मा मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे खंड
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — शालापत्रक 33

१20 संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९१६.

अंक —

(महिने) १ ते १२.

REGISTERED B. NO. 179.
पुस्तक २७. जानेवारी सन १९१६ अंक १.

# मराठी शालापत्रक

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| देश, काल, वर्तमान. | १ |
| नमस्कार चमत्कार ! | ४ |
| गुलाब-कुसुमा ! ( कविता ) | ६ |
| वानर कीं मुका मनुष्य ? | ७ |
| पक्ष्यांचीं घरटीं. | ८ |
| सहारा समुद्र. | ९ |
| " आग्नि-विमानें. " | १० |
| जिराफ. थोरपण कसें मिळवावें. | १२ |
| हवेवांचून प्राणी जगतात काय ? | १३ |
| स्वप्नांचा उपयोग. | १४ |
| विद्यार्थ्यांचें कर्तव्य काय ? | १५ |
| बेंजामिन फ्रॅन्कलिनची जबानी. | १९ |
| आळवावरचें पाणी. | २२ |

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !! विक्रीस तयार !!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

---

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१३.

व्यापाऱ्यांस कमिशन.

---

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साइज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. जानेवारी सन १९१६ अंक १.

## देश, काल, वर्तमान.

श्रीसमर्थ रामदासांनीं महाराष्ट्रांत फार मोठी कामगिरी केल्यामुळें त्यांचें नांव इतिहासांत अजरामर होऊन बसलें आहे; पण त्यांनीं कामास हात घालण्या पूर्वीं चोवीस वर्षें प्रवास व अवलोकन करण्यांत खर्च केलीं. त्यांच्या इतकें सूक्ष्म अवलोकन केलेले पुरुष फारच क्वचित् आढळून येतात. त्यावरून जन्मास आल्याचें सार्थक करावयाचें असेल तर आपणास ज्या जगांत व ज्या कालांत जगावयाचें आहे त्याचें स्वरूप समजून घेण्याकरितां खटपट केली पाहिजे. एखादे काम करूं लागल्यानंतर कांहीं वर्षांनीं हातपाय गाळून ‘ मी या कामांत उगाच पडलों, आधीं मला कोणीं सांगितलें असतें तर या भानगडींत मी बिलकूल पडलों नसतों. ’ अशी कांहीं लोक तक्रार करीत असतात, हें बोलणें खरोखर हास्यास्पद आहे आपली आवडनावड काय आहे, आपणास कोणती गोष्ट साधेल आपली योग्यता काय आहे, याचा विचार ज्याचा त्यानें केला पाहिजे. पाऊल टाकतांना पुढें खड्डा आहे किंवा सपाट जमीन आहे याकडे चालणारानेंच लक्ष पुरविलें पाहिजे. तें भाडोत्री मनुष्याकडून किंवा स्नेह्याकडून देखील समाधानकारक रीतीनें होणें शक्य नाहीं. सारांश,

आपणा सभोंवतालची परिस्थिति ओळखणें हें आपलें पहिलें काम आहे; यासच देश, काल, वर्तमान ओळखणें म्हणतात.

ही ओळख पटल्यानंतर जें तत्व मनांत बिंबवावयास पाहिजे तें हें कीं ईश्वरानें या जगाची रचना अशा रीतीनें केली आहे कीं त्यांत मनुष्यानें भीत भीत वागण्याचें कारण नाहीं. लहान मुलें कोणी परका दिसला कीं घरांत पळून जातात, अंधेरांत चार पावलें जावयाचें असलें तरी भुतें, साप, विंचू यांची कल्पना मनांत आणून घाबरतात. सारांश; अगदीं परिचित माणसें व राहती जागा सोडून बाकी सर्व जग आपणास मारण्याकरितां टपलेलें आहे असें त्यांना वाटत असतें. ही लहान मुलांची गोष्ट सोडली तरी पुष्कळ मोठ्या लोकांच्या वागणुकींत देखील हाच दोप दिसून येतो. एखाद्या युरोपियन गृहस्थाशीं बोलण्याचा, सभेंत भाषण करण्याचा किंवा नवीन एखाद्या कामाची जबाबदारी उचलण्याचा प्रसंग आला म्हणजे दुसऱ्यास पुढें ढकलून आपण मागें लपून राहण्याचा प्रयत्न चांगली मोठमोठ्या मिशाची मंडळी करीत असतांना पाहून पुष्कळ वेळा हसू येतें. खरें पाहतां इतकें घाबरण्याचें कांहींच कारण नसतें. पण जगाचा ज्यांनीं साधारणपणें विचारच केला नाहीं, त्यांना हें सगळें जग शत्रूंनीं गजबजून गेलें आहे असें वाटतें. वस्तुतः जो तो आपापल्या कामांत गढून गेलेला असतो, आमच्याशीं शत्रुत्व करण्यास तरी लोकांना फुरसत कोठें असते? पण काल्पनिक शत्रूंचा मात्र जगांत रेलचेल असल्यामुळें पुष्कळ लोकांची गाळण उडालेली असते. त्यांनीं तेथें जाऊन खरा प्रकार पाहिल्यास भूतचेष्टेप्रमाणें हा निव्वळ कल्पनेचा बाजार आहे अशी त्यांची खात्री होईल. क्वचित् तुमच्याशीं वैर करणारा एखादा मनुष्य भेटलाच तर भित्यापाठीं ब्रम्हराक्षस या न्यायानें तुमच्या घाबरटपणानें त्याला जोर चढतो; आणि तुम्ही गडबडून जात नाहीं असें दिसल्यास त्याला माघार घ्यावी लागते.



श्रीसमर्थ रामदास.

यावर कांहीं लोक असें सांगतील कीं, " तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें आमची गाळण उडते खरी, पण त्यास आमचा उपाय नाहीं. डोकें भणभणूं लागल्यावर माघार घेणें भाग पडतें; हा दोष आमच्या प्रकृतीचा आहे. कांहीं लोक जन्मतःच भिञ्या स्वभावाचे असतात

ग्रंथालय ३५४२०



व कांहीं निधड्या छातीचे असतात. " या शंकेस उत्तर देणें आवश्यक आहे. एक मोठा सेनापति मित्र-मंडळींत बसून एका घनघोर संग्रामाचें वर्णन करीत होता. तें ऐकून एकानें सेनापतीस प्रश्न केला " काय हो, पण एवढ्या धूमश्चक्रींत तुम्ही शिरला तेव्हां तुमची छाती धडधडली नाहीं काय ? " सेनापतीनें उत्तर दिलें " होय; प्रथम माझी छाती धडधडली, अंगाला घाम सुटला, सर्व कांहीं झालें. पण मी मागें पळत सुटलों नाहीं. तळावर उभा राहिलों. कांहीं वेळानें तो तोफांचा धडाका माझ्या हृदयांत भीति उत्पन्न करीनासा झाला; मी संथपणानें आपलें कर्तव्य बजावूं लागलों आणि पुढें पुढें तर तो सर्व प्रकार माझ्या इतका अंगवळणीं पडला कीं, त्याचें मला कांहींच वाटेनासें झालें. " तात्पर्य; प्रसंगीं जें कर्तव्य करण्याची वेळ येईल तें करूं लागलें पाहिजे. तळ सोडून धूम न ठोकली म्हणजे हें जग आपल्या मित्रांनीं भरलें आहे, त्यांत शत्रू फार थोडे आहेत हें कळून येईल.

लहानपणीं किंवा तरुणपणीं विचार करतांना आणखी एक गोष्ट चुकते ती अशी; एखाद्या पुस्तकांत नवी, सुंदर किंवा फायदेशीर कल्पना वाचली कीं, ती आमच्या देशांत आजपर्यंत चालू न केल्याबद्दल पूर्वजांना दोष देऊन तरुण मंडळी ती एकदम अमलांत आणूं पाहतात. युरोपांत, अमेरिकेंत, जपानांत किंवा सुधारलेल्या कोणत्याही देशांत विधवाविवाह चालू आहे, जातिनिर्बंध नाहीं, मांसाहार करण्याची पद्धति आहे, वगैरे प्रकार वाचून आमच्या देशाची उन्नति होण्याकरितां या गोष्टी आम्ही अमलांत आणणार असें बडबडूं लागतात. आणि खरोखर विश्वामित्राप्रमाणें नवीन सृष्टि बनविण्याचा प्रश्न उद्भवेल तर जगांत सुधारलेले देश कसे वागत आहेत तें पाहून त्या नमुन्यावर एक-सृष्टि बनवून टाकणेंच रास्त झालें असतें. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आपणास नवीन सृष्टि रचावयाची नाहीं; तर लाखो वर्षांपासून चालत आलेल्या जुन्या सृष्टींत आपणास दिवस काढावयाचे आहेत. ही सृष्टि आम्ही म्हणूं तशी वागणारी नाहीं. उलट पुष्कळ अंशीं तिच्या पद्धतीनें आम्हीं वागलें पाहिजे. आम्ही ज्या देशांत जन्मलों, ज्या समाजांत आपणास वावरावयाचें आहे त्या देशाचे व त्या समाजास कांहीं पूर्वपरंपरा आहे ती आधीं आपण उत्तम रीतीनें समजाऊन घेतली पाहिजे. ती समजाऊन न घेतां आमच्या देशांत अमुक गोष्ट सुरू झाली पाहिजे अशी बडबड करणें शुद्ध वेडेपणाचें लक्षण आहे.

सृष्टीची नवीन रचना करण्याचें काम आमच्याकडे कोणीं सोपविलें नसून आम्हांस जुन्या समाजांत वावरावयाचें आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी या सृष्टीची वाढ अद्याप खुंटली नाहीं ही गोष्ट देखील तितकीच खरी आहे. आजच्यापेक्षां आणखी पांच-चारशें वर्षांनीं हें जग सुधारणेच्या बाबतींत किती तरी पावलें पुढें टाकील व यांत शेंकडो फेरफार दिसून येतील; आणि हे फेरफार आमच्यासारख्या लोकांनींच केलेल्या खटपटीचें फळ असणार हें उघड आहे. तेव्हां ' मी जन्मास आलों आहें तो जगाच्या सुधारणेंत कांहींतरी भर टाकण्याकरितां आलों आहें ' असें प्रत्येक मनुष्यानें मनाशीं गांठ बांधून ठेवण्यास हरकत नाहीं. अनंत भविष्य काळाकडे नजर दिली असतां आमचें जग जुनेंपुराणें झालें आहे अशी रड करीत बसण्यांत अर्थ नाहीं. कारण पुढच्या लोकांना आमच्यापेक्षांही जुन्या जगांत दिवस काढावे लागतील. व्यास, कालिदासादि कवींनीं सुंदर उपमा लिहून टाकल्यानें अधुनिक कवीस नव्या कल्पना लिहिण्यास संधी राहिली नाहीं, सर्व प्रकारचे शोध लागून गेले, आतां आम्हास करण्यास नवीन शिल्लक कांहीं राहिलें किंवा आमच्या वाडवडिलांच्या मूर्खपणामुळें आम्हांस डोकें वर काढणें अशक्य होऊन बसलें आहे, इत्यादि अनेक प्रकारची तक्रार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सर्वच माणसें चुकीस पात्र आहेत. तेव्हां पूर्वजांनीं चुका केल्या असताल तर त्यांत अपूर्व असें कांहीं नाहीं. आतां आम्हांस जर त्या कळल्या तर त्या आपण दुरुस्त करून दाख-

विल्या पाहिजेत. नाहींतर आम्हीं इतक्या उशीरा जन्मास आल्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं असें म्हणावें लागेल. तेव्हां भविष्य काळांत आपलें नांव गाजत राहील अशी कांहींतरी कृति आपल्या हातून झाली पाहिजे.

वरील लेखाचें तात्पर्य थोडक्यांत असें सांगतां येईल.

१ जगांत भीतभीत वागण्याचें कारण नाहीं. कारण त्यांत शत्रूंपेक्षां मित्रांची संख्या अधिक आहे.

२ आपल्या समाजाची पूर्वपरंपरा नाटपणें लक्षांत घेतली पाहिजे.

३ आपली कीर्ति अजरामर राहील असें पराक्रमाचें सत्कार्य करण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे.

---

# नमस्कार चमत्कार !

महाराष्ट्रांत किंवा सर्व साधारणपणें सर्व हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें एकमेकांविषयीं आदर दाखविण्याकरितां लोक हस्तांदोलन ( शेकहँड ) करतात हें बहुतेक वाचकांना माहीत असेलच; पण इतर देशांतील कांहीं




चि. नं. १



चि. नं. २



चि. नं.



चि. नं. ४



चि. नं. ५



चि. नं. ६

नमस्कार करतात, त्याचप्रमाणें जगांत प्रत्येक देशांत कांहींना कांहींतरी चाल प्रचारांत आहे. युरोपियन चाली इतक्या चमत्कारिक आहेत कीं त्या पाहून आपणांस हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. सोबत

दिलेल्या चित्रांवरून निरनिराळ्या बारा देशांतील लोकांची पद्धति समजण्याजोगी आहे.

१ इंग्रज हस्तांदोलन करतात.

२ फ्रेंच आलिंगन देतात.

९ चिनी हात जोडून वांकतात.

१० 'सोसायटी' नांवाच्या बेटांतले लोक एकमेकांच्या नाकांस बोटानें स्पर्श करतात.

११ डाहोमी लोक बोटें ओढतात.




चि. नं. ७ चि. न. ८ चि. न. ९

३ तांबडे इंडियन ( अमेरिकेंतील मूळ रहिवासी ) तंबाकू ओढण्याच्या चिलमींची अदलाबदल करतात.

४ लापलंड बेटांतले लोक नाकावर नाक घांसतात.

१२ ब्रम्ही लोक तोंडाला तोंड लावतात.

प्रेम किंवा आदर दाखविण्याकरितां जगांत जे अनेक प्रकार शिष्टसंमत अगर रूढ आहेत त्यांचे साधारणपणें दोन विभाग पाडतां येतात एक एकमेकांना स्पर्श करून



चि. नं १० चि. नं ११ चि. न १२

५ आरबी लोक छातीवर हात ठेवतात.

६ मूर लोक खांद्याचें चुंबन घेतात.

७ सिलोनी लोक हातात गवत घेऊन सलाम करतात.

८ फिलिपाइन बेटांतले लोक पाय उचलतात व कानावर हात ठेवतात.

आणि दुसरा दुरून. पहिल्या पद्धतींत एकमेकांचे स्पर्शजन्य रोग ( खरूज, नायटे वगैरे ) एकमेकांस जडण्याचा संभव असतो. तव्हां दुसरी पद्धति—म्हणजे जिच्यांत आमच्या नमस्काराचा अंतर्भाव होतो ती—आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर आहे !

# गुलाब-कुसुमा !



( वसंततिलका. )

वा ! तूं गुलाबकुसुमा ! फूलुनी वनांत । सर्वत्र गंध पसरीसि गुणें क्षणांत !
कीं शोभवीसि निकटस्थ तरूंसि फार । तूतें निवेष्टन करी लघु वल्लि-भार १
तूं अर्पितोसि मधुपां मकरंद नित्य । तैसा सुवास, बहु होसि उदार सत्य !
तूं शुष्क होसिल तरी तव पाकळ्यांचा । होईल यांग जिथ तेथ सुगंध साचा- २
होतां प्रफुल्ल तरि गर्व-विहीन होसी । मंदानिळें हि बहु नम्र असा रहासी !
कर्णीं कथील जणुं वायु ‘ परोपकार । कीजेच ’ ऐकुनि गमे डुलतोसि फार ३
आहेस थोर सु-कुमार कुमार-सा तूं, । कृत्यें तुझीं सकल होति परार्थ-हेतु;
सोसोनियां परम-ताप सदा स्वदेहीं । देसी जनां सुख; खरा गमसी वि-देही ! ४
कोणीं जरी अरसिकें तुज वर्णिलें ना । मानीं न त्या विषयिं तूं अपमान माना !
ये यामुळेंच गुरुता जगतांत साच । रे ! साधु-वृत्ति असते सम ते अशीच ! ५

विष्णु बाळकृष्ण जोशी, कन्नडकर.

मा॰ ३५/२८



# वानर कीं मुका मनुष्य ?

'वानर' या संस्कृत शब्दाचा अर्थ (वा+नर) जवळ जवळ मनुष्य असा आहे. गेल्या शतकांत डार्विननें जें उत्क्रांतीचें तत्त्व सिद्ध केलें आहे त्याप्रमाणें पहातां देखील मनुष्यजात वानराचेंच स्वरूप होय असें ठरलें आहे. या तत्त्वाबद्दल अद्याप शंका व मतभेद चालू आहेतच. पण बहुतेकांच्या मतें उत्क्रांतितत्व ग्राह्य ठरलें आहे. विरुद्धपक्षाची एक कोटी अशी आहे कीं एखादा वानर घेऊन त्यास मनुष्य करून दाखवा. आपणांस या वादांत सध्यां शिरण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या इकडे कित्येक भिकारी वानर घेऊन येतात ते पुष्कळ लोकांनीं पाहिले असतीलच. त्यांना कित्येक गोष्टी शिकविलेल्या असतात त्या ते वानर बिनचूक करून दाखवितात. यावरून शिक्षण ग्रहण करण्याची त्यास शक्ति आहे असें ठरतें. अमेरिकेंत एका प्राणिसंग्रहालयांत सुसी नांवाच्या वानरास शिक्षण देण्याची बरीच व्यवस्था करण्यांत आल्यामुळें तो वानर कांहीं अंशीं मुक्या मनुष्याच्या योग्यतेस पोंचला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या वानरास मनुष्याप्रमाणें पोषाख घालण्यांत येतो. युरोपियन पद्धतीप्रमाणें तो खुर्चीवर बसून टेबलावर ठेवलेलें जेवण ऐटींत खातो. अन्न खातांना कांट्याचा व चमच्याचा उपयोग कसा करावा व पाणी पिण्यास पेला कसा उचलावा हें तो बरोबर शिकला आहे. या वानरास चौकोन, त्रिकोण, चिति, शंकु वगैरे भूमिति व गणीत विषयक आकृति ओळखण्यास शिकविलें आहे. कोणत्याही आकृतीचें नांव सांगतांच तो ती अचूक उचलून देतो. त्याचप्रमाणें हिरवा, पिवळा, निळा व तांबडा रंग त्या वानरास ओळखूं येतो. निरनिराळ्या रंगाच्या पट्ट्या तेथें ठेवल्या आहेत. त्यांपैकीं ज्या रंगाचें नांव घ्यावें ती पट्टी तो उचलून देतो. हा वानर अगदीं लहान असतांना धरून आणला. त्यावेळीं त्यास चालतांदेखील येत नव्हतें. त्याला खाण्यास दूध व फळें या खेरीज कांहीं देण्यांत आलें नाहीं. सध्यां त्याचें चालणें व वागणें पुष्कळ अंशीं मनुष्याप्रमाणें आहे. तेव्हां त्यास वानर म्हणावा किंवा जंगली मुका मनुष्य म्हणावा याची शंका पडूं लागली आहे. चेहऱ्यावरून त्यास वानर ठरवावा तर वानरापेक्षां कुरूप माणसें आढळतात. अंगावरच्या केसाकडे लक्ष द्यावें तर जंगली लोकांच्या अंगावर पुष्कळ केस असतात. पण मुक्या माणसांत व या वानरांत एक महत्त्वाचा भेद आहे तो हा कीं, मुकीं माणसें बहिरीं असतात असा नियम आहे. हा वानर मुका आहे पण बहिरा नाहीं. म्हणून ऐकूं येत असून ज्यास बोलतां येत नाहीं तो वानर अशी व्याख्या केली पाहिजे !



सुसी नांवाचा वानर अभ्यास करीत आहे.

ग्रामी ३५/२८



# वानर कीं मुका मनुष्य ?

'वानर' या संस्कृत शब्दाचा अर्थ (वा+नर) जवळ जवळ मनुष्य असा आहे. गेल्या शतकांत डार्विननें जें उत्क्रांतीचें तत्त्व सिद्ध केलें आहे त्याप्रमाणें पहातां देखील मनुष्यजात वानराचेंच स्वरूप होय असें ठरलें आहे. या तत्त्वाबद्दल अद्याप शंका व मतभेद चालू आहेतच. पण बहुतेकांच्या मतें उत्क्रांतितत्व ग्राह्य ठरलें आहे. विरुद्धपक्षाची एक कोटी अशी आहे कीं एखादा वानर घेऊन त्यास मनुष्य करून दाखवा. आपणांस या वादांत सध्यां शिरण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या इकडे कित्येक भिकारी वानर घेऊन येतात ते पुष्कळ लोकांनीं पाहिले असतीलच. त्यांना कित्येक गोष्टी शिकविलेल्या असतात त्या ते वानर बिनचूक करून दाखवितात. यावरून शिक्षण ग्रहण करण्याची त्यास शक्ति आहे असें ठरतें. अमेरिकेंत एका प्राणिसंग्रहालयांत सुसी नांवाच्या वानरास शिक्षण देण्याची बरीच व्यवस्था करण्यांत आल्यामुळें तो वानर कांहीं अंशीं मुक्या मनुष्याच्या योग्यतेस पोंचला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या वानरास मनुष्याप्रमाणें पोषाख घालण्यांत येतो. युरोपियन पद्धतीप्रमाणें तो खुर्चीवर बसून टेबलावर ठेवलेलें जेवण ऐटींत खातो. अन्न खातांना कांट्याचा व चमच्याचा उपयोग कसा करावा व पाणी पिण्यास पेला कसा उचलावा हें तो बरोबर शिकला आहे. या वानरास चौकोन, त्रिकोण, चिति, शंकु वगैरे भूमिति व गणीत विषयक आकृति ओळखण्यास शिकविलें आहे. कोणत्याही आकृतीचें नांव सांगतांच तो ती अचूक उचलून देतो. त्याचप्रमाणें हिरवा, पिवळा, निळा व तांबडा रंग त्या वानरास ओळखूं येतो. निरनिराळ्या रंगाच्या पट्ट्या तेथें ठेवल्या आहेत. त्यांपैकीं ज्या रंगाचें नांव घ्यावें ती पट्टी तो उचलून देतो. हा वानर अगदीं लहान असतांना धरून आणला. त्यावेळीं त्यास चालतांदेखील येत नव्हतें. त्याला खाण्यास दूध व फळें याखेरीज कांहीं देण्यांत आलें नाहीं. सध्यां त्याचें चालणें व वागणें पुष्कळ अंशीं मनुष्याप्रमाणें आहे. तेव्हां त्यास वानर म्हणावा किंवा जंगली मुका मनुष्य म्हणावा-याची शंका पडूं लागली आहे. चेहऱ्यावरून त्यास वानर ठरवावा तर वानरापेक्षां कुरूप माणसें आढळतात. अंगावरच्या केसाकडे लक्ष द्यावें तर जंगली लोकांच्या अंगावर पुष्कळ केस असतात. पण मुक्या माणसांत व या वानरांत एक महत्त्वाचा भेद आहे तो हा कीं, मुकीं माणसें बहिरीं असतात असा नियम आहे. हा वानर मुका आहे पण बहिरा नाहीं. म्हणून ऐकूं येत असून ज्यास बोलतां येत नाहीं तो वानर अशी व्याख्या केली पाहिजे !



सुसी नांवाचा वानर अभ्यास करीत आहे.

# पक्ष्यांचीं घरटीं.

घरीं कावळे, चिमण्या, सुतारपक्षी वगैरे लहान-मोठ्या पाखरांचीं घरटीं पुष्कळ मुलांनीं पाहिलीं असतील. तीं बांधण्याचे कामीं त्यांनीं दाखविलेलें चातुर्य पाहून मन आश्चर्यचकित होतें. तशीं घरटीं बांधण्यास पुष्कळ कारागिरांना देखील जड जाईल इतकें असून कित्येक दुष्ट मुलें जातां जातां दगड मारून पक्ष्यांचीं घरटीं झाडांवरून खालीं पाडतात व तीं एक दोन मिनिटें उसकटून पाहून फेंकून देतात. ही निर्दयपणाची संवय बरी नव्हे. आपण दुसऱ्यास होईल तितकी मदत केली पाहिजे. तें एकीकडे ठेवून राहत्या घराची नास-



चि. नं. १

धूस करण्यानें त्या पक्ष्यास किती दुःख होत असेल याचा प्रत्येक मुलानें विचार करावा.

शहाण्या व सदय अंतःकरणाच्या मुलांची वागणूक याच्या उलट असली पाहिजे. अशा मुलांसाठीं येथें दोन चित्रें दिलीं आहेत. पहिल्या चित्रांत पिसें दोऱ्यांच्या टोकांत अडकवून झाडाच्या बुंध्यास कशीं खोंचून ठेवावींत तें दाखविलें आहे. हीं पिसें वाऱ्यानें हालत राहतील अशा ठिकाणीं. पाखरांनीं पिसें चोचींत धरतांच



चि. नं. २

सहज निघतील अशा बेतानें व पक्ष्याच्या घरट्यापासून होईल तितकें जवळ टांगून ठेवलीं पाहिजेत. दुसऱ्या चित्रांत लोकर, दोरे व टोंकें ठेचून पिंजलेले दोराचे तुकडे, झाडावर खिळे मारून किंवा नुसते खोंचून कसे ठेवले असतां ते पक्ष्यांना घरटीं बांधण्याकरितां नेतां येतील तें दाखविलें आहे.

# सहारा समुद्र.

' सहारा ' नांवाचें निर्जन वाळवंट आफ्रिकेंत आहे. ही गोष्ट पुष्कळांच्या वाचनांत आली असेल. पण ही नैसर्गिक रचना एका फ्रेंच एंजिनियरास बरी वाटत नाहीं. या शहाण्या गणीत्याचें नांव प्रो० इच-गोयन. तो असें म्हणतो कीं हें वाळवंट निर्जन दिसतें याचें कारण तेथें पिकें नाहींत; याचें कारण तेथें पाऊस नाहीं; आणि त्याचेंही कारण असें कीं तेथें समुद्र वहात येईल. मग भूमध्यसमुद्र कोरडा होईल अशी कोणी शंका काढील तर तेथें अटलांतिक महासागरांतलें पाणी येईल असें तो आश्वासन देत आहे. हा कालवा खणण्यास पनामापेक्षां कमी खर्च येईल व फायदा जास्त होईल असें तो प्रतिपादन करतो. खरोखरच असा प्रकार घडून आला तर तेथें कांहीं ठिकाणीं असलेल्या प्राण्यांची कशी धांदल उडेल याचें विनो-



सहारा वाळवंटाचा सहारा समुद्र केल्यास कोण धांदल उडेल ती पहा !

नाहीं ! या पंडिताचें असें म्हणणें आहे कीं सहारा वाळवंट जर समुद्र बनविला तर हें वाळवंट म्हणजे उत्तम सुपीक देश होईल; पाऊस भरपूर पडेल आणि लोक चैनींत तेथें वस्ती करतील. तो आणखी असेंही म्हणतो कीं हें काम फारसें कठीण नाहीं. फक्त पन्नास मैलांचा एक कालवा भूमध्यसमुद्रांतून सहारापर्यंत खणला कीं भूमध्यसमुद्रांतील पाणी तेथें आपोआप दात्मक चित्र येथें दिलें आहे. उष्णकटिबंधांतील प्राणी व वनस्पती यांचें वर्णन भूगोलांतून पाहून या चित्राचा अर्थ लावण्याचा प्रयत्न बालवाचकांनीं करावा म्हणजे त्यांतली गंमत त्यांना चांगल्या प्रकारें समजेल. भूगोल समजाऊन घेऊन त्याबरोबरच करमणूक झाल्यास आणखी काय पाहिजे ?

---

५५/५८ ३१/८



# " अग्नि-विमानें. "

( लेखक—दा० ता० म०. )

आज वरील मथळा वाचल्याबरोबर सर्व लोकांचें लक्ष आधुनिक काळांत यूरेशियाच्या पश्चिमार्धांत संयुक्त राष्ट्रांच्या चाललेल्या युद्धभूमीवरील आकाश-मार्गाकडे जाण्याचा विशेष संभव दिसतो. चालू मथळा पाहिल्यावर् अंतरंग पाहण्याची उत्सुकता ज्यांची नाहीं असे लोक फार थोडेच सांपडतील. परंतु त्या रणभूमीवरच कां लक्ष पुरवाना. आज वैमानिकांच्या हालचालींचीं उदाहरणें, आपणास प्रत्यक्ष या चर्म चक्षूंनीं दिसल्याचा भास होत आहे, निदान प्रत्यक्ष नाहींतर त्यांचींच चित्रें मासिकादिकांतून येऊन आपल्या पुढें स्तब्ध उभीं राहात आहेत. या चित्रांना पाहून मन बालस्वभावानुरूप वस्तु काय आहे, त्याची उत्पत्ति झाली कशी, चालू स्थिति कशी प्राप्त झाली वगैरे कल्पना मनासमोर उभ्या राहून ज्ञान मिळविण्याची इशारत देतात.

बाल स्वभावच आहे कीं, मूल वस्तु पाहतें; मग त्याच्या बाह्यांगानुरूप त्याचें मन वस्तूच्या ठिकाणीं वेधून राहतें. बाह्यांग मोहक असल्याशिवाय मन वेधणार नाहीं, मनुष्याच्या मोठेपणाचा स्वभाव बालपणच्या पायावर अवलंबून असल्यामुळें आणि प्रस्तुतचा विषय उत्सुकता दोरीनें घट्ट बांधून ठेवण्यास समर्थ असल्यामुळें विषयाची गोडीच वाटण्याचा संभव आहे. मनाला बांधून ठेवण्यास उत्सुकता दोरी सर्वांपेक्षां ज्यास्त समर्थ आहे. आणि उत्सुकतेनें चालू विषयाकडे मन ओढीत असल्यानें तिकडे आपणांस वळणें अवश्य आहे.

सर्वांस माहीत आहे कीं, विमानांची कल्पना आधुनिक काळांतील आहे. पुरातन काळीं राम—रावण, पांडव—कौरव इत्यादि द्वंद्वांच्या पौराणिक युद्धांत तरी विमानाचें साहाय्य मुळींच नव्हतें, असें पुराणादिक ग्रंथ आपणांस साक्ष देतात. भूतलावर आजपर्यंत अनेक विद्यांचा आणि कलांचा शोध लागून पाश्चिमात्य राष्ट्रांचें पाऊल पुढें पुढें पडत चाललें आहे. त्यापैकींच प्रस्तुत विषयाचा शोध होय. हीं विमानें म्हणजे आकाशांतील नौकाच होत. मात्र समुद्रांतील नौकेप्रमाणें जलपृष्ठावरच राहण्याची जरूर लागत नाहीं; वायुसागराच्या पोटांतच भ्रमण करितां येतें, वायुपृष्ठावर राहतां येत नाहीं. उष्णतेनें सर्व पदार्थ प्रसरण पावतात, हें सर्वांस माहीत आहेच. बर्फास उष्णता लाविल्यानें तें वितुळतें, पाण्यास लाविल्यानें त्याची वाफ होते, हीं नित्य पाहण्यांतच आहेत. पाणी आदिकरून पदार्थ ज्याप्रमाणें विरल स्थितींत येतात त्याप्रमाणें हवेला उष्णता लाविल्यानें तीही विरल व हलकी होते. विरल हवा घन हवेपेक्षां हलकी असते याच तत्त्वाचा उपयोग करून हीं अग्नि—विमानें उदयास आलीं. यांना उष्ण हवेचीं विमानें असें म्हणतात. यांना वात—नौका म्हणण्यास हरकत नाहीं.

विवक्षित आकारमानाच्या हवेस तिचें आकारमान दुप्पट होईपर्यंत उष्ण केलें तर उष्ण केलेली हवा तेवढ्याच आकारमानाच्या मूळच्या थंड हवेच्या निम्मे वजनास भरेल. पाण्यांत बूच किंवा तशासारखाच हलका पदार्थ बुडविला म्हणजे ज्याप्रमाणें वर येतो त्याचप्रमाणें जरी गुरुत्वाकर्षण शक्ति आहे तथापि थंड हवेंतून उष्ण हवेचा वर जाण्याचा कल असतो. या तत्वाचा चालू विमानांत उपयोग केला आहे.

पातळ कापडाचे किंवा पातळ कागदाचे मोठे गोल,

वामा ३५५०



( विमानें ) करून त्यांच्या तोंडाशीं रसरशीत निखा त्याची शेगडी धरून किंवा मद्यार्काच्या भिजलेल्या कापसाच्या बोळ्यास पेटवून आंतील हवा उष्ण करितात. उष्णतेनें पदार्थ प्रसरण पावतात हें माहीत आहेच. विमानांतील हवा प्रसरण पावते आणि आंतील कांहीं हवा बाहेर निघून जाते. आणि आंत राहिलेली हवा तेवढ्याच आकारमानाच्या बाहेरच्या हवेपेक्षां हलकी असते, येवढ्यानें विमान वर जाईलच असें नाहीं, तर विमानांतील हवा आणि विमान यांचें वजन त्याच आकारमानाच्या बाहेरील हवेपेक्षां कमी भरलें पाहिजे. बरोबर भरल्यास विमान स्थिर राहील, ज्यास्त भरल्यास खालीं पडेल, आणि कमी भरल्यास वर जाईल. ( वर याचा अर्थ भूतलापासून दूर असा आहे. ) विमान वर गेल्यास आपलें ऐच्छिक कार्य झालें असें समजावें. विमान वर जाण्याला विमानांतील हवा व विमान यांचें वजन विमानाच्या बाहेरील हवेपेक्षां हलकें झालें पाहिजे.

हेंच विमान मोठ्या प्रमाणावर केल्यास मनुष्यास वर जाण्यास हरकत पडणार नाहीं. अशा विमानास इंग्रजींत " मांगोल्फिअर " असें म्हणतात. हें नांव देण्याचें कारण असें आहे कीं, या विमानाचा शोध मांगोल्फिअर या बंधुद्वयांनीं लाविला. या विमानास पेटण्याचें फार भय असतें, म्हणून याचा उपयोग अलीकडे कोणी करीत नाहींत. तथापि याचा उपयोग पाहिला म्हणजे सांप्रत विमानांचें तत्त्व चांगलें लक्षांत येतें. इ० स० १७८५ सालीं अशा प्रकारचें एक विमान ५००० फूट उंच गेल्यावर पेटल्याचें समजतें. यावरून याची उंच जाण्याची शक्ति साधारणपणें कळून येते. विमान वर जातें त्यावेळचा वर जाण्याचा स्वार्थ म्हणजे शक्ति समजण्याची आवश्यकता आहे. जड वायूतून विवक्षित आकारमानाचा हलका वायु ज्या जोरानें वर जातो तो जोर सारख्या आकारमानाच्या दोहों वायूंच्या वजनांच्या अंतराबरोबर असतो.

म्हणून जर एक घनफूट हवेस तिचा आकार दुप्पट होईपर्यंत उष्ण केलें तर त्या उष्ण केलेल्या हवेस वर चढविण्याचा जोर साध्या थंड हवेचें वजन आणि उष्ण केलेल्या हवेचें आणि विमानाचें वजन यांच्या वेरजेनें कमी भरेल. उदाहरणार्थ, थंड हवेचें वजन १००० ग्रेन मानिल्यास उष्ण हवेचें ५०० ग्रेन होय. विमानाचें वजन २५० ग्रेन आहे असें मानिलें म्हणून

विमानाची शक्ति = { १०००-( ५००+२५०= ७५० ) } २५० ग्रेन होय. आज विमानांची कल्पना आणि अग्नि-विमानें यांची थोडी माहिती झाल्यावर आनंदवश होऊन जाण्यापेक्षां आणखी सवडीप्रमाणें चालू काळांत भटकणाऱ्या विमानाची माहिती देण्याचा प्रयत्न करूं.


# स्वयंपुरोहित.


## [ नवीन सुधारलेली मंत्रार्थासह चवथी आवृत्ति. ]

हें पुस्तक जवळ असलें म्हणजे देवपूजा, संध्या, मुंज, लग्न, व्रतें, श्रावणी, दशक्रिया वगैरे सर्व धर्मविधि स्वत: करतां येतात व पंचांगही समजतें. भटाची गरज पडत नाहीं. किं० तूर्त ८६.

मोतीराव वानखडे, करजगांव ( वऱ्हाड. )

# जिराफ.

जिरफाची उंच मान व लांबलचक तंगड्या पाहि-



ल्या असतां त्यानें आपलें भक्ष्य झाडावर मिळवावें असा ईश्वरी संकेत दिसतो; आणि प्रत्यक्ष अनुभव देखील तसाच आहे. पण कधीं कधीं तेवढ्यानें त्याचें काम भागत नाहीं. जमीनीवर पडलेलीं फळें खाणें त्यास भाग पडतें. अशा वेळीं त्याच्या लांबलचक तंगड्या त्याला गैरसोईच्या भासतात. पण जिराफ म्हणजे महावस्ताद प्राणी आहे. तो लगेच तंगड्या फांकून—पाय पसरून—उभा राहतो; व जमीनीवरचें भक्ष्य खातो. त्यावरून उंचावरचा जिन्नस घ्यावयाचा असेल तेव्हां पाय जोडावे व जमीनीवरचा पाहिजे असेल तेव्हां पाय पसरावे हा सिद्धांत माणसांप्रमाणें जिराफास देखील माहीत आहे असें ठरतें.

# थोरपण कसें मिळवावें.

ज्याला सत्ता पाहिजे असेल त्यानें नम्र व्हावें, लोकांपासून सन्मान हवा असेल तर लोकांचें बरें करावें, लोकांची सेवा करावी.आजपर्यंत ज्यांचे म्हणून लोकांनीं देव्हारे केले आहेत त्यांनीं मनुष्यजातीच्या कल्याणासाठीं देह झिजविला आहे.

आपल्या परिस्थितीप्रमाणें, आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपणांस दुसऱ्यांचे कल्याण करितां येईल. आरंभ आपल्या घरापासून केला पाहिजे. मनुष्य घरांतील दुसऱ्या माणसांच्या सर्वांहून अधिक उपयोगीं पडेल त्याला सर्वांहून अधिक मान मिळेल. घराहून आपलें मोठें कुटुंब, नंतर गांव, नंतर देश, नंतर सर्व मानव जाती ह्या प्रमाणें आपलें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढविलें पाहिजे. घराचा, आपल्या माणसांचा त्याग करून एकदम मानवजातीवर प्रेम करूं पाहणें हा उलटा मार्ग आहे, त्या पासून हातीं कांहीं लागत नाहीं.

ज्याला खरें थोरपण पाहिजे असेल त्यानें नम्र झालें पाहिजे. आपलेपणा विसरून आपल्या बंधु-भगिनींच्या कल्याणाची नेहमीं चिंता वाहिली पाहिजे. जो ह्या रीतीनें आपलेपणा गमावून बसतो त्याला सुख व थोरपण मिळतें. ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादिकांनीं आपला बडेजाव कशानें होईल, लोक आपल्या चरणीं कसे लागतील, हा विचार केला नाहीं. दादाभाई नौरोजी, माधव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, ह्यांनीं आपला वेळ सुख-चिंतनांत घालविला नाहीं. लोकांचें हित कशानें होईल हीच चिंता त्यांना आहे व असे. ह्या उद्देशानेंच अहोरात्र त्यांचे प्रयत्न चालू असत.

आणि म्हणूनच ते आपणांस वंदनीय झाले आहेत. त्यांचें मीपण निवून गेलें होतें, माझें वैभव कशानें वाढेल, मला लोक बरे कसे म्हणतील, ह्या विचारांचा त्यांच्या परार्थपर मनास विटाळहि झाला नाहीं. जनहिताची चिंता त्यांच्या मनीं नेहमीं जागृत असे, त्या चिंतेनेंच त्यांनां थोरपण लाधलें.

मीपण, अभिमान हा मनुष्याला लघुत्व आणणारा आहे. हा सुटल्याशिवाय थोरपणाची वाट सांपडणार नाहीं. अभिमानाचें ओझें पाठीवर घेऊन थोरपणाची चढण चढणें अशक्य आहे. ह्यासाठीं हें जड ओझें खालीं ठेविलें पाहिजे, ही पहिली पायरी आहे. ही पायरी चढल्याशिवाय पुढें जातांच येणार नाहीं. त्यासाठींच तुकाराम म्हणतातः—

**योग तप याचि नांवें। गळित्व व्हावें अभिमानानें ।**
**करणें तें हेंचि करा । सत्य बरा व्यापार ॥**
**तरि खंडे येरझार । निवे भार देहाचा ॥**
**तुका म्हणे मानामान । हें बंधन नसावें ॥**

---

# हवेवांचून प्राणी जगतात काय ?

या प्रश्नास ‘ नाहीं ’ असें कोणीही उत्तर देईल; आणि बहुधा तेंच खरें आहे. कांहीं सूक्ष्म जंतू मात्र हवेवांचून जगतात असें प्रयोगानें सिद्ध झालें आहे. पण त्या जंतूंची गणना वनस्पतींत करावी किंवा प्राण्यांत करावी याबद्दल मतभेद आहे. एवढें मात्र निर्विवाद आहे कीं कांहीं प्राणी निद्रित स्थितींत असतांना त्यांना फार थोडी हवा पुरते; व ते हालचाल करूं लागले म्हणजे त्यांना अधिक हवेची जरूरी असते. उदाहरणार्थ, हिवाळ्यांत बेडकांना फार थोडी हवा पुरते, कारण त्यावेळीं त्यांना हालचाल करावयाची नसते. अत्यंत कडक थंडी पडणाऱ्या प्रदेशांत तर हिवाळ्यांत बेडूक जमिनींतच राहतात. त्या वेळीं त्यांना जो कांहीं थोडा जीव असतो त्याचें संरक्षण होण्यास जमिनींतली हवा पुरते. आतां काळ्या फत्तरांत जन्म पावून कांहीं बेडूक मोठे झाल्याचीं उदाहरणें बरेच लोक सांगतात. त्यांत कांहीं अतिशयोक्ति असण्याचा संभव असला तरी त्यांत कांहीं खरेपणाचा अंश असण्याचा संभव आहे. युरोपियन शास्त्रवेत्त्यांच्या मतें अशा ठिकाणीं बारकाईनें पाहिलें असतां कोठें तरी चीर सांपडेल. त्यांतून हवेचा पुरवठा होत असतो. तथापि प्राण्याची हालचाल बंद असल्यास फार थोड्या हवेवर त्याचा निर्वाह होतो हें निर्विवाद आहे. यास अपवादात्मक कांहीं प्राणी आहेत. ते हिवाळ्यांत अगदीं गोठून जातात आणि त्यांना परत ऊन केले असतां ते सजीव होतात. ते गोठून गेले म्हणजे त्यांचें चलनवलन अगदीं बंद पडतें व त्या स्थितींत त्यांना हवेची आवश्यकता नाहीं हें खरें. पण त्या वेळीं त्यांना निर्जीव म्हटलें पाहिजे असा शास्त्रज्ञांचा कोटिक्रम आहे. योगसाधनांच्या योगानें कित्येक तपस्वी निर्वात ठिकाणीं बरींच वर्षें घालविल्याचीं उदाहरणें पुष्कळांनीं ऐकलीं असतील.

आणि म्हणूनच ते आपणांस वंदनीय झाले आहेत. त्यांचें मीपण निवून गेलें होतें, माझें वैभव कशानें वाढेल, मला लोक बरे कसे म्हणतील, ह्या विचारांचा त्यांच्या परार्थपर मनास विटाळहि झाला नाहीं. जनहिताची चिंता त्यांच्या मनीं नेहमीं जागृत असे, त्या चिंतेनेंच त्यांनां थोरपण लाधलें.

मीपण, अभिमान हा मनुष्याला लघुत्व आणणारा आहे. हा सुटल्याशिवाय थोरपणाची वाट सांपडणार नाहीं. अभिमानाचें ओझें पाठीवर घेऊन थोरपणाची चढण चढणें अशक्य आहे. ह्यासाठीं हें जड ओझें खालीं ठेविलें पाहिजे, ही पहिली पायरी आहे. ही पायरी चढल्याशिवाय पुढें जातांच येणार नाहीं. त्यासाठींच तुकाराम म्हणतातः—

**योग तप याचि नांवें। गळित्व व्हावें अभिमानानें ।**
**करणें तें हेंचि करा । सत्य बरा व्यापार ॥**
**तरि खंडे येरझार । निवे भार देहाचा ॥**
**तुका म्हणे मानामान । हें बंधन नसावें ॥**

# हवेवांचून प्राणी जगतात काय ?

या प्रश्नास 'नाहीं' असें कोणीही उत्तर देईल; आणि बहुधा तेंच खरें आहे. कांहीं सूक्ष्म जंतू मात्र हवेवांचून जगतात असें प्रयोगानें सिद्ध झालें आहे. पण त्या जंतूंची गणना वनस्पतींत करावी किंवा प्राण्यांत करावी याबद्दल मतभेद आहे. एवढें मात्र निर्विवाद आहे कीं कांहीं प्राणी निद्रित स्थितींत असतांना त्यांना फार थोडी हवा पुरते; व ते हालचाल करूं लागले म्हणजे त्यांना अधिक हवेची जरूरी असते. उदाहरणार्थ, हिंवाळ्यांत बेडकांना फार थोडी हवा पुरते, कारण त्यावेळीं त्यांना हालचाल करावयाची नसते. अत्यंत कडक थंडी पडणाऱ्या प्रदेशांत तर हिंवाळ्यांत बेडूक जमिनींतच राहतात. त्या वेळीं त्यांना जो कांहीं थोडा जीव असतो त्याचें संरक्षण होण्यास जमिनींतली हवा पुरते. आतां काळ्या फत्तरांत जन्म पावून कांहीं बेडूक मोठे झाल्याचीं उदाहरणें बरेच लोक सांगतात. त्यांत कांहीं अतिशयोक्ति असण्याचा संभव असला तरी त्यांत कांहीं खरेपणाचा अंश असण्याचा संभव आहे. युरोपियन शास्त्रवेत्त्यांच्या मतें अशा ठिकाणीं बारकाईनें पाहिलें असतां कोठें तरी चीर सांपडेल. त्यांतून हवेचा पुरवठा होत असतो. तथापि प्राण्याची हालचाल बंद असल्यास फार थोड्या हवेवर त्याचा निर्वाह होतो हें निर्विवाद आहे. यास अपवादात्मक कांहीं प्राणी आहेत. ते हिवाळ्यांत अगदीं गोठून जातात आणि त्यांना परत ऊन केले असतां ते सजीव होतात. ते गोठून गेले म्हणजे त्यांचें चलनवलन अगदीं बंद पडतें व त्या स्थितींत त्यांना हवेची आवश्यकता नाहीं हें खरें. पण त्या वेळीं त्यांना निर्जीव म्हटलें पाहिजे असा शास्त्रज्ञांचा कोटिक्रम आहे. योगसाधनांच्या योगानें कित्येक तपस्वी निर्वात ठिकाणीं बरींच वर्षें घालविल्याचीं उदाहरणें पुष्कळांनीं ऐकलीं असतील.

# स्वप्नांचा उपयोग.

आमच्या देशांत कांहीं भोळेपणाच्या समजुती चालू आहेत, त्यांपैकींच स्वप्नमीमांसा ही होय. स्वप्नांत जें दिसतें, त्याच्या उलट अनुभव येतो. अमूक पदार्थ स्वप्नांत दिसले तर ते शुभसूचक व अमूक अनिष्टसूचक असे नियम देणारीं कांहीं पुस्तकें देखील मुलांनीं पाहिलीं असतील. पण त्यांतील नियमांवर विश्वास ठेवून स्वप्नाचा अर्थ करण्यांत मुलांनीं कधीं वेळ खर्चू नये. कारण असें करणें निवळ अडाणीपणाचें लक्षण आहे. चांगल्या विद्वान् शास्त्रवेत्त्यांनीं अलीकडे स्वप्नांचा पूर्ण विचार करून हा निवळ कल्पनेचा खेळ आहे व त्याला भविष्य ज्ञानाच्या दृष्टीनें कवडीइतकी देखील किंमत नाहीं असें ठरविलें आहे. जगांत प्रत्येक गोष्टीचा कांहींना कांहीं उपयोग असलाच पाहिजे. या न्यायानें स्वप्नांचाही आमच्या जीवितास उपयोग होतो असें शास्त्रज्ञांनीं कबूल केलें आहे. स्वप्नांचा उपयोग म्हटला म्हणजे कल्पनाशक्तीस स्वैर संचार करण्यास मोकळीक मिळून झोंपेची स्थिति कायम राहते हा होय. आमच्या इंद्रियांना धक्का बसल्यानें बहुतेक स्वप्नांना प्रारंभ होतो. हातावर, पायावर, छातीवर किंवा कोठेंहीं आंगावर पांघरुणाचा दाब पडून, आवाज कानांत शिरून, पचनेंद्रियांत कांहीं अव्यवस्थितपणा होऊन किंवा शरीराचा कोणताही भाग वेडावांकडा पडण्यानें स्वप्नें पडूं लागतात. वर सांगितल्यापैकीं एक किंवा अनेक कारणें घडून आलीं असतां मनास चलन मिळतें व या चालनास स्व प्नांचें रूप मिळालें नाहीं तर मनुष्य जागा होतो. यावरून क्षुल्लक कारणांनीं निद्राभंग न होतां झोंपेची स्थिति पुष्कळ वेळपर्यंत कायम राहून मनुष्य दुसऱ्या दिवशीं सकाळीं ताजातवाना होऊन उठण्याकरितां स्वप्नाची योजना विधात्यानें केली आहे असें म्हणतां येईल. समजा, आमच्या आंगावरचें पांघरूण बाजूस होऊन आंग उघडें पडलें असलें तर आम्हांस थंडी वाजणार. तिचें निवारण करण्यासाठीं जर पांघरूण उचलण्याचा विचार आमच्या मनांत आला तर त्या प्रमाणें आम्ही कृती करूं व आमची झोंपमोड होईल. पण त्या ऐवजीं थंडी वाजल्याबरोबर आपण एका नदीवर सकाळच्या प्रहरीं स्नानास गेलों आहों असें स्वप्न पडल्यास ती थंडी निवारण करण्याच्या भानगडींत मन पडत नाहीं. छातीवर पांघरूण पडून रुधिराभिसरणास किंचित् व्यत्यय आला असला तर आपल्या छातीवर कोणी बसला आहे व तो आपणास हालचाल करूं देत नाहीं असें स्वप्न पडतें व हातपाय हालविण्याकडे मनाची प्रवृत्ति होत नाहीं. सारांश, श्रीमंत लोक झोंप घेत आसतांना दरवाजावरचा शिपाई ज्याप्रमाणें किरकोळ कामासाठीं आलेल्या लोकांना कांहींतरी थापा देऊन बाहेरच्या बाहेर वाटेस लावतो आणि श्रीमंतांच्या विश्रांतीस व्यत्यय येऊं देत नाहीं, त्याप्रमाणें मन व शरीर निद्रावश असतां लहानसहान कारणांनीं त्यांना त्रास पोंचूं नये म्हणून स्वप्नें पडत असतात. त्यांचा भविष्य काळीं घडून येणाऱ्या गोष्टींशीं अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं.

# विद्यार्थ्यांचें कर्तव्य काय ?

**लेखक**—आनंदीबाई शेणवई–आश्रम.

विद्या शिकणारीं जीं मनुष्यें तीं विद्यार्थी अशी व्याख्या आहे. जगाच्या नियमाप्रमाणें सातपासून पंचवीस वर्षेपर्यंत शाळेंत शिकण्याची विद्या असते. परंतु खरें पाहूं गेलें तर मनुष्यास जन्मास आल्यापासून मरे तोंपर्यंत कांहींना कांहीं शिकावयाचें असतेंच. प्रथम अक्षरांची ओळख, नंतर लिहिणें वाचणें व जगाची माहिती करून घेणें व अनेक प्रकारचीं शास्त्रें शिकणें येवढ्यानें विद्यार्थ्यांचें कर्तव्य झालें असें नाहीं.

वर सांगितलेल्या गोष्टी ह्या शिकल्या तर पाहिजेच; परंतु त्यांच्या बरोबरीनें सद्गुण संपादन करीत जावें. त्याशिवाय विद्या व्यर्थ आहे. सद्गुणांच्या योगानें मनुष्य जगास पूज्य वाटतो आणि प्रिय होतो. सद्गुणांचें सामान्य लक्षण दुसऱ्यांचें हित चिंतणें, सत्य भाषण करणें होय. शिवाय दया, क्षमा, शांति, परोपकार, संतोष, सभ्यपणा, मातापिता, गुरु, देव, ह्यांवर भक्ति, मर्यादा इत्यादि गुण देखील सद्गुणांत मोडतात.

ह्या जगांत चांगलेपणा आणि वाईटपणा दोन्हीही आहेत. जो मनुष्य नेहमीं चांगल्याकडे लक्ष देतो त्याचा स्वभाव चांगला होत जातो. जो वाईटाकडे लक्ष देतो त्याचा स्वभाव वाईट होत जातो. ज्याचा स्वभाव चांगला असतो त्याचें मन सदासर्वदा संतुष्ट असतें. त्यामुळें त्याच्या जवळच्या सर्व मनुष्यांस सुख व समाधान होतें. सुस्वभाव हें सुखप्राप्तीचें खरें साधन आहे. किती जरी विद्या असली तरी दुःस्वभावी मनुष्याच्या हातून त्या विद्येचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. सुस्वभावी मनुष्याच्या हातून थोड्या विद्येचा देखील पुष्कळ उपयोग होऊन तीं मनुष्यें इतरांस सुख देण्यास पात्र होतात.

आतां दुसऱ्याचें हित करावें व परोपकार करावा असें वर सांगितलें आहे. तर कोणी म्हणेल आम्हांला आमचें शिकणें सोडून हीं कामें करण्यास वेळ कोठें आहे ? परंतु ह्या कामांस वेळच खर्च करावा लागत नाहीं. केवळ मनोवृत्तीनें देखील करितां येतात. उदाहरणार्थ, वर्गांत एकाचा नंबर वर आला तर दुसऱ्यानें त्याच्याशीं द्वेष न करतां आपणसुद्धां नंबर वर आणण्याचा प्रयत्न करावा. ह्या जगांत कोणासही स्वतांचें वाईट व्हावें असें वाटत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. तथापि आपल्या हितासाठीं इतरांचें अहित करूं नये.

आतां परोपकार म्हणजे केवळ आपली संपत्ति, वेळ व शक्ति लोकांकरितां खर्च केल्यानें होतो असें नाहीं. वेळ पडली तर थोड्या बहुत प्रमाणांत खर्च केला तर हरकत नाहीं. करूंच नये असें मी म्हणत नाहीं. परोपकाराचा खरा अर्थ दुसऱ्यास जवळ करून घेणें एक आणि दुसरा ईश्वरास जवळ करून घेणें होय. जगांतील कोणत्याही प्राण्यास जवळ करून घेण्यास नम्रता हा गुण फार उपयोगीं आहे. अंगीं नम्रता असणें हें शहाणपणाचें मुख्य लक्षण आहे. विद्येसही नम्रतेनें शोभा येते. ( विद्या विनयेन शोभते ) असें एक वाक्य आहे. ह्यावरून असें समजलें पाहिजे कीं, ज्याच्या अंगीं नम्रपणा आहे, त्याच्या मनावर विद्येचा परिणाम झाला.

आतां भाषण पाहूं. विद्यार्थी सत्य व मितभाषणी असावा. कारण खोटें बोलणाराची लबाडी कधींना कधीं तरी बाहेर पडतेच. लबाडी बाहेर पडल्यावर त्याच्या खऱ्या बोलण्यावर सुद्धां कोणी भरंवसा ठेवीत नाहीं, ही मोठी हानि नव्हे काय ?

त्याचप्रमाणें कारणाशिवाय बडबड केल्यानें विा-

# विद्यार्थ्यांचें कर्तव्य काय ?

लेखक—आनंदीबाई शेणवई–आश्रम.

विद्या शिकणारीं जीं मनुष्यें तीं विद्यार्थी अशी व्याख्या आहे. जगाच्या नियमाप्रमाणें सातपासून पंचवीस वर्षेपर्यंत शाळेंत शिकण्याची विद्या असते. परंतु खरें पाहूं गेलें तर मनुष्यास जन्मास आल्यापासून मरे तोंपर्यंत कांहींना कांहीं शिकावयाचें असतेंच. प्रथम अक्षरांची ओळख, नंतर लिहिणें वाचणें व जगाची माहिती करून घेणें व अनेक प्रकारचीं शास्त्रें शिकणें येवढ्यानें विद्यार्थ्यांचें कर्तव्य झालें असें नाहीं.

वर सांगितलेल्या गोष्टी ह्या शिकल्या तर पाहिजेच; परंतु त्यांच्या बरोबरीनें सद्गुण संपादन करीत जावें. त्याशिवाय विद्या व्यर्थ आहे. सद्गुणांच्या योगानें मनुष्य जगास पूज्य वाटतो आणि प्रिय होतो. सद्गुणांचें सामान्य लक्षण दुसऱ्यांचें हित चिंतणें, सत्य भाषण करणें होय. शिवाय दया, क्षमा, शांति, परोपकार, संतोष, सभ्यपणा, मातापिता, गुरु, देव, ह्यांवर भक्ति, मर्यादा इत्यादि गुण देखील सद्गुणांत मोडतात.

ह्या जगांत चांगलेपणा आणि वाईटपणा दोन्हीही आहेत. जो मनुष्य नेहमीं चांगल्याकडे लक्ष देतो त्याचा स्वभाव चांगला होत जातो. जो वाईटाकडे लक्ष देतो त्याचा स्वभाव वाईट होत जातो. ज्याचा स्वभाव चांगला असतो त्याचें मन सदासर्वदा संतुष्ट असतें. त्यामुळें त्याच्या जवळच्या सर्व मनुष्यांस सुख व समाधान होतें. सुस्वभाव हें सुखप्राप्तीचें खरें साधन आहे. किती जरी विद्या असली तरी दुःस्वभावी मनुष्याच्या हातून त्या विद्येचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. सुस्वभावी मनुष्याच्या हातून थोड्या विद्येचा देखील पुष्कळ उपयोग होऊन तीं मनुष्यें इतरांस सुख देण्यास पात्र होतात.

आतां दुसऱ्याचें हित करावें व परोपकार करावा असें वर सांगितलें आहे. तर कोणी म्हणेल आम्हांला आमचें शिकणें सोडून हीं कामें करण्यास वेळ कोठें आहे ? परंतु ह्या कामांस वेळच खर्च करावा लागत नाहीं. केवळ मनोवृत्तीनें देखील करितां येतात. उदाहरणार्थ, वर्गांत एकाचा नंबर वर आला तर दुसऱ्यानें त्याच्याशीं द्वेष न करतां आपणसुद्धां नंबर वर आणण्याचा प्रयत्न करावा. ह्या जगांत कोणासही स्वतांचें वाईट व्हावें असें वाटत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. तथापि आपल्या हितासाठीं इतरांचें अहित करूं नये.

आतां परोपकार म्हणजे केवळ आपली संपत्ति, वेळ व शक्ति लोकांकरितां खर्च केल्यानें होतो असें नाहीं. वेळ पडली तर थोड्या बहुत प्रमाणांत खर्च केला तर हरकत नाहीं. करूंच नये असें मी म्हणत नाहीं. परोपकाराचा खरा अर्थ दुसऱ्यास जवळ करून घेणें एक आणि दुसरा ईश्वरास जवळ करून घेणें होय. जगांतील कोणत्याही प्राण्यास जवळ करून घेण्यास नम्रता हा गुण फार उपयोगी आहे. अंगीं नम्रता असणें हें शहाणपणाचें मुख्य लक्षण आहे. विद्येसही नम्रतेनें शोभा येते. ( विद्या विनयेन शोभते ) असें एक वाक्य आहे. ह्यावरून असें समजलें पाहिजे कीं, ज्याच्या अंगीं नम्रपणा आहे, त्याच्या मनावर विद्येचा परिणाम झाला.

आतां भाषण पाहूं. विद्यार्थी सत्य व मितभाषणी असावा. कारण खोटें बोलणाराची लबाडी कधींना कधीं तरी बाहेर पडतेच. लबाडी बाहेर पडल्यावर त्याच्या खऱ्या बोलण्यावर सुद्धां कोणी भरंवसा ठेवीत नाहीं, ही मोठी हानि नव्हे काय ?

त्याचप्रमाणें कारणाशिवाय बडबड केल्यानें विद्या-

र्थ्याचा तोटा होतो. आतां विद्यार्थी संतोषी कां असावा तें आपण पाहूं.

विद्या कशासाठीं ? तर आपले दिवस आनंदांत जाऊन इतरास आनंद देण्यास आहे. ज्याचें मन नेहमीं दुःखी, जो सदा दुर्मुखी अशा प्राण्यास कधीं सुख मिळणें शक्य नाहीं. कारण सत्पुरुषांचें एक वाक्य आहे.

( संतोषमूलं हि सुखं दुःखमूलं विपर्ययः ) संतोषी मनुष्यानें इच्छिलेलें कार्य नेहमीं सिद्धीस जातें व त्यायोगें तो सुखी असतो असें नाहीं. परंतु कार्यहानि झाली असतां असंतोषी मनुष्यास जसें दुःख होतें, तसें संतोषी मनुष्यास होत नाहीं. संतोषामुळें त्याचें मन स्वस्थ असतें. संतोषी कधीं कुरकुर करीत नाहीं. वडिलांस अथवा ईश्वरास दोष देत नाहीं. मला कोणत्या स्थितींत ठेवावें हें मजपेक्षां माझ्या रक्षणकर्त्यास व ईश्वरास अधीक समजतें, असें म्हणून तो सुखी असतो. आणि त्यास सदाचरणाचा मार्ग सोडण्याचा प्रसंग कधीं येत नाहीं.

आतां क्षमा हा गुण विद्यार्थ्यास फार जरूरीचा आहे. कारण त्यांना अनेक देशांच्या, अनेक गुणांच्या व अनेक चालींच्या मनुष्यांबरोबर संस्थेंत राहावयाचें असतें. तेव्हां हा गुण फार उपयोगीं पडतो. शिवाय ज्यानें जन्मांत कोणाचा अपराध केला नाहीं त्यानें दुसऱ्याचे सोसले नाहींत तर एकाद वेळीं चालेल; परंतु असा मनुष्य कोण आहे बरें ?

आतां मर्यादा—ज्या प्रसंगास व ज्या स्थळास योग्य जें आचरण त्यास मर्यादा म्हणतात. व्यवस्थितपणाचा सुद्धां त्यांत थोड्या बहुतांशीं समावेश होतो. मनुष्य अव्यवस्थित असेल त्याचा पुष्कळ वेळ व्यर्थ जातो. कारण कोणताही पदार्थ वेळेवर सांपडत नाहीं. शोध करून तो काढण्यास किती तरी वेळ व्यर्थ जातो ! व्यवस्थेशीर मनुष्याचें असें कधीं होत नाहीं. कारण त्याच्या सर्व वस्तू ठिकाणावर असतात.

आतां आईबापांवर भक्ति करावी हें विद्यार्थ्याचें कर्तव्य असें म्हटलें आहे. खरें म्हटलें तर हें केवळ विद्यार्थ्यास लागू नाहीं एक आणि दुसरें आईबापांवर मुलांची भक्ति असतेच. परंतु येथें या गोष्टीचा उल्लेख करण्याचें कारण येवढें कीं, पुष्कळ विद्या शिकणारीं व शिकलेलीं आपण विद्वान् म्हणून घेणारीं मनुष्यें, आम्ही शाहाणी आम्हाला सर्व कांहीं ठाऊक आहे, म्हणून आईबाप व इतर वडील यांचें कांहीं ऐकत नसतात. एकादवेळीं त्यांची समजूत चुकीची असल्यावेळीं ऐकिलें नाहीं तर गोष्ट निराळी; परंतु प्रत्येक ठिकाणीं आपण शाहाणी म्हणून त्यांचा अपमान करण्यांत काय अर्थ आहे ? प्रत्येकजण विद्या शिकलेले असा प्रकार करीत नसतात. परंतु असें करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. ( गांवाला जरी राजा तरी आईला तो मुलगाच ) अशी म्हण आहे. ही म्हण विद्यार्थ्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवावी. आतां गुरूवर भक्ती करावी व आज्ञा पाळावी, सेवा करावी हें विद्यार्थ्याचें कर्तव्य खरें आणि या निबंधांतही वर या गोष्टी कराव्या असें सांगितलें आहे. परंतु पूर्ण लोकांवर अवलंबून राहतां कामा नये. आपला विचार आपण करावा. गुरूंनीं जरी आज्ञा केली तरी ती कशाकरितां केली आहे, यांत त्यांचा उद्देश काय, हा विचार विद्यार्थ्यानें करावा. उगीच गुरु सांगेल तें सर्व प्रमाणच म्हणून बसूं नये. असें नसेल तर विद्यार्थ्यास स्वतःला विचार करण्याची संवय लागत नाहीं. गुरु काय जन्मपर्यंत मिळणार नाहीं. मग जेथें तेथें अडणार. म्हणून प्रत्येक गोष्ट आपण विचार करून पाहावी. कित्येकांचें म्हणणें आहे गुरूचे दोष काढूं नयेत; हें म्हणणें चुकीचें आहे. आपल्या गुरूच्या अंगीं गुण काय आहेत व दोष काय आहेत हें शिष्यांनीं पाहिलें पाहिजे. कारण काय तर शिष्यास गुरूचा कित्ता गिरवावयाचा असतो. ते दोष जर याला समजले नाहींत तर ते हा करावयास लागेल. एवढें मात्र ध्यानांत ठेवावें कीं, ते दोष लोकाशीं सांगत सुट्टूं नये.

आतां सेवा. सेवा ह्या शब्दाचा अर्थ आपण चाकरी असा नेहमीं समजतों. परंतु खरा अर्थ सेवा म्हणजे संतुष्ट करणें होय. म्हणून गुरूची सेवा करणें

म्हणजे केवळ चाकरी करण्यापेक्षां गुरूचें मन संतुष्ट राखणें महत्त्वाचें आहे. शिष्य सद्गुणी असेल तर गुरु त्याच्याविषयीं संतुष्ट होईलच. चाकरी करूं नये असें माझें म्हणणें नाहीं; वेळ पडली तर करावी. गुरूचीच काय प्रत्येकाची करावी.

आतां शिष्यानें गुरूची प्रीति संपादिली पाहिजे ही गोष्ट महत्त्वाची आहे आणि यास कष्टही जास्त आहेत. आईबापांची मूळचीच प्रीति असते; गुरूचें तसें नाहीं. कष्ट सहन करून वेळ आली तर कधीं कधीं अब्रूची चाडदेखील तात्पूर्ती सोडावी लागणार आणि त्यांच्या मनाप्रमाणें वागावें लागणार; शिवाय प्रथम गुरु शिष्यास परीक्षा पाहण्यासाठीं मुद्दाम अनेक प्रकारचे कष्ट भोगावयास लावतात हें आपल्या पुराणेतिहासावरून स्पष्ट कळून येतें, म्हणून हें काम महत्त्वाचें आहे. ही प्रीति संपादन करायच्या वेळीं शिष्यानें येवढें ध्यानांत ठेवावें कीं, गुरु चांगलाच मिळेल हा भरंवसा नाहीं. कदाचित् चांगला असला तरी एखादी वाईट संवय असते. षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर एकटाच. मनुष्यामध्यें एकादा गुण वाईट असणारच. म्हणून गुरूची प्रीति एकादा वाईट गुण केल्यामुळें जडत असेल तर ती नसलेली बरी. कारण परम गुरु जो ईश्वर त्याच्या प्रेमास विन्मुख व्हावें लागेल. सद्गुणाच्या योगें मिळवितां येईल तर मात्र थोडे बहुत कष्ट सोसले तरी चालेल. ती संपादन केलीच पाहिजे हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे. कोणी म्हणेल गुरूची प्रीति हवी कशाला आणि ते कष्ट कशाला ? आपण अभ्यास केला तर आपणास विद्या साध्य होईलच; परंतु हें म्हणणें 'जगांत दुर्गुणी मनुष्याचे दिवस जात नाहींत कां ? सद्गुण संपादण्याचे कष्ट कशाला' असें म्हटल्याप्रमाणेंच होय.

असो; आतां ज्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं भूगोल, इतिहास, गणित इत्यादि विषयांचा अभ्यास करावा, त्याचप्रमाणें व्यावहारीक ज्ञानाचाही अभ्यास करावा. केवळ पुस्तकी विद्या उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ, मागें आपल्या हिंदुस्थानांत कालिदास म्हणून एक कवि होऊन गेला. त्याचा एक शिष्य फार शिकलेला संस्कृत पंडित होता. त्याला व्यावहारीक ज्ञान मुळींच माहीत नव्हतें. त्यानें एके दिवशीं एक कुदळ घेतली आणि घराच्या भिंतीनजीक असलेल्या एका झाडाचें मूळ खणूं लागला. तेव्हां बापानें विचारिलें हें काय काम चालविलें आहेस ? तेव्हां तो म्हणाला ( उद्योगं पुरुष लक्षणं ) भिंतीच्या खालीं खणलें तर घरास धक्का पोंचेल, अथवा झाडाच्या खालीं बसून खणलें तर झाड डोक्यावर पडेल हें व्यावहारिक ज्ञान नसल्यामुळें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. इतकें जरी आज विद्यार्थ्यांचें होत नाहीं तरी कित्येक विद्यार्थ्यांना बाजारांतील भाजी विकत आणावयास समजत नाहीं असे पुष्कळ सांपडतील. मग बाकी व्यवहारांत काय फजीती होत असेल कोण जाणे !

विद्यार्थ्यांस संगती चांगल्याची असली पाहिजे. ' कडू कारलें तुपांत तळलें आणि साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच ' अशी म्हण आहे खरी; परंतु ही प्राण्यांना लागू नाहीं. ह्याविषयीं पोपटांची गोष्ट बहुश्रुत आहेच. पुराणेतिहासांत इतक्या उदार कर्णानें दुर्योधनाच्या संगतीनें किती अयोग्य कामें केलेलीं आढळतात. हल्लीं सयाजीराव गायकवाड यांच्या मुलाची इंग्लंडमध्यें वाईट संगतीनें काय गती झाली होती बरें ?

त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांस मित्र या मैत्रिणी असाव्यात परंतु केवळ आपणास खायाला देतात अथवा आपलें काम करतात म्हणून त्या स्नेही समजूं नये. मित्र अथवा मैत्रीणी कशीं असावींत तर आपण जेथें चुकतों तेथें सांगून जाग्रती उत्पन्न करणारीं. आणि कष्टकाळ आला असतां सहाय्य करणारीं आणि आपल्या मित्राचें उणें पडूं न देणारीं. वेळ आली तर मित्रासाठीं कोणतेही कष्ट सहन करण्यास तयार असणारीं व लोकांनीं ती मैत्री दूर करावी म्हणून त्याचे किती अवगुण सांगितले तरी माझ्या मित्राचे गुण मला ठाऊक आहेत म्हणून धैर्यानें उत्तर देणारीं अशीं करावींत. मग तीं लहान असोत, थोर असोत, गरीब असोत, श्रीमंत असोत हरकत नाहीं. कित्येकजण असें करतात कीं, लोकांवरचें प्रेम जाऊन

तें आपणावर बसावें म्हणून नसलेले दुर्गुण उत्पन्न करून सांगतात. असें कोणीं सांगितलें म्हणून मैत्री सोडूं नये. आणि मुळीं मित्र अथवा मैत्रीण नसलेलें तें मनुष्यच नव्हे.

विद्यार्थ्यांच्या आंगीं सावधान हा गुण अवश्य असावा. म्हणजे प्रसंग जसा असेल तसें वागणें व जी गोष्ट ज्या वेळीं करावयाची असते त्या वेळीं मन त्याच गोष्टींत पूर्ण असलें पाहिजे. अभ्यासाच्या वेळीं अभ्यासांत, कामाच्या वेळीं कामांत, व्यायामाच्या वेळीं व्यायामांत, खाण्यापिण्याच्या वेळीं खाण्यापिण्यांत, पूर्ण लक्ष असावें. नाहींतर कांहीं विद्यार्थी अशीं असतात कीं, अभ्यासापुढें झोंप नाहीं, खाणेंपिणें नाहीं, कांहीं नाहीं परंतु असें करण्यांत काय अर्थ आहे बरें ? शरीरांतील शक्ति एकदां गेली म्हणजे परत मिळत नाहीं. किती औषधोपचार केले तरी मूळच्यासारखी होणें अशक्य. शरीरसंपत्ति ही फार महत्त्वाची आहे. शरीर सुदृढ असल्याशिवाय कांहीं करितां येत नाहीं, असो.

हल्लीं इंग्रजी शिकणारीं कित्येकजण नास्तीक बनतात. असें करणें योग्य नाहीं. किती शिकलें तरी व किती शहाणपण असलें तरी ईश्वरापुढें तें मोठें नाहीं. आपल्या निर्माणकर्त्यास कधीं विसरूं नये. म्हणून ईश्वरावर भक्ति ही असलीच पाहिजे. ईश्वरावर ज्यांचा भरंवसा असतो त्यांस दुःख अथवा कष्ट प्राप्त झाले तर त्यांच्या मनावर त्याचा जास्त परिणाम इतरांप्रमाणें होत नाहीं. जगाचा एक नियम असा आहे कीं, ज्याला कष्ट प्राप्त झाले असतां जास्त दुःख होत नाहीं त्याला सुख प्राप्त झालें तर जास्त आनंदही होत नाहीं. असें असल्यामुळें तें मनुष्य नेहमीं सुखी समजावें. असल्या मनुष्यास पुढची पायरी साधणें देखील सोपें होईल. हा येवढा ईश्वरनिष्ठेचा लाभ सोडून केवळ विद्या शिकून नास्तीक बनणें हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य काय ? अर्थात नाहीं. कोणती विद्या संपादन केली तरी मूळचा उत्तम धर्म सोडतां कामा नये. विद्येनें त्यास भर घालावी. विद्या ही जल आहे. ती मनुष्य ज्या झाडास घालील त्याप्रमाणें होईल. म्हणजे तिचा उपयोग वाईटाकडे केला तर वाईट होतो चांगल्याकडे केला तर चांगला होतो. म्हणून विद्यार्थ्यांचें कर्तव्य हा निबंध असून यांत सद्गुणांचें जास्त वर्णन केलें आहे. अशिक्षितांपेक्षां सुशिक्षितांच्या अंगीं दुर्गुण असले तर लोकांच्या नजरेस लौकर येतात आणि तीं नांवें ठेवितात. येवढेंच नाहीं तीं ज्या संस्थेंत शिकलेले असतील त्या संस्थेस देखील नांवें ठेवितात. त्या योगें संस्थेस देखील काळिमा लागण्याचा संभव असतो. ज्या संस्थेपासून विद्यालाभ झालेला आहे त्या संस्थेस लोकांनीं नांवें ठेवण्यापर्यंत पोंचविणें हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य काय ? असो; आतां आम्हा सर्व विद्यार्थ्यांस सद्गुण व विद्या हीं दोन्ही सारखे संपादण्यास बुद्धि द्यावी अशी ईश्वरापाशीं विनयपूर्वक विनंति करून हा निबंध पुरा करितें.

---


# फोटो बक्षीस.

जे कोणी आपआपल्या गांवांतिल ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्त्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर ही अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचनाः**—जिल्ह्याचे गांवचे निदान २५—३०, तालुक्याचे १५—२०, व पेटा वगैरेचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. वी. खानापुरे**, घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

# बेंजामिन फ्रॅन्कलिनची जबानी.

( लेखक—' गजानन. ' )

[ अमेरिकन लोक व इंग्लिश लोक यांच्यामध्यें बेबनाव होण्यास जीं अनेक कारणें झालीं, त्यांत ' स्टॅम्प ॲक्ट ' हें एक महत्त्वाचें कारण होतें. हा कर अमेरिकन लोकांच्या मनाविरुद्ध इंग्लंड त्यांजवर लादूं पहात होते. या कराविरुद्ध अमेरिकेंत फारच गवगवा झाला. याच सुमारास प्रसिद्ध अमेरिकन देशभक्त बेंजामिन फ्रॅन्कलिन हा इंग्लंडांत आला होता. तेव्हां पार्लमेंटच्या सभासदांनीं अमेरिकन लोकांचे खरे खरे विचार समजून घेण्याच्या उद्देशानें त्यास अनेक प्रश्न विचारून थोडासा हिनवण्याचाही प्रयत्न केला. त्यांच्या सर्व प्रश्नांस या विद्वान् गृहस्थानें मोठ्या धिमेपणानें उत्तरें दिलीं. हा संवाद जरा विचार करण्यासारखा वाटल्यामुळें, त्यांतील मुख्य मुद्याच्या गोष्टी येथें देत आहें. ]

**पार्लमेंटचा मेंबर**—" या करापासून वसूल झालेला सर्व पैसा अमेरिकेंतच खर्चिला जाणार आहे हें तुम्हांस माहित आहे काय ? "

**फ्रॅन्कलिन**—" कायद्याच्या कलमांतील शब्दावरून तो अमेरिकेप्रीत्यर्थ खर्ची पडणार हें मला समजतें; मात्र तो ज्यांचेकडून वसूल केला जाईल त्यांच्या उपयोगास्तव न खर्चितां, मोहिमेवर असलेल्या सैन्याकडेच त्याचा उपयोग केला जाईल. "

**पा. मे.**—" बरें, जास्त कांहीं सवलती दिल्यावर तर मग अमेरिकन लोकांची याबद्दल कुरकुर रहाणार नाहीं ना ? "

**फ्रॅन्क.**—" कांहीं झालें तरी आपखुषीनें ते तो कधींच देणार नाहींत—सक्ती करण्यांत आल्यास गोष्ट निराळी ! "

**पा. मे.**—" इ. स. १७६३ सालापूर्वी तुमचें ग्रेटब्रिटनबद्दल काय मत होतें ? "

**फ्रॅन्क.**—" फारच चांगलें. आम्हांस ग्रेटब्रिटनबद्दल नुसता आदरच वाटत होता असें नाहीं; तर त्याबद्दल एक प्रकारचें प्रेमही वाटत होतें. जे कोणी आपल्या जुन्या देशांतून ( इंग्लंडांतून ) अमेरिकेंत आलेले असत, त्यांना इंग्लंडचा फार अभिमान वाटत असे; व लोकही त्यांचा विशेष सन्मान करीत. "

**पा. मे.**—" आणि हल्लीं त्यांच्या मनोवृत्तींत काय फरक झाला आहे ? "

**फ्रॅन्क.**—" जमीन अस्मानाचा ! "

**पा. मे.**—" आमच्या पार्लमेंटबद्दल त्यांचें काय मत होतें ? "

**फ्रॅन्क.**—" त्यांना एके काळीं असें वाटत असे कीं, ब्रिटिशपार्लमेंट म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचा व हक्कांचा आधारस्तंभच होय; व त्याबद्दल ते नेहमीं मोठ्या गौरवयुक्तवाणीनें व पूज्यभावनेनें उल्लेख करीत. "

**पा. मे.**—" आणि आतां त्यांचा आदर पूर्वीप्रमाणें नाहीं का ? "

**फ्रॅन्क.**—" नाहीं—फारच कमी झाला आहे. "

**पा. मे.**—" थोडाफार फरक केल्यावरही हा ॲक्ट त्यांना पसंत पडणार नाहीं का ? "

**फ्रॅन्क.**—" नाहीं—तो ते कधींच मान्य करणार नाहींत. "

**पा. मे.**—" पुढेंमागें समजा, स्टॅम्प ॲक्टप्रमाणेंच आणखी एखादा कर बसविण्यांत आला तर त्याची वाट काय ? "

**फ्रॅन्क.**—" याची तीच त्याची. असले कर ते कधींच देणार नाहींत."

पा. मैं.—" कायद्यान्वयें ब्रिटिश पार्लमेंटला अमेरिकेच्या राजकारणांत हात घालण्याचा हक्क आहे हें तुम्हांस माहित आहे काय? व त्याप्रमाणेंच नवे करही अमेरिकन लोकांवर बसविण्याचा हक्क आहे हें आपण विसरतांसें दिसतें? "

फ्रॅन्क.—" होय महाराज, अशा प्रकारचे कांहीं ठराव असल्याचें मी ऐकतों. "

पा. मैं.—यावर तुमचें काय म्हणणें आहे? "

फ्रॅन्क.—असले कायदे व ठराव जुलमी व अन्यायाचे आहेत असेंच ते म्हणतील. "

पा. मैं.—" आमच्या देशांतून तुमच्या देशांत येणाऱ्या वस्तूंत पुष्कळशा वस्तू नित्य व्यवहारोपयोगाच्या आहेत. समजा, त्यांवरच आम्हीं कर ठेविला तर? "

फ्रॅन्कलिन मोठ्या शांतपणानें म्हणतो—" तुमच्या देशांतून येणाऱ्या वस्तूंत मला तरी अशी एकही वस्तु दिसत नाहीं कीं ती न आल्यास आमचें अडेल, अथवा आम्हांस ती बनवितां येणार नाहीं; " हें उत्तर ऐकून मेंबरांत बरीच गडबड उडाली. त्यांना हें खरेंच वाटेना. तेव्हां एक मेंबर विचारतो—" तुम्ही म्हणतां कीं आमच्याशिवाय तुमचें अडणार नाहीं. बरें–कापडाचीच गोष्ट घ्या. इंग्लंडांतल्या कापडाशिवाय तुमचें चालेल का तरी? "

फ्रॅन्क.—" हो–न चालायला काय झालें? थोड्याशा उद्योगानें व मेहेनतीनें अमेरिकन लोक आपल्या गरजा सहज भागवूं शकतील. "

पा. मैं.—" अहो पण कापडाच्या गिरण्या कांहीं एका दिवसांत तयार करतां येत नाहींत. त्याला कांहीं अवकाश लागतो. व तों पावेतों कपड्यावांचून किती हाल होतील याची कल्पना आहे का? "

फ्रॅन्क.—आपल्या अंगांत असलेल्या कपड्याकडे एकवार पाहून म्हणतो; " मला नाहीं वाटत कीं आमचे कपड्याशिवाय हाल होतील. अमेरिकन लोकांनीं किती प्रगति केली आहे याची तुम्हांस कल्पना नाहीं.—निदान येवढें तरी खास कीं त्यांचे सध्यांचे कपडे जीर्ण होण्यापूर्वीं ते आपले कपडे स्वतः बनविलेल्या मालापासून तयार करतील. " हें ऐकून तर त्या सभेंतील सभासदांस आश्चर्यच वाटलें. कांहींना तर वाटलें कीं फ्रॅन्कलिन कांहीं तरी बढाईच्या गोष्टी करित आहे. त्यांची तर ही ठाम समजूत होती कीं, इंग्लिश मालावांचून अमेरिकन लोकांचें कधींच चालणार नाहीं. आतां हा भाषणाचा ओघ परत पूर्वींच्या ठिकाणीं आणण्याच्या उद्देशानें एक मेंबर प्रश्न करतो—

पा. मैं.—"मि. फ्रॅन्कलिन, जर हा स्टॅम्प अॅक्ट रद्द केला तर अमेरिकन लोक खुष होतील असें तुम्हांस वाटतें का? "

फ्रॅन्क.—"असें मला वाटतें. "

पण यावर सभासदांस अशी धास्ती वाटली कीं अशा तऱ्हेनें या प्रश्नाचा निकाल अमेरिकन लोकांच्या पसंती अगर ना पसंतीनें ठरविणें बरोबर होणार नाहीं. एक मेंबर विचारतो,—" कोणत्या प्रसंगीं काय गोष्टी करणें योग्य आहे हें ठरविण्याची पार्लमेंटास पूर्ण मुखत्यारी आहे ना? "

फ्रॅन्क.—"पार्लमेंट वाटेल तें करो. पण जोंपर्यंत आमच्या प्रतिनिधींना आमची बाजू खुद्द पार्लमेंटपुढें मांडण्याचा हक्क नाहीं, तोंपर्यंत अशा तऱ्हेची मुखत्यारी पार्लमेंटकडे कधींच येऊ शकत नाहीं. व आम्हांस असेंही वाटतें कीं अशा नाजुक व आणीबाणीच्या प्रसंगीं आमचें मत जरूर विचारलें जाईल. "

या उत्तरानें तर सभासद जास्तच चिडले व ते जरा एकेरीवर आले. एक विचारतो—" दंडेलीशिवाय एखाद्या सौम्य उपायानें हा कायदा अमलांत आणतां येईल का? "

फ्रॅन्क.—"अशा गोष्टींत सक्ती अगर दंडेली कशी करितां येईल हेंच मुळीं मला समजत नाहीं. "

पा. मैं.—"कां–कां–कां नाहीं? "

फ्रॅन्क.—"समजा, तुम्हीं अमेरिकेंत फौज धाडलीत. पण पुढें काय? त्यांना अडविण्यास शस्त्रास्त्रें घेऊन कोणीच येणार नाहीं. मग ही फौज काय करणार? जर

आम्ही स्टॅम्प घेतल्याशिवायच आमचीं कामें चालवूं लागलों तर ? विकत घ्याच अशी तर कांहीं जबरदस्ती करूं शकत नाहीं ? उलट येवढें मात्र दृष्टोत्पत्तीस येईल कीं बंड करण्यास कोणीच तयार नाहीं.—फौजेच्या येण्यानेंच जर बंड झालें तर न कळे ! "

पा. मे.—" हा कायदा रद्द न करितां आम्हीं अमलांत आणला तर त्याचे काय परिणाम होतील ? "

फ्रॅन्क.—" पहिली गोष्ट म्हणजे आम्हांस इंग्लिश लोकांबद्दल वाटणारें प्रेम व आदर पार नाहींसा होईल. व या दोन गोष्टींवरच मुख्यतः अवलंबून असणारे इतरही व्यवहार पूर्ण बंद पडतील. "

पा. मे.—" समजा कीं, हा कायदा अखेर अमलांत आणलाच तर या कृत्यानें अमेरिकन लोक चिडून आमचा सुबक व सुंदर माल टाकून देशांतच तयार झालेला ओबडधोबड व हलक्या प्रतीचा माल घेतील असें तुम्हांस वाटतें का ? "

फ्रॅन्क.—" होय महाराज, मला असें वाटतें. "

पा. मे.—" आज जर तुमच्या म्हणण्यास्तव आम्हीं हा कर बंद केला तर तुमची अशी समजूत होईल कीं चळवळ केल्यानें उद्यां वाटेल तो कर उठविण्यास तुम्ही पार्लमेंटसभेस भाग पाडूं शकाल. "

फ्रॅन्क.—" लोकांची काय समजूत होईल हें मला इतक्या अंतरावरून सांगणें कठीण आहे. "

पा. मे.—" मग आम्हांस तरी इतक्या दुरून तुम्हांस काय हवें, नको हें कसें समजावें ? ".

फ्रॅन्क.—" मलाही तुमचें म्हणणें कबूल आहे. परंतु तुमचीच पार्लमेंट सभा आपणांस अशा तऱ्हेचा हक्क आहे हें सांगते ना ? "

पा. मे.—" हा येवढा ॲक्ट आम्हीं रद्द केला म्हणजे झाले ना ? मग तर तुमचा आमच्यावर कांहीं रोष राहणार नाहीं ? व पूर्वीप्रमाणेंच आमच्या पार्लमेंटास असे कायदे करण्याचा पूर्ण हक्क आहे हें कबूल कराल काय ? "

फ्रॅन्क.—" नाहीं—असें कधींच कबूल करणार नाहीं. "

पा. मे.—" असें कबूल करण्यास लावण्याचे कांहीं उपाय आपणांस माहित आहेत काय ? "

फ्रॅन्क.—" मला तरी कांहीं उपाय दिसत नाहीं. सत्तेच्या जोरावर भाग पाडल्यास गोष्ट निराळी. "

पा. मे.—" असें करण्यास भाग पाडणारी एखादी शक्ति पृथ्वीच्या पाठीवर आहे काय ? "

या प्रश्नाचें उत्तर फ्रॅन्कलिननें मोठ्या गंभीर स्वरांत दिलें. तो म्हणाला, " माणसास आपलें मत बदलविण्यास भाग पाडणारी अशी जगांत एकही शक्ति नाहीं." (No power howsoever great can force men to change their opinions.)

.... .... .... .... ....

पा. मे.—" तुम्हीच सांगा कीं थोडे दिवसांपूर्वी कोणच्या गोष्टींत तुम्हा अमेरिकनांस विशेष अभिमान वाटत असे ? "

फ्रॅन्क.—" इंग्लंडच्या चालीरीतीचें अनुकरण करण्यांत. "

पा. मे.—" आणि आतां ? "

फ्रॅन्क.—" आपणांस लागणारे कपडे वगैरे स्वतः करीपर्यंत सध्यां असलेले जुनेच कपडे वापरण्यांत. "


# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यतः मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यांत **मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ** सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं **गाणींही** दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं **झोपाळ्यावर** बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ **ओव्या** व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे **उखाणेही** बरेच दिलेले आहेत. किंमत. ८४. **म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# अळवावरचें पाणी.

अळवाच्या पानावर पाणी पडलें तरी तें पान ओलें होत नाहीं, पाण्याचा थेंब लगेच गडबडून खालीं पडतो आणि तें पान पाण्यांत बुडविलें असतां एक प्रकारची चमक पानासभोंवती दिसते, या गोष्टी पुष्कळ लोकांनीं पाहिल्या असतील. याचें कारण मोठें मौजेचें आहे. अळवाच्या पानावर एका प्रकारच्या मेणासारख्या पदार्थाचा पातळ थर असतो. त्यामुळें तें पान पाण्यानें भिजत नाहीं. अर्थात पाण्याचा थेंब व पानाचा पृष्ठभाग यांत एक हवेचा थर उशीप्रमाणें राहतो. यामुळें त्या थेंबास स्थिरता येत नाहीं व तो लवंडून जमिनीवर पडतो. पान पाण्यांत बुडविलें तरी पानासभोंवतीं हा हवेचा थर असतोच. प्रकाशाचें किरण पाण्यांतून पानाकडे जातांना या हवेच्या थरावर परावर्तन पावून आणि वक्री होऊन रुपेरी कांतीचा आभास उत्पन्न करतात. या पानावर हा जो मेणासारख्या पदार्थाचा थर असतो त्यामुळें तें पान लवकर कुजत नाहीं व पावसाचें पाणी पडून पानावरच्या रंध्रांतून जो श्वासोच्छ्वास चालावयाचा त्यास अडथळा पोंचत नाहीं असें वनस्पती शास्त्रवेत्त्यांचें म्हणणें आहे.


# शिवलीलामृत रंगीत चित्रांसह.

हा ग्रंथ डेमी अष्टपत्री, जाड व ग्लेज कागदावर जाड वन्निक टाइपांत छापून तयार आहे. चौदा अध्यायांत एकंदर २० रंगीत चित्रें घातलीं असून चित्रें फारच सुबक व मनोहर आहेत. चित्रें आर्टपेपरवर छापलेलीं आहेत. शिवाय ही पोथी अनेक हस्तलिखित जुन्या प्रतींवरून शुद्ध करून छापली आहे. काळसर ग्लेज व सफेत ग्लेज कागदावरील अनुक्रमें किं. ६८ व ६१० ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगबद्दल ४ आ. जास्त पडतील.

तरुण मुलांमुलींकरितां दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए. यांनीं लिहिलेलें

## नवें पुस्तक, भारतीय उपकथा पूर्वार्ध.

पृष्ठें—४००; कागद—अँटीक; टाईप—जाड ग्रेट प्रायमर; चित्रें—तेरा ( एक रंगित )

नकाशा—प्राचीन भरतखंडाचा; किंमत—फक्त एक रुपया.

"भारतीय युद्ध" या पुस्तकांत कौरवपांडवांची मुख्य कथा दिली असून त्याच पुस्तकाचे जोडीस रा. लिमये यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे. शांति-अनुशासन पर्वांतील धार्मिक व नैतिक कथा उत्तरार्धाकरितां राखून यांत इतर सोळा पर्वांतील ऐतिहासिक व पौराणिक ६० कथा मूळ भारतावरून सोप्या भाषेंत संगतवार दिल्या आहेत.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

म्याट्रिक्, स्कूल्फायनल् व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरण, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत मराठी भाषेंतील सुमारें दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय ( Idioms ) आणि म्हणी व अवांतर शेंकडों संप्रदाय, यांचे शास्त्रीयरीत्या वर्गीकरण केलेलें असून त्यांचें मराठींत सोपपत्तिक स्पष्टीकरण केलेलें आहे. व भरपूर उदाहरणेंही दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणांच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील शेंकडों अवतरणें दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे न्याय, ज्योतिषांतील शब्द, संस्कृत वाक्यें किंवा वाक्यांश, वगैरेंचें खुलासेवार स्पष्टीकरण केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय ह्यांच्या जोड्या दिल्या आहेत. पुस्तकांत एखादा विशिष्ट शब्द पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक्, स्कूल्फायनल् वगैरे परीक्षांच्या उमेदवारांस, तसेंच मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास करणाऱ्यास हें पुस्तक अत्यंत उपयोगी असें झालें आहे. रा० रा० विद्याधर वामन भिडे बी. ए. यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या जातीचें व इतक्या विस्ताराचें पुस्तक मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं पायका टाइपाचीं पानें सुमारें ५०० वर असून बांधणी कापडी व जाड पुठ्याची आणि मजबूत अशी आहे. किंमत दीड रुपया. ट० हं० व्हीं० पी० सह ३ आणे.

# निबंधलेखन आणि अनुवाद.

म्याट्रिक्युलेशन, स्कूल्फायनल्, पब्लिक् सर्व्हिस्, वगैरे परीक्षांस मराठी भाषा हा एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत निबंध लिहावा लागतो, व दिलेल्या पद्यांचा अनुवाद करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें सोयीचें पुस्तक नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं मथ-ळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्यांत निबंध-लेखन हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून निबंधांचे तीन प्रकार कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या सबरवाच्या कशा पाहाव्या, हें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर सुमारें ५० निबंध लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत अनुवाद म्हणजे काय हें सांगून तो कसा करावयाचा, ह्यासंबंधाच्या तपशी-लवार सूचना देऊन अनेक प्रकारच्या पद्यांचा अनुवाद करून दाखविला आहे; आणि नंतर कांहीं पद्यसमूह विद्यार्थ्यांना अनुवाद करावयासाठीं दिले आहेत. किं. ८८ ट. ख. ०३.

कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

आजपर्यंत राजा रविवर्मा यांचीं चित्रें लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या रंगांत बरींच छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व चित्रें त्या त्या चित्राच्या परिपूर्ण पौराणिक माहितीसह एकवटलेलीं अशीं पुस्तकरूपानें छापल्यास त्यांची फारच जरूर आहे, अशा कांहीं लोकांच्या सूचना आल्यावरून आम्ही वरीलप्रमाणें राजा रविवर्मा यांचीं निवडक चित्रें बुकसाई-जमध्यें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ चित्रें वर्णनासह दिलेलीं असून पुस्तकास कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर) वापरलेला आहे. मुखपृष्ठावर राजा रविवर्मा यांच्या प्रमुख चित्रांपैकीं शकुंतला-जन्माचें चित्र तीन रंगांत सुबक छापलेलें आहे. त्यामुळें पुस्तकास विशेषच शोभा आलेली आहे, किं० १ रुपया.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

भगवद्भक्त दैवतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव वगैरेंच्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधवराव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनीं केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेलें आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरेदार आहे. मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेलें असून किंमत अवघी ०४ आ. ठेविली आहे. ट. ह. सह किं. ०४०६.

## सचित्र ] रुक्मिणी स्वयंवर. [ सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांस तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुसत्या रफ कागदावरील पोथीस ०६ व ग्लेज कागदावरील ०८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह किं. ०१० व ०१२ आहे पोस्टेज ०१०६.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें

किंमत ०१२ ] चित्रयुक्त [ किंमत ०१२

## बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

ह्यांत अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीयुक्त आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी. म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.

हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ८१८ सदाशिव पेठ—पुणें शहर येथें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. फेब्रुवारी सन १९१६ अंक २.




## विषयक्रम.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| डॉक्टर टाकाटा. .... .... .... .... .... .... | २३ |
| परीक्षा व कर्तबगार माणसें. .... .... .... .... .... .... | २५ |
| दुधांत साखर. .... .... .... .... .... .... | २७ |
| सुशिक्षितांचा धेडगुजरीपणा. .... .... .... .... .... .... | २८ |
| " संख्यालेखन. " .... .... .... .... .... .... | ३० |
| लहान मुलांस कविता. .... .... .... .... .... .... | ३२ |
| मीराबाई. .... .... .... .... .... .... | ३३ |
| स्नानासंबंधीं महत्त्वाच्या सूचना .... .... .... .... .... .... | ३८ |
| दंतवैद्याचा दवाखाना. .... .... .... .... .... .... | ३९ |
| डोक्यांत आगगाडीचा आवाज घुमतो. .... ... ... .. ... | ४२ |

विक्रीस तयार! विक्रीस तयार!! विक्रीस तयार!!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ०१३.

व्यापाऱ्यांस कमिशन.

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ०६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस. पुणें.



डॉक्टर टाकाटा.

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ...
ता. ...
मासिक

पुस्तक २७. फेब्रुवारी सन १९१६ अंक २.

( जपानी शिक्षणखात्याचे नवे प्रधान )

## डॉक्टर टाकाटा.

डॉक्टर टाकाटा यांना नुकतेंच जपानमधील शिक्षणखात्याचे मुख्य प्रधान नेमण्यांत आलें आहे. त्यांचा जन्म १८६२ सालीं झाला असून त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण झाल्यावर इंपीरियल युनिव्हर्सिटींत राजकारण व तत्वज्ञान हे ऐच्छिक विषय घेऊन त्यांचें त्यानीं सांगोपांग अध्ययन केलें. युनिव्हर्सिटीची पदवी घेतल्यानंतर त्यानीं काउंट ओकुमा यांच्या साहाय्यानें एक स्वतंत्र विश्वविद्यालय स्थापन केलें. तें सध्यां जापनांत पहिल्या प्रतीचें गणलें जात आहे. शिक्षकाचें काम उत्तम रीतीनें बजावून त्याच वेळीं त्यानीं काउंट ओकुमा यांस जपानी राजकारणांत ' प्रागतिकपक्ष ' अस्तित्वांत आणण्यास मदत केली. १८९० सालीं डॉक्टर टाकाटा यांना जपानी पार्लमेंटचे सभासद म्हणून निवडण्यांत आलें. तेव्हांपासून त्यांची निवडणूक एकसारखी चार वेळा झाली आहे. माट्सुकाटा यांच्या धुरीणत्वाखालीं प्रधान मंडळ बनविण्यांत आलें तेव्हां टाकाटा यांना व्यापारी खात्याचे मुख्य नेमलें व नतर शिक्षणखात्यांतील वरिष्ठ जागेवर त्यांची योजना करण्यांत आली. अलीकडे त्यांना बादशहांच्या खास हुकमानें वरिष्ठ सभेचे सभासद करण्यांत आलें आहे. इतकीं अनेक प्रकारचीं व अत्यंत जबाबदारीचीं कामें करीत असतांना देखील त्यानीं शिक्षण कामीं कधींही टाळा-

टाळी केली नाहीं. त्या संस्थेस जेव्हां अखेर १९०७ मध्यें विश्वविद्यालयाचें स्वरूप सरकारी मान्यतेनें मिळालें तेव्हां अर्थात् त्यांनाच त्याचें अध्यक्षस्थान मिळालें.

टाकाटा यांचा जन्म विद्वान घराण्यांत झाला असून ते स्वतः नामांकित लेखक आहेत. त्यांना ललितकलांची आवड आहे व ते चित्रकलेंत प्रवीण आहेत; त्यांना गायनाचा शोक आहे. विश्वविद्यालयें, स्वतंत्र विचार जागृत करणारीं व प्रसृत करणारीं विद्यापीठें असलीं पाहिजेत असें टाकाटा यांचें मत असल्यामुळें त्यांनीं वासेडा युनिव्हर्सिटीची स्थापना केली. सध्या जपानी विश्वविद्यालयांना पूर्ण स्वातंत्र्य आहे हें खरें; पण वीस पंचवीस वर्षांपूर्वी जपानी सरकारी युनिव्हर्सिट्यांतील अधिकाऱ्यांना, विद्यार्थ्यांना व खासगी शिक्षकांना विचारस्वातंत्र्य दिल्यास भलत्याच मतांचा प्रसार होऊन सार्वजनिक हितास धोका येईल, अशी भीति वाटत होती. ही भीति अस्थानीं आहे हें सिद्ध करण्याचें श्रेय सर्वस्वीं टाकाटा यांना देण्यांत येतें. या सर्व कारणांमुळें यांची नेमणूक शिक्षण खात्यावर झाल्यापासून खासगी शिक्षण संस्थांना स्वतंत्रपणें काम करण्यास प्रोत्साहन मिळालें आहे.

टाकाटा यानीं शिक्षणांत जी मुख्य सुधारणा घडवून आणली ती अशी कीं त्यांनीं शास्त्रीय व औद्योगिक विषयाचें ज्ञान परकीय भाषेंतून न देतां मातृभाषेंतून देण्यास प्रारंभ केला. त्या योगानें परकीय शिक्षकावर अवलंबून राहण्याचें कारण राहिलें नाहीं. त्यांची दुसरी महत्त्वाची सुधारणा म्हटली म्हणजे सरकारी व खासगी शिक्षणसंस्थामध्यें कोणत्याही प्रकारचा पंक्तिप्रपंच अधिकाऱ्यांनीं करूं नये.

सध्या जपानांत पूर्ण शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांचें वय साधारणपणें तीस वर्षांचें असतें. सहाव्या वर्षी प्राथमिक शाळेंत मुलांना घेतात. तेथील अभ्यासक्रम पुरा करण्यास सहा वर्षें लागतात. म्हणजे तेराव्या वर्षी विद्यार्थ्यांचा ‘ मिडल स्कूल ’ ( दुय्यम शाळा ) मध्यें प्रवेश होतो. तेथें त्यास पांच वर्षें घालवावीं लागतात; आणि तो अठराव्या वर्षी हायस्कुलांत जातो. तेथें तीन वर्षें शिकल्यानंतर विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रम पुरा करण्यास आणखी चार वर्षें लागतात. प्राथमिक शाळेंत येणारीं मुलें बहुतेक सहापेक्षां अधिक वयाचीं असल्यामुळें एकसारखा पास होत जाणारा विद्यार्थी २६।२७ वर्षांपूर्वी पदवीधर होऊं शकत नाहीं. टाकाटा यांच्या मतें हायस्कूलचें शिक्षण तीन वर्षांऐवजीं दीड वर्षाचें असावें; आणि विश्वविद्यालयांत पुस्तकी ज्ञानापेक्षां व्यावहारिक माहिती सध्यापेक्षां अधिक देण्यांत यावी, अशा सुधारणांचा कायदा मसुदा टाकाटा पार्लमेंटपुढें लवकरच आणणार आहेत. तो पसंत पडून हा कायदा पास झाल्यास ज्या संस्था चार वर्षांचें शिक्षण देऊन पदव्या देत असतील त्यांना विश्वविद्यालय असें गणण्यांत येईल. म्हणजे जपानांत ४३ युनिव्हर्सिट्या होतील.

या हकीकतीवरून जपानांतील शिक्षक म्हणजे इन्स्पेक्टरांनीं ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाचें माप विद्यार्थ्यांच्या पदरांत टाकणारे हमाल नसून राष्ट्राचें हित साधण्याकरितां स्वतंत्र विचाराचे विद्वान् उत्पन्न व्हावे म्हणून सदैव ज्ञानामृताचा वर्षाव करणारे मेघ आहेत हें कोणाच्याही लक्षांत येण्याजोगें आहे. त्याचप्रमाणें ते शिक्षक राजकारणापासून अलिप्त राहत नाहींत. एवढेंच नव्हे तर शिक्षकाचें काम समाधानकारक रीतीनें होण्यास ज्या सोयी व जी परिस्थिति समाजांत उत्पन्न करावी लागते ती मुत्सद्यां मार्फतच होऊं शकत असल्यामुळें दोन्हीकडे एकसारखाच संबंध ठेवून जपानी शिक्षकांनीं शिक्षण व राजकारण हीं परस्परांस हितकारक बनवितां येतात हें जगास पटवून देण्याचें श्रेय घेतलें आहे !

# परीक्षा व कर्तबगार माणसें.

अलीकडे प्रवेशपरीक्षा पास झालेले व पदवीधर लोक पैशास पासरी होऊं लागले, यास कारण परीक्षा कडक रीतीनें घेत नाहींत अशी सबब पुढें करून विद्यार्थ्यांची परीक्षा कसून घेण्याचा व होतां होईतों कमी मुलांना पास करण्याचा क्रम विश्वविद्यालयामध्यें सुरू झालेला दिसतो. कडक परीक्षा घेतली तर बुद्धीमान्, कर्तबगार व शोधक माणसें कोणतीं हें सहजच ठरतें व त्यांनाच समाजांत मानमान्यता मिळते, अशी कोटी कडक परीक्षेचे चहाते नेहमीं लोकांपुढें मांडीत असतात. हें मत फक्त वादाकरितांच पुढें मांडण्यांत येत नसून त्याची अंमलबजावणी देखील सुरु झाली आहे. मुंबई युनिव्हर्सिटीनें गुदस्ता बेळगांवाकडे शेंकडा १२ च मंडळी पास केली व मद्रासकडे तर शेंकडा १० मंडळींना मात्र हा शिक्का मिळाला; यावरून वारा कोणत्या दिशेनें वाहत आहे हें कोणाच्याही लक्षांत येण्याजोगें आहे. इतकेंही होऊन खरोखर कर्तबगार, व बुद्धीवान् माणसेंच या पद्धतीनें तयार होऊन निवडून निघालीं असतीं तर हा अन्याय देखील क्षम्य झाला असता. पण शाळांमधून मिळणारें शिक्षण म्हणजे कांहीं गोष्टींची माहिती घोकून डोक्यांत सांठवणें एवढाच समजण्यांत येत असल्यामुळें विद्यार्थ्यांचें शील बनविण्याकडे व त्याच्या बुद्धीचा खरा विकास करण्याकडे शिक्षक लक्ष देऊं शकतील अशी आशा वाटेनाशी झाली आहे. आतां शाळांतून कर्तबगार मुलें बनविण्यांत येत नसलीं तरी परीक्षेनें जन्मसिद्ध कर्तबगार मुलें असतील तीं तरी निवडलीं जातील असें कोणास वाटत असेल तर त्यानें पुढें दिलेला उतारा पहावा.

" सॅम्युएल स्माइल्स नांवाच्या ग्रंथकारानें एके ठिकाणीं असें लिहून ठेविलें आहे कीं * स्विफ्ट बहुतेक परीक्षेंत नापास होत असे; जेम्स वॅट ( वाफेची शक्ति शोधून काढणारा ), स्टीफन्सन् आणि न्यूटन ( सुप्रसिद्ध ज्योतिषी व गणिती ) यांची गणना हुषार विद्यार्थ्यांत होत नव्हती; आणि सुप्रसिद्ध कादंबरीकार वाल्टर स्काट यास विद्यार्थीदशेंत एका प्रोफेसरानें " गचाळ " असें ठरवून टाकलें होतें. उत्क्रांतितत्व शोधून काढणारा सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डार्विन यानें तर आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, मी शाळेंतून बाहेर पडलों त्यावेळीं माझी गणना हुषार मंडळींत होत नव्हती; इतकेंच नव्हे तर माझ्या सर्व शिक्षकांच्या व बापांच्या मतें मी अगदींच सामान्य बुद्धीचा—सर्वसाधारण मुलापेक्षांही कमी दर्जाचा—आहे असें ठरलें होतें.

सारांश; शाळेंत किंवा परीक्षेंत हुषारीबद्दल किंवा बेअकलीपणाबद्दल मिळालेलें सर्टिफिकीट मनुष्याचा भावी आयुष्यक्रम अजमावण्यास उपयोगी पडेल असा आग्रह धरण्यांत अर्थ नाहीं. कारण परीक्षेंत पहिल्या वर्गांत आलेली मंडळी मोठेपणीं कर्तृत्वशून्य ठरलेलीं व नापास झालेले विद्यार्थी नांवालौकिकास चढलेले पुष्कळ ठिकाणीं आढळून येतात. असें होण्याचें कारण मोठेपणीं त्यांची बुद्धि बदलते, सुबुद्ध माणसें निर्बुद्ध बनतात किंवा निर्बुद्धांना एकदम स्फुरण येतें असें नाहीं; तर शाळांतून जें माहितीचें ओझें डोक्यावर लादण्यांत येतें तें समजण्यास, पठण्यास किंवा पचविण्यास विद्यार्थ्यांना वेळ मिळत नसल्यामुळें स्वविचाराच्या व बुद्धीच्या मुलांना या जुलमाचा [illegible] येतो, व हुषार म्हणवून घेण्याकरितां या प[illegible]

* एक नामांकित इंग्रजी ग्रंथकार.

वनविण्यापेक्षां ' मठ्ठ ' म्हणवून घेण्याची तयारी ठेवून खरोखर जें पटण्याजोगें व पचण्याजोगें असेल तेंच शोधून काढण्यांत त्यांचें मन रमतें. सारांश: कडक परीक्षेच्या सत्रानें बुद्धिमान् माणसेंच निवडतां येतील या म्हणण्यास युरोपांतील किंवा हिंदुस्थानांतील अनुभवाचा बिलकुल आधार नाहीं. मग ही सबब पुढें करून विद्यार्थ्यांची कत्तल करण्याचें व्रत परीक्षकांनीं कां स्वीकारावें ? परीक्षा घेण्यावांचून गत्यंतर नाहीं हें कबूल केलें तरी आमचें म्हणणें असें आहे कीं नेमलेले विषय विद्यार्थी शिकले आहेत किंवा नाहीं एवढेंच पाहण्याकरितां परीक्षा घ्यावी. फार लोक पास होऊं लागले म्हणून कडक परीक्षा घ्यावी हें मत कोणत्याही न्यायाच्या कसोटीस टिकण्याजोगें नाहीं. समाजांत मानमान्यता कोणास मिळावी व कोण कर्तबगार ठरेल हें पाहण्याकरितांही परीक्षा कडक करूं नये, कारण ती परीक्षा पास होण्याकरितां मनुष्य जन्मभर झटत असतो व समाज त्याला योग्य तें सर्टिफिकीट देण्यास समर्थ आहे.

---


# शिवलीलामृत रंगीत चित्रांसह.

हा ग्रंथ डेमी अष्टपत्री, जाड व ग्लेझ कागदावर जाड बाल्लिक टाइपांत छापून तयार आहे. चौदा अध्यायांत एकंदर २० रंगीत चित्रें घातलीं असून चित्रें फारच सुबक व मनोहर आहेत. चित्रें आर्ट-पेपरवर छापलेलीं आहेत. शिवाय ही पोथी अनेक हस्तलिखित जुन्या प्रतींवरून शुद्ध करून छापली आहे. काळसर ग्लेज व सफेत ग्लेज कागदावरील अनुक्रमें किं. ८ व ८१० ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगबद्दल ४ आ. जास्त पडतील.

# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यत: मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यांत मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं गाणींही दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं झोपाळ्यावर बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ ओव्या व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे उखाणेही बरेच दिलेले आहेत. किंमत ८४. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# स्वयंपुरोहित.

## [ नवीन सुधारलेली मंत्रार्थासह चवथी आवृत्ति. ]

हें पुस्तक जवळ असलें म्हणजे देवपूजा, संध्या, मुंज, लग्न, व्रतें, श्रावणी, दशक्रिया वगैरे सर्व धर्मविधि करतां येतात व पंचांगही समजतें. भटाची गरज पडत नाहीं. किं० तूर्त ८६.

मोतीराव वानखडे, कारजगांव ( वऱ्हाड. )

# दुधांत साखर.

शीख धर्माचा संस्थापक गुरु नानक हा मोठा विचारी, धैर्यशाली व चाणाक्ष पुरुष होता हें आमच्या बऱ्याच वाचकांना माहीत असेलच. हे गुण स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस आणून देणारा एक प्रसंग नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका चरित्रांत दिला आहे. तो असाः—

मुलतान येथें एक वेळ गुरुजी नदीतीरावर बसले होते. इतक्यांत तेथल्या मुसलमान पिरांनीं त्यांजकडे काठोकाठ दुधानें भरलेला एक पेला पाठवून दिला. गुरुजींनीं त्यांत कांहीं साखरेचे बतासे चुरडून टाकले व वर एक फूल ठेवून तो पेला दुधासकट जशास तसा परत पाठविला. तेव्हां मर्दान नांवाचा एक शिष्य असें म्हणाला कीं "महाराज, दूध म्हणजे प्रत्यक्ष अन्न तेव्हां आपण होऊन लोकांनीं तें तुमच्याकडे पाठविलें होतें तर तुम्ही तें पिणेंच योग्य होतें. तें न पितां तुम्ही परत केलेंत ही गोष्ट मला चमत्कारिक दिसते." तेव्हां गुरूनीं असें उत्तर दिलें कीं "पिरांनीं जें मजकडे दूध पाठविलें होतें तें पिण्याकरितां नव्हे तर हा गांव फकीरांनीं अगदीं भरून गेला आहे व नवीन धर्म प्रचारकांना येथें वाव नाहीं हें सुचविण्याकरितां तो दुधानें काठोकाठ भरलेला पेला मजकडे पाठविला होता. मीं जें उत्तर दिलें त्याचा अर्थ असा कीं बताशाला ज्याप्रमाणें दुधांत वाव सांपडतो त्याप्रमाणें या फकीरांनीं गजबजलेल्या समाजांत माझा संचार सुलभ रीतीनें होईल; इतकेंच नव्हे तर दुधावर ज्याप्रमाणें फूल मजेनें पोहत राहतें त्याप्रमाणें समाजांत माझ्या मतांस अग्रस्थान मिळाल्यावांचून राहणार नाहीं." नंतर तेथील सर्व हिंदु व मुसलमान फकीर गुरुजीचे शिष्य बनले हें निराळें सांगावयास नकोच.



गुरु नानक.

# सुशिक्षितांचा धेडगुजरीपणा.

मुसलमानी अमदानींत आमच्या समाजाचें वर्णन करतांना एका कवीनें 'न संध्यां संधत्ते नियमित निमाजान्न कुरुते' वगैरे लक्षणें सांगून तत्कालीन लोकांना हिंदु म्हणतां येत नाहीं व यवनहि म्हणतां येत नाहीं असे निराशेचे उद्गार काढले आहेत. सध्या 'सुशिक्षित' म्हणून गणल्या जाणाऱ्या लोकांचे आचार व विचार यांचें सूक्ष्म अवलोकन केलें तर अशाच प्रकारचे उद्गार आमच्या विचारी कवींना काढावे लागतील असें आम्हांस वाटतें. आमच्या समाजावर गेल्या पांच सात शतकांपासून व विशेषत: गेल्या शंभर दीडशें वर्षांपासून जे जोराचे आघात झाले आहेत, अगदींच भिन्न संस्कृतीच्या समाजानें आम्हांस जिंकल्यामुळें आमच्या लोकांची अशी कांहीं धांदल उडाली आहे कीं ती प्रत्येक ठिकाणीं पदोपदीं आढळल्यावांचून राहत नाहीं. मुसलमानी टोळधाडी आमच्या देशावर आल्या त्यावेळीं पहिल्या पहिल्यानें जरी समरभूमीवर आमच्या लोकांचा पराभव झाला व त्यांनीं केलेल्या कत्तलीनें आणि लुटीनें आमचा समाज कांहीं कालपर्यंत गांगरून गेला तरी हिंदूंच्या बुद्धिमत्तेपुढें मुसलमानांची दांडगाई टिकाव धरूं शकत नाहीं असा अनुभव येतांच आमच्या समाजानें उचल खाऊन मुसलमानी राज्यकर्त्यांना पचवून टाकलें. त्यानंतर युरोपियन संस्कृतीशीं आमची गांठ पडली, आणि त्यांतल्या त्यांत अत्यंत व्यवहारचतुर, कोणत्याही हट्टास न पेटतां तडजोडीनें कारभार चालविणारे आणि व्यवस्थितपणें व जुटीनें वागण्याचें बाळकडू ज्यांना लहानपणापासून पाजण्यांत येतें अशा इंग्रजी राष्ट्राकडे आमच्या देशाचें प्रभुत्व गेल्यामुळें जे फेरफार दृग्गोचर होण्यास कित्येक शतकें लागलीं असतीं ते अवघ्या शंभर वर्षांत चोहोंकडे दिसूं लागले आहेत. आमच्या समाजांत अशी एकही बाब आतां शिल्लक राहिली नाहीं कीं जिच्यावर युरोपियन संस्कृतीची कमीजास्त प्रमाणांत छाया पडली नाहीं. आमचे अगदीं सर्वसाधारण व्यवहार पाहिले तरी त्यांत इंग्रजीचें अनुकरण आढळून येतें. पोषाख, चालीरीति, बोलण्याची ढब, आणि खाणेंपिणें व चहापाणी देखील इंग्रजी 'फ्याशनचें' असल्यावांचून लोकांना पटेनासें झालें आहे. पण या अनुकरणांत एक मोठा दोष दिसतो तो हा कीं त्यावरून इंग्रजी संस्कृतीचें अंतरंग आमच्या लोकांनीं न ओळखतां बाह्यांगाची मात्र ते नक्कल करूं पाहत आहेत. आमचे लोक इंग्रजी वाङ्मय वाचतात पण त्याचें अध्ययन करीत नाहींत; नवे नवे शोध लागून ज्या ऐषआरामाच्या सोयी युरोपियन लोकांच्या घरीं दिसतील त्या आमच्या घरीं विकत आणण्यास आमचे लोक बरेच उत्सुक असतात; पण त्यांचें मर्म समजाऊन घेणारा किंवा नवा शोध लावून एखादा जिन्नस उत्पन्न करणारा मनुष्य पाहूं गेल्यास सांपडत नाहीं. युरोपियन इतिहासकारांचे सिद्धांत वाचून आम्हीं आमची करमणूक करून घेतों पण त्या सिद्धांतावरून आमची प्रवृत्ती बदलून ज्या प्रकारचे निश्चयी व सदाचारसंपन्न आचरण दिसलें पाहिजे त्याचा कोठें पत्ताच नाहीं. सारांश आमच्या सुशिक्षितांचें वर्तन म्हणजे एखाद्या आश्चर्यचकित बालकाप्रमाणें आहे. युरोपियन तत्वज्ञानानें तर आमच्या सुशिक्षितांच्या मनाची त्रेधाच उडाली आहे. त्यांनीं आपलें अज्ञान झांकण्याकरितां 'अज्ञेयवादा' चें अवलंबन केलें आहे. युरोपियन तत्त्वज्ञ 'अज्ञेयवादी' बनतो

याचें कारण कितीही विचार केला तरी सृष्टीच्या आद्यंताचा पत्ता समाधानकारक रीतीनें लागत नाहीं अशी पुष्कळ अनुभवानें त्याची खात्री पटली हें आहे; पण आमचा 'सुशिक्षित' विचार करण्याच्या दगदगींतून सुटण्याकरितां आणि आपल्या पोकळ ज्ञानावर व आळसावर पांघरूण घालण्याकरितां आपणास अज्ञेयवादी म्हणवीत असतो मुद्याच्या गोष्टींत हा फरक असल्यामुळें आमच्या लोकांनीं मद्यमांस सेवन करण्याचा, बूट पाटलोण व नेकटाय वापरण्याचा जो धडाका चालविला आहे तो विचारपूर्वक केलेला फरक नसून तें पोरकटपणानें केलेलें बाह्यांगांचें अनुकरणच आहे असें म्हणणें भाग आहे. या अनुकरणानें ते इंग्रजांचे सद्गुण उचलतील अशी आशा वाटत नाहीं.

या शोचनीय स्थितीचें कारण आमची प्रचलित शिक्षणपद्धति. या शिक्षणपद्धतींत विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकविण्यापलीकडे दुसरें ध्येय दिसत नाहीं. सर्व प्रकारचें ज्ञान मातृभाषेंतून दिल्यास त्रास कमी पडून विद्यार्थ्यांचा समज लवकर पटतो. हिंदुसमाजास इतिहास व परंपरा फार पुरातन कालापासून असल्यामुळें त्यांचें सांगोपांग अध्ययन न करवितां परकीय इतिहास व तत्वज्ञान यांची माहिती आम्हांस फायदेशीर होणें शक्य नाहीं आणि स्वत्वाची ओळख पडण्यापूर्वीं परकीय सुधारणा मुलांपुढें उभी करण्यानें ते गोंधळून जाण्यापलीकडे दुसरा कोणताही परिणाम व्हावयाचा नाहीं वगैरे मूलभूत सिद्धांत हीं शिक्षणपद्धती सुरू करण्याच्या वेळीं प्रवर्तकांच्या लक्षांत आले नव्हते असें दिसतें. पण याबद्दल त्यांना आतां दोष देत बसण्यांत अर्थ नाहीं; कारण पन्नास वर्षांपूर्वीं म्हणजे ही पद्धति सुरू करण्याचे वेळीं तिचे अनिष्ट परिणाम स्पष्टपणें न दिसणें शक्य होतें. चालू पिढीस हे दोष दिसले तर त्यांत मोठसें नवल नाहीं. कारण हे परिणाम व ही पिढी समकालीन आहेत. सारांश; कोणती कां होईना पण एक पद्धति सुरू करून अनुभवानें आम्हास तिचे गुणदोष जाणण्यास साधनें उपलब्ध करून दिलीं याबद्दल या शिक्षणाच्या प्रवर्तकांचे आभार मानून चालू पिढीनें तिचे दोष काढून टाकण्यास झटलें पाहिजे. आणि आमच्या सुदैवानें सरकारी अधिकाऱ्यांना व लोकांच्या जबाबदार पुढाऱ्यांना ही गोष्ट पटल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत असल्यामुळें आम्हांस हितकारक अशी शिक्षणपद्धति अस्तित्वांत येईल अशी आशा वाटूं लागली आहे. ही आशासृष्टींतली गोष्ट प्रत्यक्षसृष्टींत आणण्यास झटणें हें प्रत्येक विचारी हिंदी गृहस्थाचें कर्तव्य आहे असें आमच्या वाचकांना सुचवून हा लेख आटोपता घेतों.

---


# फोटो बक्षीस.

जे कोणी आपआपल्या गांवांतील ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर हीं अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचनाः**—जिल्ह्याचे गांवचे निदान २५–३०, तालुक्याचे १५–२०, व पेटा वगैरेचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. बी. खानापुरे**, घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

# “ संख्यालेखन. ”

शब्दांनीं सांगितलेली किंवा लिहिलेली संख्या अंकांनीं लिहून दाखविण्याच्या कृतीस संख्यालेखन म्हणतात.

संख्येचा बोध होण्याकरितां ज्या चिन्हांचा किंवा ध्वनींचा उपयोग करितात त्यांस अंक म्हणतात. हें अंक दहा आहेत. १; २; ३; ४; ५; ६; ७; ८; ९; ०. शून्याखेरीज प्रत्येक अंकास दोन प्रकारच्या किंमती असतात. ( १ ) मूळ किंमत. ( २ ) स्थानिक किंमत. उदाहरणार्थ—१ ह्या अंकाची मूळची किंमत एक परिमाण अथवा एक वस्तु, परंतु स्थानपरत्वें त्याची किंमत दहा, एकशें, एकहजार, एकलक्ष इ०. ह्यावरून कोणत्याही अंकाची किंमत संख्येंत तो अंक जसजसा उजवीकडून डावीकडे जातो तसतशी त्याची किंमत दसपटीनें वाढते.

शून्यास स्वतःची किंमत कांहीं नाहीं; परंतु ज्या अंकाच्या तें उजव्या बाजूस येतें तेव्हां त्या अंकाची किंमत तें दसपट करितें. अंकाच्या डाव्या बाजूस शून्य आल्यास त्या अंकाच्या संबंधानें त्याची किंमत शून्यच राहते. कोणत्याही संख्येंत शून्य मिळविल्यानें किंवा वजा केल्यानें संख्येच्या मूळच्या किंमतींत कांहीं बदल होत नाहीं. कोणत्याही संख्येस शून्यानें गुणून गुणाकार शून्य येतो; परंतु भागाकार मात्र असंख्य येतो, तो ∞ ह्या चिन्हानें दर्शवितात.

एकं पासून परार्धापर्यंत स्थानें जरी १८ आहेत; तरी व्यवहारांत विशेष उपयोगीं पडणारीं त्यांतील नऊच स्थानें आहेत. कोणत्याही पदार्थांची मोजदात करितात तेव्हां अब्जापर्यंतच संख्या आपल्या विशेष एकिवांत येते. तेव्हां मुलांनाही अब्जापर्यंत संख्या लिहिण्याची माहिती उत्तम रीतीनें समजावून दिली असतां व पुढील संख्या दशक पद्धतीप्रमाणें कशी मांडावी हें दोन-चार वेळां दाखविलें असतां त्यांस संख्या बरोबर लिहितां येऊं लागेल.

उडीद किंवा वाटाणे घेऊन { एकं दहं दहं शतं<br>१०=१; १०=१;

शतं सहस्र स० दशसहस्र<br>१०=१; १०=१; } त्यांच्या साह्यानें मुलांस हजारांपर्यंत संख्या नीट रीतीनें समजावून सांगितली म्हणजे पुढें ही संख्या परार्धापर्यंत अशीच क्रमाक्रमानें दसपट मोठी होत आहे असा हवाला देण्यास कांहीं हरकत नाहीं. उजवीकडून पहिल्या तीन स्थानांखालीं नेहमीं एका स्थानानें होणारी एक आंकडी संख्या येते. जसें—शतं, दहं, एकं इत्यादि.

४ ० ९; ७ ९ ८

परंतु त्या स्थानांनंतर डावेकडील तीन स्थानें म्हणजे हजार, लक्ष व कोटी ह्यांपैकीं प्रत्येकांत दोन स्थानां मिळून होणारी दोन आंकडी संख्या येते. तशी दोन आंकडी संख्या न येतां एकच आंकडी आल्यास दुसऱ्या स्थानां ऐवजीं त्या आंकड्याच्या डाव्या अंगास शून्य लिहावें लागतें.

हलींच्या शिक्षणक्रमाप्रमाणें संख्यालेखनांस आरंभ दुसरे यत्तेंत होऊन त्यावेळीं ती संख्या लिहिण्यास व वाचण्यास सुलभ रीतीनें कशी शिकवावी हा प्रश्न पडतो. दुसऱ्या यत्तेंत मुलें आल्यावर कांहीं ( मुलांच्या योग्यतेप्रमाणें १० । १५ ) दिवस संख्यालेखनांत दहाचें कोष्टक सर्वांशीं कसें लागू पडतें व त्यामुळें किती सोय होते ह्याची पूर्ण माहिती करून द्यावी; नंतर ( कोटी ) ( लक्ष ) ( हजार ) ( शें ) इष्टसंख्या

द० को० को० द० ल० ल० द० स० स० शतं द० ए०<br>२ ५ ३ ७ ८ १ ४ ६ ९

संख्या डावीकडून उजवीकडे लिहित जावी लागते व तशीच वाचावयाची असते, परंतु स्थानें मोजितानां तीं उजवीकडून डावीकडे मोजीत जावीं लागतात. असें जरी आहे तरी विद्यार्थ्यांना स्थानांचीं नांवें उलट सुलट क्रमानें अगदीं बरोबरच म्हणतां आलीं पाहिजेत. कारण त्याशिवाय संख्या अगदीं बरोबर मांडतां कदापी यावयाची नाहीं.

वरील अब्जापर्यंत मांडिलेल्या संख्येंत उजवीकडील पहिल्या तीन स्थानांत एकेकच आंकडा आहे व पुढील दुहेरी तीन स्थानांत दोन दोन आंकडे आले आहेत. त्यांपैकीं प्रत्येकांतील उजवीकडील आंकडा अनुक्रमें सहस्र, लक्ष व कोटीचा असतो व डावेकडील आंकडा दशसहस्र, दशलक्ष व दशकोटीचा असतो. जेव्हां ह्या दुहेरी तीन स्थानांत एकेकच आंकडा येतो, तेव्हां– दश ( सहस्र, लक्ष, कोटी ) ऐवजीं ' कांहीं नाहीं ' अशा अर्थीं शून्य लिहावें लागतें.

स्थानांचीं नांवें लिहून त्याखालीं सांगितलेली संख्या बिनचूक लिहितां येऊं लागली कीं कांहीं दिवस स्थानांच्या नांवा ऐवजीं वरतीं शून्यें लिहून खालीं संख्या मांडण्याचा क्रम ठेवणें जरूर आहे. जसें–

० ० ० ० ० ० ० ० ० संख्या वाचतांना मात्र
८ ० ५ ६ ० २ ९ ४ १
दशकोटी कोटी द० ल. लक्ष द. स. स० शतं द. ए.
८ ० ५ ६ ० २ ९ ४ १

अशी न वाचितां ८० कोटी ५६ लक्ष २ हजार ९ शें ४१ अशी वाचण्याची पूर्वापार वहिवाट असून तीच हितावह आहे. अशानें वेळ वांचून त्रासही कमी पडतो.

अशा रीतीनें संख्या बरोबर लिहितां वाचितां येऊं लागल्या कीं मग सामान्यार्थी " अमुक " ह्या शब्दाचा उपयोग करून कांहीं दिवस संख्या लिहून घेणें आवश्यक आहे. वास्तविक अमुक कोटी, अमुक लक्ष, अमुक हजार, अमुक शें, अमुक अशा क्रमानें संख्या असली पाहिजे. ह्यांपैकीं शतंच्याच स्थानांत एक आंकडी संख्या बहुतेक येते; क्वचित् प्रसंगीं दोन आंकडीं सांगितल्यास डावेकडील आंकडा सहस्र होणार म्हणून तो सहस्रांत मिळविणें योग्य आहे. बाकीच्या स्थानांत एक आंकडी संख्या आल्यास आंकड्याच्या डाव्या अंगास शून्य देणें आवश्य असून जीं स्थानें मुळींच सांगणार नाहींत त्यांच्या ऐवजीं शतं खेरीज दोन दोन शून्यें देणें आवश्य आहे. शतं ऐवजीं एकच शून्य येणार. जसें ०९००३७००२ अशा क्रमानें संख्या लिहिण्यास व वाचण्यास शिकविली असतां मुलांना व शिक्षकांस फार मेहनत न पडतां उत्तम प्रकारें समजून तीं तें काम बिनचूक करूं शकतात. परंतु हें काम सावकाश रीतीनें चालवून विद्यार्थ्यांना त्यांत निष्णात केलीं पाहिजेत; कारण दुसऱ्या यत्तेंतील पुढील गणिताचा संख्यालेखन हा ' पाया ' आहे, तो मजबूत असल्याविना वरची पुढील भागाची इमारत बरोबर होणार नाहीं. व कित्येक शिक्षकांकडून उतावीळपणाची चुकी होत असल्यामुळें पुढील बेरीज, व वजाबाकी इ. प्रकारचीं गणितें करण्यांत मुलें संख्याच लिहावयास वारंवार चुकतात. करितां हें काम उत्तम प्रकारें होणें अत्यावश्यक आहे.

पूर्णांकांत संख्या उत्तम रीतीनें लिहितां येऊं लागल्या कीं कांहीं दिवस मिश्रसंख्या सांगण्याचा क्रम ठेविला पाहिजे. जसें:—

कोटी लक्ष हजार शें द. ए.
१७। + ३८॥ + ९॥। + २६॥ + ० ५

वरील संख्यांपैकीं ज्या त्या स्थानांतील पूर्ण आंकडा त्या त्या स्थानांत लिहिल्यानंतर अपूर्ण संख्येची किंमत त्याच स्थानाच्या उजवीकडील स्थानांत किती होते हें पाहावें लागतें. त्या दोन स्थानांचा संबंध काय आहे हें समजण्यासाठीं कोष्टक तयार करितां आलें पाहिजे. तें कोष्टक पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

एकं शतं शतं सहस्र हजार लक्ष.
१००=१; १०= १; १००=१;

लक्ष कोटी
१००=१;

ह्या कोष्टकावरून—

( १ ) को.
१७। = १७२५०००००

( २ ) लक्ष
३८॥ = ३८५००००

( ३ ) ह.
९॥। = ०९७५०

( ४ ) शें
२६॥ = ०२६५०
०५

१७६३६२३०५

संख्येंत अपूर्णसंख्या पाव, अर्धा, पाऊण, अशा प्रकारच्या येतात त्यांची किंमत त्या अपूर्णसंख्या शतं, लक्ष, कोटी ह्या स्थानांत असतांना अनुक्रमें त्यांचे एकं, हजार व लक्ष बनविण्याच्या वेळीं शंभर ( पाव, निमे, पाऊणे ) किती ? अशा प्रश्नानें उत्पन्न होतात. परंतु हजारांचे शें बनविण्याच्या कामीं दहा ( पाव, निमें, पाऊणें ) किती ? असा प्रश्न करावा लागतो. एकदा संख्यालेखन उत्तम रीतीनें समजलें म्हणजे पुढील गुणाकार, भागाकारादि विषयांतील शंका सहज फिटून विद्यार्थ्यांच्या हातून भलत्याच स्थानाखालीं भलताच आंकडा मांडणें—उदाहरणार्थ ( १ ) एकं स्थानाखालीं दहं चा आंकडा लिहिणें, ( २ ) उसना घेतल्यावर पूर्वीचा अंक दहानें न वाढविणें, ( ३ ) बेरीज केल्यावर जी संख्या तयार होईल त्या संख्येंतील **डावीकडील आंकडा हातचा** न धरितां उजवीकडील धरणें, ( ४ ) भागाकारांत पुढील आंकडा बाकीच्या उजव्या अंगास न घेणें वगैरे प्रकारचे ढोबळ अपराध होत नाहींत.

दशक पद्धतीमुळें हातचा आंकडा संख्येच्या डाव्या-बाजूकडील सहज येतो. भागाकरांतही बाकीस १० नें गुणून नंतर त्यांत भाज्यांतील पुढील आंकडा मिळवून नंतर भाग पाहिला पाहिजे, परंतु दशक पद्धतीमुळें इतक्या खटपटीचें फळ फक्त पुढील आंकडा बाकीच्या उजव्या अंगास घेतल्यानें सहज साधतें. ही सोय दशकेतर पद्धतींत नाहीं.

**केशव बळवंत जोशी**, हेड्मास्तर.
म्यु० मराठीशाळा वाळुकेश्वर वेट—मुंबई नं. ६

# लहान मुलांस.

( **लेखक**—शांताराम सीताराम सोनलकर. )

**मानस मंगल, वाणी मंगल, कृतिही मंगल ठेवी ।**
**मंगलमय त्या प्रभुपदकमलां संतत सेवित जाई ॥**
**निर्मल तव तें मानस बाळा, शिवो न त्या कधिं कांहीं ।**
**पाप ताप या दुष्ट जगाचें, दूर दूर तूं राही ॥**
**काम, कोप या षड्रिपुपासुनि; पीडिति मनुजा भारी ।**
**छळिती तैसे दुष्ट सर्वदा जे सकलां संसारीं ॥**
**नको नको सहवास तयांचा निर्मल अन्तःकरणा ।**
**मंगल तैशा बाळा तुझिया दूर झुगारी त्यानां ॥**
**जनहितकार्यासाठीं जगतीं जन्म मला प्रभु देई ।**
**संतत सखया बाळा, ऐशा सुविचारा मनिं ठेवी ॥**
**दिसती तूतें हतदैवी जे जन या भूमीवरती ।**
**स्वजनासम ते प्रेम करीरे सखया तूं त्यांवरती ॥**
**दुःख तयांचें वारुनि त्यांतें होई तूं सहकारी ।**
**मिळतिल तुजला लोकीं मग तीं सौख्यें खचितचि सारीं ॥**
**मंगल मानस, मंगल वाणी, कृतिही तव ती साची ।**
**मंगल ठेवी, विसरूं नको बा विनया तूं तैसाची ॥**
**वर्तुनि जगतीं रीती ऐशा भूषण स्वकुला होई ।**
**वेचुनि जीवित जनहितकार्यीं वंद्य जगा या होई ॥**

# मीराबाई.

[ लेखक—" देवी श्री अहल्याबाई " चा कर्ता. ]

धन्या मीराबाई भगवज्जनवृंदवर्ण्य कुलशीला ॥
प्रबला विभागिनी, जी झाली श्रीला तशीच तुळशीला॥

मोरोपंत.

या आर्यावर्तातील सुसंस्कृत स्त्रियांत साधारणपणें सर्वतोमुखीं होण्याचा मान जर कोणाला मिळाला असला, तर तो देवी श्री अहल्याबाईच्या खालोखाल साध्वी मीराबाईलाच होय. या असाधारण भक्तिमतीचें चरित्र देण्याचें आज येथें योजलें आहे.

सोळाव्या शतकाचे आरंभीं राजपुतान्यांत मेढता संस्थानांत रत्नसिंह या नांवाचा एक राठोड राणा होऊन गेला. या वेळीं त्याचा बाप दुदाजी हा जिवंत असल्यानें रत्नसिंह हा कुडकी म्हणून मेढत्याजवळ एक गांव आहे, तेथें रहात असे. याच गांवीं त्याला संवत १५६१ सालीं एक कन्यारत्न झालें. याच कन्येचें नांव मीराबाई हें होय. या मुलीची आई लवकर वारल्यानें तिला तिच्या आजानें आपल्याजवळ ठेवलें. मीराबाईला लहानपणापासूनच देवादिकांचे खेळ खेळावेसे फार वाटत. ती कृष्ण-लीला-लळित करी व त्यांत राधामाधव आणून त्यांचें लग्न करीत असे. तिला श्रीकृष्णाचें अत्यंत वेड लागलें. तें इतकें कीं तिनें सारा दिवसभर श्रीकृष्णाचे खेळ खेळत असावे. हे तिचे अकृत्रीम व भक्तीमय खेळ पाहून तिच्या वृद्ध अजोबास फार आनंद होई. तशांत तिची आई नसल्यानें त्याचें तिजवरील प्रेम वृद्धिंगत होऊं लागलें. मीरा हीही अत्यंत सुशील व सात्वीक वृत्तीची असल्यानें दुदाजीच्या वाढत्या प्रेमांत कसचाही व्यत्यय आला नाहीं.

याप्रमाणें बरींच वर्षें लोटलीं. एकदां दुदाजीकडे एक साधु आला. तो गिरधरलालाचा भक्त होता. त्याचा पूजासमारंभ चालला असतां मीरा त्याच्याजवळच बसली होती. तिच्या मनांत त्या साधूच्या गिरधरलालाची मूर्ति इतकी भरली कीं, तिनें ती मूर्ति त्याच्याजवळ मागितली. पण तो तिला आपल्या रोजच्या पूजेची मूर्ति कशी देणार ? तो तिला जेव्हां ती मूर्ति देईना तेव्हां मीरानें दुदाजीकडून तीबद्दल मागणी केली. पण त्या मूर्तीची पूजा झाल्याशिवाय भोजन करावयाचें नाहीं असा त्या साधूजीचा नियम असल्यानें त्यानें आपली मूर्ति देण्याचें नाकारलें. त्यानें वेदांत सांगावयास प्रारंभ केला. "मुली, जर तुला गिरधरलालाजीची इतकी आवड आहे, तर तूं त्याचें ध्यान करीत जा, तो तुला ध्यानांत दिसेल." असें म्हणून त्यानें राजगृहांतून पाय काढला. हा वेदांत खुद्द त्या साधूच्या हृदयावर कोठें बिम्बला होता ? नाहीं तर त्यानें ती मूर्ति आपल्या जवळ कशाला ठेवली असती ? ही स्थिति जर खुद्द वेदांत सांगणाराची तर त्या बालिकेला तो कोठून मानवणार ? मीरेचें मन त्या मूर्तीवर गेलें—नव्हे तिचें आणि गिरधरलालाचें लग्नच लागलें. तिला त्याचा असह्य विरह झाला. या गोष्टीचा तिच्या प्रकृतीवरही परिणाम होऊं लागला. तिनें त्या मूर्तीसाठीं आकांत मांडला. हा प्रकार पाहून दुदाजी भ्याला. त्याला वाटलें, गिरधरलालापायीं या पोरीचा आतां प्राण जाणार ! त्यानें त्या साधूच्या शोधास्तव पुष्कळ लोक पाठविले. पण तो कोणालाही सांपडला नाहीं. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें तो साधू दुदाजीकडे

आला. त्याला मीराबाईचें गिरधरलालावरील उत्कट प्रेम पाहून अत्यंत कौतुक वाटलें. तशांत त्याला दृष्टांत झाला कीं, ही मूर्ति मीराबाईला द्यावी. हें पाहून त्यानें तो गिरधारलाल मीराबाईच्या स्वाधीन केला. यामुळें मीराबाईला परमसौभाग्य प्राप्त झालें. तिला त्या मूर्तीचें अत्यन्त वेड लागलें. गिरधरलाल तिचे जीव कीं प्राण झाले. गिरधरलाल जीवंत सहचारी आहेत, आपले प्रभू आहेत. आपण त्याची दासी आहोंत, असें मनोभावानें समजून ती त्या मूर्तीची एकनिष्ठपणें सेवा करूं लागली.

मीराबाईच्या भक्तपणाची कीर्ति पाण्यावरल्या तैलबिंदूप्रमाणें प्रसार पावूं लागली. तिच्या गोष्टी सिसोदिया वंशांतील सुप्रसिद्ध राणासंग याच्याही कानीं गेल्या. त्यानें दुदाजीकडे आपला मुलगा भोजराज याच्यासाठीं तिला मागणी केली. या भोजराजाला रत्नसिंह, विक्रमसिंह व उदयसिंह असे तिघे भाऊ होते. दुदाजी वगैरे मंडळींनीं मीरेला तिच्या लग्नाबद्दल विचारलें. पण तिच्या मनांतून लग्न करावयाचें नव्हतें. पण घरच्या मंडळींच्या आग्रहास्तव ती एका अटीवर लग्न लावावयास तयार झाली. व ती अट अशी कीं, लग्नसमयीं आपण गिरधरलालास लांब सोडणार नाहीं, जवळच घेऊं! घरच्या मंडळींनीं तो पोर आग्रह समजून ती अट मान्य केली. अर्थात् मीराबाईनें लग्नसमयीं जवळ गिरधरलाल घेतला. लोकांत मात्र तिचा आणि राणासंग याचा मुलगा भोजराज याचा विवाह लागला.

मीरा सासरीं गेल्यावर सिसोदियांच्या चालीप्रमाणें तिला भगवान श्री शंकरजीची पूजा करावयाचा प्रसंग आला. पण तिला गिरधरलालाशिवाय कोणीही प्रिय नसल्यानें ती एकलिंगजीची पूजा करावयास तयार होईना. ही गोष्ट राण्याच्या घरांतील बायामंडळीस मुळींच आवडली नाहीं. तशांत मीराबाई ही पोरवयाची नसून त्यांना तिचा फारच राग आला. त्या तिला नाहीं नाहीं तें बोलल्या. पण मीराचा आपला एकच हट्ट कीं, "मी गिरधरजीशिवाय कोणाचीही पूजा करणार नाहीं. तशांत शिव व विष्णु एकच आहेत. मग मी विष्णूची पूजा केली तर शिवाला तरी राग कां यावा?" हें मीरेचें म्हणणें बरोबर होतें. पण वरील साधूच्या वेदांताप्रमाणेंच हा तिचा वेदांत होता. हें म्हणणें तिच्या अंतःकरणावर अजून बिंबलें नव्हतें. जर बिंबलें असतें तर शिव हा गिरधर आहे असें समजून तिनें त्याची पूजा करावयास कांहीं हरकत नव्हती. पण या प्रसंगीं तिचें म्हणणें निव्वळ हट्टानें होतें व तें घरांतील मंडळींना आवडलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर स्वतः राण्यालाही आवडलें नाहीं. त्याला आपल्या सुनेचा राग आला व त्या भरांत त्यानें तिला भूतानें वसती केलेल्या एका जुनाट वाड्यांत ठेवून दिलें.

मीराबाईला या गोष्टीचा मुळींच खेद झाला नाहीं. कारण तिचा सकळ दुःखहर्ता गिरधरलाल याच्यावर पूर्ण भरंवसा होता. संगाच्या या कृत्यानें उलट तिला एकांतांत रहावयास मिळाल्यानें फार आनंद वाटला. तिनें त्या महालांत आपल्या खर्चानें एक मंदिर बांधलें आणि त्यांत गिरधरलालाची स्थापना करून ती त्याची पूर्ववत् पूजा करूं लागली. आतां तिला परमेश्वर-स्तवन आपल्या मनाप्रमाणें करतां येऊं लागलें.

### पद.

**हरिगुन गावत नाचूंगी ॥ धृ० ॥ आपने मंदिरमों बैठ बैठकर। गीता भागवत बाचूंगी ॥ १ ॥ ग्यान ध्यानकी गठडी बांधकर। हरीहरसंग मै लागूंगी ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरधर नागर। सदा प्रेमरस चाखुंगी ॥ ३ ॥**

हें सर्व तिला मनमुराद करतां येऊं लागलें. भोजराजाचें लग्न झालें होतें खरें, पण मीराबाई ही नांवाला त्याची बायको असल्यानें राण्यानें आपल्या मुलाचा द्वितीय विवाह केला. पण मीराबाईला या गोष्टीचें क्षणमात्रही वाईट वाटलें नाहीं. व तिचें लक्ष अशा गोष्टीकडे केव्हांही गेलें नाहीं. ती आपला काळ साधुलोकांच्या भेटींत व गिरधरलालाच्या सेवेंत घालवूं लागली. यानंतर लवकरच म्हणजे संवत १५८२ (इ. स. १५२५) त तिचा पति भोजराज वारला.

पण याही गोष्टीचा तिच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. जणूं काय या गोष्टीचा तिच्या आयुष्य-क्रमाशीं कसलाही संबंधच नव्हता.

यानंतर सुमारें तीन वर्षांनीं फत्तेपूरशिक्री येथील सुप्रसिद्ध युद्ध झालें. या युद्धांत संगाच्या वतीनें पुष्कळसे रजपूत राजे लढले. त्यांतच मीराबाईच्या माहेरचीही मंडळी होती. या युद्धांत रजपुतांनीं आपल्या सैन्याची शिकस्त केली पण पहिला मोगल बादशहा बाबर यानें त्यांचा पूर्ण मोड केला. या प्रसंगीं राणासंग हा आपल्या हजारों बांधवांसह रणांगणांत पडला. त्यांत मीराबाई-च्या माहेरचेही लोक होते. त्यांच्या सहवासांत तिचें सारें बाळपण गेल्यानें तिला या प्रसंगीं दुःख होणें स्वाभाविकच होतें. पण जगाच्या वहिवाटीप्रमाणें तिला हें दुःख सहन करावें लागलें.

राणासंग याचा ज्येष्ठ पुत्र भोजराज हा आधींच वारल्यानें त्याच्यामागें त्याचा दुसरा मुलगा रत्नसिंह हा गादीवर बसला. हा राणा मोठा समजूतदार, पापभीरू व सज्जन असल्यानें त्याच्या मनांत आपल्या भावजयी-बद्दल फार आदरभाव होता. तो तिच्याशीं अत्यंत सालसपणें वागत असे. तो तिच्या कोणच्याही प्रकारें वाटेस गेला नाहीं; इतकेंच नव्हे तर तो तिला प्रत्येक गोष्टींत साह्य करीत असे. हा तिचा सद्गुणी दीर फार दिवस राहिला नाहीं. तो इ. स. १५३५ च्या सुमारास परलोकवासी झाला.

रत्नसिंहानंतर त्याचा धाकटा भाऊ विक्रमजित हा गादीवर बसला. हा भाऊ गुणानें रत्नसिंहाच्या अगदीं उलट होता. मीराबाईकडे भेटावयास पुष्कळ साधुसंत येत. ती साधुसंताची अत्यंत भुकेली होती. तिला साधु-संगतीचें किती वेड होतें, हें तिच्याच एका पदांत सांगतों.

**पद.**

**अब तो मेरे रामनाम दुसरा न कोई ॥ धृ० ॥ माता छोडी, पिता छोडे, छोडे सगा भाई ॥ साधुसंग बेठ बेठ लोकलाज खोई ॥१॥ संत देखो दोड आई, जगत देख रोई ॥ प्रेमके आसु डाल डाल अमरवेल होई ॥ २ ॥ मारगमें, दोई तारण मीले संत राम दोई ॥ संत हमारे शिशउपर, राम हृदय होई ॥ ३ ॥ अंतमेसे तंत काढयो पिछे रही सोई ॥ राणे में लिया बिषका प्याला पिईने मगन होई ॥ ४ ॥ अबतो बात फेल गई जाने सब कोई ॥ दासी मीराबाई गिरधरनागर होनारी सो होई ॥ ५ ॥**

मीराबाई साधुलोकांच्या भेटी घेते, हें त्याला अगदीं खपत नसे. तो तिच्या विरुद्ध नाहीं नाहीं त्या शंका घेऊं लागला. तशांत त्याला आईची फुस मिळाली. त्यांना वाटे, या कारटीनें आमच्या सिसोदिया वंशाच्या उज्वल कीर्तीला कलंक लावला. ते हा कलंक धुऊन टाकावयास तयार झाले. रजपूतांनीं आपल्या मार्गांतील काटे काढावयासाठीं ज्या मार्गाचा वारंवार अवलंब केला, तोच मार्ग प्रस्तुत प्रसंगीं त्यांनीं अवलंबण्याचा विचार चालविला. त्या उभयतां मातापुत्रांनीं कट करून मीरा-बाईकडे तीर्थ म्हणून विष पाठवून दिलें. मीराबाईला राण्याच्या स्वभावाची चांगली माहिती होती. तिनें खरा प्रकार काय होता, तो ओळखला. तिला आपल्या निष्कलंक वर्तनाची पूर्ण खात्री होती व गिरधरलाल आपला खरा पाठीराखा आहे हा तिचा पूर्ण विश्वास होता. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता साक्रेटीस हा ज्याप्रमाणें अधि-कारी वर्गानें प्यावयास पाठविलेलें विष प्याला, त्याच-प्रमाणें ही तरुण भगवद्भक्त मीराबाई राण्यानें पाठविलेलें विष आनंदानें पिऊन गेली. पण ती या संकटांतून सुदैवानें वाचली. या प्रसंगाचें महिपतीनें भक्तविजयांत भक्तिपरिपूर्ण वर्णन केलें आहे. प्रस्तुत गोष्टीविषयीं मिराबाईचे उद्गार वर लिहिलेल्या पदांत आले आहेत.

मीराबाई ईश्वरस्तवनपर पदें करूं लागली व तीं गाण्यांत तद्रूप होऊं लागली. ती पदें म्हणण्यांत अत्यंत कुशल होती. तिची कीर्ति अकबर बादशहाचे कानीं आल्यावरून त्याला तिची भेट घ्यावयाची इच्छा झाली. त्याप्रमाणें तो तानसेनासह साधूचा वेश घेऊन तिच्या भेटीस गेला. कारण साधुव्यतिरिक्त इतर मंडळीस ती सहसा भेटत नसे. पुढें ही गोष्ट राण्याचे कानावर गेली ती ऐकून त्याला इतका राग आला कीं, तो तरवार

घेऊन तिच्या अंगावर धांवून गेला, पण तिला मारावयास धजला नाहीं. मीराबाई त्याच्या डोळ्यांत फार खुपत होती. तिला नाहींशी करावयास त्यानें दुर्जन लोकांच्या सल्ल्यावरून मीराबाईकडे एक विषारी नाग डब्यांत घालून पाठवून दिला आणि तिला कळविलें कीं, या डब्यांत एक शाळिग्राम आहे, तो दर्शनास्तव पाठविला आहे. शाळिग्रामाचें नांव ऐकतांच तिनें ती डबी अत्यंत भक्तिभावानें उघडली आणि आंत पाहिलें तों तिला चंदनहार दिसला ! वर सांगितलेली विषप्राशनाची गोष्ट व ही गोष्ट तिच्या ज्या पदांत ग्रथित केली आहे तें—

पद.

**रंगेलो राणो कई करसो मारो राज्य ॥ हुं तो छांडी छांडी कुलनी लाज ॥ धृ० ॥ पग बांधीने घुंगरा हातमो छीनी सतार ॥ आपने ठाकुरजोके मंदीर नाचुं वां हरी जागे दिनानाथ ॥ १ ॥ विखको प्यालो राणाजीनें भेजो कें 'दिजे मीराबाई हात ' ॥ करचरणामृत पीगई मीराबाई ठाकुरको प्रसाद ॥ २ ॥ सापरो पेटारो राणाजीनें भेजो दासाजीनें हात ॥ सापरो उपाडांनें गलामों डारयो हो गयो चंदन हार॥मीरा कहे प्रभु गिरधरनागर तूं मारो भरतार ॥**

राण्यानें पाठविलेल्या नागाच्या तडाक्यांतून मीराबाई वांचली, याच्या मुळाशीं तिच्या ठिकाणीं पराकाष्ठेची भक्ति असलेल्या एकाद्या चाकराचें हस्तकौशल्यही असेल. तें कांहीं असलें, तरी इतकें खरें कीं, ती आणखी कांहीं वर्षे जगावी अशी ईश्वराची इच्छा होती.

मीराबाईचा साधेपणा, सात्त्विकता व सरलता तिच्या पदांत पदोपदीं दिसते. तिचा भाबडा भक्तिभाव स्पष्ट कळावयास एकच पद सांगतों.

पद.

**मै तो तेरे भजन भरोसे अविनासी ॥ धृ० ॥ तीरथ बरत ते कुछ नही कीनो, बन फिरे है उदासी ॥ १ ॥ जंतर मंतर कुछ नहीं जानूं, बेद पढो नहीं कासी ॥२॥ मीराके प्रभु गिरधरनागर, भई चरणकी दासी ॥३॥**

तिचें गोकुळवासी श्रीकृष्णावर अत्यंत प्रेम असून त्याच्या लीला तिच्या नेत्रासमोर जणुंकाय प्रत्यक्ष घडत आहेत अशा दिसत.

पद.

**जसवदा मैय्यां नित सतावे कनैय्यां ॥ वाकु मुरकत क्या कहूं मैय्यां ॥ धृ० ॥ बैल लावे भीतर बांधे, छोर देवत सब गैय्या॥१॥ सोते बालक आन जगावे, ऐसा धीट कनैय्यां ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरधरनागर, हरी लागुं तोरे पैय्यां ॥ ३ ॥**

याप्रमाणें तिला श्रीकृष्णाचें वेड लागलें. ती रात्रीं भक्तिभावानें भजन करी व गिरधरमय वृत्ति झाली कीं, तो आपला नाथ जवळच आहे असें समजून ती त्याच्याशीं भाषण करी. ती कृष्णास म्हणते.

पद.

**मत डारो पिचकारी । मै सगरी भिजगई सारी ॥ धृ० ॥ जीन डारे सो सनमुख र[illegible]यो, नहीं तो मैं देउंगी गारी ॥ १ ॥ भर पिचकारो मेरे मुखपर डारी, भीजगई तन सारी ॥ २ ॥ [illegible]ाल गुलाल उडावन लागे, मैं तो मनमें बलहारी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभू गिरधर नागर, चरनकमल बलहारी ॥ ४ ॥**

याप्रमाणें ती भक्तिरंगांत तल्लीन होऊन गिरधरलालाशीं खेळूं लागे. हे खेळ म्हणजे टवाळ लोकांस राजाची मर्जी संपादन करावयास मोठें साधनच मिळालें. त्या लोकांस मिराबाईचें आचरण आपल्या थिल्लर वर्तनाप्रमाणेंच दुषित असें वा[illegible] त्यांनीं राण्याच्या मनांत भरवून दिलें कीं, मीरा [illegible] आपल्या महालांत परपुरुष आणून त्यांच्याशीं हं[illegible], खिदळते व नानाचार करते. याबद्दलची आम्हीं [illegible]तः तिचीं भाषणें ऐकिलीं आहेत व पाहिजे अस[illegible]ास या विषयीं महाराजांचीही खात्री करून देऊं. [illegible] भाषण ऐकून विक्रमजीत संतापानें लाल झाला. [illegible] सूय व हा जयद्रथ अशी खाली करून उभयतांचा [illegible]क्ष करून टाकावा अशा निश्चयानें तो मीरेच्या [illegible]ांत गेला. त्यावेळीं ती परमेश्वर भजनांत दंग झाल[illegible] [illegible] राण्याला तिचीं परमेश्वर विषयक भाषणें क[illegible]जनांप्रमाणें वाटून तो

त्वेशानें आंत गेला; पण त्याला पुष्कळ तपासांतहिं गिरधरलालाशिवाय कोणीही दिसलें नाहीं. याप्रमाणें त्याचा जेव्हां तेथें मोठा हिरमोड झाला, तेव्हां तो खजिल होऊन तेथून निघून गेला.

मीराबाईच्या वाटेंत राण्याचीं 'अशी' मधून मधून विघ्नें येऊं लागलीं. तिला तेथें मनसोक्त देवभक्ति करतां येईना. असें म्हणतात कीं, एकदां तर ती या त्रासास कंटाळून जीव द्यावयास निघाली होती; पण दैविक चमत्कृतीमुळें तो प्रसंग टळला. शेवटीं ती त्यांच्या त्रासास कंटाळून निवांतपणें आपल्या गिरधर-प्रभूची सेवा करावयास माहेरीं निघून आली. राण्याला वाटलें, औषधाशिवाय खरुज गेली.

मीराबाई माहेरींही फार दिवस राहिली नाहीं. ती वृंदावन पहावयास निघाली. यावेळीं तिचें वय बरेंच झालें होतें. तिला या यात्रेंत कष्ट फार होतील म्हणून घरच्यांनीं तिनें जाऊं नये म्हणून फार आग्रह केला. पण परमेश्वरदर्शनलोलुप झालेली मीराबाई माहेरीं कशी रहाणार ? ती अनेक साधुसंतांसह वृंदावनांत गेली. त्या काळीं यात्रेंत फार कष्ट होत. पण तिचें भक्तिबळ बळकट असल्यानें तिला या कष्टाचें कांहींच वाटलें नाहीं.

वृंदावनांत तिला कृष्णलीलांचें स्मरण होऊन तिला तें स्थान अत्यंत प्रिय झालें. भक्त लोकांची अशी समजूत आहे कीं, वृंदावनांत पुरुष काय तो एकटा श्रीकृष्ण, बाकी सारे तिचे भक्त--गोपी होत. या संबंधीं मीराबाईची एक गोष्ट सांगण्यांत येते, ती अशी; वृंदावनांत जीवगोस्वामी या नांवाचे एक निस्सिम कृष्णभक्त महंत राहत असत. मीराबाईच्या कानीं त्यांची कीर्ति गेल्यानें तिनें त्यांस भेटीची इच्छा कळविली, तेव्हां स्वामीजींनीं तिला निरोप पाठविला--

**श्रीवृन्दावनबीचमें करों आइके बास ।**
**स्त्रीसह संभाषण करन अहें न मोहिं सुपास ॥**

हें उत्तर ऐकून मीराबाईनें त्यांच्या डोळ्यांत झणझणित अंजन घातलें--

**श्रीवृन्दावन धाममें सुन्यो न इत दिन आन ।**
**पुरुष बसत है कोई इक बिना कृष्ण भगवान ॥**

हें अंजन डोळ्यांत पडतांच स्वामीजी लागलीच शुद्धीवर आले आणि त्यांनीं अत्यंत आनंदानें मीराबाईची भेट घेतली.

वृन्दावनानंतर मीराबाई द्वारकेला गेली. तेथें तिचे सर्व हेतू परिपूर्ण झाले. आतां तिला कसली म्हणून इच्छा राहिली नाहीं.

याच सुमारास उदेपुरांत-मीराबाईच्या सासरीं-अनेक संकटें उत्पन्न झालीं. याचें कारण विक्रमजीतानें मीराबाईचा छळ केला, असें लोक म्हणूं लागले. त्यावेळचा राणा उदयसिंह यासही असेंच वाटून या संकटपरंपरेस आळा पडावा म्हणून त्यानें त्या साध्वीला उदेपुरास आणावयास एक पुरोहित पाठविला. त्यानें उदेपुरास चालण्याचा तिला अतोनात आग्रह केला. पण तिचें सारें चित्त गिरधरमय झाल्यानें तिला उदेपुरास जावेसें कसें वाटणार ? तिनें तेथून चलण्याचें नाकारलें. पण भटजीमहाराज नांव म्हणून तिचें ऐकेनात. अशा अडचणींत ती सांपडली. या प्रसंगीं तिनें आपला सर्व हवाला देवावर सोंपविला. ती गिरधरलालासमोर गेली व तेथें भजन करीत असतां तिचें एकाएकीं प्राणोत्क्रमण झालें ! तिचे हेतू परिपूर्ण झाले.

मीराबाईचें हें सारें चरित्र नाभाजीनें मोठ्या चातुर्यानें सारे सहाच ओळींत ग्रथित केलें असल्यानें तें येथें सांगतों.

### छप्पय.

**सदृश गोपिको प्रेम प्रगट कलियुगहिं दिखायो ॥**
**निरअंकुश अति निडर रसिक यश रसना गायो ॥**
**दुष्टनि दोष विचार मृत्युको उद्यम कीयो ॥**
**बार न बांको भयो गरल अमृत ज्यों पीयो ॥**
**भक्ति निशान बजायकै, काहूतें नाहित लजी ॥**
**लोकलाजकुलशृंखला, तजि मीरा गिरधर भजी ॥**

हेंच या साध्वीच्या चरित्राचें तात्पर्य असल्यानें त्या संबंधीं मला निराळें असें लिहावयास कांहीं राहिलें नाहीं !

घेऊन तिच्या अंगावर धांवून गेला, पण तिला मारावयास धजला नाहीं. मीराबाई त्याच्या डोळ्यांत फार खुपत होती. तिला नाहींशी करावयास त्यानें दुर्जन लोकांच्या सल्ल्यावरून मीराबाईकडे एक विषारी नाग डब्यांत घालून पाठवून दिला आणि तिला कळविलें कीं, या डब्यांत एक शाळिग्राम आहे, तो दर्शनास्तव पाठविला आहे. शाळिग्रामाचें नांव ऐकतांच तिनें ती डबी अत्यंत भक्तिभावानें उघडली आणि आंत पाहिलें तों तिला चंदनहार दिसला ! वर सांगितलेली विषप्राशनाची गोष्ट व ही गोष्ट तिच्या ज्या पदांत ग्रथित केली आहे तें—

पद.

**रंगेलो राणो कई करसो मारो राज्य ॥ हुं तो छांडी छांडी कुलनी लाज ॥ धृ० ॥ पग बांधीने घुंगरा हातमो छीनी सतार ॥ आपने ठाकुरजीके मंदीर नाचुं वो हरी जागे दिनानाथ ॥ १ ॥ विखको प्यालो राणाजीनें भेजो कें 'दिजे मीराबाई हात' ॥ करचरणामृत पीगई मीराबाई ठाकुरको प्रसाद ॥ २ ॥ सापरो पेटारो राणाजीनें भेजो दासाजीनें हात ॥ सापरो उघाडानें गलामों डारयो हो गयो चंदन हार॥मीरा कहे प्रभु गिरधरनागर तूं मारो भरतार ॥**

राण्यानें पाठविलेल्या नागाच्या तडाक्यांतून मीराबाई वांचली, याच्या मुळाशीं तिच्या ठिकाणीं पराकाष्ठेची भक्ति असलेल्या एकाद्या चाकराचें हस्तकौशल्यही असेल. तें कांहीं असलें, तरी इतकें खरें कीं, ती आणखी कांहीं वर्षें जगावी अशी ईश्वराची इच्छा होती.

मीराबाईचा साधेपणा, सात्विकता व सरलता तिच्या पदांत पदोपदीं दिसते. तिचा भाबडा भक्तिभाव स्पष्ट कळावयास एकच पद सांगतों.

पद.

**मै तो तेरे भजन भरोसे अविनासी ॥ धृ० ॥ तीरथ बरत ते कुछ नहीं कीनो, बन फिरे है उदासी ॥ १ ॥ जंतर मंतर कुछ नहीं जानूं, बेद पठो नहीं कासी ॥२॥ मीराके प्रभु गिरधरनागर, भई चरणकी दासी ॥३॥**

तिचें गोकुळवासी श्रीकृष्णावर अत्यंत प्रेम असून त्याच्या लीला तिच्या नेत्रासमोर जगुंकाय प्रत्यक्ष घडत आहेत अशा दिसत.

पद.

**जसवदा मैय्यां नित सतावे कनैय्यां ॥ वाकु सुरकत क्या कहूं मैय्यां ॥ धृ० ॥ बैल लावे भीतर बांधे, छोर देवत सब गैय्या॥१॥ सोते बालक आन जगावे, ऐसा धीट कनैय्यां ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरधरनागर, हरी लागुं तोरे पैय्यां ॥ ३ ॥**

याप्रमाणें तिला श्रीकृष्णाचें वेड लागलें. ती रात्रीं भक्तिभावानें भजन करी व गिरधरमय वृत्ति झाली कीं, तो आपला नाथ जवळच आहे असें समजून ती त्याच्याशीं भाषण करी. ती कृष्णास म्हणते.

पद.

**मत डारो पिचकारी । मै सगरी भिजगई सारी ॥ धृ० ॥ जीन डारे सो सनमुख र[illegible]यो, नहीं तो मैं देउंगी गारी ॥ १ ॥ भर पिचकारो मेरे मुखपर डारी, भीजगई तन सारी ॥ २ ॥ [illegible]ाल गुलाल उडावन लागे, मैं तो मनमें बलहारी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभू गिरधर नागर, चरनकमल बलहारी ॥ ४ ॥**

याप्रमाणें ती भक्तिरंगांत तल्लीन होऊन गिरधरलालाशीं खेळूं लागे. हे खेळ म्हणजे टवाळ लोकांस राजाची मर्जी संपादन करावयास मोठें साधनच मिळालें. त्या लोकांस मिराबाईचें आचरण आपल्या थिल्लर वर्तनाप्रमाणेंच दुषित असें वा[illegible]. त्यांनीं राण्याच्या मनांत भरवून दिलें कीं, मीरा [illegible] आपल्या महालांत परपुरुष आणून त्यांच्याशीं हं[illegible], खिदळते व नानाचार करते. याबद्दलची आम्हीं स्वतः तिचीं भाषणें ऐकिलीं आहेत व पाहिजे अस[illegible]ास या विषयीं महाराजांचीही खात्री करून देऊं. [illegible] भाषण ऐकून विक्रमजीत संतापानें लाल झाला. [illegible] सूर्य व हा जयद्रथ अशी खाली करून उभयतांचा [illegible]क्ष करून टाकावा अशा निश्चयानें तो मीरेच्या [illegible]ांत गेला. त्यावेळीं ती परमेश्वर भजनांत दंग झाल[illegible] [illegible] राण्याला तिचीं परमेश्वर विषयक भाषणें क[illegible]जनाप्रमाणें वाटून ती

त्वेशानें आंत गेला; पण त्याला पुष्कळ तपासांतहिं गिरधरलालाशिवाय कोणीही दिसलें नाहीं. याप्रमाणें त्याचा जेव्हां तेथें मोठा हिरमोड झाला, तेव्हां तो खजिल होऊन तेथून निघून गेला.

मीराबाईच्या वाटेंत राण्याचीं 'अशी' मधून मधून विघ्नें येऊं लागलीं. तिला तेथें मनसोक्त देवभक्ति करतां येईना. असें म्हणतात कीं, एकदां तर ती या त्रासास कंटाळून जीव द्यावयास निघाली होती; पण दैविक चमत्कृतीमुळें तो प्रसंग टळला. शेवटीं ती त्यांच्या त्रासास कंटाळून निवांतपणें आपल्या गिरधर-प्रभूची सेवा करावयास माहेरीं निघून आली. राण्याला वाटलें, औषधाशिवाय खरुज गेली.

मीराबाई माहेरींही फार दिवस राहिली नाहीं. ती वृंदावन पहावयास निघाली. यावेळीं तिचें वय बरेंच झालें होतें. तिला या यात्रेंत कष्ट फार होतील म्हणून घरच्यांनीं तिनें जाऊं नये म्हणून फार आग्रह केला. पण परमेश्वरदर्शनलोलुप झालेली मीराबाई माहेरीं कशी रहाणार? ती अनेक साधुसंतांसह वृंदावनांत गेली. त्या कालीं यात्रेंत फार कष्ट होत. पण तिचें भक्तिबळ बळकट असल्यानें तिला या कष्टाचें कांहींच वाटलें नाहीं.

वृंदावनांत तिला कृष्णलीलांचें स्मरण होऊन तिला तें स्थान अत्यंत प्रिय झालें. भक्त लोकांची अशी समजूत आहे कीं, वृंदावनांत पुरुष काय तो एकटा श्रीकृष्ण, बाकी सारे तिचे भक्त–गोपी होत. या संबंधीं मीराबाईची एक गोष्ट सांगण्यांत येते, ती अशी; वृंदावनांत जीवगोस्वामी या नांवाचे एक निस्सिम कृष्णभक्त महंत राहत असत. मीराबाईच्या कानीं त्यांची कीर्ति गेल्यानें तिनें त्यांस भेटीची इच्छा कळविली, तेव्हां स्वामीजींनीं तिला निरोप पाठविला—

**श्रीवृन्दावनबीचमें करौं आइके बास।**
**स्त्रीसह संभाषण करन अहें न मोहिं सुपास॥**

हें उत्तर ऐकून मीराबाईनें त्यांच्या डोळ्यांत झणझणित अंजन घातलें—

**श्रीवृन्दावन धाममें सुन्यो न इत दिन आन।**
**पुरुष वसत है कोई इक बिना कृष्ण भगवान॥**

हें अंजन डोळ्यांत पडतांच स्वामीजी लागलीच शुद्धीवर आले आणि त्यांनीं अत्यंत आनंदानें मीराबाईची भेट घेतली.

वृन्दावनानंतर मीराबाई द्वारकेला गेली. तेथें तिचे सर्व हेतू परिपूर्ण झाले. आतां तिला कसली म्हणून इच्छा राहिली नाहीं.

याच सुमारास उदेपुरांत-मीराबाईच्या सासरीं-अनेक संकटें उत्पन्न झालीं. याचें कारण विक्रमजीतानें मीराबाईचा छळ केला, असें लोक म्हणूं लागले. त्या-वेळचा राणा उदयसिंह यासही असेंच वाटून या संकट-परंपरेस आळा पडावा म्हणून त्यानें त्या साध्वीला उदे-पुरास आणावयास एक पुरोहित पाठविला. त्यानें उदे-पुरास चालण्याचा तिला अतोनात आग्रह केला. पण तिचें सारें चित्त गिरधरमय झाल्यानें तिला उदेपुरास जावेसें कसें वाटणार? तिनें तेथून चलण्याचें नाकारलें. पण भटजीमहाराज नांव म्हणून तिचें ऐकेनात. अशा अडचणींत ती सांपडली. या प्रसंगीं तिनें आपला सर्व हवाला देवावर सोंपविला. ती गिरधरलालासमोर गेली व तेथें भजन करीत असतां तिचें एकाएकीं प्राणोत्क्रमण झालें! तिचे हेतू परिपूर्ण झाले.

मीराबाईचें हें सारें चरित्र नाभाजीनें मोठ्या चातुर्यानें सारे सहाच ओळींत ग्रथित केलें असल्यानें तें येथें सांगतों.

### छप्पय.

**सदृश गोपिको प्रेम प्रगट कलियुगहिं दिखायो॥**
**निरअंकुश अति निडर रसिक यश रसना गायो॥**
**दुष्टनि दोष विचार मृत्युको उद्यम कीयो॥**
**बार न बांको भयो गरल अमृत ज्यों पीयो॥**
**भक्ति निशान बजायकै, काहूतें नाहिंन लजी॥**
**लोकलाजकुलशृंखला, तजि मीरा गिरधर भजी॥**

हेंच या साध्वीच्या चरित्राचें तात्पर्य असल्यानें त्या संबंधीं मला निराळें असें लिहावयास कांहीं राहिलें नाहीं!

# स्नानासंबंधीं महत्त्वाच्या सूचना.

शरीरास व्यायाम, स्वच्छता व आरोग्य यांचा लाभ करून देण्यास पोहण्यासारखें सुलभ व सुखकारक साधन दुसरें कोणतेंही उपलब्ध नाहीं. पण हाच पोहण्याचा नाद कित्येकांचा प्राण घेण्यास कारण होतो; व साध्या स्नानानें देखील कित्येकांची प्रकृति बिघडते असा अनुभव पुष्कळ ठिकाणीं येतो. यासाठीं पुढें दिलेल्या सूचना प्रत्येक विद्यार्थ्यानें नेहमीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

अगदीं थकवा आल्यावेळीं किंवा भरपूर जेवण झाल्यापासून दोन तासांचे आंत स्नान करूं नये. ज्यांची प्रकृति निकोप आहे त्यांनाच पहाटेचें थंड पाण्याचें स्नान मानवतें. इतरांना तें बाधण्याचा पुष्कळ संभव असतो. लहान मुलांनीं व अशक्त माणसांनीं आठ नऊ वाजल्यावर स्नान करणें श्रेयस्कर आहे. कपडे काढल्यावर थंडींत उगाच कुडकुडत बसूं नये; एकदम स्नानास लागावें; व स्नान होतांच आंगावर कांहीं आच्छादन घ्यावें. स्नानानंतर उघड्या आंगावर थंडगार वारा लागणें हें बहुतेक अशक्त मनुष्यांना थंडी होण्याचें कारण असतें. त्याचप्रमाणें ओलेत्यांनीं फार वेळ राहूं नये. स्नान करीत असतां थंडी वाजली किंवा हातापायाचीं बोटें बधिर झालीं तर उघड्या जागेंत स्नान सोसत नाहीं असें समजावें. अशा प्रकारचा भास होतांच लवकर स्नान आटोपून कपडे घालावे. अर्थात या सर्व सूचना अशक्त लोकांकरितांच आहेत. सर्व साधारणपणें व्यवस्थितपणें वागणाऱ्या व नमस्कार किंवा दुसरा एखादा व्यायाम बिनचूकपणें करणाऱ्या मुलांना पहाटे थंड पाण्याचें स्नान मानवण्यास कांहीं हरकत पडत नाहीं.

पोहण्यास कसें शिकावें हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. पण पोहणाऱ्यांनीं लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी येथें सांगतों. चांगले चांगले पोहणारे लोक पोहतां पोहतां कांहीं कारण नसतां मृत्युमुखीं पडलेले आढळतात. याचा बारीक तपास करून डाक्तरांनीं असें ठरविलें आहे कीं, दमेकऱ्यांनीं फार पोहणें धोक्याचें आहे. कारण त्यांचा श्वास एकदम बंद पडून हातापायाचें चलन थांबतें व तोंडांत पाणी जातें. त्याचप्रमाणें ज्यांचे कान फुटत असतील त्यांनीं पाण्यांत उडी घेतांना फार सावधगिरी ठेवली पाहिजे. पाण्याच्या आघातानें कानांतील नाजूक पडद्यावर दाब पडून या लोकांना घेरी येण्याचा संभव असतो. घेरी आली म्हणजे चलनवलन बंद पडून मनुष्य बुडतो हें निराळें सांगावयास नकोच. यासाठीं अशा लोकांनीं उडी मारण्यापूर्वीं कानांत कापसाचे बोळे घालावे. ‘ बुडत्यास हात द्यावा ’ हें अगदीं खरें आहे. पण तेंही शहाणपणानें केलें पाहिजे. नाहीं तर बुडणारा व वांचवूं पाहणारा अशा दोघांसही जलसमाधि मिळण्याचा संभव असतो. बुडणारा मनुष्य बेशुद्ध स्थितींत असेल तर त्याची शेंडी धरून खेंचावा व त्यास उताणा करून ओढीत कांठावर आणावें. पण तो शुद्धीवर असून धडपडत असेल तर त्याच्या पाठीमागून जाऊन दंडास धरावें. त्याचा दंड छातीस चिकटूं न देतां सरळ धरावा, म्हणजे त्याच्या छातींत भरपूर हवा भरून तो हलका होईल. नंतर आपण त्याच्या कचाट्यांत न सांपडतां पाठीकडून पोहत कांठावर यावें. बुडणाऱ्या माणसाचें सारें शरीर व पाय होतां होईतोंवर पाण्याच्या पृष्ठभागावर ठेवण्याचा प्रयत्न करावा.

म्याट्रिक, स्कूलफायनल व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरण, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत मराठी भाषेंतील सुमारें दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय (Idioms) आणि म्हणी व अवांतर शेंकडों संप्रदाय, यांचे शास्त्रीयरीत्या वर्गीकरण केलेलें असून त्यांचें मराठींत सोपपत्तिक स्पष्टीकरण केलेलें आहे, व भरपूर उदाहरणेंही दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणांच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील शेंकडों अवतरणें दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे न्याय, ज्योतिषांतील शब्द, संस्कृत वाक्यें किंवा वाक्यांश, वगैरेंचें खुलासेवार स्पष्टीकरण केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय ह्याच्या जोड्या दिल्या आहेत. पुस्तकांत एखादा विशिष्ट शब्द पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक स्कूलफायनल वगैरे परीक्षांच्या उमेदवारांस, तसेंच मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास करणाऱ्यांस हें पुस्तक अत्यंत उपयोगी असें झालें आहे. रा० रा० विद्याधर वामन भिडे बी. ए. यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या जातीचें व इतक्या विस्ताराचें पुस्तक मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं पायका टाइपाचीं पानें सुमारें ५०० वर असून बांधणी कापडी व जाड पुठ्याची आणि मजबूत अशी आहे. किंमत दीड रुपया. ट० हं० व्ही० पी० सह ३ आणे.

# निबंधलेखन आणि अनुवाद.

म्याट्रिक्युलेशन, स्कूलफायनल, पब्लिक सर्व्हिस्, वगैरे परीक्षांस मराठी भाषा हा एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत निबंध लिहावा लागतो, व दिलेल्या पद्यांचा अनुवाद करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें सोयीचें पुस्तक नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं मथळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्यांत निबंध-लेखन हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून निबंधांचे तीन प्रकार कोणते हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या सदरवाऱ्या कशा पाडाव्या, हें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर सुमारें ५० निबंध लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत अनुवाद म्हणजे काय हें सांगून तो कसा करावयाचा, ह्यासंबंधाच्या तपशील-वार सूचना देऊन अनेक प्रकारच्या पद्यांचा अनुवाद करून दाखविला आहे; आणि नंतर कांहीं पद्यसमूह विद्यार्थ्यांना अनुवाद करावयासाठीं दिले आहेत. किं. ८८ ट. ख ८३.

कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

आजपर्यंत राजा रविवर्मा यांचीं चित्रें लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या रंगांत वरीच छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व चित्रें त्या त्या चित्राच्या परिपूर्ण पौराणिक माहितीसह एकवटलेलीं अशीं पुस्तकरूपानें छापल्यास त्यांची फारच जरूर आहे अशा कांहीं लोकांच्या सूचना आल्यावरून आम्हीं वरीलप्रमाणें राजा रविवर्मा यांचीं निवडक चित्रें बुकसाई-जमध्यें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ चित्रें वर्णनासह दिलेलीं असून पुस्तकास कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर) वापरलेला आहे. मुखपृष्ठावर राजा रविवर्मा यांच्या प्रमुख चित्रांपैकीं शकुंतला-जन्माचें चित्र तीन रंगांत सुबक छापलेलें आहे त्यामुळें पुस्तकास विशेषच शोभा आलेली आहे, किं० १ रुपया.

म्यानेजर चित्रशाळा प्रेस पुणें

भगवद्भक्त हैबतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांसारख्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधव-राव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनीं केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्य वाचून राहणार नाहीं.

ह्या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेलें आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरेदार आहे. मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेलें असून किंमत अवघी ८४ आ. ठेविली आहे.

# सचित्र ] रुक्मिणी स्वयंवर. [ सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांत तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुसत्या रफ कागदावरील पोथीस ८६ व ग्लेज कागदावरील ८८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह किं. ८१० व ८१२ आहे पोस्टेज ८१८९.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

किंमत ८१२ ] चित्रयुक्त [ किंमत ८१२

# बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

ह्यांत अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी. म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.

हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ८१० सदाशिव पेठ—पुणें शहर येथें 'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. अंक ३.

# विषयक्रम.

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| व्यायामाची आवश्यकता कां नव्हती ? | ४३ |
| काऱ्यांना लहानमोठे आंगठे कां असतात ? | ४४ |
| ब्रह्मचर्य व्रत. | ४५ |
| नाण्यांना कव कां असतात ? | ४५ |
| कोणतीं जनावरें कोणत्या देशांत आढळतात ? | ४६ |
| ऋणानुबंध ( एक गोष्ट ). | ४७ |
| अन्न. | ५० |
| हालतीं चित्रें. | ५१ |
| गप्पागोष्टी. | ५२ |
| पांच हजार मैलांवरून बोलणें ऐकूं येतें ! | ५३ |
| या गोष्टी कधीं करूं नका. | ५६ |
| उलट सुलट तोंड फिरविणारा पक्षी. | ५७ |
| नाण्याचीच जरूरी काय ? | ५८ |
| गरीबांना पत्रें येत नसतात ! | ५९ |
| लहान तोंडीं मोठा घास. | ६१ |
| परोपकारी कुत्रा. | ६१ |
| अंकगणितकारांचा कणकोडी अन्याय ! ! ! | ६२ |

विक्रीस तयार !  विक्रीस तयार !!  विक्रीस तयार !!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१२.

व्यापाऱ्यांस कमिशन.

---

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

मलई इत्यादि पदार्थांपासून मिळतात. या द्रव्यांच्या योगानें अंगांत चरबी उत्पन्न होऊन आमचीं शरीरें गरम व उबदार अशीं राहतात. तूप व तेल यांपासून शरीरास उष्णतेचा पुरवठा फार लवकर होतो. व त्यांचे खालोखाल साखर, गूळ व ज्यांत साखरेचा अंश जास्त आहे अशा पदार्थांपासून होतो. यास कार्बनमय अन्न असेंहि म्हणतात. कारण आपल्या शरिरास अवश्य लागणरी उष्णता उत्पन्न होतांना व निरनिराळ्या भागांचें चलन होत असतांना शरिरांतील जें घटक द्रव्य जळत असतें, ते मुख्यतः कार्बनमय असतें. वर जें या अन्नाचें प्रमाण दिलें आहे तें फक्त स्निग्ध द्रव्याचें आहे.

पिष्ठमय द्रव्यें यास इंग्रजींत स्टार्च असें म्हणतात. तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, इत्यादि धान्यें; सर्व प्रकारचीं कंदमुळें, बटाटे, रताळीं इत्यादि; व सर्व प्रकारचा भाजपाला यांपासून आपणांस पिष्ठमय द्रव्यें मिळतात. हीं द्रव्यें शरिरांत शक्ति उत्पन्न कारितात. या शक्तीलाच इंग्रजींत ‘ इनर्जी ’ असें म्हणतात. एवढ्या करितांच या पिष्ठमय द्रव्यांचा पुरवठा बराच केला पाहिजे.

तसेंच दूध, चांगलें स्वच्छ पाणी व ताजा भाजीपाला यांचाहि बराच पुरावठा करणें अवश्य आहे. कारण यांत चुना, लोह, पोटॅश इत्यादि धातु जास्त मिळतात. अन्नांतहि हे धातु असतात, परंतु ते कमी प्रमाणानें असतात. या धातूंच्या योगानें हाडांची वाढ होते.


सर्व प्रकारच्या अन्नांत मांसोत्पादक द्रव्यें व पिष्ठमय द्रव्यें हीं कमीजास्त प्रमाणानें असतातच. परंतु ज्या पदार्थांत मांसोत्पादक द्रव्यें जास्त सांपडतात त्यांस मांसोत्पादक द्रव्यें असें म्हणतात व ज्या पदार्थांत पिष्ठमय द्रव्यें जास्त प्रमाणानें सांपडतात त्यांस पिष्ठमय द्रव्यें असें म्हणतात. या वरून अन्नाच्या प्रकाराविषयींची कल्पना आपणांस थोडी बहुत तरी येईल असें वाटतें.

---

# हालतीं चित्रें.

अलीकडे पुणें, मुंबई वगैरे शहरांतून थोड्या खर्चात हालतीं चित्रें पाहण्याची सोय झालेली आहे. तीं चित्रें कशीं तयार करतात याचें पुष्कळ मुलांना मोठें गूढ पडतें, व आपणांस तशीं करतां येतील तर मोठी गंमत होईल असें त्यांना वाटत असतें. ही त्यांची इच्छा पुरी करण्याकरितां येथें दोन अगदीं सोपे प्रयोग देतों.

१ बुबुळें फिरविणारें मनुष्याचें चित्र— एखाद्या मासिक पुस्तकांतील किंवा जाहिरातींमधील दोनहीं डोळे असलेले ( समोरून घेतलेले ) मनुष्याचें चित्र एका लांबट कागदावर चिकटवावें. नंतर सुईनें त्याचे



डोळे भोसकून चांगलीं भोकें पाडावीं त्यानंतर एक कोरा कागद मागल्या बाजूस धरून त्यावर वरील चित्राच्या डोळ्याच्या भोकांतून शाईचे ठिपके द्यावे. म्हणजे त्या चित्रांतील मनुष्याचे डोळे चांगले दिसूं लागतील. नंतर डाव्या हातांत चित्र धरून उजव्या हातानें मागला कोरा कागद किंचित् उजव्या डाव्या बाजूस हालवावा म्हणजे त्या चित्रांतील मनुष्याचे डोळे हालल्याचा भास होतो. चित्र चिकटविण्या ऐवजीं कागदावर आपणच मुलांनीं काढावें, व तो कागद चित्रांत दाखविल्याप्रमाणें निम्यावर दुमडून, आंत डोळ्यांच्या ठिपक्याचा कागद ठेवावा म्हणजे तो हलविणें सोईचें पडेल.

# गप्पागोष्टी.

अलेक्झांडर दि ग्रेटनें एकदां एका प्रसिद्ध चितार्‍यास आपण आपल्या आवडत्या घोड्यावर बसलों आहोंत असें मोठें चित्र काढण्यास सांगितलें. चित्र तयार झाल्यावर 'अलेक्झांडर' तें पहाण्यास गेला. त्या चित्रांत अमुक एक चुकलें आहे असें त्यास सांगतां येईना; तरीपण हुबेहुब घोड्यासारखें चित्र दिसत नाहीं, असें तो म्हणे. तेव्हां चितार्‍यानें पाहण्याकरितां तो घोडाच आणविण्यास सांगितलें.

घोडा चित्राजवळ येतांच, (आपणासमोर खरोखरीचा दुसरा घोडा आहे असें समजून) तो खेंकाळूं लागला. तेव्हां चितारी म्हणतो ' महाराज, आपणापेक्षां आपल्या घोड्यास चित्राची परीक्षा अधिक आहे. '

* * *

एकदां एका गृहस्थानीं आपल्या मुलास एका तत्त्ववेत्त्याजवळ तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यास ठेविलें. शिक्षण पुरें झाल्यावर मुलगा घरीं परत येतांच त्यानीं मुलास विचारलें, ' तूं काय शिकलास ? '

मुलानें उत्तर केलें ' येईल आपणांला एकादे दिवशीं कळून ' तेवढ्यानें त्या गृहस्थांचें समाधान झालें नाहीं, व त्यांचा स्वभाव फार तापट असल्यामुळें त्यानीं एकदम रागाच्या भरांत फाडदिशी मुलाच्या तोंडांत दिली.

पण त्यामुळें आपल्याला राग आल्याचें कांहींही चिन्ह न दाखवितां मुलगा शांतपणें म्हणाला ' दुसर्‍याचा राग शांतपणें सहन करणें ही एक गोष्ट मी तेथें शिकलों आहें.'

* * *

आठ दहा मित्रांना एक क्लब होता. त्यापैकीं एक गृहस्थ ' फार उधळे ' म्हणून त्यांची ख्याती होती. तेव्हां त्याना कांहीं धडा मिळावा म्हणून त्या मित्रांपैकीं एका जरा वयस्क मित्रानें एक युक्ति केली.

एके दिवशीं ते सगळे जमले असतां, आपल्या क्लबकरितां कांहीं सामान घ्यावयाचें आहे असें सांगून त्यानें प्रत्येकाजवळ आठ आठ आणे मागितले. पण त्या उधळ्या गृहस्थांजवळ आल्यावर मात्र त्यानें त्यांच्याजवळ २५ रुपये मागितले. तेव्हां ते त्यास म्हणतात— ' हें काय ? तुम्ही या सर्वांजवळून मात्र आठ आठ आणे घेतलेत; आणि मजजवळच २५ रुपये मागतां ? '

तो गृहस्थ म्हणाला—' या सर्वांजवळून पुढें लागतील तसे आणखीही पैसे मिळतील पण तुमच्याजवळून मात्र पुढें आणखी पैसे मिळण्याची आशा नाहीं. म्हणून तुमच्याजवळून ते आतांच घेऊन ठेवितों. '

* * * *

एका गृहस्थांच्या घरीं कांहीं कारणानिमित्त वीस पंचवीस पान व्हावयाचें होतें. जेवावयाची वेळ होऊन मंडळी सोंवळें नेसतात तोंच एक आगंतुक आंत येऊन एकदम एका पानावरच बसला; तेव्हां पानें बेताचींच मांडलेलीं असल्यामुळें यजमान त्यास म्हणाले—' तुम्ही अंमळ बाहेर बसा, मग तुमचें पान मांडूं. येथें फक्त पंचवीस पानांचीच जागा आहे. व येथें ही पंचवीस मंडळी आधींच आहेत. तेव्हां तुम्हाला येथें जागा होणार नाहीं.'

पण ते भटजी पक्केच आगंतुक होते. ते म्हणतात— 'का बरं मला जागा नाहीं होणार ? आपण एकेकाला पानावर बसवा; व बसवितांना मला अगोदर बसवा म्हणजे झालें.'

* * * *

एकदां एका लढाईत एका पक्षाचा शत्रूनें पुष्कळ ठिकाणीं मोड केला, परंतु एकदां मात्र शत्रूचेच पुष्कळसे घोडे त्यांच्या हातीं लागले. तेव्हां त्यांतील २५।३० चांगले चांगले घोडे पाहून सैन्यांतील वरवरले अधिकारी त्यांवर स्वार झाले. तोंच शत्रूकडील शिंग वाजलेलें ऐकूं आलें. व त्याबरोबर सर्व घोडे भराभर आपल्या छावणीकडे पळत सुटले. वर बसलेल्या लोकांनीं आपली शिकस्त केली. पण घोडे आवरतना. घोड्यांवरून उड्या टाकाव्या, तरी त्यांच्याच टापांखालीं सांपडून मरण्याची पाळी, घोडे निघाले ते थेट आपल्या छावणींत जाऊन उभे राहिले, व ते अधिकारी आयतेच शत्रूच्या हातीं सांपडले.

# पांच हजार मैलांवरून बोलणें ऐकूं येतें !

'कडकट' वाजणाऱ्या तारेच्या साहाय्यानें एका गांवांतील तारमास्तर शेंकडो मैल अंतरावरील दुसऱ्या गांवांतील तारमास्तराबरोबर बोलूं शकतो हें सर्वांना माहित आहे. पण हें बोलणें केवळ खुणांचें असतें. प्रत्यक्ष शब्द जशास तसे ऐकूं येत नाहींत. पण कांहीं थोडे मैल अंतरापर्यंत प्रत्यक्ष शब्द ऐकूं येतील अशी व्यवस्था मुंबईशहरभर केलेली आहे, त्यास टेलिफोन म्हणतात. तारायंत्र व टेलिफोन या दोहोंनाही मध्यंतरीं या टोंकापासून त्या टोंकापर्यंत तारेची आवश्यकता असते, किंवा आजपर्यंत होती असें म्हटलें पाहिजे. कारण बिनतारेचा संदेशवाहक निघाल्यापासून तारायंत्राचें काम तारेवांचून होऊं लागलें; व अगदीं अलीकडे टेलिफोनचें काम देखील बिनतारेनें व हजारो मैलांवरून होऊं शकतें असें ठरलें. याचाच अर्थ एका ठिकाणचें बोलणें हजारो मैलांवर स्पष्टपणें ऐकूं येण्याची व्यवस्था करतां येते!




**लाइड एस्पेनशीड.** या शास्त्रवेत्त्यानें पांच हजार मैलांवर बोलणें ऐकूं येणारें रेडिओ टेलिफोनचें यंत्र तयार करून बसविलें.

हा अद्भुत प्रकार अमेरिकन शास्त्रज्ञांनीं करून दाखविला आहे. यास '**रेडिओ टेलिफोनी**' असें म्हणतात. याची शक्यता पंध्रा वर्षांपूर्वींच शास्त्रज्ञांच्या लक्षांत आली होती. त्यावेळीं एका मैलावरचें बोलणें बिनतारी टेलिफोननें ऐकूं येण्यास मोठे कष्ट पडत असत, पण दोन महिन्यांपूर्वीं अमेरिकेंतील बोलणें सरासरी तीन हजार मैलांवर पारीस येथें ऐकूं आलें. हें वाचून पुष्कळ नवीन युक्त्या शोधून काढाव्या लागल्या असतील असें वाटण्याचा संभव आहे; पण तशांतला कांहीं एक प्रकार नाहीं. सामान्य तत्त्वें पूर्वींचींच आहेत. पण पूर्वींपेक्षां विजेचे धक्के फार मोठे देऊन अमेरिकन शास्त्रज्ञांनीं ही गोष्ट शक्य केली आहे. पांच हजार मैलांचा प्रवास करणारा विजेचा धक्का अमेरिकेहून निघाला तेव्हां त्याच्या अंगीं एक एंजिनची शक्ति होती; पण तो धक्का युरोपांत पोंचला तेव्हां इतका शक्तिहीन झाला होता कीं त्याचें अस्तित्व अत्यंत सूक्ष्मयंत्राच्या साहाय्यानें मात्र शोधून काढतां येत होतें. पण या आसन्नमरण धक्क्याला फोनोग्राफांतील कण्याप्रमाणें असणाऱ्या एका यंत्रांतून बाहेर काढल्यामुळें तो धक्का पुनः ताजातवाना होऊन आपले शब्द मोठ्यानें उच्चारूं शकला. आपणास दुरून ऐकूं आलेले शब्द आपण मोठ्यानें ओरडून उलट दिशेला आणखी कांहीं अंतरावर पोंचवितों तशांतला हा प्रकार आहे. या सर्व गोष्टी आपणास प्रत्यक्ष प्रयोगानें समजून घेणें अशक्य आहे; पण त्यांची ठोकळ कल्पना येण्यास फारशी अडचण पडत नाहीं.

बिनतारी टेलिफोनची कल्पना येण्यास बोलणें म्हणजे काय याची शास्त्रशुद्ध माहिती पाहिजे. आपण

उच्चारतों म्हणजे फुफ्फुसांतील हवा घशांतील पडद्यामधून कमीजास्त जोरानें तोंडांतून बाहेर ढकलतों. त्या धक्क्यानें हवेंत लहरी म्हणजे लाटा उत्पन्न होतात. हवेंत उत्पन्न होणाऱ्या या नादलहरी जोरदार असणें किंवा दोन लाटांमधील वेळ कमीजास्त असणें हें बोलणाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असतें. या लहरी हवेंतून आमच्या कानांतील पडद्यावर आदळतात; त्यामुळें पडदा हलूं लागतो, व हें पडद्याचें कंपन म्हणजे कापणें मेंदूंत कांहीं भास उत्पन्न करणें त्यास ऐकूं येणें म्हणतात. घशांतील वर्णोत्पादक पडदा, नादलहरी पसरणारी हवा व लहरी ग्रहण करून मेंदूस पोंचविणारा कानांतील पडदा या तीन साधनांमुळें भाषेचा आपण व्यवहारांत उपयोग करूं शकतों. बोलणाऱ्याच्या तोंडाजवळची हवाच दुसऱ्याच्या कानाजवळ प्रत्यक्ष पोंचत नाहीं; तर हवेचे कण थोडे मागेंपुढें हालून लाटेस दूरवर पोंचवितात. साधा स्वरोच्चार असेल तर हें कणांचें हालणें साध्या स्वरूपाचें असतें; आणि व्यंजनोच्चारानें विषम स्वरूपाच्या लहरी उत्पन्न होतात. लहरी साध्या असोत किंवा विषम स्वरूपाच्या असोत पण त्या जशास तशा कानाच्या पडद्यावर उमटतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याचप्रमाणें नादलहरी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोंचतात त्यांस कांहींतरी आधार लागतो हें विसरतां कामा नये. हा आधार साध्या हवेच्या स्वरूपाचा, किंवा तारेच्या स्वरूपाचा अगर विद्युत्प्रवाहरूपी असतो. पैकीं शेवटचा प्रकार बिनतारी टेलिफोनमध्यें आढळून येतो.



**पारीस** येथील ‘ **ईफेल टावर** ’ नांवाचा मनोरा. अमेरिकेंतील बोलणें या मनोऱ्यावर तीन हजार मैलांवरून ऐकूं आलें.

यावरून बिनतारी टेलिफोनमध्यें मुख्य तीन गोष्टी साधावयाच्या असतात त्या अशा:—

१ एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणापर्यंत विजेच्या लाटांचा एकसारखा प्रवाह चालू करणारें यंत्र पाहिजे. या प्रवाहावरून नादलहरी प्रवास करूं शकतात.

२ नादलहरींत होणारा फेरफार विद्युत्प्रवाहांत योग्य रीतीनें ठसविणारें यंत्र पाहिजे.


३ अशा रीतीनें येणाऱ्या लहरी बरोबर रीतीनें ग्रहण करून तो नाद उच्चारून दाखविणारें यंत्र पाहिजे

या तीन यंत्रांस अनुक्रमें **१ प्रेरक, २ नियामक,** व **३ ग्राहक** अशीं नांवें देऊं.

प्रेरक यंत्राच्या अंगीं हजारों मैलांवर पोंचणारा विद्युत्प्रवाह उत्पन्न करण्याची शक्ति पाहिजे. पण या जोरदार विद्युत्प्रवाहाचा आवाज ऐकतांच थरकांप झाला पाहिजे. शास्त्रज्ञांना अडचण पडते ती याच बाबतींत. जोरदार विद्युत्प्रवाह उत्पन्न करतां येतो; पण नादाच्या जोराप्रमाणें या विद्युत्प्रवाहाचें नियमन करणारें यंत्र तयार करणेंच कठीण पडतें. त्याचप्रमाणें ग्राहकयंत्राकडे ही आवाजाची स्वारी पोंचते त्या वेळीं ती अगदीं थकून गेलेली असते, यामुळें तो आवाज जोरदार करावा तेव्हां त्याचें बोलणें ऐकूं येतें. पण ग्राहकयंत्रानें थकलेल्या आवाजाचें स्वागत केल्यावर तो मूळचा निरोप तेवढाच न सांगतां, वाटेंत पाहिलेले

हवेचे फेरबदल देखील सांगूं लागतो; या अनवश्यक गोष्टींचा सावळागोंधळ माजत असल्यामुळें मूळचा निरोप समजण्यास अडचण पडते. सारांश, अनेक प्रकारचे आवाज येतात ते चाळून आपणास पाहिजे असलेल्याच नादलहरी एके बाजूस काढून देणारी 'चाळण' तयार करणें ही ग्राहकयंत्रांतील मुख्य भानगडीची बाब आहे. पण सर्वांत मोठी अडचण म्हणजे नियामक यंत्र करण्याच्या कामीं असते. आणि हें यंत्र अलीकडे समाधानकारक रीतीनें काम करूं लागल्यामुळें बिनतारी टेलिफोनी प्रचारांत येण्याची आशा वाटूं लागली आहे.

गेल्या वर्षी आगष्ट २७ तारखेस अमेरिकेंत आर्लिंगटनपासून डेरीनपर्यंत ( अंतर २१०० मैल ) बिनतारी टेलिफोनीच्या साहाय्यानें भाषण ऐकूं येतें असें प्रयोगानें ठरलें. नंतर सप्टेंबर २९ तारखेस न्यूयार्कपासून आर्लिंगटनपर्यंत तारेच्या टेलिफोनमधून भाषण येऊन तें यंत्राच्या साहाय्यानें मोठें होऊन बिनतारी टेलिफोननें सानफ्रान्सिस्को येथें ( अंतर २५०० मैल ) पोंचलें. पण त्याच वेळीं ते शब्द हवाई ( अंतर ४९९३ मैल ) या गांवीं स्थापन केलेल्या स्टेशनांत ऐकूं फार लागले. ते शब्द मोठ्यानें उच्चारले जात होते, पण हवेतील गडगडाट त्यांत मिसळलें असल्याकारणानें कांहीं अक्षरें समजण्याची पंचाईत पडे. अमेरिका व युरोपखंड यांमध्यें अटलांटिक महासागर आहे. व त्यांत सरासरी तीन हजार मैलांचें अंतर आहे. फ्रान्सची राजधानी पॅरीस येथें **ईफेल टावर** नांवाचा उंच मनोरा आहे, त्यावर बिनतारी संदेश घेण्याची व्यवस्था केली आहे; म्हणजे तेथें ग्राहकयंत्र ठेविलें आहे. वाशिंगटन ( अमेरिका ) येथील प्रेरकांतून निघालेलें भाषण ईफेल टावरमध्यें ऐकूं आलें. परंतु हा मनोरा चालू युद्धाच्या कामीं अत्यंत उपयोगी असल्यामुळें त्याचा उपयोग असल्या प्रयोगाकडे सध्या करणें अप्रशस्त आहे असें लष्करी अधिकाऱ्यांना वाटत असल्यामुळें हें अमेरिका फ्रान्समधील रेडिओ टेलिफोनच्या साहाय्यानें चालणारें दळणवळण बंद ठेवण्यांत आलें आहे. अर्थात हें युद्ध संपतांच तें पुनः सुरू होईल.



**आर्लिंगटन** ( अमेरिका ) येथील मनोरा. येथून बिनतारी टेलिफोननें ( पांच हजार मैलांवरील ) **हवाई** व **पारीस** या शहरांपर्यंत संदेश पाठविण्यांत आला.


# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यतः मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यांत **मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ** सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं **गाणींही** दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं **झोपाळ्यावर** बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ **ओव्या** व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे **उखाणेही** बरेच दिलेले आहेत. किंमत ८४. **म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें**

# या गोष्टी कधीं करूं नका.

थोड्या फायद्याकरितां मोठा तोटा करून घेण्यास तयार होणाऱ्या मनुष्याला कालिदासानें 'विचारमूढ' म्हणजे मूर्ख असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. पण आपण लोकांचें आचरण बारकाईनें तपासलें असतां मोठमोठ्या लोकांना देखील किती तरी मूर्खपणाच्या संवयी जडलेल्या दिसतात. याकरितां अशा प्रकारचें वर्तन आपल्या हातून न घडूं देण्याबद्दल प्रत्येक विद्यार्थ्यानें जपलें पाहिजे. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी दासबोधांत "मूर्ख लक्षणें" या सदरांत सांगितलीं आहेत. परिस्थितीप्रमाणें मूर्खलक्षणाचे प्रकार वेळोवेळीं बदलत असतात. तेव्हां सध्याचीं कांहीं मूर्खलक्षणें येथें दिलीं आहेत; त्यांचा विचार करून त्यांतील तत्त्व मुलांनीं लक्षांत आणावें, म्हणजे अशीं अनेक लक्षणें त्यांना आपल्या कल्पनेनें बांधतां येतील.

१ पातें उघडलेला चाकू हातांत धरून दुसऱ्या मनुष्याकडे धांवत जाऊं नका. कारण तुम्हीच ओळखा.

२ एखादा मनुष्य खुर्चीवर बसण्याच्या बेतांत असतांना खुर्ची बाजूस ओढूं नका. तुमचा खेळ होतो, पण त्याचा जीव जाण्याचा प्रसंग येतो.

३ झोंपाळ्यावरून घसरून पडला तर लगेच उभे राहूं नये. बाजूस सरपटत जावें. झोंपाळा डोक्यास आपटला तर मोठी इजा होईल.

४ राकेलच्या चिमणीचा दिवा मालविण्यासाठीं नळीवरून फुंकर घालूं नका. डोळ्यास झळ लागेल व घशांत वाईट वायु शिरतो.

५ संध्याकाळच्या अंधुक उजेडांत किंवा चुलीपुढें बसून अगर चालत्या गाडींत पुस्तकें वाचूं नका. या कारणानें पुष्कळ लोकांचे डोळे बिघडतात.

६ पांच दहा मंडळीचा घोळका करून फिरावयास गेल्या वेळीं समोरून गाडी आली तर अर्धी मंडळी एके बाजूस व अर्धी दुसऱ्या बाजूस असे जाऊं नका. बरोबर रस्त्याच्या मधून गाडी नेण्यास गाडीवानास फार त्रास पडतो.

७ आगगाडींतून जातांना भरलेली बाटली किंवा जड पदार्थ बाहेर फेंकूं नका. तेथें काम करणाऱ्या मजूरांना दुखापत होईल.

८ गाडींतून जातांना फुलें तोडण्याचा किंवा झाडांची फांदी धरण्याचा प्रयत्न करूं नका. तुमचीं बोटें तुटतील.

९ तेलाची बाटली ऊन करण्यासाठीं विस्तवाजवळ ठेवावयाची असल्यास आधीं बूच काढून ठेवण्यास विसरूं नका. नाहींतर उष्णतेनें हवा प्रसरण पावून बाटली फुटेल व डोळ्यांत कांचेचे तुकडे उडतील.

१० काटा किंवा कुसळ काढण्याकरितां टांचणीचा उपयोग करूं नका. सुई घ्या. शरीरांत टाचणी बोचल्यानें वाईट परिणाम होतात.

११ कांहीं टोंचून किंवा कापून शरीरांतून रक्त निघालें असल्यास तें स्वच्छ पाण्यानें धुवून काढण्यास आळस करूं नका.

१२ शिस्पेनसिलीचें टोक किंवा पैसे तोंडांत घालण्याची अगर कानांत व नाकांत मणी, वाटाणे वगैरे वाटोळे पदार्थ घालण्याची खोड पुष्कळ मुलांना असते ती फार वाईट आहे.

१३ टांचणीनें दांत कोरूं नका. स्वच्छ पाण्यानें पुष्कळ चुळा भरण्यानें व अगदीं क्वचित् बोथट काडीनें दांतांतील घाण काढल्यानें दांत बळकट व स्वच्छ राहतात.

१४ कातरीच्या पातळ पात्यानें बाटलीचें बूच काढूं नका. पातें मोडून डोळा दुखावेल.

१५ दिवा पेटला असतांना खालच्या डब्यांत तेल ओतूं नका; किंवा चूल पेटली असतां राकेलच्या बाटलीची धार वर धरूं नका.

१६ लहान मुलांच्या आटोक्यांत आगपेटी ठेवूं नका.

१७ विजेचा गडगडाट होत असतांना वाटेंत झाडाखालीं राहूं नका. झाडावर विज पडण्याचा संभव फार असतो.


१८ दुमजल्यावरील खिडकींतून वांकून खालीं पाहूं नका.

१९ केळ्याचीं किंवा नारिंगाचीं सालें रस्त्यांतील फरशीवर टाकूं नका. लोक घसरून पडतील.

२० लहान मुलांना गमतीखातर भिवविणें किंवा बाऊ दाखविणें फार घातुक आहे. भीतीनें मुलें मेल्याचीं किंवा निदान तीं भिलीं बनल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

# उलट सुलट तोंड फिरविणारा पक्षी.

एक कोरें कार्ड घेऊन तें फूटपट्टीच्या सहाय्यानें एक सारखें आखावें. नंतर आकृतींत दाखविल्याप्रमाणें त्यांतील भाग अशा रीतीनें कापून काढावे कीं कापलेले भाग व न कापलेले भाग क्रमानें एकापुढें एक असे यावे व सर्वांची रुंदी एकसारखी असावी. नंतर दुसरें एक कोरें कार्ड या कार्डामागें धरावें; व वरच्या कार्डांतून खालच्या कार्डाचा जो भाग दिसतो त्यावर शाईनें किंवा रंगीत पेनसिलीनें डावीकडे तोंड केलेला एक पक्षी काढावा. नंतर वरचें कार्ड किंचित् उजव्या बाजूस सरकवावें. म्हणजे नुकतेंच काढलेलें चित्र झांकून जाईल व खालच्या कार्डाचा कोरा भाग दिसूं लागेल; त्यावर पुनः उजवीकडे तोंड केलेलें पक्ष्याचें चित्र काढावें. नंतर एका हातानें खालचें कार्ड दाबून धरून दुसऱ्या हातानें वरचें कार्ड उजव्या किंवा डाव्या बाजूस हालविलें म्हणजे पक्ष्याचें तोंड एकदां उजवीकडे व एकदां डावीकडे झाल्यामुळें पक्षी हालत असल्याचा भास होतो. यांतील खुबी लक्षांत आली म्हणजे एकदां गाय तर एकदां म्हैस, एका क्षणीं वाघ तर दुसऱ्या क्षणीं सिंह उत्पन्न करण्याची युक्ति चाणाक्ष मुलांना सहज सुचण्याजोगी आहे.



१३ टांचणीनें दांत कोरूं नका. स्वच्छ पाण्यानें पुष्कळ चुळा भरण्यानें व अगदीं क्वचित् बोथट काडीनें दांतांतील घाण काढल्यानें दांत बळकट व स्वच्छ राहतात.

१४ कातरीच्या पातळ पात्यानें बाटलीचें बूच काढूं नका. पातें मोडून डोळा दुखावेल.

१५ दिवा पेटला असतांना खालच्या डब्यांत तेल ओतूं नका; किंवा चूल पेटली असतां राकेलच्या बाटलीची धार वर धरूं नका.

१६ लहान मुलांच्या आटोक्यांत आगपेटी ठेवूं नका.

१७ विजेचा गडगडाट होत असतांना वाटेंत झाडाखालीं राहूं नका. झाडावर विज पडण्याचा संभव फार असतो.


१८ दुमजल्यावरील खिडकींतून वांकून खालीं पाहूं नका.

१९ केळ्याचीं किंवा नारिंगाचीं सालें रस्त्यांतील फरशीवर टाकूं नका लोक घसरून पडतील.

२० लहान मुलांना गमतीखातर भिवविणें किंवा बाऊ दाखविणें फार घातुक आहे. भीतीनें मुलें मेल्याचीं किंवा निदान तीं भिलीं बनल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

# उलट सुलट तोंड फिरविणारा पक्षी.

एक कोरें कार्ड घेऊन तें फूटपट्टीच्या सहाय्यानें एक सारखें आखावें. नंतर आकृतींत दाखविल्याप्रमाणें त्यांतील भाग अशा रीतीनें कापून काढावे कीं कापलेले भाग व न कापलेले भाग क्रमानें एकापुढें एक असे यावे व सर्वांची रुंदी एकसारखी असावी. नंतर दुसरें एक कोरें कार्ड या कार्डामागें धरावें; व वरच्या कार्डांतून खालच्या कार्डाचा जो भाग दिसतो त्यावर शाईनें किंवा रंगीत पेनसिलीनें डावीकडे तोंड केलेला एक पक्षी काढावा. नंतर वरचें कार्ड किंचित् उजव्या बाजूस सरकवावें. म्हणजे नुकतेंच काढलेलें चित्र झांकून जाईल व खालच्या कार्डाचा कोरा भाग दिसूं लागेल; त्यावर पुनः उजवीकडे तोंड केलेलें पक्ष्याचें चित्र काढावें. नंतर एका हातानें खालचें कार्ड दाबून धरून दुसऱ्या हातानें वरचें कार्ड उजव्या किंवा डाव्या बाजूस हालविलें म्हणजे पक्ष्याचें तोंड एकदां उजवीकडे व एकदां डावीकडे झाल्यामुळें पक्षी हालत असल्याचा भास होतो. यांतील खुबी लक्षांत आली म्हणजे एकदां गाय तर एकदां म्हैस, एका क्षणीं वाघ तर दुसऱ्या क्षणीं सिंह उत्पन्न करण्याची युक्ति चाणाक्ष मुलांना सहज सुचण्याजोगी आहे.



# नाण्याचीच जरूरी काय?

( लेखक—हिमांशु. )

प्रत्येक मनुष्याची पहावी तो पैशाकरितां धडपड. ती कां? पैसा कां भूक लागली तर खाण्याच्या उपयोगी पडणार आहे, कां तहान लागली तर पितां येणार आहे, कां थंडी वाजली तर पांघरतां येणार आहे?

खरोखर पैसा प्रत्यक्ष असा यांपैकीं कोणत्याहीं उपयोगाला येणार नाहीं. पण अप्रत्यक्षरीतीनें मात्र याचशा काय, पण आणखीही कितीतरी उपयोगाला येईल.

कसा?—तर, पैसा आपण बाजारांत घेऊन गेलों, म्हणजे दुकानदार आपणाला त्याबद्दल आपल्याला पाहिजे असेल ती वस्तु देईल.

बरें; पण दुकानदार तरी हे पैसे घेतो कशाला? त्याला तरी त्यांचा प्रत्यक्ष उपयोग काय?—त्यालाही त्यांचा प्रत्यक्ष असा उपयोग कांहींही नाहीं. मात्र त्याला ज्या कांहीं जिनसा पाहिजे असतील त्या पैशानें विकत मिळतात.

मग असें जर आहे—म्हणजे कोणालाही पैशाचा (नाण्यांचा) प्रत्यक्ष असा उपयोग होत नाहीं,— तर हें नाणें हवेंच कशाला? एकाद्या माणसाजवळ जी वस्तु पुरून उरे इतकी असेल, ती त्यानें दुसऱ्याला द्यावी, व त्या दुसऱ्या जवळची जी वस्तु आपल्याला पाहिजे असेल ती त्याच्या बदला घ्यावी. शेतकऱ्यानें कापडवाल्याला धान्य द्यावें. व कापडवाल्यानें, त्याला त्याबद्दल कापड द्यावें. वस्तूच्या मोबदला वस्तु असा व्यवहार करावा. मध्यें आणखी नाण्याची खटखट कशाला?—

होय. असा सरळ व्यवहार करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हा व्यवहार असा वरवर पहातां जितका सोपा व सरळ दिसतो, तितका तो थोडासा विचार केल्यावर दिसत नाहीं; व प्रत्यक्ष व्यवहारांत तर तो नाहींच नाहीं तसा रहात! कारण असा व्यवहार होण्यास इतक्या गोष्टी जुळून आल्या पाहिजेतः--

( १ ) आपल्याला जी वस्तु पाहिजे ती वस्तु ज्याच्याजवळ आहे, असा मनुष्य पाहिजे.

( २ ) त्या मनुष्याला आपणाजवळ जी वस्तु द्यावयास आहे, तीच वस्तु हवी असली पाहिजे.

( ३ ) तसे नसले तर आपणाला असा एक तिसरा मनुष्य पाहिला पाहिजे कीं, जो आपल्याजवळ असलेली वस्तु घेऊन, त्या बदला त्या दुसऱ्या मनुष्याला हवी असलेली वस्तु देईल. अशा तऱ्हेनें एका वस्तूकरितां तिघांतिघां चौघाचौघांमध्यें देवघेव करावयाची.

( ४ ) शिवाय प्रत्येक वेळीं दोन मालांच्या, सारख्या किंमतीचें प्रमाण बसवावयाचें म्हणजे एक भानगडच. आणि या अशा सर्व भानगडी आपल्याला एकादी लहान वस्तु पाहिजे असो, कीं मोठी वस्तु पाहिजे असो, प्रत्येक वेळीं केल्या पाहिजेत.

पण आतां ही सर्व दगदग कशाच्या योगानें वांचली? —तर "पैसा" 'नाणें' या त्रयस्थ वस्तूच्या मध्यस्तीनें आपल्याजवळ जी वस्तु असेल ती दुसऱ्या एकाद्याला देऊन त्याजवळून पैसे घ्यावयाचे, व हे पैसे, ज्याच्याजवळ आपल्याला हवी असलेली वस्तु असेल त्याला नेऊन द्यावयाचे, म्हणजे संपला व्यवहार. यांत तिघाचौघांशीं व्यवहार कधींही करण्यास नको. शिवाय 'पैसा' 'नाणें' ही वस्तु जवळ बाळगविण्यासही हलकी. या शिवाय या प्रकारच्या व्यवहारांत आणखी

एक फायदा म्हणजे असा होतो कीं, आपल्याजवळ वस्तु फार दिवस टिकूं शकत नसेल; उदाहरणार्थ 'आंबे'—आणि आपल्याला तर पुढें कधीं अडचणीच्या वेळीं कांहीं लागेल त्या करितां तरतूद करून ठेवावयाची असेल; तर त्या आंब्यांची किंमत ( नाणीं ) घेऊन ठेविली म्हणजे झालें.

अशा तऱ्हेनें 'नाण्याच्या योगानें' देववेव वाटेल तेव्हां व सुलभतेनें होते.

# गरीबांना पत्रें येत नसतात !

कांहीं वर्षांपूर्वीं इंग्लंडमध्यें पोष्टाची व्यवस्था सध्यासारखी नव्हती. त्या वेळीं पत्रें पाठविणारा टपालहांशील देत नसे; तर ज्याच्या नांवें पत्र आलें असेल त्यानें हांशील भरून पत्र घ्यावें अशी पद्धति चालू होती. अशा काळांत एके दिवशीं इंग्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावरील एका लहानशा बंदरांतून एक जहाज परदेशीं जाण्याकरितां निघालें. तेव्हां त्यावरील मंडळींना निरोप देण्याकरितां आतेष्टांची बरीच गर्दी जमली होती. त्यांनीं शेवटचा रामराम केला तेव्हां जहाज निघालें नंतर तें दिसेनासें झाल्यावर मंडळी परतली; त्यांत एक लंगडा मुलगा होता. तो कुबडी टेकीत इतरांबरोबर चालत चालत म्हणाला "प्रवासाला परदेशीं जणाऱ्या मंडळीची मोठी चैन असते. खुशाल नानाप्रकारचे देश पहात त्यांना हिंडण्यास सांपडतें." तें ऐकून एक विधवा म्हणाली "प्रवासाला जाणाऱ्यांची चैन असेल; पण घरीं मागें राहणाऱ्या आमच्यासारख्या म्हाताऱ्या कोताऱ्यांना हा प्रसंग म्हणजे मोठें संकट वाटतें. माझा मुलगा आज गेला आहे तो परत येण्याला दोन वर्षें पाहिजेत. तोंपर्यंत मला दिवस मोजीत राहिलें पाहिजे." दुसरी एक म्हातारी शेजारीच चालली होती. वरील शब्द ऐकतांच तिला पहिल्या म्हातारीचा कळवळा आला. तेव्हां तिचें समाधान करण्यासाठीं ती म्हणाली "खरेंच बाई, तुझ्यावर कठीण प्रसंग आहे यांत शंका नाहीं. तरी पण मधून मधून तुला तुझ्या मुलाकडून सविस्तर हकीकतीचीं पत्रें येतीलच. त्यावरून त्याची खुशाली तुला समजेल.



नंतर तिनें तें पाकोट फोडून आंतून कोरा कागद काढून दाखविला !

कांहीं महिन्यांनंतर एके दिवशीं त्या गांवांत पोष्टाचा शिपाई पत्रें वाटण्याकरितां आला. तो मागें सां[illegible]ल्या

# नाण्याचीच जरूरी काय ?

( **लेखक**—हिमांशु. )

प्रत्येक मनुष्याची पहावी तो पैशाकरितां धडपड. ती कां ? पैसा कां भूक लागली तर खाण्याच्या उपयोगी पडणार आहे, कां तहान लागली तर पितां येणार आहे, कां थंडी वाजली तर पांघरतां येणार आहे ?

खरोखर पैसा प्रत्यक्ष असा यांपैकीं कोणत्याही उपयोगाला येणार नाहीं. पण अप्रत्यक्षरीतीनें मात्र याचशा काय, पण आणखीही कितीतरी उपयोगाला येईल.

कसा ?—तर, पैसा आपण बाजारांत घेऊन गेलों, म्हणजे दुकानदार आपणाला त्याबद्दल आपल्याला पाहिजे असेल ती वस्तु देईल.

बरें; पण दुकानदार तरी हे पैसे घेतो कशाला ? त्याला तरी त्यांचा प्रत्यक्ष उपयोग काय ?—त्यालाही त्यांचा प्रत्यक्ष असा उपयोग कांहींही नाहीं. मात्र त्याला ज्या कांहीं जिनसा पाहिजे असतील त्या पैशानें विकत मिळतात.

मग असें जर आहे—म्हणजे कोणालाही पैशाचा ( नाण्यांचा ) प्रत्यक्ष असा उपयोग होत नाहीं,— तर हें नाणें हवेंच कशाला ? एकाद्या माणसाजवळ जी वस्तु पुरून उरे इतकी असेल, ती त्यानें दुसऱ्याला द्यावी, व त्या दुसऱ्या जवळची जी वस्तु आपल्याला पाहिजे असेल ती त्याच्या बदला घ्यावी. शेतकऱ्यानें कापडवाल्याला धान्य द्यावें. व कापडवाल्यानें, त्याला त्याबद्दल कापड द्यावें. वस्तूच्या मोबदला वस्तु असा व्यवहार करावा. मध्यें आणखी नाण्याची खटखट कशाला ?—

होय. असा सरळ व्यवहार करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हा व्यवहार असा वरवर पहातां जितका सोपा व सरळ दिसतो, तितका तो थोडासा विचार केल्यावर दिसत नाहीं; व प्रत्यक्ष व्यवहारांत तर तो नाहींच नाहीं तसा रहात ! कारण असा व्यवहार होण्यास इतक्या गोष्टी जुळून आल्या पाहिजेत:--

( १ ) आपल्याला जी वस्तु पाहिजे ती वस्तु ज्याच्याजवळ आहे, असा मनुष्य पाहिजे.

( २ ) त्या मनुष्याला आपणाजवळ जी वस्तु द्यावयास आहे, तीच वस्तु हवी असली पाहिजे.

( ३ ) तसें नसले तर आपणाला असा एक तिसरा मनुष्य पाहिला पाहिजे कीं, जो आपल्याजवळ असलेली वस्तु घेऊन, त्या बदला त्या दुसऱ्या मनुष्याला हवी असलेली वस्तु देईल. अशा तऱ्हेनें एका वस्तूकरितां तिघांतिघां चौघाचौघांमध्यें देवघेव करावयाची.

( ४ ) शिवाय प्रत्येक वेळीं दोन मालांच्या, सारख्या किंमतीचें प्रमाण बसवावयाचें म्हणजे एक भानगडच. आणि या अशा सर्व भानगडी आपल्याला एकादी लहान वस्तु पाहिजे असो, कीं मोठी वस्तु पाहिजे असो, प्रत्येक वेळीं केल्या पाहिजेत.

पण आतां ही सर्व दगदग कशाच्या योगानें वांचली ? —तर "पैसा ' ' नाणें ' या त्रयस्थ वस्तूच्या मध्यस्तीनें आपल्याजवळ जी वस्तु असेल ती दुसऱ्या एकाद्याला देऊन त्याजवळून पैसे घ्यावयाचे, व हे पैसे, ज्याच्याजवळ आपल्याला हवी असलेली वस्तु असेल त्याला नेऊन द्यावयाचे, म्हणजे संपला व्यवहार. यांत तिघाचौघांशीं व्यवहार कधींही करण्यास नको. शिवाय 'पैसा' 'नाणें' ही वस्तु जवळ बाळगविण्यासही हलकी. या शिवाय या प्रकारच्या व्यवहारांत आणखी

एक फायदा म्हणजे असा होतो कीं, आपल्याजवळ वस्तु फार दिवस टिकूं शकत नसेल; उदाहरणार्थ ' आंबे '—आणि आपल्याला तर पुढें कधीं अडचणीच्या वेळीं कांहीं लागेल त्या करितां तरतूद करून ठेवावयाची असेल; तर त्या आंब्यांची किंमत ( नाणीं ) घेऊन ठेविली म्हणजे झालें.

अशा तऱ्हेनें ' नाण्याच्या योगानें ' देवघेव वाटेल तेव्हां व सुलभतेनें होते.

---

# गरीबांना पत्रें येत नसतात !

कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें पोष्टाची व्यवस्था सध्यासारखी नव्हती. त्या वेळीं पत्रें पाठविणारा टपालहांशील देत नसे; तर ज्याच्या नांवें पत्र आलें असेल त्यानें हांशील भरून पत्र घ्यावें अशी पद्धति चालू होती. अशा काळांत एके दिवशीं इंग्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावरील एका लहानशा बंदरांतून एक जहाज परदेशीं जाण्याकरितां निघालें. तेव्हां त्यावरील मंडळींना निरोप देण्याकरितां आप्तेष्टांची बरीच गर्दी जमली होती. त्यांनीं शेवटचा रामराम केला तेव्हां जहाज निघालें नंतर तें दिसेनासें झाल्यावर मंडळी परतली; त्यांत एक लंगडा मुलगा होता. तो कुबडी टेकीत इतरांबरोबर चालत चालत म्हणाला " प्रवासाला परदेशीं जणाऱ्या मंडळीची मोठी चैन असते. खुशाल नानाप्रकारचे देश पहात त्यांना हिंडण्यास सांपडतें."



नंतर तिनें तें पाकीट फोडून आंतून कोरा कागद काढून दाखविला !

तें ऐकून एक विधवा म्हणाली " प्रवासाला जाणाऱ्यांची चैन असेल; पण घरीं मागें राहणाऱ्या आमच्यासारख्या म्हाताऱ्या कोताऱ्यांना हा प्रसंग म्हणजे मोठें संकट वाटतें. माझा मुलगा आज गेला आहे तो परत येण्याला दोन वर्षें पाहिजेत. तोंपर्यंत मला दिवस मोजीत राहिलें पाहिजे." दुसरी एक म्हातारी शेजारीच चालली होती. वरील शब्द ऐकतांच तिला पहिल्या म्हातारीचा कळवळा आला. तेव्हां तिचें समाधान करण्यासाठीं ती म्हणाली " खरेंच बाई, तुझ्यावर कठीण प्रसंग आहे यांत शंका नाहीं. तरी पण मधून मधून तुला तुझ्या मुलाकडून सविस्तर हकीकतीचीं पत्रें येतीलच. त्यावरून त्याची खुशाली तुला समजेल

कांहीं महिन्यांनंतर एके दिवशीं त्या गांवांत पोष्टाचा शिपाई पत्रें वाटण्याकरितां आला. तो मागें सांगितलेल्य

म्हातारीच्या झोंपडीजवळ पोंचला. त्याला पाहतांच म्हातारी बाहेर आली; तिनें पोष्टमनाच्या हातांतून मोठ्या उत्सुकतेनें पत्र घेतलें आणि वरील पत्ता वाचून मुकाट्यानें तें परत दिलें! हा प्रकार पाहून समोरच्या घरांतील एका पाहुण्यास मोठें आश्चर्य वाटलें, म्हणून त्यानें चौकशी केली. तेव्हां त्यास असें दिसून आलें कीं त्या म्हातारीचा मुलगा परदेशीं गेला असून तो वरचेवर पत्रें पाठवितो; परंतु म्हातारीजवळ टपालहांशील भरण्यास लागणारे पैसे नसल्यामुळें तिला तीं पत्रें मिळत नाहींत. ही हकीकत ऐकतांच त्या परक्या गृहस्थास तिची कीव आली व त्यानें धांवत जाऊन पोष्टाच्या शिपायास गाठलें आणि पैसे भरून त्या म्हातारीच्या नांवचें पाकीट ताब्यांत घेतलें. नंतर त्यानें तें पत्र मोठ्या उत्सुकतेनें म्हातारीच्या हातीं दिलें. तिनें या त्याच्या कृत्याबद्दल मनःपूर्वक आभार मानलें; तेव्हां तो गृहस्थ म्हणाला " आभार मानण्याचें काम सध्या राहूं द्या; तुम्ही आधीं मुलाचें पत्र वाचून पहाल कीं नाहीं?" म्हातारी हंसून म्हणाली " महाराज, आमच्यासारख्या गरीबांना पत्रें येत नसतात." नंतर तिनें तें पाकीट फोडून आंतून कोरा कागद काढून दाखविला! म्हातारी पुढें म्हणाली " मी गरीब आहें; पत्रें टपालांतून घेण्यास मजजवळ पैसे नाहींत ही गोष्ट माझ्या मुलाला माहीत आहे. तेव्हां तो पत्रें लिहिण्याचा व्यर्थ खटाटोप करीत नाहीं. फक्त पत्ता लिहून व आंत कोरा कागद घालून पाकीट बंद करून पाठवितो. टपालाचा शिपाई येथें आला म्हणजे माझ्या नांवचें पत्र मला पाहण्यास एकवार मिळतें, पत्त्याचें अक्षर पाहून मुलगा सुखरूप आहे अशी माझी खात्री होते; व तेवढ्यावर मला समाधान मानावें लागतें. गरीबांना पत्रें कशीं घेतां येतील?" हा चमत्कारिक प्रकार पाहून त्या गृहस्थास म्हातारीच्या स्थितीबद्दल वाईट वाटलें व त्यानें तिला मदत करून दर आठवड्यास खरोखरीचें पत्र मिळण्याची व्यवस्था केली हें सांगावयास नकोच.

---


# फोटो बक्षीस.

जे कोणी आपआपल्या गांवांतील ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर ही अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचना:**—जिल्ह्याचे गांवचे निदान २५—३०, तालुक्याचे १५—२०, व पेटा वगैरेचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. बी. ग्वानापुरे**, घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

# स्वयंपुरोहित.


## [ नवीन सुधारलेली मंत्रार्थासह चवथी आवृत्ति ]

हें पुस्तक जवळ असलें म्हणजे देवपूजा, संध्या, मुंज, लग्न, व्रतें, श्रावणी, दशक्रिया वगैरे सर्व धर्मविधि स्वतः करतां येतात व पंचांगही समजतें. भटाची गरज पडत नाहीं. किं० तूर्त ८६.

**मोतीराव वानखडे, करजगांव ( वऱ्हाड. )**

# लहान तोंडीं मोठा घास.

एखाद्या लहान तोंडाच्या बाटलींत मोठें फळ असलेलें पाहून हें या बाटलींत कसें घातलें असेल अशी शंका येऊन मन बुचकळ्यांत पडतें. पण ही गोष्ट करणें फारसें कठीण नाहीं. खेडेगांवांत पुष्कळ लोक पावसाळ्यांत परसांत भाजीचे वेल लावतात. आपणही तसे वेल लावावे आणि त्या वेलाला बारीक फळें आलीं म्हणजे एक अरुंद तोंडाची ढेरपोटी बाटली घेऊन वेलाचें एखादें फळ हलकेंच त्या बाटलीच्या तोंडांत घालून ती बाटली वेलाच्या मांडवास दोरीनें बांधून ठेवावी. अर्थात तें फळ न तुटतां किंवा त्याच्या देंठास धक्का न लागतां हें काम केलें पाहिजे. पुढें तें फळ आपोआप पंध्रावीस दिवसांत मोठें होऊन सबंध बाटली व्यापतें. नंतर तें तोडून ती बाटली लोकांपुढें न्यावी म्हणजे त्यांना आश्चर्य वाटेल. सोबतच्या चित्रावरून ही कृति चटकन ध्यानांत येईल. कांकडी, दोडके, पोमाळीं किंवा निंबें वगैरे फळें अशा रीतीनें बाटलींत घालतां येतात. मोठमोठे भोपळे देखील मातीच्या घागरींत ठेवणें अशक्य नाहीं.



# परोपकारी कुत्रा.

पावसाळ्यांत एके दिवशीं पुण्यांतील……पुलावरून मी चाललों होतों इतक्यांत एके ठिकाणीं लोकांची गर्दी जमली होती. मींहि तेथें जाऊन काय झालें आहे म्हणून चौकशी केली. तेव्हां मला असें दिसून आलें कीं नदीला पूर आलेला आहे; पाणी गढूळ होऊन जोरानें वहात आहे; आणि काठापासून थोड्या अंतरावर एक मांजर पाण्यांत पडलें असून तें अगदीं बुडण्याच्या बेतांत आहे. प्राण वांचविण्यासाठीं त्याची धडपड चालली होती. केविलवाण्या मुद्रेनें वरच्या माणसाकडे त्यानें एक दोन वेळा पाहिलें. पण पुलावरून पाहणाऱ्या पन्नास पाउणशें माणसांपैकीं एकानेंही " अरेरे, बिचारें मांजर मरून जाणार आतां ! " असे शब्द उच्चारण्यापलीकडे कांहीं एक केलें नाहीं. इतक्यांत एक कुत्रा तेथें आला. त्यानें तो प्रकार पाहतांच एकदम पाण्यांत उडी घेतली, आणि त्या मांजरास तोंडांत धरून सुखरूपपणें कांठावर आणून सोडलें. हें कुत्र्याचें धाडसाचें व मर्दपणाचें कृत्य पाहून तेथील सर्व मंडळींना आपल्या भ्याडपणाची लाज वाटली व त्या कुत्र्यास शाबासकी देण्यासाठीं जो तो उत्सुक झाला. पण त्या परोपकारी कुत्र्याला अशा शाबासकीची मुळींच आवश्यकता वाटत नव्हती. तो हीं माणसें ज्या ठिकाणीं उभीं होतीं तेथें न येतां निराळ्याच वाटेनें चटकन् पळून गेला !

# अंकगणितकारांचा ऋणकोशी अन्याय !!!

( लेखक--ग. स. खरे. )

**रा. रा. मराठी शालापत्रककर्ते यांसः—**

या काळांत अन्याय कोठेंही खपत नाहीं. जबर व्याजाचा करार झाला असला तरी न्यायाच्या कोर्टांत तो जुलूमच समजला जातो; व न्यायाधीश त्याप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार देत नाहीं. अशा दिवसांत लहान मुलांस सरळव्याज शिकवितेवेळीं व्याजाचा फाजील आकार करण्यास शिकविणें हें कांहीं रास्त नाहीं. परंतु तसा प्रकार होतो असें आढळून आल्यावरून आपणांस तसदी देत आहें.

युरोपियन कालगणनेंत वर्षाचे दिवस ३६५ धरतात व प्रत्येक चार वर्षांनीं ३६६ दिवस धरतात. हा जो जास्त दिवस धरला जातो तो फेब्रुवारीच्या २८ तारखांबद्दल २९ तारखा गणून जुळविण्यांत येतो हें महशूरच आहे. ही गोष्ट मुलांच्या लक्षांत यावी म्हणून मुद्दाम ज्यांत फेब्रुवारीची २९ तारीख असेल असे कांहीं दिवसांचें व्याज आकारणीचे हिशेब मुलांस घालतात. परंतु मौज अशी कीं, फेब्रुवारी महिन्याचे दिवस २९ हें मुलांच्या मनांत बिंबविण्याकरितां इतके श्रम ज्यांनीं घेतले, त्यांचे स्मरणांतून एक गोष्ट अगदींच विसरली जाते कीं ज्या वर्षी फेब्रुवारीचे २९ दिवस असतात, त्या वर्षाचे एकूण दिवस ३६६ असतात ३६५ नव्हेत. फेब्रुवारीच्या २९ तारखेचें ज्या अंकगणितकारास विस्मरण झालें नाहीं त्यासच वर्षाचे एकंदर दिवसाचें विस्मरण पडलेलें दिसतें. व्याज काढते वेळीं " तुट मुदतीचा " आकार काढण्याच्या रीतींत " लीप इयर " " एकाधिकदिन " वर्षाचे दिवस ३६६ धरून उत्तरें काढण्याबद्दल उदाहरणें देऊन मुलांची समजूत पाडण्याचा प्रयत्नच झालेला दिसत नाहीं. उदाहरणार्थ--चालू १९१६ सालीं " तुटमुदतीच्या " आकारानें जर कोणी व्याज चुकतें करीत असेल तर त्यास ३६६ दिवसांचें वर्ष धरून व्याज आकारणें रास्त आहे. परंतु ही गोष्ट कोणत्याही अंकगणितकारानें समजावून सांगितली नाहीं. एवढेंच नव्हे तर फेब्रुवारीचे २९ दिवस आकारले असूनही वर्षाचे दिवस ३६५ च धरले आहेत.

कै० गोपाळराव गोखले यांचे अंकगणितांतलि एक उदाहरण खालीं दिलें आहे. वर्षाचे ३६५ दिवस धरून त्यांत काढलेलें उत्तर व वर्षाचे ३६६ धरून काढलेलें उत्तर हेंही दिलें आहे. हेंच उदाहरण कै. गोखले यांचे इंग्रजी अंकगणितांत उदा० संग्रह १३ पैकीं २४ वें, पान १३० वर आहे. उदाहरण ( १४ ) पान १३९ मराठी अंकगणित भाग ( दोन ) " द. द. $७\frac{३}{१०}$ प्रमाणें ता. ४ जानेवारी सन १८३२ पासून ता. ५ आक्टोबर १८३२ पर्यंत ११५० पौं. १८ शि. $४\frac{४}{११}$ पे. मुदलाचें सरळ व्याज काय होईल? "

( १ ) अंकगणितांतील उत्तर ( वर्षाचे ३६५ दिवस धरून ) ६३ पौं. ६ शि. $\frac{२}{३}$ पे. (२) ( वर्षाचे ३६६ धरून ) येणारें उत्तर—६३ पौं. २ शि. $६\frac{३७३}{६९०}$

यावरून अंकगणितकारांच्या उत्तरानें व्याज जास्त आकारलें जातें हें स्पष्ट दिसेल. कै० गोखले जिवंत असते वेळीं त्यांस ही चूक दाखविली असती तर हा कागदी अन्यायही त्यांस खपला नसता.

ही चुकीची समजूत जुनी असून जुन्या इंग्रजी अंकगणितकारांनही आहे असें समजतें. तेव्हां ही चूक क्षुल्लक न मानतां काढून टाकावी म्हणून आपण शिक्षक वर्गापुढें मांडाल अशी उमेद आहे.

म्याट्रिक्, स्कूलफायनल् व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरणें, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत **मराठी भाषेंतील** सुमारें **दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय** ( Idioms ) आणि **म्हणी** व अवांतर **शेकडों संप्रदाय**, यांचें **शास्त्रीयरीत्या वर्गीकरण** केलेलें असून **त्यांचें** मराठींत **सोपपत्तिक स्पष्टीकरण** केलेलें आहे, व भरपूर **उदाहरणेंही** दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणांच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील **शेकडों अवतरणें** दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे **न्याय**, **ज्योतिषांतील शब्द**, **संस्कृत वाक्यें** किंवा **वाक्यांश**, वगैरेंचें **खुलासेवार स्पष्टीकरण** केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय यांच्या जोड्या दिल्या आहेत. पुस्तकांत एकादा विशिष्ट शब्द पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक्, स्कूलफायनल् वगैरे परीक्षांच्या **उमेदवारांस**, तसेंच **मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास** करणाऱ्यांस हें **पुस्तक अत्यंत उपयोगी** असें झालें आहे. **रा० रा० विद्याधर वामन भिडे** बी. ए. यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या **जातीचें** व **इतक्या विस्ताराचें पुस्तक** मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं **पायका टाइपाचीं पानें** सुमारें ५०० वर असून **बांधणी कापडी व जाड पुठ्ठ्याची** आणि मजबूत अशी आहे. किंमत **दीड रुपया. ट० हं० व्ही० पी० सह ३ आणे.**

# निबंधलेखन आणि अनुवाद.

**म्याट्रिक्युलेशन, स्कूलफायनल्, पब्लिक् सर्व्हिस्** , वगैरे परीक्षांस **मराठी भाषा हा एक विषय** असून विद्यार्थ्यांना मराठींत **निबंध लिहावा** लागतो, व दिलेल्या **पद्यांचा अनुवाद** करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें **सोयीचें पुस्तक** नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं **मथळ्यावर** निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे **दोन भाग** असून पहिल्यांत **निबंध-लेखन** हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून **निबंधांचे तीन प्रकार** कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या **सफाईवाऱ्या** कशा पाडाव्या, हें **उदाहरणांनीं स्पष्ट** करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर **सुमारें ५० निबंध** लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत **अनुवाद** म्हणजे काय हें **सांगून तो कसा** करावयाचा, ह्यासंबंधाच्या **तपशील-वार सूचना** देऊन अनेक प्रकारच्या **पद्यांचा अनुवाद** करून दाखविला आहे; आणि **नंतर कांहीं पद्यसमूह** विद्यार्थ्यांना **अनुवाद करावयासाठीं** दिले आहेत. किं. ।८ ट. ख. ।३.

## कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

**आ**जपर्यंत **राजा रविवर्मा** यांचीं **चित्रें** लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या **रंगांत बरींच** छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व **चित्रें त्या त्या चित्राच्या परिपूर्ण पौराणिक माहितीसह एकवटलेलीं** अशीं **पुस्तकरूपानें** छापल्यास त्यांची फारच **जरूर** आहे, अशा कांहीं लोकांच्या **सूचना** आल्यावरून आम्हीं वरीलप्रमाणें **राजा रविवर्मा** यांचीं **निवडक चित्रें बुकसाई-जमध्यें** छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ **चित्रें वर्णनासह दिलेलीं** असून पुस्तकास **कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर)** वापरलेला आहे. **मुखपृष्ठावर राजा रविवर्मा** यांच्या **प्रमुख चित्रांपैकीं शकुंतला-जन्माचें चित्र तीन रंगांत सुबक** छापलेलें आहे. त्यामुळें **पुस्तकास विशेषच शोभा** आलेली आहे, **किं० १ रुपया.**

**म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.**

भगवद्भक्त हैबतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांसारख्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधवराव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनीं केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेलें आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरेदार आहे. मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेलें असून किंमत अवघी ०४ आ. ठेविली आहे. ट. ह. सह किं. ०४०६.

# सचित्र ] रुक्मिणी स्वयंवर. [ सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांत तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुस्त्या रफ कागदावरील पोथीस ०६ व ग्लेज कागदावरील ०८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह कि ०१० व ०१२ आहे. पोस्टेज ०१०६.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

किंमत ०१२ ] चित्रयुक्त [ किंमत ०१२

# बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

यांत अ पासून ज्ञ पर्यंत बाळबोध व मोडी मूळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी.

म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.

हें पुस्तक रा रा शंकर नरहर जोशी यांनीं ८१८ सदाशिव पेठ-पुणें शहर येथें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. एप्रिल सन १९१६ अंक ४.

# मराठी बाळबोध

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| प्रो. जगदीश चंद्र बोस. | ६३ |
| व्यायाम. | ६६ |
| नशिबाचा खेळ ( एक गोष्ट. ) | ६८ |
| मंगळावर वस्ती आहे काय ? | ७२ |
| शास्त्रीय माहिती. | ७६ |
| ताळा पाहण्याचे सोपे प्रकार. | ७८ |
| नुसतें अनुकरण ( एक गोष्ट. ) | ७९ |
| गप्पागोष्टी. | ८१ |

विक्रीस तयार!     विक्रीस तयार!!     विक्रीस तयार!!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

**ही नवीन आवृत्ति** नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. **किंमत ८१३.**

व्यापाऱ्यांस कमिशन.

---

# सचित्र अक्षर-बोध.

## नवी आवृत्ति.

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साइज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुंस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.



प्रो. जगदीश चंद्र बोस.

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. एप्रिल सन १९१६ अंक ४.

## प्रो. जगदीश चंद्र बोस.

प्रो. जगदीश चंद्र बोस यांची कीर्ति आतां हिंदुस्थानांतच नव्हे, तर सर्व जगभर पसरली आहे; परंतु आपल्या इकडे त्यांच्या प्रसिद्धीचें कारण काय आहे, हें फार थोड्यांनाच माहीत असेल. प्राणिधर्मशास्त्रांतील एक मोठा शोध हेंच त्यांच्या कीर्तीचें कारण होय. या आपल्या शोधाचें महत्त्व त्यानीं निरनिराळ्या पाश्चिमात्य राष्ट्रांतील शास्त्रज्ञ—मंडळींपुढें सप्रयोग भाषणें करून त्यांच्या निदर्शनास आणलें व त्यायोगें त्यांच्या विचारांना नवीन वळण लावून दिलें. आतांपर्यंत आपली साहजीक अशी कल्पना असे कीं या जगांत सजीव प्राण्यांनाच मात्र त्यांच्या निरनिराळ्या इंद्रियद्वारा ज्ञान होतें. परंतु प्रो. बोस यानीं आपल्या शोधानें आतां असें सिद्ध केलें आहे कीं अशाच प्रकारचें ज्ञान निर्जीव पदार्थ आणि सजीव प्राणिमात्र यांच्यामध्यें असलेल्या वनस्पती वर्गाला ( व निर्जीव वस्तूनासुद्धां ) असूं शकतें. त्यांना हें ज्ञान होतें किंवा नाहीं हें कळण्याकरतां आपणास विद्युत-दर्शक यंत्रांचा उपयोग करावा लागतो व त्या निर्जीव वस्तूंमध्यें किंवा वनस्पतींमध्यें चेतना उत्पन्न होऊन जो विद्युत्-प्रवाह सुरूं होतो तो फार सूक्ष्म असल्यामुळें, हीं यंत्रें देखील अति सूक्ष्मप्रवाहनिदर्शक असावयास पाहिजेत. हे प्रयोग त्यानीं कोठें व कसे केले याचें वर्णन पुढें येईलच. त्याच्याअगोदर त्यांच्या चरित्राची थोडी माहिती आधी देऊं.

प्रो. बोस यांचा जन्म बंगाल्यांतील फरिदपूर नांवाच्या एका खेडेगांवीं झाला. त्यांचे वडील भगवान चंद्र बोस हे तेथील एक डिव्हिजनल आफिसर होते,

त्या वेळचें फरिदपूर दुष्ट, घातकी, व लुटारू लोकांबद्दल प्रसिद्ध होतें. एके वेळीं तर भगवानदासावर मोठाच प्रसंग आला होता, परंतु त्यानीं कोणीहि मदतीला नसतांना एकट्यानीं लुटारू टोळीच्या नायकाला पकडलें व त्याला शिक्षा दिली. पुढें तो सुटून आल्याव यांच्याकडे येऊन गयावया करूं लागला व " आतां पूर्वीचा धंदा केव्हांहि करणार नाहीं आणि शिक्षा झाली असल्यामुळें इतर कोणी मला नोकरीस ठेवणार नाहींत, तरी कृपा करून तुम्हीच मला नोकरीस ठेवा " अशी विनंति त्यांना करूं लागला. तेव्हां त्याच्यावर दया करून त्याला त्यांनीं नोकरीस ठेवलें. हाच नोकर रोज धाकट्या जगदीश चंद्राला खांद्यावर घेऊन शाळेंत पोहों-चवी व वाटेनें जातांना आपल्या सर्व अंगभर असलेले जखमांचे वण दाखवून आपण पूर्वीं केलेलीं साहसाचीं कामें, त्यांत आपल्या मित्रांना आलेलें मरण व मोठ्या मुष्किलीनें झालेली आपली सुटका यांचें रसभरित वर्णन करीत असे. यांच्या वडिलांनीं त्यांना फॅशनेबल इंग्रजी शाळेंत न घालतां, त्या खेडेगांवांतील गांवठी शाळेंतच पाठविलें व त्याच शाळेंत त्यांचें प्राथमिक शिक्षण पुरें झालें. अर्थातच त्यांचे सहाध्यायी मजूर लोकांचीं मुलें हींच होत. त्यांतल्या त्यांत कोळ्यांचीं मुलें त्यांना नदींतील व सरोवरांतील वावरणाऱ्या चमत्कारिक प्राण्यांच्या व माशांच्या गोष्टी सांगत असत. तसेंच त्यांच्या घरा-पुढील शेतांतून नदीचा पूर ओसरल्यावर नानाप्रकारचे प्राणी मरून पडत व तेहि यांना आयते पहावयास सांपडत. या सर्वांचा परिणाम असा होत असे कीं, संध्याकाळीं आफिसांतून दमून आलेल्या वडिलांना हे चिरंजीव नाना प्रश्न विचारून भंडावून सोडीत व त्यांचे वडीलही शांतपणें ते सर्व प्रश्न ऐकून घेत व त्यांचीं उत्तरें देऊन मुलाचें समाधान करीत असत. मोठेपणीं सुद्धां कायम राहिलेल्या ह्या सृष्टी-निरीक्षणाच्या संवयी-मुळेंच त्यांनीं हिमाच्छादित केदारनाथापासून रामेश्वर-पर्यंत पुष्कळ वेळां प्रवास करून ऐतिहासिक महत्त्वाचें एकही गांव पहावयाचें शिल्लक ठेविलें नाहीं. यामुळें त्यांचे अंगीं साहस, हातीं घेतलेल्या कार्यांत जयापजया-बद्दल निस्पृहता, निसर्गावर अत्युत्कट प्रेम, निरनि-राळ्या गोष्टींचीं कारणें शोधून काढण्याची हौस, रामा-यण, महाभारत इत्यादि जुन्या ग्रंथांच्या वाचनानें त्यांत वर्णिलेल्या उच्च उच्च ध्येयांबद्दल आदर व आप-ल्या देशाच्या बौद्धिक उन्नतीबद्दल पूर्ण विश्वास इत्यादि गुण वास करीत आहेत.

इ. स. १८८५ सालीं इंग्लंडहून परत आल्यावर त्यांना कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें पदार्थ-विज्ञानशास्त्राचे प्रोफेसर नेमण्यांत आलें. त्या वेळीं तेथें प्रयोगशाळा वगैरे कांहींही नसल्यामुळें फळ्यावरच प्रयो-गांच्या आकृत्या काढून दाखवाव्या लागत. निरनि-राळ्या आधुनिक शोधांच्या इतिहासाबद्दल एके वेळीं व्याख्यान देतांना, त्यांना आपल्या मातृभूमीचें नांव वगळून बाकीच्या बहुतेक देशांचीं नांवें—इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, हालंड, अमेरिका, रशिया—कोण-त्याना कोणत्या तरी शोधाबद्दल सांगावीं लागलीं; व त्यांत आपल्या हिंदुस्थानचें नांव वगळावें लागलें याब-द्दल त्यांना फार वाईट वाटलें. त्या काळीं हिंदुस्थान एखाद्या मोठ्या शोधानें त्या देशांच्या यादीमध्यें जागा पटकावील हें कोणाच्या स्वप्नींहि येणें शक्य नव्हतें. कारण येथें ना धड प्रयोगशाळा ना प्रयोगाक-रितां अवश्य लागणारीं नवीन यंत्रें तयार करणारे कारा-गीर ! अशा स्थितींत प्रो. बोस यांनी अति मेहनत घेऊन हिंदु कारागीरांच्याच हस्तें आपणास लागणारीं अति महत्त्वाचीं व सूक्ष्म यंत्रें तयार करून घेतलीं; परंतु हीं सर्व जमवाजमव करण्यास त्यांना जवळ जवळ दहा वर्षें लागलीं; व त्या नंतर कोठें, निव्वळ शोध करण्यास फुरसद मिळूं लागली. याचीं फळें लोकांना तीनच महिन्यांत दिसून आलीं. व त्यानीं शोधून काढलेलीं विद्युत्-प्रयोगाकरितां लागणारीं उपकरणें पाहून प्रसिद्ध लार्ड केल्विनसारखे शास्त्रज्ञ देखील आश्चर्यानें तोंडांत बोटें घालूं लागले. इंग्लंडच्या रॉयल सोसायटीनें तर १८९५ सालीं त्यांना पार्लमेंटरी ग्रँड देऊन आपली

गुणग्राहकता व्यक्त केली. आणि पुढील सालींच आपल्या सरकारनें त्यांना आपले शोध प्रसिद्धपणें शास्त्रज्ञांसमोर करून दाखविण्याकरितां युरोपमध्यें पाठविलें. त्या वेळीं लंडनच्या रॉयल सोसायटीनें, पॅरिसच्या अकॅडेमी ऑफ सायन्सनें, व बर्लिनच्या युनिव्हर्सिटीनें त्यांचा फार गौरव केला. अति सूक्ष्म विद्युल्लहरींना शोधून काढणाऱ्या यंत्राबद्दल• विचार चालू असतां त्यांना असें आढळून आलें कीं पूर्वींचीं जुनीं यंत्रें बराच वेळ काम करून थकल्यानंतर थोडीं नादुरुस्त होतात; व त्यांचा हा थकवा मनुष्य प्राण्याच्या थकव्याप्रमाणेंच असतो. लवकरच त्या यंत्रांच्या थकव्यावर त्यांनीं एक औषध शोधून काढलें. कांहीं औषध लावून मनुष्यप्राण्याचा थकून दुखूं लागलेला अवयव ज्याप्रमाणें एकादा डॉक्टर बरा करूं शकतो, त्याचप्रमाणें हे प्रोफेसरसाहेबही आपल्या यंत्रांना कांहीं औषधें लावून त्यांचा थकवा नाहींसा करूं लागले; एवढेंच करून ते थांबले नाहींत तर त्यांचा थकवा मर्यादेबाहेर वाढविणें किंवा वाटल्यास अजिबात नाहींसा करणें इत्यादि गोष्टी त्यांना साध्य झाल्या.

त्याच वेळीं भरलेल्या पॅरिस कांग्रेसमध्यें हे शोध प्रसिद्ध व्हावेत म्हणून सरकारनें त्यांना फिरून एकदां युरोपमध्यें पाठविलें; व त्यांच्या प्रयोगानें व भाषणानें जिकडे तिकडे गडबड उडवून दिली. यापुढील त्यांच्या प्रयोगांचा कल आजपर्यंत आपण निर्जीव मानीत आलेल्या वस्तूंमध्यें देखील चैतन्य असतें हें सिद्ध करण्याकड आहे. सजीव स्नायू किंवा ज्ञानतंतू यांच्यामध्यें कांहीं एक विद्युत्-प्रवाह उत्पन्न करण्याची शक्ति असते व हा विद्युत्-प्रवाह त्यांच्या सजीवतेचें द्योतक होय असें मानतात. प्रयोगाअंतीं प्रो. बोस यांना असें आढळून आलें कीं आजपर्यंत निर्जीव मानलेल्या धातूंना देखील कांहीं वेळ काम केल्यावर थकवा येतो; त्यांना चैतन्यवर्धक औषधें लावलीं असतां, ते विद्युत्-प्रवाह उत्पन्न करूं शकतात व त्यांच्यावर विषप्रयोग केला असतां ते मरून जातात, व तो विद्युत्-प्रवाह उत्पन्न होत नाहीं. मग प्राणी सजीव व वस्तू निर्जीव यांमध्यें फरक तो कोठें राहिला ! या प्रयोगावरून हें पूर्णपणें सिद्ध झालें कीं विद्युत्-प्रवाहांत होणारे एकसारखे (Similar) फेरफार जर सजीवतेचें द्योतक मानले तर आजपर्यंत निर्जीव मानलेल्या वस्तू खरोखर सजीवच आहेत; मात्र त्यांना आपलें चैतन्य आम्हाला नेहमीं प्रचारांत ठाऊक असलेल्या उपायांनीं दाखवितां येत नाहीं एवढेंच काय तें. हे प्रयोग त्यांनीं १९०१ च्या १० मे रोजीं रॉयल इन्स्टिट्यूशनपुढें करून दाखविले. वनस्पती सजीव आहेत ही कल्पना त्यांच्या वाढीवरून व इतर बऱ्याच बाबींवरून अगोदरच प्रचलीत झाली होती. तेव्हां धातू जर सजीव ठरले तर वनस्पती ठरणारच यांत कांहीं नवल नाहीं. त्यांना देखील सुख, दुःख, थकवा, मरण इत्यादि भावना मनुष्यमात्राप्रमाणें असतात, हें प्रो. बोस यांनीं आपल्या अतिसूक्ष्म विद्युत्-दर्शक यंत्राच्या साहाय्यानें सर्व जगाला दाखविलें व त्याला आश्चर्यचकित करून सोडिलें आहे. फुलझाडाचें फूल तोडतांना त्या झाडाला किती वेदना होतात हें जर साधारण मनुष्य एकदा प्रो. बोस यांच्या यंत्राच्या साहाय्यानें पाहील तर पुन्हा अशा तऱ्हेनें वनस्पतींना दुःख देणें त्याच्या जिवावर येईल ! ज्याप्रमाणें मानवी प्राण्याला मरणसमयीं आचक्या उचक्या लागतात त्याचप्रमाणें झाडाची फांदी तोडतांना त्याला अगदीं अशाच तऱ्हेच्या असह्य वेदना होतात; व आपणांस हे शास्त्रज्ञ ओक वर सांगितलेल्या यंत्राच्या साहाय्यानें सिनेमांत जशीं पडद्यावर चित्रें दाखवितात तशा त्या वेदना पडद्यावर दाखवूं शकतात ! किती हा आश्चर्यकारक शोध व त्यामुळें मनुष्यविचारामध्यें कोण ही भयंकर क्रांति !

# व्यायाम.

( लेखक—श्री. कुमारी सोनूबाई, गर्ल्सस्कूल-बडोदा. )

## प्राचीनकाळचे विद्यार्थी.

पूर्वी विद्या संपादन करावयाची म्हणजे जेथें गुरूचा आश्रम असेल त्या ठिकाणीं विद्यार्थ्यानें जावयाचें. हा प्रवास विद्यार्थ्याला पायींच करावा लागत होता. त्या वेळीं गाडी व घोडे यांची तर सोय नव्हतीच; परंतु रस्ते सुद्धां नीट नव्हते.

तो गुरूच्या आश्रमांत गेल्याबरोबर गुरु विद्या शिकविण्यास आरंभ करीत नसत. तो तेथें कांहीं दिवस राहिल्यानंतर गुरूला त्याचें आचरण, स्वभाव व त्याची शिक्षणासंबंधीं उत्सुकता हीं पसंत पडलीं तर विद्यार्थ्यांच्या यादींत त्याचें नांव दाखल केलें जात होतें.

त्याला गुरु, गुरूच्या घरांतील मंडळी व तेथील इतर विद्यार्थी इतक्यांना खुष ठेवावें लागत होतें. दुसऱ्याच्या मनाला संतोष देऊन आपण कसें वागावें हें त्याला चांगलें माहीत असावें लागत होतें.

रानांत जाऊन गुरूकरितां, इतर मंडळीकरितां व स्वतःकरितां कंदमुळें आणावीं लागत होतीं. गुरूच्या आश्रमांत बहुतकरून गाई असत. गाईंना रानांत चरावयास नेणें, त्यांच्याकरितां गवत आणणें, त्यांना स्नान घालणें, पाणी पाजणें, त्यांचा गोठा साफ करणें इत्यादि कामें शिष्यालाच करावीं लागत होतीं.

रानांतून सर्पण आणणें, आश्रमाची मोडतोड झाल्यास त्याची दुरुस्ती करणें व आश्रम जुना झाल्यास तो पुन्हा तयार करणें हीं कामें शिष्यांचींच होतीं.

गुरूची आज्ञा व गुरूच्या घरच्या मंडळीची आज्ञा त्याला शिरसावंद्य करावी लागत होती.

ज्याला वनांत, मोकळ्या हवेंत व सूर्यप्रकाशांत बाराही महिने वरील प्रकारचे शारीरिक श्रम करावे लागत होते, त्याला आणखी निराळा व्यायाम करण्याची आवश्यकता कोठें राहणार ? त्याला नकळत शारीरिक व मानसिक व्यायाम हे नेहमीं घडतच होते.

प्रत्येक गांवांत शाळा नव्हत्या. पण बऱ्याच गांवांत गावठी शाळा असत. त्यांत सुद्धां गुरु व गुरूच्या घरची मंडळी सांगतील तें काम आनंदानें व व्यवस्थेनें करावें लागत होतें. गुरूचें व त्यांच्या मंडळीचें मन दुखविलें तर आपणांस शिकावयास मिळणार नाहीं, हें विद्यार्थी पूर्णपणें जाणत होते. या विद्यार्थ्यांना घरांतीलही कामें करावीं लागत, त्यामुळें त्यांना बरेच शारीरिक श्रम होत असत.

सध्या शिक्षण मिळण्याची मुबलग सोय झाली आहे. मोठमोठ्या शहरांत उच्च दर्जाचें शिक्षण मिळावें म्हणून कालेजें व हैस्कुलें स्थापन झालीं आहेत. प्राथमिक शिक्षण बऱ्याच खेड्यापर्यंत मिळूं लागलें आहे. फी दिली कीं शाळेंत नांव दाखल केलें जातें. आचारविचार यांविषयींची परीक्षा द्यावी लागत नाहीं. विद्यार्थ्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल कोणीच पूसतपास करीत नाहीं. विद्यार्थी वर्गांत असला कीं, शिक्षकानें त्याला शिकविलें पाहिजे. सध्यां शिक्षकांनाच विद्यार्थ्यांचीं मनें प्रसन्न ठेवावीं लागतात. शिक्षक आपल्या शिष्यांना कामें सांगतही नाहींत; आणि जर कदाचित् एखाद्या वेळेस सांगितलें तर विद्यार्थी तें काम मनापासून व व्यवस्थित रीतीनें करीतही नाहींत.

श्रीमंत मुलांना तर घरीं बसूनही शिक्षण मिळतें. दरमहा ५, १० अथवा १५ रुपये दिले कीं, शिक्षक घरीं चालत येतात. एक शिक्षक पसंत पडला नाहीं कीं दुसरा शिक्षक ताबडतोब मिळतो. शिक्षकालाच शिष्याशीं नमून वागावें लागतें. पूर्वी दरमहा ५०० नाहीं १००० रुपये दिले तरी शिक्षक घरीं मिळणें अशक्य होतें.

त्याचप्रमाणें मुलांच्या घरच्याच वडील मनुष्यांनीं काम सांगितलें तरी ते काम करण्याची चुकवाचुकवी कारितात; काम न करण्याविषयीं कांहीं तरी खोट्या सबबी पुढें आणतात; कांहीं दुखते खुपतें म्हणून सांगतात किंवा "शाळेंतील अभ्यास करावयाचा आहे" असें म्हणून टाळाटाळी करतात. या विद्यार्थ्यांना गुरूच्या घरचेंही कांहीं काम पडत नाहीं व स्वतःच्या घरचेंही नाहीं. अशा प्रकारें कामें चुकविण्याची त्यांना संवय लागून ते **निकामी** व अशक्त होतात. हें लक्षांत ठेवून हल्लींच्या विद्यार्थ्यांनीं, कर्तबगारी गाजवावयाची असेल तर, पडेल तें काम करण्यास तयार राहिले पाहिजे. व चांगली दमचक्की होण्याजोगें काम मिळत नसेल तर नियमितपणें व्यायाम घेतला पाहिजे.

### व्यायाम म्हणजे काय ?

दंड काढणें व बैठकी मारणें येवढाच अर्थ व्यायाम या शब्दाचा केला जातो. पण तें बरोबर नाहीं.

व्यायाम करणें म्हणजे शरिराच्या बाह्य व आंतरिंद्रियांना श्रम देणें, हें होय. बाहेरील अवयवांना श्रम झाले म्हणजे थोडेबहुत तरी आंतील इंद्रियांना—म्हणजे फुफ्फुसें, हृदय व पोटांतील इंद्रियें यांना—श्रम होतात.

घरांतील कामें करणें, धुणीं धुणें, पाणी आणणें इत्यादि कामें अगोदर केलीं पाहिजेत. यानें शारीरिक श्रम चांगले होतात व घरांत व्यवस्था नीट राहते.

खोखो, आट्यापाट्या, क्रिकेट, फुटबॉल इत्यादि खेळानें पायांना चांगला व्यायाम मिळतो, मोकळी हवा मिळते, अंगांत चलाखी येते व मुलांत मिळून मिसळून कसें वागावें हें समजतें.

फिरावयास जाण्यानें पायांना उत्तम व्यायाम होतो. व्यायाम या दृष्टीनें जेव्हां फिरावयास जावयाचें तेव्हां एकट्यानें जावें; झपझप चालावें व तोंड बंद ठेवावें.

पोहणें हाही एक व्यायाम आहे. यानें सर्व शरिराला व्यायाम घडतो.

खणणें, लाकडें फोडणें यानें पोटाला व हातांना चांगला व्यायाम होतो.

शिकारीनें पायांना व्यायाम व मोकळी हवा मिळते, डोळे व कान तीक्ष्ण होतात व अंगांत चलाखी व धाडस येतें.

घोड्यावर बसण्यानें कमरेच्या वरच्या भागाला व्यायाम मिळतो. व मनुष्य चलाख व समयसूचक होतो.

कुस्तीच्या योगानें सर्व शरिराला व्यायाम घडतो व अंगांत चलाखी येते.

दंड काढण्यानें व जोडी फिरविण्यानें हात मजबूत होतात. बैठकी मारणें व नमस्कार घालणें यानें पाय मजबूत होतात. कांठीलाठी, दांडपट्टा व फारिगदका यांनीं हातापायांला व्यायाम मिळून अंगीं चलाखी व धैर्य येतें. मलखांबानें पोटाला चांगला व्यायाम मिळतो. लेझीमनें सर्व शरिराला व्यायाम मिळून, त्यांच्यांतून निघणाऱ्या आवाजानें मुलाचें मन चांगलें रमतें.

व्यायाम म्हणजे काय व त्यांत कोणकोणत्या श्रमाचा कसा समावेश होतो याचें स्पष्टीकरण थोडेंबहुत वर केलें; याचा उपयोग करून घेण्यास आपणांस फारशी अडचण पडणार नाहीं. एका प्रकारचा व्यायाम साधला नाहीं तर दुसऱ्या तऱ्हेचा व्यायाम आपणांस सहज करितां येईल.

# व्यायाम.

( लेखक—श्री. कुमारी सोनूबाई, गर्ल्सस्कूल–बडोदा. )

## प्राचीनकाळचे विद्यार्थी.

पूर्वी विद्या संपादन करावयाची म्हणजे जेथें गुरूच आश्रम असेल त्या ठिकाणीं विद्यार्थ्यानें जावयाचें. ह प्रवास विद्यार्थ्याला पायींच करावा लागत होता. त्य वेळीं गाडी व घोडे यांची तर सोय नव्हतीच; परं रस्ते सुद्धां नीट नव्हते.

तो गुरूच्या आश्रमांत गेल्याबरोबर गुरु विद्या शिक विण्यास आरंभ करीत नसत. तो तेथें कांहीं दिव राहिल्यानंतर गुरूला त्याचें आचरण, स्वभाव व त्याच शिक्षणासंबंधीं उत्सुकता हीं पसंत पडलीं तर विद्य र्थ्यांच्या यादींत त्याचें नांव दाखल केलें जात होतें.

त्याला गुरु, गुरूच्या घरांतील मंडळी व तेथील इत विद्यार्थी इतक्यांना खुष ठेवावें लागत होतें. दुसऱ्याच्य मनाला संतोष देऊन आपण कसें वागावें हें त्याल चांगलें माहीत असावें लागत होतें.

रानांत जाऊन गुरूकरितां, इतर मंडळीकरितां स्वतःकरितां कंदमुळें आणावीं लागत होतीं. गुरूच्य आश्रमांत बहुतकरून गाई असत. गाईंना रानांत चर वयास नेणें, त्यांच्याकरितां गवत आणणें, त्यांना स्ना घालणें, पाणी पाजणें, त्यांचा गोठा साफ करणें इत्यादि कामें शिष्यालाच करावीं लागत होतीं.

रानांतून सरपण आणणें, आश्रमाची मोडतोड झाल्या त्याची दुरुस्ती करणें व आश्रम जुना झाल्यास त पुन्हा तयार करणें हीं कामें शिष्यांचींच होतीं.

गुरूची आज्ञा व गुरूच्या घरच्या मंडळीची आज्ञ त्याला शिरसावंद्य करावी लागत होती.

ज्याला वनांत, मोकळ्या हवेंत व सूर्यप्रकाशांत बाराही महिने वरील प्रकारचे शारीरिक श्रम करावे लागत होते, त्याला आणखी निराळा व्यायाम करण्याची आवश्यकता कोठें राहणार ? त्याला नकळत शारीरिक व मानसिक व्यायाम हे नेहमीं घडतच होते.

प्रत्येक गांवांत शाळा नव्हत्या. पण बऱ्याच गांवांत गावठी शाळा असत. त्यांत सुद्धां गुरु व गुरूच्या घरची मंडळी सांगतील तें काम आनंदानें व व्यवस्थेनें करावें लागत होतें. गुरूंचें व त्यांच्या मंडळीचें मन दुखविलें तर आपणांस शिकावयास मिळणार नाहीं, हें विद्यार्थी पूर्णपणें जाणत होते. या विद्यार्थ्यांना घरांतीलही कामें करावीं लागत, त्यामुळें त्यांना बरेच शारीरिक श्रम होत असत.

सध्या शिक्षण मिळण्याची मुबलग सोय झाली आहे. मोठमोठ्या शहरांत उच्च दर्जाचें शिक्षण मिळावें म्हणून कालेजें व हैस्कुलें स्थापन झालीं आहेत. प्राथमिक शिक्षण बऱ्याच खेड्यापर्यंत मिळूं लागलें आहे. फी दिली कीं शाळेंत नांव दाखल केलें जातें. आचारविचार यांविषयींची परीक्षा द्यावी लागत नाहीं. विद्यार्थ्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल कोणीच पूसतपास करीत नाहीं. विद्यार्थी वर्गांत असला कीं, शिक्षकानें त्याला शिकविलें पाहिजे. सध्यां शिक्षकांनाच विद्यार्थ्यांचीं मनें प्रसन्न ठेवावीं लागतात. शिक्षक आपल्या शिष्यांना कामें सांगतही नाहींत; आणि जर कदाचित् एखाद्या वेळेस सांगितलें तर विद्यार्थी तें काम मनापासून व व्यवस्थित रीतीनें करीतही नाहींत.

श्रीमंत मुलांना तर घरीं बसूनही शिक्षण मिळतें. दरमहा ५, १० अथवा १५ रुपये दिले कीं, शिक्षक घरीं चालत येतात. एक शिक्षक पसंत पडला नाहीं कीं दुसरा शिक्षक ताबडतोब मिळतो. शिक्षकालाच शिष्यांशीं नमून वागावें लागतें. पूर्वी दरमहा ५०० नाहीं १००० रुपये दिले तरी शिक्षक घरीं मिळणें अशक्य होतें.

त्याचप्रमाणें मुलांच्या घरच्याच वडील मनुष्यांनीं काम सांगितलें तरी ते काम करण्याची चुकवाचुकवी करितात; काम न करण्याविषयीं कांहीं तरी खोट्या सबबी पुढें आणतात; कांहीं दुखतें खुपतें म्हणून सांगतात किंवा "शाळेंतील अभ्यास करावयाचा आहे" असें म्हणून टळाटाळी करतात. या विद्यार्थ्यांना गुरूच्या घरचेंही कांहीं काम पडत नाहीं व स्वतःच्या घरचेंही नाहीं. अशा प्रकारें कामें चुकविण्याची त्यांना संवय लागून ते निकामी व अशक्त होतात. हें लक्षांत ठेवून हल्लींच्या विद्यार्थ्यांनीं, कर्तबगारी गाजवावयाची असेल तर, पडेल तें काम करण्यास तयार राहिलें पाहिजे. व चांगली दमचक्की होण्याजोगें काम मिळत नसेल तर नियमितपणें व्यायाम घेतला पाहिजे.

## व्यायाम म्हणजे काय ?

दंड काढणें व बैठकी मारणें येवढाच अर्थ व्यायाम या शब्दाचा केला जातो. पण तें बरोबर नाहीं.

व्यायाम करणें म्हणजे शरिराच्या बाह्य व आंतरिंद्रियांना श्रम देणें, हें होय. बाहेरील अवयवांना श्रम झाले म्हणजे थोडेबहुत तरी आंतील इंद्रियांना—म्हणजे फुफ्फुसें, हृदय व पोटांतील इंद्रियें यांना—श्रम होतात.

घरांतील कामें करणें, धुणीं धुणें, पाणी आणणें इत्यादि कामें अगोदर केलीं पाहिजेत. यानें शारीरिक श्रम चांगले होतात व घरांत व्यवस्था नीट राहते.

खोखो, आट्यापाट्या, क्रिकेट, फुटबॉल इत्यादि खेळानें पायांना चांगला व्यायाम मिळतो, मोकळी हवा मिळते, अंगांत चलाखी येते व मुलांत मिळून मिसळून कसें वागावें हें समजतें.

फिरावयास जाण्यानें पायांना उत्तम व्यायाम होतो. व्यायाम या दृष्टीनें जेव्हां फिरावयास जावयाचें तेव्हां एकट्यानें जावें; झपझप चालावें व तोंड बंद ठेवावें.

पोहणें हाही एक व्यायाम आहे. यानें सर्व शरिराला व्यायाम घडतो.

खणणें, लाकडें फोडणें यानें पोटाला व हातांना चांगला व्यायाम होतो.

शिकारीनें पायांना व्यायाम व मोकळी हवा मिळते, डोळे व कान तीक्ष्ण होतात व अंगांत चलाखी व धाडस येतें.

घोड्यावर बसण्यानें कमरेच्या वरच्या भागाला व्यायाम मिळतो. व मनुष्य चलाख व समयसूचक होतो.

कुस्तीच्या योगानें सर्व शरिराला व्यायाम घडतो व अंगांत चलाखी येते.

दंड काढण्यानें व जोडी फिरविण्यानें हात मजबूत होतात. बैठकी मारणें व नमस्कार घालणें यानें पाय मजबूत होतात. कांठीलाठी, दांडपट्टा व फरिगदका यांनीं हातापायांला व्यायाम मिळून अंगीं चलाखी व धैर्य येतें. मलखांबानें पोटाला चांगला व्यायाम मिळतो. लेजीमनें सर्व शरिराला व्यायाम मिळून, त्यांच्यांतून निघणाऱ्या आवाजानें मुलाचें मन चांगलें रमतें.

व्यायाम म्हणजे काय व त्यांत कोणकोणत्या श्रमाचा कसा समावेश होतो याचें स्पष्टीकरण थोडेंबहुत वर केलें; याचा उपयोग करून घेण्यास आपणांस फारशी अडचण पडणार नाहीं. एका प्रकारचा व्यायाम साधला नाहीं तर दुसऱ्या तऱ्हेचा व्यायाम आपणांस सहज करितां येईल.

# नशिबाचा खेळ.

( लेखक—सदाशिव दामोदर जोगळेकर बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट वकील, बडोदें. )

मुंबईतील युनिव्हर्सिटीच्या बागेंतील एका बांकावर गणपत बसला होता. बागेंत गोळा झालेल्या आंग्ल-बालकांची क्रीडा, व त्यांच्या दायांचे वटलर, बवर्जी वगैरे जनांशीं होत असलेले प्रेमविनोद तो निष्काळजीपणानें अवलोकन करीत होता. अभ्राच्छादित आकाशांत एक मोठा काळा ढग वावरत होता. त्यानें थोड्या वेळानें वर्षावास सुरवात करून त्या वर्षाच्या पावसाळ्याचें आगमन जाहीर केलें. साधारणतः अशा प्रसंगीं उन्हाळ्यानें त्रासलेल्या जनसमूहास अत्यानंद होतो. तथापि आंगावर वर्षाऋतूचीं प्रथम चिन्हें पडतांच गणपत दचकला. त्यानें सभोंवतीं व आकाशाकडे पाहिलें. त्याची खात्री झाली कीं पावसाळा आतां खरोखरीच सुरू झाला. आनंद तर राहो, पण चिंतेची छटा त्याच्या मुखावर पसरली. सगळ्या मुंबई शहरांत, अथवा पृथ्वीतलावर त्याला टेंकण्यास हक्काचें असें ठिकाण नव्हतें. त्याची उपजीविका इतरांप्रमाणें नियमीत नव्हती. त्याचप्रमाणें तिचें साधनही स्थिर नव्हतें. लोकांचा निष्काळजीपणा, अंधविश्वास, भोळेपणा, व कींव यांवर त्याचा चरितार्थ चालत असे. गणपतसारख्या लोकांस पावसाळा म्हणजे महासंकट ! वर्षांतील आठ महिने सार्वजनिक बागा, चौपाटी, बंद असलेल्या दुकानाचे ओटे वगैरेंचा आश्रय घेऊन कसे तरी निभावत असत. पण पावसाळ्यांत मोठीच पंचाईत. यामुळें गणपतला काळजी वाटणें सहाजीक होतें. स्वतःच्या जीवनक्रमाविषयीं गणपतला बिलकूल वाईट वाटत नव्हतें. तो एक स्वतंत्र धंदा आहे असें त्याचें मत होतें. आतां कोणत्याही धंद्यांत चढउतार हीं असावयाचींच. गणपतलाही अनेक वेळां सरकारचा पाहुणचार स्वीकारण्याचा प्रसंग आला होता. परंतु त्याची क्षिति बाळगणारा तो नव्हता. यंदांचा पावसाळा कसा काढावा याविषयीं त्याच्या मनांत विचार सुरू झाले. आप्त म्हणण्याला त्याला कोणीही नव्हतें. त्याचा एक चुलतभाऊ मुंबईत



"कोणरे तो? काय करितो तिथें?" एका पोलिस शिपायानें गणपतच्या खांद्यावर हात ठवून जोरानें विचारिलें.

एका गिरणींत नोकर होता खरा; तथापि त्याच्या व गणपतच्या आप्तपणाची परिसमाप्ती कधींच होऊन चुकली होती. गणपतनें अनेक युक्त्या मनांत आणिल्या परंतु एकही त्याला पसंत पडली नाहीं. त्याचा चेहेरा उदास झाला. इतक्यांत विजेच्या झटक्याप्रमाणें एक कल्पना त्याच्या डोक्यांत आली. त्यानें आपल्या मांडीवर समाधानदर्शक टाळी वाजविली. त्याचा चेहरा प्रफुल्लित झाला. त्याची कल्पना फारशी नवीन नव्हती, तरीही ती इतका वेळ आपल्यास कशी सुचली नाहीं याचें त्यास फार आश्चर्य वाटलें. पावसाळ्याचे हाल टाळण्यास तुरुंगाचा आश्रय करणें हा राजरोस व आंगवळणीं पडलेला एकच सुलभ मार्ग होय. तुरुंगासारखें चिंतेस औषध नाहीं. तेथें अन्नपाण्याचा व इतर आवश्यक वस्तूंचा प्रश्न नसतो. श्रीमंतांस न लाभणारी सुरक्षितता, व गरिबांस तापविणाऱ्या संसाराचे व्यापापासून मुक्तता, हीं दोन्हीं तुरुंगांत यथेच्छ भोगावयास मिळतात. अन्न व श्रम हे नियमित व वक्तशीर मिळाल्यानें, आणि शुद्ध हवेच्या सेवनानें प्रकृती निरोगी होते. तुरुंगाची युक्ति गणपतला फारच पसंत पडली. महायुद्धांतील सेनापति व गणपत यांमध्यें एका बाबतींत साम्य होतें. दोघांचीही स्थिती अस्थिर असल्यानें कोणतीही कल्पना मनांत आल्याबरोबर तिच्याविषयीं कायतो निश्चय एकदम करून कार्यास हात घालणें दोघांस जरूर असे; नाहींतर अनपेक्षित तिसरीच गोष्ट घडून कल्पना जागेवरच रहावयाची. हा गुण गणपतमध्यें चांगला बाणला होता; तुरुंगांत जावयाचें खरें, मग उशीर कशाला ?

तुरुंगांत जाण्यास तयार अथवा उत्कंठित असलेल्या माणसाच्या स्थितीची कल्पना साधारण मनुष्यास क्वचितच करितां येईल. वाटेल तेथें जाण्याची व वाटेल तें करण्याची त्याला मुभा असते. प्रत्यक्ष सत्ताधीश राजाला सुद्धां अशक्य असणाऱ्या गोष्टी त्याला सुलभ असतात. गणपतला आज बरेच दिवसांत पोटभर अन्न मिळालें नव्हतें. तेव्हां सहाजीकच तो विचार त्याच्या मनांत प्रथम आला. पहिल्यानें कोठें तरी जाऊन चांगला ताव मारावा व नंतर पोलीस व मॅजिस्ट्रेट यांजवर पुढील कामगिरी सोंपवावी असा त्यानें बेत केला. बांकावरून उठून तो रस्त्यावर आला. पलीकडेच एक इराण्याचें दुकान त्याला दिसलें. त्याबरोबर चमचमित मांसाहाराची व एखाद्या बाटलीची आशा त्याला उत्पन्न होऊन त्याचे तोंडास पाणी सुटलें. त्यानें आपल्या कपड्याकडे पाहिलें. टोपी व कोट एका सभ्य गृहस्थाच्या माडीवरून आलेलीं असल्यानें बरीं होतीं. परंतु धोतर मात्र अगदींच फाटकें व मलीन होतें. पायही मोकळेच होते. अशा स्थितींत इराण्याच्या क्षुधाशमनगृहांत प्रवेश करावा कीं नाहीं याबद्दल त्याला संशय उत्पन्न झाला, पण तो क्षणमात्रच. कारण तुरुंगांत जाण्यास उत्सुक असल्यावर भीती कोणाची व काय म्हणून ? गणपतनें बेधडक दुकानांत प्रवेश केला. बाहेरील वाढणाऱ्यास टाळून तो आंतले दालनांत गेला; व खुर्चीवर बसणार तोंच " ए साला सुवर, कुठें निघाला ? बसते कुठें ? शरम नाहीं वाटत ! " असें म्हणून एका वाढप्यानें त्याचा हात धरला. गणपत उत्तर काय देणार ? दुसरे वाढपी गोळा होऊन त्यांनीं गणपतला थोडी " समजूत " देऊन फार त्वरेनें रस्त्यावरील फूटपाथवर पोंचविलें.

कपड्यावरील माती झटकून गणपत बोरीबंदराकडे वळला. थोडें अंतर गेल्यावर एक मोठें युरोपियन दुकान त्याला लागलें. त्याच्या खिडक्यांना भलीं मोठीं कांचेचीं तावदानें असून आंतील माल विद्युत् दीपाचे लखलखाटांत भपकेदार रीतीनें मांडला होता. रस्त्यावरून जाणाऱ्याचें मन सहज त्या खिडक्यांकडे आकर्षिलें जात असे. गणपतची दृष्टि त्या खिडक्यांकडे गेली. त्यानें रस्त्यावरील एक मोठासा वाटोळा दगड उचलला. क्षणांत तो दगड फुटलेल्या कांचेच्या आवाजांत त्या दुकानांतील मालांच्या भेटीस गेला. दुकानांतील व रस्त्यावरील लोक गोळा झाले. त्यांत एक पोलीस शिपाई होता.

गणपतनें ऐटींत खिशांत हात घालून, मधुर स्मित करून त्याच्याकडे पाहिलें.

"किदर है वो बदमाष, किदर भगा ?" शिपायानें घाईनें विचारिलें. "माझा कांहीं संबंध ह्या कृत्याशीं असेल असें तुम्हांस नाहीं कां वाटत ?" हांसतच आणि शांतपणें गणपतनें विचारिलें. शिपायानें तिकडे लक्ष्यच दिलें नाहीं. खिडक्या फोडून पुन्हा जागेवरच राजरोस उभें राहून पोलीसजवळ शांतपणें भाषण करणारा बदमाष आजपर्यंत त्याला भेटला नव्हता. त्यानें सभोंवतीं पाहिलें. दोन माणसें जरा दूर अंतरावर ट्राम गांठण्यास पळत होतीं. शिपाईबोवानीं ताबडतोब त्यांचा पाठलाग करण्यास सुरुवात केली.

गणपतनें मनांत एकंदर मानव जातीवर व मुख्यत: पोलीसवर तिरस्कारयुक्त शिव्यांचा वर्षाव केला. तो पुन्हा चालूं लागला. मोठ्या रस्त्यावर त्याचें साहस दोन वेळां फसलें म्हणून त्यानें एका गल्लींत वळून संधी शोधण्याचा उपक्रम आरंभिला. एका लहान बोळांत त्याला एक हिंदू मराठ्याचें उपहारगृह लागलें. कांद्याच्या भज्यांचा वास गणपतच्या नाकांत जातांच त्याच्या पोटांत काहूर उठलें. असल्या दुकानांत प्रथम दर्शनींच मज्जाव होण्याची त्याला भीति नव्हती. चहाचा बंब व भज्यांची कढई बाहेरच ओटयावर ठेविलीं होतीं. पलीकडेच एका खुर्चीवर एक गलेलठ्ठ मनुष्य बसला होता. त्याच्या लाल चेहेऱ्यावरून व पाणेऱ्या डोळ्यांवरून तो चहापेक्षां जाज्वल पेयाचा भक्त असावा असें दिसलें. दुकानाच्या भिंती धुरानें काळ्या झाल्या होत्या. टेबलें, खुर्च्या, जमीन वगैरे इतकीं गलिच्छ होतीं कीं त्यांपुढें गणपतचें धोतर म्हणजे परीटघडीच होय. गणपतनें खुशाल आंत जाऊन फराळास सुरवात केली. चिवडा, शंकरपाळे, श्रीखंड, पुरी, शेव, भजीं इत्यादि नित्य सरावाचे पदार्थ झाल्यावर त्यानें लाडू वगैरेंची चव घेतली. एवढ्या आवर्धांत लेमोनेड वगैरेंच्या तीन बांटल्या त्यानें खलास केल्या. आज बेचव पाण्यास स्पर्श करण्याची गणपतला जरूर नव्हती. हा सर्व प्रकार दुकानाच्या मालकानें आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहिला. गणपतला वाढतां वाढतां त्याचे टाके ढिले झाले. तो थोडा त्रासल्याप्रमाणें पण दिसला. तथापि विक्री बरी झाल्याचें समाधान मानूनच तो स्वत:चें शांतवन करीत असावा. शेवटीं चहाचा एक पेला संपवून गणपतनें तोंड व हात पुसले. तो उठला व मालकाचे टेबलाजवळ आला; मालकानें हात पुढें करितांच गणपतनें मधुरस्मित करून आपला व पैशाचा बेबनाव झाल्याचें कळविलें. यानंतरच्या अर्ध्यामिनिटांतील गोष्टी इतक्या त्वरेनें झाल्या कीं त्याचें भान गणपतला सुद्धां असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. पुन्हा मोठ्या श्रमानें गणपत रस्त्यावरून उठून उभा राहिला. त्याचें कानशील लाल—भडक झालें होतें. डोक्यावर एक टेंगूळ येऊन शिणका मारीत होत्या. उजवा पाय किंचित् लचकल्याचाही त्याला लवकरच शोध लागला. तथापि लवकर पाय उचलून त्यानें दुसरा रस्ता गांठला. शरिरावरील धूळ झाडून त्यानें पुन्हा मार्ग आक्रमिण्यास आरंभ केला. त्याच्या अजिबात नष्ट झालेल्या धीरापैकीं थोडाबहुत परत आणण्यास अर्धा अधिक तास त्याला फिरावें लागलें.

काय म्हणावें या नशिबाला ! तुरुंगांत जाण्यास गणपत एका पायावर तयार असतां कोणीही त्याला जाऊं देईना ! नाहींतर, खोटा पुरावा उभा करून निरपराध्यांसही तुरुंगाचा रस्ता दाखविण्यास पोलीस व लोक कधीं कधीं उत्सुक असतात ! तथापि, निराश न होतां गणपतनें आपला निश्चय कायम ठेविला. फिरतां फिरतां कांहीं वेळानें आणखी एक नामी संधी त्यास दिसली. आतां मात्र आपण फसणार नाहीं अशी त्याला खात्री वाटली.

एक गृहस्थ दाराशीं आपली छत्री ठेवून एका दुकानांत शिरत होता. गणपतनें बेधडक दुकानांत शिरून ती छत्री उचलली व परत फिरून तो सावकाश चालूं लागला.

"अहो माझी छत्री आहे ती !" तो गृहस्थ रागानें म्हणाला.

" असें काय " गणपतनें उद्धटपणें जबाब दिला, " तुमची आहे छत्री ? चोरली मीं ? मग पोलीसला कां नाहीं बोलावीत ? "

" माफ करा अं–" गणपतच्या धीटाईनें नरमून तो गृहस्थ अडखळत म्हणाला, " छत्री तुमची असेल तर खुशाल घेऊन जा. आजच सकाळीं माझी बदलून ही आली होती ! "

" माझीच आहे ही ! " गणपत संतापून उद्गारला.

छत्रीवाला गृहस्थ मुकाट्यानें मागें फिरला. विस्मयानें व रागानें गणपत वेडावून गेला. राजाला ज्याप्रमाणें कोणताही अपराध करण्याचा हक्क नाहीं त्याप्रमाणें गणपतचाही अपराध करून तुरुंगांत जाण्याचा स्वयंसिद्ध व नैसर्गिक हक्क नाहींसा झाला कीं काय ?

संतापाच्या भरांत त्यानें ती छत्री गटारांत फेंकून दिली, व सर्व मानवजातींचे पितर उद्धरिले. आतां मात्र निराशेचा अम्मल त्याच्या मनावर होऊं लागला. कसा तरी चालत, आडखळत, तो ठाकूर-द्वारापर्यंत आला. तेथें रामाचे मंदिरांत कीर्तन सुरू होतें. विद्युद्दीप लावून मंदिरांत बरीच शोभा आणिली होती. हरिदासांची वृत्ति रंगांत येऊन भगवद्भजन जोरानें चालू होतें. मंदिराकडे पाहून गणपतला आठवण झाली कीं, आपण पूर्वीं एकदां याच मंदिरांत प्रभूला साष्टांग नमस्कार घालून पुन्हा वाईट फंदांत न पडण्याची शपथ घेतली होती. त्याच्या यावेळच्या मनःस्थितीमध्यें या भगवद्भजनाचा विलक्षण परिणाम त्याच्यावर झाला. मंदिराबाहेर उभें राहून भजन ऐकत असतां त्याच्या मनांत पश्चात्ताप उत्पन्न झाला, व सद्विचार जागृत होऊं लागले. त्यानें आपल्या आयुष्याचा आढावा काढिला, परंतु त्यांत समाधान मानण्यासारखी एकही गोष्ट त्याला आढळली नाहीं. जन्मास येऊन आपण दुष्कृत्यांमध्यें गुरफटून पापाचे डोंगर स्वतःच्या शिरावर रचित आलों त्याची जाणीव येऊन त्याला अत्यंत खेद झाला. मंदिराच्या दाराशीं बसलेले दुबळे भिकारी हे सुद्धां आपल्यापेक्षां श्रेष्ठ, असें वाटून तो खजील झाला. त्याच्या डोळ्यांतून आश्रू वाहूं लागले. प्रभू रामचंद्राची मूर्ति त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली. तिच्या पायावर मनानेंच डोकें ठेवून त्यानें क्षमा भाकिली, व इतःपर सन्मार्गानेंच आयुष्य कंठण्याचा त्यानें संकल्प केला.

" कोणरे तो ? काय करितो तिथें ? " एका पोलीस शिपायानें गणपतच्या खांद्यावर हात ठेवून जोरानें विचारिलें. " अरे हा तर गणपत ! माझी ओळख विसरलास काय ? आज काय देवळांतल्या जोड्यांवर नजर आहे वाटतें ? चला, गणपतराव, चला. मॅजिस्ट्रेटसाहेब तुमची वाट पहात आहेत. "

दुसरे दिवशीं सकाळीं उपजीविकेचें दृश्य साधन नसल्याबद्दल मॅजिस्ट्रेटांनीं गणपत गेनबा यास सहा महिन्यांची शिक्षा फर्माविली.

---


# फोटो बक्षीस.

जे कोणी आपआपल्या गांवांतील ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर ही अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचनाः**—जिल्ह्याचे गांवचे निदान २५–३०, तालुक्याचे १५–२०, व पेठा वगैरेंचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. डी. खानापुरे**, घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

गणपतनें ऐटींत खिशांत हात घालून, मधुर स्मित करून त्याच्याकडे पाहिलें.

" किदर है वो बदमाष, किदर भगा ?" शिपायानें घाईनें विचारिलें. " माझा कांहीं संबंध ह्या कृत्याशीं असेल असें तुम्हांस नाहीं कां वाटत ?" हांसतच आणि शांतपणें गणपतनें विचारिलें. शिपायानें तिकडे लक्ष्यच दिलें नाहीं. खिडक्या फोडून पुन्हा जागेवरच राजरोस उभें राहून पोलीसजवळ शांतपणें भाषण करणारा बदमाष आजपर्यंत त्याला भेटला नव्हता. त्यानें सभोंवतीं पाहिलें. दोन माणसें जरा दूर अंतरावर ट्राम गांठण्यास पळत होतीं. शिपाईबोवानीं ताबडतोब त्यांचा पाठलाग करण्यास सुरुवात केली.

गणपतनें मनांत एकंदर मानव जातीवर व मुख्यत: पोलीसवर तिरस्कारयुक्त शिव्यांचा वर्षाव केला. तो पुन्हा चालूं लागला. मोठ्या रस्त्यावर त्याचें साहस दोन वेळां फसलें म्हणून त्यानें एका गल्लींत वळून संधी शोधण्याचा उपक्रम आरंभिला. एका लहान बोळांत त्याला एक हिंदू मराठ्याचें उपहारगृह लागलें. कांद्याच्या भज्यांचा वास गणपतच्या नाकांत जातांच त्याच्या पोटांत काहूर उठलें. असल्या दुकानांत प्रथम दर्शनींच मज्जाव होण्याची त्याला भीति नव्हती. चहाचा बंब व भज्यांची कढई बाहेरच ओटयावर ठेविलीं होतीं. पलीकडेच एका खुर्चीवर एक गलेलठ्ठ मनुष्य बसला होता. त्याच्या लाल चेहेऱ्यावरून व पाणेऱ्या डोळ्यांवरून तो चहापेक्षां जाज्वल पेयाचा भक्त असावा असें दिसलें. दुकानाच्या भिंती धुरानें काळ्या झाल्या होत्या. टेबलें, खुर्च्या, जमीन वगैरे इतकीं गलिच्छ होतीं कीं त्यांपुढें गणपतचें धोतर म्हणजे परीटघडीच होय. गणपतनें खुशाल आंत जाऊन फराळास सुरवात केली. चिवडा, शंकरपाळे, श्रीखंड, पुरी, शेव, भजीं इत्यादि नित्य सरावाचे पदार्थ झाल्यावर त्यानें लाडू वगैरेंची चव घेतली. एवढ्या आवर्धींत लेमोनेड वगैरेंच्या तीन बाटल्या त्यानें खलास केल्या. आज बेचव पाण्यास स्पर्श करण्याची गणपतला जरूर नव्हती. हा सर्व प्रकार दुकानाच्या मालकानें आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहिला. गणपतला वाढतां वाढतां त्याचे टाके ढिले झाले. तो थोडा त्रासल्याप्रमाणें पण दिसला. तथापि विक्री बरी झाल्याचें समाधान मानूनच तो स्वत:चें शांतवन करीत असावा. शेवटीं चहाचा एक पेला संपवून गणपतनें तोंड व हात पुसले. तो उठला व मालकाचे टेबलाजवळ आला; मालकानें हात पुढें करितांच गणपतनें मधुरस्मित करून आपला व पैशाचा बेबनाव झाल्याचें कळविलें. यानंतरच्या अर्ध्यामिनिटांतील गोष्टी इतक्या त्वरेनें झाल्या कीं त्याचें भान गणपतला सुद्धां असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. पुन्हा मोठ्या श्रमानें गणपत रस्त्यावरून उठून उभा राहिला. त्याचें कानशील लाल–भडक झालें होतें. डोक्यावर एक टेंगूळ येऊन शिणका मारीत होत्या. उजवा पाय किंचित् लचकल्याचाही त्याला लवकरच शोध लागला. तथापि लवकर पाय उचलून त्यानें दुसरा रस्ता गांठला. शरिरावरील धूळ झाडून त्यानें पुन्हा मार्ग आक्रमिण्यास आरंभ केला. त्याच्या अजिबात नष्ट झालेल्या धीरापैकीं थोडाबहुत परत आणण्यास अर्धा अधिक तास त्याला फिरावें लागलें.

काय म्हणावें या नशिबाला ! तुरुंगांत जाण्यास गणपत एका पायावर तयार असतां कोणीही त्याला जाऊं देईना ! नाहींतर, खोटा पुरावा उभा करून निरपराध्यांसही तुरुंगाचा रस्ता दाखविण्यास पोलीस व लोक कधीं कधीं उत्सुक असतात ! तथापि, निराश न होतां गणपतनें आपला निश्चय कायम ठेविला. फिरतां फिरतां कांहीं वेळानें आणखी एक नामी संधी त्यास दिसली. आतां मात्र आपण फसणार नाहीं अशी त्याला खात्री वाटली.

एक गृहस्थ दाराशीं आपली छत्री ठेवून एका दुकानांत शिरत होता. गणपतनें बेधडक दुकानांत शिरून ती छत्री उचलली व परत फिरून तो सावकाश चालूं लागला.

" अहो माझी छत्री आहे ती ! " तो गृहस्थ रागानें म्हणाला.

" असें काय " गणपतनें उद्धटपणें जबाब दिला, " तुमची आहे छत्री ? चोरली मीं ? मग पोलीसला कां नाहीं बोलावीत ? "

" माफ करा अं—" गणपतीच्या धीटाईनें नरमून तो गृहस्थ अडखळत म्हणाला, " छत्री तुमची असेल तर खुशाल घेऊन जा. आजच सकाळीं माझी बदलून ही आली होती ! "

" माझीच आहे ही ! " गणपत संतापून उद्गारला.

छत्रीवाला गृहस्थ मुकाट्यानें मागें फिरला. विस्मयानें व रागानें गणपत वेडावून गेला. राजाला ज्याप्रमाणें कोणताही अपराध करण्याचा हक्क नाहीं त्याप्रमाणें गणपतचाही अपराध करून तुरुंगांत जाण्याचा स्वयंसिद्ध व नैसर्गिक हक्क नाहींसा झाला कीं काय ?

संतापाच्या भरांत त्यानें ती छत्री गटारांत फेंकून दिली, व सर्व मानवजातींचे पितर उद्धरिले. आतां मात्र निराशेचा अम्मल त्याच्या मनावर होऊं लागला. कसा तरी चालत, आडखळत, तो ठाकूर-द्वारापर्यंत आला. तेथें रामाचे मंदिरांत कीर्तन सुरू होतें. विद्युद्दीप लावून मंदिरांत बरीच शोभा आणिली होती. हरिदासांची वृत्ति रंगांत येऊन भगवद्भजन जोरानें चालू होतें. मंदिराकडे पाहून गणपतला आठवण झाली कीं, आपण पूर्वीं एकदां याच मंदिरांत प्रभूला साष्टांग नमस्कार घालून पुन्हा वाईट फंदांत न पडण्याची शपथ घेतली होती. त्याच्या यावेळच्या मनःस्थितीमध्यें या भगवद्भजनाचा विलक्षण परिणाम त्याच्यावर झाला. मंदिराबाहेर उभें राहून भजन ऐकत असतां त्याच्या मनांत पश्चात्ताप उत्पन्न झाला, व सद्विचार जागृत होऊं लागले. त्यानें आपल्या आयुष्याचा आढावा काढिला, परंतु त्यांत समाधान मानण्यासारखी एकही गोष्ट त्याला आढळली नाहीं. जन्मास येऊन आपण दुष्कृत्यांमध्यें गुरफटून पापाचे डोंगर स्वतःच्या शिरावर रचित आलों त्याची जाणीव येऊन त्याला अत्यंत खेद झाला. मंदिराच्या दाराशीं बसलेले दुबळे भिकारी हे सुद्धां आपल्यापेक्षां श्रेष्ठ, असें वाटून तो खजील झाला. त्याच्या डोळ्यांतून आश्रू वाहूं लागले. प्रभू रामचंद्राची मूर्ति त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली. तिच्या पायावर मनानेंच डोकें ठेवून त्यानें क्षमा भाकिली, व इतःपर सन्मार्गानेंच आयुष्य कंठण्याचा त्यानें संकल्प केला.

" कोणरे तो ? काय करितो तिथें ? " एका पोलीस शिपायानें गणपतच्या खांद्यावर हात ठेवून जोरानें विचारिलें. " अरे हा तर गणपत ! माझी ओळख विसरलास काय ? आज काय देवळांतल्या जोड्यांवर नजर आहे वाटतें ? चला, गणपतराव, चला. मॅजिस्ट्रेटसाहेब तुमची वाट पहात आहेत. "

दुसरे दिवशीं सकाळीं उपजीविकेचें दृश्य साधन नसल्याबद्दल मॅजिस्ट्रेटांनीं गणपत गेनबा यास सहा महिन्यांची शिक्षा फर्माविली.

---


# फोटो बक्षीस.

जे कोणी आपआपल्या गांवांतील ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर ही अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचनाः—**जिल्ह्याचे गांवचे निदान २५—३०, तालुक्याचे १५—२०, व पेटा वगैरेचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. डी. खानापुरे,** घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

# मंगळावर वस्ती आहे काय ?

इ. स. १८७७ सालीं शापरेली नांवाच्या इटालियन ज्योतिष्यानें प्रथम मंगळावर चमत्कारिक रेषा असल्याचा शोध लावला; व त्या रेषांना त्यानें कालवे अशी संज्ञा दिली. तेव्हांपासून "मंगळावर वस्ती आहे किंवा नाहीं" या वादास प्रारंभ झाला; आणि अद्याप हा वाद मिटला नाहीं. यानंतर कांहीं दिवसांनीं त्याच ज्योतिष्यानें हे कालवे-रेल्वेच्या रुळाप्रमाणें-दुहेरी आहेत असाही शोध लावला. या प्रकाराचा समाधानकारक उलगडा अद्याप कोणींच केला नाहीं. मंगळ व पृथ्वी हे दोनही सूर्याभोंवतीं दीर्घवर्तुलाकृति कक्षेंत फिरणारे ग्रह आहेत; यामुळें या दोन ग्रहांतील अंतर कित्येक वेळा अधीक व कित्येक वेळा अगदीं कमी असतें. अंतर अगदीं कमी असेल त्यावेळीं या ग्रहाची पाहणी करण्यास आपणास सोईचें पडतें. गेल्या महिन्यांत म्हणजे फे० ९ तारखेस पृथ्वी व मंगळ हे एकमेकांपासून बऱ्याच कमी म्हणजे ६ कोटी मैल अंतरावर आलेच होते. तेव्हां या ग्रहाचे सूक्ष्मपणें वेध घेऊन शापरेलीच्या मताची शहानिशा करण्याकरितां जगांतील प्रसिद्ध ज्योतिषी नुकतेच गुंतले होते हें साहजीक आहे.



प्रो. लोवेलः—मंगळावरील कालव्यांचे वेध घेणारा ज्योतिषी.

मंगळ पृथ्वीपासून साडेतीन कोटी मैलांपेक्षां जवळ येत नाहीं ही गोष्ट खरी असली तरी आमच्या ज्योतिष्यांना पृथ्वीच्या पृष्ठभागापेक्षां मंगळावरील पृष्ठभागाची माहिती कांहीं बाबतींत अधीक आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. आपण मंगळाकडे दुर्बिणींतून पाहतों त्याप्रमाणें मंगळावरून पृथ्वीकडे पाहिल्यास मनुष्यप्राणी दिसणें अर्थातच अशक्य आहे. पण मोठमोठीं शेतें व लागवडीखालीं आलेले विस्तीर्ण प्रदेश यांवरून पृथ्वीवरील मनुष्याचें आस्तित्व तर्कानें जाणतां येईल. त्याचप्रमाणें हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें, कित्येक ठिकाणचीं दाट जंगलें, दोनही ध्रुवांकडील बर्फाच्छादित प्रदेश, मोठमोठे विस्तीर्ण भूप्रदेश व महासागर आणि पृथ्वीसभोंवतीं असणारें मेघाचें आवरण वगैरे ईश्वरनिर्मित बड्या प्रकरणांची मात्र पुसट कल्पना मंगळावरून दुर्बिणींतून पाहणाऱ्यास होणें शक्य


आहे. पण येथील प्राणी व वनस्पति यांविषयीं प्रत्यक्ष किंवा सूक्ष्म माहिती या भौमस्थ प्रेक्षकाला कधींही मिळणार नाहीं.

या मानानें भूस्थ ( पृथ्वीवरल्या ) ज्योतिष्यांस अधीक अनुकूलता आहे. मंगळावर ढग नसल्यामुळें त्याचा पृष्ठभाग स्पष्टपणें दिसण्याची केव्हांही अडचण पडत नाहीं; कारण मंगळावरील वातावरण सदैव कोरडें व विरळ असतें. तेथें वातावरणांत केव्हांही बदल होत नाहीं; फक्त ऋतुमान बदलत असतें.

दुर्बिणीची युक्ति सांपडल्यानंतर थोड्याच वर्षांत मंगळावर बर्फ आहे या गोष्टीचा शोध लागला. मंगळावर प्रत्येक हिवाळ्यांत ध्रुवाभोंवतीं बर्फाचें आच्छादन तयार होतें आणि उन्हाळ्यांत तें वितळून नाहींसें होतें. भर हिवाळ्यांत या बर्फाच्छादित प्रदेशाचें क्षेत्रफळ तेहतीसशें मैल असतें.

या शिवाय मंगळावरील कांहीं प्रदेश निळसर-हिरवट रंगाचे दिसतात. हे प्रदेश म्हणजे महासागर व खंडें असतील असें कांहीं वर्षांपूर्वी ज्योतिष्यांना वाटत होतें. व त्यांना अमूक खंड, तमूक महासागर अशीं नांवें देखील ठरवून टाकण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं ! पण अलीकडे हा सर्व कल्पनेचा बाजार आहे असें सिद्ध झालें आहे.

शापरेलीनें मंगळावरील कालव्यांचा शोध लावल्यानंतर थोड्याच वर्षांनीं प्रोफेसर पर्सीव्हेल लोवेल यानें अमेरिकेंत फ्लागस्टाफ येथें एक वेधशाळा स्थापन केली. मंगळाचे वेध घेण्यास लागणारी सर्व प्रकारची उत्तमोत्तम यंत्रसामुग्री या वेधशाळेंत जमविण्यांत आली आहे. यंत्रसामुग्रीप्रमाणेंच या गृहस्थानें आपल्या वेधशाळेंत असें कांहीं बुद्धिमान् ज्योतिषशास्त्रज्ञमंडळ जमविलें आहे कीं, मंगळासंबंधीं बोलावयाचें म्हणजे त्या वेधशाळेंतील लोकांनींच बोलावें, येरगबाळाचें तें काम नव्हे असें ठरून गेलें आहे. अर्थात पुढें दिलेली भौमपृष्ठविषयक माहिती या वेधशाळेनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून घेतलेली आहे हें सांगावयास नकोच.



प्रो. लोवेलच्या वेधशाळेंतील दुर्बीण.

**हे सातशें कालवे कोणीं केले ?** शापरेलीनें भौमपृष्ठावर कालवे आहेत असा जो शोध लावला होता त्याची सशास्त्ररीतीनें मांडणी करण्याचें श्रेय प्रोफेसर लोवेल यासच दिलें पाहिजे. प्रत्येक कालव्याचें उगमस्थान, गमनमार्ग व अंतिमस्थान कोठें आहे हें दाखविणारा नकाशा या गृहस्थानें सतत वीस वर्षें अविश्रांत खटपट करून तयार केला आहे. त्यानें आतांपर्यंत **सातशें अठ्याऐंशी** कालव्यांचा शोध लावला आहे. मंगळावर कालवे आहेत एवढेंच शापरेली म्हणत असे; पण यापुढें जाऊन हे कालवे किंवा जलमार्ग ( मनुष्यासारख्या ) सज्ञान प्राण्यांनीं तयार केलेले म्हणजे कृत्रिम आहेत, निसर्गसिद्ध नाहींत हा सिद्धांत स्थापण्याचें श्रेय सर्वस्वीं प्रोफेसर लोवेल याजकडेच आहे. या शास्त्रज्ञानें आपल्या म्हणण्याच्या सिद्धीसाठीं अनेक पुरावे दिले आहेत व ते इतके सप्रमाण आहेत कीं विरुद्धपक्षास ते खोडण्यासाठीं फार श्रम पडत आहेत. तथापि कालव्यांच्या आस्तत्वाबद्दल आतां फारसा वाद राहिला

नाहीं; फक्त विचारशील प्राणी ( मनुष्यें ) तेथें आहेत किंवा नाहींत याबद्दल म्हणजे तर्कसिद्ध गोष्टीबद्दलच फक्त वाद राहिला आहे.

मंगळावर ध्रुवप्रदेशाखेरीज इतरत्र कोठेंही पाणी नाहीं यामुळें तेथील कालव्यांचा उद्देश व उपयोग पृथ्वीवरील कालव्यांप्रमाणेंच असावा असा तर्क करण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. मंगळ पृथ्वीपूर्वी हजारों वर्षें उत्पन्न झालेला आहे;* यामुळें तो म्हातारपणानें थकल्यासारखा दिसतो. त्याच्या बहुतेक भागावरील सुपीक जमीन नष्टप्राय होऊन निर्जल बनली आहे. महासागर, समुद्र आणि सरोवरें यांतील पाणी नाहींसें होऊन कोरडे खड्डे राहिले आहेत. वातावरणांतील नानाप्रकारचे वायु आटून पृथ्वीवर अतीउंच पर्वतांच्या शिखरावर ज्याप्रमाणें अगदीं विरळ हवा असते त्याप्रमाणें तेथील हवा बनली आहे. अद्याप जें थोडें पाणी तेथें शिल्लक आहे तें बर्फाच्या रूपानें ध्रुवप्रदेशाजवळ दृष्टीस पडतें.



मंगळावरील कालव्यांचा नकाशा.

अशा परिस्थितींत मंगळावरील प्रत्येक विचारक्षम प्राण्याचा प्रयत्न या दुर्मिळ पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याप्रीत्यर्थ चालला असला पाहिजे हें उघड आहे. ध्रुवप्रदेशावरील म्हणजे शीतकटिबंधावरील बर्फ उन्हाळ्यांत वितळलें म्हणजे वाहणारें पाणी समशीतोष्ण व उष्णकटिबंधांत कालव्यांच्या द्वारें नेण्याची व्यवस्था केल्यास मंगळावर मनुष्यप्राणी जगणें शक्य आहे असें प्रोफेसर लोवेल यांच्या लिहिण्याचें तात्पर्य आहे. अर्थात मंगळावरील कालवे हेंच तेथील जीवनाचें मुख्य साधन; कारण त्यांतून हजारों मैलपर्यंत पाणी वहात जाईल तेव्हां तें पेराऊ जमीनीस मिळणार व लोक जगणार.

हे मंगळावरील कालवे कोणीं तरी केलेले आहेत हें उघड आहे. कारण ते अत्यंत व्यवस्थित आहेत. भूमितीच्या उदाहरणांत लागणाऱ्या रेषेप्रमाणें अगदीं नियमित प्रमाणांत काढलेले कालवे ईश्वरनिर्मित असणें संभाव्य दिसत नाहीं, ते मनुष्यकृतच असले पाहिजेत. सर्व कालवे एका मध्यबिंदूपासून निघालेल्या चाकाच्या आऱ्यांप्रमाणें अगदीं रेखीव दिसतात. अर्थात या कालव्याद्वारें निर्जल प्रदेशांत पाणी पोंचविलें असावें. हे कालवे दीडपासून चार हजार मैल लांब आहेत. तथापि आपण साडेतीन कोटी मैलांवरून पहात असल्यामुळें आपणास या कालव्यांतील जलप्रवाह दिसणें शक्य नाहीं; तेव्हां पृथ्वीवरील ज्योतिषांना दिसते ती या कालव्यासभोंवतालची झाडी व हिरवीं पिकें असलीं पाहिजेत. कालव्याचा प्रवाह मधून मधून अदृश्य होतो व नंतर कांहीं दिवसांनीं तो पूर्ववत् दिसूं लागतो; याचें कारण हीं पिकें तयार झालीं म्हणजे त्यांची कापणी होत असेल; व पुनः नवीन पिकें येण्यास कांहीं महिने लागत असतील.

* यावरून वयमानानें मंगळाला 'भूमिपुत्र' ही संज्ञा देण्यास पाश्चात्य ज्योतिषी तयार नाहींत हें उघड आहे.

गेल्या महिन्यांत मंगळाचे वेध घेण्यास विशेष प्रकारची अनुकूलता होती याचा अर्थ असा. मंगळाच्या उत्तर गोलार्धांत सध्या उन्हाळा आहे. म्हणजे त्याचा उत्तरेकडील प्रदेश सूर्याकडे वळलेला आहे. यामुळें तो आम्हांस चांगल्या प्रकारें पहाण्यास सांपडण्याजोगा आहे. मंगळावर उन्हाळा चालू असतांना तो पृथ्वीजवळ आल्याचा योग बराच दुर्मिळ असतो.

मंगळावर कालवे नाहींत, तो नुसता दृष्टिभ्रम आहे असें प्रतिपादन करणारे कित्येक नामांकित ज्योतिषी आहेत हेंही येथें नमूद केलें पाहिजे. पण असे कित्येक ' नास्तिक ' वादी लोवेलच्या वेधशाळेंत राहिले म्हणजे " कालव्यांच्या अस्तित्वाबद्दल आमची खात्री झाली " अशी कबूली देऊन परत आले आहेत. १९०७ सालापासून लोवेलच्या धर्तीवर आणखी कित्येक ठिकाणीं मंगळाचे वेध घेण्याची व्यवस्था केली आहे. व त्या सर्व वेदशाळेंतील ज्योतिष्यांनीं मंगळावर कालवे आहेत असें ठरविलें आहे.

मंगळावर वस्ती आहे असें कबूल केल्यानंतर तेथील लोक कशाप्रकारचे असतील हा प्रश्न उद्भवतो. ते अति उंच असावेत असा तर्क एका फ्रेंच विद्वानानें प्रसिद्ध केला होता. परंतु लोवेल म्हणतो " या बाबतींत निश्चयात्मक सिद्धांत सांगणें शक्य नाहीं. पण तर्कानें आपणास इतकें म्हणतां येईल. ग्रह मोठा असेल त्या मानानें आपणास शरीराची हालचाल करण्यास अडचण पडेल. आपण गुरुमंडळावर गेलों तर आमच्या शरीराची हालचाल करण्यासच आम्हाला कित्येक हत्तीइतकी शक्ति पाहिजे. कारण गुरूची आकर्षणशक्ति पृथ्वीपेक्षां फार मोठी आहे. मंगळाची घनता पृथ्वीच्या नवमांश आहे. यामुळें आपण भौमलोकावर गेलों तर आपलें वजन फार थोडें भरेल. आपल्या हमालाला मंगळावर हत्ती देखील उचलतां येईल. क्रिकेटपटूला एक मैलपर्यंत चेंडू टोलवितां येईल. खुद्द भौमलोकीं जन्म पावलेल्या मनुष्यांबद्दल तर्कच सांगावयाचा असेल तर तो आमच्या तिप्पट उंच व सत्तावीस पट शक्तिवान असला पाहिजे. मंगळावरील हवा अत्यंत विरळ असल्यामुळें श्वासोच्छ्वास चालण्यास प्राण्याची छाती पुष्कळ मोठी पाहिजे. मात्र असले अगडबंब अवयव असलेला व इतक्या प्रचंड शक्तीचा मनुष्य तेथील कालवे खणण्यास फार योग्य ठरेल. "

---


# स्वयंपुरोहित

## [ नवीन सुधारलेली मंत्रार्थासह चवथी आवृत्ति ]

हें पुस्तक जवळ असलें म्हणजे देवपूजा, संध्या, मुंज, लग्न, व्रतें, श्रावणी, दशक्रिया वगैरे सर्व धर्मविधि स्वतः करतां येतात व पंचांगही समजतें. भटाची गरज पडत नाहीं. किं० तूर्त ८६.

**मोतीराव वानखडे, करजगांव ( वऱ्हाड. )**

# ताळा पाहण्याचे सोपे प्रकार.

नवांनीं ताळा पाहण्याची रीति बहुतेक अंकगणितांतून दिलेली असते; त्यापेक्षां सोपी अशी दुसरी एक रीति येथें दिली आहे. मूळसंख्या व उत्तराची संख्या यांतील अंकांची बेरीज घ्यावी, ती बेरीज दोन अंकी असल्यास पुनः अंकांची बेरीज करावी म्हणजे एक आंकडा येईल; त्यावरून ताळा पहातां येतो.

**१ बेरीज—**

९७४२६५ = ३३ = ६
+८४३३७ = २५ = +७
१३ = ४
१०५८६०२ = २२ = ४

पहिल्या संख्येतील आंकड्यांची बेरीज ३३ आली. ही दोन अंकी आहे. म्हणून पुनः आकड्यांची बेरीज घेतली असतां ( ३ + ३= ) ६ ही एक अंकी बेरीज आली. त्याचप्रमाणें दुसऱ्या संख्येतील अंकांची बेरीज २५ म्हणजे ( २ + ५=) ७ आली. ∴ ६+७=१३ म्हणजे ( १ + ३=) ४. बेरजेंतील अंकांची बेरीज देखील २२ म्हणजे ( २ + २ = ) ४ आली म्हणून ताळा जमला. अर्थात बेरीज बरोबर आहे.

**२ वजाबाकी—**

९७४२६५ = ३३
−८४३३७ = २५
८ = ८
८८९९२८ = ४४ = ८

येथें ३३ च्या अंकांतील बेरीज ( ३ + ३= ) ६ ही २५ च्या अंकांतील बेरीज ( २ + ५ = ) ७ पेक्षां कमी आहे. यामुळें वजाबाकीस अडचण पडते; यासाठीं दोन वेळा बेरीज घेतली नाहीं. पण तशी घेतली तर वरच्या बेरजेमागें एक दशक हातचा घेऊन नंतर वजा द्यावा; जसें—

३३ = ६ = १६ ( एक दशक घेऊन )
२५ = ७ ७
९
−१ दशकाबद्दल एक वजा.
८

मूळ वजाबाकीमधील आंकड्यांची बेरीज देखील दोन वेळां संस्कार केल्यानें आठच आली आहे. तेव्हां ताळा जमला.

**३ गुणाकार—**

९७४२६५ = ३३ = ६
×८४३३७ = २५ = ७
४२ = ६
८२१६६५८७३०५ = ५१ = ६

येथें गुण्य व गुणक यांना दोन संस्कार करून आलेल्या आंकड्यांचा ( ६ × ७=) ४२ आहे. त्यांतील आंकड्यांची बेरीज ( ४ + २ = ) ६ आहे. ती गुणाकारांतील आंकड्यांच्या ( ५१ ) बेरजेशीं जमते.

**४ भागाकार—**

३७५ = १५ = ६ भाज्य.
÷ २५ = ७ = ७ भाजक.
= १५ = ६ = ६ भागाकार.

भागाकार × भाजक = भाज्य
∴ ६ × ७ = ४२ = ६ = भाज्य.

# नुसतें अनुकरण.

( लेखक—महादेव विष्णु खरे, खेड. )

आपले मनांत नसलें तरी थोर सत्पुरुष जें सांगत आले त्याचें अनुकरण केलें असतां कसा फायदा होतो हें खालील गोष्टीवरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

एके गांवांत एक ब्राम्हण राहत असतां अत्यंत दरिद्री होता. तो असें म्हणत असे कीं, साधु म्हणतात निरिच्छ असावें परंतु माझे घरांत अठरा विसवें दारिद्र्य, धड अन्न मिळण्याची मारामार असें असतां माझे मनांत संतोष असणार कसा ? दैववशात् एके दिवशीं एक वैरागी त्याचे घरीं भिक्षेस आला. त्यानें त्यास निरिच्छ असलास तर संपत्ति मिळेल म्हणून सांगितलें. ब्राम्हणास मोठें आश्चर्य वाटलें. परंतु त्या वैराग्याचे बोलण्याचा त्याचे मनावर बराच परिणाम झाला. अखेरीस बायकोस माहेरीं पाठवून थोडे दिवस निरिच्छपणाचा अनुभव घेण्याचा त्यानें निश्चय केला, व त्यानें तो अमलांतही आणला. घरची व्यवस्था लागल्यावर तो ब्राम्हण एके दिवशीं दूर देशाप्रत जाऊन एका अरण्यांत पर्णकुटिका बांधून राहिला. कंदमुळावर उपजीविका करून ईश्वरभक्ति करावी असा त्यानें बेत केला. बरेच दिवस लोटल्यावर त्या अरण्यांत गुराखी गुरें चरविण्याकरितां आले. त्यांनीं या ब्राम्हणास पाहून हे कोणी मोठे बुवा आहेत असा त्यांचा समज झाला. म्हणून त्यांनीं या बुवांस आपणांस कांहीं पाहिजे असल्यास सांगावें म्हणून नम्रपणें विनंती केली. बुवांनीं आपणास कांहीं नको म्हणून सांगितलें. यामुळें बुवावर गुराख्यांची बरीच श्रद्धा बसली. अखेरीस तेथें गाईचें दूध काढून गुराख्यांनीं बुवाचे पुढें आणलें व तें पिण्याबद्दल त्यांस अत्यंत आग्रह केला. बुवांना तर निरिच्छ झाल्यापासून काय मिळतें हेंच पाहावयाचें होतें म्हणून त्यांनीं दूध पिण्याचें साफ नाकारिलें. निरुपायास्तव तें दूध परत घेऊन गुराखी तेथून संध्याकाळीं घरीं परत आले. त्यांनीं गांवांत जातांच गांवकरी लोकांस बुवांबद्दल हकिगत सांगितली. हा प्रकार काय आहे म्हणून पाहण्याकरितां लोकांच्या झुंडीच्याझुंडी बुवाकडे जाऊं लागल्या. कोणी पैसे, कोणी फळफळावळ वगैरे आणून बुवापुढें ठेवूं लागले. परंतु त्यांतील कांहीं एक बुवा घेईनात. यापेक्षांही निरिच्छ होऊन काय प्राप्त होतें हें पहाण्याची त्यांची उत्कंठा वाढली. बुवांची कीर्ति सर्वत्र झपाट्यानें पसरूं लागली. अखेरीस त्या देशांतील प्रधानासही ही गोष्ट कळली. बुवांचे लौकिकास भुलून प्रधान एके दिवशीं हत्ती घोडे बरोबर घेऊन भेटीकरितां आला. त्यानें बुवास आपले राजधानींत येऊन राहण्यास आग्रह केला परंतु बुवा ऐकेनात. शेवटीं नाइलाजास्तव तो आपले नगराप्रत निघून गेला. ताबडतोब राजासही बुवांबद्दलची साद्यंत हकीगत प्रधानानें सांगितली. त्यामुळें राजाचेही मनांत श्रद्धा उत्पन्न होऊन तोही एके दिवशीं बुवांचे भेटीस मोठ्या लव्याजम्यानिशीं आला. इकडे बुवाचे मनांत विचार आला कीं, प्रथम निरिच्छ बनलों तेव्हां गुराख्यांनीं दूध आणून दिलें. दुसऱ्या खेपेस लोक भजनीं लागले. तिसऱ्या खेपेस प्रधान हत्ती घोडे बरोबर घेऊन आला. आतां प्रत्यक्ष राजेसाहेबही आले. यापुढें काय काय होतें तें पहावें असा निश्चय करून बुवा स्वस्थ बसले. राजानें प्रधानाप्रमाणें आपले नगरांत येऊन राहण्याविषयीं आग्रह केला व मोत्यांचे हार, हिरे, पाच वगैरे अमोलिक द्रव्य बुवांपुढें ठेविलें. बुवांनीं तें आपला प्रसाद म्हणून राजास परत दिलें. यामुळें राजाची बुवावरील निष्ठा फारच वाढली. अखेरीस राजानें बुवा नको म्हणत असतां त्यांस तेथें एक सुंदर पर्णकुटिका व लहानसें उद्यान तयार करून देऊन कांहीं दिवस बुवांचे सान्निध्यांत राहून तोही निघून गेला. बुवांनीं दिवसें-

# ताळा पाहण्याचे सोपे प्रकार.

नवांनीं ताळा पाहण्याची रीति बहुतेक अंकगणितांतून दिलेली असते; त्यापेक्षां सोपी अशी दुसरी एक रीति येथें दिली आहे. मूळसंख्या व उत्तराची संख्या यांतील अंकांची बेरीज घ्यावी, ती बेरीज दोन अंकी असल्यास पुनः अंकांची बेरीज करावी म्हणजे एक आंकडा येईल; त्यावरून ताळा पहातां येतो.

**१ बेरीज—**

```
  ९७४२६५ = ३३ =    ६
 +८४३३७ = २५ = + ७
                 १३ = ४
१०५८६०२ = २२       = ४
```

पहिल्या संख्येंतील आंकड्यांची बेरीज ३३ आली. ही दोन अंकी आहे. म्हणून पुनः आंकड्यांची बेरीज घेतली असतां ( ३ + ३= ) ६ ही एक अंकी बेरीज आली. त्याचप्रमाणें दुसऱ्या संख्येंतील अंकांची बेरीज २५ म्हणजे ( २ + ५=) ७ आली. ∴ ६+७=१३ म्हणजे ( १ + ३=) ४. बेरजेंतील अंकांची बेरीज देखील २२ म्हणजे ( २ + २ = ) ४ आली म्हणून ताळा जमला. अर्थात बेरीज बरोबर आहे.

**२ वजाबाकी—**

```
 ९७४२६५ = ३३
 −८४३३७ = २५
           ८ = ८
 ८८९९२८ = ४४ = ८
```

येथें ३३ च्या अंकांतील बेरीज ( ३ + ३= ) ६ ही २५ च्या अंकांतील बेरीज ( २ + ५ = ) ७ पेक्षां कमी आहे. यामुळें वजाबाकीस अडचण पडते; यासाठीं दोन वेळा बेरीज घेतली नाहीं. पण तशी घेतली तर वरच्या बेरजेमागें एक दशक हातचा घेऊन नंतर वजा द्यावा; जसें—

```
३३ = ६ = १६ ( एक दशक घेऊन )
२५ = ७    ७
          ९
         −१ दशकाबद्दल एक वजा.
          ८
```

मूळ वजाबाकीमधील आंकड्यांची बेरीज देखील दोन वेळां संस्कार केल्यानें आठच आली आहे. तेव्हां ताळा जमला.

**३ गुणाकार—**

```
 ९७४२६५ = ३३ = ६
×८४३३७ = २५ = ७
             ४२ = ६
८२१६६५८७३०५ = ५१ = ६
```

येथें गुण्य व गुणक यांना दोन संस्कार करून आलेल्या आंकड्यांचा ( ६ × ७=) ४२ आहे. त्यांतील आंकड्यांची बेरीज ( ४ + २ = ) ६ आहे. ती गुणाकारांतील आंकड्यांच्या ( ५१ ) बेरजेशीं जमते.

**४ भागाकार—**

```
  ३७५ = १५ = ६ भाज्य.
÷  २५ =  ७ = ७ भाजक.
=  १५ =  ६ = ६ भागाकार.
```

भागाकार × भाजक = भाज्य

∴ ६ × ७ = ४२ = ६ = भाज्य.

# नुसतें अनुकरण.

( लेखक--महादेव विष्णु खरे, खेड. )

आपले मनांत नसलें तरी थोर सत्पुरुष जें सांगत आले त्याचें अनुकरण केलें असतां कसा फायदा होतो हें खालील गोष्टीवरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

एके गांवांत एक ब्राम्हण राहत असतां अत्यंत दरिद्री होता. तो असें म्हणत असे कीं, साधु म्हणतात निरिच्छ असावें परंतु माझे घरांत अठरा विसवें दारिद्र्य, धड अन्न मिळण्याची मारामार असें असतां माझे मनांत संतोष असणार कसा ? दैववशात् एके दिवशीं एक बैरागी त्याचे घरीं भिक्षेस आला. त्यानें त्यास निरिच्छ असलास तर संपत्ति मिळेल म्हणून सांगितलें. ब्राम्हणास मोठें आश्चर्य वाटलें. परंतु त्या बैराग्याचे बोलण्याचा त्याचे मनावर बराच परिणाम झाला. अखेरीस बायकोस माहेरीं पाठवून थोडे दिवस निरिच्छपणाचा अनुभव घेण्याचा त्यानें निश्चय केला, व त्यानें तो अमलांतही आणला. घरची व्यवस्था लागल्यावर तो ब्राम्हण एके दिवशीं दूर देशाप्रत जाऊन एका अरण्यांत पर्णकुटिका बांधून राहिला. कंदमुळावर उपजीविका करून ईश्वरभक्ति करावी असा त्यानें बेत केला. बरेच दिवस लोटल्यावर त्या अरण्यांत गुराखी गुरें चरविण्याकरितां आले. त्यांनीं या ब्राम्हणास पाहून हे कोणी मोठे बुवा आहेत असा त्यांचा समज झाला. म्हणून त्यांनीं या बुवांस आपणांस कांहीं पाहिजे असल्यास सांगावें म्हणून नम्रपणें विनंती केली. बुवानीं आपणास कांहीं नको म्हणून सांगितलें. यामुळें बुवावर गुराख्यांची बरीच श्रद्धा बसली. अखेरीस तेथें गाईचें दूध काढून गुराख्यांनीं बुवाचे पुढें आणलें व तें पिण्याबद्दल त्यांस अत्यंत आग्रह केला. बुवांना तर निरिच्छ झाल्यापासून काय मिळतें हेंच पाहावयाचें होतें म्हणून त्यांनीं दूध पिण्याचें साफ नाकारिलें. निरुपायास्तव तें दूध परत घेऊन गुराखी तेथून संध्याकाळीं घरीं परत आले. त्यांनीं गांवांत जातांच गांवकरी लोकांस बुवांबद्दल हकिगत सांगितली. हा प्रकार काय आहे म्हणून पाहण्याकरितां लोकांच्या झुंडीच्याझुंडी बुवाकडे जाऊं लागल्या. कोणी पैसे, कोणी फळफळावळ वगैरे आणून बुवापुढें ठेवूं लागले. परंतु त्यांतील कांहीं एक बुवा घेईनात. यापेक्षांही निरिच्छ होऊन काय प्राप्त होतें हें पहाण्याची त्यांची उत्कंठा वाढली. बुवांची कीर्ति सर्वत्र झपाट्यानें पसरूं लागली. अखेरीस त्या देशांतील प्रधानासही ही गोष्ट कळली. बुवांचे लौकिकास भुलून प्रधान एके दिवशीं हत्ती घोडे बरोबर घेऊन भेटीकरितां आला. त्यानें बुवास आपले राजधानींत येऊन राहण्यास आग्रह केला परंतु बुवा ऐकेनात. शेवटीं नाइलाजास्तव तो आपले नगराप्रत निघून गेला. ताबडतोब राजासही बुवांबद्दलची साद्यंत हकीगत प्रधानानें सांगितली. त्यामुळें राजाचेही मनांत श्रद्धा उत्पन्न होऊन तोही एके दिवशीं बुवांचे भेटीस मोठ्या लव्याजम्यानिशीं आला. इकडे बुवाचे मनांत विचार आला कीं, प्रथम निरिच्छ बनलों तेव्हां गुराख्यांनीं दूध आणून दिलें. दुसऱ्या खेपेस लोक भजनीं लागले. तिसऱ्या खेपेस प्रधान हत्ती घोडे बरोबर घेऊन आला. आतां प्रत्यक्ष राजेसाहेबही आले. यापुढें काय काय होतें तें पहावें असा निश्चय करून बुवा स्वस्थ बसले. राजानें प्रधानाप्रमाणें आपले नगरांत येऊन राहण्याविषयीं आग्रह केला व मोत्यांचे हार, हिरे, पाच वगैरे अमोलिक द्रव्य बुवांपुढें ठेविलें. बुवांनीं तें आपला प्रसाद म्हणून राजास परत दिलें. यामुळें राजाची बुवावरील निष्ठा फारच वाढली. अखेरीस राजानें बुवा नको म्हणत असतां त्यांस तेथें एक सुंदर पर्णकुटिका व ऊहानसें उद्यान तयार करून देऊन कांहीं दिवस बुवांचे सान्निध्यांत राहून तोही निघून गेला. बुवांनीं दिवसें-

दिवस नामस्मरणाचा सपाटा चालविला. याचा परिणाम असा झाला कीं, नकळतच बुवाची पुण्याई अतिशय वाढली. एके दिवशीं मध्यरात्रीं खरोखरच भगवान श्रीकृष्ण त्यांचे पुढें येऊन उभे राहिले व वत्सा "वरंब्रुहि" म्हणून बुवास आज्ञा केली. हें ऐकिल्याबरोबर बुवांनीं भगवंताचे चरणास मिठी मारली. परंतु यावेळींही त्यांचे मनांत असें आलें कीं, आपण देवाजवळ कांहीं मागूं नये.

म्हणसि मागचि जी कमलावरा ।
त्वरित दे तरी या अ-मला वरा ॥
किमपि ही उपजेत न कामना ।
करिं असें विधिच्या जनका मना ॥ १ ॥

असाच वर मागितला. बुवांची अशा प्रकारची निष्ठा पाहून भगवंतानीं लागलाच त्यास ब्रम्हज्ञानाचा उपदेश केला व अखेरीस बुवा साहाजिकच मुक्त झाले.



**अखेरीस तेथें गाईचें दूध काढून गुराख्यांनीं बुवांचे पुढें आणलें व तें पिण्याबद्दल त्यास अत्यंत आग्रह केला.**

कारण आपणांस प्राप्त झालेली सद्यस्थिती निरिच्छपणामुळेंच आहे. पुन्हां भगवंतानीं " वरं ब्रुहि " म्हणून बुवांस सांगितलें. यावर बुवा म्हणाले "भगवंता, मला दुर्लभ असें तुझें दर्शन आज झालें. या पक्षां मला तुजजवळ कांहीं मागावयाचें नाहीं." भगवंतानीं पुन्हां-पुन्हां वर माग म्हणून बुवास आग्रह केला. परंतु बुवांनीं प्रल्हादाप्रमाणें

**सारांशः**—सत्पुरुषांच्या आचरणाचें अनुकरण करण्याचा आपण सतत प्रयत्न केला म्हणजे आपले अंगीं तसें करण्याची संवय जडते, व संवय जडली म्हणजे त्या अनुकरणाचे सुपरिणाम आपणांस उपभोगावयास मिळतात. आणि अखेर खरोखरच आपली उन्नती होते.

# गप्पागोष्टी.

एका बाईच्या घराजवळ एक उंच झाड होतें; त्यावर एका कावळ्यानें आपलें घरटें केलें होतें. त्या बाईचा नवरा देशांतराला गेला होता; व घरांत दुसरेही कोणी मनुष्य बोलाचालायला नसल्यामुळें, ती त्या कावळ्याजवळ तासच्या तास गोष्टी सांगत बसे. ती बाई आपल्याशीं गप्पा मारते यावरूनच आपण इतर सर्व पक्षांपेक्षां कांहीं अधिक शहाणे आहों, अगर मोठे श्रेष्ठ आहों असें त्या कावळ्यास वाटे.

एकदां ती बाई त्यास म्हणाली कीं, माझा नवरा सुखरूप परत आला म्हणजे मी तुला सोन्याची टोपी करून देईन. मग तूं कसा मोरापेक्षां सुद्धां अधिक सुंदर दिसशील कावळेबुवास खूपच आनंद झाला. तो अगदीं एकसारखा झाडाच्या शेंड्यावर बसून चारी दिशांला त्या बाईचा नवरा येतो आहे काय, हें पहात असे.

एके दिवशीं त्या बाईचा नवरा आला; व तिनें कबूल केल्याप्रमाणें त्या कावळ्यास एक सोन्याची टोपी करून दिली. मग त्याचा आनंद आणि डौल काय विचारावा ? रात्रंदिवस तो ती टोपी डोक्याला अगदीं ठासून ठेवी. उन्हांत बसला असतां अगर उडत असतां त्याची टोपी चमकूं लागली म्हणजे तर त्याला आपल्यासारखे धन्य आपणच असें वाटे !

सहजच, थोड्याच दिवसांत जवळपासच्या सर्व लोकांस त्या कावळ्याच्या डोक्याला सोन्याची टोपी आहे ही गोष्ट कळून चुकली. मग एकदां तो मोठ्या डौलानें झाडाच्या शेंड्यावर उन्हांत उंच मान करून बसला असतां एका व्याधानें एकाच बाणांत त्याचा सर्व डौल उतरविला !

* * *

सर्व चतुष्पाद जनावरांची एकदां एक मोठी ‘ स्नेहवर्धक सभा ’ भरली होती; त्या वेळीं प्रत्येकानें विशेष गुण काय आहे तो सांगावा असें ठरलें. तेव्हां कुत्र्यानें मोठ्या वक्तृत्वपूर्ण भाषणानें आपला ‘ इमानीपणा ’ हा गुण सभेपुढें मांडला. बकऱ्यानें थोड्याच शब्दांत व अगदीं हलक्या आवाजांत आपल्यांतील विशेष गुण म्हणजे ‘ निरुपद्रवीपणा ’ एवढाच असल्याचें सांगितलें. नंतर गर्दभराजांनीं आपल्या खड्या आवाजांत मोठमोठ्या लोकांच्या भाषणांतील उतारे देऊन, आपल्या ‘ कष्टाळूपणा ’ बद्दल सर्वांची खात्री केली. या प्रमाणें प्रत्येकानें आपल्यांतील कांहींना कांहीं विशेष गुण सांगतां सांगतां लांडग्याची पाळी आली. तेव्हां तो ठासून, जोरदार आवाजांत म्हणतो—‘ लहान सहान जनावरांची एका सपाट्यासरशी चटणी करणें, हाच माझ्यांतील विशेष गुण आहे. असें करणें हा माझा महज मनोधर्म आहे. व ईश्वरानें मला दिलेली शक्ति व स्वभावधर्म याला अनुसरून असलेलें हें काम करणें हें मी माझें कर्तव्यकर्म व माझा अधिकारच समजतों. ’

हें भाषण ऐकून शेळ्या, मेंढ्या, हरणें, वगैरे प्राणी थरथर कापूं लागले. तें पाहून हत्ती गंभीरपणें उठून म्हणतो—‘ आतांच्या या भाषणानें स्नेहसंवर्धिनी सभेच्या मूळ हेतूवरच घाला घातल्यासारखें झालें आहे. वक्त्यांच्याच विचारसरणीनें विचार केला तर त्यांच्यासारख्या क्रूर व राक्षसी वृत्तीच्या प्राण्याला मीही माझ्या जन्मस्वभावाप्रमाणें व माझ्या अधिकारांतील शासन दिल्यास मीही दोषाला पात्र होणार नाहीं. ’ असें म्हणून नागराजानीं लगेंच आपल्या प्रचंड शुंडेनें लांडगोबास उंच उचलून दाणकन् खालीं आपटलें !

* * *

एकदां सर्व पक्षांनीं आपली एक जंगी सभा बोलावून आपला राजा कोण असावा याबद्दल जोरानें खल चालविला. कोणी म्हणे जो सर्वांत सुंदर पक्षी असेल तो राजा असावा; कोणी म्हणे सौंदर्य काय करावयाचें

दिवस नामस्मरणाचा सपाटा चालविला. याचा परिणाम असा झाला कीं, नकळतच बुवाची पुण्याई अतिशय वाढली. एके दिवशीं मध्यरात्रीं खरोखरच भगवान श्रीकृष्ण त्यांचे पुढें येऊन उभे राहिले व वत्सा "वरंब्रूहि" म्हणून बुवास आज्ञा केली. हें ऐकिल्याबरोबर बुवांनीं भगवंताचे चरणास मिठी मारली. परंतु यावेळींही त्यांचे मनांत असें आलें कीं, आपण देवाजवळ कांहीं मागूं नये.

म्हणसि मागाचे जी कमलावरा ।
त्वरित दे तरी या अ-मला वरा ॥
किमपि ही उपजेत न कामना ।
करिं असें विधिच्या जनका मना ॥ १ ॥

असाच वर मागितला. बुवांची अशा प्रकारची निष्ठा पाहून भगवंतानीं लागलाच त्यास ब्रम्हज्ञानाचा उपदेश केला व अखेरीस बुवा साहाजिकच मुक्त झाले.



अखेरीस तेथें गाईचें दूध काढून गुराख्यांनीं बुवांचे पुढें आणलें व तें पिण्याबद्दल त्यास अत्यंत आग्रह केला.

कारण आपणांस प्राप्त झालेली सद्यस्थिती निरिच्छपणामुळेंच आहे. पुन्हां भगवंतानीं "वरं ब्रूहि" म्हणून बुवांस सांगितलें. यावर बुवा म्हणाले "भगवंता, मला दुर्लभ असें तुझें दर्शन आज झालें. या पक्षां मला तुजजवळ कांहीं मागावयाचें नाहीं." भगवंतानीं पुन्हां-पुन्हां वर माग म्हणून बुवास आग्रह केला. परंतु बुवांनीं प्रल्हादाप्रमाणें

**सारांशः**—सत्पुरुषांच्या आचरणाचें अनुकरण करण्याचा आपण सतत प्रयत्न केला म्हणजे आपले अंगीं तसें करण्याची संवय जडते, व संवय जडली म्हणजे त्या अनुकरणाचे सुपरिणाम आपणांस उपभोगावयास मिळतात. आणि अखेर खरोखरच आपली उन्नती होते.

# गप्पागोष्टी.

एका बाईच्या घराजवळ एक उंच झाड होतें; त्यावर एका कावळ्यानें आपलें घरटें केलें होतें. त्या बाईचा नवरा देशांतराला गेला होता; व घरात दुसरेही कोणी मनुष्य बोलाचालायला नसल्यामुळें,ती त्या कावळ्याजवळ तासच्या तास गोष्टी सांगत बसे. ती बाई आपल्याशीं गप्पा मारते यावरूनच आपण इतर सर्व पक्षांपेक्षां कांहीं अधिक शहाणे आहों, अगर मोठे श्रेष्ठ आहों असें त्या कावळ्यास वाटे.

एकदां ती बाई त्यास म्हणाली कीं, माझा नवरा सुखरूप परत आला म्हणजे मी तुला सोन्याची टोपी करून देईन. मग तूं कसा मोरापेक्षां सुद्धां अधिक सुंदर दिसशील कावळेबुवास खूपच आनंद झाला. तो अगदीं एकसारखा झाडाच्या शेंड्यावर बसून चारी दिशांला त्या बाईचा नवरा येतो आहे काय, हें पहात असे.

एके दिवशीं त्या बाईचा नवरा आला; व तिनें कबूल केल्याप्रमाणें त्या कावळ्यास एक सोन्याची टोपी करून दिली. मग त्याचा आनंद आणि डौल काय विचारावा ? रात्रंदिवस तो ती टोपी डोक्याला अगदीं ठासून ठेवी. उन्हांत बसला असतां अगर उडत असतां त्याची टोपी चमकूं लागली म्हणजे तर त्याला आपल्यासारखे धन्य आपणच असें वाटे !

सहजच, थोड्याच दिवसांत जवळपासच्या सर्व लोकांस त्या कावळ्याच्या डोक्याला सोन्याची टोपी आहे ही गोष्ट कळून चुकली. मग एकदां तो मोठ्या डौलानें झाडाच्या शेंड्यावर उन्हांत उंच मान करून बसला असतां एका व्याधानें एकाच बाणांत त्याचा सर्व डौल उतरविला !

* * *

सर्व चतुष्पाद जनावरांची एकदां एक मोठी ‘ स्नेहवर्धक सभा ’ भरली होती; त्या वेळीं प्रत्येकानें विशेष गुण काय आहे तो सांगावा असें ठरलें. तेव्हां कुत्र्यानें मोठ्या वक्तृत्वपूर्ण भाषणानें आपला ‘ इमानीपणा ’ हा गुण सभेपुढें मांडला. बकऱ्यानें थोड्याच शब्दांत व अगदीं हलक्या आवाजांत आपल्यांतील विशेष गुण म्हणजे ‘ निरुपद्रवीपणा ’ एवढाच असल्याचें सांगितलें. नंतर गर्दभराजांनीं आपल्या खड्या आवाजांत मोठमोठ्या लोकांच्या भाषणांतील उतारे देऊन, आपल्या ‘ कष्टाळूपणा ’ बद्दल सर्वांची खात्री केली. या प्रमाणें प्रत्येकानें आपल्यांतील कांहींना कांहीं विशेष गुण सांगतां सांगतां लांडग्याची पाळी आली. तेव्हां तो ठासून, जोरदार आवाजांत म्हणतो—‘ लहान सहान जनावरांची एका सपाट्यासरशी चटणी करणें, हाच माझ्यांतील विशेष गुण आहे. असें करणें हा माझा महज मनोधर्म आहे. व ईश्वरानें मला दिलेली शक्ति व स्वभावधर्म याला अनुसरून असलेलें हें काम करणें हें मी माझें कर्तव्यकर्म व माझा अधिकारच समजतों. ’

हें भाषण ऐकून शेळ्या, मेंढ्या, हरणें, वगैरे प्राणी थरथर कापूं लागले. तें पाहून हत्ती गंभीरपणें उठून म्हणतो—‘ आतांच्या या भाषणानें स्नेहसंवर्धिनी सभेच्या मूल हेतूवरच घाला घातल्यासारखें झालें आहे. वक्त्यांच्याच विचारसरणीनें विचार केला तर त्यांच्यासारख्या क्रूर व राक्षशी वृत्तीच्या प्राण्याला मी-ही माझ्या जन्मस्वभावाप्रमाणें व माझ्या अधिकारांतील शासन दिल्यास मीही दोषाला पात्र होणार नाहीं. ’ असें म्हणून नागराजानीं लगेंच आपल्या प्रचंड शुंडेनें लांडगोबास उंच उचलून दाणकन् खालीं आपटलें !

* * *

एकदां सर्व पक्षांनीं आपली एक जंगी सभा बोलावून आपला राजा कोण असावा याबद्दल जोरानें खल चालविला. कोणी म्हणे जो सर्वांत सुंदर पक्षी असेल तो राजा असावा; कोणी म्हणे सौंदर्य काय करावयाचें

आहे ? जो सर्वांत प्रचंड असेल तो राजा असावा; तर इतर कांहींजणांचें म्हणणें पडलें कीं, ' दिखने मे ढब्बू' राजा काय करावयाचा ? राजा सर्वांत चपळ असेल तो असावा.

याप्रमाणें वाद चालतां चालतां असें ठरलें कीं, जो सर्वांहून अधिक उंच उडेल त्याला राज्यपद द्यावें. मग ज्यांना ज्यांना म्हणून आपल्याला उंच उडतां येईल असें वाटलें त्या सर्वांनीं आपली शिकस्त करून दाखविली. शेवटीं घार आली. तिनें येतांक्षणीं जी एक भरारी मारली, ती जशी कांहीं अगदीं आकाशाला जाऊन टेंकली. त्याबरोबर सर्व पक्षी ' घार आमची राणी, घार आमची राणी ' म्हणून ओरडले. मोठ्या डौलानें फेरे घेत घेत घार मग खालीं उतरली, तेव्हां सर्व पक्षांनीं तिचा मोठा गौरव केला. पण ती खालीं बसतांक्षणींच तिच्या पाठीवरून एक लहानशी चिमणी पुटकन खालीं उतरली, व म्हणते--' मी घारीहून उंच होतें, तेव्हां राणी मीच. चिमणी घारीपेक्षां वर होती ही गोष्ट कोणालाही नाकबूल करितां येईना. पण चिमणीसारख्या हलकट पक्ष्यास आपली राणी समजावें ही गोष्ट कोणालाही रुचेना. शेवटीं सर्व पक्षी त्यांच्यांतला एकांतवासांत बसून विचार करणारा तत्त्ववेत्ता जो घुबड त्याच्याकडे गेले. त्यानें सर्व गोष्टी शांतपणें ऐकून घेतल्या, आणि मग तो चिमणीस म्हणतो-- ' तुमचें असें ठरलें होतें कीं, जो सर्वांत उंच उडेल त्याला राज्यपद द्यावयाचें; तूं घारीपेक्षां उंच होतीस हें खरें; पण तूं उडाली नाहींस तेव्हां राणी घारच झाली. '

न्यायमूर्तीचें हें म्हणणें सर्वांना अगदीं योग्य वाटलें; व सर्वांनीं चिमणीची अगदीं फजिती केली. तेव्हांपासून चिमणी इतर पक्षांत फारशी लांब कोठें जात नाहीं. कोठें छपरांत, कौलारांत खोपटें करून रहाते.

आपल्या खोलीचें दार पहा, किंवा ओटीवरून अंगणांत जाण्याचें दार पहा, अगर आपल्या घराचा रस्त्यावरील मोठा दरवाजा पहा.--हीं सर्व दारें आंतल्या अंगाला उघडण्यासारखीं केलेलीं असतात. असें कां?

याचें कारण इतकेंच कीं, दारें बाहेरल्या अंगास उघडण्यासारखीं केलीं, तर बाहेर दाराजवळ कोणी आहे कीं काय हें माहीत नसतांना कोणी एकदम आंतून दार उघडलें तर तें बाहेरच्या माणसास लागावयाचें. घराचा पुढला दरवाजा रस्त्याकडील अंगास उघडण्यासारखा केला तर आंतल्या माणसानें तो उघडतांच रस्त्यावरून घाईघाईनें जाणाऱ्या माणसास तो धाडदिशीं लागण्याचा फारच संभव.

* * *

आपण रुपया नेहमीं पहातों; पण ही गोष्ट सहसा आपल्या लक्षांत आलेली नसते कीं, रुपयावरील छापापैकीं दोन्ही बाजूंचाही गोल कडा हा छापाच्या इतर सर्व ठशापेक्षां अधिक वर आलेला असतो.

असा तो वर मुद्दामच आणलेला असतो; वापरतांना व विशेषतः रुपये एकावर एक ठेवून मोजतांना वगैरे ते घांसले जातात, तेव्हां अधिक उंच असलेला कडाच ज्यास्त घांसला जावा व बाकीचा छाप घांसून लवकर गुळगुळीत होऊं नये, म्हणून ही योजना असते.

* * *

कांहीं लोक मांजरासारखे असतात. तुम्ही त्यांना कुरवाळीत आहां, व पाठीवरून हलके हलके हात फिरवीत आहां, तोंपर्यंत त्यांच्यासारखे गोजिरवाणे दुसरे कोणी नाहीं. पण चुकूनही जर कां तुमचा त्यांच्या शेंपटीला हात लागला तर तुमचें सर्व कुरवाळणें वाया जाऊन, ते तुमच्या अंगावर फुस्कारून येणार!

* * * * * * * *

म्याट्रिक्, स्कूल्फायनल् व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरणें, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत मराठी भाषेंतील सुमारें दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय ( Idioms ) आणि म्हणी व अवांतर शेंकडों संप्रदाय, यांचें शास्त्रीयरीत्या वर्गीकरण केलेलें असून त्यांचें मराठींत सोपपत्तिक स्पष्टीकरण केलेलें आहे, व भरपूर उदाहरणेंही दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणाच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील शेंकडों अवतरणें दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे न्याय, ज्योतिषांतील शब्द, संस्कृत वाक्यें किंवा वाक्यांश, वगैरेंचें खुलासेवार स्पष्टीकरण केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय ह्यांच्या जोड्या दिल्या आहेत. पुस्तकांत एखादा विशिष्ट शब्द पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक, स्कूल्फायनल् वगैरे परीक्षांच्या उमेदवारांस, तसेंच मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास करणाऱ्यांस हें पुस्तक अत्यंत उपयोगी असें झालें आहे. रा० रा० विद्याधर वामन भिडे बी. ए. यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या जातीचें व इतक्या विस्ताराचें पुस्तक मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं पायका टाइपचीं पानें सुमारें ५०० वर असून बांधणी कापडी व जाड पुठ्याची आणि मजबूत अशी आहे. किंमत दीड रुपया. ट० हं० व्ही० पी० सह २ आणे.

# निबंधलेखन आणि अनुवाद.

म्याट्रिक्युलेशन, स्कूल्फायनल, पब्लिक् सर्व्हिस्, वगैरे परीक्षांस मराठी भाषा हा एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत निबंध लिहावा लागतो, व दिलेल्या पद्यांचा अनुवाद करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें सोयीचें पुस्तक नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं मथळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्यांत निबंध-लेखन हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून निबंधांचे तीन प्रकार कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या सडखाच्या कशा पाडाव्या, हें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर सुमारें ५० निबंध लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत अनुवाद म्हणजे काय हें सांगून तो कसा करावयाचा, ह्यासंबंधाच्या तपशी-लवार सूचना देऊन अनेक प्रकारच्या पद्यांचा अनुवाद करून दाखविला आहे; आणि नंतर कांहीं पद्यसमूह विद्यार्थ्यांना अनुवाद करावयासाठीं दिले आहेत. किं. ८८ ट. ख. ८३.

कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

आजपर्यंत राजा रविवर्मा यांचीं चित्रें लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या रंगांत बरींच छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व चित्रें त्या त्या चित्राच्या परिपूर्ण पौराणिक माहितीसह एकवटलेलीं अशीं पुस्तकरूपानें छापल्यास त्यांची फारच जरूर आहे, अशा कांहीं लोकांच्या सूचना आल्यावरून आम्हीं वरीलप्रमाणें राजा रविवर्मा यांचीं निवडक चित्रें बुकसाईजमध्यें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ चित्रें वर्णनासह दिलेलीं असून पुस्तकास कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर) वापरलेला आहे. मुखपृष्ठावर राजा रविवर्मा यांच्या प्रमुख चित्रांपैकीं शकुंतला-जन्माचें चित्र तीन रंगांत सुबक छापलेलें आहे. त्यामुळें पुस्तकास विशेषच शोभा आलेली आहे, किं० १ रुपया.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

भगवद्भक्त हैबतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांसारख्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधवराव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनी केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेलें आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरेदार आहे मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेलें असून किंमत अवघी ०४ आ. ठेविली आहे ट. ह. सह किं. ०८०६.

## सचित्र | रुक्मिणी स्वयंवर. | सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांत तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुसत्या रफ कागदावरील पोथीस ०६ व ग्लेज कागदावरील ०८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह किं ०१० व ०१२ आहे पोस्टेज ०१०६.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें

किंमत ०१२ ] चित्रयुक्त [ किंमत ०१२

## बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

यांत अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रुळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी. म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.



हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ८१८ सदाशिव पेठ–पुणें शहर येथें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED B-NO. 179

पुस्तक २७. मे सन १९१६ अंक ५.

# मराठी शालापत्रक

## विषयक्रम.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| व्यायामाचा उद्देश व आवश्यकता. | ८३ |
| रामायण. | ८५ |
| तोतया राजपुत्र. | ८६ |
| संभाषण-कला. | ८९ |
| पुरंदरावर स्वारी. | ९१ |
| प्रेमाबाई. | ९७ |
| चतुर्थांश पद्धति किंवा रेघाचें अपूर्णांक. | १०० |
| गप्पागोष्टी. | १०२ |

**विक्रीस तयार ! विक्रीस तयार !! विक्रीस तयार !!**

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

**आवृत्ति सहावी.**

**ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१२.**

व्यापाऱ्यांस कमिशन.

# सचित्र अक्षर-बोध.

## नवी आवृत्ति.

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

नं. ... २
ता. ...
मासिक शा...

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. मे सन १९१६ अंक ५.

## व्यायामाचा उद्देश व आवश्यकता.

व्यायामाचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे शरीर निरोगी स्थितींत ठेवणें हा होय. शरीरांतील मुख्य दोन इंद्रियें म्हटलीं म्हणजे मेंदू व स्नायु हीं होत. हीं दोन इंद्रियेंच बहुतकरून सर्व कामें करितात. एखादी गोष्ट करावयाची असल्यास प्रथम मेंदूकडून हुकूम केला जातो. हुकुमाची अंमलबजावणी स्नायु करितात. म्हणून मेंदू व स्नायु ह्यांच्या पूर्ण वाढीकडे लक्ष देणें हें आपलें कर्तव्य आहे. त्यांची पूर्ण वाढ झाली नसल्यास ती करावयास आरंभ केला पाहिजे. ही वाढ कशी करावयाची म्हणाल तर त्याला एकच सरळ उपाय आहे. तो उपाय म्हटला म्हणजे मेंदू व स्नायु यांना योग्य व्यायाम देणें हा होय.

मेंदू व स्नायु ह्यांची पूर्ण वाढ झाली असें समजा. पूर्ण वाढ झाल्यावरही व्यायामाची जरूर आहे. कारण ते नेहमीं काम करतात तेव्हां त्यांची थोडीबहुत तरी झीज होते. ही झीज भरून काढण्याकरितां त्यांना नेहमीं भरपूर रक्ताचा पुरवठा केला पाहिजे. रक्त भरपूर असून तें शुद्धही असलें पाहिजे. भरपूर व शुद्ध रक्त हें आपणांस व्यायामापासूनच मिळवितां येईल. तेव्हां व्यायामाचा उद्देश मेंदू व स्नायु ह्यांची पूर्ण वाढ करणें व ते नेहमीं चांगल्या स्थितींत ठेवणें हा होय.

व्यायामाची आवश्यकता कां आहे याचा थोडासा विचार आपण करूं. आपलें शरीर हें गिरणींतील यंत्राप्रमाणें एक स्वतः हालचाल करणारें यंत्रच आहे. गिरणींतील यंत्रें विकत आणून तीं जर एक दोन वर्षें अगदीं जशींच्या तशींच ठेविलीं तर यंत्रांची स्थिति काय होईल बरें ? तीं गंजतील व लवकरच निरुपयोगी होतील. हींच यंत्रें जर वापरण्यांत आणिलीं तर तीं जास्त वर्षें टिकतील, व मालकास उत्पन्न होईल तें वेगळेंच. आपल्या शरीररूपी यंत्राची रचना विश्व-

त्यानें कांहीं विलक्षण तऱ्हेनें केली आहे. शरीराकडून जर योग्य वेळीं योग्य कामें करून घेतलीं नाहींत तर तें गंजेल म्हणजे सुस्त होऊन जाईल. तेंच जर योग्य वेळीं योग्य कामीं लाविलें तर तें जास्त जोरदार होईल; भराभर वाढूं लागेल; दुसऱ्यास त्याचा उपयोग होईल व स्वतःस म्हणाल तर शरीरसुख प्राप्त होईल.

गिरणींतील यंत्रें काम करीत असतांना त्यांतील पोलादाचें घर्षण होतें. घर्षणानें तें झिजतें; त्यामुळें त्याची काम करण्याची तरतरी हळुहळू कमी होत जाते व गिरणीचीं चाकें ढिलीं पडतात. आमचें शरीररूपी यंत्र घर्षणानें झिजण्याच्या ऐवजीं तें अधिक मजबूत होतें; त्याची तरतरी कमी न होतां वाढतच जाते. मेंदूकडूनही आम्हीं योग्य कामें नेहमीं करून घेतलीं तर त्याची तरतरी दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाईल. तर शरीरांतील प्रत्येक स्नायु व मेंदू मजबूत व तरतरीत करण्याकरितां व्यायामाची आवश्यकता आहे.

एकंदर व्यायामी आवश्यकता शरीरास कां आहे हें आपणांस सांगितलेंच. तें शरीर तान्या मुलाचें असो अथवा मुलीचें असो; पुरुषाचें असो अथवा स्त्रीचें असो; तरुणाचें असो अथवा वृद्धाचें असो; योग्य व्यायाम प्रत्येक शरीराला मिळालाच पाहिजे.

## निर्दोष व्यायामपद्धति.

व्यायामाच्या पद्धति पूर्वीच्या बऱ्याच आहेत; बऱ्याच नवीन निघाल्या आहेत व निघतही आहेत. यांतील कांहीं पद्धति अशा आहेत कीं, त्यांच्या योगानें घरींच एखाद्या खोलींत व्यायाम करितां येतो. खुल्या हवेंतील कामापासून अगर उघड्या पटांगणांतील खेळापासून जो फायदा होतो तो खोलींत केलेल्या व्यायामापासून होत नाहीं. कारण खोलींत एकट्यानेंच व्यायाम करण्यांत कांहींच मजा वाटत नाहीं. खेळांत अगर कामांत जसें मन रमतें तसें यांत रमत नाहीं. मन ज्या ठिकाणीं लागतें तेथें काम चांगलें होतें, असा अनुभव सर्वांना आहेच. काबाडकष्ट करणारांचीं शरीरें व शाळेंत व्यायाम करून कमावलेलीं शरीरें यांत बराच फरक आपल्या दृष्टीस पडतो. काबाडकष्ट करणारांचें लक्ष शरीरांतील स्नायु मजबूत करण्याकडे नसतें; व त्यांच्या श्रमांत त्यांचें मन रममाण होत नाहीं. व्यायाम करणाराचें मन शरीरांतील स्नायु पुष्ट करण्याकडे असतें व तें काम तो आनंदानें करतो. शरीरास फायदा व्हावा अशी इच्छा असल्यास आपण जी व्यायामाची पद्धत स्वीकारतों त्यांत मनाला आनंद वाटला पाहिजे; कंटाळा येतां कामा नये. परंतु कांहींच व्यायाम न करण्यापेक्षां नवीन पद्धतीप्रमाणें घरीं राहूनच व्यायाम करणें सुद्धां फार बरें आहे.

व्यायामाच्या ज्या पद्धतीनें कांहीं विशिष्ट स्नायूंची वाढ होते व ज्याच्या योगानें नांवाजलेल्या पैलवानांसारखीं शक्तीचीं कामें करितां येतात, ही व्यायामाची स्वाभाविक पद्धति नव्हे; ही पद्धत अयोग्य आहे.

निर्दोष व्यायामपद्धति कोणती म्हणाल तर ज्या पद्धतीच्या योगानें सर्व शरीराची सारखी वाढ होते; सर्व स्नायूंचा उपयोग केला जातो; शरीराच्या सर्व अवयवाला पुष्टी मिळते; जींत खेळाप्रमाणें मजा वाटते; जींत मन रमून जातें व व्यायाम करणाराला मोकळ्या हवेंत राहून व्यायाम करणें भाग पडतें.

यावरून निर्दोष व्यायामपद्धतीची कल्पना आपणांस थोडीबहुत आलीच असेल. परंतु ज्याला व्यायामाविषयीं कांहींच माहिती नाहीं व त्याला व्यायाम करून शरीर कमविण्याची इच्छा असेल तर त्यानें ज्यास व्यायामशास्त्राचें चांगलें ज्ञान असेल व ज्यास त्या बाबतींत अनुभवही चांगला असेल त्याच्याकडून स्वतः कोणती व्यायामपद्धति स्वीकारावी याचें ज्ञान करून घेणें फायदेशीर होईल.

# रामायण.

( लेखकः—चिंतामणि, पुणें )

रामायण हा ग्रंथ व्यास ऋषींनीं लिहिलेला आहे. हा ग्रंथ हिंदू लोकांत फार पवित्र मानला गेला आहे. ह्या ग्रंथापासून आपणांस पुष्कळ शिकण्याजोगें आहे. हा ग्रंथ आमचा मार्गदर्शक आहे. हा ग्रंथ आम्हांस आईबापा प्रमाणें पूज्य आहे. हा ग्रंथ म्हणजे आमचा सन्मार्गदर्शक आहे. हा ग्रंथ पतिताचे पावन करणारा आहे. हा आमचा सन्मित्र आहे. हा ग्रंथ आमचा तारक आहे. हा ग्रंथ म्हणजे आमच्या पूर्वजांचा इतिहास आहे. असा हा अमूल्य, अवर्णनीय व असामान्य ग्रंथ लाभला याबद्दल व्यास ऋषींची महती वर्णावी तितकी थोडीच! ज्या ग्रंथांत प्रभु रामचंद्र, लक्ष्मण, हनुमान, सीता, दशरथ, कौसल्या व भरत इत्यादिकांचीं वर्णनें आहेत अशा या ग्रंथास आमचे प्रेमपुरःसर प्रणाम असोत!



भरतभेट.

हे प्रभु रामचंद्रा, तुझे गुण गावे तितके थोडेच! आपल्या वर्तनानें तूं जगाला दिपविलेंस! तुझ्या गुणांचें गान लोक आजपर्यंत करीत आहेत व याच्यापुढेंही करतील. हे माई सीतादेवी, तूं आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावानें लोकांना आश्चर्यचकित करून सोडलेंस. प्रत्यक्ष प्रभु रामचंद्रानीं सुद्धां तुझे गुण गाइले! हे बंधू लक्ष्मणा, तूं आपल्या उदाहरणानें जगाला बंधुप्रेमाचें उत्तम उदाहरण घालून दिलेंस. वा मारुतिराया, तूं आपल्या धन्याकरितां वाटेल त्या गोष्टी करण्यास तयार झालास! धन्याचे ठायीं त्वां आपलें तनमनधन अर्पण केलेंस! कायावाचामनें करून तूं त्याला साहाय्य केलेंस. राजा दशरथा व राणी कौसल्ये, तुम्ही उभयतां प्रभु रामचंद्राच्या वियोगानें किती दुःखी झाला असाल! राजा दशरथा, आपल्या पुत्राच्या वियोगानें त्वां आपल्या पंचप्राणास त्यागिलेंस, आं! अहो अयोध्यावासी जनहो! राम, सीता, लक्ष्मण यांच्या वियोगाग्नीनें तुम्ही होरपळले असाल ना!

### दैवाची गति विचित्र आहे!

इतकें दुःख, आनंद, युद्ध वगैरे भाग ज्या ग्रंथांत आहेत त्या ग्रंथाबद्दल एका कवीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे.

**जी दूषणान्वितहि शून्याचि दूषणांनीं।**
**तेवी खरांकितहि कोमल वर्णखाणी॥**
**ऐशी अपूर्व कृति ज्या कवि राजयाची।**
**त्या वाल्मिकिप्रति असो नति आज याची॥१॥**

तसेंच आमचेही या ग्रंथाला व ग्रंथकर्त्याला प्रेमपुरःसर अनेकवार प्रणाम असोत!

# तोतया राजपुत्र.

आस्त्रिया आणि जर्मनी या दोन बलाढ्य राष्ट्रांनीं आपली राक्षसी युद्धतृष्णा तृप्त करण्याकरितां ज्या लहानशा देशाशीं प्रथम भांडण उकरून काढिलें, तो सर्विया देश आतां कोणास माहीत नाहीं ?

या सर्विया देशाचा एक राजा एकदां शिकारी-करितां अरण्यांत गेला असतां, त्याला तेथें एक ' जंगली माणूस ' आढळला. जन्मापासून हा माणूस जंगलांतच वाढलेला होता. त्याला मनुष्यवस्तींचा मुळीं संपर्कही नव्हता. त्याचें सर्व आयुष्य रानांतील श्वापदांबरोबर गेलेलें. अर्थात्च शिकारीकरितां आलेले लोक पाहून तो दूर दूर पळूं लागला, व दऱ्याखोऱ्यांत दडूं लागला. परंतु राजानें आपल्या बरोबरच्या माण-सांस त्याला पकडून आणण्यास सांगितलें. त्यांनीं त्याला शोधून काढिलें, पण तो मुकाट्यानें त्यांच्या स्वाधीन होईना. आपल्या जवळच्या रानटी हत्यारांनीं त्यानें त्यांच्यापैकीं ४।५ माणसांस जखमी केलें; पण अखे-रीस त्यांनीं त्याला पकडून राजाकडे आणलें. राजानें त्यास आपल्या बरोबर राजधानींत नेऊन एका तळघरांत कोंडून ठेविलें.

नेहमीं श्वापदांबरोबर रानांत स्वैर हिंडण्याची संवय झालेली; तेव्हां अर्थात्च त्या जंगली माणसास असें तळघरांत कोंडून रहाणें अतिशयच कष्टप्रद वाटलें. शिवाय कधीं कोणी दृष्टीस पडे तेंही त्याच्या नेहमींच्या परिचयाचे कोणी श्वापद नसून एकादें माणूस ! तो रात्रंदिवस एकसारखा ' मला मोकळा सोडा; मला रानांत जाऊं द्या ' म्हणून केंविलवाणा ओरडत असे. पण राजाचा सक्त हुकूम होता कीं, जर कोणीं त्यास सोडून दिलें, तर त्यासच त्या तळघरांत कोंडून ठेविलें जाईल ! तेव्हां अर्थात्च त्याच्या त्या ओरड्यानें कोणा-सही कींव येऊन कांहींच उपयोग नव्हता. पण राज-पुत्राच्यानें त्या माणसाचें तें रात्रंदिवस ओरडणें ऐक-वेना. त्यानें एके दिवशीं रात्रीं विशेष कोणाचें लक्ष नाहीं असें पाहून त्या जंगली माणसास तळघरांतून सोडून दिलें.—

दुसरे दिवशीं शोध करितां, राजपुत्रानेंच त्या जंगली माणसास सोडून दिलें असें राजास आढळून आलें. आपल्या न्यायप्रीतीला अनुसरून राजानें लागलींच राजपुत्रास तळघरांत कोंडून ठेवण्याचा विचार केला. इतक्यांत एका वृद्ध सरदारानें राजास म्हटलें, ' महा-राज, राजपुत्रास तळघरांत कोंडून ठेवणें काय, अगर आपल्या राज्याच्या हद्दपार करणें काय, सारखेंच. तेव्हां आपल्या डोळ्यासमोर खुद्द राजपुत्रास तळ-घरांत बंदींत ठेवण्यानें आपणा स्वतःस व आम्हां प्रजा-जनांनाही जें दुःख होणार, त्यापेक्षां आपण राजपुत्रास हद्दपार करावें हेंच बरें. ' राजास हा विचार बरा वाटून त्यानें एक चाकर बरोबर देऊन राजपुत्रास हद्दपार केलें.

राजपुत्र आणि तो चाकर रानांतून चालले असतां दुपारच्या वेळीं राजपुत्रास फार तहान लागली; पण जवळपास नदी अगर ओढा कांहींच दिसेना. इत-क्यांत त्यांस एक विहीर दिसली. पाणीही कांहीं फार खोल नव्हतें. पण पाणी काढावयाचें कशानें, आणि कशांत ? त्यांचे जवळ कांहीं दोरी नव्हती कीं भांडेंही नव्हतें. शेवटीं त्या चाकरानें राजपुत्राचे पाय धरून त्याला उलटें विहिरींत सोडावें व राजपुत्रानें पाण्यास

तोंड लावून पाणी प्यावें असें ठरलें, आणि त्या प्रमाणें त्या चाकरानें राजपुत्रास पाय धरून विहिरींत सोडलें.

पण इतक्यांत त्या चाकराच्या मनांत एक दुष्ट विचार आला आणि तो राजपुत्रास म्हणाला,— 'आतां तुझा जीव माझ्या हातांत आहे. तर वर येतां क्षणीं आपले कपडे बदलून यापुढें मी राजपुत्र आणि तूं माझा चाकर असें म्हणून चालण्यास तूं तयार आहेस कीं नाहीं? कां देऊं असाच विहिरींत टाकून?'

राजपुत्रानें त्याचें म्हणणें कबूल केलें आणि वर येतांच आपले कपडे बदलून, चाकराचा धनी आणि धन्याचा चाकर बनून ते पुढें चालले, ते शेजारच्या राज्यांत आले. तेथील राजानें सर्वियाचा राजपुत्र समजून त्या चाकराचा चांगला आदरसत्कार केला व त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें. खऱ्या राजपुत्रानेंही आपला शब्द स्मरून खरी हकीगत कोणासही सांगितली नाहीं. पण चाकराच्या मनांत ती गोष्ट डांचत होती. राजपुत्र आज ना उद्यां ही गोष्ट फोडणार त्यापेक्षां कांहीं तरी युक्तीनें याचा कांटा काढून टाकावा असा त्यानें मनांत विचार केला.



त्या चाकरानें राजपुत्रास पाय धरून विहिरींत सोडलें.

तेथील राजानें आपल्या बागेंत निरनिराळीं जनावरें पाळून ठेविलीं होतीं. तीं पहात असतां, तोतया राजपुत्र राजास म्हणाला,—'तुम्ही आपल्या जवळ हीं इतकीं जनावरें— श्वापदें ठेविलीं आहेत, हीं दररोज सकाळीं तुम्ही रानांत कां मोकळीं सोडीत नाहीं? दररोज संध्याकाळीं पुन्हां परत आणावींत.'

'पण एकदां मोकळीं सोडल्यानंतर तीं पुन्हां परत कशीं आणतां येणार?'

'अं:, त्याच्यांत काय आहे? माझ्या जवळ जो माणूस आहे त्याच्या आंगीं रानटी श्वापदें जमवून आणण्याचा मोठा गुण आहे तो हें काम करीत जाईल. पण तो एक मोठा विचित्र मनुष्य आहे. तो बऱ्या बोलानें काम करण्यास कबूल होणार नाहीं. सला हजार सबबी सांगेल. मला तें काम करितांच येत नाहीं म्हणून म्हणेल. त्याच्याकडून काम करवून घ्यावयाचें म्हणजे काम न झाल्यास डोकें उडविलें जाईल अशी त्याला जरब घालावी लागते.'

हें ऐकून त्या राजास मोठें आश्चर्य वाटलें, पण त्याप्रमाणें दुसरे दिवशींच करून पहाण्याचें त्यानें ठरविलें. त्या लुच्चया चाकरानें मनांत विचार केला कीं या युक्तीनें राजपुत्र रानांत गेला कीं डोकें उडण्याच्या भीतीनें

परतच यावयाचा नाहीं; व मग त्याला तेथेंच श्वापदें मारून टाकतील. दुसरे दिवशीं बागेंत पाळलेलीं सर्व श्वापदें रानांत मोकळीं सोडून देण्यांत आलीं; व दुपारीं खऱ्या राजपुत्रास रानांतून तीं सर्व गोळा करून आणण्यास हुकूम झाला. जनावरें गोळा करून न आणल्यास डोकें उडविलें जाईल म्हणूनही त्यास वजावण्यांत आलें.

राजपुत्र आरण्यांत खूप भटकला; श्वापदें गोळा करून आणणें त्याला शक्यच नव्हतें. पुढें काय करावें हें त्याला समजेना. हताश होऊन तो एका झाडाखालीं बसून मोठ्यानें रडूं लागला. इतक्यांत शेजारच्या झाडीमधून तो जंगली माणूस त्याजवळ आला; आणि त्यानें त्यास रडण्याचें कारण विचारलें. राजपुत्रानें सर्व हकीगत सांगतांच त्या जंगली माणसानें आपल्याजवळची एक लहानशी घांट त्याजवळ दिली आणि म्हटलें,—'ही घंटा आपण वाजवा, म्हणजे आतां सर्व श्वापदें आपल्या भोंवतीं गोळा होतील व मग आपण जिकडे जाल तिकडे तीं आपल्या मागें येतील !'

त्याप्रमाणें संध्याकाळीं तो घंटा वाजवीत पुढें धांवत बागेंत शिरतांना व त्याच्या मागें रानटी जनावरें धांवतांना पाहून राजास व तेथील लोकांस मोठा आंचवा वाटला.

इतक्यांत सर्वियाच्या राजाकडून कांहीं कामानिमित्त जासूद आला होता, त्यानें खऱ्या राजपुत्रास ओळखिलें व मग सर्व खरी हकीगत बाहेर आली. राजानें लागलींच तोतया राजपुत्रास हातापायांत बेड्या घालून तळघरांत टाकून दिलें व आपल्या चुकीबद्दल खऱ्या राजपुत्राची माफी मागितली. सर्वियाच्या राजास सर्व हकीगत कळल्यावर त्यानें राजपुत्रास त्याच्या अपराधाबद्दल माफी करून परत बोलाविलें.

त्यानंतर राजपुत्रानें त्या जंगली माणसाचा पुष्कळ शोध केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. राजपुत्र आणि त्याचे वंशज मात्र कृतज्ञतापूर्वक त्या माणसाची आठवण किती तरी वर्षें काढीत असत. सर्वियांत म्हातारी माणसें अजूनही लहान मुलांना ही गोष्ट सांगतात.

---

तरुण मुलांमुलींकरितां दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए. यांनीं लिहिलेलें

नवें पुस्तक ] **भारतीय उपकथा** [ पूर्वार्ध

पृष्ठें—४००; कागद—अँटीक; टाईप—जाड ग्रेट प्रायमर; चित्रें—तेरा ( एक रंगित )

नकाशा—प्राचीन भरतखंडाचा; किंमत—फक्त एक रुपया.

"भारतीय युद्ध" या पुस्तकांत कौरवपांडवांची मुख्य कथा दिली असून त्याच पुस्तकाचे जोडीस रा. लिमये यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे. शांति-अनुशासन-पर्वांतील धार्मिक व नैतिक कथा उत्तरार्धांकरितां राखून यांत इतर सोळा पर्वांतील ऐतिहासिक व पौराणिक ६० कथा मूळ भारतावरून सोप्या भाषेंत संगतवार दिल्या आहेत.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# संभाषण-कला.

नेहमींच्या भेटींत होणाऱ्या संभाषणाचा उद्देश ज्ञानप्राप्ति किंवा पांडित्यप्रदर्शन हा नसतो; एकमेकांची घटकाभर करमणूक व्हावी एवढाच असतो. हा उद्देश साध्य होण्यास खालील नियम ध्यानांत ठेवले पाहिजेत.

१ साधारण गप्पासप्पा, अथवा गप्पागोष्टी म्हणजे कांहीं एका व्यक्तीचें व्याख्यान नाहीं, यासाठीं अशा प्रसंगीं एकाच व्यक्तीनें आपलें पुराण ऊर्फ चऱ्हाट ऊर्फ व्याख्यान इतरांवर लादूं नये. सर्वांस थोडथोडें बोलण्यास अवकाश द्यावा.

२ म्हणजे प्रत्येकानें नियमित मिनिटें बोललेंच पाहिजे असें मात्र नव्हे. अगदीं उत्तम भाषण करणारापेक्षांही अगदीं गप्प बसून प्रसंगोचित एखादेंच पण, चटकदार वाक्य झोकून देणाऱ्याही कांहीं व्यक्ती असतात. व त्यांच्या ह्या उक्ती कधीं कधीं लोकांच्या ध्यानांत कित्येक वर्षें कायमपणें राहतात.

३ अगदींच तोंडाला कुलूप घालणें मात्र फार वाईट. कारण त्यामुळें इतर बोलणारांचा ह्या हुम्या मनुष्याबद्दल गैरसमज होतो. एक तर या अशा हुम्या माणसास अहंमन्य समजण्यांत येतें किंवा त्याचेवर विलक्षण व अक्षम्य बेफिकीरीचा आरोप लादण्यांत येतो. यासाठीं मंडळींतला म्हणवून घेण्यासाठीं प्रत्येकानें गप्पांचा ओघ सारखा अप्रतिहत व अस्खलित चालण्यास यथाशक्ति व यथामति हातभार लावलाच पाहिजे.

४ संभाषण किंवा गप्पागोष्टी म्हणजे कांहीं प्रश्नोत्तरांचा भडिमार नव्हे. अगदीं प्रेमळ माणसें देखील कधीं कधीं आपल्या मित्रावर प्रश्नांचा वर्षाव करितात. अशा करण्यानें आपण आपली कळकळ व्यक्त करितों असें त्यांना वाटतें पण तें चुकीचें आहे. कधीं कधीं असा प्रश्नांचा मारा सुरू झाला म्हणजे ज्याच्यावर ही सरबत्ती होते त्याला यांतून आपण जीव घेऊन कसें सुटतों अशी काळजी पडते.

५ संभाषण म्हणजे वितंडवाद किंवा हमरीतुमरीही नाहीं. विचारविनिमयासारखी मौज कशांतच नाहीं. परमतसहिष्णुता मात्र बाळगली पाहिजे, म्हणजे विचारवैचित्र्यप्रदर्शनानें फारच मनोरंजन होतें. परमतसहिष्णुता नसल्यामुळें क्लबांत किंवा मेजवानींत कधीं कधीं भयंकर वाग्युद्ध ऊर्फ चुरशीचा सामना माजून रहातो, हें फारच वाईट व अक्षम्य.

६ साधारणपणें गप्पागोष्टींत राजकीय किंवा धार्मिक विषय आणूं नये हें उत्तम. हा नियम पाळण्याचें कारण धार्मिक व राजकीय बाबतींत परमतसहिष्णुता बहुतकरून फारच थोड्यांच्या अंगीं असते.

७ विरुद्ध मत प्रदर्शित करावयाचें असल्यास फारच सावधगिरीनें, शहाणपणानें व लीनतेनें केलें पाहिजे. अशा वेळीं उद्धट किंवा उद्दामपणाचा एकही शब्द तोंडांतून निघूं नये. संभाषणांत एखाद्यानें एखादें चुकीचें विधान केल्यास ताबडतोब त्याची चुकी त्याचे पदरांत घालणें चांगलेंही नाहीं व शहाणपणाचेंही नाहीं. अशानें ज्याची चूक आपण काढतों तो फारच गरम होण्याचा संभव आहे. असें झाल्यास तो आपली चूक प्रांजलपणें कबूल तर करणारच नाहीं, पण उलट आपलेविषयीं वाईट ग्रह मात्र करून घेईल. यासाठीं अशी चूक ताबडतोब न काढतां बऱ्याच वेळानें अशा माणसाचें बोलणें पुरें झाल्यावर आपण बोलावें व आपल्या भाषणांत त्याची चूक सुधारून घ्यावी; मात्र त्यानें अशी चूक केली होती असें बोलून दाखवूं नये. अगदीं तरण्या-

परतच यावयाचा नाहीं; व मग त्याला तेथेंच श्वापदें मारून टाकतील. दुसरे दिवशीं बागेंत पाळलेलीं सर्व श्वापदें रानांत मोकळीं सोडून देण्यांत आलीं; व दुपारीं खऱ्या राजपुत्रास रानांतून तीं सर्व गोळा करून आणण्यास हुकूम झाला. जनावरें गोळा करून न आणल्यास डोकें उडविलें जाईल म्हणूनही त्यास वजावण्यांत आलें.

राजपुत्र आरण्यांत खूप भटकला; श्वापदें गोळा करून आणणें त्याला शक्यच नव्हतें. पुढें काय करावें हें त्याला समजेना. हताश होऊन तो एका झाडाखालीं बसून मोठ्यानें रडूं लागला. इतक्यांत शेजारच्या झाडीमधून तो जंगली माणूस त्याजवळ आला; आणि त्यानें त्यास रडण्याचें कारण विचारलें. राजपुत्रानें सर्व हकीगत सांगतांच त्या जंगली माणसानें आपल्याजवळची एक लहानशी घांट त्याजवळ दिली आणि म्हटलें,—'ही घंटा आपण वाजवा, म्हणजे आतां सर्व श्वापदें आपल्या भोंवतीं गोळा होतील व मग आपण जिकडे जाल तिकडे तीं आपल्या मागें येतील !'

त्याप्रमाणें संध्याकाळीं तो घंटा वाजवीत पुढें धांवत बागेंत शिरतांना व त्याच्या मागें रानटी जनावरें धांवतांना पहून राजास व तेथील लोकांस मोठा आंचवा वाटला.

इतक्यांत सर्वियाच्या राजाकडून कांहीं कामानिमित्त जासूद आला होता, त्यानें खऱ्या राजपुत्रास ओळखिलें व मग सर्व खरी हकीगत बाहेर आली. राजानें लागलींच तोतया राजपुत्रास हातापायांत बेड्या घालून तळघरांत टाकून दिलें व आपल्या चुकीबद्दल खऱ्या राजपुत्राची माफी मागितली. सर्वियाच्या राजास सर्व हकीगत कळल्यावर त्यानें राजपुत्रास त्याच्या अपराधाबद्दल माफी करून परत बोलाविलें.

त्यानंतर राजपुत्रानें त्या जंगली माणसाचा पुष्कळ शोध केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. राजपुत्र आणि त्याचे वंशज मात्र कृतज्ञतापूर्वक त्या माणसाची आठवण किती तरी वर्षें काढीत असत. सर्वियांत म्हातारी माणसें अजूनही लहान मुलांना ही गोष्ट सांगतात.

---

तरुण मुलांमुलींकरितां दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए. यांनीं लिहिलेलें

नवें पुस्तक ] **भारतीय उपकथा** [ पूर्वार्ध

पृष्ठें—४००; कागद—अँटीक; टाईप—जाड ग्रेट प्रायमर; चित्रें—तेरा ( एक रंगित )

नकाशा—प्राचीन भरतखंडाचा; किंमत—फक्त एक रुपया.

"भारतीय युद्ध" या पुस्तकांत कौरवपांडवांची मुख्य कथा दिली असून त्याच पुस्तकाचे जोडीस रा. लिमये यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे. शांति-अनुशासन-पर्वांतील धार्मिक व नैतिक कथा उत्तरार्धाकरितां राखून यांत इतर सोळा पर्वांतील ऐतिहासिक व पौराणिक ६० कथा मूळ भारतावरून सोप्या भाषेंत संगतवार दिल्या आहेत.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# संभाषण-कला.

नेहमींच्या भेटींत होणाऱ्या संभाषणाचा उद्देश ज्ञान-प्राप्ति किंवा पांडित्यप्रदर्शन हा नसतो; एकमेकांची घटकाभर करमणूक व्हावी एवढाच असतो. हा उद्देश साध्य होण्यास खालील नियम ध्यानांत ठेवले पाहिजेत.

१ साधारण गप्पासप्पा, अथवा गप्पागोष्टी म्हणजे कांहीं एका व्यक्तीचें व्याख्यान नाहीं, यासाठीं अशा प्रसंगीं एकाच व्यक्तीनें आपलें पुराण ऊर्फ चऱ्हाट ऊर्फ व्याख्यान इतरांवर लादूं नये. सर्वांस थोडथोडें बोलण्यास अवकाश द्यावा.

२ म्हणजे प्रत्येकानें नियमित मिनिटें बोललेंच पाहिजे असें मात्र नव्हे. अगदीं उत्तम भाषण करणारापेक्षांही अगदीं गप्प बसून प्रसंगोचित एखादेंच पण चटकदार वाक्य झोकून देणाऱ्याही कांहीं व्यक्ती असतात. व त्यांच्या ह्या उक्ती कधीं कधीं लोकांच्या ध्यानांत कित्येक वर्षें कायमपणें राहतात.

३ अगदींच तोंडाला कुलूप घालणें मात्र फार वाईट. कारण त्यामुळें इतर बोलणारांचा ह्या हुम्या मनुष्याबद्दल गैरसमज होतो. एक तर या अशा हुम्या माणसास अहंमन्य समजण्यांत येतें किंवा त्याचेवर विलक्षण व अक्षम्य बेफिकीरीचा आरोप लादण्यांत येतो. यासाठीं मंडळींतला म्हणवून घेण्यासाठीं प्रत्येकानें गप्पांचा ओघ सारखा अप्रतिहत व अस्खलित चालण्यास यथाशक्ति व यथामति हातभार लावलाच पाहिजे.

४ संभाषण किंवा गप्पागोष्टी म्हणजे कांहीं प्रश्नोत्तरांचा भडिमार नव्हे. अगदीं प्रेमळ माणसें देखील कधीं कधीं आपल्या मित्रावर प्रश्नांचा वर्षाव करितात. अशा करण्यानें आपण आपली कळकळ व्यक्त करितों असें त्यांना वाटतें पण तें चुकीचें आहे. कधीं कधीं असा प्रश्नांचा मारा सुरू झाला म्हणजे ज्याच्यावर ही सरबत्ती होते त्याला यांतून आपण जीव घेऊन कसें सुटतों अशी काळजी पडते.

५ संभाषण म्हणजे वितंडवाद किंवा हमरीतुमरीही नाहीं. विचारविनिमयासारखी मौज कशांतच नाहीं. परमतसहिष्णुता मात्र बाळगली पाहिजे, म्हणजे विचारवैचित्र्यप्रदर्शनानें फारच मनोरंजन होतें. परमतसहिष्णुता नसल्यामुळें क्लबांत किंवा मेजवानींत कधीं कधीं भयंकर वाग्युद्ध ऊर्फ चुरशीचा सामना माजून रहातो, हें फारच वाईट व अक्षम्य.

६ साधारणपणें गप्पागोष्टींत राजकीय किंवा धार्मिक विषय आणूं नये हें उत्तम. हा नियम पाळण्याचें कारण धार्मिक व राजकीय बाबतींत परमतसहिष्णुता बहुतकरून फारच थोड्यांच्या अंगीं असते.

७ विरुद्ध मत प्रदर्शित करावयाचें असल्यास फारच सावधगिरीनें, शहाणपणानें व लीनतेनें केलें पाहिजे. अशा वेळीं उद्धट किंवा उद्दामपणाचा एकही शब्द तोंडातून निघूं नये. संभाषणांत एखाद्यानें एखादें चुकीचें विधान केल्यास ताबडतोब त्याची चुकी त्याचे पदरांत घालणें चांगलेंही नाहीं व शहाणपणाचेंही नाहीं. अशानें ज्याची चूक आपण काढतों तो फारच गरम होण्याचा संभव आहे. असें झाल्यास तो आपली चूक प्रांजलपणें कबूल तर करणारच नाहीं, पण उलट आपलेविषयीं वाईट ग्रह मात्र करून घेईल. यासाठीं अशी चूक ताबडतोब न काढतां बऱ्याच वेळानें अशा माणसाचें बोलणें पुरें झाल्यावर आपण बोलावें व आपल्या भाषणांत त्याची चूक सुधारून घ्यावी; मात्र त्यानें अशी चूक केली होती असें बोलून दाखवूं नये. अगदीं तरण्या-

बांडांनींही शीघ्रकोपी वृद्धाशीं भाषण करतांना फार जपून व आदरानें बोलावें.

८ गोष्टी सांगण्याची कला सर्वांसच साधते असें नाहीं. गोष्ट चटकदार, आटपसर व मुद्याची असावी. ज्यांत कांहीं मुद्दा नाहीं असें एरंडाचें गुऱ्हाळ ऊर्फ चऱ्हाट सज्जन श्रोत्यांवर जुलमानें लादूं नये. कोट्या करण्याचें होईल तितकें टाळावें. गोष्ट सरळपणें व मुद्यास धरून सांगावी, वळणावळणांनीं वहात जाऊं नये. शेवट चटकदार असला तरच ती चटकदार गोष्ट.

९ संभाषणांत ' आमचें आफीस ' आणि ' आमचा साहेब ' यांचा सुळसुळाट नसावा.

१० संस्कृत किंवा इंग्रजी सुभाषितांची भाषणांत रेलचेल करूं नका; आधुनीक देशी संगीत कवीची एखादी ओळ प्रसंगोपात दडपली तरी चालेल.

११ मंडळींत असतां मोठ्यानें रेकूं नये किंवा मंडळींतील एखाद्याच्या कानांत कुजबुजूंही नये. सर्वांस ऐकूं येईल अशा आवाजानें बोलावें. दुसऱ्याचें बोलणें संपण्यापूर्वींच आपली उक्ती मध्येंच दडपून देऊं नका.

१२ संभाषण प्रसंगीं कोणाचेही अंगावर तिरस्कारानें खेंकसूं नका. एखादा हुशार परंतु अंमळ कमी धीट मनुष्य एखादें मत प्रदर्शित करीत असला तर त्याला बीच मे मेरा चांदभाई असें न करितां सहज हातभार लावा. असें केल्यानें त्याचे मनांत तुमचेविषयीं कायमची पूज्यबुद्धि उत्पन्न होईल.

१३ ' पण लक्ष्यांत कोण घेतो ' या पुस्तकांत श्रीयुत हरिभाऊ आपटयांनीं वर्णिल्याप्रमाणें परिचित स्त्रीपुरुषांचीं काव्यशास्त्रविनोदार्थ मिश्र संमेलनें ऊर्फ संध्याकाळीं चार गप्पागोष्टी करण्यासाठीं बैठकी होण्याची रूढी पडल्यास चांगलेंच. त्यायोगानें पुरुषांचे अंगीं अधिक सौजन्य व सौम्यपणा येईल, व स्त्रियांचे अंगीं अधिक धिटाई व समयसूचकता येईल.

# फोटो बक्षीस.


जे कोणी आपआपल्या गांवांतील ठळक व्यापाऱ्यांचीं नांवें, जात व धंदा कोणता वगैरे स्वच्छ बालबोधमध्यें पूर्ण पत्यासह लिहून कळवितील त्यांस मुंबई प्रदर्शनांत सुवर्ण पदक मिळालेला असा श्रीपार्वती, श्रीगणपतीस खेळवीत असलेला अत्यंत नयनमनोरम फोटो १ ( चित्र नव्हे ) बक्षीस देऊं; तर ही अमोल्य संधि प्रत्येक गांवचे मास्तरांनीं व्यर्थ दवडूं नये.

**सूचनाः**—जिल्ह्याचे गांवचे निदान २५–३०, तालुक्याचे १५–२०, व पेटा वगैरेचे निदान १० याप्रमाणें कळविलें पाहिजे.

**एम. बी. खानापुरे**, घर नंबर १४०१ पेठ कसबा, श्री मल्लिकार्जुन देवळाजवळ मु.—सोलापूर शहर.

## मुलांचे लेख—


# पुरंदरावर स्वारी.

[ लेखक—काशिनाथ नरसिंह केळकर. ]

आम्ही सुमारें ११ वाजण्याच्या सुमारास आळंदीस पोहोंचलों. स्टेशनाबाहेर आल्यावर आम्ही आपल्या पडशा खांद्यांवर टाकून चालावयास लागलों. थोड्याच अंतरावर एक मोठा वटवृक्ष उभा होता. उन्हांतून चालून आल्यावर इतका घनदाट छायेचा वृक्ष पाहून कोणास आनंद होणार नाहीं? त्या झाडापासूनच थोड्या अंतरावर एक ओढा झुळुझुळू करीत वहात होता. जवळच एक विहीर होती आणि तिच्याच उजव्या बाजूस एक मळा होता. समोरच असलेल्या सोनवरी किल्ल्याची कड सूर्यप्रकाशामुळें अत्यंत स्पष्ट दिसत होती. आणि आसपास पसरलेल्या वनःप्रांतांमध्यें मधून मधूनच पण कांहीं हिरवींगार झाडें असल्याकारणानें त्यानें असमंतात भागाला अप्रतिम शोभा आली होती. अशा रीतीनें तो प्रदेश माध्यान्ह सूर्याच्या किरणांनीं तळपत होता. सरतेशेवटीं एकदां त्या वटवृक्षाखालीं थोडासा आहार केला; परंतु पोहावयाची इच्छा अनावर झाल्याकारणानें आम्हीं त्या वृक्षाखालींच आणखी थोडा वेळ मुक्काम केला. सरतेशेवटीं बराच वेळ डुंबल्यानंतर आम्ही सोनवरी किल्ल्यावर जाण्याकरितां निघालों. किल्ल्याची वाट इतकी कांहीं भिकार आहे कीं चढतांना पायांत गोळेच येतात. रस्ता अत्यंत वांकडा गेलेला असून त्रासदायक आहे. मध्यें एकही झाड नाहीं. खालची जमीनही अत्यंत तापल्याकारणानें त्यांतून अत्यंत उष्ण अशा वाफा निघत होत्या आणि त्या आमच्या उष्ण श्वासांतच मिसळून जात असत. खालीं तापलेली जमीन, खडतर रस्ता, वर सहस्ररश्मी सूर्य! बसावें म्हटलें तर एकही झाड नाहीं! अशी आमची कीव करण्यासारखी स्थिति होऊन गेली. सर्वांच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या आणि अंगांत कोट राहण्याची सोयच नसल्याकारणानें सगळेच उघडे बोडके होऊन कसे तरी मार्ग आक्रमित होतों. सरते शेवटीं दरवाजा दिसू लागला तेव्हां आमचे सर्वांचे जीव खालीं पडले. दरवाज्याजवळ जाऊन एकदां आम्ही आक्रमिलेल्या खडतर मार्गावर दृष्टि फेंकली व सुखाचा सुस्कारा सोडला. त्यावेळेस त्या भव्य बुरुजाच्या छायेखालीं आम्ही बसलों असतां आम्हांस उठवें असें वाटेनाच! समोर नीलवर्ण टेंकड्यांची रांग लागलेली आहे, खालीं जमिनीवर आकाशांतल्या ढगांच्या छाया धांवताहेत, अशा स्थितींत हा सांवलींतच बसल्याकारणानें वाटणारा मनोहर देखावा बराच वेळ अनुभविल्यानंतर थोडेंसें पाणी पिऊन आम्ही शेजारच्या देवळांत गेलों. तेथेंही सुमारें अर्धा तास त्या किल्ल्याबद्दल गप्पा मारण्यांत घालविला. आमच्या बरोबरच आलेल्या एका मराठी गड्यानें आम्हांस तो सर्व किल्ला हिंडून दाखविला. आम्ही ज्या देवळांत उतरलों होतों त्यांतील मूर्ती आपोआप भंगलेली नसून ती फोडलेली आहे असेंही त्यानें आम्हांस सांगितलें. सरतेशेवटीं आह्मी निघालों. ऊन जरा खालीं झालेलें होतें. तरी पण जमिनींतून सारख्या वाफा वर उसळत होत्या. तेथून जे आह्मी तडाक्यानें आलों ते एकदम सोनावळी गांवीं आलों. तेथें थोडेंसें पाणी प्याल्यावर आह्मी तसेच तडक पुढें निघालों. एकमेकांची थट्टा करीत व वाटेंतल्या झाडांच्या भराभर कैऱ्या तोडीत आह्मी झपाट्यानें चाललों होतों. वाट आतां बरी होती. सूर्याचा तापही आतां कमी झालेला होता. मधून मधून गार वाराही

वाहत होता; अशा स्थितींत आम्ही टोळ्या करून झपाट्यानें चाललों होतों. वाटेंतून वाहत जाणारे ओढे, शेजारचे मळे, वागा, त्यांत चाललेला मोटेचा कर्णमधुर आवाज ह्यांनीं मनाला एक प्रकारचा आनंद होत होता. कुठें एकाद्या घरांतून वर धूर निघत आहे, कुठें एकाद्या पक्ष्याचा शब्द ऐकूं येत आहे अशा त्या रम्य संध्यासमयीं आम्ही एकमेकांशीं विनोद करीत चाललों होतों.

थोड्या वेळानें एकदांचे गांवांत आलों. आमच्या एका मित्रानें आमची सोय केलेलीच होती. तेव्हां संकोच न करितां त्याच्या घरींच आह्मीं आपलें ठाणें दिलें. आम्हांस गांव पाहण्यास फारसा वेळ नव्हताच, कारण आतां संध्याकाळ होत आलेलीच होती व आह्मीही सर्वजण थकलेलों असल्याकारणानें जवळच असलेल्या नदी-वर स्नानास निघालों. पांच सात मिनिटांचा रस्ता चालल्यावर एक-दाचें पात्र दिसूं लागलें. त्यांत आतां मनमुराद पोहावयास सांपडेल असें वाटलें होतें. पण गुडघ्यावर पाणी असेल तर शपथ! तेव्हां तिथें स्नान न करितां दुसरीकडे एक पोहण्यासारखी जागा आहे असें कळ-ल्यावरून आह्मी ओढ्याच्याच कांठानें वर निघालों. तो समय अतीशय सुखप्रद असा होता. संध्यासम-याच्या मंद सुगंधी वायूनें आसमंतातचा प्रदेश दरवळून सोडलेला होता आणि एकाद्या रानपक्षाचा आवाज मधूनच ऐकूं येत असल्याकारणानें त्यानें ऐकणाराचें मन अत्यंत प्रसन्न होत असे. जवळूनच पाण्याचा स्वच्छ प्रवाह खळखळ असा शब्द करीत स्वैर वृत्तीनें जात होता आणि समोरच श्रीवटेश्वराच्या देवालयाचा कळस अस्तंगत होणाऱ्या भास्कराच्या प्रकाशांत झळकत होता.



पुरंदर किल्ल्याचा देखावा.

ज्याप्रमाणें एकाद्या चित्रपटांतून देखावे डोळ्यांपुढून जावे त्याप्रमाणें हे देखावे आमच्या डोळ्यांपुढून जात असत. ह्यांतील प्रत्येक देखावा मनोवृत्ती उचंबळून सोडणारा होता. आणि जेथें आह्मी स्नानास उतरलों तेथें तर निसर्गाच्या शोभेची कमालच झालेली होती. पश्चिम दिशेकडील बहुतेक सर्व देखावा त्या प्रवाहांत प्रतिबिंबित झाला होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि अस्तमानास गेलेल्या सूर्याच्या प्रभेनें सोज्वलित झालेला तो देखावा त्या स्फटिकतुल्य पात्रांत कम्प पावत होता. ह्याच पाण्याचा एक प्रवाह एका गोमुखींतून जाऊन खालीं असलेल्या शिव-लिंगावर पडत होता आणि तसाच तो खळ-खळ करीत शेजारच्या कुंडांतून पलीकडे जाऊन शेजारच्या तृणांकुरांत अदृश्य होत असे. अशा रम्य स्थळीं स्नान केल्यानें आमच्या सर्व श्रमांचा परिहार झाला व ज्या सृष्टिकर्त्यानें हें इतकें सर्व उत्पन्न केलें त्याच्या लीलेचें अत्यंत कौतुक वाटून मन थक्क होऊन गेलें. त्या ठिकाणीं आह्मी बराच वेळ बसल्यावर घरीं जाण्याकरितां निघालों. अंधःकारानें आपलें साम्राज्य सुरू केल्यामुळें आल्या वाटेनें परत न जातां नीट रस्त्यानेंच जावयाचें आह्मीं ठरविलें. ज्या मंडळींना जास्त भुका लागलेल्या होत्या ते पुढें निघून गेले. आह्मी मात्र त्या पुलाच्या कठड्यावर वटेश्वराची शोभा पहात बसलों. सृष्टि शोभा पहात असतांना पुरंदर अत्यंत भेसूर दिसत होता. त्याच्याच शेजारच्या वज्र-

गडावर भयंकर वणवा लागलेला होता, व तो जळत जळत सर्व डोंगरावर लांबपर्यंत पसरलेला होता. ज्याप्रमाणें एकाद्या ज्वालामुखींतून अग्निरसाचा लोंढा बाहेर उसळावा त्याप्रमाणें त्या काळोख्या रात्रीं ती वणव्याची ओळ भासत होती. त्या वणव्याचा प्रकाश आसमंतात भागीं पसरला असून त्यानें पुरंदराला एक प्रकारचें भेसूर स्वरूप आणलें होतें.

इकडे गांवांत लुकलुकणाऱ्या दिव्यांना उत्तर देण्याकरितां म्हणूनच जणूं काय तारकांनीं आपापलीं डोकीं वर काढलीं. आणि ज्याप्रमाणें एकादी काळी चंद्रकळा खडींनें सुशोभित दिसावी त्याप्रमाणें तें आकाश तारकांनीं शोभित होऊन गेलें.

नंतर फारच रात्र झाल्यामुळें आह्मी घराकडे परतलों. घरांत येतों तों आमची सर्व मंडळी अंगणांत गप्पा झोडीत पडलेली होती. आमच्यांपैकीं एकदोघांनीं गांवांत जाऊन दूध आणलें; तें सकाळच्या चहाकरितां ठेवण्यांत आलें. नंतर दोन दोन घांस खाऊन सर्व मंडळी निजली. सुमारें चारच्या सुमारास आह्मी जागें झालों. ह्यावेळीं चांदणें स्वच्छ पडलें असून तारका आकाशांत चमकत होत्या. सर्वांनीं आपलीं प्रातःकृत्यें झपाट्यानें उरकून घेतलीं व एक एक चहाचा कप झोंकून सर्वजण बाहेर पडले. आमच्यांपैकीं एकानें घडचाळ घेतलेलें होतें आणि सर्व मंडळी ताज्या दमानें चालूं लागली. पुरंदराविषयीं उत्तेजनपर उद्गार काढीत व मराठ्यांच्या पोवाड्यांचा घोष करीत ही मराठ्यांची सेना मार्ग आक्रमूं लागली. चांदणें शुभ्र होतें; रस्ता स्वच्छ दिसत होता. अशा वेळीं टोळ्या करून आम्ही चाललों होतों. सहा मैलांचा रस्ता बरोबर सव्वा तासांत आक्रमून आह्मी पायथ्याशीं पोहोंचलों. तेथें थोडा वेळ बसल्यानंतर आह्मीं गड चढावयास सुरवात केली. रस्ता अतीशय उत्कृष्ट बांधलेला असून कांहीं कांहीं ठिकाणीं पूलही बांधले आहेत. किल्ल्याचा दरवाजा अतीशयच सुंदर व भव्य दिसतो. दोहों बाजूस दोन बुरुज व मध्यें काळ्या दगडांकाम मुळें एकाद्या पुष्ट गजाप्रमाणें हा दरवाजा लांबून फारच शोभिवंत दिसला.

दरवाजांतून आंत गेल्याबरोबरच एक जुनी परंतु अत्यंत प्रचंड तोफ ठेवलेली आहे. तिच्या पाठीमागें एक फुलझाडांचा सुंदर ताटवा आहे. पुणेरी पद्धतीनें बांधलेलीं घरें, त्यांच्या भोंवतीं असलेल्या बागा, उगवत्या सहस्रकराच्या किरणांत झणकटणारा सोनेरी क्रोस, हें सर्व पाहून आह्मी ब्रिटिश वसाहतींतच आहोंत असें वाटलें; आह्मीं गस्त घालणाऱ्याच्या वाटेवरून निघालों; त्यावेळेस आसमंतातचा प्रदेश फारच शोभिवंत दिसत होता. रात्रीच्या वणव्यानें जळून काळा दिसणारा वज्रगड, खालीं अत्यंत विस्तृत प्रदेश व तो सुंदर रीतीनें बांधलेला मार्ग व ती रम्य अशी सकाळची वेळ ह्यांनीं मनाला अत्यंत आल्हाद होत होता. कांहीं वेळानें आह्मी एका बागेपाशीं आलों. आंत कोणीही नाहीं हें पाहून एक प्रकारचें आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मध्यें एक बंगला तो शून्य होता. त्याच्या दोहों बाजूस 'सुरु' चीं झाडें असून मध्यें रस्त्यावर वाळू पसरलेली होती. ती इंग्रज लोकांची पुरण्याची जागा होती. निरनिराळ्या तऱ्हेनें व सुंदर रीतीनें कोरलेले क्रोस प्रत्येक थडग्यावर उभे होते. क्रोसच्या खालीं असणाऱ्या दगडावर पुरलेल्या मनुष्याचें नांव व त्याचे गुण लिहून ठेवलेले होते. प्रत्येक थडग्याशेजारीं 'एल्म' नांवाचें झाड होतें व तें प्रातःकालच्या मंद वायुलहरींनीं हालत असे. तो एकंदर उद्विग्न देखावा पाहून माझेंही मन उद्विग्न होऊन गेलें.

असो; पुढें ऊन फार होईल म्हणून आम्ही चालूं लागलों. वाट अतिशय रुंद असल्याकारणानें मी निश्चिंत मनानें व झपाट्यानें चाललों होतों. इतर सर्व मंडळी खूपच मागें पडली होती म्हणून मी सावलींत एका शिळेवर बसलों. तेथून कडेलोटाची जागा स्पष्टपणें दिसत होती. या वेळेस मी दमलेलों असल्याकारणानें

त्या शीतल छायेची व वायूची बहार फारच वाटली. शेजारच्या करवंदांच्या जाळ्यांतून वायु अतिशय कर्णमधुर आवाज करीत वहात होता. तो काय बरें कंठरवानें महाराष्ट्रास सांगत असेल? "ह्याच किल्यावर शिवाजी महाराजांनीं शत्रूंचीं मस्तकें टकरींसरशीं फोडलीं; ह्याच किल्यावरून, दिल्लीरखानावर मराठ्यांनीं अग्निवर्षाव केला; ह्याच किल्यावर मुरारबाजीनें अद्वितीय पराक्रम केला; ह्याच किल्यावर राष्ट्रोद्धाराकरितां मराठ्यांच्या रक्ताचे पाट वाहले; ह्याच किल्यावर बारभाईनीं राघोभरारींच्या भराऱ्या मागें परतविल्या आणि ह्याच किल्याच्या कड्यांवरून 'बालरुबाईच्या' मारेकऱ्यांचा कडेलोट झाला."

ह्या अशा किल्याकडे पाहून कोणा स्वाभिमानी पुरुषाचें अंतःकरण उचंबळून येणार नाहीं? ज्या कड्यावरून, ज्या तटांवरून श्रीशिवाजी महाराजांनीं स्वदेश भक्तीचें बीज महाराष्ट्रांत पेरलें तेच हे कडे, तेच ते हे तट. असें पाहून कोणच्या महाराष्ट्रीय पुरुषास अभिमान वाटणार नाहीं? प्रत्येकाची मनोदेवता त्यास एकसारखे प्रश्न करीत असेल—ज्यावेळेस छोट्या माधवर वसाहेबांना धरण्याच्या कटाची बातमी गंगाबाईसाहेबांना कळली त्या वेळेस त्यांचे 'दगा' 'दगा' असे उद्गार ज्याच्या दऱ्याखोऱ्यांत प्रतिध्वनित होऊन उठले तो हाच पुरंदर ना! ज्यांनीं पुण्याच्या स्मशानांत श्रीमंत नारायणरावांच्या जळत्या चितेसमक्ष, 'आतां या वंशाची (रघुनाथ रावाच्या) सेवा करावयाची नाहीं' अशी शपथ घेतली आणि त्या करितां ज्यांनीं श्रीमंतांचा बचाव करण्यासाठीं भीषण मध्यरात्रींच्या घनघोर पावसांत ज्या किल्याचा आश्रय केला तो हाच पुरंदर ना? ज्या मुत्सद्यांचें रक्त रघुनाथरावाच्या कृत्यांनीं सळसळून गेलें होतें, त्याला ज्याच्या शीतल वायुलहरींनीं शांत केलें तो हाच पुरंदर ना? ज्यानें मराठेशाहीच्या अस्तंगत होणाऱ्या रवीस मोठ्या उदात्त व गंभीरपणानें प्रणाम केला तो हाच पुरंदर ना? असे एक ना दहा प्रश्न आपली मनोदेवता आपणांस करिते, व आपल्या कर्तव्याविषयीं आपणांस जागृती उत्पन्न करून देते. मी बराच वेळ त्या शिळेवर विचार करीत होतों.



पुरंदर किल्यावरील श्रीकेदारेश्वराचें देऊळ.

इतक्यांत सर्व मंडळी येऊन पोहोंचली. व नंतर आम्ही सर्वांनीं ती फेरी पुरी केली. सरतेशेवटीं एका बुरुजापासच्या तोफेपाशीं बसून आम्हीं फराळ केला. बसल्या बसल्या मींही त्या तोफेचें चित्र काढून घेतलें.

नंतर आम्ही बालेकिल्यावर गेलों. नुसता बालेकिल्लाच सिंहगडायेवढा आहे असें म्हणतात. श्रीकेदारेश्वराची पूजा करण्याकरितां आलेला गुरव या वेळेस आमच्याबरोबर चालत होता. त्याला माहितीही पुष्कळ होती. त्याच्या हातांत एक तांब्या असून त्यांत कांहीं फुलें होतीं. त्याच्या अंगावर फक्त एक उपरणें असून तो आमच्या बरोबर गोष्टी सांगत चालला होता. कांहीं वेळानें आम्ही एका टाक्याशीं आलों. त्याचें पाणी अतिशय गार होतें. पुढें एक फारच मजेदार टाकें आहे असें त्यानें सांगितल्यावरून आम्ही कांहींजण तेथें गेलों. वाट अतीशय वाईट आहे. थोड्या वेळांत टाकें दिसूं लागलें. त्याची उघडी वाट एकाद्या सिंहाच्या

गुहेप्रमाणें दिसत होती. आंत हिरव्यागार वनस्पती उगवलेल्या असून त्या, त्या स्फटीकासारख्या स्वच्छ पाण्यांतून अतीशय सुंदर दिसत होत्या. मध्यें ११ खांब असून त्यांवर तो सर्व पर्वत आपलें आंग टाकून पडलेला होता. आंतील सर्व भाग एकाद्या छताप्रमाणें दिसत असून पाण्याच्या कडेचा तर अंतच लागत नव्हता. आणि बाहेरून ज्याप्रमाणें एकाद्या गुहेंत अंधार भासावा, त्याप्रमाणें तें टाकें अंधःकारानें आंतील बाजूस व्याप्त होऊन गेलेलें होतें. त्या टाक्याची शोभा थोडा वेळ पाहून आम्ही केदारेश्वरावर निघालों.

कांहीं वेळानें एक दगडी जिना चढून केदारेश्वरावर आलों. त्या वेळेस अप्रतिम व कधींही न पाहिलेला देखावा दिसूं लागला. आसमंतातचा प्रदेश सुमारें पांच पन्नास मैलांपर्यंत लांबवर पसरलेला दिसूं लागला. ढगांच्या धांवणाऱ्या छाया तर ५००० फुटांच्या उंचीवरून फारच मनोरम दिसत होत्या. एकीकडे सिंहगड—राजगड, तोरणा, प्रतापगड यांची ओळच लागून राहिलेली होती. जवळच मराठ्यांचा भगवाझेंडा फडफड शब्द करीत, मोठ्या विजयानें फडकत होता. प्रत्यक्ष अवलोकन केल्याशिवाय त्या देखाव्याचें वर्णन करितां येणेंच शक्य नाहीं. ज्याप्रमाणें अंतरिक्षांत स्वैरगतीनें भराऱ्या मारणाऱ्या वैमानिकास खालचा विस्तीर्ण भूप्रदेश दिसावा, त्याप्रमाणें आम्हांला सभोंवार पसरलेला विस्तीर्ण भूप्रदेश दिसूं लागला. आम्हीं त्या गुरवाबरोबर बराच वेळ गप्पा मारल्यानंतर सर्वजण खालीं येण्यास निघालों. पण मी व दोघां तिघां मंडळींचे मनांत एवढेंच पाहणें पुरें न होऊन आम्हीं सर्व बालेकिल्ला पायांखालीं घातल्याशिवाय परत जावयाचें नाहीं असा निश्चय केला व तो अंमलांत आणला. इतर मंडळी असंतुष्ट व संतप्त मनानें खालीं बुरजापाशीं जाऊन बसली. आम्हीं जे तेथून निघालों ते थेट तटापाशीं आलों;व तेथून रांगत रांगत व काठ्यांचा आधार घेत चाललों. कारण सर्व रस्त्यावर गवत पसरलेलें होतें व घसरण्याची तर फारच भीति होती. कांहीं वेळानें आम्हीं एका टाक्यापाशीं आलों. पाण्यांत पाय बुडविल्याबरोबर सर्व श्रमांचा परिहार झाला व शरीरांत नवीन चैतन्य आल्यासारखें वाटलें.

प्रत्येकानें तेथें हातरुमाल ओले करून घेतलेले होतेच. ते तोंडाला पुशीत आम्ही पुनः मार्ग आक्रमूं लागलों; खास त्यावेळेस आमच्या अंगांत मावळ्यांच्याच रक्ताचा संचार झाला असला पाहिजे. केव्हां केव्हां हातांतल्या काठ्यांनीं झुडपांनां जमीनदोस्त करीत, तर केव्हां नुसत्या घसरणाऱ्या गवतावरून उड्या मारीत, आम्हीं आलों. ऊन किंवा जमिनींतून वर उसळणाऱ्या वाफा ह्यांनां न जुमानतां प्रत्येक कड्यावरून व प्रत्येक बुरुजावरून आम्ही जाऊन आलों. आम्हीं जे येथें आलों ते परत जाण्याकरितां नव्हे अशी आमची पक्की खात्री होती आणि म्हणूनच या श्रमांची आम्हीं मुळींच पर्वा केली नाहीं. एकांत एक असणारे तीन बुरुज, कडेलोटाची भयंकर जागा. आंत बाराबारा खांब असणारीं टाकीं ह्यांसारखीं आश्चर्यकारक ठिकाणें पाहून सरते शेवटीं साडेतीन तासांनीं आम्हीं परत आलों. सकाळीं तीन वाजल्यापासून फक्त चहाशिवाय आमच्या पोटांत कांहीं असेल तर शपथ! दुपारचे चार वाजल्याची वेळ आलेली अशा वेळीं उशीर लावल्याबद्दल सर्वजण आमच्यावर संतापल्यास नवल नाहीं. परंतु आतां झाली गोष्ट झाली ती परत येत नाहीं असें सांगून आम्हीं त्यांचें सांत्वन केल्यावर आम्ही गड उतरलों. खालीं आल्यावर जवळ कांहींही नसल्यामुळें आम्हीं एक मैल चालत गेल्यावर वाडींत आलों. तेथें तांदूळ व डाळ विकत घेऊन कसातरी स्वयंपाक केला. गुरवानें आम्हांस अतीशयच मदत केली.जेवण मात्र त्या दिवशीं पक्वान्नापेक्षां सुंदर लागलें. त्या दिवशीं आम्हीं श्रम करूनही सुमारें १६ तास उपाशींच होतों. पिठलें भात झाल्याकारणानें सर्व जेवणास बहार आली होती. आम्ही सर्वजण आकंठ जेवलों व लगेच पुढच्या उद्योगास

लागलों. सर्व आटपेपर्यंत आठ वाजण्याचा सुमार झाला. आम्ही सर्व सासवड गांवीं येण्याकरितां निघालों.

येथें आमच्यांत फूट झाल्याकारणानें आम्हीं त्याच पावलीं गांवांत निघालों. ताऱ्यांच्या अस्पष्ट प्रकाशानें ती अंधेरी रात्र जास्तच भीषण दिसत होती. एकानें 'गोल्डन डीडस' सांगण्यास सुरवात केली व त्याच्या नादानें केवळ एक तास दहा मिनिटांनीं आम्ही गांवाच्या पुलावर आलों. बटेश्वराची काळी बाह्यरेषा ह्यावेळीं फारच खुलून दिसत होती. त्याच्या पायथ्याशीं पाण्याचा प्रवाह कलरव करीत वहात होता. आणि वाटावरच्या एकदोन दिव्यांचें प्रतिबिंब त्या प्रवाहांत स्पष्टपणानें उमटलेलें होतें. तो समय फारच शांत होता. फक्त रातकिडयांच्या झूं अशा आवाजानें ती शांतता भंग पावत होती. आकाशांत तारका आपल्या तेजानें चमकत होत्या व रजनीनाथानें आपलें मुख आज कोठें तरी लपविलें होतें. अशा प्रशांत समयीं आम्हीं शहरांत प्रवेश केला. घरीं आल्यावर आम्ही थोडयाच वेळांत झोपीं गेलों. सकाळीं सुमारें सहाच्या वेळेस जागे झालों व उठल्यानंतर इकडे तिकडे करण्यांतच वेळ जाऊन आठ वाजले. तेव्हां पुनः पूर्वीच्या ठिकाणीं जाऊन आंघोळ केली. नंतर तेथलीं बरीच देवळें पाहिलीं. देवळांच्या कुसर कामांत, तर पेशव्यांनीं इतकी कमाल केली आहे कीं मन आश्चर्यानें थक्कच होऊन जातें. प्रत्येक इंचाइंचावर मूर्ति कोरलेल्या आहेत व कलाकुसर केलेली आहे. कांहीं कांहीं खांब एका दगडाचे असून ते अत्यंत प्रचंड आहेत. पूर्वजांचेविषयीं हीं देवळें निःसंशय मनांत अभिमान उत्पन्न करतात. नंतर आम्हीं गांवांत आल्यावर बळवंतराव मेहेंदळ्यांचा वाडा पाहिला ह्याचें छत पाहण्यासारखें आहे. बारभाई येथेंच जमत असत असें म्हणतात. नंतर सुमारें ११ ला जेवून व ज्यांच्याकडे आम्ही उतरलों होतों त्यांचा प्रेमळ निरोप घेऊन आम्ही स्टेशनाकडे परतलों. साडेसहा मैलांचा रस्ता, वाटेला समांतर अशा शेतांतून काढून सुमारें १॥ तासांत आम्हीं आक्रमिला व नंतर हा रस्ता थोडासा सोनावडीच्या चढावरून गेल्याकारणानें तो चढ आम्हीं चढावयास सुरवात केली. बहुतेक चढ संपला आणि आतां उतरणीचा मार्गही सुरू झाला. स्टेशन दिसूं लागलें. इतक्यांत दुरून आगगाडी येतांनां दिसूं लागली. त्याबरोबर आमची धांवपळ सुरू झाली. खडकाळ मार्गालाही न जुमानतां आम्हीं भराभर उडया मारीत धावूं लागलों. तोंडानें मागल्यांनां हांका मारीत व सूर्याच्या तापानें तापलेल्या खडकांनां तुडवीत आम्ही जेवाची मुंबई करून धांवत होतों. स्टेशन अजून सुमारें पाऊण एक मैल होतें. शेवटीं डोंगर सरला आणि आगगाडीची व आमची गांठ पडली, तरी पण स्टेशन अजून लांबच होतें. मध्यें शेतेंची शेतेंच पसरलेलीं होतीं. सुदैवानें गाडीला सिग्नल न मिळाल्यामुळें आम्हाला स्टेशन गांठावयास वेळ मिळाला. त्यावेळेस असें वाटे कीं 'काय करायचें आहे पळून! आतां चालणेंच शक्य नाहीं. ह्या ऊन्ह ढेकळांवरच डोकें टेकून झोंपीं जावें' इतके त्या वेळेस आम्ही दमलों. छाती फुटते कीं काय असें क्षणभर वाटलें! इतरांच्या नांवानें आरोळ्या मारीत एकदाचें स्टेशनावर पोहोंचलों व सरतेशेवटीं प्रयत्नानेंच जिंकली!

---


# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यतः मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यांत **मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ** सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं **गाणींही** दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं **झोंपाळ्यावर** बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ **ओव्या** व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे **उखाणेही** बरेच दिलेले आहेत. किंमत. ४. **म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# प्रे मा बा ई.

ओंवी.

आतां ऐका प्रेमळ सज्जन ।
कथा रसिक निरूपण ॥
एक प्रेमाबाई म्हणवोन ।
श्रीभागवत श्रवण करीतसे ॥ ९ ॥

भक्तलीलामृत अ० ४२

पुराणश्रवणप्रिय व परम वैराग्यसंपन्न प्रेमाब या नांवाची एक भावीक स्त्री होती. तिला दहा वर्ष च्या एका मुलाशिवाय कोणीही नव्हतें. प्रेमाबाई ज्ञानामुळें "वैराग्य" प्राप्त झालें नव्हतें, तरी त भक्तीबळामुळें विरक्त झाली होती. ती नित्य परमेश्व भजन करून आपले दिवस काढीत होती. महीपत तिचें वर्णन करतात.—

ओंव्या.

नाठवे आपुलें आणि परावें ।
सम विषम नाहींच ठावें ॥
सर्वाभूतीं सारिखाच भाव ।
एकचि जीव मानीतसे ॥ ११ ॥
दया परम सर्वाभूतीं ।
श्रवणीं कीर्तनीं असे आर्ती ॥
याचक क्षुधितां यथाशक्ति ।
करितसे तृप्ती तयांची ॥ १२ ॥
संत साधु वैष्णव प्रेमळ ।
आणि या मंदरीं देतसे स्थळ ॥
नामस्मरण सर्वकाळ ।
सप्रेम मेळें करीतसे ॥ १३ ॥

भक्तलीलामृत अ० ४२

हा तिचा क्रम असे. ती नित्य गंगेचें स्नान करी, गोपालमूर्तीचें अर्चन करी आणि त्या गांवांत कोणी एक पंडित भागवत वाचीत असे, तें ती श्रवण करी. तेथें श्रीहरीचें चारित्र श्रवण करीत असतां त्या भाविक आणि प्रेमळ स्त्रीच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात. तिला देहाचें विस्मरण पडे व ती परमेश्वराचे ठायीं लीन होऊन जात असे. तिची भक्ति अत्यंत उत्कट होती, व श्रीगोपालकृष्णाचें चरित्र तिच्या डोळ्यापुढें स्पष्ट उभें होतें. त्याचें तिला वेड लागलें होतें. हा तीव्र भाव तिच्या पदांत पदोपदीं अतिशय स्पष्टपणें दिसतो. उदाहरणार्थ तिचें येथें एक पद देतों.—

पद

गडे हो कृष्णगडी आपुला ।
यमुना डोहीं बुडाला ॥ ध्रु० ॥
काळिया डसेल जरि हरिला ।
होइल विषबाधा त्याला ॥
हाका मारिल अपुल्याला ।
तुम्हि तरी स्वस्थपणें बसला ॥
आतां कोण काढिल रे त्याला ।
यमुना डोहीं बुडाला ॥ १ ॥
गाई त्याविणें हंबरती ।
वांसरें स्तनपान न करिती ॥
यापरी गोप सर्व रडती ।
मुखानें कृष्ण कृष्ण म्हणती ॥
आतां काय भेटेल अपुल्याला ।
यमुना डोहीं बुडाला ॥ २ ॥
यशोदा पुसेल जरि हरिला ।
तरि मग काय सांगु तिजला ॥

नंद मज म्हणेल त्वां नेला ।
हलधर मारिल रे मजला ॥
आता काय जावें गोकुळाला ।
काळजी प्रेमाबाईला ॥ ३ ॥

यावरून प्रेमाबाईचीं पदें किती प्रेममय आहेत तें कळेल. ती हरिकीर्तनास बसली कीं, तिची विदेही स्थिति होत असे. या तिच्या एकंदर स्थितीवरून वैष्णवभक्तांनीं तिचें प्रेमाबाई हें सार्थ नांव ठेवलें.

एकदां ती पुराण ऐकावयास जाणार, तोंच तिच्याकडे क्षुधित असे साधुसंत आले. यामुळें तिला मोठ्या अडचणींत पडल्यासारखें झालें. कारण पुराणश्रवणास न जावें तरी पंचाईत. बरें जावें तर संतसेवेस अंतर पडतें ! असा तिला मोठा विचार पडला. संत लोक घरास आले असतां देवपूजा करीत बसणें हें देवाला तरी कोठें आवडतें ? ती म्हणाली—

ओंव्या.

“ विष्णु पूजन करितां निश्चित ।
घरासि आले वैष्णव भक्त ॥
तरी देवपूजा सांडोनि त्वरित ।
तयांसि प्रणिपात करावा ॥ १९ ॥
बाहेर आले वैष्णव जन ।
त्यांचा न करोनि सन्मान ॥
करीत बसला देवतार्चन ।
तरी तें न माने हरीसी ॥ २० ॥
वेदोक्त मंत्र यथास्थित ।
ऐकोनिया वैकुंठनाथ ॥
म्हणे अपशब्द बोलतो मातें ।
कैसें यातें करावें ॥ २१ ॥
सुमन पुष्पें वाहतो बरीं ।
तरी ते दगड येती देवावरी ॥
ताडनासमान श्रीहरी ।
पूजा अंतरीं भावीतसे ॥ २२ ॥

असें जर संतसेवेस अंतर पडलें, तर त्यामुळें सर्व सुकृताचें वाटोळें होतें ! ” असा निश्चय करून ती घरांत दुसरें कोणी नसल्यानें संत सत्कारासाठीं घरीं राहिली, पुराणश्रवास गेली नाहीं, तथापि तिचें लक्ष देवाकडेच होतें. ती घरांत काम करीत होती, तरी तिचें लक्ष श्रीहरीकडेच होतें. तिनें आपल्या मुलास बोलावलें व त्याला सांगितलें, “ बाळा आज तूं पुराणाला जा, आणि बोवा सांगतील ती कथा सारी ऐक, व मग ती मला येऊन सांग; ” मुलगा म्हणाला “ अवश्य सांगेन बरें ” असें म्हणून तो पुराणास गेला.

इकडे प्रेमाबाई परमेश्वरस्मरण करीत घरांत कामकाज करीत राहिली. तिनें पाकनिष्पत्ती तयार केली. तों संतजनही गंगातीरावरून स्नान करून आले. तिनें त्यांची मनोभावें पूजा केली आणि त्यांस जेवूं घातलें. नंतर ती पुत्राची वाट पहात बसली, इतक्यांत तोही पुराणाहून आला. मग त्या मायलेकांनीं जेवण केलें. प्रहरभर दिवस राहिला होता. प्रेमाबाईनें पुत्राला जवळ बोलाविलें व त्यास आज काय कथाभाग झाला तो सांगावयास सांगितलें. मुलानें तिला तो कथाभाग इतक्या सुरेख रीतीनें वठवून सांगितला कीं, त्या प्रेमळ प्रेमाबाईचें सारें लक्ष कथामय झालें. तिला देहाचें विस्मरण पडलें. त्या कथाभागाचा असा संबंध होता कीं, बाळकृष्णाच्या दूध-दहीं सांडण्यानें यशोदा फार भंडावून गेली आहे, व त्याबद्दल कृष्णास शिक्षा देण्याची सोय करीत आहे. प्रेमाबाई या कथाभागांत अतिशय तन्मय झाली. तिला वाटलें यशोदा कृष्णाला खरीच शिक्षा करीत आहे. तो डोळ्यापुढील देखावा पाहून ती गहिंवरली; तिचा कंठ दाटून आला आणि डोळ्यांतून टपटप अश्रू पडूं लागले. ती म्हणाली “ आतां या संकटांतून माझ्या सांवळ्याला कोण बरें सोडवील ?

ओंवी.

एकदां लवंडिला गोरस ।
त्यास्तव बांधिला कृष्णास ॥

माय नव्हे, ते आहे लास ।
मजला भासे साजणी " ॥ ९५ ॥

इतकेंच नव्हे तर पुढें पहा काय प्रकार झाला तो—

ओंवी.

मग प्रेमाबाई पुत्रासि म्हणे ।
" संसार निरविला तुज कारणें ॥
मी सत्वर गोकुळीं जाऊन ।
सोडवीन कृष्ण स्व-हस्तें " ॥ ९६ ॥

असें भाषण बोलत आहे, तोंच तिचें प्राणोत्क्रमण झालें ! हा प्रकार प्रत्यक्ष समोर घडतांना पाहून त्या घरीं उतरलेले संतजन—

ओंवी.

एकमेकासि काय बोलती ।
" धन्य प्रेमाबाईची भक्ती ॥
हृदयीं चिंतोनी कृष्ण मूर्ती ।
झाली पावती निजधामा " ॥ ९८ ॥

भक्तलीलामृत अ० ४२

प्रेमाबाईचीं पदें अत्यंत प्रेमळ आहेत. तिचें एक पद वर दिलेंच आहे, आणखी येथें एक देतों.

पद.

गडे हो कृष्ण गडी आपुला ।
राजा मथुरेचा झाला ॥ ध्रु० ॥
टाकुनि काळा कांबळा ।
कासे पीतांबर कसिला ॥
टाकी मयोर पिच्छाला ।
जडित मुकुट घातला ॥
आतां काय ओळखील आपुल्याला ।
राजा मथुरेचा झाला ॥ १ ॥
टाकुनि गुंजांची दाटी ।
घातला कौस्तुभ श्रीकंठीं ॥
टाकुनि मुरली वेताटी ।
करिं घे आयुधें गोमटीं ॥
आतां काय बागुल भय त्याला ।
राजा मथुरेचा झाला ॥ २ ॥
गोधनें चारू विसरला ।
आतां तो नगरामध्यें शिरला ॥
नारीनें उरीं धरूनि चुरिला ।
आतां तो कुब्जेनें वरिला ॥
देतसे निजपद प्रेमेला ।
राजा मथुरेचा झाला ॥ ३ ॥


# विद्यार्थ्यांचें नोटबुक

## अथवा मराठी पहिल्या पुस्तकावरील नोट्स्.

लेखक रा. त्र्यंबक नारायण लेले, शाळामास्तर—पालक आणि विद्यार्थी यांना अत्यंत उपयोगी. पुस्तकांतील प्रत्येक धड्याचें मर्म समजावून त्याबरोबरच विविध माहिती देणारें आणि मनोरंजन करणारें असें हें एकच नोटबुक आहे. ह्याची रचना, प्रचलित गद्यपद्यार्थबोधाहून फार निराळ्या प्रकारची आहे. यास भारदस्त मराठी पत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. हें पुस्तक सर्वसाधारण लोकांस घेतां यावें म्हणून ह्याची किंमत कमी करून दोन आणे ठेविली आहे. तरी ५ प्रतीला ८ आणेच पडतील. आमचेकडे मागणी करावी.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चतुर्थांश पद्धति किंवा रेघाचें अपूर्णांक.

( लेखक—ग० स० खरे. )

या विषयीं आपले मासिकाचे सप्टेंबरचे अंकांत गुणाकार करतांना पैसे रूप मध्यें आणून कांहीं अंकगणितकारांनीं लोकांची दिशभूल कशी केली आहे हें दाखविलें आहे व फक्त कै० केरूनाना छत्रे यांच्या अंकगणितांत मात्र याचें शुद्धरूप दिसतें असें सांगितलें आहे. गुजराथींतही रेघांच्या अपूर्णांकाचा विषय आहे. तेव्हां त्या देशांत या अपूर्णांकाचें काय स्वरूप झालें आहे, हें पहाण्याकरितां गुजराथी अंकगणिताचीं पुस्तकें पाहिलीं. त्यांत मात्र शुद्ध स्वरूप अजून कायम आहे. गुजराथींत चतुर्थांश पद्धतीस आणपाणना अपूर्णांक म्हणतात. कै० लालशंकर उमयाशंकर त्रवाडी यांचे अंकगणिताची एक प्रत येथील अनाथ विद्यार्थिगृहाचे लायब्ररींत ठेविली आहे. कोणाची इच्छा असल्यास त्यांनीं तेथें पहावी.

या चतुर्थांश पद्धतीचा उपयोग अव्वल इंग्रजींत इंग्रजी अधिकारी यांनीं जो करून घेतला त्याचा विचार केला म्हणजे बोलके लोक व कर्ते लोक यांतील फरक डोळ्यापुढें पूर्णपणें उभा राहतो. 'बोलाची कढी' 'बोलाचा भात' करण्यास सामान लागत नाहीं, चूल लागत नाहीं, सरपण लागत नाहीं, कांहीं लागत नाहीं आपल्याकडे असलेल्या ज्या चार चांगल्या गोष्टी आहेत त्यांची खरी किंमत ओळखण्याची ही कुवत आमच्यांत राहिली नाहीं. चतुर्थांश पद्धति पूर्वीं निर्मळ होती आता बिघडली म्हणून आमचें जें नफा नुकसान झालें त्याजविषयीं कोणीं कंठशोष केला तरी त्याचें आम्हास काय? जोंपर्यंत एका इयत्तेंतील मुलगा वरच्या वर्गांत जातो तोंपर्यंत पालकांनीं या गोष्टीची उठाठेव का करावी? शिक्षक लोक म्हणणार कीं आम्ही शाळाखात्यानें मंजूर केलेलें अंकगणित शिकवितों, प्रत्येक इयत्तेंतील भाग यथाक्रमानें मुलांकडून करून घेतों, तेव्हां तुमची कर्मकटकट आम्हांला नको. सुपरिंटेंडेंटची दृष्टि शाळेंत येणाऱ्या मुलांची संख्या व सरकारांतून मिळणारी ग्रँट यांजकडे. मग असल्या शुष्क विषयाकडे नजर फेंकण्यास फुरसत आहे कोणास? आमच्या किती तरी गोष्टी या प्रकारच्या आमच्या निष्काळजीपणामुळें बुडाल्या आहेत व पुढेंही बुडतील?

परंतु ज्यांस राज्यें मिळवावयाचीं होतीं, व मिळविलेलीं राज्यें राखावयाचीं होतीं, त्यांची दृष्टि फार निराळी असलीच पाहिजे हें उघड आहे आमच्यासारखे गबाळे राहते तर त्यांचे हातून असल्या महत्वाच्या गोष्टी होत्याच ना! गोष्ट कितीही हलकी असो तिचा ते पूर्ण विचार करून उपयोगाची असल्यास ती लागलीच ग्रहण करणार. मग ती परदेशी असो कीं स्वदेशी असो! आपल्या राज्याचे हिताकरितां ते तिचा उपयोग करणारच. अव्वल इंग्रजींत जमिनीची मोजणी करण्याची जरूर राज्यकर्त्यांस दिसून आली. पैमाशखात्याची योजना झाली. थोड्या पगारावर पुष्कळ काम करून घेण्याची इच्छा असणें स्वाभाविक होतें. अर्थात त्यांची बुद्धि काम करावयास लागली. क्षेत्रफळ काढणें म्हणजे गुणाकार करणें. गुणाकार करण्यावरच खर्चाचा अंदाज. अर्ध्या वेळांत गुणाकार होत असल्यास अर्ध्या खर्चांत काम व्हावयाचें व मोजणी करणारे तरी हजारों लागावयाचे. हिंदी लोकांतील चतुर्थांश पद्धतीच्या गुणाकाराची सुलभता त्या लोकांच्या लक्षांत आली. दशांश किंवा द्वादशांश या दोन्हींहून चतुर्थांश पद्धति अधिक चांगली हें त्यांना स्पष्ट दिसलें. व या चतुर्थांश पद्धतीचा उपयोग करण्याकरितां काय केलें पाहिजे हें ते पाहूं लागले. आपल्या काठ्या, पांड, बिघा त्यास ध्यावया-

चेच नव्हते; पण त्याची १०० ( links ) दुवे म्हणजे ६६ फुटी सांखळी व १० चौरस सांखळ्या म्हणजे १ एकर. हें तर चतुर्थांश पद्धतीस सोईचें नव्हतेंच. पण ४० ( poles ) काठ्या म्हणजे रूढ व ४ रूढ म्हणजे १ एकर हेंही चतुर्थांश पद्धतीस सोईचें नव्हतें. मग त्यांनीं थोडासा आपलेपणा सोडला व नवीनच कोष्टक तयार केलें. ६६ फुटी सांखळी बोजड वाटल्यामुळें ३३ फुटी सांखळी केली, व त्याचे १६ दुवे करून प्रत्येकास आणा हें हिंदी नांव दिलें. चौरसाचें कोष्टकही नवेंच तयार केलें. एक आणा लांब व एक आणा रुंद क्षेत्र म्हणजे एक प्रति आणा. एक सांखळी लांब व एक आणा रुंद क्षेत्र म्हणजे एक आणा. एक सांखळी लांब व रुंद क्षेत्र म्हणजे एक गुंठा ( गंटरचा अपभ्रंश ). व ४० गुंठे म्हणजे १ एकर. हें गंगाजमनी कोष्टक एकदां तयार झालेवर मग कांहीं अडचण उरली नाहीं. गुणाकार येणारे लोक देशांत तयार होतेच. त्यांना शंकुसांखळी देऊन मोजणीदार बनविलें. त्यांच्या टोळ्यांनीं आपल्या या देशांतील प्रत्येक जमिनीच्या तुकड्याची मोजणी केलेली आहे.

पैमाश खात्यांतील प्रत्येक मोजणीदारानें ' वसले ' बुकांत ३ पासून ४ लाखपर्यंत रेघाचे गुणाकार आपल्या नौकरीच्या मुदतींत करून ठेविले आहेत. त्यामुळें सरकारी दप्तरांत कोट्यावधि गुणाकार आहेत. ल्याड रेकार्डचें कोणतेंही दप्तर पाहिल्यास या गोष्टीचा प्रत्यय येईल. या दप्तरांतील गुणाकार कोणत्या पद्धतीचे आहेत ? नवीन अंकगणितकारांनीं स्वकपोलकल्पित काढलेल्या पै पद्धतीचें नाहींत, तर कै० केरुनानांच्या अंकगणित पद्धतीचेच आहेत. या झाल्या मागील गोष्टी; पण हल्लीं निर्भेळ गुणाकाराची पद्धत कोठें प्रचारांत आहे काय हें पाहिलें पाहिजे. बडोदें राज्यांत रिविजन सर्वेचें काम सुरू आहे. तेथें क्षेत्रफळ गुणाकार करून काढीतच नाहींत. मोजलेल्या क्षेत्राचा नकाशा काढतात. व क्षेत्रमापन यंत्रानें ( Planimeter ) क्षेत्रफळ येईल तें दाखल करितात, यामुळें गुणाकाराचे श्रम त्यानीं पूर्णपणें वांचविले आहेत. परंतु इंग्रजी अंमलांत ही गुणाकाराची पद्धति आज मितीस अंमलांत आहे. पोटनंबर पाडते वेळीं याचा उपयोग करतातच. पण इरिगेशन खात्यांत जमिनीस पाणी देतात त्या क्षेत्राचें माप रेघाचे गुणाकारानेंच काढितात. याप्रमाणें सर्वत्र निर्भेळ चतुर्थांश पद्धति चालू असतां कांहीं अंकगणितकारांची दिशाभूल कशी झाली याचे कारणाचा शोध होणें ही एक इष्ट गोष्ट आहे.

ज्या इंग्रज गृहस्थांनीं आमच्यांतील चतुर्थांश पद्धतीचा चांगुलपणा ओळखून त्याचा आपल्या कोष्टकांत एकजीव करून घेतला त्याचें नांव इतिहास-संशोधकांनीं शोधून काढावें. ' गुणाः पूजास्थानं ' हें मनांत आणून या लोकांनीं जित लोकांतील चांगल्या गुणांचा मिलाफ करण्याची संधी वायां जाऊं दिली नाहीं हीच खऱ्या सुधारणेची दिशा. नाहीं तर आमच्या चांगल्या गोष्टी कोणत्या हें धड ओळखण्याचेंच आम्हांस सामर्थ्य नाहींसें झालें आहे, मग त्या जतून ठेवणें कसें होणार, इकडे कोणी लक्ष देईल काय ?


# चिमुकल्या गोष्टी, भाग १ ते ६.

या पुस्तकांत रोज **व्यवहारांत** घडणाऱ्याच **गोष्टी** दिलेल्या आहेत; पण त्या इतक्या **मोहक, मनोरंजक व मार्मिक** लिहिल्या आहेत कीं, **इसापनीतींतील** गोष्टीं प्रमाणें या गोष्टींतील **तत्त्वबोध** गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज बसत जातो. पुस्तकें **मोठ्या टाइपांत सुंदर, जाड, ग्लेज** कागदावर छापिलेलीं असून प्रत्येक गोष्टीच्या आरंभीं **कथानकाचें सुंदर चित्र** दिलेलें आहे. प्रत्येकीं किंमत ८४.

**म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# गप्पागोष्टी.

एकजणानें अरिस्टॉटलला विचारलें:—‘ लोक खोटें बोलतात त्यापासून ते मिळवितात तरी काय ? ’ अरिस्टॉटलनें उत्तर केलें:—‘ लोकांचा गैरविश्वास. ’

* * * *

एका विनोदी गृहस्थानें वकीलांची व्याख्या अशी केली आहे. ‘ जे तुमची इस्टेट तुमच्या प्रतिस्पर्ध्याजवळून सोडवून आपल्याजवळ ठेवितात ते. ’

* * * *

एक तत्त्ववेत्ता म्हणतो—‘ म्हातारपणीं लहान व्हावें, आणि लहानपणीं म्हातारे असावें. ’ म्हणजे म्हातारपणीं लहानपणची आनंदीवृत्ति असावी, आणि लहानपणीं वृद्धमाणसाचा विचारीपणा असावा.

* * * *

उदार अंतःकरणाच्या माणसाची स्थिती गरिबीची असावी, ही मनाला मोठी उद्विग्नता आणणारी गोष्ट आहे. पण कृपणाजवळ तिजोऱ्याच्या तिजोऱ्या नुसत्या भरलेल्या असतां,त्याला आणखीही द्रव्य मिळत असावें, ही दैवलीला मात्र त्याहून अधिक उद्विग्नकर आहे.

* * * *

लांकडी सामान थोडेंसें कोठें पिचलें, मोडलें, तर आपण त्याला एक चूक मारून बसवितों. या चुकेला ( तारखिळ्याला ) वरच्या अंगाला दोन चार चरे पाडलेले असतात; ते शोभेकरितां अमतील झाले, असें आपणास वाटतें. पण ते मुद्दाम उपयोगी म्हणून पाडलेले असतात. हा खिळा जर खालपासून वरपर्यंत सगळा अगदीं गुळगुळीत असेल, तर तें लांकडी सामान पुन्हा लवकरच खिळखिळीत होऊन, तो खिळा वर निघून येईल. पण त्याला वर पाडलेल्या चऱ्यांमुळें तो जरा ज्यास्त पक्का बसतो, व लवकर निघून येत नाहीं.

याच कारणांमुळें स्क्रू खिळ्यांपेक्षांही जास्त पक्का बसतो.

* * * *

चार चाकांच्या गाड्या पहाव्या तों त्यांचीं पुढलीं दोन चाकें मागल्या चाकांपेक्षां नेहमीं लहान असतात. तीं अशीं लहान कांहीं ज्यास्त सुबक दिसतात म्हणून केलेलीं नसतात; त्याचें कारण वेगळेंच आहे.

गाडीचा घोडा वळविला म्हणजे त्याच्या बरोबरच पुढल्या चाकांमधील आंस फिरावा अशी व्यवस्था केलेली असते. हा आंस फिरला म्हणजे पुढलें एक चाक गाडीच्या खालीं जातें; व अशा तऱ्हेनें सबंध गाडी उजवीकडे अगर डावीकडे वळते. याप्रमाणें पुढील चाक गाडीखालीं जावें लागतें म्हणून तीं दोन्हीं चाकें लहान केलीं असतात.

* * * *


## मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

ह्यांत प्रथम लहान मुलांना दिशा, नंतर व्याख्या व पाण्याचे विभाग समजावून देण्याकरितां लहान लहान रंगित नकाशे दिले आहेत. पुढें पर्वत, नद्या, आगगाडीचे रस्ते, इलाख्याचे मुख्य भाग वगैरे निरनिराळे नकाशे देऊन स्पष्ट दाखविले आहेत; भूगोलासारखा विषय लहान मुलांस समजावून देण्यास ह्या पुस्तकाचा उपयोग चांगला होतो. किंमत ८१. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

म्याट्रिक्, स्कूल्फायनल् व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरण, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत **मराठी भाषेंतील** सुमारें **दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय** (**Idioms**) आणि **म्हणी** व अवांतर **शेंकडों संप्रदाय,** यांचें **शास्त्रीयरीत्या वर्गीकरण** केलेलें असून त्यांचें मराठींत **सोपपत्तिक स्पष्टीकरण** केलेलें आहे, व **भरपूर उदाहरणेंही** दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणाच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील **शेंकडों अवतरणें** दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे **न्याय, ज्योतिषांतील शब्द, संस्कृत वाक्यें** किंवा **वाक्यांश,** वगैरेंचें खुलासेवार **स्पष्टीकरण** केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय त्यांच्या जोडीला दिल्या आहेत. पुस्तकांत एकादा विशिष्ट **शब्द** पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक, स्कूलफायनल वगैरे परीक्षांच्या **उमेदवारांस,** तसेंच **मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास** करणाऱ्यांस हें **पुस्तक अत्यंत उपयोगी** असें झालें आहे. **रा० रा० विद्याधर वामन भिडे बी. ए.** यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या **जातीचें** व इतक्या **विस्ताराचें पुस्तक** मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं **पायका टाइपाचीं** पानें सुमारें ५०० वर असून **बांधणी कापडी व जाड पुठ्याची** आणि मजबूत अशी आहे. किंमत दीड रुपया. **ट० हं० व्हीं० पी० सह २ आणे.**

# निबंधलेखन आणि अनुवाद.

म्याट्रिक्युलेशन, स्कूल्फायनल्, **पब्लिक् सर्व्हिस्,** वगैरे परीक्षांस **मराठी भाषा हा** एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत **निबंध** लिहावा लागतो. व दिलेल्या **पद्यांचा अनुवाद** करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें **सोयीचें पुस्तक** नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं **मथ**ळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे **दोन भाग** असून पहिल्यांत **निबंध-लेखन** हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून **निबंधांचे तीन प्रकार** कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या **सबरवाऱ्या** कशा पाडाव्या, हें **उदाहरणांनीं स्पष्ट** करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयावर **सुमारें ५० निबंध** लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत **अनुवाद** म्हणजे काय हें **सांगून तो कसा** करावयाचा, ह्यासंबंधाच्या **तपशी-लवार सूचना** देऊन अनेक प्रकारच्या **पद्यांचा अनुवाद** करून दाखविला आहे; आणि **नंतर कांहीं पद्यसमूह** विद्यार्थ्यांना **अनुवाद करावयासाठीं** दिले आहेत. किं. ८८ ट. ख. ६२.

### कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

**आ**जपर्यंत **राजा रविवर्मा** यांचीं चित्रें लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या रंगांत **बरींच** छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व **चित्रें त्या त्या चित्राच्या** परिपूर्ण पौराणिक **माहितीसह एकवटलेलीं** अशीं **पुस्तकरूपानें** छापल्यास त्यांची फार **जरूर** आहे, अशा कांहीं लोकांच्या **सूचना** आल्यावरून आम्हीं वरीलप्रमाणें **राजा रविवर्मा** यांचीं **निवडक चित्रें बुकसाई-जमध्यें** छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ **चित्रें वर्णनासह दिलेलीं** असून पुस्तकास **कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर)** वापरलेला आहे. **मुखपृष्ठावर राजा रविवर्मा** यांच्या **प्रमुख चित्रांपैकीं** शकुंतला-जन्माचें **चित्र तीन रंगांत सुबक** छापलेलें आहे. त्यामुळें **पुस्तकास विशेषच शोभा** आलेली आहे, किं० १ रुपया.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

भगवद्भक्त हनतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांसारख्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधवराव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनी केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.

ह्या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेले आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरदार आहे मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेले असून किंमत अवघी ०४ आ. ठेविली आहे ट. ह. सह किं. ०४०६.

# सचित्र ] रुक्मिणी स्वयंवर. [ सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांत तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुसत्या रफ कागदावरील पोथीस ०६ व ग्लेज कागदावरील ०८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह कि. ०१० व ०१२ आणे. [illegible]

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

किंमत ०१२ ] चित्रयुक्त [ किंमत ०१२

# बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

ह्यात अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव त्या निरनिराळ्या रंगात दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी. म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.

हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ४१८ सदाशिव पेठ—पुणें शहर येथें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. जून सन १९१६ अंक ६.

# मराठी शालापत्रक

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मिताहार. | ....१०३ |
| कीर्तीचें महत्त्व. | ....१०५ |
| महायुद्ध आणि शिक्षण. | ....१०९ |
| कान्होपात्रा. | ....१११ |
| यात्रांचें महत्त्व. | ....११४ |
| नवीन शिक्षणपद्धति. | ....११६ |
| अमेरिकेंतील हिंदू विद्यार्थी. | ....११७ |
| शास्त्रीय माहिती. | ....११९ |
| गप्पागोष्टी. | ....१२२ |

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !! विक्रीस तयार !!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१३.

व्यापाऱ्यांस कमिशन.

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात कि. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

// मराठी शालापत्रक. //

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. जून सन १९१६ अंक ६.

# मि तां हा र.

पचनेंद्रियें चांगल्या स्थितींत ठेवण्यास आपणांस काय केलें पाहिजे, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. विचारांतीं व अनुभवांतीं आपणांस असें समजून येईल कीं, आपणांस मिताहारी बनलें पाहिजे; म्हणजे भुकेपेक्षां दोन घांस नेहमीं कमीच खाल्ले पाहिजेत. भुकेपेक्षां थोडें कमी खाण्याच्या ऐवजीं जास्त खाल्लें तर पचनेंद्रियांना त्यांच्या शक्तीच्या बाहेर काम करावें लागतें; काम जास्त पडल्यामुळें तीं कंटाळतात व तें अर्धवटच केलें जातें; व त्यामुळें अजीर्ण, मलावरोध इत्यादि अनेक रोग उद्भवतात. अन्नापासून पुष्टी येते खरी; परंतु पुष्टी येण्यास किती अन्न खाल्लें पाहिजे याचा विचार आपण बहुतकरून करीत नाहीं. जितकें अन्न अधिक, तितकी पुष्टीहि अधिक अशा कित्येकांचा समज असतो. परंतु खरोखर तशी पुष्टी येत नाहीं. आपण जें अन्न खातों त्यापैकीं जितकें पचवूं शकतों, तितक्याचेंच रक्त तयार होतें; व बाकीचें न पचलेलें अन्न शरिरांत अनर्थ करितें. अन्नांतील पिष्टमय भाग चांगलें चर्वण करून खाल्ल्यास पचतो. चांगलें चर्वण न केल्यास तो चांगला पचत नाहीं व हें काम दुसऱ्या इंद्रियांवर पडल्यामुळें, त्यांजकडून त्यांचीं स्वतःचीं कामें व हें काम नीट होत नाहीं. याचा उल्लेख मागें एका निबंधांत केलेलाच आहे.

अन्नांतील मांसवर्धक द्रव्यें न पचतां शरिरांत राहिल्यास त्यांपासून युरीआ व दुसरे अनेक विषारी पदार्थ उत्पन्न होतात. असें झालें असतां शरिरास नाना तऱ्हेचे रोग जडतात. स्नेहमय द्रव्यांचें पचन न होऊन, तीं शरिरांतच राहिलीं तर अंगांत चर्बी उत्पन्न होते; व

शरीर वातबद्ध होतें. जेव्हां जेव्हां आपण बोजड, वातबद्ध व स्वतःला न तोलण्यासारखीं शरीरें पाहतों तेव्हां तें तसें होण्याचें कारण वरीलच होय. मांसवर्धक व स्निग्ध द्रव्यें फारशीं खाऊं नयेत. पिष्टमय द्रव्यें थोडीं जास्त खाल्ल्यास हरकत नाहीं. परंतु तीं जर नीट चावून खाल्लीं तर बेताचींच जातील. कारण त्याचें प्रमाण जास्त झाल्यावरोबर आपल्या दांतांकडून इषारा येईल कीं, आतां खाणें पुरें करणें चांगलें. मिताहारी लोक निरोगी, सशक्त असे असतात; व ते पुष्कळ वर्षें जगतात असा अनुभव आहे. जपानी लोक मिताहारी आहेत. जपानांत दिवसभर काम करणारे मजूर लोक देखील नेहमीं मिताहार करितात तेथें त्यांच्या जुजुत्स नामक शारीरिक शिक्षण पद्धतीप्रमाणें व्यायाम करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मिताहाराचा नियम सक्तीनें पाळविला जातो. जपानी लोकांची आरोग्य शक्ति यांबद्दल ख्याती आहेच.

## मांसाहार.

कित्येक लोक मांसाहारापासून शक्ति वाढते, काम करण्याची ताकत येते व काटकपणा वाढतो असें प्रतिपादन करितात. उदाहरणाकरितां इंग्लिश लोकांकडे बोट दाखवितात. मांसाहाराविरुद्ध पुष्कळ सबळ कारणें आहेत; त्यांपैकीं कांहीं मुख्य आज सांगण्याचा विचार आहे. मनुष्याच्या दांतांवरून व बाकीच्या पचनेंद्रियांच्या रचनेवरून मनुष्य हा वनस्पत्याहारी प्राणी दिसतो, मांसाहारी दिसत नाहीं. मांसभक्षक प्राण्यांचीं पचनेंद्रियें जशीं असतात तशीं मनुष्याचीं नाहींत, याकरितां मांसाहार हा मनुष्याचा योग्य व स्वाभाविक आहार नव्हे.

मांसाहारापासून ईश्वरनिर्मित प्राण्यांचे हाल होतात. त्यांना त्रास व यातना सोसाव्या लागतात व त्यांची हत्या होते. आपलें पोट भरण्याकरितां व जिभेचें समाधान करण्याकरितां लाखों अनाथ व निरुपद्रवी प्राण्यांची हत्या करणें हें नीतिदृष्ट्या गैर आहे. हें पातक आहे. मांस विकणारे व खाणारे या पापाचे वांटेकरी आहेत. मांसाहारी लोकांचा स्वभाव रागीट, खुनशी, तापट व चिडखोर असा होतो. मांसाहारानें मनुष्याच्या शारीरिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नतीस व्यत्यय येतो. मांसाहारी लोक व्यसनी बनतात व गुन्हे करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति होते. आरोग्यदृष्ट्या पाहिलें असतां, मांसाहारापासून अनेक रोग जडण्याचा व मनस्वी दुःख होण्याचा संभव आहे. गुरें ढोरें, मेंढ्या बकरीं यांना जे अनेक रोग असतात, ते रोग त्या जनावरांचें मांस खाणाराला जडतात; व तेच रोग परंपरेनें चवथ्या पिढीपर्यंत त्यांच्या वंशजांना प्राप्त होतात. तसेंच मांसाहारापासून शरिरांत युरीआ ( Uric acid ) नांवाचा विषारी पदार्थ व त्यापासून तसेच दुसरे विषारी पदार्थ उत्पन्न होतात. हे सर्व विषारी पदार्थ अतिव्यायामानें अगर दुसऱ्या कोणत्याही साधनांनीं घर्मरूपानें बाहेर काढले पाहिजेत. ते शरिरांत राहिल्यास अनेक रोग उत्पन्न करितात.

मांसाहाराची आवश्यकता कांहीं दिसत नाहीं. मांसाहारापासून मांसवर्धक द्रव्यें शरिरास मिळतात, हें खरें आहे. परंतु गहूं, सर्व प्रकारच्या डाळी, दूध इत्यादि पदार्थांपासूनही आपणांस मांसवर्धक द्रव्यें मिळतात. या पदार्थांच्या सेवनानें आमचे कांहीं तोटे होत नाहींत व हत्येचाहि दोष लागत नाहीं. जे लोक मांसाहार करण्याकरितां इंग्लिश लोकांचें उदाहरण पुढें मांडितात, त्यांनीं जपानांतील लोकांच्या आहाराविषयीं थोडासा विचार करावा. जपानांतील लोक मांसाहारी नाहींत. त्यांचें मुख्य अन्न तांदूळ हें होय. ते लोक भाजीपाला व मासे यांचा बराच उपयोग करितात हें खरें; परंतु त्यांची सर्व भिस्त तांदळावरच अवलंबून आहे. नुकतेंच रशिया व जपानचें मोठें युद्ध झालें. त्यांत भातखाऊ जपाननें मांसाहारी व प्रबळ अशा रशियाचा पराभव केला. या युद्धांत रशियन व जपानी लोकांना "हस्ताहस्ती, केशाकेसी" असेही लढण्याचे प्रसंग बरेच आले. त्यांत देखील भात खाणारे जपानी लोक

मांसाहारी रशियन लोकांपेक्षां शारीरिक बलानें श्रेष्ठ आहेत असेंच आढळून आलें. याउपर तरी मांसाहारानें शक्ति येते व वनस्पत्याहारानें ती येत नाहीं, हा समज दूर होईल अशी आशा आहे.

### आहाराविषयीं सूचना.

आहाराविषयीं कांहीं उपयुक्त सूचना करून हें प्रकरण संपवितों. आहार थोडे असल्यास, तो चांगली भूक लागल्यावर घ्यावा. भूक लागली असतां कोंडा देखील मांड्यापेक्षां गोड लागतो; पण तीच भूक जर लागलेली नसली तर उत्तम उत्तम पक्वानें देखील बिनचव व कडू अशीं लागूं लागतात; व तीं तशींच खाल्ल्यास अपायकारकही होतात. “ भुकी तो सुखी ” ही म्हण प्रचारांत आहेच. सर्व शरिराला चांगला व्यायाम झाला म्हणजे चांगली भूक लागते; याकरितां नाना तऱ्हेचे व्यायाम करावे. दिवसांतून दोन वेळां जेवावें. मध्यंतरीं फारसें खाण्याची संवय ठेवूं नये. अन्न नेहमीं एकाच प्रकारचें नसावें. त्यांत वरचेवर फेरबदल करावा, म्हणजे कंटाळा येणार नाहीं. पक्वान्नें फारशीं विशेषतः मसाल्यांनीं युक्त अशीं खाऊं नयेत. स्नेहमय द्रव्यें फार खाऊं नयेत. तळलेले जिन्नस खाण्याचे कामीं फार जपून असावें. फार तिखट, खारट व आंबट असें अन्न खाऊं नये. मांस न खाणें हें बरें. फार मांस केव्हांही खाऊं नये. मोठ्या कष्टानें व श्रमानें होणाऱ्या पक्वान्नापेक्षां साधें अन्न खाण्याकडे मनाची प्रवृत्ति असावी. अन्न सावकाश चांगलें चर्वण करून खावें. अन्न अगदीं तोलून खाऊं नये व खातांना कोणत्याही प्रकारची भीति मनांत धरूं नये.

---

# कीर्तीचें महत्त्व.

( लेखक—महादेव विष्णू खरे–खेड )

या जगांत प्रत्येक मनुष्य आपलें वैभव कसें वाढेल या बाबतींत गुंग झालेला आढळून येतो. परंतु खरें पाहतां उत्तम वैभव फारच थोड्यांस प्राप्त होतें. आज या भूतलावर ज्या मोठमोठ्या घडामोडी झालेल्या आहेत अथवा होत आहेत त्या सर्व आपलें वैभव वाढविण्याकरितां मनुष्यानें केलेल्या आहेत असें आढळून येईल. मात्र खरें वैभव कशांत आहे हें फारच थोड्या लोकांस कळतें. साधारणतः कित्येक लोकांची समजूत अशी झालेली दिसून येते कीं, आपले जवळ पुष्कळ संपत्ति असली म्हणजे आपणास आपोआपच वैभव प्राप्त होईल, इतकेंच नव्हे तर अनुपम सौख्यही मिळेल. परंतु ही समजूत भ्रामक आहे. खरें वैभव अगर सुख संपत्तींत नाहीं असें आपणांस थोर पुरुष सांगत आले आहेत, व त्यांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. कारण—

Can wealth give happiness? look around and see,
What gay distress! what splendid misery!
Whatever fortunes lavishly can pour,
The mind annihilates and calls for more.

( Poet-Young- )

यावरून असें दिसून येईल कीं जशी जशी संपत्ति घरांत येऊं लागते तशी तशी अधीक मिळविण्याबद्दल मनांत हांव उत्पन्न होते. यामुळें चित्तांत संतोष राहात नाहीं आणि जेथें संतोष नाहीं तेथें सौख्य कोठून मिळणार ? गिझनींचे महमुदानें लहानमोठ्या एकंदर २४ स्वाऱ्या हिंदुस्थानावर केल्या, अनेक राजांकडून करभार घेतला, पुष्कळ संपत्ति लुटली, परंतु इतकें झालें तरी त्याची धनतृष्णा नाहींशी झाली नाहीं. त्यानें अंतकाळीं आपण लुटून आणलेली अपार संपत्ति आपले पुढें आणून ठेवण्यास प्रधानास सांगितलें. ती सर्व पाहिल्यावर त्याचे डोळ्यांत अश्रु आले, व एवढी संपत्ति दुसऱ्याचे स्वाधीन होणार असें वाटल्यावर त्याला अत्यंत दुःख झालें. यावरून असें दिसून येईल कीं, संपत्ति प्राप्त होऊनही सुख नाहीं. शिवाय घरांत संपत्ति असली म्हणजे ती कोणी हिराऊन नेईल म्हणून नेहमीं काळजी करावी लागते. कोणावर विश्वास ठेवण्याची सोय नाहीं. अशा प्रकारची जी स्थिती होते तिला वर लिहिलेल्या कवितेंत Splendid misery म्हणून म्हटलें आहे, व तें यथातथ्यच आहे. दुसरें असें कीं, संपत्ति प्राप्त झाली म्हणजे कांहीं लोक अत्यंत गर्विष्ठ आणि बेफिकीर बनतात. म्हणजे गरीब लोकांची त्यांस मुळींच परवा नसते; आपली इच्छा कशी तृप्त होईल येवढेंच ते पहात असतात. याचा परिणाम अंतीं चांगला होत नाहीं; असो.

ज्ञाते पुरुष म्हणूनच इतर संपत्तीपेक्षां कीर्तिरूप संपत्तीलाच विशेष मान देतात. कारण संपत्ती म्हणून जिला आपण म्हणतों ती फार वेळ टिकणारी नसून कीर्तिरूप संपत्तीच चिरकाल टिकणारी आहे. रामदास म्हणतात—

## मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥

मनुष्याचें अस्तित्व दोन प्रकारचें असतें. एक मनुष्य जिवंत असतांना व दुसरें मरणानंतर. मरणानंतरही अस्तित्व असतें असें आम्हीं म्हणतों याचें कांहीं लोकांस




रामदास.

आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु यांत आश्चर्य बिलकूल नाहीं. जिवंत असतांना मनुष्य प्रत्यक्ष दृष्टीस पडतो व त्याचे अस्तित्वाबद्दल आपणांस साक्ष पटते. परंतु आज आपण रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादि

साधु, कालिदास, मोरोपंत, वामनपंडित वगैरे कवी, शेक्सपिअर, मिल्टन, पोप, इत्यादि आंग्लकवी, त्याचप्रमाणें पराक्रमी राजे, मुत्सद्दी, मोठमोठे वक्ते इत्यादिकांचा नामनिर्देश नित्यशः करितों ते आज जिवंत आहेत काय? नाहीं तर त्यांनीं जीं महत् कृत्यें केलीं व कीर्ती संपादली त्या महत् कृत्यांची स्मृतीच आमचेकडून त्यांचा नामनिर्देश करविते, व हेंच त्यांचें खरें अस्तित्व.

**स जीवति गुणा यस्य यस्य धर्मः स जीवति**
**गुणधर्मविहीनस्य जीवितं निष्प्रयोजनम्**

म्हणजे जो सकळ गुणसंपन्न आहे तो अल्पायु जरी झाला तथापि तो चिरायुच समजावा. कां कीं, त्याच्या गुणाची कीर्ति बहुकाळ लोकांत राहाते. तेव्हां तो कीर्तिरूप जिवंतच आहे असें समजावें; आणि जो निरंतर धर्म करणारा तो मृत्यू पावला असतां तो कीर्तिरूपानें जीवंतच होय. जो गुणांनीं अथवा धर्मानें हीन, म्हणजे ज्याचे जवळ एकही उत्तम गुण नाहीं अथवा ज्याला कोणताही सद्धर्म नाहीं त्याचें जीवित्व व्यर्थ होय. तो जिवंत असतांही मृत समजावा. आतां थोर पुरुषांनीं निरनिराळ्या मार्गांनीं कीर्ति संपादन केली ही गोष्ट खरी आहे; परंतु त्यांनीं ज्या मार्गाचें अवलंबन केलें ते मार्ग ज्या परिस्थितींत होते त्या परिस्थित्यनुरूप योग्य आहेत.


**रथांत बसून सदेह स्वर्गांत यावें म्हणून इंद्रानें धर्मास सांगितलें.**

कोणी अत्यंत मनोहर इमारती, मनोरे वगैरे बांधून, कोणी लोकांस भक्तीमार्ग दाखवून, कोणी शौर्याचीं कृत्यें करून, कीर्ति मिळवितात. एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं, जीं कृत्यें करून कीर्ति संपादन करावयाची तीं कृत्यें परोपकाराचीं, जनसमुहाचे हिताचीं, सज्जनांस मान्य अशीं असलीं पाहिजेत. नाहीं तर वाईट कृत्यें करून अपकीर्तीनेंही मनुष्य प्रसिद्धीस येतो. तेव्हां कीर्ति मिळवावयाची ती सत्कीर्ति पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी कीं, कीर्तिमान लोकांचे अंगीं अल्पस्वल्प दोष असले तरी ते झांकून जातात; याचें कारण असें आहे कीं, ज्यानें उत्तम कीर्ति संपादलेली असते तो मनुष्य थोर गणला जातो आणि यदाकदाचित् त्याचे नेहमींचे वर्तनाविरुद्ध एखादें कृत्य त्याचे हातून घडलें तरी सामान्यतः लोक त्यास दूषण देत नाहींत. एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

> अयुक्तं स्वामिनो युक्तं युक्तं नीचस्य दूषणं।
> अमृतं राहवे मृत्युर्विषं शंकरभूषणम् ॥ १ ॥

**अर्थः**— अयोग्य जरी कर्म केलें तथापि तें थोरांस योग्यच होतें. कारण, त्यांना दूषण देण्यास कोणीही धजत नाहीं. नीचानें उचित कर्म केलें असतांही त्याला दूषण देण्यास लोकांस मुळींच भीति वाटत नाहीं, म्हणजे त्याला तें दूषणास्पद होतें. पहा, अमृतपान उत्तम, परंतु राहूला नीचपणामुळें मृत्यूलाच

कारणीभूत झालें; आणि विषप्राशन हें अनुचित परंतु शंकरास भूषणच झालें.

असो; आर्यांचे कीर्तीविषयीं किती उदात्त विचार होते याविषयीं महाभारतांत धर्माचें उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पांडव स्वर्गारोहण करण्याकरितां निघाले; बरोबर द्रौपदीही होती. तीं सर्वजणें मार्ग चालत असतां मेरुपर्वताजवळ असलेल्या भयाण मैदानांत द्रौपदी मृत होऊन पडली. त्यानंतर अनुक्रमें सहदेव, नकुळ, अर्जुन, भीमसेन आपआपल्या वैगुण्यानुसार मृत होऊन पडले. मात्र एकटा धर्म व त्याचे बरोबर एक कुत्रा जिवंत राहिला. पुढें ते दोघे थोडा मार्ग क्रमून गेल्यानंतर पृथ्वी व आकाश आपल्या गंभीर ध्वनीनें दणाणून टाकीत इंद्राचा रथ त्यांचे पुढें आला. रथांत बसून सदेह स्वर्गांत यावें म्हणून इंद्रानें धर्मास सांगितलें. तेव्हां त्या दोघांमध्यें झालेल्या संवादापैकीं, प्रस्तुत विषयाकरितां आवश्यक असलेला अगदीं अल्प असा त्यांतील भाग खालीं देत आहों;—

**इंद्रः**—तुझ्या अगोदरच तुझे भाऊ व द्रौपदी स्वर्गांत गेलीं आहेत तेथें त्यांची व तुझी गांठ पडेल; करितां रथांत लवकर बस.

**धर्मः**—हा कुत्रा माझा फार आवडता असून त्याची मजवर फारच भक्ति आहे. यासाठीं यालाही बरोबर येण्याची परवानगी असावी.

**इंद्रः**—अरे, उत्तम यश, कीर्ति, स्वर्गांतील अमरत्व, व सर्व प्रकारचें ऐश्वर्य हीं तुला मिळत असतां या कुत्र्याची तूं पर्वा कां बाळगितोस ? दे त्याला सोडून.

**धर्मः**—देवा, असें करणें हें आर्यांचें ब्रीद नव्हे. यापासून जगांत माझी अपकीर्ति होईल. आपल्या भक्ताचा त्याग करून मिळणारें कोणतेंही सुख मला नको.

**इंद्रः**—कुत्रीं बरोबर घेऊन येणाऱ्या मूढ लोकांस स्वर्गांत जागा मिळेल असें तुला वाटतें का ?

**धर्मः**—मला जागा न मिळाली तरी चालेल. भक्तत्यागामध्यें ब्रम्हहत्येइतकें पातक आहे; यासाठीं कांहीं झालें तरी या कुत्र्याचा त्याग मी करणार नाहीं.

**इंद्रः**—आपले भाऊ व पत्नी यांचा तूं त्याग केलास आणि सदाचारानें मिळविलेला स्वर्ग यःकश्चित् कुत्र्याकरितां टाकीत आहेस या तुझ्या मूर्खपणास म्हणावें तरी काय ?

**धर्मः**—माझे भाऊ व बायको हीं मला पाहिजे होतीं. जों पर्यंत तीं जिवंत होतीं तोंपर्यंत त्यांचे सुखाकरितां मी एकसारखे प्रयत्न करीत असें; इतकेंच नव्हे तर मी आपल्या सुखापेक्षां त्यांच्याच सुखाची विशेष काळजी करीत असें. परंतु त्यांच्या कर्मानुसार तीं मरून पडलीं यांत माझा काय अपराध ? ज्याअर्थीं अद्यापपर्यंत हा कुत्रा जिवंत आहे त्याअर्थीं यास येथेंच टाकून मी आपले **उत्तम कीर्तीस कालिमा** आणणार नाहीं.

इतक्यांत त्या कुत्र्याचे जागीं प्रत्यक्ष यमधर्म रथाचे पुढें उभा राहिला व म्हणाला "धर्मा, माझे कसोटीस तूं पूर्णपणें उतरला आहेस; आतां लवकर स्वर्गीं चल." नंतर इंद्र, यमधर्म, युधिष्ठिर रथांत बसून स्वर्गीं गेले. यावरून असें लक्षांत येईल कीं, थोर पुरुष स्वर्गसुखापेक्षां कीर्तीसच मान देतात. कीर्ति ही मनुष्यास भूषणास्पद असून त्याचें अस्तित्व ह्या जगांत चिरकाळ राहण्यास साधनीभूत होते. म्हणून प्रत्येक मनुष्यानें सत्कीर्ति संपादन करण्याचा नेहमीं प्रयत्न करावा. सत्कीर्ति ही सत्कृत्याशिवाय प्राप्त होत नाहीं, आणि सत्कृत्यें करण्याची संवय होण्यास मुख्यतः सदाचाराचें निरंतर अवलंबन केलें पाहिजे.

# महायुद्ध आणि शिक्षण.

[ एका अमेरिकनाचे विचार. ]

प्रस्तुत महायुद्धाचे आम्ही एकप्रकारें फार ऋणी आहोंत. त्यानें आमच्यामध्यें नम्रभाव उत्पन्न केला आहे. बायबलमध्यें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं आमचें मन लहान बालकांच्या मनाप्रमाणें शुद्ध झाल्याखेरीज आम्हांला स्वर्गप्राप्ति होणार नाहीं. ही शुद्धता, ही निगर्विता या युद्धानें आमच्या मनाला आणून दिली आहे. आम्हाला वाटत असे कीं आमच्या संस्कृतीचा पाया अगदीं असावा तसा आहे. या पायांत कांहीं आम्हांला फेरबदल करणें नको. वरच्या राजकीय, धार्मिक, औद्योगिक संस्थांमध्यें बदलत्या काळाला अनुरूप असे फेरफार केले म्हणजे आमचें हें जग सर्वांना सुखमय होईल; परंतु या युद्धानें आमचा हा भ्रम दूर केला आहे. आमच्या संस्कृतीच्या पायाकडेच आम्हांला पाहिलें पाहिजे, त्यांत दुरुस्ती केल्याखेरीज आमचें इष्ट आम्हांस लाभणार नाहीं, हें या युद्धानें आम्हांस शिकविलें आहे. आम्ही नीतिविन्मुख, धर्मविन्मुख, परमार्थविन्मुख झालों आहों. नीति–धर्म–परमार्थ–पराङ्मुख झालेली ही आमची संस्कृति पायाशुद्ध आहे असें आम्हांस कसें म्हणतां येईल ! नीतीच्याच पायावर खऱ्या संस्कृतीची उभारणी झालेली पाहिजे. आम्ही नीतीपासून किती दूर वाहवलों आहों हें या युद्धानें आम्हांस दाखवून दिलें आहे. आमच्यासारख्या नीतिभ्रष्ट, धर्मभ्रष्ट लोकांनीं दूर देशीं धर्मोपदेश करण्यासाठीं उपदेशक पाठवावेत ही अत्यंत हास्यास्पद गोष्ट आहे. या युद्धानें आमचा धार्मिकतेचा गर्व हरण केला आहे. व आम्ही क्षुद्र मनाचे, रानटी, ज्ञानशून्य आहोंत असें सिद्ध केलें आहे. आमच्या आधिभौतिक प्रगतीची पूर्वजांचे स्थितीशीं तुलना करून आम्ही आपल्याला धन्य मानीत होतों; परंतु आमची आध्यात्मिक अवनति या युद्धानें स्पष्ट दाखवून दिल्यानें आमची मान आतां खालीं झाली आहे.

आमच्या मनाची ही स्थिति एकंदरीनें आम्हांला फायदेशीरच होईल. आम्ही आतां नम्रभावानें आमच्या समाजस्थितीकडे पाहूं व अशा नम्र दृष्टीलाच उन्नतीचा मार्ग दिसणार आहे. हा उन्नतीचा मार्ग शिक्षणाच्याच क्षेत्रांतून जाणार यांत संशय नाहीं. कारण जशी शाळा तसा समाज हा न्याय उघड आहे. तेव्हां आपल्या संस्कृतीवरची काळिमा जाण्यासाठीं आम्ही आमच्या शिक्षण–पद्धतीचें बारकाईनें अवलोकन करून तिच्यांतील व्यंगें काढून टाकलीं पाहिजेत.

आम्ही बहुजनसमाजाला काय शिक्षण देत आहों ? लिहिणें, वाचणें, थोडेसें गणित, थोडासा इतिहास-भूगोल, किंचित्सें वाङ्मय, व अल्पसें सृष्टिज्ञान हें आम्ही त्यांच्या पदरीं बांधतों. हें प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळावें असा आमचा आटोकाट प्रयत्न चालला आहे व याच्या जोडीला आम्ही धंदेशिक्षण सुरूं केलें आहे. कांहीं वर्षे प्राथमिक शिक्षण म्हणजेच सर्वस्व असें वाटत होतें; आतां तो मनु जाऊन धंदेशिक्षण म्हणजे सर्वस्व असें वाटूं लागलें आहे. कारण सध्यां सगळ्या राष्ट्रांची दृष्टि व्यापारांत आपला पहिला नंबर कशानें येईल इकडे आहे. व्यापारांत पहिला नंबर मारण्याचें साधन व्यापाराला प्रत्यक्षपणें व अप्रत्यक्षपणें साहाय्यभूत असे जे धंदे, ज्या कला, विद्या व शास्त्रें आहेत त्यांत पारंगत अशीं माणसें तयार करणें हें होय.

म्हणून अशीं पारंगत माणसें तयार करण्याकडेच सध्यांच्या शिक्षणपद्धतीचें लक्ष आहे. तज्ज्ञ तयार करण्याच्या कामांत जर्मनींतील शिक्षणपद्धतीचा नंबर पहिला आहे. म्हणून जर्मन शिक्षणपद्धतीचे गोडवे सर्व देश गात होते. व त्या पद्धतीचें निरीक्षण करण्यासाठीं, आणि तिचा फायदा घेण्यासाठीं चोहोंकडून मोठमोठे विद्वान जर्मनीची यात्रा करीत असत. प्रस्तुत युद्धांतील जर्मनीचे अत्याचार पाहून जर्मनीचे गोडवे गाण्यांत आमची कोठें तरी चूक होत आहे असें आम्हांस वाटूं लागलें. जर्मनींतील युद्धशिक्षण, कीं ज्या योगें जर्मन-सैनिकांना अत्याचार करतांना क्षिती वाटत नाहीं, तेंच दोषपूर्ण असलें पाहिजे असा आमचा ग्रह झाला. परंतु अधिक विचार करतां असें वाटतें कीं, व्यापारी दृष्टीनें दिलेलें सर्वच शिक्षण दोषपूर्ण आहे.

व्यापारी धोरणाच्या शिक्षणक्रमाचें मुख्य उद्देश दोन असतात. शक्य तितके तज्ज्ञ तयार करावयाचे व शक्य तेवढे हुषार कामकरी, कामगार तयार करावयाचे. आतां तज्ज्ञ तयार होतो कसा, हें पाहिलें तर दिसून येईल कीं, या तज्ज्ञतेची पदवी मिळवूं पहाणाऱ्या माणसाला आपल्या ठरींव विषयावरच सर्व परिश्रम करावे लागतात. अशानें मनाचा एकांगी विकास होतो. या परिश्रमांनीं मनुष्य उत्तम एंजिनिअर बनेल, उत्तम वकील बनेल, परंतु त्याच्या शिक्षणक्रमांत मनाचा नैतिक विकास करणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें असल्यानें तो आपलें ज्ञान बिनदिक्कत घोर कामें करण्याकडे खर्च करील. जर्मन तज्ज्ञांची अशीच स्थिति झाली आहे. आतां व्यापारी धोरणाचा शिक्षणक्रम जे हुषार कामकरी तयार करतो त्यांचें ज्ञानही त्यांना चांगल्या वाईटाचा विचार नीटपणें करण्यास पुरेसें नसतें. तेव्हां तज्ज्ञाला मिळणारें शिक्षण घ्या, अथवा कामकऱ्याला मिळणारें शिक्षण घ्या, व्यापारी धोरणाच्या शिक्षण पद्धतींत दोघांचाही एकांगी विकास होत असतो. दोघांच्याही शिक्षणक्रमांत नीति, धर्म, परमार्थ, या गोष्टींना बहुतेक जागाच दिलेली नसते. असें असल्यानें व्यापारी शिक्षणक्रमांतून बाहेर पडलेलीं माणसें जवळ जवळ यंत्रासारखीं असतात. नीतिदृष्ट्या, धर्मदृष्ट्या, परमार्थदृष्ट्या आपले मालक आपण आहोंत ही जागृति यांच्यामध्यें तीव्रतेनें असत नाहीं. मालक अमुक काम करावयास सांगत आहे, म्हणून तें केलें पाहिजे अशा तऱ्हेची यांची मनःस्थिती असते. मालक जें काम सांगत आहे तें नीतिविरुद्ध आहे, धर्मविरुद्ध आहे, आणि म्हणून सांगणारा कोणीही असला तरी आपल्याला तें कर्तव्य नाहीं, अशी स्वतंत्र बुद्धि नीति-शिक्षणाशिवाय मनांत जागृत होत नाहीं. तेव्हां व्यापारी धोरणाच्या शिक्षणक्रमानें अ-स्वतंत्र बुद्धीचीं माणसें तयार होतात हा त्यांतील मुख्य दोष आहे. युद्ध-शिक्षणाचेंही धोरण माणसांना यंत्रप्राय बनविण्याचेंच असतें. या दृष्टीनें पाहिलें असतां व्यापारी शिक्षणक्रमांतून निघालेलीं माणसें सेनापतीला व्हावीं तशींच यंत्रप्राय झालेलीं असल्यानें युद्ध-शिक्षणांत व व्यापारी शिक्षणांत तत्वतः कांहीं फरक दिसत नाहीं.

तेव्हां आजच्या शिक्षणपद्धतींतील मुख्य दोष असा आहे कीं, तें एकांगी व नीतिपराङ्मुख आहे. मनुष्याचें परमध्येय व्यापारही नव्हे व युद्धही नव्हे. धार्मिक, परमार्थपर, व नीतिशुद्ध जीवन हें त्याचें परमध्येय आहे. व्यापार हें एक सुखाचें साधन आहे व युद्ध हें दुःखाचें निधान आहे. युद्ध टाळून सर्वांशीं सलोख्यानें वागणें हें नीतिदृष्ट्या मनुष्याचें एक थोर कर्तव्य आहे. व्यापार-रूपी सुखसाधनांतून दुःखाचा उद्भव न व्हावा यासाठीं व्यापारी चढाओढींत आपल्या माणुसकीला न विसरणें, आपल्या बांधवांशीं सहानुभूतीनें वागणें हेंही आमचें कर्तव्य आहे. पायाशुद्ध शिक्षणक्रमांत नीतिदृष्टि चांगली तीक्ष्ण होईल अशा विषयांचा समावेश झाला पाहिजे. प्राथमिक शिक्षण व धंदे शिक्षण देऊन बहुजनसमाजाला आम्ही फार शहाणे करीत आहों असें आम्हांस वाटतें ही आमची चूक आहे. या शिक्षणानें सदसद्विचाराची तीव्र दृष्टि लोकांना प्राप्त होत नाहीं, म्हणून

त्यांचें शहाणपण आंधळे असतें. हें त्यांचें आंधळेपण नाहींसें व्हावें असा आमच्या शिक्षणपद्धतींत फेरफार करणें हें आजला आमचें मुख्य कर्तव्य आहे. हें कर्तव्य आमच्या हातून नीटपणें पार पडल्यास भाविष्यकाळीं युद्धप्रसंग फारसे उद्भवणार नाहींत अशी या लेखकाला दृढ आशा आहे.

# कान्होपात्रा.

आर्या.

**कान्हूपात्रा श्रीमद्विठ्ठलरूपीं समानता पावे ॥ तापत्रयें जन, यशा या पिउनि अमृतसमा, नता पावे ॥ १ ॥**

मोरोपंत.

पंढरपुराहून सात कोस मंगळवेढें म्हणून एक गांव आहे, तेथें शामा या नांवाची एक गणिका रहात असे. तिला एक अत्यंत सुस्वरूप कन्या होती, तिचें नांव कान्होपात्रा होय. ह्या कान्होपात्रेंत पुष्कळसे सद्गुण बीजरूपानें होते;पण तिची परिस्थिती अत्यंत नीच असल्यानें तिच्यांतील सर्व सद्गुण दबल्यासारखे झाले होते. शामा एकदां आपल्या मुलीला म्हणाली, "मुली, चल आपण राजाकडे जाऊं, तो तुला अलंकारादि द्रव्य देऊन तुझी उत्तम संभावना करील !" या वरून हें लक्षांत येईल कीं राजाला आपल्याकडे ओढणारे किती प्रकारचे लोक असतात ! ज्याचें त्याचें लक्ष राजाकडे असावयाचें. एखाद्या नदीला जसे लहान मोठे नाले, ओढे, गटारी मिळतात, तसेच राजाला सज्जन, दुर्जन, दुराचारी लोक मिळतात ! याचा परिणाम गांठ घेणाराच्या संख्येवर व स्वतः राजाचे वृत्तीवर अवलंबून असतो. असो; मुलीनें आपल्या आईचें म्हणणें मान्य केलें.

श्यामा आपल्या मुलीला वेदराला बादशहाकडे नेणार, याच सुमारास मंगळवेढ्याहून पंढरपुराला यात्रा चालली होती. ती यात्रा पाहून कान्होपात्रेला अत्यंत अनुताप वाटला व तिनें संतांस साष्टांग नमस्कार घालून त्या वैष्णवांस विचारलें, "आपण कोठें जातां हें मला कृपा करून सांगा." ते म्हणाले, "आम्ही पंढरपुरास विठ्ठलाकडे जातों."

**कान्हो०**—हा विठ्ठल कसा काय आहे ?

**संत**—तो कसा आहे हें तर ब्रम्हादिकांलाही सांगतां येणार नाहीं. तरी तूं विचारलेंच आहेस तर सांगतों.

ओवी.

**उदार धीर सुंदर पूर्ण । लक्ष्मीहुनी कोटी गुण ॥ चंद्र सूर्यादि तारा गण । जयाचे तेजें रहाटती ॥ १३ ॥**

भक्तिविजय अ० ३९.

असा तो पंढरीनाथ आहे.

**कान्हो०**—तुम्ही त्याचें 'उदार' असें वर्णन करतां, तर मी पातकी त्याला शरण गेल्यास तो माझें रक्षण करील काय ?

**संत**—हो, हो. तुझें रक्षण तो करील.

असें म्हणून त्यांनीं तिला कंसदासी कुब्जा, अजामेळ, चोखामेळा, यांचा देवानें उद्धार कसा केला याचे दृष्टांत सांगितले या गोष्टीचा परिणाम त्या

स्वभावतः भाविक अंतःकरणाच्या मुलीवर इतका झाला कीं, तिनें घरीं जाऊन पंढरीस जावयाची परवानगी घेतली. इतकेंच नव्हे तर ती तंबोरा घेऊन पंढरीनाथाचे भक्तीनें भजन करीत करीत यात्रेबरोबर निघालीही.

कान्होपात्रा पंढरपुरास पोहोंचली तिला महाद्वारांतून पंढरीनाथाची सांवळी मूर्ति दिसतांच तिनें तिच्यापुढें लोटांगण घातलें, व गद्गदीत कंठानें ती विठोबास म्हणाली,—

ओव्या.

**उदार धीर सुंदर पूर्ण । षड्गुणैश्वर्य लक्षण ॥ तुझ्याठायीं वसती म्हणोन । आलें शरण श्री विठ्ठला ॥२०॥ अजामेळ गणीका जाण । तुवां उद्धरिली येतां शरण ॥ संतीं सांगितलें म्हणोन । आलें शरण श्री विठ्ठला ॥ २१ ॥ लौकीक काम देहाभिमान । माझे ठायीं होता जाण ॥ सर्व त्याजोनि तुजकारण । आलें शरण श्रीविठ्ठला ॥२२॥ आतां मजलागीं अंगिकारी । शरण आलें तुज श्रीहरी ॥ म्हणोनि माथा चरणावरी । कान्होपात्रा ठेवीतसे ॥२३॥**

तिचें चित्त हरिमय झालें. ती पंढरपुरास राहिली, आणि महाद्वारीं बसून सद्भावानें नित्य हरिगुण वर्णन करूं लागली.

हा प्रकार एका दुर्जनानें पाहिला. पण त्याला जगांतील हा सरळपणाचा व व्यवस्थित प्रकार पाहून मुळींच चैन पडेना ! या दुर्जनांचें वर्णन महिपतीनें इतकें सुंदर दिलें आहे कीं, तें येथें उतरवण्याचा मोह सुटत नाहीं. ते म्हणतातः—

ओव्या.

**कांहीं नसतां अपराधासी । धीवर मारी जलचरांसी ॥ तैसें सज्जन दुर्जनाशीं ॥ अखंड वैर चालतसे ॥ २७ ॥ व्याघ्र देखोनि मनुष्यासीं । ग्रासूं पाहे सक्रोध मानसीं ॥ तैसें दुर्जन सज्जनासीं ।**



इतक्यांत सेवकांनीं तिला दरडावून सांगितलें " पोरी, तुला बादशहानें बोलाविलें आहे. "

**वैर मानसीं सर्वदा ॥ २९ ॥ अपराध नसतां निद्रितासी । ढेकूण डसती मनुष्यासी । तैसें दुर्जन सज्जनासी । वैर मानसीं सर्वदा ॥ ३० ॥**

कान्होपात्रेनें त्याचा कांहीं एक अपराध केला नव्हता; पण ही स्वारी ' ते केन जानी महे ' या वर्गांतली असल्यानें त्यानें बेदरला जाऊन बादशहाला सांगितलें, " महाराज, पंढरपूरच्या महाद्वारांत एक सुंदर गणिका आहे. तिच्यासारखी सुंदर स्त्री आपल्या पहाण्यांतही नसेल, तर सरकारांनीं तिला येथें अवश्य बोलवावी. " सरकार अगदीं उल्लू होतें. त्यांनीं त्या दुर्जनाच्या सांगण्यावरून कान्होपात्रेला आणावयास आपले बरेचसे लोक पंढरपुरास पाठवून दिले.

इकडे कान्होपात्रा महाद्वारीं परमेश्वर भजन भक्तिभावानें करीत होती. इतक्यांत सेवकांनीं तिला दरडावून सांगितलें—" पोरी, तुला बादशहानें बोलाविलें आहे, तर बेदरास बऱ्या बोलानें चल, नाहीं तर आम्ही तुला तेथें बलात्कारानें नेऊं. " हा प्रकार पाहून ती भयभीत झाली. तिच्या छातींत धडकी भरली. तरी ती समयसूचकतेनें त्यांना म्हणाली, " मी देवास नमस्कार करून ही येतेंच " असें म्हणून ती राउळांत गेली व दूत बाहेर उभे राहिले.

कान्होनें अत्यंत नम्र भावानें देवाचे पायावर मस्तक ठेविलें व त्याची प्रार्थना केली; " पुंडरीकवरदा पांडुरंगा, हे श्रीरंगा, मी आपलीच म्हणवतें. मी आतां आपली आहे. आपल्या दासीला या सेवकांनीं खेंचून नेलें तर त्यांत उणेपणा कोणाचा आहे ? आपण गजेंद्राची हाक ऐकतांच त्याला उद्धरले, आपण दीनांचें दुःख निवारण करतां असा आपला लौकिक; मी आपणाला शरण आलें आहें, मी दीन आहें; अशा वेळेला जर आपण माझा उद्धार केला नाहीं, तर त्यांत उणेपणा कोणाला बरें आहे ? देवा, माझें मन तुझे स्वरूपीं जडलें आहे या देहाला आतां दुर्जनांनीं स्पर्श करावा काय ? देवा, या दीन अबलेची तुला कींव नाहीं कां येत ? खरेंच आहे. तुम्हाला तरी माझी कींव कोठून येणार ? कारण—

अभंग.

**संचित माझें खोटें मन असे ग्वाही । तुम्हा बोल नाहीं देवराया ॥ १ ॥ मानिला भरंवसा परी जाहली निरासा । आतां पाहूं आस कवणाची ॥ २ ॥ लागला तो पाठीं काळाचा दरारा । सोडवी दुसरा ऐसा कोण ॥ ३ ॥ तुझें म्हणविल्या शरण जाऊं कोणा । कान्होपात्रा म्हणे मना आणी देवा ॥ ४ ॥**

अशी मनोभावानें प्रार्थना करीत असतां तिचें तेथेंच प्राणोत्क्रमण झालें ! विठोबानें तिची ज्योती आपल्या स्वरुपांत मिळविली. कान्होपात्रेचा देह जेथें पडला तेथें एक तरटाचें झाड उगवलें. हा प्रकार राजाला कळतांच तो पंढरपुरास आला. तेथील एकंदर गोष्टीचा त्याचे अपराधी मनावर फार परिणाम झाला. तो देवाला शरण गेला. नंतर पुजाऱ्यास म्हणालाः—

ओवी.

**कान्होपात्रेचें भाग्य परम । हरि स्वरूपीं जाहली लीन ॥ आम्हीं अभाग्य ज्ञानहीन । केलें छळण तियेचें ॥ ७५ ॥**

भक्तिविजय अध्याय ३९.

कान्होपात्रेचे बरेच अभंग प्रसिद्ध आहेत. ते अत्यंत प्रेमळ असून फारच साधे आहेत. तिचा एक अभंग वर दिला आहे व आणखी येथें एक दोन देतों.

अभंग.

**नलगे भुक्ति मुक्ति नलगे स्वर्गवास । नको जाणें वैकुंठास देवराया ॥ १ ॥ नलगे योगयाग अष्टांग साधन ॥ न चुके बंधन येणें कांहीं ॥ २ ॥ नलगे इष्टमित्र सोयरे संबंधीं ॥ नको हे उपाधी पाठीं लावूं ॥ ३ ॥ कान्होपात्रा म्हणे विठोबा दयाळा ॥ देगा प्रेमकळा नाम तुझें ॥ ४ ॥**

[ २ ]

**शांति आणि क्षमा हे तुमचे उपाय ॥ दंभ**

प्रपंच भय निवारावे ॥१॥ ज्ञान वैराग्य श्रद्धायुक्त हें भजन ॥ हेंचि मज प्रमाण देई देवा ॥२॥ विनवी कान्होपात्रा अहो दीनानाथा ॥ चरणीं असो माथा सर्वकाळ ॥ ३ ॥

मनुष्याला एकदां देवाचें वेड लागलें म्हणजे अगदीं नीच अवस्था असूनही उत्तम अवस्थेप्रत एका जन्मांत जातां येतें, हें कान्होपात्रेनें आपल्या आचरणानें जगास दाखविलें आहे.

## मुलांचे लेख—

# यात्रांचें महत्त्व.

[ लेखक—नारायण भिकाजी परुळेकर. ]

रल्वे, आगबोटी, तारायंत्रें यांच्या योगानें सध्यां प्रवास अत्यंत सुखकारक झाला आहे. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत निर्भयपणें संचार करावा; आगबोटींच्या योगानें सातासमुद्रांपलीकडील देशांना खुशाल जावें; आज काय इटली, उद्यां काय फ्रान्स, परवा इंग्लंड, जर्मनी या सारख्या सुधारलेल्या देशांतील मोठमोठीं शहरें, व्यापाराच्या पेठा, लोकांच्या चालीरीति पाहाव्यात; परवा कानडांतील सुपीक प्रदेश, संयुक्त संस्थानांतील मोठमोठे कारखाने, भव्य इमारती पाहून सुधारणेच्या प्रचंड स्वरूपाचें अवलोकन करावें; मेक्सिको, ब्राझील या सारख्या सृष्टिसौंदर्याकरितां प्रसिद्ध असलेल्या देशांतील नानाप्रकारचे रमणीय देखावे पाहावेत, अशा प्रकारें पैका असणाऱ्या गृहस्थाला थोड्या श्रमांत व थोड्या काळांत विविध देश पाहावयास सांपडतील. परंतु ज्यावेळीं रेल्वे नव्हत्या, तारायंत्राची कल्पना नव्हती, त्यावेळीं अर्थातच प्रवास करणाऱ्याला फार श्रम पडत. बैलाच्या अगर घोड्याच्या गाडींतून महिनेच्या महिने प्रवास करावा लागत असल्यामुळें बिचारा अगदीं मुरकुंडीस येई. जवळ पैसा बाळगला तर चोराची भीति, दाट जंगलें, चांगल्या सडका नाहींत, खोल दऱ्याखोऱ्यांतून अथवा उंच डोंगरावरून हिंडावें; सिंह, व्याघ्र, इत्यादि क्रूर श्वापदांनीं ज्या वनांत दिवसा ढवळ्या संचार करावा अशा दाट अरण्यांतून, जीव मुठींत घेऊन जात असतां प्रवाशाची काय अवस्था होत असेल याची कल्पना विसाव्या शतकांतील आगगाड्यांतून सुखानें प्रवास करणाऱ्या चैनी लोकांना चांगलीशी करतां यावयाची नाहीं.

अशा कालांत प्रवासाचें कितीही महत्त्व समजावून देण्याचा प्रयत्न केला तरी लोक प्रवासाला थोडेच धजणार ? प्रवासाला जाणें म्हणजे आपण होऊन आपल्या अंगावर हालअपेष्टा ओढून घेतल्यासारखें व्हावयाचें. बंधुजनांचा व प्रियमित्रांचा वियोग-बहुतेक कायमचाच विरह-व्हावयाचा. काशीला आज मनुष्य दोनचार दिवसांत सहज जाऊं शकतो, परंतु त्यावेळीं काशीला निघावयाचें म्हणजे निदान सहा महिन्यांची तरी तयारी करावी लागे. सारांश, प्रवासाला जाणें म्हणजे जाणून बुजून मृत्यूच्या जबड्यांत उडी घेण्यासारखें होतें. मग सुखाचा जीव धोक्यांत कोण घालील ! अशा वेळीं लोकांनीं प्रवास करावा, नाना देश पहावेत, आणि ज्ञान संपादन करावें म्हणून कांहीं तरी उपाय योजिला पाहिजे असें वाटून आमच्या पूर्वजांनीं मोठ्या दूरदर्शीपणानें लोकांच्या धर्मनिष्ठेचा योग्य फायदा घेतला. सामान्य लोक ज्ञान मिळावें म्हणून प्रवासांतील

हाल अपेष्टा व अनेक संकटें पत्करणार नाहीत हें त्यांना पूर्णपणें माहित होतें. ज्यांची ज्ञानलालसा इतकी प्रदीप्त नाहीं त्यांना निदान धर्माच्या नांवाखालीं तरी प्रवास करावयास लावावयाचा असें प्राचीन महर्षींनीं ठरविल्यासारखें दिसतें. “बाबानों, हीं पहा पुण्यक्षेत्रें ! या ठिकाणीं जाऊन तुम्ही देवांचें दर्शन घेऊन या, म्हणजे तुमच्या पापांचें क्षालन होईल. यात्रा करून पुण्याचा संचय करतां येईल. व या लोकांत नाहीं तरी परलोकांत, तुम्हाला त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.” अशा प्रकारें ते लोकांना उपदेश करीत असत. याचा परिणाम असा झाला कीं, प्राणाचीही पर्वा न करितां काशी, हरिद्वार, बदरिकेदार, इत्यादी लांब लांबच्या ठिकाणीं श्रद्धाळू माणसें जाऊं लागलीं.

तीर्थांची रचनाही अशा प्रकारची करण्यांत आली आहे कीं, यात्रा करण्याकरितां निघालेल्या मनुष्यानें सर्व हिंदुस्थान पहावा. गोकर्ण महाबळेश्वरासारखें दक्षिणेंतील क्षेत्र, द्वारकेसारखें अगदीं पश्चिमेकडील टोंक, उत्तरेकडील हिमालयांतील तीर्थस्थानें, राजपुतान्यांतील पुष्करासारखीं क्षेत्रें पाहिलीं म्हणजे वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. कांहीं कांहीं क्षेत्रांच्या रचनेंत दुसरा असा एक विशेष आहे कीं यात्रेकरूला सृष्टिसौंदर्यही पाहावयास मिळावें. त्यावेळीं एकट्या दुकट्यानें प्रवास करणें फार धोक्याचें असे, त्यामुळें यात्रेकरु मोठमोठे जमाव करून बाहेर पडत. आपल्या सर्वांना एकाच ठिकाणीं जावयाचें आहे, आपल्यांपैकीं एकाला कांहीं बरें वाईट झालें तर सर्वांनाच हाल सोसावे लागतील; एकमेकांच्या मदतीनेंच आपला प्रवास जास्त सुखकर होईल अशी जाणीव प्रत्येकाला असल्यामुळें परस्परांत सहकारिता वाढूं लागली, बंधुत्वाची कल्पना रुजली व दूरदूरच्या प्रांतांतील लोकांच्या ओळखी झाल्यामुळें प्रांताप्रांतांतील दळणवळणही वाढूं लागलें. अशा रीतीनें परस्परांचा संबंध न तुटतां सर्व देशांतील लोकांचे परस्पर संबंध जास्त जास्तच दृढ होत चालले. पंढरपूरच्याच यात्रेचें उदाहरण ध्याना ? लाख दोन लाख लोक कामधंदा टाकून एकनिष्ठेनें परमेश्वराचें भजन करीत करीत पंढरपुरास दरसाल एकत्र जमतात. तेथें मित्रभावानें वागून देवाचें दर्शन घेऊन मोठ्या प्रेमानें एकमेकांचा निरोप घेऊन आपल्या गांवीं आनंदानें जातात. नुसता प्रवास करावा म्हणून इतके लोक कामधंदा टाकून एकत्र जमते ना. त्यांच्यामध्यें इतका बंधुभावही उत्पन्न होता ना ! परंतु तेंच यात्रेचें नांव निघाल्याबरोबर सर्व लोक मोठ्या खुशीनें प्रवासाला निघतात ही खरोखर जादू नव्हे काय ? आपल्या पूर्वजांनीं यात्रेच्या रूपानें लोकांना प्रवास करावयास लाविला, त्यांना प्रवासाच्या ज्ञानाचा लाभ घडवून दिला याबद्दल त्यांच्या बुद्धीचें व दूरदर्शीपणाचें कौतुक करावें तितकें थोडेंच.

# चिमुकल्या गोष्टी, भाग १ ते ६.

ह्या पुस्तकांत रोज **व्यवहारांत** घडणाऱ्याच **गोष्टी** दिलेल्या आहेत; पण त्या इतक्या **मोहक, मनोरंजक व मार्मिक** लिहिल्या आहेत कीं, **इसापनीतीं**तील गोष्टींप्रमाणें या गोष्टींतील **तत्त्वबोध** गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज बसत जातो. पुस्तकें **मोठ्या टाइपांत सुंदर, जाड, ग्लेज** कागदावर छापिलेलीं असून प्रत्येक गोष्टीच्या आरंभीं **कथानकाचें सुंदर चित्र** दिलेलें आहे. प्रत्येकीं किंमत ८४.

**म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# नवीन शिक्षणपद्धति.

सध्यां सर्व सुधारलेल्या देशांतून शिक्षणपद्धतींत जे फेरफार होत आहेत ते लक्षांत घेतले असतां जुन्या शाळा व आणखी पंचवीस वर्षांनीं अस्तित्वांत येणाऱ्या शाळा यांत अगदीं निरनिराळे देखावे दिसतील हें उघड आहे. जुन्या शाळांत, शिक्षकाचा मुख्य प्रयत्न विद्यार्थ्यांचें मन सुसंकृत करण्याचा असे आणि या करितां पुस्तकावर विशेष भिस्त ठेवण्यांत येत होती. कोणत्याही शाळेंत गेलें तरी विद्यार्थ्यांचें पुस्तकाशीं सदैव साहचर्य दिसत असे. पण भविष्यकालीन शाळांतून विद्यार्थ्यांस हस्तकौशल्य प्राप्त होऊन विशेषेंकरून यंत्रांच्या अभ्यासानें त्यांचें मन सुसंस्कृत करण्याची योजना अमलांत येईल असें लक्षण दिसत आहे; म्हणजे विद्यार्थ्यांना कोणत्या ना कोणत्या तरी धंद्याचें शिक्षण देण्यांत येईल. विद्यार्थी अभ्यासक्रम संपवितील तेव्हां ते कोणता तरी धंदेवाईक गृहस्थ बनून बाहेर पडतील; इतकें धंद्याचें ज्ञान त्यांना देण्यांत येईल. इतकेंच नव्हे तर विद्यार्थी शाळेंत शिकत असतांना देखील कांहीं मजूरी मिळवूं शकतील असें वाटतें. सध्यां शाळा सोडल्यावर मुलांना धंदा पत्करण्यापूर्वीं जी माहिती व जो व्यवहार शिकण्यांत कांहीं वर्षे घालवावीं लागतात ती माहिती शाळेंतच त्यांना मिळेल. भावी शाळांत अनेक प्रकारच्या धंद्यांचें शिक्षण मिळण्याची सोय करण्यांत येईल व आपणास कोणता धंदा पत्करावयाचा आहे हें विद्यार्थ्यांना प्रारंभींच ठरवावें लागेल. व त्यांस एकदम त्या धंद्याचेंच शिक्षण मिळत जाईल. त्या शाळांतून उत्तम सुतार, लोहार, तांबट कोष्टी, शिंपी, शेतकरी वगैरे लोकांच्या शिक्षकांच्या जागेवर नेमणुका होतील. अशा प्रकारच्या अनेक शाळा जर्मनींत पुष्कळ ठिकाणीं आज चालू आहेत; व अमेरिकेंत ठिकठिकाणी अस्तित्वांत येत आहेत. इतर देशांतून देखील याच पद्धतीचें अनुकरण करण्यांत येईल यांत शंका नाहीं.



जुन्या पद्धतीचा वर्ग.



नव्या पद्धतीचा वर्ग.

धंदेशिक्षणाच्याच शाळा भविष्यकाळीं जगभर

मुख्यत्वेंकरून अस्तित्वांत येतील हें ठरविण्यास मोठ्या ज्योतिष्याची अवश्यकता नाहीं. दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें साऱ्या जगास एखाद्या कारखान्याचें स्वरूप प्राप्त होत आहे. प्रत्येक देशानें कोणता तरी माल उत्तम प्रकारचा व मुबलक प्रमाणांत तयार करून जगाच्या बाजारांत पुरविल्यावांचून त्यास जगणें अशक्य होईल. या जगड्व्याळ व्यापाराच्या चढाओढींत ज्या देशांतील लोक उत्तम कारागीर असतील त्यांचाच माल खपेल. अलीकडे जर्मन मालाचा जगभर जिकडे तिकडे सुळसुळाट झालेला दिसतो; यास कारण त्यांच्या देशांत धंदेशिक्षणाची उत्तम सोय आहे हेंच होय. जुन्या व भावी शाळांचे भिन्न स्वरूप सोबतच्या चित्रांवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

# अमेरिकेंतील हिंदू विद्यार्थी.

मॉडर्न रिव्ह्यूच्या गेल्या मेच्या अंकांत अमेरिकेंतील हिंदू विद्यार्थ्यांसंबंधानें लाला लजपतराय यांनीं लिहिलेला एक वाचनीय लेख प्रसिद्ध झाला असून मराठी वाचकां-करितां त्याचा सारांश खालीं दिला आहेः—न्यूयॉर्कच्या किनाऱ्यावर मी प्रथम पाय ठेवला त्यावेळीं बरेच हिंदी लोक मला भेटले. न्यूयॉर्कमध्यें बंगाली, मराठे, पंजाबी व अनेक प्रांतांतले व बहुतेक सर्व प्रमुख जातीचे लोक व बडोदे सरकारच्या शिष्यवृत्ति घेऊन तेथें स्त्रियांच्या कॉलेजमध्यें शिकणाऱ्या दोन हिंदू स्त्रिया व एक पारशी स्त्री ही सर्व मंडळी मला भेटण्याकरितां आली होती. बोस्टनमध्येंही हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांताचे व धर्माचे लोक आहेत. यांतील बहुतेकजण हारवर्ड युनिव्हर्सिटींत शिकत आहेत. शांपाईन मधील इलिनॉईस युनिव्हर्सिटींत पंजाबी व बंगाली असे १४।१५ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत असून यांच्यांत एक मुसलमान विद्यार्थीही आहे. त्याचप्रमाणें मिचिगान, विस्किन्सन, ओहिओ, कॉर्नेल वगैरे युनिव्हर्सिट्यांतूनही बरेच हिंदी विद्यार्थी शिकत आहेत. उत्तरेकडील अलास्का, दक्षिणेंतील ब्राझिल, अर्जेंटाईन, चिलीपर्यंत म्हणजे बहुतेक सर्व अमेरिका खंडांत हिंदी लोक पसरलेले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांपैकीं बरेच लोक मध्य अमेरिकेंत म्हणजे मेक्सिकोंत ब्रिटिश ग्वायना यांतच आहेत. यांच्यापैकीं पुष्कळ लोक पंजाबी, शिख, थोडेसे मुंबईकडील, बंगाली आणि मद्रास-कडील फारच कमी लोक आहेत. अमुक इतकेच लोक अमेरिकेंत आहेत असें जरी नक्की सांगतां आलें नाहीं तरी जवळ जवळ दहा हजारांवर हिंदी लोक अमेरिकेंत आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. केवळ संख्येच्या दृष्टीनेंच विचार केल्यास युरोपपेक्षां अमेरिकेंतच जास्त हिंदी लोक आहेत यांत कांहीं शंका नाहीं.

बुद्धीनें व शिक्षणानें या सर्वांत उच्चदर्जाचे व कोण-त्याहि युनिव्हर्सिटींत शिक्षण घेत नसलेले लोक म्हणजे रामकृष्ण—विवेकानंद मिशनचे हिंदू धर्मोपदेशक होत. या दोन्ही मिशनशीं संबंध नसलेले कांहीं उपदेशक आहेत पण ते फारच थोडे. न्यूयॉर्क, वॉशिंगटन, बोस्टन, शिकागो, लूस ॲंगेलिस, सॅनडीगो, सॅन-फ्रान्सिस्को वगैरे अमेरिकेंतील बहुतेक सर्व प्रसिद्ध शहरांत विवेकानंद मिशनाच्या संस्था आहेत. या प्रत्येक संस्थेचे स्वतंत्र फंड व व्यवस्था असून अमे-रिकेंतील इतर मिशन संस्थांशीं यांचा कोणत्याहि प्रका-रचा संबंध नाहीं. या मिशनच्या सभासदांत स्त्रियांचा भरणा बराच आहे. न्यूयॉर्क येथील संस्थेखेरीज इतर संस्थांची सांपत्तिक स्थितीहि फार उत्तम आहे.

वेदांत मिशनच्या लोकांच्या महत्त्वाच्या दृष्टीनें खालोखाल पण संख्येनें जास्त असा वर्ग म्हणजे विद्या-र्थ्यांचा होय. या विद्यार्थ्यांपैकीं स्वतांच्या किंवा

एकाद्या संस्थेकडून किंवा संस्थानांतून शिष्यवृत्तीच्या रूपानें पैशाची मदत मिळत असलेले विद्यार्थी फार थोडे आहेत. घरच्या मदतीवर विद्याभ्यास करीत असलेले विद्यार्थीहि फारच थोडे असून केवळ आपल्या आंगमेहनतीनेंच मिळालेल्या पैशावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत मोठी आहे. अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थ्यांच्या धाडसाकडे, त्यांच्या मेहनतीकडे व शिक्षणाकरितां व निर्वाहाकरितां लागणारा पैसा मिळविण्याकरितां त्यांनीं पतकरलेल्या अनेक मार्गांकडे पाहिलें म्हणजे मन आश्चर्यचकित होतें. सर्वस्वी प्रतिकूल अशा परिस्थितीशीं झगडणाऱ्या या विद्यार्थ्यांची आत्मकथा ऐकूं लागलें म्हणजे आपण एकादें कादंबरींतील कथानकच ऐकत आहों कीं काय असें वाटतें. या विद्यार्थ्यांपैकीं पुष्कळ विद्यार्थी आईबापांच्या व नातलगांच्या परवानगीशिवाय इकडे आले आहेत, व कांहींना चार उपदेशाच्या गोष्टी सांगणारे आईबाप किंवा नातलगहि नाहींत. वरून निघते वेळीं कांहींच्या जवळ एक पैसाहि नव्हता व अमेरिकेंतील एकाद्या बंदरांत उतरतांना आपल्याला उडाणटप्पू समजूं नये म्हणून सरकारी अधिकाऱ्यांना दाखविण्यास आवश्य असलेले १५० रु. हि यांच्याजवळ नव्हते. तेव्हां गाडीचें, बोटीचें भाडें भागविण्याकरितां व वरील दीडशे रुपयांकरितां सुद्धां कित्येकांना मोलमजूरी करावी लागली आहे. अमेरिकेंत पोंचल्यानंतर खर्चाकरितां खिशांत एक दमडीही नसलेला एक पंजाबी विद्यार्थी मला माहित आहे. हा विद्यार्थी न्यूयार्कपासून शिकागोपर्यंत १२०० मैल पायीं चालत गेला. रात पडली म्हणजे रस्त्याच्या बाजूस तो निजत असे व पोटाकरितां प्रवासांत जें मिळेल तें काम करीत असे. पंजाबांतील अँग्लो संस्कृत स्कूलमध्यें एन्ट्रन्सपर्यंत या विद्यार्थ्याचा अभ्यास तरी झाला होता; पण इंग्रजी भाषेचा एक शब्दहि माहित नसलेला दुसरा एक पंजाबी विद्यार्थी येथें आलेला मला माहित आहे. हा विद्यार्थी येथें येऊन आठ वर्षें झालीं असून सध्यां तो कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीच्या एंजिनियर शाखेच्या शाळेंतील वरच्या वर्गांत आहे. याचें इंग्रजी अद्यापि जरी थोडेसें कच्चें असलें तरी शाळेंतील हुशार विद्यार्थ्यांत याची गणना असून ज्यूनियर क्लासांतील विद्यार्थ्यांचे गणिताचे पेपर तपासण्याचें काम याच्याकडे देऊन युनिव्हर्सिटीनें याचा बहुमान केला आहे. युनिव्हर्सिटींत राहून शिक्षण घेण्याच्या उद्देशानें कांहीं विद्यार्थी इकडे आले. पण येथें आल्यावर त्यांना तो मार्ग सोडावा लागला, व सध्यां ते शेतांतून व गौळवाड्यांतून कामें करीत आहेत. हिंदुस्थानांतील श्रीमंत व घरीं खाऊन पिऊन सुखी असलेल्या घराण्यांतील इकडील बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलेले विद्यार्थीही हीं कामें करीत आहेत. पुढील शिक्षणाला लागणाऱ्या पैशाचा पुरवठा करण्याकरितां कांहीं विद्यार्थी अमेरिकेंतील मोठमोठ्या कुटुंबांत नोकर राहिले आहेत. शिक्षणाकरितां लागणाऱ्या या पैशाकरितां रेलवेच्या रस्त्याची खडी फोडणें वगैरे खडतर कामेंही हे विद्यार्थी करतात. जवळ पैसा नसल्यामुळें व पुढील पैशाची तरतूद करण्याची काळजी असल्यामुळें अगदीं उघड्या जमिनीवर हे निजतात व प्रवासी लोकांनीं फेंकून दिलेल्या टिनच्या भांड्यांतून आपलें अन्न शिजवून खातात. अमेरिकन युनिव्हर्सिटींत हुशार म्हणून नावाजलेल्या कित्येक विद्यार्थ्यांनासुद्धां खानावळींतून वाढप्याचें, घरांतील भय्याचें, बागांतून फळें वेंचण्याचें वगैरे काम करावें लागतात.

अमेरिकेंतील सर्वच विद्यार्थी मोठे कष्टाळू व सद्गुणी आहेत असें माझें म्हणणें नाहीं. त्यांतही कांहीं नीच लोक आहेत. यांपैकीं कांहीं लोक येथील पाद्र्याचे हस्तक बनले असून हिंदू धर्माचे स्थितीचीं अवास्तव व चीड येणारीं वर्णनें करून हे अमेरिकन लोकांचीं मनें आमच्याविषयीं दूषित करण्याचा प्रयत्न करीत असतात. येथील हिंदी लोकांत परस्पर भांडणें लावून देऊन साक्षीदाराचें किंवा दुभाष्याचें काम करून उदरनिर्वाह

करणारे लोकही यांत आहेत; पण अशांची संख्या फार थोडी असल्यामुळें हिंदी विद्यार्थ्यांविषयींचा आदरभाव अद्याप कायम राहिला आहे.


अमेरिकेसारख्या परक्या देशांत आल्यावर आपली सोय करणारी तेथें एकही संस्था नसतांना—' हिंदुस्थानी स्टूडंटस असोसिएशन ऑफ अमेरिका ' अशी एक संस्था अलीकडे निघाली आहे; पण अमेरिकेंत येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या मानानें या संस्थेचा फारसा उपयोग होत नाहीं. आमचे विद्यार्थी धर्म, वर्ण इत्यादिमुळें उत्पन्न झालेल्या या प्रतिकूल परिस्थितीस न जुमानतां आपला हेतू साध्य करण्याकरितां हवी ती मेहनत घेण्यास तयार असतात व कसलींही धाडसाचीं कामें करण्यास तयार असतात याचेंच मला फार कौतुक वाटतें. प्रसंग नसल्यामुळें स्वदेशांत दिसून न येणारे आत्मविश्वास व स्वावंलबन इत्यादि हिंदू विद्यार्थ्यांतील गुण येथें विकास पावलेले पाहून तर मला फारच आश्चर्य व आनंद वाटतो.

हिंदू विद्यार्थ्यांच्या सौजन्यामुळें व कष्टाळूपणामुळें अमेरिकेन प्रोफेसरांचें त्यांच्याविषयीं अनुकूल मत झालें असून कांहीं प्रोफेसरांनीं आमच्या विद्यार्थ्यांची माझ्याजवळ अगदीं मनापासून स्तुति केली. विशेषत: प्रोफेसरांच्या बायकांचें हिंदू विद्यार्थ्यांवर त्यांच्या सौजन्यामुळें प्रेम बसलें असून प्रसंगीं मातेप्रमाणें व भगिनीप्रमाणें त्यांना त्या मदत करतात. हिंदी विद्यार्थ्यांबद्दल अमेरिकन लोकांना सर्वसामान्य मत्सर असता तर ही गोष्ट शक्यच नव्हती. एकंदरींत हिंदू विद्यार्थ्यांच्या परदेशांतील या उदात्त चारित्र्याबद्दल मला अभिमान वाटतो. मला वाईट वाटतें तें इतकेंच कीं परदेशांत असतांना जे गुण या विद्यार्थ्यांत दिसून येतात ते येथें आल्यावर त्यांच्यांत दिसून येत नाहींत.

याच्या पुढील हकीकत मजुरांसंबंधानें असल्यानें ती येथें देण्याचें कारण नाहीं.

# शास्त्रीय माहिती.


**माशीला भिंगावर कसें चालतां येतें ?**—एक कातड्याचा तुकडा पाण्यांत भिजवून भिंगावर चिकटविला आणि जोरानें दाबून पाणी काढून टाकलें तर हवेच्या दाबामुळें तो तुकडा त्या भिंगास चिकटतो. या चिकटण्याचें कारण पाणी नव्हे तर वरील हवेचा दाब हें लक्षांत ठेवावें. कारण आम्ही पाणी दाबून काढून टाकलें आहे. यावरून कातड्याचा पृष्ठभाग व भिंग यांमध्यें असणारी हवा नाहींशी करतां आली तर तीं एकमेकांस चिकटतात येवढें ठरलें.



तावदानावर माशी चढत आहे.

माशीचा पाय शेवटीं पसरट व लवचीक असतो. ती कोठेंही बसते तेव्हां पायांवर दाब घालून ज्या पदार्थावर तिला चालावयाचें असते त्याचा पृष्ठभाग व तिचा पाय यांमधील हवा काढून टाकते. म्हणजे मग वरच्या हवेच्या दाबानें तिचा पाय त्या पृष्ठभागास चिकटतो व तिला अशा रीतीनें भिंगासारख्या गुळगुळीत पृष्ठभागावर देखील वरून खालीं खुशाल चालतां येतें.

**सूर्याची उष्णता**—पृथ्वीपासून सूर्यापर्यंत म्हणजे नऊ कोटी तीस लक्ष मैल उंचीचा व अडीच मैल व्यासाचा बर्फाचा खांब तयार केला व त्यावर सूर्यानें आपली प्रखर उष्णता एकवटली तर तो बर्फाचा खांब एका सेकंदांत वितळून जाईल असा एका गणित्यानें हिशेब केला आहे. ही अचाट उष्णता उत्पन्न करण्यास दगडी कोळसा उपयोगांत आणावयाचें म्हटल्यास सबंध सूर्याच्या पृष्ठभागावर एकोणीस फूट उंचीचा दगडी कोळशाचा थर पसरावा लागेल; म्हणजे एवढ्या जळणानें सूर्य फक्त एक तास जळत राहील! सध्यांचा सबंध सूर्य उत्तम दगडी कोळशाचाच बनला आहे असें मानल्यास तो पांच हजार वर्षांपेक्षां अधीक वेळ टिकणार नाहीं. पण पृथ्वीचेंच वय लाखों वर्षांपेक्षां अधीक आहे असें निश्चितपणें ठरल्यामुळें सूर्याचे प्रचंड उष्णतेची उपपत्ती अशा रीतीनें लागत नाहीं हें उघड आहे.



सूर्याच्या उष्णतेची समाधानकारक उपपत्ति हेलमोट्झ नांवाच्या जर्मन शास्त्रज्ञानें प्रथम लावली. त्यानें असें ठरविलें कीं सूर्य म्हणजे आगीचा डोंब नव्हे, तर एखादा लोखंडाचा गोळा तापवून तांबडा लाल झाला म्हणजे ज्याप्रमाणें जळजळीत दिसतो व कांहीं वेळ तळपत राहतो, त्याप्रमाणें सूर्य हा एक अति तापलेला गोळा आहे; व सूर्यापासून सध्यां जी उष्णता बाहेर पडत आहे तितकी बाहेर पडण्यास हा गोळा दरसाल अडीचशें फूट संकुचित होत राहिला म्हणजे झालें. स्पंज दाबलें असतां ज्या प्रमाणें थेंबथेंब पाणी ठिबकतें त्या प्रमाणें सूर्याचा गोळा खचत जाऊन त्यांतून उष्णता बाहेर पडत आहे; व अशा रीतीनें सूर्याला पिळून जग आपल्या उष्णतेची तहान भागवीत आहे! प्रोफेसर न्यूकंब यांच्या मतें सत्तर लाख वर्षेपर्यंत सूर्य पिळला गेला म्हणजे त्याचा आकार सध्यांच्या अर्ध्यानें राहील! हे सर्व हिशेब विद्वान माणसांनीं केलेले असले तरी ते निवळ तर्क आहेत. अंकगणितांतलीं उत्तरें पाहून कांहीं मुलें उदाहरणाची रीत बसवितात त्या सारखा या गणितज्ञांचा कित्येक वेळा प्रकार असतो. धूमकेतूच्या आकर्षणांत सांपडून पृथ्वीचा चुराडा उडणार असें भाकित एका ज्योतिष्यानें कित्येक वर्षांपूर्वीं केलें होतें. पण पृथ्वीस त्यावेळीं मुळींच धक्का लागला नाहीं, हें पाहून त्यानें धक्का न लागण्याचें गणीत बरोबर बसवून दिलें! सारांश; म्हणजे गतगोष्टींचा छडा सध्यांचे शास्त्रज्ञ बरोबर लावून देतात; पण भविष्यकालीन प्रकाराबद्दलचें त्यांचें गणीत बरोबर ठरेल अशी अद्याप खात्री वाटत नाहीं. याचाच अर्थ हें शास्त्र अपूर्णावस्थेंत आहे; व जगाच्या अंतापर्यंत तें अपूर्णच राहणार. पण विश्वांतील प्रत्येक गोष्टच जर अपूर्ण आहे तर शास्त्राच्या अपूर्णतेबद्दलच नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे?

---


**चुकीची दुरुस्ती**—मागील अंकांत पुरंदरावर स्वारी या लेखांत ‘ पुरंदर किल्याचा देखावा ’ व ‘ पुरंदरावरील केदारेश्वराचें देऊळ ’ अशीं दोन चित्रें आलीं होतीं; पण त्या चित्रांना अनुक्रमें ‘ **वज्रगड** ’ व ‘ **सोनवरी किल्यावरून दिसणारा पुरंदर** ’ अशीं नांवें पाहिजेत.


**का. न. केळकर.**

**महायुद्धासंबंधी मनोरंजक आंकडे**—सध्यां युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे त्यांत दरमिनिटास जो खर्च होतो तितक्याचें सोनें खरेदी केल्यास तें उचलून नेण्यास तीन माणसें लागतील, म्हणजे त्याची किंमत एक लक्ष साठ हजार




रुपये होईल. आणि गेल्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपर्यंत जो खर्च झाला आहे त्याचें सोनें विकत घेतलें असतें तर तें एका ठिकाणाहून दुसरीकडे नेण्यास सत्तर डब्यांच्या १६ आगगाड्या सोडाव्या लागल्या असत्या !




**जादूचा खेळ !**—प्रथम पिठीची खळ करून त्यांत थोडें पाणी घालून ती पातळ करावी. नंतर ' टिंक्चर आफ आयोडिन 'चे कांहीं थेंब त्या खळींत टाकावे म्हणजे ती निळी होते. या रंगीत खळींत पांढरा हातरुमाल बुडवून वाळवावा; म्हणजे तो जादूचा प्रयोग करण्याच्या कामीं उपयोगी पडतो.

प्रथम प्रेक्षकांच्या हातीं तो निळा हातरुमाल तपासण्यास द्यावा; त्यांनीं तपासून परत दिल्यावर त्यास किंचित् उष्णता लावावी म्हणजे तो पांढरा होतो. आणि नंतर कांहीं वेळानें परत निळा होतो.

# गप्पागोष्टी.

एक गृहस्थ आपल्या खोलींत येतात तों आपल्या खोलींत कोणी चोर कपाटामागें दडून बसला आहे असें त्यांस आढळलें. आतां जवळपासच्या कोणा लोकांस जमविण्याचा प्रयत्न करावा तर तेवढ्या वेळांत तो चोर निघूनही जावयाचा. बरं आपणच एकट्यानें त्याला पकडण्याचा प्रयत्न करावा, तर तो चोर चांगला दणगट होता; यांसच उलटे दोन रट्टे देऊन निघून जावयाचा. तेव्हां त्या गृहस्थांनीं एक निराळीच युक्ति योजिली.

त्यांनीं आपल्या बायकोला एका तपेलींत पाणी आणावयास सांगितलें; आणि खोलीच्या मध्यभागीं बसून अग्निष्टासारखे पहात ते चारी बाजूला पाणी शिंपडूं लागले. बायकोनें 'हें काय करितां?' म्हणून विचारतां ते तिच्याच डोक्यावर पाणी ओतूं लागले. आपल्या नवऱ्यास वेड लागलें असें वाटून तिनें शेजाऱ्यापाजाऱ्यांना बोलावून आणलें. त्यांनीं 'अहो, बायकोच्या अंगावर पाणी कां ओततां?' असें विचारतां तो गृहस्थ 'हिच्या दुप्पट तिप्पट पाणी मी त्या कपाटामागच्या चोराच्या अंगावर उडविलें, तो पहा कसा गपचूप बसला आहे, आणि हिनें मात्र चार शिंतोड्यांचा इतका बोभाटा केला!'

लोकांनीं त्याच्या इतर भाषणाकडे फारसें लक्ष न देतां एकदम जाऊन त्या चोरास पकडलें हें सांगणें नकोच!

*   *   *   *

एका श्रीमंत गृहस्थानीं एक जुनाट घर विकत घेऊन तें पाडून तेथें एक नवा मोठा वाडा बांधला. वाड्याचें काम पुरें झाल्यावर, सर्व वाडा पाहून ते मागल्या बखळींत जातात तों तेथें एक मोठा थोरला रोड्याराड्याचा ढीग पडलेला! 'अहो हा ढीग कशाला येथें राहूं दिला?' त्यांनीं कंत्राटदारास विचारिलें.

'तो उचलून टाकविण्यास खर्च फार येत होता.'

'उचलून टाकविण्यास खर्च फार येत होता, तर बखळींतच एक खड्डा काढून त्यांत सर्व रोडाराडा भरावयाचा असता!'

'पण मग ती माती कोठें टाकावयाची?'

'अहो मोठा थोरला खड्डा काढावयाचा असता, आणि ती माती आणि हा राडारोडा सर्वच त्यांत भरावयाचें असतें!

*   *   *   *

सर्व जनावरांत कोल्हा आपल्या वस्तादगिरीबद्दल फार प्रसिद्ध आहे.

एकदां असाच एक कोल्हा डोंगराच्या पायथ्यानें हलके हलके जात असतां त्यानें समोरून सिंहराजाची स्वारी शिकार हुडकीत हुडकीत येत असलेली पाहिली; तेव्हां आतां यांची मोहीम आपल्यावर होणार हें जाणून कोल्हा मोठ्या विवंचनेंत पडला; पण इतक्यांत थोडासा जोराचा वारा आला. त्याबरोबर याच्या डोक्यांत कल्पना सुचली, आणि तो धांवत धांवतच सिंहाकडे गेला, आणि घाईघाईनेंच म्हणतो 'महाराज चला धांवा लवकर, नाहींतर पहा केवढें वादळ येत आहे तें! त्यांत सांपडला तर उडून जाल.'

तेव्हां सिंह वादळाच्या भीतीनें काकुळती येऊन म्हणतो, 'पण माझें अंग पडलें तुझ्यापेक्षां किती जड! तेव्हां माझ्यानें धांववेल कसें? आणि मग मला वाटेंतच वादळानें गांठलें तर?'

'महाराज, मग त्यापेक्षां आपण याच येथल्या मोठ्या थोरल्या झाडास घट्ट आंवळून धरून बसा.'

'अरे, पण वादळ जर सबंध दिवसभर चाललें, तर माझ्यानें घट्ट धरून तरी किती वेळ बसवेल?'

'बरं तर मग मी तुम्हांला या झाडाशीं घट्ट बांधून ठेवितों अगोदर, आणि मग मी पळेन.'

सिंहानें तें कबूल केलें. मग कोल्ह्यानें रानांतून कांहीं चिवट वेली शोधून आणून सिंहास त्या झाडाशीं घट्ट आंवळून बांधलें; आणि मग हंसून म्हणतो 'महाराज, वादळ कांहीं फार मोठें नाहीं. तुम्ही बसा आतां असेंच झाडाला टांगून! मी जातों आतां; रामराम!'

म्याट्रिक, स्कूलफायनल व इतर परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेचे

# वाक्प्रचार, म्हणी इत्यादि.

( उपपत्ति, स्पष्टीकरणें, उदाहरण, अवतरणें यांसह. )

ह्या पुस्तकांत **मराठी भाषेंतील** सुमारें **दीड हजार मुख्य मुख्य संप्रदाय** ( Idioms ) आणि **म्हणी** व अवांतर **शेंकडों संप्रदाय**, यांचें **शास्त्रीयरीत्या वर्गीकरण** केलेलें असून त्यांचें मराठींत **सोपपत्तिक स्पष्टीकरण** केलेलें आहे, व **भरपूर उदाहरणें**ही दिलेलीं आहेत. स्पष्टीकरणांच्या समर्थनार्थ प्राचीन व अर्वाचीन कवितेंतील **शेंकडों अवतरणें** दिलीं आहेत. तसेंच मराठी भाषेंत हर-हमेश योजले जाणारे **न्याय, ज्योतिषांतील शब्द, संस्कृत वाक्यें** किंवा **वाक्यांश**, वगैरेंचें **खुलासेवार स्पष्टीकरण** केलेलें आहे. दुसरें असें कीं, ह्या पुस्तकांत पुष्कळशा मराठी म्हणी, संप्रदाय, व त्याच अर्थाच्या इंग्रजी म्हणी व संप्रदाय ह्यांच्या जोड्या दिल्या आहेत. पुस्तकांत एकादा विशिष्ट शब्द पाहण्यासाठीं वर्णानुक्रमें रचलेली तपशीलवार सूचीही दिली आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें म्याट्रिक, स्कूलफायनल वगैरे परीक्षांच्या **उमेदवारांस**, तसेंच **मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास** करणाऱ्यांस हें पुस्तक **अत्यंत उपयोगी** असें झालें आहे. **रा० रा० विद्याधर वामन भिडे** बी. ए. यांनीं हें फार काळजी-पूर्वक रचिलें आहे, आणि ह्या **जातीचें** व इतक्या **विस्ताराचें पुस्तक** मराठी भाषेंत आजपर्यंत झालेलें नाहीं. याचीं **पायका टाइपाचीं पानें** सुमारें ५०० वर असून **बांधणी कापडी** व **जाड पुठ्याची** आणि मजबूत अशी आहे. किंमत **दीड रुपया. ट० हं० व्ही० पी० सह ३ आणे.**

# निबंधलेखन आणि अनुवाद.

**म्याट्रिक्युलेशन, स्कूलफायनल, पब्लिक सर्व्हिस**, वगैरे परीक्षांस **मराठी भाषा** हा एक विषय असून विद्यार्थ्यांना मराठींत **निबंध लिहावा** लागतो, व दिलेल्या **पद्यांचा अनुवाद** करावा लागतो. यासंबंधानें विद्यार्थ्यांना माहिती देणारें **सोयीचें पुस्तक** नाहीं, ही अडचण दूर करण्यासाठीं **मथ**-ळ्यावर निर्दिष्ट केलेलें पुस्तक रचण्यांत आलें आहे. ह्या पुस्तकाचे **दोन भाग** असून पहिल्यांत **निबंध-लेखन** हा विषय आहे. यांत पहिल्यानें निबंध म्हणजे काय हें सांगून **निबंधांचे तीन प्रकार** कोणते, हें सांगितलें आहे. ह्या तिन्ही प्रकारच्या निबंधांच्या **सदरवाऱ्या** कशा पाडाव्या, हें उदाहरणांनीं **स्पष्ट** करून दाखविलें आहे. नंतर ठळक ठळक अशा विषयांवर **सुमारें ५० निबंध** लिहून दाखविले आहेत. अनुवाद ह्या भागांत **अनुवाद** म्हणजे काय हें **सांगून तो कसा** करावयाचा, त्यासंबंधाच्या **तपशी-लवार सूचना** देऊन अनेक प्रकारच्या **पद्यांचा अनुवाद** करून दाखविला आहे; आणि नंतर **कांहीं पद्यसमूह** विद्यार्थ्यांना **अनुवाद करावयासाठीं** दिले आहेत. किं. ८८ ट. ख ८३.

### कैलासवासी राजा रविवर्मा यांचीं

# नामांकित चित्रें.

**आ**जपर्यंत **राजा रविवर्मा** यांची **चित्रें** लहानमोठ्या आकाराचीं निरनिराळ्या **रंगांत** बरींच छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि सर्व **चित्रें त्या त्या चित्राच्या परिपूर्ण पौराणिक माहितीसह एकवटलेलीं** अशीं **पुस्तकरूपानें** छापल्यास त्यांची फारच **जरूर** आहे, अशा कांहीं लोकांच्या **सूचना** आल्यावरून आम्हीं वरीलप्रमाणें **राजा रविवर्मा** यांचीं **निवडक चित्रें बुकसाई-जमध्यें** छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पुस्तकांत एकंदर ८८ **चित्रें वर्णनासह दिलेलीं** असून पुस्तकास **कागद पहिल्या नंबरचा जाड (आर्ट-पेपर)** वापरलेला आहे. **मुखपृष्ठावर राजा रविवर्मा** यांच्या **प्रमुख चित्रांपैकीं शकुंतला-जन्माचें चित्र तीन रंगांत सुबक** छापलेलें आहे. त्यामुळें **पुस्तकास विशेषच शोभा आलेली आहे, किं० १ रुपया.**

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

भगवद्भक्त ह्वतरावबाबा यांच्या सांप्रदायानुसार तयार केलेली

# भजनी मालिका.

हे रोज म्हणण्याचे अभंगाचे पाठ श्रीतुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव यांसारख्या कविश्रेष्ठांच्या अभंगांतून निवडलेले असून ही निवड ह. भ. प. विष्णु नरसिंह जोग. व रा. माधवराव कृष्ण देशमुख यांसारख्या तज्ज्ञांनी केलेली असल्यामुळें वारकरी मंडळास ती अत्यंत प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकांत सुमारें १७५ अभंग दिले असून प्रत्येक वारीं भजनाचे वेळीं कोण कोणते अभंग म्हणावे हें क्रमवार पुस्तकाचे शेवटीं दिलेलें आहे. पुस्तकाचा टाईप जाड असून कागद मोहोरेदार आहे मुखपृष्ठावर श्री विठोबारखुमाईचें सुंदर चित्र दिलेलें असून किंमत अवघी ०४ आ. ठेविली आहे र. ह. सह किं. ०४०६.

# सचित्र ] रुक्मिणी स्वयंवर. [ सचित्र

हा ग्रंथ पोथीसाइजमध्यें छापलेला असून प्रत्येक अध्यायापूर्वी हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलें एक एक सुंदर चित्र दिलेलें आहे. ७ व्या व १६ व्या अध्यायांत तीन रंगांत छापलेलीं दोन मनोहर चित्रें घातलीं आहेत. पोथी चांगल्या ग्लेज व चिवट रफ कागद अशा दोन प्रकारच्या कागदांवर जाड टाइपांत सुबक छापलेली आहे. शेवटीं पोथींतील कठीण शब्दांचा कोश जोडला असल्यामुळें अर्थ समजण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. इतकें करूनही किंमत अगदीं माफक म्हणजे नुसत्या रफ कागदावरील पोथीस ०६ व ग्लेज कागदावरील ०८ अशी ठेविली आहे. रेशमी बाइंडिंगसह किं. ०१० व ०१२ आहे पोस्टेज ० ०६.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें

किंमत ०१२ ] चित्रयुक्त [ किंमत ०१२

# बालबोध व मोडी रंगीत वर्णमाला.

यांत अ पासून ज्ञ पर्यंत बाळबोध व मोडी मुळाक्षरें, त्या त्या अक्षराच्या सूचक-चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षरांचे अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविलेले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास नकाशाचा उपयोग चांगला होतो.

मुंबई—चित्रशाळा दुकान, काळकादेवी.

म्यानेजर, चित्रशाळा-प्रेस, पुणें.


हें पुस्तक रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ८१८ सदाशिव पेठ–पुणें शहर येथें 'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. जुलै सन १९१६ अंक ७.

# मराठी बालपत्रक

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| डॉ. बुकर टी. वाशिंग्टन. | १२३ |
| स्वच्छ हवेची आवश्यकता | १२६ |
| कपडे कसे धुवावे ? | १२८ |
| महाराजा टेसूराव गणपत. | १३२ |
| श्रीमत् शंकराचार्यावतार--कथा. | १३५ |
| शास्त्रीय माहिती. | १३८ |
| मनोरंजक शास्त्रीय गोष्टी. | १४० |
| बुद्धि—प्रभाव ( कविता. ) | १४१ |
| गप्पागोष्टी. | १४२ |

विक्रीस तयार! विक्रीस तयार!! विक्रीस तयार!!

सरकारनें शाळाखात्याकरितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

ही नवीन आवृत्ति नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१२.

व्यापाऱ्यांस कमिशन.

---

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षरांचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी शालापत्रक.


येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.


पुस्तक २७. जुलै, सन १९१६. अंक ७.


## डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन.


( लेखक—य. न. केळकर. )


निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ ।

सतत प्रयत्नानें व दृढनिश्चयानें अशक्य दिसणाऱ्या गोष्टीसुद्धां शक्य होतात असें या महात्म्याच्या चरित्रावलोकनानें सिद्ध होतें. व सध्या वरील दोन गुणांची आपणास अत्यंत आवश्यकता आहे. याकरितां दीर्घपरिश्रमानें अत्यंत हीनदीन वर्गांतून व ज्यांचे हाल कुत्रा देखील खाणार नाहीं अशा गुलामगिरींतून मार्ग काढून सर्व जगाला मान्य झालेल्या या महात्म्याचें संक्षिप्त चरित्र लिहिण्यास घेतों.

डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांचा जन्म इ. स. १८५८ सालीं व्हर्जिनिया प्रांतांत एका मळ्यांत गुलाम आईबापांच्या पोटीं झाला. त्या वेळीं फिजी बेटांतल्याप्रमाणेंच तेथें गुलामगिरी पसरली होती. हे जातीनें निग्रो होते व बहुतेक सर्व गुलाम निग्रोच होते. यांच्या घरची मंडळी म्हणजे त्यांचे आईबाप व त्यांचे दोन भाऊ हे होत. त्या वेळीं त्यांची स्थिति अत्यंत शोचनीय होती. पहाटे चार वाजतां उठावें, मीठभाकर मिळेल ती खावी आणि निघावें कामाला ! बारा वाजेपर्यंत काम करावें; जरा थोडें चुकलें कीं त्या लांचखाऊ ओव्हरसियरांचे चाबकांचे तडाखे खावेत. पुन्हा त्यांनीं त्यांना दुप्पट काम द्यावें तें यांनीं करावें व संध्याकाळीं घरीं जावें असा त्यांचा क्रम असे ! त्यांच्यावरील कामगारांनीं हवे तसे अत्याचार करावे आई आणि तिचीं पोरें, बहीण—भाऊ, नवरा—बायको यांची एका पैशाकरतां ताटातूट करावी असली बेबंदशाही तेथें चालत होती. अशा वेळीं बुकर पुढें आपली

उन्नति करून या गुलामगिरीच्या नरकांतून डोकें वर काढील अशी कोणास तरी शंका आली असती का ? छे ! छे ! परंतु ईश्वरानें अजून डोळे मिटले नाहींत. जेव्हां जेव्हां असल्या गोष्टी दृष्टीस पडतात तेव्हां तेव्हां तो त्यांतून सर्वांची मुक्तता करीतच असतो. या गुलामगिरीचें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे. आब्राहाम लिंकन म्हणतो जर गुलामगिरी पाप नाहीं तर इतर कांहींही पाप नाहीं ! असो; अशा हालांत त्यांनीं बरींच वर्षे काढलीं.

त्यावेळीं वुइल्यम ग्यारिसन नांवाच्या गृहस्थानें एक वर्तमानपत्र काढलें होतें. त्यांत गुलामगिरीच्याच माहितीचा समावेश होत असे. असाच दुसरा एक प्रयत्न स्टो नामक विदुषीनें ' अंकल टॉम्स केबिन ' ही कादंबरी लिहून केला. या बाईनें या पुस्तकांत आपण पाहिलेल्या व ऐकलेल्या दुःखदायक गोष्टी कादंबरीरूपानें पुढें आणिल्या. यांतील सर्व गोष्टी सत्य आहेत व तें वाचतांना म्हणजे गुलामगिरींतील हालांचें शब्दचित्र पाहतांना खरोखरीच रडूं येईल. या बुकाचा बराच परिणाम जनतेवर घडला व अमेरिकेंत दोन पक्ष उद्भवले; एक गुलामांना स्वतंत्रता द्या म्हणणारा व दुसरा देऊं नये म्हणणारा. या पक्षामुळें अमेरिकेची स्थिति विचित्र झाली व या नाजूक परिस्थितीची विल्हेवाट लावून निग्रोंना स्वतंत्रता देणारा आब्राहाम लिंकन नांवाचा मनुष्य प्रेसिडेंट निवडून आला. या गृहस्थानें गुलामांचे हाल पाहिलेले असल्यामुळें त्याच्या मनानें निग्रोंना स्वतंत्रता द्यावयाचें पूर्वीपासूनच घेतलें होतें.



डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन.

वर सांगितलेल्या दोन पक्षांतील भांडण रक्तपाताशिवाय थांबावयाचें नाहीं असें आब्राहाम लिंकन यास वाटतांच त्यानें पुष्कळसें सैन्य जमवून लढावयाची तयारी केली व थोडक्याच दिवसांत लढाईस तोंड लागलें. ही लढाई १८६० त सुरू होऊन १८६४ त संपली व आब्राहामच्या पक्षास जय मिळाला. गुलामांना स्वतंत्रता द्यावयाचा दिवस आधींच मुक्रर करण्यांत आला होता व तो दिवस येतांच सर्व गुलामांना मोकळीक देण्यांत आली. पण ' जो लोककल्याण साधावया जाण घेई करीं प्राण त्या सौख्य कैचें ' या नियमाप्रमाणें लिंकनचें नशीब कसें आहे तें पहा. गुलामांना स्वतंत्रता दिल्यावर दोनही पक्षांत समेट करण्याचा त्याचा विचार होता. पण एके दिवशीं फोर्ड थिएटरांतच त्याचा एका माथेफिरूनें खून केला. स्वातंत्र्यसुख भोगण्याचा दिवस येतांच सर्व गुलामांना काय आनंद झाला असेल, तो वर्णन करणें कठीण आहे. त्यांनीं ईश्वराला व आब्राहाम लिंकनला लाखों धन्यवाद दिले. व डोक्यावरची एक अतिशय अजस्र अशी धोंड उतरून आपण स्वर्गांत आरोहण केल्याप्रमाणें त्यांना वाटूं लागलें. यापुढें सर्व गुलामांनीं असें ठरविलें कीं आपण राहात होतों तीं घरें सोडून दुसरीकडे राहावयास जाऊं. व ठरल्याप्रमाणें पुष्कळ लोकांच्या बरोबर पश्चिम व्हर्जिनियांत बुकरची मंडळी मालडन गांवीं राहण्यास गेली.

आतां यापुढें काय उद्योग करावा हा प्रश्न आपोआपच त्यांच्या पुढें उभा राहिला. कांहीं दिवसांनीं त्यांना असें कळलें कीं तेथें जवळच एक मिठाची भट्टी

व कोळशाची खाण आहे. तेथें त्यांनीं काम करावें असें ठरलें. बुकरलाही तेथेंच काम करावें लागे. याच वेळीं त्याच्या आईनें (जेननें) त्याला पुस्तक आणून दिलें व त्यावरून त्याला थोड्याच दिवसांत अक्षरओळख झाली; पण त्याच्या बापाला हें पसंत पडेना. त्याला वाटलें कीं याला बरेंच काम देऊन आपल्याला जास्त पैसे मिळवतां येतील. पण बुकरनें शिकणें सोडलें नाहीं, व मनाशीं एकच खूणगांठ बांधली ती म्हणजे शिक्षण घेण्याची.व याच निश्चयाच्या जोरावर तो मोठा नामांकित गृहस्थ झाला. त्यानें शिकणें बंद करण्याची गोष्ट नाकारल्यावर त्याच्या बापानें त्याची कांहींही काळजी घेतली नाहीं. पुढें पुढें तर बुकर आपला पुष्कळसा वेळ अभ्यासांतच घालवूं लागला. हें पाहून त्याच्या आईनें त्यास तेथून काढून रफनर नांवाच्या एका गृहस्थाच्या घरीं चाकरीस ठेवला. तेथली घरधनीण अतिशय रागीट होती. पण त्या बाईनें सांगितलें कीं जर तूं चांगलें काम करशील तर तुला येथें एक जवळ निग्रोकरितां शाळा आहे तेथें घालीन. हें ऐकून बुकरला फार आनंद झाला व त्यानें अतिशय मन लावून काम केलें. रफनर बाईला यानें केलेली चाकरी पाहून फार समाधान वाटलें व तिनें त्याला जवळच्या शाळेंत घातलें.

एके दिवशीं हापटन येथें निग्रोंच्याकरितां एक शाळा आहे व तेथें गरीब पण हुशार मुलांचा जेवणखर्च, राहण्याची सोय वगैरे होते असेंही कळलें, तेव्हां त्याला अतिशय आनंद झाला; व त्यानें तेथें जावयाचें ठरविलें. माल्डनपासून हापटन ५०० मैल खरें; पण जो दृढनिश्चयी आहे त्याला त्याची काय मातबरी ? बुकरला सारखा शिक्षण घेण्याचा ध्यास लागलेला होता. व कितीही अडचणी येवोत ही गोष्ट साध्य करून घ्यावयाचीच हा त्याचा निश्चय असल्यामुळें त्यानें जावयाचा दिवस ठरविला; व त्या दिवशीं चाकरीचे जे ५।६ रुपये जवळ होते ते घेऊन व आईची परवानगी घेऊन तो निघाला. वाटेंत त्याला अतिशय त्रास झाला. सर्व प्रवास पायीं करावयाचा व जवळ पैसे तर अगदींच थोडे; यामुळें त्याचे फार हाल झाले. पण एक दिवस एका जहाजावर जाऊन काम करून त्यानें थोडेसे पैसे मिळविले व पुढें चालला.

याप्रमाणें अतिशय त्रास सोसून, हालांत दिवस काढून त्यानें प्रवास केला. त्याच्याजवळ द्रव्य नव्हतें; परंतु शिक्षण घेण्याची सदिच्छा मात्र त्याचे जवळ सदैव होती व त्या निश्चयामुळेंच त्यानें हालांत दिवस काढले; त्याच निश्चयामुळें तो भूक विसरला, तहान विसरला, सर्व हाल विसरला, व शेवटीं हापटनला पोहोंचला.

हापटनला गेल्यावर तो तडक शाळेच्या चालकांकडे गेला व आपणास नादार घेण्याबद्दल त्यानें विनंती केली. चालकांनीं याचा तो इतके दिवसांचा धुळीनें मळलेला कोट, पुष्कळ दिवस आंघोळ न मिळाल्यामुळें मलीन झालेलें शरीर वगैरे पाहून हा कोणी तरी घाणेरडा, आळशी, उडाणटप्पू आहे अशी समजूत करून घेतली. पण शेवटीं त्याला शेजारची खोली साफ करण्यास सांगितलें. बुकरनें तात्काळ ती झाडून पुसून अगदीं स्वच्छ करून टाकली. ती पाहून शाळेच्या चालकांनीं लगेच त्याला नादार म्हणून घेतला. त्या वेळीं बुकरला अतिशय आनंद झाला व त्यानें शाळेच्या नियमाप्रमाणें वागून, झटून अभ्यास करून लोकांकडून शाबासकी मिळविली. १ ल्या सुटींतच त्याची आई वारली. तेव्हां त्यास अतिशय वाईट वाटलें व मग तो घरीं जाऊन कांहीं दिवसांनीं परत आला.

या संस्थेंतूनच तो पदवीधर झाला; पुढें माल्डनला जाऊन यानें नीग्रो लोकांकरितां एक शाळा काढली. त्यांत ५०–६० वर्षांच्या म्हाताऱ्या बाया, व पुरुष शिकण्यास येत असत. हापटनचे आर्मस्ट्रांग नांवाचे एक अतिशय विख्यात पुरुष बुकरचे गुरु होते. त्यांच्या आज्ञेवरून बुकरनें टस्केजी येथें एक शाळा स्थापन केली. प्रथम ती एका खोपटांत भरत असे. पण पुढें ही फार मोठी झाली. हल्लीं शाळेच्या

५० इमारती आहेत; या व त्यांतील ४० इमारती मुलांनीं बांधलेल्या आहेत. तेथें विटा करण्याचा मोठा कारखाना आहे. तेथें बहुतेक सर्व प्रकारचें शिक्षण देण्यांत येतें. होतां होईल तों व्यवहारांत लागणाऱ्या सर्व गोष्टी मुलांना करतां याव्या असा शाळेचा साधारण उद्देश आहे. यांच्या शाळेंत ११०० विद्यार्थी व ८६ कामगार होते. व पुढें पुढें त्यांची संख्या तर फारच वाढली. कार्नेजी नांवाच्या एका गृहस्थानें २० हजार डालर वॉशिंग्टनला लायब्ररीकरतां दिले व इतरही फंड खूप जमला. वॉशिंग्टन यांच्या बायकोनेंही पुष्कळ ठिकाणीं फिरून फंड जमवला. या शाळेचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. व ही एक जगांतील सुप्रसिद्ध शाळापैकीं आहे. पुन्हा केव्हां तरी या शाळेबद्दल लिहितां येईल.


इ. स. १८९५ सालीं अमेरिकेंत अटलांटा येथें एक मोठें प्रदर्शन झालें. त्यांत बुकर टी. वॉशिंग्टन यांनीं एक आवेशयुक्त भाषण केलें व त्यामुळें त्यांची फारच प्रसिद्धि झाली व पुढें कित्येकांनीं आमंत्रणें दिल्यामुळेंही उत्तम भाषणें केलीं व वक्ता म्हणून ते प्रसिद्ध आले. लोकांचीं त्यांच्यावर अत्यंत भक्ति बसली प्रत्येक गोष्टींत त्यांना ते मदत करूं लागले. लोकांनीं जमवून त्यांना दोन तीन वेळा युरोपचा प्रवास घडवि दोन युनिव्हर्सिट्यांनीं त्यांना एल्. एल्. डी. व एम्. ए. या पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. फार काय, अमेरिकेचे प्रेसिडेंटही त्यांची शाळा पहावयास गेले व त्यांनीं आपली सहानुभूति दाखविली. त्यांनीं एकंदर तेरा ग्रंथ लिहिले आहेत. त्यांना १९१५ च्या डिसेंबर महिन्यांत देवाज्ञा झाली. बुकर टी. वॉशिंग्टन गेले; पण आपली कीर्ति, दृढनिश्चय, परिश्रम, कळकळ वगैरे गोष्टींचें उदाहरण ठेवून ते गेले आहेत. त्यांनीं ठेवलेल्या गोष्टि आपण घेऊन त्यांच्याप्रमाणेंच मोठे होण्याची इच्छा धरली पाहिजे. त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें गेलें पाहिजे. म्हणजे आपणासही मोठें होतां येईल.

# स्वच्छ हवेची आवश्यकता.

[ लेखक—महादेव विष्णु खरे, खेड. ]

शरीरप्रकृति चांगली राहण्यास स्वच्छ हवा अवश्य पाहिजे. अस्वच्छ हवेपासून अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होतात. कारण प्रत्येक क्षणीं श्वासोच्छ्वासाबरोबर जी हवा आपण आंत घेतों ती वाईट असल्यास तिचा रक्तावर फारच अनिष्ट परिणाम होतो. अस्वच्छ हवेंत अनेक जंतु असतात ते आपले अंगांत जाऊन रक्तांत प्रवेश करितात. ज्या अर्थी आपले शरिरांत एकसारखें सर्व अवयवांतून रक्त खेळत असतें, त्या अर्थी ते जंतु सर्व अवयवांत शिरणें साहजिकच आहे. म्हणून आपण ज्या घरांत रहातों तें घर ओलसर जागेंत असतां कामा नये. त्याप्रमाणेंच जी जागा दलदलीची असेल ती जागा रहाण्यास वर्ज्य करावी; अशा जागेंत राहिल्यास हिंवताप, हातापायांचे सांधे धरणें, खोकला, पडसें, वगैरे विकारांनीं शरीर नेहमीं पीडित असतें. घरांत स्वच्छ हवा येण्याकरितां पुष्कळ खिडक्यांची योजना केली पाहिजे. प्रत्येक खोलींत निदान एक मोठी खिडकी पाहिजे. लहान खिडक्यांतून बाहेरील हवा जितकी आंत आली पाहिजे तितकी येत नाहीं व उजेडही मिळत नाहीं. हेंही येथें सांगून ठेविलें पाहिजे कीं, स्वच्छ हवेप्रमाणें उजेडाची आपले शरिरास फारच आवश्यकता आहे. ज्याप्रमाणें झाडांचीं लहान रोपें काळोखांत बराच काळपर्यंत ठेविलीं असतां त्यांचीं पानें फिकट पांढरीं होतात, त्याप्रमाणें काळोख असलेल्या जागेंत राहिल्यानें मनुष्य

निस्तेज व रोगट होतो. शिवाय एका खोलींत अनेक मनुष्यांनीं बराच वेळ निजणें चांगलें नाहीं. कारण आपले शरीरांतून जी हवा श्वासोच्छ्वासाबरोबर बाहेर जाते ती फारच दूषित असते. याविषयीं एका फ्रेंच डॉक्टरनें खालीं लिहिल्याप्रमाणें प्रयोग करून पाहिला. प्रथमतः त्यानें दोन पक्षी पकडले. एकास पिंजऱ्यांत घालून उघड्या हवेंत ठेविले व दुसऱ्यास एका स्टुलावर बसवून त्यावर हंडीचे आकाराचें एक कांचेचें पात्र घेऊन तें उपडें ठेविलें. त्यामुळें आंतील पक्ष्यास हवा मिळेनाशी झाली. आतां कांचेचे भांड्याचा कांठ व स्टुलाचा पृष्ठभाग यांचेमध्यें कोठें एखादें सूक्ष्म छिद्र राहिल्यास त्यांतून येणारी हवा त्या पक्ष्याचा जीव जगण्यास पुरेशी नाहीं हें उघड आहे. अशा रीतीनें तो पक्षी अर्धा तास राहिल्यावर त्या डॉक्टरनें त्या पक्ष्यास चटकेन बाहेर काढून त्या दुसऱ्या पिंजऱ्यांत असलेल्या पक्ष्यास त्या कांचेच्या पात्राखालीं बसविलें. तो पक्षी आंत गेल्यावर ताबडतोब मरण पावला. याचें कारण असें कीं पूर्वीं अर्धा तास जो पक्षी आंत बसला होता, त्याचे श्वासोच्छ्वासानें आंतील हवा इतकी विषारी झाली होती कीं, ती हवा दुसऱ्या पक्ष्याचे शरीरांत गेल्याबरोबर तो मरण पावला. यावरून श्वासोच्छ्वासामुळें हवा किती दूषित होते हें लक्षांत येईल. मोठमोठे समारंभ, यात्रा वगैरे ठिकाणीं कधीं कधीं जागा आकुंचित असून अतिशय गर्दी असतां हवा दूषित झाल्यामुळें कांहीं लोकांस मूर्च्छा येते. यासाठीं शाळा, सभागृहें, नाटकगृहें म्हणजे जेथें बरींच मनुष्यें एकत्र जमतात त्या जागा विस्तृत असून स्वच्छ हवा आंत येण्यास व आंतील हवा बाहेर जाण्यास त्यांस पुष्कळ द्वारें पाहिजेत. श्वासोच्छ्वास करितांना मनुष्य जवळची सोळा घनफूट ( 16 cubic feet ) हवा एका तासांत दूषित करितो असें सिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें पांच मनुष्यें जितकी हवा एका तासांत दूषित करितात तितकीच हवा एक ग्यासचा दिवा तितक्याच वेळांत दूषित करितो. म्हणून ग्यासचे दिव्यामुळें जी हवा बिघडते ती बाहेर जाण्यास द्वारें अवश्य पाहिजेत. असो; वरील विवेचनावरून आपली प्रकृति निरोगी असण्यास स्वच्छ हवा किती आवश्यक आहे हें कळून येईल. डाक्टर लोक याच कारणामुळें रोग्यांस स्वच्छ हवेचे ठिकाणीं जाऊन राहण्यास सांगतात. फार काय अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील कीं, कांहीं रोगी नुसत्या स्वच्छ हवेचे ठिकाणीं राहिल्यामुळें कांहीं औषधपाणी घेतल्याशिवाय बरे झाले. याकरितां प्रत्येक मनुष्यानें आपली प्रकृति निरोगी राखण्याकरितां स्वच्छ हवेचा पुरवठा कसा मिळेल याविषयीं नेहमीं दक्ष असलें पाहिजे.



**दुसऱ्यास एका स्टुलावर बसवून त्यावर हंडीचे आकाराचें एक कांचेचें पात्र घेऊन तें उपडें ठेविलें.**


# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यतः मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यांत **मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ** सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं **गाणींही** दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं **झोपाळ्यावर** बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ **ओव्या व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे उखाणेही** बरेच दिलेले आहेत. किंमत. ८॥.

**मिळण्याचे ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# कपडे कसे धुवावे ?

[ लेखक—पु. वि गोगटे, बी. एस. सी. सायन्स टीचर हायस्कूल, खांडवा. ]

कपडे धुण्याची कला अवगत असणें फार उपयोगाचें आहे. प्रत्येक शहरांतून धोबी असतात; परंतु पुष्कळ प्रसंग असे येतात कीं ज्या वेळेस कपडे घरच्याघरीं धुणें भाग पडतें. जर कपडे स्वच्छ धुतां येत नसतील तर अशा वेळीं मळकट कपडे घालण्याचा प्रसंग येतो. आपण नेहमीं धोतरें वगैरे धुतों. यांत आपण धोतरास पाण्यांत बुचकळून थांव देतों किंवा दगडावर ठेवून हातांनीं चुबकतों, नंतर पाण्यांत खळबळून पिळतों. अशा तऱ्हेनें धुतल्यानें मळका कपडा म्हणूण्यासारखा स्वच्छ होत नाहीं. धोतरें नेहमीं धुतलीं जातात तरी पण कांहीं दिवसांनीं तीं मळकट दिसूं लागतात, व त्यांना धोब्याकडे देण्याचा प्रसंग येतो. तेव्हां कपडे स्वच्छ कसे धुतां येतील हें जाणणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

कपडे धुण्यांत पाणी किती प्रकारचें असतें व कोणचें पाणी धुण्याच्या बाबतींत चांगलें याची माहिती असणें इष्ट आहे. कपडा स्वच्छ निघणें न निघणें हें बरेच अंशीं पाण्यावर अवलंबून असतें. आपण पुष्कळदां ऐकलें आहे कीं अमक्या पाण्यापासून कपडा स्वच्छ निघतो व अमक्या पाण्यापासून कपडा मुळींच निघत नाहीं, या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे. नदी किंवा तलावाच्या पाण्यानें कपडा जितका चांगला निघतो तितका विहिरीच्या पाण्यानें निघत नाहीं. ज्या पाण्यानें कपडा स्वच्छ निघतो असें पाणी थोडेसें एका भांड्यांत घेऊन त्या पाण्यांत साबूनें हात धुतले तर त्या पाण्याला दरदरून फेंस येईल. परंतु तेंच ज्या पाण्यांत कपडा स्वच्छ निघत नाहीं अशा पाण्यांत हात धुतले तर फेंस न येतां साबूच्या फुटलेल्या ताकासारख्या कवड्या होतात. पहिल्या पाण्यास आपण हलकें पाणी म्हणूं. इंग्रजींत या पाण्यास सॉफ्ट वॉटर म्हणतात. दुसऱ्या पाण्यास जड पाणी असें नांव देतां येईल. इंग्रजींत याला हार्ड वॉटर म्हणतात. वरील परीक्षेवरून कोणचें पाणी धुण्यास चांगलें व कोणचें वाईट हें ठरवितां येईल. ज्या पाण्यांत साबूला दरदरून फेंस येतो तें पाणी धुण्यास चांगलें. ज्या पाण्यांत साबूला फेंस न येतां त्याच्या कवड्या कवड्या होतील तें पाणी निरुपयोगी आहे असें समजावें. वरील परीक्षा करितांना साबू चांगला असला पाहिजे. बार सोप किंवा साबूचे गोळे ज्यांचा उपयोग कपडे धुण्याकडे करतात त्यांत चुना, पीठ व अशाच प्रकारच्या स्वस्त द्रव्यांची मिसळ साबूचें वजन वाढविण्यासाठीं केलेली असते. यामुळें सकृद्दर्शनीं हे साबू स्वस्त वाटतात तरी पण ते एकंदरींत स्वस्त पडत नाहींत, इतकेंच नाहीं तर वर दर्शविलेल्या मिसळीपासून त्या साबूपासून होणाऱ्या कार्यावर अनिष्ट परिणाम होतो. सबब पाण्याची परीक्षा करितांना अशा तऱ्हेचा साबू घेऊं नये. सध्यां बाजारांत मिळत असणाऱ्या साबूमध्यें सनलाईट सोपइतका शुद्ध व स्वस्त साबू दुसरा कोणचाच नाहीं. हा साबू स्वस्त असल्यामुळें कपड्यास लावण्यास परवडतो व शुद्ध असल्यामुळें वेळप्रसंगीं अंगालाही लावतां येतो. पाण्याची परीक्षा करण्यासाठीं या साबूचा उपयोग करावा, इतकेंच नाहीं तर कपडे धुण्यासाठींही हाच साबू वापरावा.

सर्व पाण्यांचा जडपणा सारखा नसतो. कांहींचा कमी व कांहींचा जास्त असतो. कमी जड पाण्यांत प्रथम थोड्या साबूच्या कवड्या होतात; परंतु त्यानंतर जास्त साबू वापरला तर त्या पाण्याला फेंस येऊं लागतो. जास्त जड पाणी असलें तर त्याच्यांत बराच साबू वापरल्यानंतर फेंस येतो. अशा पाण्यांत कपडा धुवावयाचा म्हणजे साबूचा बराच व्यय होतो. कपडे धुण्यास हलकें पाणी असलें म्हणजे थोडक्या साबूंत काम होतें. पावसाचें पाणी नेहमीं हलकें असतें. परंतु तेंच पाणी जमिनीवर पडल्यावर जमिनींतले नानातऱ्हेचे क्षार आपल्यांत विरघळून त्या क्षारांच्या गुणधर्माप्रमाणें हलकें किंवा जड होतें. तलावाचें पाणी जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहात गेलेलें असतें. डोंगरावर पडलेलें पाणी जमिनींत जाऊन एखाद्या पोकळींत जमा होतें व तेथून झऱ्याच्या रूपानें बाहेर पडतें. अशा तऱ्हेचे अनेक झरे मिळून त्याची नदी झालेली असते. यावरून तलावाच्या पाण्यापेक्षां नदीच्या पाण्यांत क्षार जास्त प्रमाणानें द्रवीभूत झालेले असतात असें दिसेल. विहिरीचें पाणी जमिनींत जास्त खोलवर गेल्यामुळें त्याच्यांत नदी किंवा तलावाच्या पाण्यापेक्षांही जास्त क्षार असतात. पाण्यांत कांहीं क्षार विरघळविले असतां पाणी हलकेंच रहातें व कांहीं क्षारांनीं पाणी जड होतें. तेव्हां पाण्याचें जडत्व किंवा हलकेपणा त्यांत विरघळलेल्या क्षारांच्या प्रमाणावरच नसून त्याच्या जातीवरही आहे.

कपडे धुण्यास कोणचें पाणी चांगलें याचें विवेचन झालें. आतां कपड्याचा मळ काढणें याबद्दल विचार करूं. कपडा भिजवून पुष्कळ आपटला किंवा दगडांवर चोळला तर बराच स्वच्छ होतो; परंतु आघातामुळें धुताचा पीळ सैल होऊन सूत कमजोर होतें व कपडा लवकर फाटतो. करवडलेलीं भांडीं ज्याप्रमाणें ताबडतोब घांशीत नाहींत, त्यांना पाणी घालून उमलवितात, त्याप्रमाणें कपड्याचाही मळ उमलविला पाहिजे. कपडा नुसता भिजवून बरेच तास ठेवला तर मळ उमलेल, परंतु कांहीं रासायनिक द्रव्यें पाण्यांत घातलीं असतां मळ उमलण्याची क्रिया चांगली व त्वरेनें होते. सध्यां हिंदुस्थानांत या कामासाठीं वापरलीं जाणारीं द्रव्यें साबू व सोडा हीं होत. सुधारलेल्या देशांतून निरनिराळीं रासायनिक द्रव्यें उपयोगांत आणतात; परंतु आपल्या देशांत तीं चोहोंकडे मिळत नसल्यामुळें साबू व सोडा यांचाच जास्त प्रचार आहे. या खेरीज साबू व सोडा हे पदार्थ निरुपद्रवी असल्यामुळें मुलाबाळांच्या घरांत बिनधोक ठेवतां येतात. तशा तऱ्हेनें इतर विषारी रासायनिक पदार्थ निर्धास्तपणानें ठेवतां येत नाहींत.

साबूचा उपयोग सर्वांना माहीत आहे. पुष्कळ लोक कपड्याला साबू लावून कपडा चोळून चोळून किंवा आपटून धुतात. अशा तऱ्हेनें कपडे धुण्यांत मेहनत जास्त लागते. यापेक्षां कपड्याला साबू लावून तो उन्हांत वाळवावा किंवा साबू लावून गरम पाण्यांत ठेवावा म्हणजे कांहीं वेळानें मळ व साबू यांचा संयोग होऊन मळ मऊ पडून द्राव्य स्थितींत येतो व थोड्याशा मेहनतीनें कपडा स्वच्छ होतो. नुसत्या साबूपेक्षां साबूबरोबर थोडासा सोडा वापरला तर मळ द्राव्य करण्याची क्रिया सुलभ होते. सोडा हा बहुतेक ठिकाणीं मिळतो. याला वाशिंग सोडा किंवा धुण्याचा सोडा असेंही कित्येक ठिकाणीं म्हणतात. सोडा हा शब्द प्रचारांत तीन निरनिराळ्या वस्तूंना लावतात. सोडा या नांवाचें पेय पुष्कळांना सध्या माहीत आहे. हें पेय कांचेच्या जाड बाटलींत भरलेलें असून बाटलीच्या तोंडांत कांचेची गोळी असते. गोळी जोरानें दाबली म्हणजे बाटलींतलें पाणी जोरानें बाहेर येऊं लागतें व त्या पाण्यांतून कांहीं विवक्षित वायूचे बुडबुडे येतात. या पाण्याला सोडा ही संज्ञा आहे; परंतु यांत सोडा ह्या रासायनिक द्रव्याचा लवलेश नसतो. पाण्यांत कॉर्बानिक आसीड वायू बऱ्याच प्रमाणांत यंत्राच्या साहाय्यानें विरघळवून तें पाणी बाटल्यांतून भरतात. कार्बानिक

आसिड वायूच्या शक्तीमुळें कांचेची गोळी बाटलीच्या तोंडांत जाऊन बसते. या कार्बानिक आसिडमिश्रित पाण्यास सोडा ही संज्ञा आहे. पूर्वी याला लागणारा कार्बानिक आसिड वायू सोडा या द्रव्यापासून तयार करीत असल्यामुळें या वायूमिश्रित पाण्यालाही सोडा हें नांव दिलें असावें.

दुसऱ्या दोन सोडा या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या वस्तू म्हणजे एक वाशिंगसोडा व दुसरी सोडा बाय कार्ब या होत. दोन्ही पांढऱ्या भुकट्या असून दोन्ही पाण्यांत विरघळणाऱ्या आहेत. माल सोडा बाय कार्ब वाशिंग सोड्यापेक्षां कमी द्राव्य आहे. सोडा बाय कार्ब जिभेवर ठेवला असतां एक प्रकारची खारट चव लागते. ह्याचा उपयोग औषधांत होतो. अजीर्ण, बद्धकोष्ठ वगैरे बाबतींत हा पोटांत देतात. वाशिंग सोड्याचा एक कण जिभेवर ठेवला तर जिभेला चटका बसतो. याचा उपयोग फक्त कपडे धुण्याकडे होतो. केंसाचा मळ काढण्याकडेही अलीकडे याचा उपयोग होऊं लागला आहे. नुसत्या सोड्यानें केंस चरचरीत होतात, परंतु तोच ताक किंवा दह्यांत घालून लावला तर केंस स्वच्छ निघून मृदु रहातात. वाशिंग सोडा म्हणजे शुद्ध केलेला पापडखार. धोबी लोक जी खारीमाती कपडे धुण्यांत वापरतात ती खारीमाती, पापडखार व वाशिंगसोडा हीं रासायनिक दृष्ट्या एकच द्रव्यें असून त्यांत फरक फक्त कमीजास्त शुद्धतेचाच असतो. वाशिंगसोड्यांत मळ मुळींच नसतो. अशा तऱ्हेनें सोडा हें नांव प्रचारांत सोडा (पेय), सोडा बाय कार्ब व वाशिंगसोडा या तिघांना आहे. तेव्हां नुसता सोडा म्हटल्यानें धुण्याच्या कामांत कोणचा सोडा येतो हें नीट समजावें म्हणून वर स्पष्टीकरण केलें आहे.

वर दाखविलेल्या धुण्याच्या दोन तऱ्हांपेक्षां वाफेनें मळ उमलविण्याची तऱ्हा चांगली. कारण वाफेनें कपडा जळण्याची भीति नसून या पद्धतीनें मळ फार चांगला उमलतो. हीच पद्धति धोबी लोक उपयोगांत आणतात. पाणी तापविण्याच्या तपेल्यांत तीन सारख्या उंचीचे दगड ठेवावे व या तीन दगडांवर आडव्या उभ्या अशा कांहीं बांबूच्या चिपा ठेवाव्या. नंतर दगड बुडेल इतकें पाणी त्यांत भरावें. कपडे भिजतील इतकें पाणी घेऊन त्यांत एक धोतराला किंवा एक सदऱ्याला अर्धा किंवा पाऊण लहान चमचा वाशिंगसोडा घालावा. या पाण्यांत कपडे भिजवून साधारण पिळावे. नंतर एक एक कपडा पाटावर पसरून त्यावर साबूची वडी हलक्या हातानें फिरवावी. जेथें जास्त मळ असेल तेथें मात्र म्हणजे गळपट्टी, बगला, हातोपे वगैरे ठिकाणीं साबू थोडा जास्त लावून हातानें चोळावें. साबू जितका जास्त लावावा तितका कपडा जास्त चांगला निघेल ही समजूत चुकीची आहे. उलटपक्षीं साबूचे प्रमाण जास्त झाल्यास कपड्यावर साबूच्या गुठळ्या गुठळ्या होतील व कपडा चांगला निघणार नाहीं. वरील गोष्ट सोड्याच्याही प्रमाणाला लागू आहे. साबू लावल्यावर कपड्याचे पुन्हा पिळे करून तपेल्यांत बांबूच्या चिपावर एकमेकांवर व गोलाकार अशा तऱ्हेनें रचावे कीं तपेल्याच्या मध्यभागीं पोकळी राहील; नंतर तपेल्याचें तोंड एखाद्या मोठ्या पिल्यानें बंद करून तपेल्यावर झांकण ठेवावें. नंतर तपेल्याखालीं जाळ लावावा. कपडे प्रत्यक्ष तपेल्याच्या बुंधाला लागत नसल्यामुळें कपडे जळण्याची भीति मुळींच नाहीं. तपेल्यांतलें पाणी उकळूं लागलें म्हणजे वाफ वर दर्शविलेल्या पोकळींतून वर चढेल व कपड्यांना गरम करील. दहा बारा पिळ्यांची भट्टी असेल तर तपेल्याखालीं तास दीड तास जाळ ठेवावा व नंतर लांकडें काढून राहिलेल्या मंदाग्नीवर भट्टी निवूं द्यावी. भट्टी निवाल्यानंतर कपडे धुवावे. भट्टी चांगली साधली म्हणजे मळ इतका सैल होतो कीं एक दोन धांव घालून कपडा पाण्यांत खळबळविला कीं, सर्व मळ निघून तो स्वच्छ होतो.

कपडे वाळवावयाचे ते जितक्या प्रखर उन्हांत वाळवितां येतील तितक्या प्रखर उन्हांत वाळवावे. कपडे उन्हांत वाळविल्यानें व ते देखील तापलेल्या वाळवंटांत वाळविल्यानें जितके पांढरे शुभ्र होतात तितके छायेंत व साध्या जमिनीवर वाळवल्यानें होत नाहींत. याचें कारण नीटसें जरी सांगतां येणार नाहीं तरी पण हा पुष्कळांचा अनुभव आहे.

वरील भट्टीची कृति सर्व पांढऱ्या बीनरंगाच्या कपड्यांना लागू आहे. रंगीत कपडे भट्टींत घालतांना विचार करावा लागतो. कपड्याचा रंग कच्चा किंवा पक्का असतो. जो रंग साध्या पाण्यानें किंवा साबूच्या पाण्यानें निघतो तो कच्चा रंग व जो अशा तऱ्हेनें निघत नाहीं तो पक्का रंग. कपडा पक्क्यारंगाचा आहे किंवा नाहीं हें पाहणें असेल तर त्याला सोपी युक्ति म्हणजे त्याचा एक तुकडा घेऊन हातावर साबूच्या पाण्यानें चांगला चोळून मग धुवावा. जर पक्का असेल तर चिंधींतून निघणारें पाणी स्वच्छ असेल व रंग कच्चा असला तर त्या रंगाचें पाणी निघेल. वरील परीक्षेवरून असें दिसेल कीं पक्क्यारंगाचें कापड असलें तर त्याचा रंग साबू किंवा सोड्याच्या पाण्यानें निघणार नाहीं. परंतु सर्व पक्क्यारंगाचे कपडे भट्टींत घालतां येतीलच असें मात्र सांगवत नाहीं. कांहीं रंग थंड पाण्यांत न सुटले तरी वाफेच्या उष्णतेनें सुटतात. कांहीं रंग मात्र वाफेच्या उष्णतेलाही सुटत नाहींत. याच रंगाचे मात्र कपडे भट्टींत घालतां येतील. कोणचे रंग वाफेच्या उष्णतेला टिकाव धरतात व कोणचे नाहींत हें अनुभवानेंच ठरविलें पाहिजे. जेथें कपड्यावरच प्रयोग करणें इष्ट नसेल किंवा प्रयोगासाठीं त्याच कपड्याचा लहानसा तुकडा मिळणें शक्य नसेल तेथें असे रंगीत कपडे सोडा व साबूच्या थंड पाण्यांत कांहीं वेळ भिजवून मग धुवावे. रंगीत कपडे नेहमीं छायेंत वाळवावे. कारण रंग किती जरी पक्का असला तरी उन्हानें तो फिक्का पडतो. रेशीमकांठी धोतर भट्टींत घालतांना त्याचे कांठ चांगले फडक्यानें गच्च बांधण्याचा जो प्रघात आहे तो येवढ्याचसाठीं कीं भट्टीच्या उष्णतेचा परिणाम कांठाच्या रंगावर होऊं नये.

वर जी माहिती दिली आहे त्याखेरीज आणखी बरीच माहिती या विषयावर देतां येईल; परंतु साधारण जनसमूहाला त्याची आवश्यकता नसल्यामुळें ती येथें दिली नाहीं.


# विद्यार्थ्यांचें नोटबुक

## अथवा मराठी पहिल्या पुस्तकावरील नोट्स्.

लेखक रा. त्र्यंबक नारायण लेले, शाळामास्तर—पालक आणि विद्यार्थी यांना अत्यंत उपयोगी. पुस्तकांतील प्रत्येक धड्याचें मर्म समजावून त्याबरोबरच विविध माहिती देणारें आणि मनोरंजन करणारें असें हें एकच नोटबुक आहे. ह्याची रचना, प्रचलित गद्यपद्यार्थबोधाहून फार निराळ्या प्रकारची आहे. यास भारदस्त मराठी पत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. हें पुस्तक सर्वसाधारण लोकांस घेतां यावें म्हणून ह्याची किंमत कमी करून दोन आणे ठेविली आहे. तरी ५ प्रतीला ८ आणेच पडतील. आमचेकडे मागणी करावी.

**म्यानेजर**—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# महाराजा टेसूराव गणपत.

[ लेखक—विश्वनाथ, दिल्ली. ]

ह्या रामायणकालीन दाक्षिणात्य विभूतीचा महोत्सव या प्रांतांतील—उत्तर हिंदुस्थानांतील—बालगोपाल अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध दशमीपर्यंत करतात. वेळूच्या कांबट्यांची एक तिवई करून त्यावर एक मातीचें मुंडकें तयार करून बसवितात. डोक्यावर ऐटबाज मराठेशाही पागोटें व भव्य कपाळावर त्रिपुंड्र असतो. सारांश, महाराष्ट्रीय वीरपुरुषाला साजेलशी ऐट चेहेऱ्यांत असते. आम्ही टेसूरावाला महाराष्ट्रीय म्हटलें याचें कारण " राव " हें मानदर्शक उपपद विशेषतः मराठ्यांसच लावण्यांत येतें. रात्रौ आठ नवाचे सुमारास आळींतील मुलें टेसूरावची मूर्ति, पणती—दिवे, आणि लहान लहान काठ्या घेऊन बाहेर पडतात. घरोघर जाऊन टेसूरावचें चरित्र ज्यांत गोंवलें आहे असें एखादें पद किंवा दुसरें कोणतेंही गाणें म्हणतात. नंतर पणतींत तेल घालून पैसा दोन पैसे दिले म्हणजे मुलें आनंदानें उड्या मारीत जातात. एक्या आळींतल्या मुलांबरोबर दुसऱ्या आळींतल्या मुलांशीं कधीं कधीं मारामारीही होते. ह्या उत्सवांत पूर्वी मुसलमानांचीं मुलेंही मिसळत असत; परंतु अलीकडे तीं मुळींच सामील होत नाहींत बालपणापासूनच हिंदुमुलांबरोबर त्यांच्या धार्मिक सणावारांत मिसळण्याचें बाळकडू मिळाल्यास पुढें भविष्यकाळीं न जाणों कदाचित् राष्ट्रैक्यरूपी संकट हिंदुस्थानावर यावयाचें ! ! ! ह्या भीतीनें त्यांचीं मातापितरें मिसळूं देत नसतील ! ! ! अस्तु ! येणेंप्रमाणें दहा दिवस केल्यानंतर विजयादशमीच्या दिवशीं सूर्यास्ताच्या सुमारास नदींत किंवा तळ्यांत टेसूरावच्या मूर्तीचें विसर्जन करतात. ह्याच वेळीं इकडे रामलीलेचा उत्सवही मोठ्या थाटानें होतो. " मराठ्या वीराचा उत्सव " ह्या शब्दसमुच्चयानें आम्हाला जिज्ञासा उत्पन्न झाली आणि त्याबद्दल येथील बऱ्याच मित्रांस विचारितां त्यांनीं जो कथाभाग सांगितला तो खालीं देत आहें. हनुमानानें सीताशुद्धि केल्यावर लंकापती रावणाबरोबर युद्ध करण्याचें ठरलें. प्रभु श्रीरामचंद्र—लक्ष्मण, सुग्रीव, हनुमान, नल, नील, जांबुवंत इत्यादि—सेनाध्यक्षांबरोबर युद्धाचा खल करीत बसले होते. सुग्रीव प्रभुजींस म्हणाला " ह्या दक्षिण प्रांतांत महाराजा टेसूराव गणपत हा मोठा पराक्रमी राजा असून त्याच्या पदरीं अपरंपार सेना आहे व तो लंकाधिपतीचा जीवश्च कंठश्च स्नेही आहे. अर्थात् युद्धाचे वेळीं रावणाला तो साहाय्य केल्याविना राहणार नाहीं, आणि असें झालें म्हणजे रावणाचा पराभव करणें जवळ जवळ दुरापास्तच होईल. महाराजा टेसूराव हा फार नीतिमान् , धार्मिक, सुशील व मोठा भगवद्भक्त आहे. रावणाचा असत्पक्ष आहे असें त्याच्या मनांत भरविल्यास त्यानें जर तटस्थ राहण्याचें कबूल केलें तरच ही मोहीम तडीस जाईल. " सुग्रीवाची ही सला सर्वांना पसंत पडली आणि प्रभुश्रीरामचंद्रानें महाराजा टेसूरावांस मोठ्या सरंजामानिशीं बोलावणें पाठविलें. महाराजा टेसूराव मोठा भगवद्भक्त होता हें वर सांगितलेंच आहे. श्रीरामचंद्रजी साक्षात् ईश्वर आहेत हें तो पूर्णपणें जाणून होता; इतके दिवस आपण होऊनच जावें व प्रभुजींचें दर्शन घेऊन कृतार्थ व्हावें असें कित्येकदां त्याच्या मनांत येई; पण लंकाधिपती दोष देईल ह्या कल्पनेनें त्यानें तसें केलें नाहीं; परंतु आतां तसा दोष पदरीं येणें शक्य नसल्यामुळें मोठ्या आनंदानें तो प्रभूकडे येण्यास निघाला. शामसुंदर रामचंद्राला पाहतांच साष्टांग प्रणाम करून " काय

आज्ञा आहे " असें म्हणून तो नम्रपणें उभा राहिला.

रामचंद्रानें महाराजाला प्रेमानें आपल्याजवळ बसविलें. शिष्टाचाराप्रमाणें इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्यावर रामचंद्रानें युद्धाबद्दल गोष्ट काढली. ते म्हणाले " महाराजाधिराज ! आमचें आणि लंकापतीचें लवकरच युद्ध होणार हें आपल्याला अवगत असेलच; रावणानें केलेली अमानुषकृति मी नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आम्ही आपल्याच आश्रयाला आलों आहोंत. आमचा सत्पक्ष आहे. आपण मोठे भगवद्भक्त, महापराक्रमी आहांत. आपलें सेनाबल अतुल आहे तेव्हां न्याय्यपक्षाला साहाय्य करून आपली सद्वृत्ति जगाच्या निदर्शनास आणून द्याल अशी माझी विनंति आहे."

टेसूराव:—हे षडैश्वर्यसंपन्न भारत सम्राटा ! आपली सेवा घडावी आणि त्यांतच हा देह पडावा अशी मनापासून इच्छा आहे; परंतु लंकाधिपति माझा जिवलग स्नेही असल्यामुळें आपल्याला मदत करणें म्हणजे मित्रद्रोहाचें भयंकर पाप करणें नव्हे काय ? माझ्याजवळ अतुल सेना असून मी स्वतः जरी महापराक्रमी असलों तरी आपण साक्षात् ईश्वरावतार आहांत, अर्थात् त्याला साहाय्य केल्यास मला विजय मिळणें केव्हांही शक्य नाहीं. अद्यापि रावणानें माझें साहाय्य मागितलें नाहीं, परंतु मागितल्यास स्नेहधर्मामुळें मला तें दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. याबद्दल मला फार वाईट वाटतें.



आळींतील मुलें टेसूरावची मूर्ति, पणती-दिवे, आणि लहान लहान काठ्या घेऊन बाहेर पडतात.

मुत्सद्दीपणाच्या युक्तीजुक्तीस धरून रामचंद्र म्हणाले:—असें जर आहे तर आपण तटस्थ रहावें हेंच बरें.

टेसूरावाला हें बोलणें रुचलें. " रावणानें साहाय्याची याचना केल्यास सेना त्याच्याकडे पाठवीन परंतु मी स्वतः तटस्थ राहीन " असें श्रीरामचंद्राच्या चरणकमलांस स्पर्श करून कबूल केलें व विनयपूर्वक म्हणाला:—" हे भारताधिपते ! आपल्या आणि रावणाच्या घनघोर रणसंग्रामांत कोणत्याहि पक्षाच्या बाजूनें कां होईना पण युद्ध करावें असें कोणत्या वीरास वाटणार नाहीं ? परंतु ज्या अर्थी मला तसें करणें आतां शक्य नाहीं त्याअर्थी निदान रणभूमीवर येऊन युद्ध पहाण्याची मला आज्ञा असावी. युद्ध चालत असतांना यदाकदाचित् रावणाचा पराजय होत आहे असें वाटल्यास मी मित्रप्रेमानें वेडा होऊन त्याच्या बाजूनें युद्ध करीन व त्यामुळें माझ्या वचनाला बाध येईल, म्हणून माझें शिर तोडावें व वेळूच्या तिवईवर ठेवून ती तिवई दोहोंपक्षांच्या बरोबर मध्यभागीं ठेवावी, आणि कबंध छिन्नविच्छिन्न करून टाकावें. कारण न जाणों घनघोर रणसंग्राम, आकाशाला भेदून जाणारे वीरपुरुषांचे भीषण जयनाद, प्रत्यंचाचे कानठळ्या बसविणारे टणत्कार, शस्त्रास्त्रांचा खणखणाट इत्यादि पाहून माझें कबंधही वीरश्रीनें रणभूमीवर थैमान करूं लागेल व त्यामुळें प्रभूजींला फार त्रास होईल."

रामचंद्रानें नाइलाजानें टेसूरावाचें हें म्हणणें कबूल

केलें. नंतर रावणानें साहाय्य मागितलें. टेसूरावानें आपली सेना त्याच्या स्वाधीन केली. टेसूराव निदान शत्रुपक्षातर्फे युद्ध करणार नाहीं एवढ्यावरच रावणानें समाधान मानून घेतलें. अस्तु !

ठरल्याप्रमाणें युद्ध सुरू झालें. टेसूरावाच्या शिराची मध्यवर्ती स्थलावर स्थापना करण्यांत आली. श्रीरामचंद्राचा अद्वितीय पराक्रम पाहून टेसूरावाच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. रामचंद्रानें रावणाला मारिलें. अंबरांतून देवांनीं पुष्पवृष्टि केली. जिकडेतिकडे आनंदी आनंद झाला. रामचंद्रानें टेसूरावाचें शिर स्वहस्तें काढून प्रेमानें हृदयाशीं कवटाळिलें, नंतर प्रभुजी लक्ष्मणाकडे वळून म्हणाले:—बा लक्ष्मणा ! ह्या वीरपुरुषाचे हस्तपादादि अवयव नीट सांधून पुन्हां पूर्ववत् जागच्या जागीं लाव. नंतर टेसूरावास म्हणाले:— हे भक्त श्रेष्ठा ! तुझ्या अनन्य भक्तीनें मी पूर्ण संतुष्ट झालों. वरं ब्रूहि !

शिरानें रामचंद्राच्या चरणकमलांवर लोळण घेतली व म्हणालें:—हे सच्चिदानंद दयाघन प्रभो ! ज्या वेळीं हस्तपादादि अवयव तोडवून शिरकमल आपल्या चरणांवर अर्पण केलें त्याच वेळीं ह्या नश्वर जगाचा मीं त्याग केला. आपल्या दर्शनानें मी पावन झालों. आतां पुनरपि ह्या नश्वर जगांत मला लोटूं नका, इतकेंच प्रभुचरणांजवळ मागणें आहे.

निष्काम भक्तीनें भगवान् संतुष्ट झाला, गहिंवरला, सर्व जगत् निमिषमात्र स्थिर झालें, वातावरण तेजोमय दिसूं लागलें, सर्व प्रेममय बनलें. "तथास्तु" हीं प्रसादाक्षरें राममुखकमलांतून बाहेर पडलीं. शिरकमलांतून तेजोमय ज्योत निघून प्रभूंत विलीन झाली !!!

झालें ! आमचा कथाभाग येथें संपला. आमच्या प्रभूंला एका दाक्षिणात्य राजानें साहाय्य केलें त्या बद्दल कृतज्ञता दाखविण्याकरितांच हा उत्सव इकडे होतो. ह्या कथाभागाला कांहीं पुराणाधार आहे किंवा भक्तिमार्ग वाढविण्याच्या हेतूनें ही कोणी रचिली आहे याबद्दल आम्हांला कांहीं सांगतां येणार नाहीं. रामायणकालांत "टेसूराव गणपत" अशीं नांवें दक्षिणेंत प्रचलित होतीं किंवा एकाद्या तत्कालीन राजाच्या नांवाचा अपभ्रंश होऊन वरील नांव प्रचारांत आलें आहे वगैरेबद्दल ऊहापोह करणें आमच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरील काम असल्यामुळें तें महाराष्ट्रीय विद्वान लोकांवर सोंपवून वाचकांची रजा घेतों.


# चिमुकल्या गोष्टी, भाग १ ते ६.

ह्या पुस्तकांत रोज **व्यवहारांत** घडणाऱ्याच **गोष्टी** दिलेल्या आहेत; पण त्या इतक्या **मोहक, मनोरंजक व मार्मिक** लिहिल्या आहेत कीं, **इसापनीतींतील** गोष्टींप्रमाणें या गोष्टींतील **तत्त्वबोध** गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज बसत जातो. पुस्तकें **मोठ्या टाइपांत सुंदर, जाड, ग्लेज** कागदावर छापिलेलीं असून प्रत्येक गोष्टीच्या आरंभीं **कथानकाचें सुंदर चित्र** दिलेलें आहे. प्रत्येकीं किंमत ८४.

**मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# श्रीमत् शंकराचार्यावतार–कथा.

श्री० शंकराचार्य हे शंकराचे अवतार होत. त्यांनीं ज्ञानमार्गाचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. शंकरांना हा अवतार कां घ्यावा लागला व त्या अवतारकार्यांत इतर दैवतांनाही कोणकोणतीं कार्यें करावीं लागलीं याबद्दलची जी माहिती उपलब्ध आहे ती फारच मनोरंजक व बोधप्रद आहे. तर तिचें आपण थोडक्यांत पर्यालोचन करूं.

श्रीमत् शंकराचार्यांचा अवतार होण्यापूर्वीं प्रचलित असलेल्या मतांमध्यें मुख्यतः चार्वाक्, जैन, बौद्ध, व शाक्त हीं विशेष महत्त्वाचीं होतीं. यांपैकीं चार्वाक्मतें तर विलक्षणच होतीं. त्यानंतरचीं जैन हीं जास्त वरच्या दर्जाचीं व बौद्धमतें तर चार्वाक्मताचें समूळ खंडण करणारीं होतीं. आतां या प्रत्येकाबद्दल थोडक्यांत विचार केल्यास अप्रासंगिक होणार नाहीं.

चार्वाक्मतें फारच भयंकर होतीं. त्यामध्यें ईश्वराचें अस्तित्व मानलें जात नव्हतें व ईश्वर नसल्यामुळें ईश्वराला मनुष्यानें भिण्याचें प्रयोजन उरत नव्हतें. वेदांमध्यें सांगितलेला धर्म खोटा. वेदबाह्य सर्व खरें व तेवढाच काय तो धर्म. या प्रथम दैत्याच्या म्हणण्याप्रमाणें जगाचा नियंता कोणीच नाहीं. यानें आपली मति वादविवाद करण्यांतच खर्च केली. ते वादही असेच कीं, ज्यापासून कांहीं तथ्य निघणार नाहीं, तर केवळ शुष्क. स्वर्ग वगैरे सर्व खोटें. वेदधर्म म्हणजे पैसे उपटण्याचें एक साधन होय. त्याचे मतें वेद हे पौरुषेय होत. यज्ञयाग सर्व मिथ्या होय. तो असें म्हणे कीं पशुहननानें जर पशु स्वर्गाला जातो तर माणसानें आपल्या पित्याला स्वर्गांत स्थान मिळण्यासाठीं त्याला खुशाल मारावें. हें जग केवळ स्त्रीपुरुष निर्मित आहे. यमही नाहीं व यमयातनाही नाहींत. आत्मा सुद्धां देहाव्यतिरिक्त नाहीं तर देह हाच आत्मा. म्हणून आत्मा अजरामर नाहीं. कारण—
" भस्मीभूतस्य पुनरागमनं कुतः "

अशा रीतीनें 'खाना पीना और मजा करना' एवढेंच काय तें जगांत येऊन इतिकर्तव्य अशी जेव्हां अवस्था झाली तेव्हां परमेश्वर विष्णु यांना काळजी पडली व त्यांनीं बुद्धाचा जन्म घेतला व बौद्ध धर्म स्थापन केला.

या धर्मांत सुद्धां वेदाचें प्रामाण्य मानलेलें नाहीं. हीं मतें चार्वाक्मतांपेक्षां श्रेष्ठ आहेत. बुद्धाचा अवतार होण्याचें कारण एवढेंच कीं चार्वाक् मताभिमान्यांना दृश्य जगाच्या जरा पलीकडे नेलें म्हणजे कार्यभाग झाला. चार्वाकांच्या डावपेंचांना आळा बसावा म्हणून यानें " अहिंसा परमोधर्मः " हें तत्त्व प्रस्थापित केलें. स्वतःला हलकें समजणें, यज्ञयाग करणें हीं सर्व तत्त्वें फुकट आहेत. आत्मसंयमन, भूतदया, कायिक वाचिक मानसिक पावित्र्य, यांच्या योगानें सुख होतें. याला पुनर्जन्मतत्त्व मान्य होतें. पुनर्जन्म चुकवायला पावित्र्य, सदाचार वगैरे उपाय होत. व त्यांच्या योगानें मनुष्यास " निर्वाण " प्राप्त होतो (म्हणजे आत्म्याला चिरंतन शांति मिळते.) ह्या धर्माचा प्रसार चीन, जपान ह्या ठिकाणीं झाला. यांत जरी " अहिंसा परमोधर्मः " हें तत्त्व होतें तरी वेदप्रामाण्य नव्हतें.

याच वेळीं शाक्त उत्पन्न झाले. हे सर्व " शक्ति " म्हणजे देवीउपासक होते. या मताचे लोक वेदबाह्य यज्ञ करीत. सुरापान सुरू होऊन लोक व्यसनाधीन बनले. या वेळीं दुराचार अत्यंत वाढला.

जैन धर्म राजा महावीर यानें स्थापिला. तो वेदधर्म व बौद्ध धर्म यांच्या मधला आहे. त्यांना चातुर्वण्य-व्यवस्था व निरनिराळ्या देवता संमत आहेत. परंतु वेद प्रामाण्य कबूल नाहीं. ते "जिनांची" पूजा करतात म्हणून त्यांना जैन म्हणतात. "जिन" म्हणजे साधु अथवा शहाणा. त्यांच्या अहिंसेची कल्पना बुद्धाच्या कल्पनेपेक्षां फारच विलक्षण आहे. त्यांत दोन जाती आहेत. श्वेतांबर व दिगंबर. यांच्यांतली हवेंतील कीटक तोंडांत जाऊं नयेत म्हणून तोंडावर पडदा बांधण्याची पद्धत महशूरच आहे.

आतां आपण अशी स्थिति असतांना शंकरांनीं अवतार कसा घेतला व कोणाला आपल्या मदतीस घेतलें तें पाहूं.

बौद्धांनीं वैदिकांचा फारच छळ केला. 'अति तेथें माती.' वेदधर्माप्रमाणें वागणाऱ्यांचा जेव्हां अत्यंत छळ होऊं लागला तेव्हां लाट फिरली. नारदांनीं संचार करीत असतां ही गोष्ट ब्रह्मदेवांना सांगितली. ब्रह्मदेवांनीं नारदास विष्णूकडे पाठविलें. परंतु गौतमबुद्ध हा पडला विष्णूचा अवतार. तेव्हां बुद्धाच्या मताचें खंडन करण्यासाठीं विष्णूकडे जाण्यांत अर्थ नाहीं. कारण तो आपण प्रस्थापित केलेल्या मतांचें खंडन कदापिहि करणार नाहीं. एतदर्थ महादेव शंकर यांच्याकडे जाण्याचा बेत झाला व त्याप्रमाणें त्यांच्याकडे जाऊन त्यांस वृत्तांत कळविला. त्यांनीं सांगितलें कीं मी अवतार घेईन परंतु आधीं बुद्धांचा सुळसुळाट कमी करण्यास दुसऱ्या कोणीं तरी अवतार घेतला पाहिजे.. हें काम कार्तिकस्वामीनीं करावें असें ठरलें. त्यांस बोलाविण्यांत आलें. व त्यांच्याकडे जगांत वेदप्रामाण्य सिद्ध करण्याची कामगिरी आली. व नवखंडांत सर्व प्रतिपक्षीय पंडितांचा पराजय करशील असा वर दिला. शंकरांनीं ब्रह्मदेवाला तूं मंडणमिश्र हो म्हणून सांगितलें व यज्ञयाग वगैरे कर्म करण्याचव कामगिरी दिली. इंद्रास सुधन्व होण्यास सांगितलें व



श्रीमत् आद्य शंकराचार्य.

कार्तिकस्वामींस--कुमारीलभट्टांस--राजसाहाय्य दिलें. देवी सरस्वतीला मंडणमिश्र पत्नी केली. याप्रमाणें सर्व व्यवस्था करून शंकर म्हणाले कीं या सर्वांच्या अवतारानंतर मी अवतार घेईन व उज्ज्वल ज्ञानमार्ग स्थापन करीन.

एवढें ठरल्यानंतर सर्वांनीं आपआपलीं कामें करण्यास सुरवात केली. अशोक राजाच्या वंशांत इंद्रानें अवतार घेतला. सुधन्वाचें वास्तव्य "मेदिनीपूर"—हल्लींचें "मिदनापूर"—हें होतें. हा पक्का जैन होता. हा विद्वानांचा चहाता होता. त्याची वृत्ति अत्यंत शांत होती. कार्तिकस्वामींनीं तैलंगण देशांत यज्ञेश्वरभट्टांचा पुत्र कुमारीलभट्ट म्हणून अवतार घेतला. कुमारीलभट्ट जैन गुरूंकडे राहिला, परंतु आपण वैदिकमताचे आहोंत हें मात्र त्यानें त्यांस कळूं दिलें नाहीं. त्यांच्याजवळ राहून तो जैन मतांतील दोष शोधूं लागला व मोठा वादी म्हणून प्रसिद्धीस आला. व त्याची प्रसिद्धी सुधन्व्याच्या कानापर्यंत गेली. त्याला आमंत्रण करण्यांत आलें, त्याची राजानें पूजा केली, व दरबारांतील पंडितांबरोबर वादविवाद करण्यास सांगितलें. इतक्यांत बाहेर आंब्याच्या झाडावर कोकिळ ओरडला. कोकिळश्रुति दोष लागला. "तूं जैन पंडितांच्या नादास न लागलास तर तुझी कीर्ति स्वर्गलोकांत होईल" असें राजा मनांत समजला. वादास सुरवात झाली व कुमारीलभट्टानें सर्व पंडितांस जिंकलें व वैदिक धर्म सिद्ध केला. तुम्हीं वादांत आह्मांला जिंकलें खरें परंतु प्रमाण दाखवा असें पंडीत म्हणूं लागले. तुम्हीं जर वेद खरे आहेत असें म्हणतां तर पर्वतावरून उडी टाका. तो म्हणाला ठीक व त्यानें वेद-पुरुषाची आठवण करून पर्वतावरून उडी टाकली, परंतु वेदपुरुषानें त्यास वरचेवर धरिलें. तेव्हां एक पंडित ओरडलें, "हें चेटूक आहे, ह्यापेक्षां निराळी समक्षा दाखवा." त्यानें ठीक आहे म्हणून सांगितलें. पंडितांनीं एका घागरींत एक सर्प घालून तिचें तोंड बंद करून ती त्याच्यापुढें ठेविली व घागरींत काय आहे म्हणून त्यास विचारिलें. त्यानें वेदपुरुषाचें स्मरण करून "आंतमध्यें सोन्याची लक्ष्मीनारायणाची मूर्ति आहे" असें सांगितलें. सुधन्व घाबरला व आपला अवतार हेतु फसतो असें त्यास वाटलें. तो अत्यंत चिंतातुर झाला इतक्यांत आकाशवाणी होऊन राजाला अभय मिळालें. पंडितांस वाटलें, आपण विजयी झालों; म्हणून मोठ्या आनंदानें त्यांनीं तिचें तोंड उघडलें व आंत पाहतात तों सोन्याची लक्ष्मी नारायणाची मूर्ति! मग काय? सर्वांचीं तोंडें चिमणीएवढीं झालीं. राजाला अत्यानंद झाला. पंडितांनीं पलायन केलें. राजानें ताबडतोब जैन लोकांस मारण्याचा हुकूम केला. "जे कोणाचा जीव घेत नाहींत त्यांची रामेश्वरापासून हिमालयापर्यंत हा म्हातारा किंवा हें मूल हा विचार न करतां सरसहा कत्तल करा." लगेच जैनांस मारण्याची सुरवात झाली. पहिली पाळी कुमारीलभट्टांचे गुरू यांच्यावर आली. धृष्टद्युम्नानें आपल्या गुरूला मारल्याचा आधार घेऊन त्यानेंही आपल्या गुरूला मारविलें. अशा रीतीनें जैनबीज नष्ट झालें. सुधन्वराजा वेदधर्मवादी झाला. अशा रीतीनें कर्ममार्ग प्रचलित झाला.

दुसरीकडे ब्रह्मदेवही मंडणमिश्र म्हणून जन्मास आले. सरस्वती त्यांची पत्नी झाली व दोघे यज्ञयाग करूं लागलीं. या अवताराचा हेतु एवढाच कीं अत्यंत कर्मठपणा प्रचलित करावयाचा. सुधन्व राजानें वेदधर्माला सुरवात केली. मंडणमिश्रानें तो अत्यंत कडकपणानें आचारिला व यामुळें त्याची अत्यंत कर्मठ म्हणून प्रसिद्धि झाली. यानें यज्ञांचीं अनुष्ठानें सुरू केलीं. जुनीं सर्व मतें नष्ट झालीं. परंतु अशी स्थिति जर कायम राहील तर बरें नव्हे. हा मार्ग चांगला खरा परंतु यांत स्वर्ग मिळविणें हेंच अंतिम साध्य. स्वर्गापरतें सुख नाहीं. तेव्हां माणसाची इतिकर्तव्यता एवढीच कीं त्यानें सर्व कर्में यथाशास्त्र करावींत व नंतर स्वर्गसुख

अनुभवावें. उपनिषदें अत्यंत श्रेष्ठ व मुख्य. सकाम कर्म सुरूं झालें. कर्मच ईश्वर. अद्वितीय ब्रह्म नाहीं, अशीं मतें अस्तित्वांत आलीं. ज्ञान-मार्ग बुडत चालला व अशी स्थिति जर चालेल तर तो लवकरच समूळ नष्ट होईल अशी भीति वाटूं लागली.

शंकरांनीं अवतार घेण्याची वेळ झाली असें जाणून नारद त्यांस भेटले व " सर्वांनीं आपआपलें काम केलें आहे, आतां आपण अवतार घेऊन ज्ञानमार्ग प्रस्थापित करा " म्हणून त्यांस विनंति केली. शंकर म्हणाले, " हल्लीं सकाम कर्में होऊं लागलीं आहेत; तेव्हां मी शंकराचार्य होऊन श्रुतींचें मर्म लपविणाऱ्यांना जिंकीन" विष्णु पद्मनाभ, वसु हस्तामलक व बृहस्पति तंतोटक होण्याचें ठरलें. तैलंगण देशांत शिवगुरु ब्राह्मण मोठा शिवभक्त होता. त्यास पुत्र नव्हता. त्यानीं सात दिवस तपश्चर्या केल्यावर त्यास स्वप्न झालें. त्यांत " तुला हुषार पण अल्पायुषी असा एक मुलगा पाहिजे, कां मूर्ख पण दीर्घायुषी असे शंभर मुलगे पाहिजेत " असें विचारण्यांत आलें. त्यानें एकच पण तेजस्वी व हुषार असा पाहिजे, असें सांगितलें. शंकरांनीं लागलीच अवतार घेतला. ( ३५८ ईश्वरनाम संवत्सरे वैशाख शु० १५.) पुढें यांनीं लवकरच संन्यास घेऊन मंडणमिश्राबरोबर कडाक्याचा वाद करून व त्यास जिंकून ज्ञानमार्ग स्थापिला. यांनीं अद्वैत मार्ग स्थापिला नसता तर एकही वेदान्त ग्रन्थ आज दृष्टीस पडला नसता. यांचा सिद्धान्त व ब्रीद " ब्रह्मविदाप्नोति परमं " हे होते. " अयमात्माब्रह्म " आत्मा व ब्रह्म यांत जो अंतर मानील तो नाश पावेल. " तत्त्वमसि " वगैरे ज्ञानापासून मोक्ष मिळतो तद्व्यतिरिक्त ब्रह्म नाहीं. त्याच्या अभावीं जन्ममरणशृंखला सुटणें अशक्य आहे. " ब्रह्म जाणतो तो ब्रह्म होतो " हें आदितत्व त्यांनींच शिकविलें. यांचे संस्कृत ग्रंथ सुलभ पण अत्यंत ज्ञानप्रद आहेत. भाष्यासारखे कठीणही आहेत; परंतु तेवढ्यावरच न जातां त्यांचें परिशीलन प्रत्येकानें करावें ह्मणजे ज्ञानप्राप्त होऊन सद्गति मिळेल यांत संशय नाहीं.

आचार्यांनीं तैलंगणांतून बौद्ध धर्माचें समूळ उच्चाटण केलें. त्यांच्याप्रमाणेंच त्यांचे शिष्यही प्रसिद्ध आहेत.

# शास्त्रीय माहिती.

**खंदकांतील वर्तमानपत्रें**—मुद्रणस्वातंत्र्याच्या कालापासून तों आजपर्यंत रणांगणावरील खंदकांत वर्तमानपत्रांचा अवतार झाल्याचें ऐकिवांत नव्हतें; पण प्यारिसमधील गॉलाइस ( Gaulois ) वर्तमानपत्राच्या बातमीदारानें ही गोष्ट निदर्शनास आणली आहे. तो म्हणतो कीं बंदुकांच्या व तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यांत असणाऱ्या खंदकांतही वृत्ती उल्हसित करणारीं वर्तमानपत्रें निघत आहेत. शांततेच्या काळांत ज्याप्रमाणें विद्वत्ताप्रचुर व विनोदात्मक लेखांनीं भरलेलीं वर्तमानपत्रें निघत असतात त्याचप्रमाणें त्या आगीच्या जबड्यांत प्रतिक्षणीं असणाऱ्या खंदकांतूनही तीं निघत आहेत. हे क्षत्रिय-वर्तमानपत्रकर्ते, कसल्याही प्रसंगांत, कसल्याही हवेंत, सभोंवतीं बंदुकांच्या गोळ्यांचें नर्तन चाललें असतांही, आपलें छापण्याचें काम करीतच असतात; इतकेंच नव्हे तर तें वर्तमानपत्र हें त्यांच्या निधड्या छातीचें व आत्मविश्वासाचें एक निदर्शकच असतें. हें सगळें काम हॅंडप्रेसवरच निघत असतें, व त्यांतील चित्रेंही त्यावरच ते छापून काढतात.(Warcry) ह्या नांवाचें १०३ व्या पलटणीचें एक वर्तमानपत्र आहे; तें सरकारी, विनोदप्रचुर, वाङ्मयात्मक व

" अनियतकालिक " असल्याचें त्यानेंच जाहीर केलें आहे. युद्धप्रसंगांत नियतकालीं पत्र काढणें शक्य नसल्यानें त्यानें " अनियत कालिक " हें विशेषण आपणांस लावून घेतलें आहे हें योग्यच आहे. त्याचा एक अंक जानेवारी १ ला तर दुसरा २१ ला निघाला आहे. त्याच्या आशावादी व धैर्यशील प्रकाशकांनीं आपलें धोरण म्हणजे " शत्रूचें नियमन " व आपलें ऑफिस " विजयपथांत " असल्याचें प्रसिद्ध केलें आहे.

सरकारी पत्रकांत येणाऱ्या बातम्यांचा रकाना संपल्यावर 'मग हे विनोदी लेखक आपला विनोद स्वैर चालूं देतात. जाहिरातींकरितां राखून ठेवलेल्या जागेंत सुद्धां विनोदच भरलेला असतो. " खंदकांतील मोठ्या विस्तृत, प्रकाशमय, शुद्ध हवा खेळत असणाऱ्या व ( Boches ? ) युद्धाचा देखावा सुंदर रीतीनें ज्यांतून दृष्टीस पडेल अशा खोल्या भाड्यानें देणें आहे, गरजूंनीं अर्ज करावे " अशा जाहिराती त्यांत असतात. अशाच रीतीनें खंदकांतून प्रसिद्ध होत असणाऱ्या दुसऱ्या वर्तमानपत्रांचीं नांवें The cave man ( गुहावासी ), The Trench Gazette ( खंदकसमाचार ) वगैरे आहेत.

—लिटररी डायजेस्ट.—

**शिजविलेलें व न शिजविलेलें अन्न**—मांसाहार श्रेष्ठ कां शाकाहार श्रेष्ठ हा वाद ज्याप्रमाणें कधीं संपणार नाहीं त्याप्रमाणें शिजविलेल्या व न शिजविलेल्या फलहाराच्या गुणदोषाबद्दल पुष्कळ मतभेद आहे. मुळे, पेरु, केळीं वगैरे फळांची व कंदमुळांची कोशिंबिर आपण खातों; म्हणजे आपण ' अपक्व ' फलाहार करतों. हा जिवंत आहार पचविण्यास आपल्या पोटास बरीच खटपट करावी लागते; पण त्यामुळें जो जाठररस उत्पन्न होतो तो पचनशक्ति वाढवितो. अशा प्रकारें न शिजविलेलें कांहीं तरी अन्न पोटांत न गेलें व आपण निवळ शिजलेलेंच अन्न खाल्लें तर अनेक प्रकारचे रोग जडतात. मुलांना तर याबद्दल विशेषच जपलें पाहिजे. यांत एकच धोका आहे तो असा कीं न शिजविलेल्या फळांत रोगजंतू असण्याचा बराच संभव असतो. शिजविण्यानें ते मरून जातात. यामुळें पुष्कळ वेळा शिजवून खाण्यांत धोका कमी असतों. वाटाण्यासारखें धान्य मात्र अति टणक असल्यामुळें तें शिजवून खाल्लें पाहिजे. या शिवाय आवडीचा एक प्रश्न विचारांत घेण्याजोगा आहे. अन्न शिजविण्यानें त्याला एक प्रकारची निराळी रुची येते; व आवडेल तेंच अन्न खाणें केव्हांही श्रेयस्कर असतें. यामुळें कोशिंबिरी खाव्या कीं शिजलेल्या भाज्या अधीक खाव्या यास सरसकट एक उत्तर न देतां अभिरुचीप्रमाणें, सवड पाहून व सारासार विचार करून बरें वाटेल तसें पण " गोड करून खावें " म्हणजे सर्व कांहीं पचतें असा नियम एका अनुभवीक वैद्यानें दिला आहे.

**खडकांचा प्रवाह**—कार्नेजी संस्थेनें शास्त्रीय शोधाकरितां दिलेल्या रकमेपैकीं एकीचा विनियोग " खडकांचा प्रवाह—गती—चलन " ह्याकडे व्हावयाचा आहे. ह्यावरून खडकसुद्धां चालतात, वाहतात असें दिसतें; आणि ह्या खडकांच्या प्रवाहाबद्दल नक्की शास्त्रीय माहिती मिळविणें हें महत्त्वाचें काम आहे. पाण्याच्या दाबानें चालणाऱ्या यंत्राच्या साहाय्यानें १ स्क्वेअर इंचावर—१ इंच लांबीरुंदीच्या जागेवर—१२० टनांचा दाब घालून हा प्रयोग चालविला असतां संगमरवरी दगड, चुनखड्याचे पथ्थर, वगैरे खडक वाहूं लागतात असें स्पष्ट दाखवितां येतें. त्यांची गती अति मंद असते. ह्या शोधांचें महत्त्व पृथ्वीवरील शिलाप्रस्तर कसे बनले असावेत हें दाखविण्याकरितांच आहे.

अनुभवावें. उपनिषदें अत्यंत श्रेष्ठ व मुख्य. सकाम कर्म सुरू झालें. कर्मच ईश्वर. अद्वितीय ब्रह्म नाहीं, अशीं मतें अस्तित्वांत आलीं. ज्ञान-मार्ग बुडत चालला व अशी स्थिति जर चालेल तर तो लवकरच समूळ नष्ट होईल अशी भीति वाटूं लागली.

शंकरांनीं अवतार घेण्याची वेळ झाली असें जाणून नारद त्यांस भेटले व "सर्वांनीं आपआपलें काम केलें आहे, आतां आपण अवतार घेऊन ज्ञानमार्ग प्रस्थापित करा" म्हणून त्यांस विनंति केली. शंकर म्हणाले, "हल्लीं सकाम कर्में होऊं लागलीं आहेत; तेव्हां मी शंकराचार्य होऊन श्रुतींचें मर्म लपविणाऱ्यांना जिंकीन" विष्णु पद्मनाभ, वसु हस्तामलक व बृहस्पति तंतोटक होण्याचें ठरलें. तैलंगण देशांत शिवगुरु ब्राह्मण मोठा शिवभक्त होता. त्यास पुत्र नव्हता. त्यानीं सात दिवस तपश्चर्या केल्यावर त्यास स्वप्न झालें. त्यांत "तुला हुषार पण अल्पायुषी असा एक मुलगा पाहिजे, कां मूर्ख पण दीर्घायुषी असे शंभर मुलगे पाहिजेत" असें विचारण्यांत आलें. त्यानें एकच पण तेजस्वी व हुषार असा पाहिजे, असें सांगितलें. शंकरांनीं लागलीच अवतार घेतला. (३५८ ईश्वरनाम संवत्सरे वैशाख शु० १५.) पुढें यांनीं लवकरच संन्यास घेऊन मंडणमिश्राबरोबर कडाक्याचा वाद करून व त्यास जिंकून ज्ञानमार्ग स्थापिला. यांनीं अद्वैत मार्ग स्थापिला नसता तर एकही वेदान्त ग्रन्थ आज दृष्टीस पडला नसता. यांचा सिद्धान्त व ब्रीद "ब्रह्मविदाप्नोति परमं" हे होते. "अयमात्माब्रह्म" आत्मा व ब्रह्म यांत जो अंतर मानील तो नाश पावेल. "तत्त्वमसि" वगैरे ज्ञानापासून मोक्ष मिळतो तद्व्यतिरिक्त ब्रह्म नाहीं. त्याच्या अभावीं जन्म-मरणशृंखला सुटणें अशक्य आहे. "ब्रह्म जाणतो तो ब्रह्म होतो" हें आदितत्त्व त्यांनींच शिकविलें. यांचे संस्कृत ग्रंथ सुलभ पण अत्यंत ज्ञानप्रद आहेत. भाष्यासारखे कठीणही आहेत; परंतु तेवढ्यावरच न जातां त्यांचें परिशीलन प्रत्येकानें करावें ह्मणजे ज्ञानप्राप्त होऊन सद्गति मिळेल यांत संशय नाहीं.

आचार्यांनीं तैलंगणांतून बौद्ध धर्माचें समूळ उच्चाटण केलें. त्यांच्याप्रमाणेंच त्यांचे शिष्यही प्रसिद्ध आहेत.

# शास्त्रीय माहिती.

**खंदकांतील वर्तमानपत्रें**—मुद्रणस्वातंत्र्याच्या कालापासून तों आजपर्यंत रणांगणावरील खंदकांत वर्तमानपत्रांचा अवतार झाल्याचें ऐकिवांत नव्हतें; पण प्यारिसमधील गॉलाइस ( Gaulois ) वर्तमानपत्राच्या बातमीदारानें ही गोष्ट निदर्शनास आणली आहे. तो म्हणतो कीं बंदुकांच्या व तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यांत असणाऱ्या खंदकांतही वृत्ती उल्हसित करणारीं वर्तमानपत्रें निघत आहेत. शांततेच्या काळांत ज्याप्रमाणें विद्वत्ताप्रचुर व विनोदात्मक लेखांनीं भरलेलीं वर्तमानपत्रें निघत असतात त्याचप्रमाणें त्या आगीच्या जबड्यांत प्रतिक्षणीं असणाऱ्या खंदकांतूनही तीं निघत आहेत. हे क्षत्रिय-वर्तमानपत्रकर्ते, कसल्याही प्रसंगांत, कसल्याही हवेंत, सभोंवतीं बंदुकांच्या गोळ्यांचें नर्तन चाललें असतांही, आपलें छापण्याचें काम करीतच असतात; इतकेंच नव्हे तर तें वर्तमानपत्र हें त्यांच्या निधड्या छातीचें व आत्मविश्वासाचें एक निदर्शकच असतें. हें सगळें काम हँडप्रेसवरच निघत असतें, व त्यांतील चित्रेंही त्यावरच ते छापून काढतात. (Warcry) ह्या नांवाचें १०३ व्या पलटणीचें एक वर्तमानपत्र आहे; तें सरकारी, विनोदप्रचुर, वाङ्मयात्मक व

" अनियतकालिक " असल्याचें त्यानेंच जाहीर केलें आहे. युद्धप्रसंगांत नियतकालीं पत्र काढणें शक्य नसल्यानें त्यानें " अनियत कालिक " हें विशेषण आपणांस लावून घेतलें आहे हें योग्यच आहे. त्याचा एक अंक जानेवारी १ ला तर दुसरा २१ ला निघाला आहे. त्याच्या आशावादी व धैर्यशील प्रकाशकांनीं आपलें धोरण म्हणजे " शत्रूचें नियमन " व आपलें ऑफिस " विजयपथांत " असल्याचें प्रसिद्ध केलें आहे.

सरकारी पत्रकांत येणाऱ्या बातम्यांचा रकाना संपल्यावर 'मग हे विनोदी लेखक आपला विनोद स्वैर चालूं देतात. जाहिरातीकरितां राखून ठेवलेल्या जागेंत सुद्धां विनोदच भरलेला असतो. " खंदकांतील मोठ्या विस्तृत, प्रकाशमय, शुद्ध हवा खेळत असणाऱ्या व ( Boches ? ) युद्धाचा देखावा सुंदर रीतीनें ज्यांतून दृष्टीस पडेल अशा खोल्या भाड्यानें देणें आहे, गरजूंनीं अर्ज करावे " अशा जाहिराती त्यांत असतात. अशाच रीतीनें खंदकांतून प्रसिद्ध होत असणाऱ्या दुसऱ्या वर्तमानपत्रांचीं नांवें The cave man ( गुहावासी ), The Trench Gazette ( खंदकसमाचार ) वगैरे आहेत.

—लिटररी डायजेस्ट.—

**शिजविलेलें व न शिजविलेलें अन्न**—मांसाहार श्रेष्ठ कां शाकाहार श्रेष्ठ हा वाद ज्याप्रमाणें कधीं संपणार नाहीं त्याप्रमाणें शिजविलेल्या व न शिजविलेल्या फलहाराच्या गुणदोषाबद्दल पुष्कळ मतभेद आहे. मुळे, पेरु, केळीं वगैरे फळांची व कंदमुळांची कोशिंबिर आपण खातों; म्हणजे आपण 'अपक्व' फलाहार करतों. हा जिवंत आहार पचविण्यास आपल्या पोटास बरीच खटपट करावी लागते; पण त्यामुळें जो जाठररस उत्पन्न होतो तो पचनशक्ति वाढवितो. अशा प्रकारें न शिजविलेलें कांहीं तरी अन्न पोटांत न गेलें व आपण निवळ शिजलेलेंच अन्न खाल्लें तर अनेक प्रकारचे रोग जडतात. मुलांना तर याबद्दल विशेषच जपलें पाहिजे. यांत एकच धोका आहे तो असा कीं न शिजविलेल्या फळांत रोगजंतू असण्याचा बराच संभव असतो. शिजविण्यानें ते मरून जातात. यामुळें पुष्कळ वेळा शिजवून खाण्यांत धोका कमी असतों. वाटाण्यासारखें धान्य मात्र अति टणक असल्यामुळें तें शिजवून खाल्लें पाहिजे. या शिवाय आवडीचा एक प्रश्न विचारांत घेण्याजोगा आहे. अन्न शिजविण्यानें त्याला एक प्रकारची निराळी रुची येते; व आवडेल तेंच अन्न खाणें केव्हांही श्रेयस्कर असतें. यामुळें कोशिंबिरी खाव्या कीं शिजलेल्या भाज्या अधीक खाव्या यास सरसकट एक उत्तर न देतां अभिरुचीप्रमाणें, सवड पाहून व सारासार विचार करून बरें वाटेल तसें पण " गोड करून खावें " म्हणजे सर्व कांहीं पचतें असा नियम एका अनुभवीक वैद्यानें दिला आहे.


**खडकांचा प्रवाह**—कार्नेजी संस्थेनें शास्त्रीय शोधाकरितां दिलेल्या रकमेपैकीं एकीचा विनियोग " खडकांचा प्रवाह—गती—चलन " ह्याकडे व्हावयाचा आहे. ह्यावरून खडकसुद्धां चालतात, वाहतात असें दिसतें; आणि ह्या खडकांच्या प्रवाहाबद्दल नक्की शास्त्रीय माहिती मिळविणें हें महत्त्वाचें काम आहे. पाण्याच्या दाबानें चालणाऱ्या यंत्राच्या साहाय्यानें १ स्क्वेअर इंचावर—१ इंच लांबीरुंदीच्या जागेवर—१२० टनांचा दाब घालून हा प्रयोग चालविला असतां संगमरवरी दगड, चुनखड्याचे पथ्थर, वगैरे खडक वाहूं लागतात असें स्पष्ट दाखवितां येतें. त्यांची गती अति मंद असते. ह्या शोधांचें महत्त्व पृथ्वीवरील शिलाप्रस्तर कसे बनले असावेत हें दाखविण्याकरितांच आहे.

# मनोरंजक शास्त्रीय गोष्टी.

**हवा खेळवणाऱ्या पंख्यापासून धोका**—ब्रुसेल्समध्यें ह्या पंख्यांबद्दल प्रयोग करून पाहतां त्यांच्यापासून फायदा होण्यापेक्षां, जंतूंनीं भरलेली धूळ उडविण्यानें जास्त तोटाच होतो, असें निदर्शनास आलें आहे. खाणावळींत आणि पानगृहांत १ घनमीटर हवेंत पंखे चालू नसतां, १०००० पासून २०००० पर्यंत जंतु असतात, एक तास पंखे चालविल्यास ते १७००० पासून ४८००० पर्यंत असतात, आणि दोन तास सुरू असल्यास २७५०० पासून तों ८५००० हजारांपर्यंत होतात. क्षयरोगांवर औषधें तयार करणाऱ्या औषधशाळेंत पंखे चालू करण्यापूर्वीं ८५०० जंतू होते, ते एक तास पंखा चालू दिल्यावर ४५००० झाले व दोन तासांत जंतूंची संख्या ८५००० पर्यंत गेली. एका खासगी घराच्या खोलींत पंखा चालू करण्यापूर्वीं जंतूंची गणती ६५० भरली, १ तास पंखा चालू केल्यावर २५०० झाली, दोन तासांत ती ४००० वर गेली व पंखा बंद केल्यावर २ तासांनीं पाहतां ती पुन्हां ७०० वर आली.

**आक्सीजन--प्राणवायूवांचून जिवंत रहातां येतें**—प्रोफेसर डी. डी. मेन ह्यांनीं स्वतः प्रयोग करून "आक्सीजन—प्राणवायू हा जीवनाला आवश्यक आहे व कार्बन डायआक्साइड--आपल्या बाहेर निघणाऱ्या श्वासांत असणारा वायू—हा हुंगल्यानें, मृत्यू येतो" हें इन्द्रियविज्ञानशास्त्रवेत्त्यांचें मत निराधार आहे असें ठरविलें आहे. त्यांचें मत असें आहे कीं, आपल्या शरीरांतील रंध्रांतून जे पदार्थ बाहेर पडतात, ते विषारी असतात आणि आक्सीजन मिळाला नाहीं म्हणजे त्या पदार्थांनीं मृत्यू येतो. हें सिद्ध करण्याकरितां त्यांनीं एका वासराला एका वायुप्रवेशप्रतिबंधक पेटींत व दुसऱ्याला उघड्या पेटींत ठेविलें. पहिल्या वासराला कोठूनही आक्सीजन मिळूं नये अशी तजवीज केली होती; तरीही कित्येक दिवसांनंतर तें दुसऱ्या वासराप्रमाणेंच धडधाकट राहिलें. नंतर दुसऱ्या प्रयोगांत त्यांनीं त्याच पेट्यांमध्यें वासरांची अदलाबदल केली तरीही बंद पेटींतल्या वासरास कांहीं झालें नाहीं. ह्यावरून आक्सीजन न मिळाल्यानें, व कार्बन डाय आक्साइड हुंगल्यानें मृत्यू आलाच पाहिजे, हें सिद्ध होत नाहीं असें त्यांनीं ठरविलें आहे.

**गुरुत्वाकर्षण**—गुरुत्वाकर्षणाचे परिणाम मोठे मनोरंजक आहेत. चंद्रलोकांत जर एखादा, पृथ्वीवर असणाऱ्या मनुष्याप्रमाणेंच असणारा, माणूस असेल तर त्यास पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणापेक्षां चंद्रावरील आकर्षणशक्ति कमी असल्यानें एखाद्या तीन मजली इमारतीवरून उडी मारण्यांत कांहींच श्रम किंवा धोका नाहीं. आम्हांला तीन फुटांवरून उडी मारण्याप्रमाणेंच त्याला तें अगदीं सहज वाटेल. तेथील हत्ती हे आमच्या चंचलगती हरिणांप्रमाणें बागडत उड्या मारीत असतील. परंतु गुरु किंवा शनी लोकीं ह्याच्या उलट प्रकार होत असला पाहिजे. आपल्या पृथ्वीपेक्षां ते पुष्कळपटींनें मोठे असल्यानें तेथें माणसालासुद्धां रांगणेंही मुष्किलीचें होत असलें पाहिजे. हत्तीसारखे प्रचंड प्राणी तर आपल्या वजनाखालींच चुरडून जावयाचे !



# बुद्धि-प्रभाव.

[ कवि—कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी, कल्लोळ. ]

पद.

शक्तीहूनहि थोर मति । जिच्या अभावें अशी गति ॥
परवशतेची हो प्राप्त । जगांत बहुधा गजांप्रत ॥
या रीतीनें । माहूतानें । आवेशानें ।
वाजविलेली जगताला । नौबत कथिते गमे मला ! ॥ १ ॥

# दुःखांत सुख.

दिंडीवृत्त.

लवहि ज्याच्या चित्तीं न दया माया
धनाढ्या त्या धनयाचना कराया
कधीं पंगो ! जातोस तद्‌गृहा न
धन्य तुजला तरि सांग गणूं कां न ? ॥ १ ॥
कृपें देवानें द्रव्य दिलें फार
म्हणुनि भरला यद्देहिं मद अपार
मुखा अंधा बघतोस तयाच्या न
धन्य तुजला तरि सांग गणूं कां न ? ॥ २ ॥
जवळ वित्ताच्या असुनि थोर राशी
जो न दीनां दे अल्पही धनासी
स्तविसि मूका ! त्या धरुनि धनाशा न
तुजप्रत मी तर धन्य गणूं कां न ? ॥ ३ ॥
जिच्यामध्यें परिपूर्ण भरुनि राहे
परम दारुण विष ती खलोक्ति पाहें
तुझे बधिरा ! नच आयकिती कान
धन्य तुजला तरि सांग गणूं कां न ? ॥ ४ ॥

# खलभुजंगम.

पद.

या दुर्जनरूपी भुजंगमाची आहे ।
वध करावयाची रीति विचित्रा पाहें ॥
निज जिव्हायोगें एकाच्या कर्णांत ।
दुर्वचोरूप विष हा असतो ओतीत ! ॥
गरल तें न अति त्या त्रास । देतसे !।
परि विष–बाधा अन्यास । होतसे
ता तिनें निज प्राणांस । मुकतसे
खल–भुजंगमाचा दंश असा एकास
परि अन्य मुकतसे त्यायोगें प्राणांस ! ॥ १ ॥

# गप्पागोष्टी.

मुसलमानी बादशहांच्या राज्यांतील विक्षिप्तपणाच्या पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकींच खालील एक गोष्ट आहे.

एका बादशहाच्या राज्यांत असा नियम होता कीं, बादशहा हा इतर माणसांपेक्षां सर्व बाबतींत श्रेष्ठ असल्यामुळें कोणाचीही एकाद्या गुणाबद्दल प्रशंसा करितांना 'बादशहा मात्र तुमच्यापेक्षां ज्यास्त आहे' असें म्हणावयाचें. 'हा काजी किती न्यायी मनुष्य आहे, बादशहा फक्त याहून ज्यास्त न्यायी आहे;' 'हा मनुष्य किती श्रीमंत आहे, बादशहा फक्त याहून अधिक श्रीमंत आहे;' असें बोलण्याची तेथें अगदीं रूढीच पडून गेली होती.

एकदां परमुलुखांतील एक श्रीमान् व्यापारी तेथें आला आणि त्यानें तेथें खूप दानधर्म केला. तेव्हां जवळचा एक मनुष्य त्यास म्हणतो 'किती उदार आहां हो तुम्ही! बादशहाच फक्त तुमच्याहून अधिक उदार आहे.' त्या व्यापाऱ्यास ही असली स्तुति रुचली नाहीं. त्यानें त्या मनुष्याच्या समोरच आणखी एक हजार मोहोरांचा धर्म केला; त्या मनुष्यानें या दानशूरतेची आणखी तारीफ केली, पण शेवटलें वाक्य बोलण्याचें मात्र तो विसरला नाहीं. तेव्हां त्या व्यापाऱ्यानें आणखी दोन हजार मोहोरांचा धर्म करून म्हटलें 'आतां तुमच्या बादशहापेक्षां अधिक दानधर्म झाला कां?' पण तो मनुष्य तें कबूल करीना. तो म्हणे 'आमचा बादशहा तुमच्याहून अधिकच दातृत्ववान्.' चढाओढीस पेटून त्या व्यापाऱ्यानें आणखी ५० हजार मोहोरांचा धर्म करून म्हटलें 'तुमचा बादशहा खास इतका दानधर्म करूं शकणार नाहीं.' पण तो मनुष्य या व्यापाऱ्याचें दातृत्व आपल्या बादशहाहून वरचढ ही गोष्ट कबूल करीना!

अखेर भांडण काजीकडे गेलें. त्या राज्यांतील रिवाजाप्रमाणें 'बादशहा सर्वांत श्रेष्ठ' अशी बादशहाची प्रशंसा झालीच पाहिजे असें ठरून त्या व्यापाऱ्यास दोन मोहोरा दंड झाला.

खिशांतून दोन मोहोरा टाकून तो व्यापारी म्हणतो, 'हा मनुष्य आणि काजी दोघेही महामूर्ख आहेत. बादशहाच फक्त यांच्याहून श्रेष्ठ!'


## मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

ह्यांत प्रथम लहान मुलांना **दिशा**, नंतर **व्याख्या** व **पाण्याचे विभाग** समजावून देण्याकरितां लहान लहान **रंगित नकाशे** दिले आहेत. पुढें **पर्वत, नद्या, आगगाडीचे रस्ते, इलाख्याचे मुख्य भाग** वगैरे निरनिराळे **नकाशे** देऊन स्पष्ट दाखविले आहेत; भूगोलासारखा **विषय** लहान मुलांस समजावून देण्यास ह्याच **पुस्तकाचा उपयोग** चांगला होतो. किंमत ८१.

**म्यानेजर**—चित्रशाळा प्रेस, पुणें.

REGISTERED B. NO. 179.

आगष्ट सन १९१६ अंक ८.

# मराठी बालसखा

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मराठी वाङ्मयांत दिसून येणारी एक मोठी उणीव. | १४३ |
| योग्य श्वासोच्छ्वास. | १४८ |
| मनाचा शरिरावर परिणाम. | १५१ |
| राज्यश्रीची प्रार्थना. ( कविता ) | १५५ |
| अट्टल चोर. | १५८ |
| शास्त्रीय माहिती. | १६० |
| गप्पागोष्टी. | १६२ |

**विक्रीस तयार! विक्रीस तयार!! विक्रीस तयार!!**

सरकारनें शाळाखात्याकारितां

मंजूर केलेलें.

# नवनीत.

आवृत्ति सहावी.

**ही नवीन आवृत्ति** नुकतीच छापून विक्रीस तयार झाली आहे. किंमत ८१३.

व्यापाऱ्यांस कमिशन.

---

# सचित्र अक्षर-बोध.

नवी आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत त्या त्या अक्षराचें प्रथम अक्षर दर्शविणाऱ्या चित्रासह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात कि. ८६

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी ... नं. ... ता. ...

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. आगष्ट, सन १९१६. अंक ८.

## मराठी वाङ्मयांत दिसून येणारी एक मोठी उणीव.

[ लेखक—रामकृष्ण नारायण ब्रम्हनाळकर. ]

अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या उत्क्रमणाला आरंभ होऊन आज अर्ध्या शतकाच्या वर अवधी लोटला. या अवधींत काव्य, कादंबऱ्या व नाटकें यांची बरीच उत्पत्ति होऊन मराठी भाषेंतील ललितवाङ्मय बरेंच वृद्धिंगत झालें आहे. नियतकालिकांची ( Periodicals ) आणि वर्तमानपत्रांची बरीच वाढ झाल्यामुळें विविधविषयासंबंधीं सरसनीरस निबंधसंग्रहाची भरही मराठी वाङ्मयांत बरीच पडली आहे. विविध व उपयुक्त माहितीनें भरलेले ग्रंथ आमच्या भाषेंत अगदींच नाहींत असें नाहीं. कांहीं भाषांतरित व फारच थोडे स्वतंत्र असे शास्त्रीय व तात्विक स्वरूपाचे ग्रंथही अर्वाचीन मराठी भाषेंत प्रसिद्ध झाले आहेत. तथापि गेल्या पन्नास वर्षांतील वाङ्निर्मिती पाहूं गेल्यास ती जरी अगदींच असमाधानकारक नसली तरी पण ती अगदींच अल्प आहे हें प्रत्येक सूज्ञ महाराष्ट्रीयाच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. मियाची दाढी हातभर वाढली खरी परंतु मिया मूठभर ते मूठभरच. नुसत्या दाढीवरच मियाचा मोठेपणा अवलंबून असला तर गोष्ट निराळी; परंतु वास्तविक पाहूं जातां मियाच्या दाढीला अजीबात चाट मिळाली तरी हरकत नाहीं; परंतु स्वतः मियाजी वाढले पाहिजेत हें उघड आहे.

मराठी भाषेची स्थिति थोडीबहुत या प्रकारचीच झाली आहे. कै. विष्णुशास्त्रींनीं मराठी वाङ्मयचक्राला जी एकदा गती देऊन ठेवली आहे त्याच गतीवर तें अद्याप चाललें आहे असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. नाटककार, कादंबरीकार, मासिककार, वर्तमानपत्रकार किंवा कवी यांना स्फूर्ति देण्यास तोच जोम थोड्याबहुत प्रमाणांत कारणीभूत झालेला आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वीं एका तेजस्वी साहित्यसेवकाच्या पराक्रमानें वाङ्मयचक्राला जें जोराचें चलन

मिळालें आहे त्यावरच अद्याप तें सुरूं आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. परंतु सृष्टिनियमाप्रमाणें आतां त्या गतीचा जोर कमी कमी होत चालला आहे. वाङ्मयाच्या वेगवेगळ्या प्रदेशांत स्वतंत्र प्रयत्न झालेले अलीकडे फारच क्वचित् दिसून येतात. आंखलेल्या मर्यादेच्या बाहेर गेलेला एकही साहित्यसेवक दृष्टीस पडत नाहीं. नाटक लिहावें, कादंबरी रचावी किंवा सर्वांत सोपा आणि कमी त्रासाचा उपाय म्हणजे कविता कराव्यात आणि फारच मोठी उडी म्हणजे एखाद्या मासिकांत किंवा वर्तमानपत्रांत प्रचलित विषयासंबंधीं एखादा निबंध लिहावा एवढेच काय ते प्रयत्न सुरूं असलेले दृष्टीस पडतात. परंतु वाङ्मयचक्राच्या कमजोर झालेल्या गतीला पुन्हा नवीन चलन मिळेल अशा तऱ्हेचा स्वतंत्र स्वरूपाचा आणि स्फूर्तिदायक प्रयत्न मुळींच झालेला दिसून येत नाहीं. वर्तमानपत्रें आणि मासिकें यांचें धोरण म्हणजे आपला अधीक प्रसार कसा होईल एवढेंच पाहण्यापुरतें असतें असें दिसून येईल. आणि बहुतेक मासिकांचा लेखक वर्ग अर्धवट शिक्षण मिळालेला व लेखक म्हणून हौस मिरवण्याची लालसा असलेला किंवा स्वार्थसाधन आणि चैन यांतून वेळ उरलाच तर मौजेखातर मासिकाकरितां एखादा **शिळपट लेख** लिहिणारे पदवीधर यांचाच बनलेला असतो. यामुळें वरून तुकतुकणारें मासिक आपल्या बुद्धिहीन डोक्यावर व्यवस्थित विंचरलेल्या केशाचा भार वाहणाऱ्या पोक्षाळ लट्ठंभारतीप्रमाणें मोठ्या छानछुकींत दिसतें खरें, परंतु अंतःस्थिति पाहिली म्हणजे मराठी वाङ्मयाला असल्या भुसाचा उपयोग काय होणार असें वाटल्यावांचून रहात नाहीं. तात्पर्य सांगावयाचें म्हणून इतकेंच कीं, वाङ्मयाच्या अभिवृद्धीला लिखाणाच्या विस्ताराचा मुळींच उपयोग नसून त्याला चांगल्या व्यवस्थित आणि पोषक लेखन प्रयत्नाची जरूर असते.

परंतु नवीन जोम आणि नवीन जीवन यांच्या अभावीं अशा तऱ्हेचें कमजोर आणि **शिळपट** वाङ्मय निर्माण व्हावें यांत कांहीं नवल नाहीं; किंबहुना आरंभीं जोरांत असलेल्या चळवळीला कालपरत्वें हळू हळू शैथिल्य येऊं लागलें म्हणजे त्या चळवळीला नवीन चलनाची आणि जीवनाची आवश्यकता आहे असें अनुमान काढण्यास कांहींही हरकत नाहीं. आणि विशेषतः या उन्नतावनत स्थित्यंतरांचें वाङ्मयवृद्धीच्या बाबतींत तरी बरेंच महत्त्व असतें हें आंग्ल वाङ्मयाचा इतिहास जाणणाऱ्यास सांगण्याचें कारणच नाहीं. आणि ज्या अर्थीं आमच्या वाङ्मयाचा विस्तार वाढत आहे आणि त्यांतील जोम मात्र कमी होत आहे त्या अर्थीं आतां मराठी भाषेचें स्थित्यंतर होणें अवश्य आहे असें अनुमान काढणें फारसें चुकीचें होणार नाहीं. मात्र हें स्थित्यंतर कोणच्या तत्वावर होणार हा मोठा प्रश्न आहे. आमच्या मतें आजपर्यंत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयांत एक मोठी उणीव दिसून येते आणि ही उणीव भरून काढण्यांतच सध्यांच्या स्थित्यंतराचें बीज आहे असें आम्हांस वाटतें. आजपर्यंतची वाङ्निर्मिती पाहूं गेल्यास वाङ्मयाच्या निरनिराळ्या प्रदेशांत साहित्यसेवकांनीं प्रवेश केलेला दिसून येईल. परंतु बारकाईनें निरीक्षण करूं गेल्यास निर्माण झालेल्या वाङ्मयाला आपल्या सूक्ष्मभेदी आणि मार्मिक अभिरुचीनें शिस्त लावणारा टीकाकार अद्याप मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत अवतरलेला आहे असें दिसून येत नाहीं. स्वतंत्र वाङ्मय निर्माण होणें अत्यंत अवश्यक व महत्त्वाचें आहे हें खरें; परंतु त्याला शिस्त लावणें हें तितकेंच किंबहुना त्याहूनही अधीक आवश्यक आणि महत्त्वाचें आहे. वाङ्मयाची वाढ थोडीबहुत झाडासारखी आहे. झाडाचा बुंधा नीट खांबासारखा सरळ आणि उंच जावा म्हणून त्याच्या निरर्थक वाढलेल्या खांद्यांची खची करावी लागते. त्याचप्रमाणें वाङ्मयाच्याही निरर्थक वाढीची नीट खची केली म्हणजे वाङ्मयाचीही योग्य आणि खरी वाढ होऊं लागते आणि याच कार्याकरितां टीकाकाररूपी माळ्याची गरज लागते. पाश्चात्य साहित्य-

सेवकांनीं टीकाशास्त्राचा अभ्यास फारच आस्थेनें केलेला दिसून येतो. मूळ ग्रंथांवर तिकडे इतक्या व्यवस्थित आणि पद्धतशीर टीका झाल्या आहेत कीं, निव्वळ टीकात्मक ग्रंथच बाजूला काढले तर तें एक स्वतंत्र, विपुल आणि सुंदर असें वाङ्मय असलेलें दिसून येईल; आणि पाश्चात्य वाङ्मयोदधींत इतका भर येण्याच्या अनेक मुख्य कारणांपैकीं त्यांच्यांतील मार्मिक विवेचक शक्तीचा विलक्षण विकासच होय.

आतां टीका म्हणजे काय, टीकाकार कोणास म्हणावें आणि मराठी भाषेच्या सद्यःस्थितीला टीकेची किती आवश्यकता आहे याचा विचार करूं. आमच्यांतील सध्यांचे कांहीं टीकाकार म्हणजे द्वेषानें जळफळणारे शुद्ध निंदक कसे बनले आहेत हें मधून मधून प्रसिद्ध होणाऱ्या कांहीं नाटकांवरील टीकांवरून व अर्वाचीन काव्यावर पाखडल्या जाणाऱ्या आगीवरून उघडपणें दिसून येत आहे. परंतु टीका म्हणजे गालिप्रदान नव्हे हें प्रत्येक साहित्यसेवकास आतां समजावयास पाहिजे. शिवाय टीकाकारांनीं नेहमीं दोषैक दृष्टी ठेवणें हेंही बरें नव्हे. टीकेच्या अनेक हेतूंपैकीं दोष दाखविणें व हीन प्रतीच्या वाङ्निर्मितीची योग्य निर्भर्त्सना करून तिचा वाङ्मयांत प्रवेश न होऊं देणें हाही एक आहे हें खरें; परंतु तेवढ्यावरच टीकेच्या सर्व हेतूंची परिसमाप्ति झाली असें मानणें हें अत्यंत घातुक आहे. परंतु सध्यांची आमची टीकाकरणाची पद्धत पाहिली म्हणजे टीकाकारांचें कातडें पांघरलेल्या निंदकांचा हीनपणा व आमच्यांतील टीकाकौशल्याचा पूर्ण अभाव यांचा मात्र चांगला प्रत्यय येतो. हा एक प्रकार झाला. टीकाकारांचा दुसराही एक प्रकार आमच्यांत वारंवार दृग्गोचर होतो. आणि हा म्हटला म्हणजे केव्हांही व कोणाच्याही लेखनाविषयीं आपलें मत वाईट न देणें हा होय. एखाद्या कवीनें आपल्या काव्याविषयीं या सुशील टीकाकारास मत द्यावयास सांगितलें किंवा पुस्तकरूपानें छापलेल्या आपल्या कवितेस प्रस्तावना लिहावयास सांगितली कीं त्यांतील अभिप्रायाचा नमुना खालीलप्रमाणें ठरलेला.

" हे सुप्रसिद्ध कवी माझे परम मित्र आहेत. यांचा काव्यव्यासंग आज सतत दोन तपें चालू आहे. यांची कविता फार प्रतिभावान् असून समजण्यास मुळींच कठीण नसते. ज्यांना अर्वाचीन काव्यांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटत असेल त्यांनीं या कवींच्या कविता वाचाव्यात. खालील उतारे अगदीं नितांत रमणीय वाटल्यावरून मुद्दाम दिलेले आहेत. वगैरे. "

अशा तऱ्हेनें अभिप्राय पुरा करून कोठल्यातरी पांचपंचवीस ओळी दिल्या म्हणजे टीकाकारांचें काम झालें. आणखी मौज अशी कीं पांचपंचवीस कवींवर अभिप्राय द्यावयाचा झाला तरी ' प्रतिभावान्, प्रासादिक, सुरस, हृदयंगम, स्वाभाविक ' वगैरे विशेषणें आलटून पालटून घालून तोच अभिप्राय वेगवेगळ्या स्वरूपांत दिसून येतो. असल्या टीकाकारांचा वर्ग वरील टीकाकरांच्या वर्गापेक्षां केव्हांहि बरा; परंतु या अनधिकारी मंडळींचा वाङ्मयाच्या अभिवृद्धीला काडीइतकाही उपयोग होत नसतो. ज्या ग्रंथकाराच्या ग्रंथावर टीका करावयाची असते त्याच्याविषयीं टीकाकारानें केव्हांहि सहानुभूती बाळगली पाहिजे हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं; परंतु दोषाची वाच्यता करण्यानें सहानुभूतींत कमीपणा येतो असें मुळींच नाहीं. आतां तिसराहि एक टीकाकारांचा वर्ग आहे. यांच्या पुढें कोणचाहि ग्रंथ किंवा लेख न्या, थोडे गुण आणि थोडे दोष अशा मिश्र अभिप्रायाच्या ठोकळ्यांत त्याला बसवून टाकलाच म्हणून समजावें. परंतु टीकेंत केवळ गुणदोष विवेचनाचाच अंतर्भाव होतो असें नाहीं; कारण एखाद्या ग्रंथकारांत गुण व दोष या व्यतिरिक्त देखील कांहींतरी गुणविशेष ( Characteristics ) असूं शकतात. तेव्हां टीकाकरणाचा अर्थ सरासरी बऱ्या वाईट गुणदोष विवेचनापुरताच मर्यादित करणें फारसें बरोबर नाहीं. कारण एखादा सामान्य लेखकाचा ग्रंथ

असेल तर त्याचें सरासरी गुणदोषविवेचन करून तो बरा किंवा वाईट आहे इतकें ठरविलें म्हणजे बस्स होतें; परंतु कालिदासासारख्या कवीनें किंवा वामनासारख्या एखाद्या पंडितानें ग्रंथ लिहिला म्हणजे त्याच्या बऱ्या वाईटाविषयीं मुळीं प्रश्नच राहत नाहीं. त्यांतही वैगुण्य असूं शकतें. परंतु तें वैगुण्य शोधून काढणें फार कठीण असतें. परंतु सहज जातां जातां चार गुण आणि चार दोष दाखवून त्या ग्रंथाची विल्हेवाट लावतां येणार नाहीं हें खास. अशा ग्रंथावर टीका करावयाची म्हणजे त्यांतील विषयांचें पृथःकरण, स्पष्टीकरण आणि वर्गीकरण करावें लागतें. प्रतिभावान् लेखक आपल्या ग्रंथांत कांहींतरी मानवी जीविताविषयीं लिहीत असतो. व तो अंतःस्फूर्तीनें आणि दिव्य प्रसादानें लिहीत असल्यामुळें त्याच्या लेखनांतील कित्येक गोष्टी सामान्य वाचकांस समजण्यास कठीण जातात. म्हणून टीकाकारानें विशेष परिश्रम घेऊन त्यांतील विचारांचें पृथःकरण करून तो ग्रंथ सर्वांस सुलभ होईल असें करणें आवश्यक असतें. या शिवाय टीकेचा दुसरा महत्त्वाचा उपयोग म्हणजे उद्दिष्ट ग्रंथांत कलेच्या दृष्टीनें काय गुणावगुण आहेत याचें दिग्दर्शन करणें हा होय. उद्दिष्ट ग्रंथ नाटक असेल तर नाट्यकलेच्या दृष्टीनें त्यांतील गुणावगुणांचें मार्मिक विवेचन केलें पाहिजे; हीच स्थिति काव्य व कादंबरी यांनाही लागू आहे. अशा टीकात्मक विवेचनानें लोकांच्या सदभिरुचीचा विकास होऊन त्यांच्या अंगीं मार्मिकता येते.

वरील विवेचनावरून मूळ ग्रंथकारापेक्षां टीकाकारांची योग्यता कमी आहे अशी चुकीची कल्पना होण्याचा संभव आहे. परंतु ज्या स्फूर्तीनें आणि खोल दृष्टीनें ग्रंथकार आपला ग्रंथ लिहीत असतो तितक्याच स्फूर्तीनें आणि खोल दृष्टीनें टीकाकाराला टीका करावी लागते. ग्रंथकाराच्या दृष्टीच्या विशाल वर्तुळाइतकें आपल्या दृष्टीचें वर्तुळ विस्तृत करतां येण्याइतकी टीकाकाराच्या अंगीं पात्रता लागते. तुटपुंजें ज्ञान असलेल्या ज्ञानलव दुर्विदग्धाला ती पात्रता कोठून असेल ? तरतरीत बुद्धि, वरवर दिसणाऱ्या शब्दार्थांचा पडदा बाजूस सारून बुडाशीं असलेलें तत्व तात्काळ ओळखण्याची तेजस्वी सूक्ष्मदर्शकदृष्टि, विषयाचें पृथःकरण व स्पष्टीकरण करण्यास लागणारी स्वाभाविक विचारक्षमता आणि कलेच्या दृष्टीनें दिसून येणारे गुणावगुण पाहण्याची मर्मज्ञता इत्यादि गुण टीकाकारांत अवश्य असावे लागतात. अशा योग्य टीकाकाराच्या साहाय्यानेंच सामान्य वाचकाच्या उत्तान दृष्टीला एरवीं न दिसणारे एखाद्या गहन ग्रंथांतील अनेक गुण—म्हणजे त्यांतील मनोज्ञता आणि प्रासादिक जोम, त्यांतील स्वारस्याचें भांडार आणि अर्थाची गंभीरता—सहज दिसूं लागतात. यावरून खऱ्या टीकाकाराचें माहात्म्य किती आहे हें उघड होणार आहे.


परंतु टीकाकाराची इतकी आवश्यकता भासावयाला आमच्या वाङ्मयांत अद्याप चांगले ग्रंथ तरी कोठें आहेत असा प्रश्न साहजीकच पुढें मांडण्यांत येईल. या प्रश्नांत बराच सत्यांश आहे असें धरून चाललें तरी वरील म्हणणें फारसें युक्तीस धरून होणार नाहीं. कारण वाङ्मय उत्कृष्ट निर्माण होवो किंवा मध्यमप्रतीचें होवो दोन्ही ठिकाणीं टीकाकारांची आवश्यकता असतेच. उच्च दर्जाचें वाङ्मय निर्माण झाल्यास टीकाकाराचा दुभाष्याप्रमाणें किंवा भाषांतरकाराप्रमाणें उपयोग होईल, आणि कनिष्ठ प्रतीचें वाङ्मय निर्माण होऊं लागल्यास बऱ्यावाइटाची निवड करणाऱ्या न्यायाधिशाप्रमाणें त्याचा उपयोग होईल इतकेंच. एका ठिकाणीं टीकाकाराला भक्तिमान साहित्यसेवकाचा पेशा पत्करावा लागेल तर दुसऱ्या ठिकाणीं साहित्याधिपतीचा अधिकार हातीं घ्यावा लागेल. परंतु दोन्ही ठिकाणीं त्याचें अस्तित्व अत्यंत आवश्यक आहे. कोणच्याही लेखनकृतीकडे कलेच्या दृष्टीनें पाहण्याची पात्रता सामान्य वाचकांत दुर्मिळ असल्यामुळें चांगल्या ग्रंथांतील स्वारस्य ज्याप्रमाणें पृथःकरण व स्पष्टीकरण यांच्या साहाय्यानें

त्यांच्या नजरेस आणून द्यावें लागतें, त्याचप्रमाणें असंभाव्य आणि अद्भुत प्रसंगाच्या मिश्रणानें मनोरंजक वाटणाऱ्या लेखनकृती कलेच्या दृष्टीनें किती हीन आहेत हेंही आपल्या मार्मिक विवेचनानें लोकांच्या नजरेस आणून द्यावें लागतें. तेव्हां आमचें सध्यांचें वाङ्मय अगदीं मध्यमप्रतीचें मानलें तरी त्याच्या अभिवृद्धीला टीकाकाराची कशी आवश्यकता आहे हें दिसून येईल. टीकाकाराच्या अभावामुळें आमच्या वाङ्मयसाम्राज्यांत कोण घोटाळे माजून राहिले आहेत तें पहा. एखादा लेखक चटकदार कथानक घेऊन रंगभूमीकरितां नाटक म्हणून लिहितो; परंतु वास्तविक पाहूं जातां कथानकाची अंकानुरूप विभागणी आणि त्यांतील संभाषणपद्धती या व्यतिरिक्त त्या ग्रंथाचा नाटक या नांवाला कोणचाही हक्क पोहोंचत नाहीं. लोक त्याला नाटक म्हणतात. परंतु वास्तविक पाहूं जातां नाटकाचा बुरखा घेतलेली ती कादंबरी असते; परंतु पांच अंकांत कथानकाची विभागणी केली म्हणजे कादंबरीचें नाटक होत नसतें हें टीकाकाराच्या साहाय्याशिवाय त्या बिचाऱ्याला कोठून कळणार ! एखादे नाटककार विनोद साधण्याकरितां आपल्या नाटकांत चेष्टेखोर मात्र घालतात व त्या लेखकाची विनोदी लेखक म्हणून वाहवाही होते; परंतु नाटकांतील कोणचेंहि पात्र मानवी प्रकृतीचेंच चित्र असावें लागतें व त्याला केवळ विनोदाचें ( किंवा चेष्टेचें म्हटलें असतां अधीक योग्य होईल ) कळसूत्री बाहुलें बनवून चालत नाहीं हें लेखकाच्या मुळींच लक्षांत येत नाहीं; एखादा दूरदर्शी लेखक आपल्या नाटकांत चटकदार चाली व असंभवनीय व प्रणयालापांनीं युक्त असे रंगेल प्रसंग घालून स्वस्त असलेली लोकप्रियता संपादतात; आणि त्यांतील दोषाची वाच्यता करण्यास कोणी धजतही नाहीं; परंतु मार्मिक टीकाकाराच्या दृष्टीनें तें लोकप्रिय नाटक अगदींच हीन ठरेल. बऱ्या वाइटाची छाननी करण्यास लागणाऱ्या सदभिरुचीच्या अभावामुळें नाट्यकलेची फार दुर्दशा उडाली आहे. नाटक म्हणजे एखादें कपोलकल्पित कथानक संभाषणाच्या रूपानें रंगभूमीवर आणणें इतकीच आमची कल्पना झाली आहे. नाट्यकलेचेंच भावंड कादंबरी; तिचीही हीच स्थिति झाली आहे. काव्याची दुर्दशा तर विचारूंच नका. काव्य चांगलें कोणचें, वाईट कोणचें हें जाणण्याची पात्रता फारच थोड्यांत दिसते. बरें चांगलें काव्य असलें तर तें तसें कां व वाईट असलें तर तें कां याचें विवेचन तर अगदीं दुर्मीळ झालें आहे. एखाद्या चांगल्या काव्यकृतीचें महत्त्व लोकांना लवकर कळलें नाहीं व तें लोकप्रिय झालें नाहीं तरी त्यांत फारसें बिघडत नाहीं. परंतु रसहीन आणि तुटपुंज्या काव्यकृतीला महत्त्व येणें हें वाङ्मयाच्या अभिवृद्धीला फार घातक होय. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, एखाद्या वर्तमानपत्रकाराच्या किंवा मासिककाराच्या अंध अभिप्रायानें अगदींच सामान्य काव्याला विलक्षण मोठेपणा मिळालेला दृष्टीस पडतो. परंतु वर्तमानपत्रकार किंवा मासिककार टीकाकार असतोच असें नाहीं. पण हें लक्षांत कोण घेतो ! याकरितांच आतां मराठी वाङ्मयाला अधिकारी टीकाकाराची फार गरज आहे. या टीकाकारानें उच्च विचारक्षेत्रांत शिरून आपल्या विशाल व निःपक्षपाती दृष्टीनें सर्व मराठी वाङ्मयाचें विहंगमदृष्ट्या अवलोकन करून त्याला शिस्त लावली पाहिजे. कलेकलेंत सूक्ष्मभेद कसे असतात, प्रत्येक कलेचीं विशिष्ट लक्षणें कोणचीं, त्यांतील दोष कोणचे व गुण कोणचे याचें पृथःकरण करून टीकाकारानें साहित्यसेवकांना शिस्त लावणें जरूर आहे. याशिवाय सध्यांच्या लेखकांत चांगले कोण व कोणाला कोणचा दर्जा देतां येईल हें आपल्या मार्मिक दृष्टीनें ठरवून वाङ्मयाची अभिवृद्धी होण्यास काय उपाय केले पाहिजेत व कोणच्या मार्गानें गेलें पाहिजे हें ठरविणें टीकाकाराचेंच काम आहे. मराठी वाङ्मयाची अभिवृद्धी होण्याकरितां पाश्चात्य पद्धतीनुरूप आमचेकडेही वाङ्मयेतिहास लिहिणेचे प्रयत्न झाले पाहिजेत आणि

याला स्फूर्तिमान् टीकाकाराची आवश्यकता आहे आणि हा टीकाकाराचा अवतारच कै. विष्णुशास्त्री-प्रमाणें वाङ्मयोत्क्रांतीच्या मंदावलेल्या चक्राला जोराचें चलन देण्यास कारणीभूत होऊन मराठी भाषेंतील मोठी उणीव भरून काढील अशी आमची खात्री आहे.

## योग्य श्वासोछ्वास.

योग्य रीतीनें श्वासोच्छ्वास कसा करावा हें बहुतेकांना माहित नसतें. त्यामुळें श्वासोच्छ्वासाच्या क्रियेपासून होणारा फायदा त्यांना पूर्णपणें मिळत नाहीं. योगी लोकांना मात्र योग्य रीतीनें श्वासोच्छ्वास कसा करावा हें माहीत असतें. ते श्वासोच्छ्वासापासून पूर्ण फायदा करून घेतात, व त्या योगें त्यांना आपली शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक उन्नति करून घेण्याची खुबी साधली आहे. तेव्हां आपणांस योग्य रीतीनें श्वासोच्छ्वास कसा करावा हें योग्यांकडूनच शिकलें पाहिजे. श्रीमत् योगी राम चरक यांनीं श्वासोच्छ्वास योग्य रीतीनें कसा करावा हें 'श्वासोच्छ्वासशास्त्र' या आपल्या पुस्तकांत सांगितलें आहे. तो प्रकार असा:—



हृदय व त्याच्या कोठड्या.

### योग्यांचा पूर्ण श्वासोच्छ्वास.

( १ ) उभें रहावें किंवा ताठ बसावें. नाकांतून श्वास हळू हळू घ्यावा. प्रथम फुफ्फुसाचा खालचा भाग हवेनें भरावा. हें मध्यपटल नांवाच्या स्नायूचा उपयोग केल्यानें होतें. मध्यपटलांचा उपयोग केला म्हणजे तो पोटभागांतील इंद्रियांना खालीं दाबतो, व त्यामुळें पोट पुढें येतें. नंतर खालच्या बरगड्या, छातीचें हाड व छाती हीं पुढें उचलून फुफ्फुसांचा मधला भाग हवेनें भरावा. तदनंतर छातीचा अगदीं वरचा भाग, वरच्या बरगड्यासहित वर उचलून, फुफ्फुसांचा वरचा भाग हवेनें भरावा. शेवटीं पोट आंत ओढावें. म्हणजे फुफ्फुसांना आधार मिळून त्यांचा सर्वांत वरील भाग हवेनें भरतो. सकृत् दर्शनीं असें वाटण्याचा संभव आहे कीं, वरील रीतीनें श्वास घेण्याला तीन क्रिया कराव्या लागतात. परंतु तसें करावयाचें नसतें. श्वास एकसारखा मध्यें न थांबतां घेतला पाहिजे. मध्यें मध्यें हिसके देऊन श्वास घेऊं नये. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रथम पोट, नंतर खालच्या बरगड्या, तदनंतर वरच्या

वरगड्या क्रमानें फुगवाव्या; व शेवटीं पोट आंत ओढून घ्यावें.

( २ ) कांहीं सेकंदें श्वास आंत कोंडून ठेवावा.

( ३ ) फुगविलेली छाती तशीच ठेवून, नाकांतून हळू हळू श्वास सोडावा. हवा फुफ्फुसांतून बाहेर निघूं लागतांच, पोट थोडेसें आंत ओढून तें वरच्या बाजूकडे सावकाश ओढूं लागावें. सर्व हवा बाहेर गेल्यावर पोट व छाती सैल सोडावी.


या श्वासोच्छ्वासाच्या अभ्यासापासून अनेक फायदे आहेत. ते सर्व येथें सांगणें शक्य नाहीं. त्यांपैकीं एक मात्र येथें सांगतों. श्वास घेतांना मध्यपटल, पोट भागांतील इंद्रियांना ( जठर, यकृत, आंतडीं वगैरेंना ) खालीं दाबतो. उच्छ्वासांत हा दाब काढून घेतला जातो. याकरितां श्वासोच्छ्वास योग्य रीतीनें करण्याचा अभ्यास ठेवल्यास वर सांगितलेल्या अंतरिंद्रियांना एक प्रकारचें मर्दन घडून चांगला व्यायाम होतो.

मध्यपटलाच्या साधनाशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायानें अथवा साधनानें वरील अंतरिंद्रियांना व्यायाम होणें शक्य नाहीं. याकरितां योग्य रीतीनें श्वासोच्छ्वास केल्यास हृदय व फुफ्फुसें यानांच नव्हे, तर पोटभागांतील जठर, यकृत, आंतडीं इत्यादि इंद्रियांना देखील व्यायाम घडतो.

### हृदय व फुफ्फुसें यांना व्यायाम.

योग्य रीतीनें खुल्या, मोकळ्या व स्वच्छ हवेंत श्वासोच्छ्वास करण्याची संवय ठेविली म्हणजे हृदय व फुफ्फुसें यांना व्यायाम होतो. प्रथम आपण नाकांतून श्वासोच्छ्वास करण्याचा अभ्यास केला पाहिजे. तोंडांतून श्वासोच्छ्वास केल्यास बाहेरील थंड हवा निर्विघ्नपणें आंत जाते; व त्यामुळें श्वासनलिका, फुफ्फुसें इत्यादि नाजूक इंद्रियांना अपाय होतो. तसेंच तोंडानें हवा आंत घेतल्यास कृमिकीटक व इतर सूक्ष्म जंतु आंत जातात व त्या योगें अनेक रोग उत्पन्न होण्याचा संभव असतो. हा दोष जर टाळावयाचा असेल तर नाकानें श्वासोच्छ्वास नेहमीं करण्याची संवय केली पाहिजे.

नाकांतील आडवे उभे केस हे नाकांत रखवालदारीचें काम करितात. ते धुळीला व कृमिकीटकाला आंत जाऊं देत नाहींत त्यांना तेथेंच कांहीं वेळ अडकवून ठेविलें जातें. उच्छ्वासाच्या वेळीं ह्या कृमिकीटकांना बाहेर लोटून दिलें जातें. यांपैकीं एखादा शत्रु अति लगट करून केंसरूपी रखवालदारांची नजर चुकवून आंत गेल्यास शिंकेची व्यवस्था केलेली आहेच. तेव्हां कोणताही विजातीय पदार्थ नाकानें श्वासोच्छ्वास केला असतां श्वासनलिकेंत जाऊं शकत नाहीं.



हृदयाच्या कोठड्या व मुख्य रक्तवाहिन्या.

नाकाच्या आंतील बाजूला एक अति पातळ त्वचा आहे. ही त्वचा दोन कामें करिते. ह्या अंतस्त्वचेला रक्ताचा पुरवठा बराच असतो. तेव्हां बाहेरील थंड हवा गरम व उबदार होऊन आंत जाते. शरिराच्या आंतील उष्णतेपेक्षां बाहेरील हवा अधिक उष्ण असेल तर या

अंतस्त्वचेच्या योगानें त्या हवेची उष्णता कमी केली जाते. हवेंत कांहीं दूषितपणा असल्यास तो ह्या अंतस्त्वचेच्या योगानें नाहींसा केला जातो.

हृदय व फुफ्फुसें यांना जो श्वासोच्छ्वासाच्या योगानें व्यायाम द्यावयाचा तो नाकावाटें कां द्यावा याचें कारण आतां आपणांस नीट समजलेंच असेल.

## रुधिराभिसरण.

अंगांत रक्त खेळण्याच्या क्रियेस रुधिराभिसरण असें म्हणतात. हृदय ही एक मांसमय पिशवी आहे. हिला मांसमय पिचकारी असें म्हटलें असतांही चालेल. कारण ही पिचकारीचें काम फार उत्तम करिते. ह्या पिचकारींतून रक्त लांबवर लोटलें जातें. ही पिशवी जाड आहे व हिचा आकार कांहीं अंशीं केळफुलासारखा आहे. हिच्यांत चार कोठड्या केलेल्या आहेत. डावीकडे एकावर एक अशा दोन व उजवीकडे एकावर एक अशा दोन आहेत. या कोठड्यांपैकीं वरच्या लहान व खालच्या मोठ्या आहेत.

हृदय नेहमीं संकोच व विकास पावत असतें. आकुंचन होणें व प्रसरण पावणें हा हृदयाचा धर्मच आहे. हृदयाचा हा संकोचविकास तालबद्ध आहे. ह्याला स्फुरण असें म्हणतात. हृदय संकोच पावलें कीं, हृदयाच्या डावीकडच्या खालच्या कोठडींतून रक्त जोरानें बाहेर पडतें. तें प्रथम हृदयांत उगम पावणाऱ्या मोठ्या धमनींत जातें. या धमनीच्या अनेक शाखा, उपशाखा, रक्तवाहिन्या व केशवाहिन्या आहेत. ह्या सर्व शरीरभर जाळ्यासारख्या पसरलेल्या आहेत. या शाखांच्या द्वारें रक्त सर्व शरीरभर फिरतें. रक्त शरिरांत फिरत असतांना, सर्व अवयव रक्तांतून पौष्टिक अंश ग्रहण करितात; व ते जीर्ण व निरुपयोगी झालेले पदार्थ रक्तांत सोडितात. अशा दूषित पदार्थांच्या मिश्रणानें रक्त काळसर होतें. हें काळसर रक्त अशुद्ध केशवाहिन्यांत पाझरून येतें; तेथून तें बारीक शिरांत जातें; अशा अनेक सूक्ष्म शिरा मोठ्या शिरेला मिळतात व शेवटीं तीन मोठ्या शिरांच्या द्वारें तें दूषित रक्त हृदयाच्या उजवीकडील वरच्या कोठडींत येतें. नंतर त्याच्या खालच्या कोठडींत जातें. या दोन कोठड्यांच्या मध्यें पातळ त्वचेचा पडदा असतो. तेथून हें रक्त दोन मोठ्या धमन्यांच्या द्वारें फुफ्फुसांत जाऊन पसरतें.

रक्त फुफ्फुसांत जाऊन पसरतें न पसरतें तोंच श्वासाबरोबर घेतलेला हवेंतील आक्सिजन (प्राणवायु) श्वासनलिकेच्या शाखांतून येतो. व तो फुफ्फुसांतील रक्ताशीं संयोग पावतो. लागलीच एक रासायनिक क्रिया सुरू होते. या क्रियेमुळें अशुद्ध व दूषित रक्त स्वच्छ व तांबडें लाल असें होतें. या रासायनिक क्रियेच्या योगानें रक्तांतील दोष, कॉर्बानिक ॲसिड गॅसच्या रूपानें, उच्छ्वासाबरोबर बाहेर पडतात. स्वच्छ व तांबडें लाल झालेलें रक्त चार फुफ्फुसगत शिरांतून, हृदयाच्या डावीकडील वरच्या कोठडींत येतें; नंतर त्याच बाजूच्या खालच्या कोठडींत तें उतरतें. या दोन कोठड्यांच्या मध्येंही अगदीं पातळ त्वचेचा पडदा आहे. रक्त वरच्या कोठडींतून खालच्यांत जातांना पडदा उघडतो; व खालची कोठडी भरली कीं, पडदा पडतो. खालच्या कोठडींत मावेल त्यापेक्षां जास्त रक्त जाऊं नये म्हणून पडद्याची योजना विधात्यानें केलेली आहे.

खालच्या कोठडींत शुद्ध रक्त आल्यावर तेथून पुन्हां सर्व शरीरभर फेरी करण्यास निघतें. सर्व शरिराला पुष्टि देऊन त्यांतील दोष घेऊन येऊन रक्त पुन्हां फुफ्फुसांत पसरतें; व हवेंतील ऑक्सिजनानें पुन्हां शुद्ध होतें. दिवसांतून सुमारें ९।१० हजार ग्यालन म्हणजे सव्वादोन अथवा अडीच हजार मण रक्त फुफ्फुसभर पसरून शुद्ध होतें असा अंदाज केलेला आहे.

# मनाचा शरिरावर परिणाम.

[ लेखक—महादेव विष्णू खरे,–खेड. ]

मनाचा शरिरावर जितका लवकर परिणाम होतो तितका केवळ रोगाचाही होत नाहीं. मनावर ज्या वेळीं जसे जसे परिणाम होतात तसे तसे शरिरावरही होतात. मनांत भीति उत्पन्न झाली कीं, सर्व शरीर भयानें कंपीत होतें. त्याचे उलट म्हणजे मनांत एखादा उच्च विचार आला म्हणजे शरिरांत ताबडतोब उत्साह उत्पन्न होतो. मनास हुषारी वाटली म्हणजे शरीरही तरतरीत दिसूं लागतें. कधीं कधीं मनावर विशेष प्रकारचा परिणाम झाल्यामुळें निर्बल लोक प्रबल होतात, भित्रे धीट होतात आणि चंचल मनाचे निश्चयी बनतात. उच्च मनोविचारांत मनुष्य गढून गेला म्हणजे तो भयंकर यातनाही शांतपणानें सोसण्यास तयार होतो. त्याचें अगदीं ठळक उदाहरण म्हणजे हरिश्चंद्राचें होय. या थोर पुरुषाचा अनेक प्रकारें छळ झाला तरी तो यत्किंचित् डगला नाहीं हा केवळ मनाचा परिणाम होय. आतां याचा वैद्यकदृष्ट्या विचार करूं. कित्येक डॉक्टर लोकांचा असा अनुभव आहे कीं, रोग्यास नुसता धीर दिला असतां त्याचें दुखणें बरेंच कमी होतें. कधीं कधीं तर त्याला जो विकार झालेला असेल त्याचें खरें स्वरूप त्यास न सांगतां अगदीं क्षुल्लक विकारापासून त्याला पीडा होत आहे असें सांगण्यांत येतें. याचें कारण असें आहे कीं, त्याचे मनावर भीतीचा परिणाम होऊं नये. रोग्याचे मनावर भलताच परिणाम झाल्यामुळें जो रोग खरोखरच त्याचे शरिरांत नसतो तो उत्पन्न होतो. याविषयीं बरींच उदाहरणें दाखवितां येतील. पारिस शहरामध्यें नॉटर डॅम ( Notre Dame ) ठिकाणाजवळ एका बाईस एक कुत्रा चावला. तिला हॉटेल ड्यु ( Hotel Dieu ) नांवाच्या रुग्णालयांत नेण्यांत आलें. तेथें तिची जखम तपासण्यांत येऊन ती बरी करण्यांत आली. पुढें कांहीं दिवसांनीं ती एका रस्त्यावरून जात असतां तिला एक विद्यार्थी भेटला. ती अद्याप जिवंत असल्यावद्दल त्यानें आश्चर्य व्यक्त केलें. कारण त्यानें तिला असें सांगितलें कीं, जो कुत्रा तिला चावला तो पिसाळलेला होता. हें ऐकतांच तिला पेटके ( Spasms ) येऊं लागले. त्या वेळीं वर लिहिलेल्या रुग्णालयाचे चालक डॉ० बक्वाय ( Dr. Bucquoy) यांस बोलावण्यांत आलें; परंतु त्यांचा कोणताही उपाय लागू पडेना. अखेरीस ती



लहान मुलांस घरांत दाराचे आड उभें राहून दुसऱ्या एखाद्या लहान मुलास तो आंत येत असतां मोठा आवाज करून भिवविण्याची वाईट खोड लागलेली असते.

बाई मरण पावली. आतां हें एका बाईचें उदाहरण झालें. परंतु प्रत्यक्ष लॉर्ड बायरन ( Lord Byron ) यांचीही हकीगत जवळ जवळ अशीच आहे. 'बायरन' हे लहान असतांना त्यांना एका जोतिष्यानें असें सांगितलें कीं, त्यांचा मरणकाळ त्यांचे वयाचे ३७ वें वर्षी आहे. या भाषणाचा त्यांचे मनावर परिणाम झाला व अखेरीस मरते समयीं त्यांनीं डाक्टरला औषध न देण्याविषयीं सांगितलें; कारण त्या औषधाचा भविष्याप्रमाणें कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यांस वाटलें. असो; उदात्त विचार, निश्चय, दुखणें बरें होण्याची खात्री ( conviction of recovery ) यांचा रोग्याचे मनावर चांगला परिणाम झाल्यास बरेच वेळां रोग जास्त न वाढतां कमी होतो. याचे उलटपक्षीं म्हणजे निष्कारण भय, मनाचा भलताच ग्रह इत्यादिकांमुळें रोग कमी न होतां त्याची शरिरांत प्रगतीच होते. कित्येक डाक्टरांस असा अनुभव असेल कीं, धाडसी लोकांस, भित्रे व चंचल मनाचे लोकांपेक्षां स्पर्शजन्य रोग कमी जडतात. प्रत्यक्ष नेपोलिअन बोनापार्ट ( Napoleon Bonaparte ) प्लेग हास्पिटलमध्यें प्लेग झालेल्या रोग्यांचे आंगास बरेच वेळां हात लावीत असे; परंतु त्यास तो रोग कधींही जडला नाहीं. तो असें म्हणत असे कीं, " जो भीत नाहीं तो प्लेगास हांकून लावितो. "

मोठमोठ्या शहरांत कमी अधिक प्रमाणांत नेहमीं प्लेग असतो. तेथें प्लेगास न भिणारे लोक पुष्कळ आढळतात. इतकेंच नव्हे तर प्लेग झालेल्या रोग्यांजवळ बराच वेळ बसून त्यांची शुश्रूषा करितात. प्लेगजंतु प्रतिबंधक औषध ते घेण्याचे भरीस पडत नाहींत. असें असूनही तो रोग त्यांस जडत नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मनाच्या अतिशय गूढ शक्तीचा परिणाम शरिरावर होतो या गोष्टीचा शास्त्रीयरीत्या शोध होऊं लागला. प्रयोग करून असें प्रत्ययास आलें आहे कीं, अंगांतून येणारे घर्मबिंदु मनावर झालेले परिणाम दाखवितात. जो मनुष्य अपराधी असून ज्याचे मनास अघोर कृत्यें केल्याबद्दल त्याची सदसद्विवेक बुद्धि टोंचीत असेल त्याचे घर्मबिंदूचें रासायनिक पद्धतीनें वर्गीकरण ( Chemical Analysis ) केल्यास व 'सेलेनिक' अॅसीड ( Selenic Acid ) बरोबर त्यांचा संयोग केल्यास ते बिंदु गुलाबी रंगाचे होतात. निरपराधी मोकळ्या मनाचे लोकांच्या घर्मबिंदूचें वर लिहिल्याप्रमाणें वर्गीकरण केल्यास त्याच्यांत रंगाचा फरक पडत नाहीं. परंतु हा शोध अजून पूर्णावस्थेस पोहोंचला आहे असें म्हणतां येत नाहीं; कारण यांतही अजून थोडीं व्यंगें आहेत.

आतां कधीं कधीं अकस्मात् आवेशयुक्त मनोवृत्तीमुळें कित्येक लोकांचे केश पांढरे होतात. इतकेंच नव्हे तर कांहीं लोक वेडे होतात व कांहींजणांस प्रत्यक्ष मरणही येतें. आफ्रिकेचे मध्यभागांतून स्टॅन्ले ( Stanley ) हे आपल्या सोबत्यांसह प्रवास करीत असतां पलीकडील समुद्रकिनाऱ्यावर केव्हां पोहोंचूं याची अत्यंत उत्कंठा सर्वांस लागली होती. सर्वजण आधींच तेथील कष्टमय स्थितीस अगदीं कंटाळलेले होते. अखेरीस समुद्र दिसूं लागला म्हणून 'स्टॅन्ले' नें जेव्हां आपल्या सोबत्यास सांगितलें तेव्हां त्यांतील एकास इतका आनंद झाला कीं, तो मूर्च्छीत होऊन खालीं पडला व तेथेंच मरण पावला. व्यापारांत दिवाळें निघाल्यामुळें व्यापाऱ्याचें, प्रियपतीची मृत्युवार्ता ऐकिल्यामुळें स्त्रियांचें, चोरांनीं सर्व धन चोरून नेल्यामुळें धनिकांचें, पुरून ठेविलेलें द्रव्य जागचे जागीं न मिळाल्यामुळें कृपणाचे केंश पांढरे झाल्याचीं उदाहरणें आहेत. हा परिणाम मनास भयंकर धक्का बसल्यामुळें होय. लहान मुलांस घरांत दाराचे आड उभें राहून दुसऱ्या एखाद्या लहान मुलास तो आंत येत असतां मोठा आवाज करून भिवविण्याची वाईट खोड लागलेली असते; याचा परिणाम कधीं कधीं भयंकर होतो. मनास एकाएकीं धक्का बसून भीतीमुळें बिचारीं लहान मुलें एकदम खालीं पडतात व कोठें तरी त्यांचे शरिरास बरीच दुखापत होते. अथवा कधीं कधीं

ग्रंथ संग्रहालय
नं..........
ता..........
शाखा

मृत्युमुखींही पडतात. म्हणून अशा प्रकारची संवय लहान मुलांस लागल्यास ती नाहींशी करण्याचा आई-बापांनीं तावडतोब प्रयत्न केला पाहिजे.

अतिशय रागामुळें सुनबहीरी (Apoplexy) नांवाचा रोग अंगीं जडतो. बहुत रात्री मानसिक चिंतेंत घालविल्यामुळें रोगी बनलेले बरेच लोक दृष्टोत्पत्तीस येतात. सतत दुःख, बहुत काळचा मत्सर, नेहमीं चिंता या मुळें कांहीं प्रसंगीं चाळपुळी (Cancer) वगैरे रोगांची वृद्धी होते. उदासीन व दुष्ट विचार नेहमीं मनांत असणें हीच रोगाची छाया आहे. या रितां दुष्ट मनोविकारांस आपण मनांत बिलकुल जागा देतां कामा नये. शिवाय आपणास जो रोग जडतो असें वाटतें त्या रोगाचें स्वरूप व त्यांची चिकित्सा निष्कारण करीत न बसतां आपलें मन नेहमीं उल्हासी ठेविलें पाहिजे. भीतीमुळें शरिरावर कसा परिणाम होतो हें पाहाणें असेल तर ज्यांस आपणांस हार्ट डिसीझ (Heart disease) विकार झाला आहे असें वाटतें त्या इसमांची स्थिति लक्षांत घ्यावी. खरोखर पाहूं गेलें तर अशा रोग्यांस कांहीं कारणामुळें आपणांस रोग जडला असा भ्रम उत्पन्न होतो. यामुळें ते नेहमीं आपले हृदयांतील ठोके कसे पडतात हें पहात असतात. अखेरीस खरोखरच त्यांचें हृदय बिघडतें.



घरास आग लागलेली पाहून आंत बिछान्यावर असलेले रोगी एकदम उठून सामान बाहेर काढण्यास एकसारखी न श्रमतां दुसऱ्या लोकांस मदत करण्यास समर्थ होतात.

आतां याचे उलट म्हणजे मनोवृत्तीस एकदम एकाएकीं भयंकर चलन देऊन बरेच दिवस आंथरुणावर असलेले रोगी बरे होतात. मात्र हे रोगी नुसत्या भ्रमानें आजारी पडलेले असले पाहिजेत. अशीं उदाहरणें आहेत कीं, घरास आग लागलेली पाहून आंत बिछान्यावर असलेले रोगी एकदम उठून सामान बाहेर काढण्यास एकसारखी न श्रमतां दुसऱ्या लोकांस मदत करण्यास समर्थ होतात व तेव्हांपासून त्यांचा रोग पार नाहींसा होतो. कित्येक डॉक्टरांनीं अशा रीतीनें खोटेंच अंगांत अतिशय त्वेश आणणारें वर्तमान कळवून अगर जबरदस्तीनें धाक दाखवून अंथरुणावर निष्कारण भ्रमानें असलेले रोगी बरे केले आहेत. यावरून असें लक्षांत येईल कीं, या सर्व गोष्टींचे मुळाशीं नुसते मनोविकार आहेत. म्हणून इच्छाशक्ति (Will—Power) बळकट असली म्हणजे मनुष्यास बऱ्याच रोगांपासून आपलें संरक्षण करून घेतां येतें; तशी स्थिति भित्र्या मनुष्याची नाहीं. त्याला लोक जें जें सांगतील तें तें ऐकण्याची इच्छा असते. मोहक शब्दांनीं दिलेल्या जाहिरातींवर भुलून तो निरनिराळीं औषधें सेवन करितो व अखेरीस आपल्या शरिराची कायमची खराबी करून

घेतो. येथें इतकें मात्र विसरतां कामा नये कीं, उच्च शिक्षणाचा मनावर चांगला परिणाम होतो. मनांत नेहमीं उदात्त विचार येऊं लागले व मन प्रगल्भ झालें म्हणजे निष्कारण भीति, दुष्ट विचार, कुत्सित वासना इत्यादिकांस मनांत जागा मिळत नाहीं व आयताच त्याचा शरिरावर उत्तम परिणाम होतो.

It is education forms the common mind;
Just as the twig is bent, the trees inclined.
Pope.

यावरून आम्हीं जें म्हणतों त्याची सत्यता कळून येईल. शिवाय नीतिमत्तेचाही शरीराशीं संबंध आहे. नीतिमान् लोक नेहमीं आनंदी असतात. अनीतिमान् लोकांच्या मनास द्वेष, हेवा, असंतोष व सूड घेण्याची कल्पना इत्यादिकांपासून त्रास होतो.

या सर्व विवेचनावरून मनाचा शरिरावर किती परिणाम होतो याची कल्पना होईल. एकटें सुसंस्कृत मन शरिराचा तरूणपणा, सौंदर्य, सुदृढता कायम राखून शरिराचा लवकर ऱ्हास न होऊं देण्यास समर्थ होतें.*

यासाठीं आपण आपल्या मनास योग्य वळण देण्यास शिकलें पाहिजे, म्हणजे शारीरिक व्याधीपासून आपली पुष्कळ अंशीं सुटका होईल हें निराळें सांगण्याची जरूरी दिसत नाहीं.

---

* ( एका आंग्ल विद्वानाचे या संबंधें काय विचार आहेत हे खालील मजकुरावरून दिसून येईल.

" We cannot believe that the Creator has left the whole human race entirely at the mercy of only about half a dozen specific drugs which always act with certainty. There is a divine remedy placed within us for many of the ills we suffer. If we only knew how to use the power of will and mind to protect ourselves, many of the physicians would be out of employment, and many of us would be able to carry youth and cheerfulness with us into the teens of our second century. "

---


# विद्यार्थ्यांचें नोटबुक

## अथवा मराठी पहिल्या पुस्तकावरील नोट्स्.

लेखक रा. त्र्यंबक नारायण लेले, शाळामास्तर—पालक आणि विद्यार्थी यांना अत्यंत उपयोगी. पुस्तकांतील प्रत्येक धड्याचें मर्म समजावून त्याबरोबरच विविध माहिती देणारें आणि मनोरंजन करणारें असें हें एकच नोटबुक आहे. ह्याची रचना, प्रचलित गद्यपद्यार्थबोधाहून फार निराळ्या प्रकारची आहे. यास भारदस्त मराठी पत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. हें पुस्तक सर्वसाधारण लोकांस घेतां यावें म्हणून ह्याची किंमत कमी करून दोन आणे ठेविली आहे. तरी ५ प्रतीला ८ आणेच पडतील. आमचेकडे मागणी करावी.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# राज्यश्रीची प्रार्थना.



( श्रीमत्प्रभु रामचंद्र वनवासांतून आल्यानंतर राज्यकारभार हातीं घेण्
समयीं राज्यलक्ष्मीनें त्यांची केलेली प्रार्थना. )

द्युतियुत तव तनु मूर्ति बघुनि मनीं हर्ष जाहला फार
वाटे नित्य मला कीं, जन्माचें सर्व मादिय हें सार ॥ १
दिन अमित कंठिले मी आजवरी तव वियोग साहून
ना अन्य दुःख गमलें दुःसह मज खचित अधिक याहून

सुगुणीं तव राजवरा, वदत्यें–वदवे न–मन्मना हरिलें
हलतें न तेथुनी तें रिझवीलें परि तिथेंच तें रमलें ॥ ३ ॥
सहाय्य कराया तत्पर, घे सत्वर तव करांत मम पाणी
सुखवी दीन जनांते वारुनि तन्नयनिचें झणि पाणी ॥ ४ ॥
बालक हे असति नृपा, पालक असशी समर्थ तूं यांचा
तव शासनीं न केव्हां येवो यांते प्रसंग यांचेचा ॥ ५ ॥
स्वसुतहिततत्परवर दक्ष पिता जेंवि काळजी वाहे
तेंवि प्रजाजनांच्या सुखसाधनिं सतत तूं निरत राहे ॥ ६ ॥
धर्म प्रतिपाळ करी, करवी अपुल्या प्रजाजनां करवीं
घडवी सुकृत, दुष्कृत दडवी, मति निरवी, अशुचि जो नुरवी ॥ ७ ॥
विद्या विविध कलाहीं भूषवि यांते करी बहु चतुर
होइल सत्कीर्ति जगीं, गातिल स्वर्गींहि ती, सख्या, अमर ॥ ८ ॥
ज्ञान असे बल मोठें, तत्प्रभव तुवां पाहिला स्वयें नयनीं
जीणें व्यर्थ तयांचें जगतीं जे जगति लवहि अज्ञानीं ॥ ९ ॥
विद्या–बळ–अबल–खळ खळवि धरा सकळ वळवि जग–पाळा
विमल–कळ–धृत–बाळा काय तळीं या अघट भूपाळा ॥ १० ॥
कर्तव्य तुझें पहिलें करणें सत्ज्ञानदान स्वजनांते
जेणें जाणति जीवीं ते अपुला जनन–हेतु, जगनातें ॥ ११ ॥
क्रयविक्रय हें दुसरें आहे साधन प्रधान जीवांचें
दक्षत्वें न करी जो तत्सदन सदैव दैवहीनाचें ॥ १२ ॥
त्यावरि कोपुनिया मग लवलाही सत्य संपदा फिरते
विपदा वेगें धाउनि शान्तिसुखा तयिं तयांस मुकवीते ॥ १३ ॥
होय विपत्पंक न हा तुज तेवि त्वदीय जनतेते
रक्षी निपजवि कौशल धंदे उपजविति धन जनीं ते ते ॥ १४ ॥

काय, कुठे, किति, कैसे, जातें, मिळतें तदर्थ तुज काय
होतें काय जनांते, सुख तेणें दुःख वा करी घाय ॥ १५ ॥
चित्तांत उचित चिंतन करुनी याचें सुचेल आचरि तें
भयलोभें मोहें वा अंतर येऊं न देइ मग त्यातें ॥ १६ ॥
उद्यम-सत्सुख सोडुनि वसति करी अन्यसंगमीं न सती
संपत्त्याख्या ख्याता अखिल जनीं खलसुतांसवें रुसती ॥ १७ ॥
स्ववश कराया इजला नलगे तुजला विशेष खटपट ती
शास्त्रें विविध सुधींते शिकवी येईल शीघ्र चुटपुटती ॥ १८ ॥
धनधान्यसमृद्धि करि तव बालांच्या घरोघरीं राया
सुखवृष्टी, मनतुष्टी, बलपुष्टि, ज्ञानदृष्टि शिवतनया ॥ १९ ॥
होतां प्रसन्न मन्मन पुरविन सकल त्वदीय मी काम
रत होउनि तृप्त करी जनानुरंजनाचि तीव्र मन काम ॥ २० ॥
स्वजनीं यश मिळवुनिया गाजवि भुवनीं प्रताप तव अतुल
सच्चरिता सुखदाता, त्राता आर्ता, तसा खलां काल ॥ २१ ॥
काय वदूं अधिक नृपा जाणसि तूं आपुलें मनीं कार्य
स्वजना श्रेष्ठ करोनी सर्वपरी, म्हणवि गा बुधीं आर्य ॥ २२ ॥

राया, दिलीं तव करीं मम लेंकरें हीं
सेवेंत सादर तसीं तव नित्य मीही
नेऊन वैभव पदीं अति उंच यांते
धन्यत्व घे तुजासि, दे इस भूमि माते ॥ २३ ॥

राज्यश्री मज म्हणती स्तविती, निंदिति अनेक जन, नाथा,
स्त्रीधर्म काय ? पत्यनुगमन; गमे तुजासि हा न बोल वृथा ॥ २४ ॥

गोदासुत—इंदूर.

# अट्टल चोर.


( लेखकः—कॉलेजांतील विद्यार्थी. )

आम्ही कॉलेजांतले विद्यार्थी म्हणजे फ्याशनच्या बाबतींत सर्वांच्या 'पुढें असतों. घरीं पत्र पाठविलें कीं, वडिलांकडून आठ दिवसांत मनिआर्डरीनें जोंपर्यंत पैसे येतात व रोज नवनव्या पद्धतीचे मोहक पोषाख आमच्या नजरेस पडतात, तोंपर्यंत बूट, नेकटाय, कॉलर, फणी, आरसा वगैरे साधनांनीं शरीर भूषित करण्याच्या कामीं आम्ही काय म्हणून हयगय करावी ? शरीर रोगी झालें तरी खपेल, मन दुर्बल झालें तरी हरकत नाहीं, वडिलांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढला तरी त्याची आम्ही फिकीर बाळगणार नाहीं, पण आमच्या फ्याशनमध्यें यत्किंचित् चूक झालेली आम्हांस बिलकूल सहन होणार नाहीं !



**बूट कोंपऱ्याकडे जाऊं लागला.**

हें खरें कीं आम्हालाही चैन पडूं न देणारे प्राणी परमेश्वरानें जगांत निर्माण केले आहेत. एके दिवशीं आमच्या एका मित्राचा बूटच नाहींसा झाला; दुसऱ्याचा हातरुमाल रात्रीं अदृश्य झाला; आणि तिसऱ्याचा एक महत्त्वाचा कागद सांपडेना. आपल्या निष्काळजीपणामुळें या वस्तु हरवल्या असतील किंवा थट्टेनें कोणीतरी लपवून ठेवल्या असतील अशा शंका आमच्या मनांत उद्भवल्या. पण यांचें निरसन तावडतोब झालें. व यांत कांहीं तरी गूढ प्रकार असला पाहिजे अशी आमची खात्री झाली. कोणी चोरानें हें काम केलें असेल असें म्हणावें तर त्याचा कांहींच संभव दिसेना. मग मीं एक युक्ति सुचविली व ती सर्वांना पसंत पडली. ती युक्ति अशी कीं, एकानें बारा वाजेपर्यंत रात्रीं पहारा करावा, दुसऱ्यानें दोन वाजेपर्यंत आणि उजाडेपर्यंत आणखी दोघानीं जागें रहावें. नऊ वाजतां सर्व मंडळी निजली व मी जागा होतों. दिवा अगदीं बारीक केला होता. अकरा वाजण्याच्या सुमारास खोलीच्या आसपास एक चमत्कारिक आवाज ऐकूं आला. मला वाटलें चोर आले. मी माझी काठी जवळ घेऊन निजलों. थोड्या वेळानें माझ्या उशाशीं कोणी तरी गडबड करीत असल्याचा भास झाला. वर पहाण्याची इच्छा झाली इतक्यांत दिवा विझला. पण थोड्याच वेळानें चंद्र जवळजवळ



कॉलर आणि गळपट्टी चोरली जात आहेत.

डोक्यावर आल्यामुळें व त्या दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें आमच्या खोलींत चांदण्याचा चांगला प्रकाश पडला.



**एक उंदरोपंत घड्याळाच्या कातड्याची वादी धरून नेत आहेत.**

माझ्यासमोर कोणी तरी धांवपळ करीत आहे अशी माझी खातरी झाली. आणि निरखून पाहूं लागलों तेव्हां माझा बूट धडपडत कोंपऱ्याकडे चालला आहे असें मला आढळलें! हा भुताटकीचा तर प्रकार नसेलना असें वाटून मी क्षणभर गोंधळलों. तथापि धीर करून बारकाईनें पाहिलें तेव्हां एक उंदीर बुटाची दोरी धरून ओढीत असल्याचें आढळलें.

हा शोध लागला तेव्हां मनांतली भीति नाहींशी झाली; पण जिज्ञासा वाढली. थोड्याच वेळानें एक दोन उंदरांनीं आमच्या अंगावरून धांवण्यास सुरुवात केली. आणि एकानें नेकटाय, दुसऱ्यानें कॉलर, तिसऱ्यानें साखळीसुद्धां घड्याळ तोंडांत धरून नेण्यास सुरुवात केली. मी झोंपी गेल्याचें सोंग घेऊन मुकाट्यानें पहात राहिलों. कांहीं वेळानें ते उंदीर आमच्या खोलींतील अडगळीनें भरलेल्या एका कोंपऱ्यांतील घडवंचीखालीं गेले व अदृश्य झाले. माझ्या स्नेह्यांना जागे करून सर्व प्रकार त्यांना सांगितला. पण ती वेळ ऐन झोंपेची असल्यामुळें सर्वजण त्या वेळीं निजलों.

दुसरे दिवशीं सकाळीं ही बातमी लगेच चोंहोंकडे पसरली. कोंपऱ्यांतली अडगळ काढली तेव्हां तेथें एक भलें मोठें बीळ सांपडलें; व त्यांत आदल्या दिवशीं रात्रीं हरवलेलेंच नव्हे तर बऱ्याच दिवसांपूर्वीं चोरीस गेलेले पदार्थ देखील छिन्न–भिन्न स्वरुपांत सांपडले. त्यांत एक चमत्कारिक प्रकार आढळला तो असा कीं, एक दोन बूट धान्यानें भरले होते! म्हणजे आमचे बूट उंदरांना धान्य सांठविण्यास सोईचे दिसले. याशिवाय त्यांच्या घराची रचना देखील फार वाखाणण्याजोगी होती. मोठ्या उंदरांची जागा निराळी व लहान उंदरांनां खेळण्याकरतां निराळी खोली होती. शिवाय अनेक साध्या व अनेक गुप्त मार्गांनीं संकटसमयीं निसटून जाण्याची व्यवस्था त्यांत केलेली होती. त्यामुळें आम्हीं कुदळीनें खणून सर्व घरें पाहिलीं तरी आमच्या हातीं एकही उंदीर लागला नाहीं. असो; अशा रीतीनें चोराचा पत्ता लागला; पण काय उपयोग? त्यास शासन करण्याचें साधन आमच्या जवळ नसल्यामुळें निरुपाय झाला!



एक बूट धान्यानें बहुतेक भरला होता.

# शास्त्रीय माहिती.

( लेखक—पु. वि. गोगटे, बी. एस्‌ सी. )

## उष्णता लेखांक १.

उन्हाळ्याचे दिवस; वैशाखाचा महिना; संध्याकाळची वेळ; अण्णासाहेब कचेरींतून येऊन आराम-खुर्चीवर हवा खात बसले होते. इतक्यांत त्यांचा मुलगा मधुकर तेथें आला व अण्णासाहेबांच्या जवळ जाऊन म्हणाला " बाबा, मला एक गोष्ट विचारायची आहे. मी कनीं दुपारीं आईचें फराळाचें आणायला गेलों होतों; तेव्हां गर्दींत बूट न घालतां तसाच बाहेर पडलों. बाहेर पाहिलें तों बाबा, सडकेच्या बाजूचे दगड इतके तापले होते कीं वर पाय ठेवला कीं चटका बसे; पण जमीन कांहीं इतकी तापली नव्हती. तर याचें कारण काय ? ऊन तर चोहोंकडे सारखेंच होतें. मग दगडच जास्त कां तापावे व जमीन कां तापूं नये ?

अण्णा०:—तूं योग्य विचारलेंस. बरें, आपल्या अंगणांत एक बांक आहे त्याला कधीं तूं दुपारच्या वेळीं हात लावून पाहिलास का ?

मधु०:—होय, बाबा. त्या बांकाच्या लोखंडी पट्ट्या फार तापतात पण लांकडी फळ्या इतक्या तापत नाहींत.

अण्णा०:—आणखी सकाळीं थंड वेळेला ?

मधु०:—त्या वेळेस लोखंडी पट्ट्या थंड लागतात पण लांकूड इतकें थंड लागत नाहीं.

अण्णा०:—आतां हें सांग कीं आपण लोखंडी पळीचें बोंड जर चुलींत विस्तवावर धरलें तर मागच्या दांड्याची काय स्थिति होईल ?

मधु०:—तोही तापेल बाबा !

अण्णा०:—बरें, आपण चुलींत लांकूड लावतों तेव्हां लांकडाचें दुसरें टोंक तापतें का ?

मधु०:—नाहीं.

अण्णा०:—मग पळीचें टोंकच कां तापावें व लांकडाचें टोंक कां तापूं नये ?

मधु०:—तें नाहीं माहीत बाबा !

अण्णा०:—याचें कारण एवढेंच कीं लोखंडांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत उष्णता जाण्याचा धर्म आहे, तसा धर्म लांकडांत नाहीं; म्हणून लांकूड लोखंडासारखें तापत नाहीं. चुलींत जीं लांकडाचीं व लोखंडाचीं टोंकें आहेत तीं मात्र समान तापतील.

मधु०:—मग बाबा, जर लांकडाचीं व लोखंडाचीं चुलींत असणारीं टोंकें समान गरम होतात तर लोखंडांत जी उष्णता दुसऱ्या टोंकाला गेली ती लांकडापेक्षां अधिकच समजावयाची. नाहीं ?

अण्णा०:—अगदीं बरोबर सांगितलेंस. लोखंड आणि लांकूड दोन्हीं एकाच चुलींत आहेत त्यामुळें दोघांना सारखीच उष्णता लागते; पण लोखंडांत उष्णतेचें वहन करण्याचा म्हणजे उष्णता पसरविण्याचा धर्म असल्यामुळें लोखंडांत बरीच उष्णता सांचते, पण लांकडांत फक्त चुलींत असलेल्या टोंकावर जितकी उष्णता असते तितकीच. समज; दोन भिक्षुक राजाकडे याचनेसाठीं गेले. त्यांत एकाजवळ एक लांब व मोठी पिशवी आहे व दुसऱ्याजवळ कांहीं नाहीं. आतां राजानें त्यांना कोठारांत नेऊन वाटेल तितकें धान्य घेऊन जाण्यास सांगितलें तर पिशवीवाला भिक्षुक बरेंच धान्य नेईल व दुसरा आपल्या मुठींत जितकें राहील तितकेंच नेईल.

मधु०:—आतां, बाबा, मी समजलों. लोखंड व लांकूड उन्हांत असलें म्हणजे लोखंडांत बरीच उष्णता जमा होते व लांकडांत तितकी उष्णता जमा होत नाहीं.

अण्णा०:—तुझें म्हणणें खरें आहे. लोखंडांत उष्णता जास्त जमा होईल व लांकडांत कमी होईल; परंतु दोघांच्या उन्हाकडच्या बाजूंचाच जर विचार केला तर त्या दोन्हीं सारख्याच तापलेल्या असतील, म्हणजे

त्यांची तीव्रता किंवा गरमपणा सारखाच असेल.

मधु०:—असें कसें बाबा म्हणतां ? लोखंडांत लांकडापेक्षां उष्णता जास्त असल्यावर लांकूड जितकें गरम वाटेल त्यापेक्षां लोखंड जास्त गरम वाटणार नाहीं का ?

अण्णा०:—नाहीं. कारण लोखंडांत उष्णता जास्त आहे; तरी पण ती सर्व लोखंडभर पसरली असल्यामुळें व लांकडांत उष्णता कमी आहे तरी पण ती लांकडाच्या फक्त उन्हाकडच्या भागांतच असल्यामुळें दोघांची तीव्रता सारखीच राहील. उष्णतेच्या तीव्रतेचें प्रमाण निव्वळ उष्णतेच्या सांठ्यावर अबलंबून नसतें, तर ती किती जागेंत पसरली आहे याच्यावरही अवलंबून असतें. चहाच्या एका पेल्यांत, समज एक चमचा साखर घातली आहे व दोन पेल्यांत दोन चमचे साखर घातली आहे, तर जशी या दोन्ही चहांची गोडी सारखीच लागेल, एकांत दोन चमचे साखर आहे म्हणून तो चहा जास्त गोड होणार नाहीं व दुसऱ्यांत कमी म्हणून तो कमी गोड लागणार नाहीं, तशीच लोखंडांत उष्णता जास्त असली तरी ती लांकडापेक्षां जास्त भागांत पसरलेली असल्यामुळें दोघांची तीव्रता सारखीच राहील. आतां तू पाहिलेंस कीं लोखंड उष्णतावाहक आहे; त्यामुळें आपण तापलेल्या लोखंडाला आपलें बोट लावलें तर बोटापेक्षां लोखंड जास्त गरम असल्यामुळें आपण बोट लावलेल्या जागेंतील उष्णता आपल्या बोटांत शिरेल. आतां ही उष्णता आपल्या बोटांत गेल्याबरोबर त्या रिकाम्या झालेल्या जागेंत लोखंडाच्या दुसऱ्या भागांतून उष्णता येईल व तीही आपल्या बोटांत शिरेल. पुन्हां या रिकाम्या झालेल्या जागेंत उष्णता येऊन तीही पूर्ववत् आपल्या बोटांत येईल. अशा तऱ्हेनें उष्णतेचा प्रवाह लोखंडाच्या सर्व भागांतून सुरू होऊन आपल्या बोटाकडे येईल. आतां आपलें बोट लोखंडासारखें उष्णतावाहक नसल्यामुळें बोटांत जमा झालेली उष्णता सर्व आंगभर न पसरतां जेथच्या तेथेंच जमा होईल व अशा रीतीनें बोटांत बरीच उष्णता जमा झाल्यामुळें बोटाला चटका बसेल. ही बोटांत उष्णता जमा होण्याची क्रिया लोखंडाला बोट लावल्यापासून इतक्या थोड्या अवधींत होते कीं आपल्याला हात लावल्याबरोबर चटका बसला असें वाटतें. आतां लोखंडापेक्षां जास्त उष्णतावाहक पदार्थ म्हणजे तांबें, पितळ वगैरे जर असले त्यांना बोट लावल्यापासून इतक्या अल्पावधींत व इतकी जास्त उष्णता त्या पदार्थांच्या सर्व भागांतून येऊन आपल्या बोटांत शिरेल कीं आपणास लोखंडापेक्षां तांब्याच्या किंवा पितळेच्या पदार्थानें जास्त चटका बसेल.

उन्हांत असलेल्या लांकडाला जर बोट लावलें तर फक्त बोट लावलेल्या जागेंतील उष्णता आपल्या बोटांत शिरेल. लांकूड उष्णतावाहक नसल्यामुळें लोखंडासारखा उष्णतेचा प्रवाह चोहोंकडून सुरू होत नाहीं. म्हणून सुरवातीलाच आपल्या बोटाला उष्णतेचा जो काय अनुभव येईल तेवढाच. त्यापेक्षां कांहीं बोट जास्त भाजणार नाहीं.

मधु०:—बाबा, आतां माझ्या लक्षांत आलें कीं जे जिन्नस उष्णतावाहक आहेत ते उन्हांत असले तर त्यांनीं पाय भाजतील; इतरांनीं भाजणार नाहींत.

अण्णा०:—हेंच मी तुला सांगणार होतों इतक्यांत तूंच होऊन सांगितलेंस. माती फारच कमी उष्णतावाहक असल्यामुळें तिनें पाय भाजत नाहींत. दगड हे साधारण उष्णतावाहक असल्यामुळें त्यांनीं पाय भाजतात; पण धातु या पुष्कळच उष्णतावाहक असल्यामुळें त्यांनीं तर चटकेच बसतील.

मधु०:—बाबा, आतां सकाळीं आपल्या आंगणांतल्या बांकाचें लोखंड थंड कां लागतें व लांकूड इतकें थंड कां लागत नाहीं याचें कारण काय ?

अण्णा०:—मधु, तुला आज बरेंच सांगितलें आहे, त्याचें तूं नीट मनन कर व तूं हा जो प्रश्न विचारलास तो त्यावरून तुझा तुलाच सुटतो कीं नाहीं तें पहा व मग उद्यां मला विचार. आतां संध्याकाळ झाली आहे तेव्हां थोडासा बाहेर खेळ. जा.

# गप्पागोष्टी.

महंमद घोरीचा सरदार महंमद बखत्यार खिलजी यानें बंगाल व बहार हे प्रांत जिंकिले, हें इतिहासप्रसिद्धच आहे. त्या वेळीं बंगालची तेव्हांची राजधानी नदीया येथें लक्ष्मणसेन नांवाचा वृद्ध पालवंशी राजा राज्य करीत होता. या लक्ष्मणसेनाच्या जन्माच्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट प्रसिद्ध आहे; तीवरून त्या वेळीं लोकांची ज्योतिषावर निस्सिम श्रद्धा होती, हें लक्षांत येतें. ती गोष्ट अशी—

लक्ष्मणसेनाचा बाप वारला, त्या वेळीं त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. राणी गरोदर होती; तेव्हां होणारें मूल हेंच राज्याचें धनी, म्हणून राणीच्या पोटावर मुकुट ठेवून, सर्व प्रजाजनांनीं व मांडलिक राजांनीं राजनिष्ठेच्या शपथा घेतल्या.

पुढें ज्या वेळीं राणीस प्रसूतीवेदना होऊं लागल्या, त्या वेळीं तिनें पदरच्या सर्व विद्वान् ब्राह्मणांस व ज्योतिष्यांस बोलविलें, आणि 'ही वेळ कशी काय आहे ?' म्हणून विचारिलें. त्यांनीं लागलींच गणित करून राणीस सांगितलें कीं, 'ही वेळ फार वाईट आहे. या वेळीं मूल जन्माला आलें, तर त्याला राज्यप्राप्ति नाहीं. परंतु मुलाचा जन्म आणखी दोन तासांनीं झाल्यास तो ८० वर्षे राज्यपद भोगील असा योग आहे.'

हें ऐकतांच राणीनें आपले दोन्ही पाय घट्ट एके ठिकाणीं बांधण्यास आज्ञा केली, आणि आपणास उलटें टांगवून घेतलें. व ज्योतिषांस चांगला मुहूर्त केव्हां येतो हें पहात बसविलें.

सर्व ज्योतिषांनीं एकमतानें तो सुयोग आला, असें सांगतांच तिनें आपणास खालीं उतरवून घेऊन आपले पाय सोडवून घेतले व लागलींच ती प्रसूत झाली. याच मुलाचें नांव लक्ष्मणसेन. याचा राय लक्ष्मणसेनानें पुढें ऐंशीं वर्षे राज्य केलें; परंतु राणीनें दोन तास ज्या वेदना सहन केल्या होत्या, त्यामुळें ती मात्र प्रसूती होतांच मरण पावली !

× × × ×

इंग्लंडचा राजा सातवा हेनरी याच्या एका सरदारानें एकदां राजाकडे येऊन तक्रार केली कीं, "हॉल्बीननें मला माझ्या योग्यतेप्रमाणें मान दिला नाहीं.' हॉल्बीन हा त्या वेळचा एक प्रसिद्ध चितारी होता; राजा त्याचा गुण जाणून होता, व म्हणूनच त्याला दुखविण्याची राजाची इच्छा नव्हती. त्यानें सरदारास उत्तर केलें:—'तुम्ही माझ्यापुढें सात भिकारी आणून उभे करा, आणि मी तुम्हांला त्यांचे सात सरदार करून देतों. पण तुम्ही मजकडे सात सरदार आणलेंत, तर त्या सर्वांचाही मिळून मला एक हॉल्बीन कांहीं बनवितां येणार नाहीं.

स्वतःच्या योग्यतेचा गर्व पार मावळून, तो सरदार परत गेला.

---


# भातुकली.

हें लहानसें पुस्तक मुख्यतः मुलींकरितां लिहिलेलें आहे. ह्यात **मुलांमुलींचे लहानपणचे सर्व खेळ** सविस्तर दिले असून खेळ खेळतांना म्हणण्याचीं **गाणींही** दिलेलीं आहेत. शिवाय मुलांनीं **झोपाळ्यावर** बसून म्हणण्याच्या सुमारें ३२ **ओव्या** व मुलींनीं एकमेकींस घालण्याचे **उखाणेही** बरेच दिलेले आहेत. किंमत ४ आ.

**म्यानेजर**—चित्रशाळा प्रेस, पुणें.

A GUIDE TO KINDERGARTEN

# बालोद्यान--शिक्षणमार्गदर्शिका.

## सुधारलेली आवृत्ति दुसरी.

( ग. ना. बोरवणकरकृत. )

ह्या पुस्तकांत फ्रोबेलच्या १ पासून २० पर्यंतच्या सर्व देणग्यांचें उत्तम प्रकारें विवेचन केलेलें असून त्या स्पष्टपणें शिक्षकांस समजाव्या म्हणून शेवटीं प्रत्येक देणगीच्या आकृति जोडलेल्या आहेत. ह्या पुस्तकाचा उपयोग ज्यांना या विषयाची अद्याप मुळींच ओळख नाहीं, त्यांना तर फारच उत्तम होतो. किं० रु. ०।१०. ट. ह. शिवाय.

# चिमुकल्या गोष्टी.

( भाग १ ते ६. )

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वरील टाईपांत सुंदर, जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत. प्रत्येक भागास किं० ०।४. सहा भाग एकदम घेणारास किं० १।०।४.

# मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

ह्यांत प्रथम लहान मुलांना दिशा, नंतर ज्यारखग्र व पाण्याचे विभाग समजावून देण्याकरितां लहान लहान रंगीत नकाशे दिले आहेत. पुढें पर्वत, नद्या, आगगाडीचे रस्ते, इलाख्याचे मुख्य भाग वगैरेंचे निरनिराळे नकाशे देऊन स्पष्ट दाखविले आहेत. भूगोलासारखा विषय लहान मुलांस समजावून देण्यास ह्या पुस्तकाचा उपयोग होतो. किं० ०।१.

# शारदीय वाचनपाठमाला.

हें पुस्तक प्रसिद्ध पंडिता रमाबाई यांनीं लहान मुलांकरितां अमेरिकन धर्तीवर लिहिलेलें आहे. ह्यात लहानलहान प्राण्यांच्या बोधपर गोष्टी लिहिल्या आहेत. शिवाय मुलांना वाचण्यासारखे शब्द प्रत्येक धड्याचे प्रारंभीं दिले आहेत. प्रत्येक गोष्टीस चित्रें दिलीं असून पुस्तकाचा टाईप चांगला जाड आहे. किं० ०।१।६.

मिळण्याचें ठिकाणः--ज्ञानेश्वर चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी रंगीत सचित्र वर्णमाला.

ह्यांत अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें त्या त्या अक्षराच्या सूचक चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षराचें अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास या नकाशाचा उपयोग चांगला होतो. किं. ०१२.

# मूळाक्षरांचे (मराठी) चित्रयुक्त रंगीबेरंगी पत्ते.

हे पत्ते इस्पिकचे पत्त्यांप्रमाणें खेळासही उपयोगी पडणारे असून पत्त्यावर 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत मूळाक्षरें व १ पासून १० पर्यंत अंक त्या त्या अक्षरांकदर्शक वस्तूंच्या सुबक चित्रांसहित काढलेलीं आहेत. वरील पत्त्यांच्या इस्पिकांप्रमाणें खेळ खेळतांना मुलांना जोडाक्षरांसह अक्षरओळख होऊन आंकड्यांचेंही ज्ञान सुलभ रीतीनें व लवकर होतें. पत्तेजोड सुंदर पेटींत ठेविलेला आहे. किं. ०४, ट. ह. ०१.

# ऐतिहासिक खेळण्याचे पत्ते.

हे खेळण्याचे पत्ते नवीनच चित्रशाळेंत छापून तयार झालेले असून, ह्यांत राजा व राणी या चित्रांचे ठिकाणीं ऐतिहासिक स्त्री-पुरुषांचीं चित्रें छापलेलीं आहेत. व म्हणूनच ह्यांस ऐतिहासिक पत्ते असें नांव दिलेलें आहे. ह्या चित्रांत अकबर, शहाजहान, मुमताजमहाल, जहांगीर, नूरजहान, अवरंगजेब, चांदबीबी, वगैरे मोंगल घराण्यापैकीं चित्रें असून छत्रपति शिवाजी, व्यंकोजी, ताराबाई, थोरले माधवराव पेशवे, रमाबाई, सवाई माधवराव पेशवे, गंगाबाई, नाना फडनवीस वगैरे मराठेशाहींतील व पेशवाईतील स्त्री--पुरुषांचीं चित्रें आहेत. शिवाय अलीकडील राजे--रजवाड्यांचींही चित्रें ह्यांत घातलेलीं आहेत. हीं सर्व चित्रें रंगीत असून अगदीं ओळख पटण्यासारखीं हुबेहूब आहेत. पत्त्यांस चांगला जाड व गुळगुळीत कागद वापरलेला असून बावन पत्त्यांचे एका जोडास किंमत अवघी दोन आणे ठेविली आहे. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस ८१० सदाशिव पेठ पुणें सिटी.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. सप्टेंबर सन १९१६ अंक ९.




# विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| नेत्राचा खरा उपयोग. | १६३ |
| साहसाला ईश्वराचा पाठिंबा. | १६६ |
| नौ-उच्चालक-यंत्र. | १६८ |
| भुताटकीचा प्रकार. | १६९ |
| सिंहासंबंधीं खऱ्या गोष्टी. | १७२ |
| शास्त्रीय माहिती. | १७८ |
| गप्पागोष्टी. | १८१ |

आरबी भाषेंतील

# सुरस व चमत्कारिक गोष्टी.

## विद्यार्थ्यांकरितां काढलेली संक्षिप्त आवृत्ति.

ह्या पुस्तकांतील गोष्टींची निवड केवळ लहान-थोर विद्यार्थ्यांकरितांच केलेली असून मूळ ग्रंथांत असलेला अश्लील भाग यांतून मुळींच काढून टाकलेला आहे. रिकामपणीं किंवा सुट्टीचे दिवसांत मनोरंजनाकरितां वरील पुस्तक मुलांमुलींना वाचण्यास दिलें असतां त्या-पासून त्यांची करमणूक होऊन वाचनाचीही गोडी लागेल. पुस्तक जाड व सुंदर टाइपांत ग्लेज कागदावर छापलेलें असून त्यांत एकंदर १० चित्रें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं व आर्ट पेपरवर छापलेलीं घातलीं आहेत. बाइंडिंग जाड पुठ्ठ्याचें मजबूत आहे. किं० १॥८. ट. ह. शिवाय.

# सचित्र अक्षरबोध.

नवीन आवृत्ति.

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भप-केदार रंगांत तें तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकही वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए. बी. सी. डी. शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं० ८६.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मूळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार कर-ण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या साहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं० ८१. ट. ह. ८८६.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी शालपत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. सप्टेंबर, सन १९१६. अंक ९.

## नेत्राचा खरा उपयोग.

( लेखकः—महादेव विष्णू खरे,—खेड. )

प्रत्येक मनुष्य या भूतलावर त्याच्या परिस्थित्यनुरूप अनेक वस्तु पाहतो. आतां देशाटन केल्यामुळें एकादा मनुष्य दुसऱ्या इतर मनुष्यांपेक्षां अनेक वस्तु पाहील; परंतु या पाहण्यानें त्यानें आपल्या नेत्राचा खरा उपयोग केला असें क्वचितच म्हणतां येईल. कोणतीही वस्तु आपण पाहिली म्हणजे तिचें बाह्य स्वरूप न पाहतां त्या वस्तूचे गुण-धर्म, ती कशी बनलेली आहे, शिवाय त्या वस्तूपासून आपणास काय फायदा करून घेतां येईल हें पाहिलें पाहिजे. असें केलें तरच आपण आपले नेत्राचा ती वस्तु पाहण्याकडे खरा उपयोग केला असें म्हणतां येईल. थोर पुरुषांत व सामान्य मनुष्यांत भेद तर हाच असतो कीं थोर पुरुषांची निरीक्षणशक्ति फारच विलक्षण असते. म्हणून नेत्राचा खरा उपयोग करून ज्या थोर पुरुषांनीं या जगावर अद्भुत शोध लाविले त्यांचे संबंधानें प्रस्तुत विषयापुरतें विवेचन करणें जरूर आहे.

बरेच वेळां आपण घरांचे वाशांस लहान प्राण्यांनीं भोंकें पाडलेलीं पाहतों; त्याचप्रमाणें भुंगे लांकडास वाटोळीं भोंकें पाडतात, असेंही आपले पाहण्यांत येतें; परंतु या गोष्टीचें आपणांस कांहीं आश्चर्य वाटत नाहीं; अगर या प्राण्यांच्या कृतीपासून कांहीं शिकण्यासारखें आहे किंवा कसें याबद्दल विचार करण्याचें कोणाचेंही मनांत येत नाहीं. शिपवर्म ( Ship worm ) म्हणून

एक किडा गलबताचे फळ्यांस भोंक पाडतो. असा एक किडा भोंक पाडीत असतां सर इसाम्बार्ड ब्रुनेल ( Sir Isambard Brunel ) यांनीं पाहिला. त्याच्या कृतीचें सूक्ष्मदृष्ट्या निरीक्षण केल्यावर मोठ्या प्रमाणावर त्याच कृतीचें अनुकरण करून प्रसिद्ध टेम्स--भोगदा ( Thames Tunnel ) बांधिला. त्याचप्रमाणें कॅप्टन ब्राऊन ( Captain Brown ) हे एके दिवशीं सकाळीं आपले बागेतून फिरत असतां एका कोळ्याचें जाळें हवेंत लोंबत असलेलें त्यांनीं पाहिलें. बराच वेळ विचार केल्यावर त्यांस असें वाटलें कीं लोखंडी तारेचा त्या जाळ्याचे नमुन्याप्रमाणें एक लोंबता पूल बांधितां येईल. अखेरीस त्यांनीं पुष्कळ श्रम करून एक लोंबता पूल तयार केला. व या त्यांच्या कृतीस चांगलें यश आलें.



जेम्स वॉट.

वाफेच्या इंजिनाची उत्पत्ति अशाच क्षुल्लक गोष्टीवरून झालेली आहे. लन्डन टॉवरमध्यें सुमारें २०० वर्षांपूर्वी मार्क्विस ऑफ वुरसेस्टर ( Marquis of Worcester ) या नांवाचा एक इसम कैदी होता. त्यानें किटलीचे तोंडांतून आंतील पाण्यास आधण आल्यामुळें वाफ येत असलेली पाहिली. तेव्हां त्याचे मनांत असें आलें कीं, त्या किटलीची तोटी व झांकण बंद करावें व काय परिणाम होतो तो पहावा. तोटी व झांकण बंद केल्यावर कांहीं वेळानें ती किटली फुटून गेली. यावरून वाफेची शक्ति फारच मोठी आहे असें त्याचे लक्षांत आलें व वाफेनें चालणारें एक इंजिन त्यानें तयार केलें. परंतु हा शोध प्रथमच लागल्यामुळें त्यांत बरेंच वैगुण्य होतें. पुढें सन १७३६ मध्यें स्कॉटलन्ड देशांत जेम्स् वाट ( James Watt ) नांवाचा एक इसम जन्मला. तो लहान असतां वर सांगितल्याप्रमाणें किटलीचे तोंडांतून वाफ येत असतांना त्यानें पाहिली. नंतर वाफेचे शक्तीबद्दल त्यानें फारच परिश्रम करून प्रयोग करून पाहिले व वाफेच्या इंजिनमध्यें महत्त्वाच्या सुधारणा केल्या. हल्लीं आगगाड्या, आगबोटी वगैरे प्रवासाचीं जीं सुलभ साधनें आपणांस लाभलीं आहेत तीं वर लिहिलेल्या शोधांचीं फळें आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

वाफेस जर बोलतां येत असतें तर ती काय बोलली असती याविषयीं एका आंग्ल कवीनें खालीं लिहिलेली कविता केली आहे.

I blow the bellows, I forge the steel;
I manage the mill and the mint;
I hammer the ore and turn the wheel;
And the news that you read I print.

असो; वैशाख महिन्यांत आंब्याचे झाडावर आंबे पिकले म्हणजे कित्येक लोक दगड मारून आंबे खालीं

पाडतात. दगडाचा तडाका बसला म्हणजे देंठापासून आंबा गळून खालीं पडतो. तो खालीं पडला म्हणजे तेथें जमलेली मंडळी तो कापून मजेनें खाऊन निघून जातात. परंतु आंबा खालीं कां पडतो याबद्दल विचार करण्याचें कोणासही सुचत नाहीं. सर ऐझाक न्यूटन ( Sir Isaac Newton ) नांवाचे गृहस्थानें झाडावरून फळ कां खालीं पडतें याबद्दल विचार करून गुरुत्वाकर्षणाचा शोध लाविला. फार काय परंतु अमेरिका खंड या पृथ्वीवर आहे किंवा काय या विषयीं कित्येक वर्षें कोणास कांहीं माहीत नव्हतें. असें असतां समुद्रांतून लाटेवर तरंगून किनाऱ्यावर वाहात आलेलें गवत, नकशी काम केलेलीं लांकडें वगैरे पाहून कोलंबस नांवाचे इसमास अटलान्टिक महासागराचे पलीकडे आणखा जमीन असावी असें वाटूं लागलें. म्हणून तो कांहीं गलबतें बरोबर घेऊन पश्चिमेकडे सफर करण्यास निघाला. या त्याच्या धाडसी कृत्यांत त्यास अनेक अडचणी सोसाव्या लागल्या. कारण त्याचें म्हणणें लोकांस मुळींच पटेना. अखेरीस मनाचा निर्धार करून मोठ्या परिश्रमानें त्यानें तें खंड शोधून काढिलें.



सर ऐझाक न्यूटन.

अशा रीतीनें अल्प वस्तूंचें योग्य निरीक्षण केलें तरच नेत्राचा खरा उपयोग झाला असें म्हणतां येईल. कोणतीही वस्तु पहिल्यानें अगदीं क्षुल्लक दिसते; परंतु जसें जसें त्या वस्तूचें निरीक्षण करीत जावें तशी तशी त्या वस्तूची खरी किंमत आपणास कळून येते व अनेक महत्त्वाचे शोध लावितां येतात. या साठीं जर नेत्रांचा खरा उपयोग करणें असेल तर निसर्गानें उत्पन्न केलेल्या वस्तूचे गुणधर्म, ती कशी बनलेली आहे, त्या वस्तूचा एकादा प्रयोग करून तिजपासून काय शिकतां येईल हें पहाण्याचा प्रत्येक विचारी पुरुषानें प्रयत्न करावा.

# साहसाला ईश्वराचा पाठिंबा.

लेखक—विश्वनाथ नारायण रेडे, आखंदें.

साहस या शब्दार्थात सामर्थ्याबाहेर केलेलीं सर्व बरीं वाईट कृत्यें मोडतात. त्यांतील बऱ्यांचें फल बरें मिळतें आणि वाइटाचें फल वाईट मिळतें. तीं बरीं वाईट कृत्यें साहसाच्या आश्रयानें कोणी करूं लागला तर तो त्यांत हटकून यशस्वी होतो, निदान तत्संबंधीं त्याची कीर्ति अमर राहते. जगाच्या इतिहासांत ज्यांचीं ज्यांचीं नांवें नभोमंडळांतील रात्रीच्या ठळक ठळक तेजस्वी ताऱ्यांप्रमाणें चमकतात, ते सर्व—स्त्री अगर पुरुष—साहसाच्या आश्रयानें उदयास आले आहेत, असें विचारान्तीं दिसून येईल.

कार्यकर्त्यानें साहस करण्याचें पत्करिलें म्हणजे त्याच्या अंगांत विद्युल्लतेसारखी एक अलौकिक शक्ति संचार करूं लागते. निर्बलांस बल देणारी, मूढांना अक्कल शिकविणारी आणि दुष्कर कृत्येंही सुगम भासविणारी अशी ती शक्ति आहे. मनानें जें कार्य दुर्घट ठरविलें तें जर तडीस जाण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं तर ती देवाची कृपा! असें आपण समजतों. पण तीं सुचिन्हेंही साहसावर अवलंबून असतात हें आमच्या लक्षांत येत नाहीं. आणि 'देवाची कृपा असेल तर आमची कार्यसिद्धि होईल!' असा आम्ही सर्वथैव देवावर हवाला टाकून—आमच्या हातून होण्यासारखीं सुद्धां आम्हीं कामें न करितां—पाय असून चालतां येत नसावें अथवा हात असून निरुपयोगी व्हावें अशांतल्या स्थितीप्रमाणें स्वस्थ बसून राहतों! पण ही आमची मोठी चूक आहे. आपणाला फार भूक लागली आहे आणि आमचा तर मूळपासून नामदेवासारखा (पण त्याच्या लायकीचा नव्हे हो!) देवावर हवाला. देवाला म्हटलें:—"देवा! तुझ्यावर आमचा हवाला. तूं आमचें जेवणाचें ताट पंचपक्वान्नांनीं भरून आमच्या पुढ्यांत आणून ठेविलेंस तर आम्ही आज जेवणार! नाहीं तर आपलें उपोषण ठरलेलें!!" यावर देव म्हणेल:—"राहिनास लेका उपाशीं! आळशीच तूं, तुझी गत अशीच व्हावयाची! चांगलें पोटांत चुरचुरलें आणि भुकेनें जीव कासावीस होऊन 'मरतों कीं उरतों' अशी स्थिति झाली म्हणजे आपोआप चूल पेटविशील! 'आपणाला सैंपाक करतां येत नाहीं तरी बघूं या काय होतें तें.' असें म्हणून धीटाईनें जर त्या उद्योगास लागतास तर कोणाच्याही रूपानें आणि कसेंही तरी तुला मीं साह्य केलें असतें. पण त्यांतलें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. तेव्हां खुशाल उपाशीं मर! मजकडून कांहीं ताट येत नाहीं." यावरून असें सिद्ध होईल कीं साहस करणाऱ्यानें 'आपणांस ईश्वराचें पाठबळ आहे' असें मानण्यास कोणचीच हरकत नाहीं. मात्र साहसाला असणाऱ्या ईश्वराच्या पाठिंब्याचा फायदा सदसद्विचार करूनच मिळविला पाहिजे. नाहींपेक्षां 'एक करतां बेक' होण्याचा फार संभव आहे. 'साहसाला ईश्वराचा पाठिंबा' जर नसेल तर अशा कांहीं चमत्कारिक गोष्टी जगांत दृष्टोत्पत्तीस येतात कीं, जेणेंकरून वरील गोष्ट सत्यच मानावी लागते. समजा, एकानें गुन्हा करण्याचें साहस केलें तर परमेश्वर त्याला त्याच वेळीं ही गोष्ट वाईट आहे असें समजून शिक्षा देत नाहीं. जर देता तर निखाऱ्यास पाय लागण्याबरोबर 'हाय' म्हणून जसा मनुष्य मागें सरतो अगर त्याला भिऊन राहतो, तसा तो गुन्ह्याला भिऊन वागता व त्याच्याकडून

कधीं गुन्हा घडला नसता. अलीकडे प्रत्यक्ष गुन्हा असला तरी तो गुन्हा ठरत नाहीं. जेव्हां साक्षीपुरावे व्हावे व गुन्हा शाबीत व्हावा त्याच वेळीं तो दंडास पात्र होतो. या वाईट गोष्टीपासून त्याला शिक्षा मिळाली तर मिळते खरी; पण ' साहसाला ईश्वराचा पाठिंबा असतो ' एवढें सिद्ध होतें. व तो लोकांच्या उपहासास आणि स्वतःच्या दुःखास कारणीभूत होतो हें विसरतां कामा नये. विषाचा प्रताप माहीत असतां मुद्दाम विषप्राशन करण्याचें धाडस कोणी मूर्ख करूं लागला तर त्या धाडसाचें फल जें मरण तें तो प्राप्त करून घेऊन त्या वाईट कृत्यांत एका अर्थी यशस्वीच होतो. त्याला मरणाची अपेक्षा होती ना ? झालें तर मग; त्यानें विषप्राशनाच्या धाडसानें आपलें साध्य साधून घेतलें. पण, त्याचें हें साहस अज्ञानमूलक होय, म्हणून तें सर्वथा गर्हणीय आहे. शंकरासारख्या सुरपूजितानें समुद्रमंथनाच्या कालीं त्रैलोक्याला भस्मसात् करण्याची शक्ति असलेलें—हाल हाल करून सोडणारें—हालाहल विष परोपकारार्थ प्राशन करण्याचें साहस केलें. तें त्याला म्हणूनच पचलें—त्या विषापासून त्याचा अंत झाला नाहीं—तरी पण त्या दुर्धर विषाचा प्रचंड दाह शमन होण्यासाठीं मोठमोठे भुजंग, पृथ्वीला भेदणारा गंगौघ इ० धारण करण्याचें साहस करावें लागलें आणि अन्तीं रामनामोच्चार पाठानें त्याला शान्ति मिळाली. तसेंच, त्याच्या विरुद्ध—अमृतोपम सुखोत्पत्ति प्राप्त करून घेण्याच्या साहसानें—आरंभिलेल्या कृत्यांतही विजयी झालेले आढळतील. त्या साहसांत आणि या साहसांत जमीन अस्मानाइतकें अंतर आहे. तें गर्हणीय तर हें प्रशंसनीय, आणि तें जितकें निंद्य तितकेंच हें श्रेयस्कर ! पांच वर्षांच्या ध्रुवानें सुरुचि नामक सावत्र आईच्या दुर्वाक्यानें संतापून परमेश्वरप्राप्त्यर्थ तपोवनांतील समस्त क्लेश सहन करण्याचें धाडस केलें व ईश्वरानें त्यास अढळपद देऊन त्याचें चीज केलेंही.

युरोपांतील चालू महायुद्धावरूनही आमच्या तत्वास चांगली बळकटी येते. हिंदी वीरांनीं लढाईवर जाण्याचें जें अप्रतिम साहस केलें त्यांत त्यांना परमेश्वरानें साहाय्य केलें म्हणून तर त्यांचा यशोदुंदुभी साऱ्या पृथ्वीतलावर दुमदुमून राहिला आहे. " आपण आतां रणांगणावर गेल्यावर प्रतिपक्ष्याकडील हृदयाचें पाणी करून सोडणारे तोफांचे लालभडक गोळे ऑ पसरून येतील, संगिनीच्या माऱ्यानें देहाचे राइएवढाले तुकडे होतील, अथवा विषारी धुरानें जीव गुदमरून मरून जाऊं ! " अशी कोणचीच भीति न बाळगितां त्यांनीं निधड्या छातीनें तिथें जाऊन जें साहस केलें तें पाहून परमेश्वरानें त्यांस साहाय्य केलें तर त्यांत नवल कसचें ? तें एक त्याचें ब्रीदच आहे.

साहस करण्याविषयीं मनाची तेवढी तयारी असणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. ज्या वेळीं लोकप्रीति उद्भवेल, राजभक्ति बाणेल किंवा कोणच्याही कार्याबद्दल विशेष कळकळ वाटेल त्याच वेळीं साहस करण्याकडे मनाची प्रवृत्ती होते. लोकप्रीति उद्भवणें, राजभक्ति बाणणें अगर कोणच्याही स्तुत्य कार्याबद्दल विशेष कळकळ वाटणें हे लोकोत्तर गुण फारच थोड्यांच्या अंगीं वसत असतात.

साहसामुळें लोकांत उपहास होतो ( लोक बऱ्यास हंसतात आणि वाइटास तर हंसावयाचेच. ) पदरमोड करावी लागते व आपल्या इतर व्यवधानांसही केव्हां केव्हां अर्धचंद्र द्यावा लागतो. अशी सर्वस्वीं झीज सोसावी लागते; पण आपण एक सत्कार्य करीत आहों ही भावना मनांत ठेवून तें सारें सहन केलें पाहिजे. म्हणजे हीच एक प्रकारची तपश्चर्या होऊन त्याचें फल जें आपलें उद्दिष्ट कार्य तें परमेश्वर सफल करितो. त्यामुळें आपल्या कृतश्रमाचें सार्थक्य झालेंसें वाटून जें समाधान प्राप्त होतें तें अवर्णनीय आहे.

जे दुर्बल असतात त्यांच्या तोंडांतून ' हें कार्य आपल्याकडून पार पडेल काय ? ' ' मनाप्रमाणें सिद्धीस नच गेलें तर पुढें कसें काय होईल ? ' इ० भागूबाईचे उद्गार निघत असतात. म्हणून ज्यांस आपली उन्नति करून घ्यावयाची असेल,स्तुत्य कार्याची

# साहसाला ईश्वराचा पाठिंबा.

लेखक—विश्वनाथ नारायण रेडे, आखंदें.

साहस या शब्दार्थांत सामर्थ्याबाहेर केलेलीं सर्व बरीं वाईट कृत्यें मोडतात. त्यांतील बऱ्यांचें फल बरें मिळतें आणि वाइटाचें फल वाईट मिळतें. तीं बरीं वाईट कृत्यें साहसाच्या आश्रयानें कोणी करूं लागला तर तो त्यांत हटकून यशस्वी होतो, निदान तत्संबंधीं त्याची कीर्ति अमर राहते. जगाच्या इतिहासांत ज्यांचीं ज्यांचीं नांवें नभोमंडळांतील रात्रीच्या ठळक ठळक तेजस्वी ताऱ्यांप्रमाणें चमकतात, ते सर्व—स्त्री अगर पुरुष—साहसाच्या आश्रयानें उदयास आले आहेत, असें विचारान्तीं दिसून येईल.

कार्यकर्त्यानें साहस करण्याचें पत्करिलें म्हणजे त्याच्या अंगांत विद्युल्लतेसारखी एक अलौकिक शक्ति संचार करूं लागते. निर्बलांस बल देणारी, मूढांना अक्कल शिकविणारी आणि दुष्कर कृत्येंही सुगम भासविणारी अशी ती शक्ति आहे. मनानें जें कार्य दुर्घट ठरविलें तें जर तडीस जाण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं तर ती देवाची कृपा ! असें आपण समजतों. पण तीं सुचिन्हेंही साहसावर अवलंबून असतात हें आमच्या लक्षांत येत नाहीं. आणि ‘देवाची कृपा असेल तर आमची कार्यसिद्धि होईल !’ असा आम्ही सर्वथैव देवावर हवाला टाकून—आमच्या हातून होण्यासारखीं सुद्धां आम्हीं कामें न करितां—पाय असून चालतां येत नसावें अथवा हात असून निरुपयोगी व्हावें अशांतल्या स्थितीप्रमाणें स्वस्थ बसून राहतों ! पण ही आमची मोठी चूक आहे. आपणाला फार भूक लागली आहे आणि आमचा तर मूळपासून नामदेवासारखा ( पण त्याच्या लायकीचा नव्हे हो ! ) देवावर हवाला. देवाला म्हटलें:—“ देवा ! तुझ्यावर आमचा हवाला. तूं आमचें जेवणाचें ताट पंचपक्वान्नांनीं भरून आमच्या पुढ्यांत आणून ठेविलेंस तर आम्ही आज जेवणार ! नाहीं तर आपलें उपोषण ठरलेलें ! ! ” यावर देव म्हणेल:—“ राहिनास लेका उपाशीं ! आळशीच तूं, तुझी गत अशीच व्हावयाची ! चांगलें पोटांत चुरचुरलें आणि भुकेनें जीव कासावीस होऊन ‘ मरतों कीं उरतों’ अशी स्थिति झाली म्हणजे आपोआप चूल पेटविशील ! ‘ आपणाला सैंपाक करतां येत नाहीं तरी बघूं या काय होतें तें.’ असें म्हणून धीटाईनें जर त्या उद्योगास लागतास तर कोणाच्याही रूपानें आणि कसेंही तरी तुला मीं साह्य केलें असतें. पण त्यांतलें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. तेव्हां खुशाल उपाशीं मर ! मजकडून कांहीं ताट येत नाहीं. ” यावरून असें सिद्ध होईल कीं साहस करणाऱ्यानें ‘ आपणांस ईश्वराचें पाठबळ आहे ’ असें मानण्यास कोणचीच हरकत नाहीं. मात्र साहसाला असणाऱ्या ईश्वराच्या पाठिंब्याचा फायदा सदसद्विचार करूनच मिळविला पाहिजे. नाहींपेक्षां ‘ एक करतां बेक ’ होण्याचा फार संभव आहे. ‘ साहसाला ईश्वराचा पाठिंबा ’ जर नसेल तर अशा कांहीं चमत्कारिक गोष्टी जगांत दृष्टोत्पत्तीस येतात कीं, जेणेंकरून वरील गोष्ट सत्यच मानावी लागते. समजा, एकानें गुन्हा करण्याचें साहस केलें तर परमेश्वर त्याला त्याच वेळीं ही गोष्ट वाईट आहे असें समजून शिक्षा देत नाहीं. जर देता तर निखाऱ्यास पाय लागण्याबरोबर ‘ हाय ’ म्हणून जसा मनुष्य मागें सरतो अगर त्याला भिऊन राहतो, तसा तो गुन्ह्याला भिऊन वागता व त्याच्याकडून

कधीं गुन्हा घडला नसतो. अलीकडे प्रत्यक्ष गुन्हा असला तरी तो गुन्हा ठरत नाहीं. जेव्हां साक्षीपुरावे व्हावे व गुन्हा शाबीत व्हावा त्याच वेळीं तो दंडास पात्र होतो. या वाईट गोष्टीपासून त्याला शिक्षा मिळाली तर मिळते खरी; पण ' साहसाला ईश्वराचा पाठिंबा असतो ' एवढें सिद्ध होतें. व तो लोकांच्या उपहासास आणि स्वतःच्या दुःखास कारणीभूत होतो हें विसरतां कामा नये. विषाचा प्रताप माहीत असतां मुद्दाम विषप्राशन करण्याचें धाडस कोणी मूर्ख करूं लागला तर त्या धाडसाचें फल जें मरण तें तो प्राप्त करून घेऊन त्या वाईट कृत्यांत एका अर्थी यशस्वीच होतो. त्याला मरणाची अपेक्षा होती ना ? झालें तर मग; त्यानें विषप्राशनाच्या धाडसानें आपलें साध्य साधून घेतलें. पण, त्याचें हें साहस अज्ञानमूलक होय, म्हणून तें सर्वथा गर्हणीय आहे. शंकरासारख्या सुरपूजितानें समुद्रमंथनाच्या कालीं त्रैलोक्याला भस्मसात् करण्याची शक्ति असलेलें—हाल हाल करून सोडणारें—हालाहल विष परोपकारार्थ प्राशन करण्याचें साहस केलें. तें त्याला म्हणूनच पचलें—त्या विषापासून त्याचा अंत झाला नाहीं—तरी पण त्या दुर्धर विषाचा प्रचंड दाह शमन होण्यासाठीं मोठमोठे भुजंग, पृथ्वीला भेदणारा गंगौघ इ० धारण करण्याचें साहस करावें लागलें आणि अन्तीं रामनामोच्चार पाठानें त्याला शान्ति मिळाली. तसेंच, त्याच्या विरुद्ध—अमृतोपम सुखोत्पत्ति प्राप्त करून घेण्याच्या साहसानें—आरंभिलेल्या कृत्यांतही विजयी झालेले आढळतील. त्या साहसांत आणि या साहसांत जमीन अस्मानाइतकें अंतर आहे. तें गर्हणीय तर हें प्रशंसनीय, आणि तें जितकें निंद्य तितकेंच हें श्रेयस्कर ! पांच वर्षांच्या ध्रुवानें सुरुचि नामक सावत्र आईच्या दुर्वाक्यानें संतापून परमेश्वरप्राप्त्यर्थ तपोवनांतील समस्त क्लेश सहन करण्याचें धाडस केलें व ईश्वरानें त्यास अढळपद देऊन त्याचें चीज केलेंही.

युरोपांतील चालू महायुद्धावरूनही आमच्या तत्वास चांगली बळकटी येते. हिंदी वीरांनीं लढाईवर जाण्याचें जें अप्रतिम साहस केलें त्यांत त्यांना परमेश्वरानें साहाय्य केलें म्हणून तर त्यांचा यशोदुंदुभी साऱ्या पृथ्वीतलावर दुमदुमून राहिला आहे. " आपण आतां रणांगणावर गेल्यावर प्रतिपक्ष्याकडील हृदयाचें पाणी करून सोडणारे तोफांचे लालभडक गोळे ऑ पसरून येतील, संगिनीच्या माऱ्यानें देहाचे राइएवढाले तुकडे होतील, अथवा विषारी धुरानें जीव गुदमरून मरून जाऊं ! " अशी कोणचीच भीति न बाळगितां त्यांनीं निधड्या छातीनें तिथें जाऊन जें साहस केलें तें पाहून परमेश्वरानें त्यांस साहाय्य केलें तर त्यांत नवल कसचें ? तें एक त्याचें ब्रीदच आहे.

साहस करण्याविषयीं मनाची तेवढी तयारी असणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. ज्या वेळीं लोकप्रीति उद्भवेल, राजभक्ति बाणेल किंवा कोणच्याही कार्याबद्दल विशेष कळकळ वाटेल त्याच वेळीं साहस करण्याकडे मनाची प्रवृत्ती होते. लोकप्रीति उद्भवणें, राजभक्ति बाणणें अगर कोणच्याही स्तुत्य कार्याबद्दल विशेष कळकळ वाटणें हे लोकोत्तर गुण फारच थोड्यांच्या अंगीं वसत असतात.


साहसामुळें लोकांत उपहास होतो ( लोक बऱ्यास हंसतात आणि वाइटास तर हंसावयाचेच. ) पदरमोड करावी लागते व आपल्या इतर व्यवधानांसही केव्हां केव्हां अर्धचंद्र द्यावा लागतो. अशी सर्वस्वीं झीज सोसावी लागते; पण आपण एक सत्कार्य करीत आहों ही भावना मनांत ठेवून तें सारें सहन केलें पाहिजे. म्हणजे हीच एक प्रकारची तपश्चर्या होऊन त्याचें फल जें आपलें उद्दिष्ट कार्य तें परमेश्वर सफल करितो. त्यामुळें आपल्या कृतश्रमाचें सार्थक्य झालेंसें वाटून जें समाधान प्राप्त होतें तें अवर्णनीय आहे.

जे दुर्बल असतात त्यांच्या तोंडांतून ' हें कार्य आपल्याकडून पार पडेल काय ? ' ' मनाप्रमाणें सिद्धीस नच गेलें तर पुढें कसें काय होईल ? ' इ० भागूबाईचे उद्गार निघत असतात. म्हणून ज्यांस आपली उन्नति करून घ्यावयाची असेल,स्तुत्य कार्याची

अभिरुची असेल, अथवा व्यावहारिक सुखाची अभिलाष असेल, त्यांनीं नुसते मनांतले मांडे मनांत भाजून खाण्यासाठीं आतुर होतां कामा नये. कारण ते जसे कल्पित मांडे तसेंच तें कल्पित खाणें होऊन राहील; तेव्हां त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे; अर्थात् साहसीच बनलें पाहिजे ! तरच परमेश्वराचें पाठबळ मिळून कार्यें फलद्रूप होतील ! !

# नौ-उच्चालक-यंत्र.


पाण्याच्या भारानें मोठमोठीं जहाजें उचलून इच्छित स्थळीं पोंचविणारी यंत्रसामुग्री सध्यां बऱ्याच ठिकाणीं उपयोगांत आणली जात आहे. त्यापैकीं कानडा प्रांतांतील पीटरबरो येथें अशा प्रकारचीं जीं यंत्रें आहेत तेवढीं मोठीं जगांत इतरत्र कोठेंही नाहींत असें म्हणतात. ही यंत्रसामुग्री म्हणजे दोन भल्या मोठ्या पोलादी पेट्या एका भक्कम दांडीवर बसविलेल्या आहेत. ज्या पेटींत वजन भरावें ती पेटी खालीं जाते व दुसरी वर येते. या साध्या सिद्धांतावर या अजस्र उच्चालकाची रचना केली आहे. उच्चालक म्हणजे मोठमोठीं जहाजें उचलणारें यंत्र. रस्त्यानें आपण लहान मुलांना घेऊन फिरावयास जात असतांना



उच्चालक-पेटींत घातलेलें जहाज उंचावरच्या पाणसळीवर पोंचलें आहे.

एखाद्या ठिकाणीं एकदम उंच टेकडी, मोठा खळगा किंवा दुसरी कोणतीही अडचण उपस्थित होऊन मुलांना कांहीं वेळ कडेवर घेऊन पलीकडे पोंचविणें भाग पडतें. अशांतलाच प्रकार मोठमोठ्या जहाजांचा असतो. मोठमोठ्या महासागरांतून हीं जहाजें खुशाल पोहत जातात. मध्यंतरीं कालवे करून वाट दिली तरी त्या मार्गानें तीं जाऊं शकतात. पण जर त्या कालव्यांत एखादी टेकडी ओलांडून पलीकडे जावयाचें असेल तर मात्र तें या जहाजांना अशक्य असतें. अशा प्रसंगीं त्या जहाजांना कडेवर घेऊन पलीकडे पोंचविलें पाहिजे. हल्लींच्या प्रचंड जहाजांना कडेवर घेण्याचें सामर्थ्य अर्थातच मनुष्यांस शरीरानें करतां येणें शक्य नाहीं. पण बुद्धीच्या जोरावर त्यानें जी यंत्ररचना केली आहे, तिच्या योगानें हें काम सुलभ झालें आहे. या यंत्ररचनेस देखील मोठी अगाध बुद्धि पाहिजे असें नाहीं. कित्येक मुलें एका लांकडी ठोकळ्यावर लांब फळी ठेवली असेल तर दोन टोकांस दोन मुलें बसून आळीपाळीनें भार घालून क्रमानें एकेक बाजू वर-खालीं करून 'घोड्याचा' खेळ खेळतात, हें पुष्कळांच्या पाहण्यांत असेलच. फळीच्या टोकांस बसणाऱ्या दोन मुलांच्या जागीं दोन मोठ्या भक्कम पोलादी पेट्या आहेत व

त्यापैकीं एक पेटी जमीनीस टेकलेली आहे अशी कल्पना करा. त्या पेटीचें दार उघडून रस्त्यानें वाहणारें पाणी किंवा त्यांतून वहात येणारी कागदाची नाव त्या पेटींत घेतां येईल हें उघड आहे. नाव पेटींत आल्यानतर पेटीचें दार पुनः बंद करावें म्हणजे ती नाव पेटींत अडकून राहील. आतां नाव आंत असलेली पेटी जड असल्यामुळें खालीं झालेली आहे व दुसऱ्या बाजूची पेटी रिकामी, म्हणजे हलकी असल्यामुळें उंचावर आहे. आतां रिकामी पेटी सबंध पाण्यानें भरली असें समजा. अर्थात ती जड होऊन एकदम खालीं येईल व त्याबरोबरच नावेची पेटी उचलली जाईल. अशा रीतीनें ६५ फूट उंचीवर मोठमोठीं जहाजें उचलून धरून त्या उंच प्रदेशावरून वाहणाऱ्या कालव्यांत तीं सोडण्यांत येतात. वरच्या कालव्याच्या सपाटीपर्यंत हीं जहाजें उचललीं गेल्यावर पेटीचा दरवाजा उघडून वाट दिली कीं हीं जहाजें आपोआप नव्या कालव्यांत प्रवेश करून सुखानें पोहूं लागतात. पण मधली वाट उंचवट्याची असल्यामुळें त्यांना पेटींत घालून १२ मिनिटें कोंडून ठेवावें लागतें. दुसऱ्या पेटींत पाणी भरून वोटीस कोंडून ठेवलेलें पारडें वर होऊं लागलें म्हणजे एकदम दीड मिनिटांत ६५ फूट उंचीवर जातें. त्यावेळीं बोटींतील लोकांना, 'घोड्याचा' खेळ खेळणाऱ्या लहान मुलांप्रमाणें मोठी गंमत वाटते. हा सर्व बुद्धीचा खेळ आहे !



जहाज आंत असलेली पेटी वर येत आहे व दुसरी खालीं जात आहे.


# भुताटकीचा प्रकार.

बहुतेक भुताखेतांच्या व पिशाच्चबाधेच्या गोष्टी भिऱ्यांच्या कल्पनातरंगावर किंवा लबाड लोकांच्या गौडबंगालावर अवलंबून असतात. त्यांत बिलकूल सत्याचा अंश नसतो. तथापि हजारांत एखादी भुतासंबंधीची गोष्ट अशी असते कीं तेथें चांगल्या चांगल्या शहाण्या लोकांची मति गुंग होते हें कबूल करावें लागेल. ही भूतबाधेची समजूत आमच्याच देशांत आहे असें नाहीं, तर ती जगभर सर्व देशांतून कमीजास्त प्रमाणांत आढळते. त्यांपैकीं मलाया द्वीपकल्पांतील रहिवाशांच्या व चिनी लोकांच्या समजुती हिंदी लोकांच्या समजुतीशीं फार जुळत्या आहेत हें पुढें दिलेल्या गोष्टीवरून आढळून येईल.

मॅले व चिनी लोकांच्या मतें कित्येक झाडांवर पिशाच्चांची वस्ती असते. हीं झाडें ओळखणें फार सोपें असतें; कारण त्यांच्या मुळाशीं किंवा फांद्या फुटल्या असतील त्या सांध्यावर उदवत्त्या किंवा उदाच्या

कांड्या कोणी तरी खुपसलेल्या असतात किंवा रंगीत कापडाचें निशाण लावलेलें असतें. असलें एक झाड सिंगापूर येथें स्टांफोर्ड रस्त्यावर आहे आणि त्या झाडावरील पिशाच्चानें दोन वर्षांपूर्वी एक अद्भुत दाखला आणून दिला तो असा. ली खिया ग्वान नांवाचा एक तरुण चिनी थोड्या दिवसांपूर्वी इंग्लंडमध्यें केंब्रिज येथील विश्वविद्यालयांतील शिक्षण पुरें करून सिंगापुरास आला होता. तो आपल्या मित्रमंडळीबरोबर फिरावयास गेला असतां त्या पिशाच्च वस्तीच्या— झाडाजवळ आला. तेथें धूप जळत असलेला पाहून लोकांच्या देवभोळेपणाच्या समजुतीबद्दल त्याला हसूं आलें आणि त्यानें लाथाडून त्या उदबत्त्या पाडल्या व तुडवून टाकल्या. नंतर तो स्नेह्याबरोबर बोलत पुढें चालला. एका मित्रानें सहज त्याच्या कृत्यावर टीका केली. तो म्हणाला "तुमचा विश्वास नसेल; पण त्यांत कांहीं अर्थ असण्याचा संभव आहे. मी असल्या झाडांच्या वाटेस जात नाहीं; कारण अशा झाडांची कोणी चेष्टा केल्यास त्यांचें कांहीं तरी नुकसान होतें अशा अर्थाच्या बऱ्याच गोष्टी मीं ऐकल्या आहेत."

चिनी तरुण हें ऐकून हसून म्हणाला " झाडांवर भुतें राहतात या गोष्टीवर फक्त अडाणी मजुरांचा मात्र विश्वास आहे. इतर कोणाचाही नाहीं; त्यांतल्या त्यांत युरोपियनांचा तर मुळींच नाहीं. " हें बोलणें झाल्यानंतर तीन दिवसांनीं तो चिनी गृहस्थ मोटारींत बसून दुसऱ्या गांवास निघाला. रस्ता त्या भूतबाधेच्या झाडाजवळूनच होता. त्या खालून मोटार चालली, इतक्यांत त्या झाडाची एक भली मोठी फांदी मोडून नेमकी त्या मोटारीवर इतक्या जोरानें पडली कीं, तो चिनी जागच्याजागीं ठार झाला व मोटारीचा पुढचा भाग मोडून गेला ! त्या फांदीस वाळवी लागली असेल म्हणून चांगली लक्षपूर्वक पहाणी केली पण तशांतला कांहीं एक प्रकार आढळून आला नाहीं. वाऱ्याची सबब सांगावी तर ती सकाळची वेळ होती. अर्थात हवेंत यत्किंचित् हालचाल नव्हती. मग ती खालीं कां पडली असावी याचें कारण शोधून काढणें कठीण आहे !



**मोटार झाडाखालून चालली असतां एक भली मोठी फांदी मोडून पडली.**

अशाच जातीचा आणखी एक प्रकार मलाका बेटांत थोड्या वर्षांपूर्वी घडला.

जंगल तोडून रबराची लागवड करावयाची असली म्हणजे मॅले, जाव्हानी किंवा आपल्या इकडले तामिली मजूर मलाका बेटांत कामास लावतात. ते झाडें तोडीत असतां मध्येंच एखाद्या झाडाविषयीं भूतबाधेचा संशय येऊन तें तसेंच ठेवतात. मग तें झाड तोडण्यास बरेच पैसे देण्याची लालूच दाखवावी तेव्हां एकादा मजूर तयार होतो. अशा प्रकारचें एक झाड तोडण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न झाला; पण कोणी कबूल होईना. शेवटीं मोठ्या माराकुटीनें बारा तामिली मजुरांनीं त्या झाडा-

सभोंवतीं लांकडें रचून व वर राकेल तेल ओतून तें झाड जाळून टाकण्याचें कबूल केलें. लांकडें रचण्याचें काम चाललें असतां एक ओंडका एका मजुराच्या खांद्यावर पडला व त्याला जबर दुखापत झाली. शेवटीं आग लावतांच, ज्यानें काडी पेटविली होती त्याच्या हातास एक नागसर्प डसला, आणि वाटेल तितकें राकेल ओतलें तरी तें झाड पेटेना !

दुसरे दिवशीं सकाळीं मालकानें तें झाड तोडून काढण्याविषयीं त्या तामिली लोकांचें मन वळविलें व त्यांनीं तें झाड शेवटीं एकदां तोडलें. पण तो बुंधा खालीं पडला तो एका मजूराच्या अंगावर ! व तो मेला नाहीं तरी त्याचे हातपाय मोडले !

तिसरे दिवशीं कोणीच मजूर कामावर आला नाहीं. चौकशी केल्यावर मजूर आजारी आहेत असें कळलें. पण ही सबब मामुली वहिवाटीप्रमाणें लबाडीची असावी असा मालकाला संशय आल्यामुळें त्यानें आपल्या डाक्टरास मजुरांच्या घरीं जाऊन तपास करण्यास सांगितलें. त्या युरोपियन डाक्टरानें समक्ष जाऊन पाहिल्यावर सौतहीं मजूर इतके आजारी असल्याचें त्याला आढळून आलें कीं, त्यांना उपचारासाठीं इस्पितळांत नेण्याचा हुकूम देणें भाग पडलें. यानंतर वाटेल तितकी मजूरी देऊं केली तरी तें झाड तोडण्यास कोणीही कबूल होईना.

वर सांगितलेली अनर्थ-परंपरा एवढ्यावरच संपली नाहीं. कारण तो डाक्टर व मालक मजुरांना तपासून परत घराकडे चालले असतां ज्या झाडाकरितां हा सर्व खटाटोप चालला होता त्या झाडाशेजारीं पोंचले तेव्हां मालकाचा पाय एका केळ्याच्या सालावर पडला; आणि तो घसरून एका दगडावर आपटला व त्याचा एक हात मोडला !

यानंतर महिन्या दीडमहिन्यांत त्या मालकाची बायको, मुलगा, गडी व मोलकरीण हीं सर्व माणसें फार आजारी पडलीं. सारांश; त्या भुताटकीच्या झाडाशीं ज्याचा ज्याचा प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें संबंध होता तो तो इसम आजारानें जमीनदोस्त झाला. पण तो वृक्ष मात्र ताठ उभा आहे. तो तोडून काढण्याचा विचार मालकानें अजीबात सोडला आहे. कारण तोडण्याचा हुकूम सोडण्यास मालक तयार नाहीं व हुकूम सोडला तरी मजूर कामास लागण्यास तयार नाहींत. हा मालक युरोपियन गृहस्थ आहे एवढें सांगितलें म्हणजे ही गोष्ट अगदींच अविश्वसनीय आहे असें म्हणतां येणार नाहीं. हें आमचें मत वाचकांना ग्राह्य होईल असें वाटतें. युरोपियन लोक बरेच विचक्षण असल्यामुळें ते चांगली चौकशी न करतां असली हकीकत सहसा प्रसिद्ध करणार नाहींत. ही सर्व हकीकत टिसडेल नांवाच्या एका सिंगापूरनिवासी गृहस्थानें ' वाइड वर्ल्ड मॅगझिनमध्यें ' दिली आहे.

# पृथ्वीचें वय.

पृथ्वीचें वय काय असावें याबद्दल अनेक तर्क चालू आहेत. त्यांपैकीं एकाची विचारसरणी अशी आहे. अगदीं प्राचीन काळीं म्हणजे प्रथम समुद्र अस्तित्वांत आला त्यावेळीं तो गोड्या पाण्याचा असला पाहिजे; असें गृहीत धरून त्यांत आज जें क्षाराचें प्रमाण आढळतें तितकें जमण्यास किती काळ लागला असेल हा मुख्य प्रश्न आहे. पृथ्वीवर सध्यां जे पर्वत आहेत ते थराच्या स्वरूपाचे आहेत व त्यांत फारसे क्षार नाहींत; पण प्राचीन काळचे बहुतेक पर्वत ज्वालामुखीनें वर आलेल्या जळजळीत रसाचे बनलेले असल्यामुळें त्यांत क्षार अधीक होते. या फरकामुळें प्रथम पावसानें समुद्रांत जमिनीवरच्या क्षाराची जितकी भर पडत होती

तितकी आतां पडत नाहीं. पण या विचारसरणींत पृथ्वीवर एक हिस्सा जमीन व तीन हिस्से पाणी हें प्रमाण पहिल्यापासून आहे असें गृहीत धरावें लागतें. ही गोष्ट गृहीत न धरावी तर गणीतास कोणतीच राशी स्थिर न सांपडल्यामुळें प्रश्न सोडविणें अशक्य होईल; म्हणून ही गोष्ट गृहीत धरून पृथ्वीस आजचें स्वरूप प्राप्त होऊन जवळ जवळ १० कोटी वर्षें झालीं असावीं असें शास्त्रज्ञ म्हणतात.

# सिंहासंबंधीं खऱ्या गोष्टी.

सध्या हिंदुस्थानांत काठेवाडखेरीज इतर कोणत्याही भागांत सिंह आढळत नाहींत; आणि काठेवाडांत तरी परवानगीवांचून शिकार करावयाची नाहीं असा प्रतिबंध असल्यामुळेंच ते शिल्लक राहिले आहेत. आफ्रिकेंत देखील पूर्वीच्या मानानें त्यांची संख्या पुष्कळ कमी झाली आहे. तरी शिकारी लोकांची हौस पूर्ण होण्याइतके सिंह अद्याप तेथील जंगलांत आहेत; व पुढें दिलेल्या सर्व गोष्टी आफ्रिकेंतील सिंहांसंबंधीं विश्वसनीय लोकांनीं लिहून ठेवलेल्या हकीकतींवरून दिल्या आहेत.



सिंहाचें जोडपें व त्यांचें नैसर्गिक वसतिस्थान.

साधारणपणें शिकारी लोकांची व सिंहाची दिवसा गाठ पडली तर सिंह होतां होईतोंवर पळून जातो; पण रात्रीं आपणहून मनुष्यावर चाल करून जातो. सिंह म्हातारपणींच मनुष्यावर हल्ला करतो, तोंपर्यंत मनुष्याच्या वाटेस जात नाहीं अशी आजपर्यंत समजूत होती; पण आफ्रिकेंतील अलीकडच्या अनुभवावरून भक्ष्य मिळण्याची खात्री व सवड असली

म्हणजे कोणताही सिंह मनुष्यावर झडप घालण्यास मागें-पुढें पहात नाहीं असें म्हणावें लागतें.

सात आठ वर्षांपूर्वी अमेरिकेचे माजी अध्यक्ष मि. रूजवेल्ट आफ्रिकेंत सिंहाची शिकार करण्यासाठीं गेले होते. त्यांनीं केलेल्या शोधावरून गेल्या ४० । ५० वर्षांत शेंकडों गोरे व हजारों काळे लोक आफ्रिकेंत सिंहांच्या भक्ष्यस्थानीं पडले आहेत; आणि रेडे, हत्ती व गेंडे यांची तर गणतीच नाहीं.



आफ्रिकन सिंह.

पूर्व आफ्रिकेंतील एका भागांत प्रे. रूजवेल्ट यांना सिंहांनीं जखमी केलेलीं पुष्कळ माणसें भेटलीं. त्यांच्या तोंडून ज्या गोष्टी त्यांना ऐकण्यास सांपडल्या त्यांतील कांहीं येथें देऊं.

दोघे इसम घोड्यांवर बसून एका जंगलांतून जाणाऱ्या वाटेनें चालले होते. इतक्यांत एका सिंहानें येऊन एकाच्या अंगावर झडप घालून त्याला खालीं पाडलें व जोराचा चावा घेतला. दुसरा इसम त्याला सोडविण्याकरतां मदतीस जावयाच्या विचारांत होता; इतक्यांत त्या सिंहानें त्याच्या अंगावर उडी मारून त्याला घोड्यावरून खालीं पाडलें व तीन चार मिनिटांत त्याचे प्राण घेतला. पण या अवधींत पहिला मनुष्य जखमी झाला होता तरी त्यानें मोठ्या धैर्यानें बंदूक झाडून त्या सिंहास ठार केलें. हा मनुष्य पुढें बरींच वर्षें वांचला; पण कायमचा पंगु बनला.


कॅपटन स्लेटर शिकारीस गेला असतांना एका सिंहावर बंदूक झाडली. गोळी सिंहास लागली पण ती वर्मस्थानीं लागली नाहीं. यामुळें तो चवताळून स्लेटरवर धांवून आला व सिंहानें त्याला खालीं पाडलें. इतक्यांत हातांत बंदूक घेऊन धांवणारा एक आफ्रिकन त्याला दिसला. त्याबरोबर त्यानें स्लेटर यास सोडून आफ्रिकनाकडे धांव घेतली; व त्याला गांठून मागल्या दोन पायांवर उभे राहून त्या सिंहानें पुढल्या दोन पायांनीं त्या मनुष्याला पकडून ठार केलें.

झिब्रा अंगावर पट्टे असलेला घोडा सिंहाला फार आवडतो. एकदा एका झिब्रास पाहतांच सिंहाला इतकी घाई झाली कीं, त्यानें त्याच्या अंगावरच उडी घेतली; झिब्रा सिंहाच्या वजनानें तत्काळ खचला; त्याचे चारी पाय चार दिशेस फांकून पोट जमिनीस लागलें; इतक्यांत सिंहानें त्याची मानगुटी धरून असा जोराचा हिसका दिला कीं, तो बिचारा तत्काळ प्राणास मुकला.

उगांडा प्रांतांत एकदा कांहीं मंडळी शिकारीस गेली. रात्रीं तंबू ठोकून जंगलांत राहण्याचें ठरलें. इतर सर्व मंडळी निजली व एक शिपाई बाहेर पहारा करीत

दरवाज्यापाशीं फिरत होता. पण त्याचा डोळा चुकवून कांहीं आवाज होऊं न देतां एक सिंह तंबूत शिरला व एका निजलेल्या मनुष्यास धरून ओढूं लागला. तेव्हां त्या मनुष्यानें जी धडपड व आरडाओरड केली त्यामुळें शेजारची मंडळी जागी झाली व धांवून आली; तेव्हां तो सिंह त्या मनुष्यास तेथेंच टाकून पळून गेला. त्या जखमी मनुष्याची जखम धुऊन व औषध लावून त्याला अंथरुणांत निजविण्यांत आलें. इतर मंडळीही झोंपी गेली. एक दोन तासांनीं सिंह परत आला; तंबूंत शिरला; आपलें भक्ष्य-तो जखमी मनुष्य-आपल्या जबड्यांत धरलें व इतर लोक जागे होतात न होतात तों त्याला घेऊन जंगलांत पार निघून गेला.

अगदीं पेचांत सांपडला व निरुपाय झाला म्हणजे उंदरासारखा क्षुद्र प्राणी देखील मांजरावर उलटूं शकतो असें कांहीं लोक म्हणतात. पण सिंहास जखम झाली कीं तो उलटतो; व वाटेल तेवढा धीटपणा दाखवितो. शिकारी मनुष्य पळून जाणाऱ्या सिंहावर गोळी घालील व ती त्याला अर्धवट लागेल तर तो पळून न जातां शिकारी मनुष्यावर उलट चालून येतो. वाघ निःशस्त्र मनुष्यावर मात्र दिवसां हल्ला करतो. पण सिंह भुकेनें अगदीं व्याकूळ झाला नसेल तर पुष्कळ वेळा आपण-हून मनुष्याच्या वाटेस जात नाहीं. अशा रीतीनें सिंहाच्या तडाक्यांतून बचावलेलीं बरींच माणसें आहेत.



**सिंहीण व तिचीं पिलें शिकार फाडून खात आहेत.**

पर्सी-रीड नांवाचा एक गृहस्थ शिकार करण्याकरतां एकदा पुष्कळ गवत वाढलेल्या जंगलांतून चालला होता. इतक्यांत त्याला एका प्राण्याचें डोकें हालतांना दिसलें; त्याच्या समजुतीनें तो हरीण असावा. त्यानें विशेष लक्ष न देतां एकदम बंदूक झाडली. ती त्या प्राण्यास लागली नाहीं. त्याबरोबर तो धांवून आला तेव्हां तो सिंह आहे असें रीड यास कळून आलें; व शिवाय त्याच्या मागोमाग तीन सिंहिणी आहेत असेंही दृष्टीस पडलें. रीडजवळच्या गोळ्या बहुतेक संपत आल्यामुळें त्याचा उपाय चालण्याजोगा नव्हता. तो शांतपणें सिंहाकडे पहात राहिला. थोडा वेळ त्या सिंहांनीं त्याच्याकडे टक लावून पाहिलें; व नंतर मुकाट्यानें ते सिंह आल्या वाटेनें परत निघाले. शंभर दीडशें पावलें गेल्यावर ते सिंह थांबले व त्यांनीं मागें वळून पाहिलें. नंतर त्यांपैकीं एक सिंहीण रीडकडे धांवत येऊं लागली. रीडजवळ फक्त एक गोळी होती; तेव्हां त्यानें असा विचार केला कीं ही सिंहीण अगदीं जवळ आल्यावर ही झाडावी, नाहींतर नेम चुकण्याचा संभव आहे. या विचारानें तो निश्चलपणें होता त्या जागीं उभा राहिला. त्या निश्चलपणाचें सिंहिणीस आश्चर्य वाटलें असावें. कारण रीडपासून वीस पंचवीस पावलांपर्यंत ती धांवत आली आणि नंतर ती एका बाजूस निघून गेली. जातांना मध्यें मध्यें थांबून रीडकडे पहात असे; व पांच चार वेळां ती गुरगुरलीही! शेवटीं ती दिसेनाशी झाल्यावर रीड परत घरीं गेला. रीडनें त्या सिंहिणीस गोळी घालून मारलें असतें तर सगळे सिंह पळून गेले असते; पण ती गोळी मर्मस्थानीं लागली नसती तर त्या सिंहिणीच्या मदतीस इतर सिंह आले असते व रीडचा शेवट झाला असता असा मृगयाशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे.

पण हा नियम सर्व प्रसंगास लागू पडत नाहीं. कारण मनुष्याप्रमाणें प्रत्येक सिंहाचा स्वभाव भिन्न असतो; व तो आपल्या लहरीस लागेल तसें वागतो.

क्यूमिंग नांवाचा एक गृहस्थ एकदा शिकारीस गेला असतां त्याची दोन मोठ्या सिंहिणींशीं गांठ पडली. त्यानें जवळच्या सिंहिणीवर गोळी झाडली; व पुनः एक वेळ बार उडवावा म्हणून पाहूं लागला तो बंदुकींत दुसरी गोळी नाहीं. पहिली गोळी सिंहिणीस ओझरती लागली. त्याबरोबर ती परतून रागानें शेपटी जमिनीवर आपटीत क्यूमिंगवर चालून आली. दुसरी सिंहीण भिऊन पळून गेली. आपल्यावर चाल करून येणाऱ्या सिंहिणीचें उग्र स्वरूप पाहून व आपणाजवळ तिला मारण्याचें शस्त्र नाहीं असें दिसून आल्यावरून क्यूमिंगनें एक अखेरीचा उपाय योजिला. त्यानें आपली बंदूक दोन्ही हातांत उंचावर काठीप्रमाणें धरली व किंचाळ्या फोडीत तोंडास येईल ते शब्द ओरडूं लागला सिंहीण क्षणभर थबकली, क्यूमिंग अत्यंत संकटांत सांपडला होता; पण भिऊन कांहीं उपयोग नाहीं असें दिसून आल्यापासून त्यानें डोकें शांत ठेवून तिला भिवविण्याचा प्रयत्न चालविला. सिंहीण थोडा वेळ थांबून सावकाश पुढें येऊं लागली. क्यूमिंग चार पावलें मागें हटला व पुनः ओरडूं लागला. ती थोडा वेळ थांबत व चार पावलें टाकीत पुढें येई व क्यूमिंगनें जलदीनें मागें हटून बरेंच अंतरावर जावें आणि तिचा जोर दिसला म्हणजे मोठ्यानें ओरडावें असें करीत तो पार पडला.



माणसाळलेले वाघ व सिंह यांच्या पाठींवर सर्कशींतील मनुष्य लोळत आहे.

हीं सर्व उदाहरणें दिवसा उजेडीं सिंह कसा वागतो याबद्दलचीं आहेत. पण रात्रीं त्याचें स्वरूप उग्र असतें; त्यांत तो भुकेनें व्याकुळ झाला असला म्हणजे तर बोलण्याची सोयच नसते. तो वाटेल तें धाडस करण्यास तयार होतो. अशा वेळीं त्याला धरण्याचा प्रयत्न करणें फार धोक्याचें असतें. उगांडा रेल्वे बांधण्याचें काम चाललें असतां किऊ नांवाच्या गांवाजवळ एका सिंहास माणसाच्या रक्ताची चट लागली होती; त्यानें कित्येक मजूर मारले; तेव्हां तीन युरोपियनांनीं त्याची शिकार करण्याचें ठरवून सर्व तयारी केली. तिघांपैकीं एक इंग्रज, दुसरा जर्मन वकील व तिसरा इटालियन गृहस्थ होता. रात्रीं ते एका मोठ्या आगगाडीच्या डब्यांत सर्व सामुग्री घेऊन निजले. या डब्याला जोडून आफ्रिकन नोकरांकरितां दुसराही एक डबा होता. बराच वेळ वाट पाहिली तरी सिंहाचा पत्ता लागेना व सर्वांना झोंप येऊं लागली. तेव्हां जर्मन व इटालियन गृहस्थांनीं निजावें व इंग्रजानें कांहीं वेळ जागत रहावें असें ठरलें. जर्मन गृहस्थ डब्यांत झोंप घेण्यासाठीं केलेल्या जागीं निजला व इतालियन डब्यांत बाकाखालीं असलेल्या जागीं आडवा झाला. हा वेळपर्यंत सिंहाचा मागमूस देखील नव्हता. सर्वत्र अगदीं शांतता होती. मात्र इंग्रज गृहस्थ आपल्या सोबत्यांना उद्देशून एवढें बोलला कीं, "आज आपल्या डब्याजवळ फारच मोठे काजवे उडत आहेत व त्यांचें तेज फार विलक्षण आहे; आणि अर्धवट चांदण्यांत चकाकणाऱ्या रेल्वे रुळावर उंदीर इकडून

तिकडे व तिकडून इकडे उड्या मारतांना मीं दोन चार वेळा पाहिले." खरा प्रकार असा होता कीं, ते 'काजवे' म्हणजे सिंहाचे डोळे व 'उंदीर' म्हणजे सिंहाच्या हालचाल करणाऱ्या शेपटीच्या केंसाचा झुबका होता. वर सांगितल्याप्रमाणें कोठेंच गडबड दिसत नसल्यामुळें जर्मन व इटालियन गृहस्थांना झोंप लागली. इंग्रज गृहस्थानें जागण्याचें कबूल केलें होतें. तेव्हां एका उघड्या खिडकीकडे तोंड करून व दुसऱ्या उघड्या खिडकीकडे पाठ करून तो खुर्चीवर बसला होता. त्यालाही दैववशांत डुकली आली. थोड्या वेळानें डब्यांत 'धाडधाड' असा मोठ्यानें आवाज झाला. सर्वजण जागे होऊन पहातात तों ज्या सिंहास मारण्याकरितां आपण आलों तोच आपल्या समाचारास खिडकींतून उडी मारून डब्यांत आला आहे. व त्यानें इंग्रज गृहस्थास खालीं पाडून त्याला एका पंजानें व इतालियनास दुसऱ्या पंजानें दाबून धरून त्यांना उठूं देत नाहीं असें आढळून आलें. सिंह व त्याच्या पंजाखालीं सांपडलेले गृहस्थ यांची झटापट सुरू झाली तेव्हां डबा हालूं लागला व त्या हादऱ्यानें वर निजलेला जर्मन खालीं घसरला. त्याच धांदलींत डबा लवंडला व जर्मन गृहस्थ डब्याबाहेर पडला. बंदूका डब्यांत असल्यामुळें जर्मन गृहस्थास काय करावें तें सुचेना; इतक्यांत त्या इंग्रज गृहस्थास तोंडांत धरून सिंहानें खिडकीबाहेर उडी घेतली; व एका क्षणांत तो जंगलांत दिसेनासा झाला ! इतालियन व जर्मन गृहस्थ वांचले, पण ते तरी केवळ परमेश्वरीकृपेनेंच म्हणावयाचे !

या उगांडा रेल्वेची हकीकत देतांना ले. क. पॅटर्सन नांवाच्या ग्रंथकारानें मनुष्य-भक्ष्य सिंहांच्या पुष्कळ गोष्टी दिल्या आहेत. या हिंस्र पशूंचा कांहीं दिवस इतका सुळसुळाट झाला कीं रेल्वे रस्ता बांधण्याचें काम १५।२० दिवस बंद ठेवणें भाग पडलें. मोंबासापासून उगांडा प्रांताच्या मध्यभागाकडे जाणारा रेल्वे रस्ता त्सावो गांवापर्यंत तयार झाला व तेथें नदीस पूल बांधण्याचें काम चाललें होतें. हजारों मजूर कामासाठीं तेथें आले होते. इतक्यांत तेथें दोन भयंकर सिंह आले; व त्यांनीं रोज रात्रीं कांहीं माणसें धरून नेण्याचा क्रम ठेवला. कितीही सावधगिरी ठेवली तरी दोन माणसें निजलीं असतील तर एकास सिंहानें हटकून उचलून न्यावें, व त्याच्या आरडाओरड्यानें दुसरा जागा व्हावा असा क्रम नऊ महिने चालला होता. कॅ. पॅटर्सननें सांपळे लावून पाहिलें व पाळत ठेवली पण ते सिंह नेमकी ती जागा टाळून दुसरीकडे हल्ला करीत असत. रात्र झाली कीं सगळे लोक घाबरून जात. सिंह दूर असतांना गर्जना करीत; तेव्हां लोक सावध होऊन "हुषार हुषार" असें ओरडून सर्वांना इषारा देत. पण ते सिंह मनुष्यवस्तीच्या शेजारीं आले कीं यत्किंचित् आवाज काढीत नसत; मग चोहोंकडे सामसूम होई. या शांत स्थितीचें सर्वांना मोठें भय वाटे. कारण त्या वेळीं सिंह त्या वस्तींत वावरत असला पाहिजे अशी त्यांची खात्री असे. कितीही सावधगिरी ठेवली तरी हजारों लोकांच्या समुदायांत कांहींना झोंप लागावयाचीच व नेमक्या त्या लोकांना सिंहाच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागे. नऊ महिन्यांनीं या माणसाच्या रक्तास सोकावलेल्या सिंहांना क. पॅटर्सन यांनीं ठार केलें वगैरे हकीकत त्यांच्या सुंदर पुस्तकांत सविस्तर दिली आहे. पण ती येथें देण्याचें कांहीं कारण नाहीं.

या दोन सिंहांच्या मरणानें देखील हा रेल्वे रस्ता निर्भय झाला नाहीं असें १९०६ सालीं तेथील स्टेशनमास्तरानें ट्राफिक म्यानेजरास केलेल्या तारेवरून ठरतें. एके दिवशीं सिंबा स्टेशनावरील मास्तरानें ट्रॅफिक म्यानेजरास तार दिली ती अशी– "सिंह प्लॅटफार्मवर आहे. गार्ड व ड्रायव्हर यांनीं सिग्नल न देतां सावधगिरीनें गाडी आणावी असें त्यांना सांगून ठेवा. गाडींतील लोकांनीं या स्टेशनावर उतरूं नये असें बजावावें. आज सिंहानें येथें एक मनुष्य मारला. नुसती काडतुसें उपयोगी पडत नाहींत. गोळ्यांचीं काडतुसें पाठवावीं."

थोड्या वेळानें दुसरी तार आली ती अशी होती. " सांधा देण्याकरितां गेलेल्या इसमावर दोन सिंह चालून आले. तो जवळच्या तारेच्या खांबावर चढून बसला आहे. त्याला लवकर मदत पोंचली पाहिजे; सेक्रेटरीनें एक सिंह आतांच मारला. "

या स्टेशनावरील मंडळींना सिंहाच्या हस्तें आपणांस केव्हां मरण येईल याचा नेम नाहीं असें नेहमीं वाटत असे. कारण तेथील सिंहांनीं मनुष्याची पारख चांगल्या प्रकारें केली होती व आगगाडी निघून गेली कीं, स्टेशनावरील मंडळीच्या समाचारास सिंह येत असत ! ही गोष्ट पुढील तारेंतील मजकुरावरून कळून येईल. " दोन वाजतां सुटणाऱ्या गाडीच्या ड्रायव्हरनें आमच्या स्टेशनांत उतरतांना फार खबरदारी घ्यावी. सांधे बंद आहेत, कारण आम्हांस बाहेर पडतां येत नाहीं; मी स्वतः ( स्टेशनमास्तर, ) सांधा देणारा, व हमाल वगैरे सर्वजण ऑफिसांत दार लावून बसलों आहों; कारण दरवाज्यासमोर सिंह बसला आहे. " इत्यादि.

सिंहास अटकेंत ठेवून पुष्कळ गोष्टी करण्यास शिकवितां येतें. सर्कशींत सिंहांचें काम पुष्कळांनीं पाहिलें असेल. पण तो माणसाळतो असें म्हणतां येत नाहीं. तो म्हातारा होईल तसा लहरी स्वभावाचा होतो; आणि त्या लहरीच्या भरांत कित्येक वर्षें परिचयानें व प्रेमानें वागणाऱ्या इसमास फाडून टाकतो.

तथापि सिंहाची स्मरणशक्ति जबर असते; व तो कृतज्ञ असतो असें हागेनबेक याचें म्हणणें आहे. पारिसमध्यें एके दिवशीं सिंहांचा एक चमत्कारिक खेळ करावयाचें ठरलें होतें. कित्येक प्राण्यांच्या आकृति तयार करून व त्यांत घोड्याचें मांस भरून सर्कशींतील वाघांच्या झुंडीपुढें टाकावयाच्या; व ते वाघ त्या प्राण्यांना फाडून मांस खाऊं लागतात तोंच त्यांच्या पिंजऱ्यांत सर्कशीच्या मालकानें ( रिंगमास्तरानें ) शिरून त्यांना अडविलें पाहिजे. मालकाचें नांव सीथ असें होतें व त्याचे सहा सिंह होते; पण त्यानें लोकांच्या सर्कशींतले बारा सिंह त्या दिवसाकरितां आणले होते. लोकांनीं माणसाळलेले सिंह आपण विकत घेऊन आपल्या सिंहाच्या कळपांत मिसळून देण्याची कित्येक सर्कसवाल्यांची रीत आहे, पण ती भयावह आहे. असो; ठरल्याप्रमाणें पिंजऱ्यांत सगळ्या सिंहांपुढें मिळून कित्येक प्राणी ( दिखाऊ ) पिंजऱ्यांत टाकण्यांत आले. त्यांतील मांसाचा वास येतांच सिंहांनीं त्यांवर उड्या घेतल्या; व त्यांना फाडून मांस बाहेर काढूं लागले. इतक्यांत सीथ पिंजऱ्याचा दरवाजा उघडून आंत गेला. त्याबरोबर कांहींशी घसरड झाली असल्याकारणानें त्याचा पाय घसरून तो खालीं पडला. तेव्हां परक्याकडून आणलेल्या एका सिंहानें त्याच्या अंगावर झडप घातली व त्याला दाबून धरलें. इतर सिंह देखील धांवून आले व तें भक्ष्य कोणी घ्यावें याबद्दल झगडा सुरू झाला. इतक्यांत सीथच्या फार दिवसांचा ओळखीचा व जबरदस्त असा सिंह त्याच्या मदतीस आला. तो सीथच्या शरीरावर आडवा उभा राहून इतर सिंहांना जवळपास येऊं देईना. फक्त पहिल्या सिंहानें सीथची मांडी धरून ठेवली होती. बाहेरच्या मंडळीस सीथच्या मदतीस जातां येईना; कारण सीथ दरवाजास लागून पडला होता. पण एका नोकरानें एक पहार पिंजऱ्याच्या गजांमधून सीथच्या हातीं दिली. त्यानें ती घेऊन मांडीचा चावा घेणाऱ्या सिंहाच्या जबड्यांत इतक्या जोरानें खुपसली कीं, तो जागच्या-जागींच ठार झाला. नंतर तो धडपडत बाजूस झाला व नोकरानें दरवाजा उघडून त्याला बाहेर ओढून काढलें. सीथ यानंतर पांच महिने आजारी होता; व शेवटीं बरा झाला; आणि पुढें कित्येक वर्षेंपर्यंत त्यानें पुनः सिंहाचे खेळ करून पुष्कळ पैसा कमावला.

या हकीकतीवरून सीथच्या मदतीस त्याचा स्नेही सिंह आला असें म्हणतां येईल. पण कित्येकांच्या मतें तो सिंह धन्याच्या मदतीस आला नसून आपण त्यास खावें इतरांना त्यांतला वाटा देऊं नये या हेतूनें तो लढत होता.

दिवसा एकाच कुरणांत एकीकडे रानरेडा चरत असतो व दुसरीकडे सिंह झोंप घेत असतो. यावरून या दोघांत मित्रभाव असला पाहिजे असा मात्र कोणी तर्क करूं नये. कारण शहामृग, झिब्रा, घोडे, हरणें वगैरे प्राणी खाण्यास थोड्या श्रमानें मिळत असतील तोंपर्यंत रानरेड्याच्या अंगावर सिंह चालून जात नाहीं. रानरेड्याशीं झुंजणें सिंहास देखील जड पडतें.

प्रसंगानुसार कांहीं कामासाठीं किंवा निवळ सोबतीस कोणी पाहिजे म्हणून सिंह इतर प्राण्याशीं मैत्री करतो. एक सिंहीण एका प्राणिसंग्रहालयांत सोळा वर्षें राहिली होती. तिला एकंदर पन्नास पिलें झालीं होतीं. पण आतां म्हातारपणामुळें तिच्यानें फारशी हालचाल करवत नव्हती. ती स्वतंत्र असती तर मनुष्य–भक्षक बनली असती; पिंजऱ्यांत तिला अन्न भरपूर मिळत असे पण उंदीर तिला स्वस्थ निजूं देत नसत. वाघ, सिंह वगैरे हिंस्र पशूंनीं खाऊन टाकलेल्या मांसाचे तुकडे मिळतील या आशेनें उंदीर नेहमीं त्यांच्या वसतिस्थानांत मोठ्या धिटाईनें फिरत असतात. सिंहाची प्रकृति बरी असली म्हणजे त्याला या उंदराचें कांहीं वाटत नाहीं. पण तो आजारी पडला म्हणजे त्याला जिवंतपणींच कुरतडून खाऊन टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मागें सांगितलेल्या सिंहिणीवर हा प्रसंग आला. हत्तीचे पाय कुरतडून त्याला देखील उंदीर सळो का पळो करून सोडतात. हागेनबेक नांवाच्या सर्कसवाल्याचे तीन हत्ती प्रवासानें थकून निजले असतां त्यांचे पाय कुरतडून उंदरांनीं त्यांना पायांत एवढीं मोठीं भोकें पाडलीं कीं अखेरीस ते हत्ती मरण पावले.

असो; आमच्या सिंहिणीच्या पिंजऱ्यांत एक कुत्रा टाकण्यांत आला. त्यास पाहून ती प्रथम गुरगुरूं लागली, आणि हालचाल करण्याचा तिला कंटाळा नसता तर तिनें त्याला एकदम खाऊन टाकलें असतें. पण इतक्यांत एक उंदीर पिंजऱ्यांत आला. कुत्रा एकदम त्याच्यावर धांवून गेला व त्यानें उंदरास ठार केलें. तें पाहतांच हा कुत्रा उंदीर मारण्यास उपयोगी पडेल असें त्या सिंहिणीच्या लक्षांत आलें. तिनें त्या कुत्र्याशीं मैत्री जमविली. तेव्हांपासून तो कुत्रा त्या सिंहिणीच्या छातीवर खुशाल निजत असे; व तिलाही उंदरांचा त्रास त्यानंतर झाला नाहीं.

# शास्त्रीय माहिती.

## उष्णता लेखांक २.

( लेखक—पु. वि. गोगटे, बी. एस. सी. खांडवा. )

मागच्या गोष्टीला पांच सहा दिवस झाले असतील. अण्णासाहेब व मधुकर यांच्या भेटीही होत असत; परंतु अण्णासाहेबांना कचेरींत विशेष काम पडत असल्यामुळें, किंवा कांहीं अन्य कारणांमुळें म्हणा, त्यांना थकवा येत असे; व अशा स्थितींत आपण कांहीं प्रश्न विचारिले असतां अण्णासाहेबांस त्रास होईल असें वाटून मधुकरानें मागच्या विषयावर किंवा अन्य विषयावर कांहीं बोलणेंच काढलें नाहीं. आज आदितवारची

सुट्टी असल्यामुळें व अण्णासाहेबांची वृत्तीही थोडी आनंदित दिसल्यामुळें मधुकर अण्णासाहेबांजवळ गेला. तो कशाकरितां आला आहे हें अण्णासाहेबांनीं तावडतोब ओळखलें व विचारिलें, " काय मधु, बांकाच्या लोखंडी पट्ट्या सकाळच्या वेळीं लांकडापेक्षां थंड कां लागतात याबद्दल तूं विचार केलास काय ? "

मधु०:—होय बाबा. ज्या कारणानें उन्हांत असलेलें लोखंड गरम लागतें त्याच कारणानें रात्रभर थंडींत असलेलें लोखंड थंड लागतें.

अण्णा०:—तसें नाहीं. नीट समजावून सांग.

मधु०:—म्हणजे हें पहा बाबा, लोखंड व लांकूड रात्रभर थंडींत असलीं म्हणजे त्यांच्यांतली सर्व उष्णता जाऊन तीं आपल्या हातापेक्षां थंड होतात. आपण लोखंडाला बोट लावलें म्हणजे लोखंड आपल्या हातापेक्षां थंड असल्यामुळें आपल्या बोटांतली उष्णता लोखंडांत जाते. ही उष्णता लोखंडांत त्याच जागीं राहिली तर सुरवातीला लोखंड जेवढें थंड लागेल तेवढेंच; जास्त लागणार नाहीं. परंतु लोखंड उष्णतावाहक असल्यामुळें आपल्या बोटांतली लोखंडांत गेलेली उष्णता त्याच जागीं न रहातां सभोंवार पसरते; व ज्या ठिकाणीं आपण बोट लावलें ती जागा पुन्हा: आपल्या बोटापेक्षां थंड होऊन आपल्या बोटांतली जास्त जास्त उष्णता लोखंडांत खेंचून घेतली जाते. अशा रीतीनें आपल्या बोटांतली बरीच उष्णता कमी होऊन आपलें बोट गार पडतें, व आपणांस लोखंड गार असावें असा भास होतो. लांकूड उष्णतावाहक नसल्यामुळें आपल्या बोटांतली फारच थोडी उष्णता लांकडांत जाते, व त्यामुळें आपलें बोट जितकें गार होतें तितकें लांकडानें होत नाहीं.

अण्णा०:—म्हणजे उष्णतावाहक पदार्थ गार लागणें किंवा गरम लागणें हें हवेच्या स्थितीवर अवलंबून असतें हें तुझ्या लक्षांत आलेंच. हवा आपल्या अंगापेक्षां थंड असेल तर उष्णतावाहक वस्तु आपणांस विशेष गार लागतील, व ती गरम असेल तर त्या विशेष गरम लागतील.

मधु०:—आणि बाबा, निरनिराळ्या उष्णतावाहक वस्तु निरनिराळ्या प्रमाणांत गरम किंवा थंड लागतील; नाहीं का ? कारण दगडापेक्षां लोखंड जास्त गरम किंवा जास्त थंड लागतें.

अण्णा०:—बरोबर आहे. सर्व वस्तु सारख्याच उष्णतावाहक नसतात. ज्या जास्त वाहक असतील त्या जास्त गरम किंवा थंड लागतील. पितळ लोखंडापेक्षां शीघ्रवाहक आहे म्हणून पितळ जास्त तापेल किंवा थंड होईल.

मधु०:— तरीच बावा, पितळेची पळी लोखंडी पळीपेक्षां जास्त तापते वरें का ! सिगारेटच्या डबींतला पत्रा शिशाचा असें तुम्हीं एकदां म्हणाला होता. तेव्हां तो विरघळतो किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं मीं एके दिवशीं त्याचा तुकडा पितळेच्या पळींत टाकून ती तापत घातली; पण तिचें बोंड लाल होण्यापूर्वींच तिचा दांडा इतका तापला कीं तो हातांत धरवेना. तें पाहून आईनें लोखंडी पळी दिली व सांगितलें कीं ही तापत घाल; हिचा दांडा तापणार नाहीं. बाबा तिचें बोंड लालभडक झालें तरी दांडा विशेष गरम लागला नाहीं. आज याचें कारण अनायासेंच समजलें.

अण्णा०:—आतां तुला उष्णतावाहक व उष्णतारोधक पदार्थ कोणते व त्यांचा धर्म काय हें समजलें. लांकूड, लोंकर, हवा वगैरे उष्णतारोधक पदार्थ आहेत; म्हणून त्यांच्यांत उष्णता अगदींच पसरत नाहीं असें नाहीं. त्यांच्यांतही उष्णता पसरते; पण ती फार थोडी. यामुळें त्यांना उष्णतारोधक न म्हणतां मंदवाहक असेंही म्हणतात. आतां त्या दिवशीं तूं अनवाणी गेलास म्हणून तुला दगड मातीपेक्षां जास्त गरम आहेत असा अनुभव आला; पण तो इतके दिवस कां नाहीं आला ?

मधु०:—बाहेर जातांना नेहमीं माझ्या पायांत जोडा असे म्हणून.

अण्णा०:—जोडा असे म्हणून दगडानें पाय कां भाजूं नयेत ?

मधु०:—जोड्यांतून उष्णता वर पायांपर्यंत येऊं शकत नाहीं.

अण्णा०:—मग यावरून कातडें उष्णतावाहक आहे किंवा उष्णतारोधक आहे ?

मधु०:—हें काय विचारतां बाबा ? उष्णतारोधकच नाहीं का ? जर तें उष्णतावाहक असतें तर दगडाची उष्णता वर पायाला लागली नसती का ?

अण्णा०:—मग जोड्याचे तळवे धातूच्या पत्र्याचे केले तर चालतील का ?

मधु०:—नाहीं चालणार. त्यांनीं पाय भाजतील.

अण्णा०:—आणखी थंडीच्या दिवसांत थंडही लागतील.

मधु०:—हो खरेंच; तें मी विसरलोंच होतों. ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत धातूच्या पत्र्यांतून उष्णता वर येऊन पाय भाजतील त्याचप्रमाणें थंडीच्या दिवसांत आपल्या पायांतली उष्णता बाहेर जाऊन पाय थंडावतील.

अण्णा०:—तेव्हां जोडा करण्याकरितां उष्णतारोधक पदार्थांचा उपयोग कां केला हें तुला समजलें. आतां व्यवहारांत आपण उष्णतारोधक पदार्थांचा असाच उपयोग करून घेतों याचीं कांहीं उदाहरणें दे पाहूं?

( मधुकर बराच वेळ विचार करतो आहे असें पाहून )

अण्णा०:—स्वयंपाकांत कांहीं करतों का उपयोग ?

मधु०:—हो बाबा. आई चुलीवरून भांडीं उतरतांना हाताशीं कागद किंवा पान घेत्ये. तेव्हां कागद किंवा पान हे उष्णतारोधक पदार्थ असले पाहिजेत; व म्हणून तिचा हात भाजत नाहीं.

अण्णा०:—बरोबर आहे. कागद, वाळलेलीं पानें वगैरे उष्णतारोधक आहेत. आतां तापलेल्या भांड्यापासून आपल्या बोटांचें संरक्षण करण्यासाठीं जसा येथें उष्णतारोधक पदार्थ वापरला तसाच उष्णतारोधक पदार्थ आपल्या शरीराचा बाहेरच्या थंडीपासून बचाव करण्यासाठीं वापरतात. तो पदार्थ....

मधु०:—बाबा, मी सांगतों तो पदार्थ कोणता तो ! तो लोंकरीचा कपडा. कारण आतांच तुम्हीं सांगितलें होतें कीं लांकूड, लोंकर, हवा हीं उष्णतारोधक आहेत. पण बाबा, लोंकर ही उष्णतारोधक आहे; तेव्हां आपल्या अंगांतली उष्णता बाहेर जाणार नाहीं एवढेंच; पण त्यानें ऊब कां यावी ? लोंकरींत उष्णता सांठविलेली असते काय ?

अण्णा०:—लोंकरींत उष्णता सांठविलेली नसते. ऊब येण्याचें कारण हेंच कीं, आपल्या अंगांतली उष्णता लोंकरीमुळें बाहेर जात नाहीं; आंतल्या आंत रहाते. आपल्या अंगांत आपल्या कामापुरती उष्णता उत्पन्न होत असते व तितक्या उष्णतेचें रक्षण केलें तर बाहेरच्या उष्णतेची आवश्यकता रहात नाहीं. त्याच उष्णतेनें आपणांस सुख वाटतें व त्यालाच आपण ऊब आली असें म्हणतों. ज्या शालजोड्यांची लोंकर विशेष उबदार असेल म्हणजे उत्तम उष्णतारोधक असेल त्या शालजोड्या चांगल्या; व अशाच शालजोड्यांना किंमत जास्त पडते.

मधु०:—बाबा, जसा थंडीच्या दिवसांत आपल्या अंगांतली उष्णता बाहेर जाऊं नये म्हणून शालजोड्यांचा किंवा लोंकरी कपड्यांचा उपयोग करतात तसाच उपयोग उन्हाळ्यांत बाहेरची उष्णता अंगाला लागूं नये म्हणून कां करीत नाहींत ?

अण्णा०:—तोही उपयोग करतात. आपले लोक करीत नाहींत एवढेंच. परंतु युरोपियन लोक थंड देशांतले असल्याकारणानें त्यांना आपल्या येथील उन्हाळा असह्य होतो व त्यामुळें त्यांना आपल्या शरीराचें उष्णतेपासून संरक्षण करणें जरूर असतें. म्हणून ते लोक उन्हाळ्याच्या दिवसांतही लोंकरीचे शर्ट नाहींतर लोंकरीचें गंजीफ्राक वापरतात.

मधु०:—खरेंच बाबा, लांकूड व लोंकर हीं उष्णतारोधक आहेत हें समजलें; पण हवा उष्णतारोधक कशी हें समजलें नाहीं. हवा जर उष्णतारोधक असती तर थंडीच्या दिवसांत आपल्या अंगांतली उष्णता

बाहेर जाती ना ! त्याचप्रमाणें एखादी जिन्नस गरम केली तर ती गरमच राहिली असती. निवालीच नसती.

अण्णा०:—तुझें म्हणणें खरें आहे. मोकळी हवा उष्णतारोधक नाहीं. मी जी हवा उष्णतारोधक म्हणून म्हणालों ती हवा लोंकर, पर, पिसें, कापूस, लांकडाचा भूस अशांत गुंतून राहिलेली हवा. माती दगडापासूनच झालेली असते; पण दगड उष्णतावाहक आहे व माती उष्णतावाहक नाहीं. यांचें कारण मातीच्या कणांत अडकलेली हवा उष्णतारोधक आहे, म्हणून आपणांस माती उष्णतारोधक वाटते. तुला हवें असेल तर एक प्रयोग करून पहा. एक पैसा चांगला तापीव व हातावर थोडीशी मातीची भुकटी ठेवून तिच्यावर तो पैसा ठेव. हात मुळींच भाजणार नाहीं. कारण, मातीच्या भुकटींत बरीच हवा अडकलेली आहे व ती उष्णतारोधक आहे; म्हणून हात भाजणार नाहीं. आतां तो पैसा एखाद्या धलपीनें दाब, दाबामुळें भुकटींतील हवा निघून जाईल; व तुझा हात भाजेल. जर माती खरोखरच उष्णतारोधक असती तर पैसा दाबल्यानें हात भाजला नसता. लोंकरीची देखील उष्णतारोधक शक्ति बऱ्याच अंशीं तिच्यांत गुंतून राहिलेल्या हवेवरच अवलंबून आहे. अशा तऱ्हेची गुंतून राहिलेली हवा जितकी उष्णतारोधक आहे तितकी कोणतीच वस्तु उष्णतारोधक नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आतां लांकूड उष्णतारोधक आहे असें आपण पाहिलें; पण लांकडाच्या पेटींत बर्फाची ढेप ठेवली तर ती तशीच रहाणार नाहीं; लवकर विरघळेल; पण तीच लांकडाच्या भुशांत ठेवली तर बरेच तासपावेतों जशीच्या तशीच राहील. यावरून तुला स्पष्ट समजेल कीं, लांकूड जरी उष्णतारोधक आहे तरी त्याचा भुसा त्यांत अडकून राहिलेल्या हवेमुळें जास्त उष्णतारोधक होतो.

इतक्यांत शेजारचे गोपाळराव अण्णासाहेबांकडे आल्यामुळें अण्णासाहेब व मधुकर यांचा संवाद तितक्यावरच थांबला.

# गप्पागोष्टी.

जीवोत्पत्तीसंबंधानें अलीकडे नवीन मत बनत चाललें आहे. समुद्रांत प्रथम जीवोत्पत्ति झाली असावी असा आजपर्यंत समज होता. पण तो अलीकडे अग्राह्य ठरून, जीव प्रथम भूमीवर अस्तित्वांत आला असला पाहिजे असें ठरत आहे; मग तो खडकांच्या दमट खाचींत असो, गोड्या पाण्याच्या डबक्यांत असो किंवा फार थोड्या खारट अशा अतिप्राचीन समुद्राच्या कांठावर असो; पण पहिल्या जीवाचा संबंध जमिनीशीं होता एवढें खास. जीवनास अत्यवश्यक अशीं जीं कित्येक द्रव्यें आहेत तीं प्राचीनकाळच्या समुद्रांत मुळींच नव्हतीं, तेव्हां त्यांत जीवोत्पत्ति होणें अशक्य होतें; तीं ओलसर मातींतच शक्य आहे किंवा नैट्रोजनयुक्त आकाशांतून पडणाऱ्या पाण्यांत तरी शक्य आहे. विजेचा गडगडाट आकाशांत चालला असतांना नैट्रोजन व आक्सिजन यांच्या संयोगापासून जे नैट्रेट उत्पन्न होतात त्यांचा संचय कांहीं डबक्यांच्या पाण्यांत झाला

असेल व तें स्थळ जीवोत्पत्तीस अत्यंत अनुकूल झालें असावें. पण गोड्या पाण्यांत प्रथम जीव उत्पन्न होऊन तेथून समुद्रांत गेला असावा हा या शोधकांच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे.

* * * *

सध्या युरोपांत जें महायुद्ध चालू आहे त्यांत कोणत्या पक्षास किती लोकसंख्या आहे यासंबंधीं अगदीं अलीकडची माहिती अशी आहे.

**संयुक्तांचा पक्ष.** ( आकडे कोटीचे आहेत )

| | | | |
|---|---|---|---|
| रशिया | १७।; | संयुक्तसंस्थानें | ४॥ |
| फ्रान्स | ४ | इताली | ३॥ |
| बेलजम | -।।।- | सर्व्हिया व मॉन्टिनिग्रो | -॥- |
| वसाहती | २॥ | | |
| | २४॥ | | ८॥ |

एकुण सरासरी ३२-३३ कोटी लोकसंख्या संयुक्तांच्या बाजूची आहे. यांत हिंदुस्थानचा आंकडा धरला तर दुप्पट होईल.

**शत्रुपक्ष.**

| | | | |
|---|---|---|---|
| जर्मनी | ६।।।; | आस्त्रिया | ५।; |
| तुर्कस्थान | २; | बलगेरिया | -॥- |

एकूण १४। कोटी लोकसंख्या जर्मन पक्षाकडे आहे. पैकीं १८ ते ४५ या दरम्यानच्या वयाची लोकसंख्या साधारण मानानें शेंकडा १६ म्हणजे सहावा हिस्सा असते. पण अशक्त लोक सोडून शेंकडा दहा म्हणजे एकंदरीचा दहावा हिस्सा शिपाइगिरीस उपयोगी पडतात. याचा अर्थ संयुक्तांचें सैन्यबल ३। कोटी व शत्रुपक्षांचें सरासरी १॥ कोटी युद्धाच्या सुरुवातीस असावें. ही संख्या प्रत्यक्ष युद्धांत उभे राहिलेल्या शिपायांची नसून शिपाइगिरीस लायक असलेल्या लोकांची आहे. व तीच हिशेबांत घेतली पाहिजे; कारण कांहीं लोक युद्धाच्या सुरुवातीस पुढें आले नसले तरी आतां त्यांना कायद्यानें आणलें जातें.

या हिशेबांत एक गोष्ट विचारांत घेतली नाहीं; पण ती महत्त्वाची आहे. युद्ध सुरू होतांच फ्रान्सचें सर्व सैन्य तावडतोब तयार होतें. इंग्लंडचें अलीकडे तयार झालें, व रशियाची तयारी अद्यापही व्हावयाची आहे. उलटपक्षीं जर्मनानें आधींच तयारी करून ठेवली असल्यामुळें युद्ध पुकारतांच त्यानें एकदम सर्व सैन्य पुढें आणलें. यामुळें त्या पक्षाचा एकदम मोड करणें मित्रसंघास शक्य नव्हतें. पण अलीकडे संयुक्ताच्या सैन्यांत एकसारखी भर पडत आहे व जर्मनांच्या सैन्यांतील मेलेल्या शिपायांनीं त्यांची संख्या सारखी कमी होत आहे. यामुळें अलीकडे जर्मनांची चोहों बाजूंनें पिछेहाट कां होते याचा उलगडा होईल.

---


# मराठी सचित्र अक्षरलिपी.

ह्यांत सर्व **मूळाक्षरें** ( स्वर व व्यंजनांसह ) **मोडी** आणि **बाळबोध** सुंदर **रंगीत चित्रांसह** फार **सुबक** छापलेलीं आहेत. **अक्षरओळख** झाल्यानंतर **सोपे** व **लहान शब्द—बाळबोध** व **मोडी**—मुलांना **वाचण्याकरितां** दिले आहेत. शेवटीं गोट्यांचे चौकटीचे साहाय्यानें **बेरीज** व **वजाबाकी** कशी शिकावी हें दाखविलें आहे. किं० ८२.

**मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# लक्ष्मीपूजन व भाऊबिजेची आठवण.

## ( दोन बोधपर गोष्टी. )

लेखकः—त्र्यं. सि. कारखानीस, ( महाराष्ट्र नाटक मंडळी. )

वरील गोष्टी काल्पनिक तर खऱ्याच; परंतु लेखकानें मनुष्यस्वभावाचें हुबेहूब चित्र वरील गोष्टींत इतक्या चातुर्यानें व सफाईनें रेखाटलें आहे कीं, वाचणारांस क्षणभर त्या खऱ्याच घडत आहेत कीं काय, असा भास झाल्यावांचून रहात नाहीं. ह्या गोष्टीरूप बोधामृताचा स्त्री–पुरुषांचे मनावर पक्का ठसा उमटावा म्हणून पुस्तकांत जागजागीं गोष्टींतील महत्त्वाचे प्रसंगांचीं सात चित्रें दिलेलीं आहेत. गोष्टी रोजच्या व्यावहारिक व सोप्या भाषेंत लिहिलेल्या असून दिपवाळीचे सणांत लहानथोर भावंडांनीं भाऊबिजेस ओंवाळणीदाखल आपल्या प्रियभगिनींस पाठविण्यास फारच योग्य अशा झाल्या आहेत. पुस्तकाचें बाह्यांगही फारच सुबक व रमणीय आहे. किंमत ८४. ट. ह. ८॥.

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि–शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

# मुलांच्या शिक्षणाचा अहवाल.

सर्व शाळांतून ह्या पुस्तकाचा उपयोग करतां येतो. कारण अमुकच शाळेचें नांव यावर घातलेलें नाहीं. ह्यांत दर महिन्याच्या बारा महिन्यांचीं एकंदर बारा पानें मुलांच्या अभ्यासक्रमाकरितां किंवा मासिक परीक्षेचे गुण मोजण्याकरिता दिलेलीं आहेत. शिवाय आईबाप किंवा पालक यांच्या अभिप्रायाकरितां प्रत्येक पेजाखालीं जागा ठेविली आहे. शेवटीं चांचणी-परीक्षा, वर्ग बदलण्याची परीक्षा, दरमहा वर्गांतील नंबराची सरासरी वगैरे निराळीं कोष्टकें दिलीं आहेत किं० ८८६.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी

# ध्रुव व चिलया.

अंगीं **स्वाभिमान** असणें हें मनुष्यत्वाचें—किंवा जिवंतपणाचेंही म्हणतां येईल,—**खरें लक्षण** आहे. **स्वाभिमान** हा व्यक्तीच्या उत्कर्षाचा पाया आहे; व राष्ट्राचा उत्कर्ष हें व्यक्तीच्या उत्कर्षाचें संतान असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं स्वाभिमानाचें बीं रुजविणें हा **राष्ट्रहिताचा श्रीगणेशा**—होय. पण स्वाभिमानाचें पाणी, मन कोंवळें असतांना अंगांत मुरलें पाहिजे; नाहीं तर पुढें तें केव्हांही मुरावयाचें नाहीं. तेव्हां हें कार्य अंशतः तरी व्हावें, या हेतूनें ध्रुव व चिलया या दोन **पौराणिक मुलांचीं चरित्रें** आम्हीं रा. रा. **कृष्णाजी गोविंद किनरे** यांजकडून मुद्दाम मुलांकरितां लिहविलीं आहेत. **ध्रुवाचें चरित्र** म्हणजे स्वाभिमानाची **केवळ जागती ज्योत** आहे; तसेंच **भक्ति व दृढ निश्चय** यांच्या बळावर **अमर कीर्ति**, अखंड **वैभव** व **चिरंजीवित्व** हीं कशीं संपादन करितां येतात, याचेंही तें प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्याचप्रमाणें आईबापांची—**कुलाची—कीर्ति** राखण्याकरितां प्रसंगीं जिवावरही उदार होणें कसें श्रेयस्कर आहे, हें **चिलयाचे** चरित्रांत दाखविलें आहे. अशीं हीं दोन **हृदयंगम चरित्रें** अगदीं नवीन तऱ्हेनें लिहिलेलीं आहेत. मुलांनींच काय, पण थोरांनींही यांचीं नित्य पारायणें करावीं, इतकी यांची योग्यता आहे. आधीं चरित्रें गोड, त्यांत अत्यंत मोहक भाषेंत तीं रा. किनरे यांनीं लिहिल्यामुळें, 'आधींच सोन्याचें, वरी जडावाचें' असा प्रकार झाला आहे. छपाईचें कामही **अंतरंगाला साजेसेंच** केलें आहे. **सात सुंदर चित्रें** घातलीं आहेत. किंमत पांच आणे. ट. ख. निराळा.

# भारतांतील गोष्टी, [ भाग १ ला. ]

'चिमुकलें भारत' या मुलांना **अत्यंत प्रिय झालेल्या** पुस्तकांत कौरव व पांडव यांचा सरळ व सोप्या पण मोहक भाषेंत इतिहास दिला आहे. भारतांतील **उपकथाही तितक्याच महत्त्वाच्या** असल्यामुळें त्या लहानपणीं **मनावर ठसणें योग्य** आहे. म्हणून आम्हीं त्या रा. कृष्णाजी गोविंद किनरे यांजकडूनच मुद्दाम लिहविल्या आहेत. गोष्टी अशाच धाटणीनें लिहिल्या आहेत कीं, वाचतां वाचतांच त्यांचें मर्म मुलांचे मनावर आपोआप ठसावें. उपदेशपर वाक्यें जाडअक्षरीं केलीं आहेत. भाषा मोहक, छपाई गोड. **सात सुंदर चित्रें.** एकंदरींत बाह्यांग अत्यंत **मनोरम** पृ. १२९. किं. पांच आणे. ट. ह. निराळें.

**मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.**


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस ८१८ सदाशिव पुणें सिटी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं. ........
ता. ........
मासिक शाखा

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. आक्टोबर सन १९१६ अंक १०.

# मराठी बालबोधमेवा

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| आतिथ्य. | १८३ |
| शिरोभाग. | १८७ |
| जंगली लोकांच्या चमत्कारिक कल्पना. | १९० |
| दोन राजकन्या. | १९१ |
| नाणें धातूचेंच कशाला पाहिजे ? | १९४ |
| प्रयत्न कीं दैव ? | १९५ |
| दामोदर मासा. | १९६ |
| थंडी न होण्यास [illegible] | १९७ |
| चिनी वैद्य. | १९८ |
| शास्त्रीय माहिती. | १९९ |
| मनोरंजक माहिती. | २०१ |

# सचित्र इसाप-नीति.

## पूर्वार्ध.

[ नवीन भाषांतर—भाग १ ला. ]

पृष्ठसंख्या २००, गोष्टी २६२, कागद जाड व गुळगुळीत,
सांचा क्राऊन, साईज अष्टपत्री, टाईप मोठा.
या भागांत ११० सुंदर चित्रें आहेत.

मुलांमुलींस अत्यंत उपयुक्त. किं. फार माफक—१ रु. ट. ह. ८२.

या भागाचे ६ पोटभाग केले आहेत; त्या प्रत्येकाचीं पृष्ठें ३६ असून किंमत ४ आणे ठेविली आहे. ज्यांस सबंध पहिला भाग एकदम घेण्यास सवड नसेल त्यांस हे पोटभाग घेणें अधिक सोईचें होईल. या भागाच्या मूलपृष्ठांवर सुंदर रंगित चित्रें दिलीं आहेत. नुकत्याच अक्षरओळख झालेल्या मुलांचें ह्या पुस्तकांतील लहान लहान गोष्टी वाचून त्यांचें मनोरंजन होतें व त्यांस वाचण्याची उत्तम गोडीही लागते.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षरओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकही जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं० अवघी चार आणे, ट. ह. ८८६.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
नं...............


# मराठी शालापत्रक.


येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. आक्टोबर, सन १९१६. अंक १०.

## आतिथ्य.

( लेखकः—महादेव विष्णू खरे,–खेड. )

आपलेकडे कोणी पाहुणा आला तर आपण त्यास 'कोठून आला,' 'कोठें जावयाचें,' 'पाणी पाहिजे काय?' वगैरे औपचारिक प्रश्न विचारून त्याचें आदरातिथ्य करितों. या आदरातिथ्याचा त्याचे मनावर अनुकूल असा परिणाम होतो. एक तर श्रमून आल्यामुळें थोडा उपहार मिळाला तर त्याचे शरीरास हुशारी येते; आणि दुसरें, आपण आलों तेव्हां योग्य व गोड शब्दांनीं आपलें स्वागत केलें गेलें म्हणून त्याचे मनांत आतिथ्य करणाऱ्या व्यक्तीविषयीं सहानुभूति उत्पन्न होते. आदरातिथ्य करणें हें सार्वत्रिक सहानुभूति ( Universal Sympathy ) मनांत असल्याचें द्योतक आहे. आदरातिथ्य करण्याची चाल रानटी लोकांतही आहे. आफ्रिकेंतून लिव्हिंग्स्टन साहेब ( Dr. Livingston ) प्रवास करीत असतां एके वेळीं तेथील रानटी लोकांशीं एक रात्र काढण्याचा त्यांना प्रसंग आला. त्यांना पहिल्या प्रथम असें वाटलें कीं, हे रानटी लोक फारच धाडशी असून खुनशी स्वभावाचे असतील; परंतु जेव्हां ते त्यांजपाशीं गेले तेव्हां ते लोक गोंधळून न जातां त्यांच्यापैकीं एकानें लिव्हिंग्स्टन साहेबांस बसावयास आसन दिलें. पुढें एकमेकांची भाषा एकमेकांस कळत नसल्यामुळें हातांनीं खुणा करून लिव्हिंग्स्टन साहेबांनीं आपणांस जरूर असलेल्या वस्तु त्यांजपाशीं मागितल्या व त्यांस त्या

मिळाल्याही. इतकेंच नव्हे तर उपहारार्थ दूधही त्यांस त्या लोकांनीं देऊं केलें. शिवाय आश्चर्य करण्याजोगी गोष्ट इतकीच कीं, त्या लोकांच्या स्त्रियांनीं आपलेकडे पाहुणा आला म्हणून त्याच्या स्वागतार्थ रात्रीं गाणीं म्हटलीं. अशा प्रकारें अत्यंत रानटी लोकांनही आतिथ्याची चाल आहे. परंतु या रानटी लोकांपेक्षांही इकडील कांहीं लोक सदरहु बाबतींत इतके रानटी बनतात कीं त्यांचेकडे एखादा पाहुणा आला तर खालीं लिहिलेल्या गमतीच्या रीति वेळ पडेल त्याप्रमाणें उपयोगांत आणल्या जातात.

१ एखादा अतिथी आपलेकडे येतो असें वाटल्यावर घराचा पुढचा दरवाजा लावून घेऊन दुसरीकडे निघून जाणें.

२ इतकें असूनही एखादा 'धाडशी' पांथस्थ दारावर थापा मारून दार उघडण्याविषयीं विनंती करूं लागला तर घरांतील एखाद्या लहान मुलानें दरवाजा उघडावयाचा व 'यजमान घरीं आहेत काय?' म्हणून पांथस्थानें विचारतांच 'ते घरीं नाहींत गांवीं गेले आहेत' म्हणून शिकविलेलें उत्तर त्या मुलानें देऊन त्याची रवानगी करावी.



तेथें कोणी विचारपूस न केल्यामुळें क्रुद्ध होऊन ती दक्षापुढें आली व यज्ञकुंडांत तिनें उडी टाकली.

३ दैववशात् एखादा 'वाटसरू' यजमान घरीं असतां 'रात्रभर राहण्याची आपली इच्छा आहे' अशी त्याजपाशीं विनंती करूं लागला तर स्वतः यजमानानें 'आपण यजमान नसून तुमचेसारखेच पाहुणे आहोंत, खरे यजमान गांवीं अगर दुसरे कोठें गेले आहेत' वगैरे सांगून वेळ मारून न्यावयाची.

४ घरांतील कर्ते पुरुष जर एकमेक बंधु असतील तर यजमानपणाचा हक्क, पाहुणा आला असतां एकमेकांनीं एकमेकांवर ढकलावयाचा. म्हणजे, एक बंधु घरांत असला तर दुसऱ्या बंधूस उद्देशून 'मुख्य यजमान घरीं नाहींत' म्हणून म्हणावयाचें व दुसऱ्या बंधूनें आपलेवर प्रसंग आला म्हणजे याच कृतीची पुनरावृत्ति करावयाची.

५ गांवांत जर एखादा इसम दातृत्ववान असेल तर त्याचें नांव सांगून 'तेथें तुमची सोय होईल' म्हणून पांथस्थास सांगून त्याची रवानगी करावयाची.

याप्रमाणें निरनिराळ्या रीति आहेत. या रीतींचें

नं.............. ता..............

अवलंबन करून अतिथीची संभावना कांहीं लोक करितात. खरें पाहूं गेलें तर एखादा इसम खरोखरच गरीब असून त्यांस दुसऱ्या इसमाची ‘ बडदास्त ’ ठेवण्याचें जरी सामर्थ्य नसेल, तरी त्यानें वरील प्रकारांपैकीं कोणत्याही प्रकाराचें अवलंबन करणेंसुद्धां बरें नाहीं. कारण या प्रकारांपेक्षां एक उत्तम मार्ग आहे. जर आपणांस सामर्थ्य नसेल तर अतिथीला त्याप्रमाणें खरी हकीगत सांगण्यास काय हरकत आहे ? गरीब अगर श्रीमंत होणें हें सर्वस्वीं नशिबावर अवलंबून असल्यामुळें त्याबद्दल कोणींही विषाद मानूं नये. आमचे मतें खरी हकीगत सांगण्यापासून अतिथीस राग न येतां वर लिहिलेल्या अडाणी प्रकाराबद्दल मात्र राग येईल. आम्हांस आश्चर्य वाटतें तें हें कीं, कांहीं गृहस्थ घरचे श्रीमंत असूनही वरील प्रकारांचें अवलंबन करितात. अंगीं सामर्थ्य असूनही बुभुक्षितास एक घांसभरही अन्न मिळूं नये यापेक्षां मनाचा क्षुद्रपणा तो आणखी कोठें दृष्टोत्पत्तीस यावयाचा ? आज जो प्रसंग आपले कडे आलेल्या अतिथीवर आहे तोच प्रसंग कदाचित् उद्यां आपल्यावर येईल असा विचारसुद्धां त्यांचे मनांत येत नाहीं. असो; या बाबतींत आतां दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, एखादे वेळीं कांहीं अतिथी असे खमंग भेटतात कीं, एखाद्या गृहस्थानें आदरसत्कार करून त्यांची जेवणाची सोय केली आणि त्यांचे रोजचे चैनींत जर न्यून उत्पन्न झालें तर ते यजमानावर रुष्ट होतात. वास्तविक पाहतां त्यांना मिळालेलें अन्न धर्मार्थ असतें; असें असतां इंग्रजींत—

“Dine upon charity and ask for sauce” —म्हणून जी एक म्हण आहे त्या म्हणीप्रमाणें ते आपलें वर्तन ठेवितात. याकरितां अशा अतिथीचें अल्पसुद्धां आदरातिथ्य न करितां त्यांचेपासून दूर रहाणें हेंच बरें.

कधीं कधीं आदरातिथ्य न झाल्यामुळें तंटे होतात, एकमेकांमध्यें द्वेष उत्पन्न होतो वगैरे अनेक अनिष्ट प्रकार घडून येतात. फार कशाला, देवांना सुद्धां आतिथ्याची अपेक्षा असतें. दक्ष प्रजापतीनें यज्ञ केला; पार्वती ही दक्षाची मुलगी असूनही त्या समारंभास तिजला बोलावणें गेलें नाहीं. असें असताहां पार्वतीनें शंकरापाशीं बापाचे घरीं जाण्याची परवानगी मागितली. शंकरानीं दूरवर विचार करून पार्वतीस असें सांगितलें कीं, ज्याअर्थीं तुला बोलावणें नाहीं त्याअर्थीं तूं तेथें न जावें हेंच उत्तम. कारण तेथें तुझा आदरसत्कार होणार नाहीं व त्यामुळें तुला दुःख होईल. शंकराचा हा उपदेश न ऐकतां पार्वती दक्षाकडे गेली व तेथें कोणी विचारपूस न केल्यामुळें क्रुद्ध होऊन ती दक्षापुढें आली व यज्ञकुंडांत तिनें उडी टाकली. पुढें शंकरानें दक्षाचें कसें पारिपत्य केलें हें सर्वांस ठाऊक आहेच. अशा प्रकारें आतिथ्य न झाल्यामुळें कधीं कधीं वाईट प्रसंग घडून येनात. म्हणून आर्यांची आतिथ्याविषयीं किती उदात्त कल्पना होती हें महाभारतांतील कपोत पक्षाचे गोष्टीवरून चांगलें कळण्यासारखें आहे.

एके समयीं एका अरण्यांत अतिशय प्रचंड वारा सुटून इतका पाऊस पडूं लागला कीं, त्या अरण्यांतून मार्ग क्रमून जाणें अशक्य होतें. अशा समयास एक व्याध शिकार करण्याकरितां त्या अरण्यांत फिरत होता. शिकार करण्याचें बाजूसच राहिलें; परंतु जीव जगतो कीं नाहीं याचीच त्यास चिंता वाटूं लागली. हातपाय थंडीनें गारठून गेल्यामुळें तो एका वृक्षाचा आश्रय धरून बसला. अशा स्थितींत सायंकाळ झाली. दैववशात् पाऊस थांबला व आकाश स्वच्छ झालें. दिवसभर उपाशी असल्यामुळें कोठें वस्तीचें ठिकाण जवळपास आहे किंवा कसें हें पाहण्यासाठीं तो व्याध निघाला. दिवसभर वारा व पाऊस अतिशय लागल्यामुळें कित्येक पक्षी जमिनीवर मरून पडले होते; त्यांत एक अर्धवट जिवंत असलेला पक्षी आढळला. त्यास व्याधानें आपल्या पिंजऱ्यांत घातलें. नंतर वस्तीचें ठिकाण सांपडत नाहीं असें वाटून त्यानें रात्रभर एका वृक्षाखालीं राहण्याचा निश्चय केला. तो ज्या वृक्षाखालीं बसला होता त्या वृक्षावर एक कपोत ( कवडा ) पक्षी—त्याची

स्त्री सकाळीं चारा आणण्याकरितां गेली, ती अद्यापि परत आली नाहीं म्हणून—विलाप करीत होता; तो म्हणाला ' प्रचंड वायू आणि वृष्टि होऊन गेली आहे;



नंतर वस्तीचें ठिकाण सांपडत नाहीं असें वाटून त्यानें रात्रभर एका वृक्षाखालीं राहण्याचा निश्चय केला.

तथापि प्रिया येत नाहीं. ती अद्यापि परत न येण्याचें काय बरें कारण असेल ? माझी प्रिया अरण्यांत सुखरूप असेल ना ! ' आणि पुढें तो म्हणूं लागला—

**पुत्रपौत्रवधूभृत्यैराकीर्णमपि सर्वतः ।**
**भार्याहीनं गृहस्थस्य शून्यमेव गृहं भवेत् ॥**

महाभारत ( शान्तिपर्व. )

पुत्र, पौत्र, स्नुषा आणि सेवक यांची घरांत चोहोंकडे गर्दी असली तरी भार्या नसेल तर गृहस्थाश्रमी-याचें घर केवळ ओसाड होय. अशा प्रकारें तो विलाप करीत असतां व्याधाच्या पिंजऱ्यांत सांपडलेली ती कपोत स्त्री म्हणाली, " कांत, आपण शोक करूं नये. कारण दैवाप्रमाणें होणाऱ्या गोष्टी चुकत नाहींत; तरी आपलें कर्तव्य आपण केलें पाहिजे. हा व्याध आपलेकडे पाहुणा आला आहे याचा आपण आदरसत्कार करावा." हें आपल्या स्त्रीचें भाषण ऐकून त्या कपोतपक्षानें त्या व्याधाचा सत्कार केला. त्याला हातपाय शेकण्याकरितां अग्नि आणून दिला; इतकेंच नव्हे तर त्या पक्षानें त्या व्याधाची क्षुधा निवारण करण्याकरितां आपणास जाळून घेतलें. अशा प्रकारचा आतिथ्याचा अद्भुत प्रकार पाहून त्या व्याधास उपरती झाली. त्यानें त्या कपोतस्त्रीला पिंजऱ्यांतून मोकळें करून सोडून दिलें व आपण पश्चात्ताप पावून ईशप्राप्तीकरितां अरण्यांत निघून गेला. कपोतस्त्रीनें पतिसमवेत अग्नींत उडी टाकिली. पुढें तें कपोत-जोडपें व तो व्याध स्वर्गांत सुखानें वास्तव्य करूं लागलीं इत्यादि इतिहास सांगून आम्हीं वाचकांचा वेळ घेत नाहीं.

# शिरोभाग.

आपण सैन्याची व्यवस्था कशी काय असते, ती पाहूं. सैन्यामध्यें सेनापति मुख्य असतो; सैन्य चांगलें तयार पाहिजे; व सेनानायक चांगला हुशार, अनुभविक, धैर्यवान्, शूर व प्रसंगावधानी असा मनुष्य असला पाहिजे. या दोन गोष्टी एकत्र असल्यावर सैन्याच्या हातून पाहिजे तसलीं शौर्याचीं कामें अगदीं सहज होतील. पण जर कां सेनापति भित्रा, मूर्ख असला, त्याला लढाईचा अनुभव नसला तर सैन्य चांगलें तयार असूनही त्या सैन्याचा लढाईत पराभव होईल, व त्या सैन्यावर नानातऱ्हेचीं संकटें येतील व अनेक अनर्थ ओढवतील. याकरितां सैन्य तयार पाहिजे व सेनापति अनुभविक व चतुर पाहिजे.

आमच्या शरीरांतही राजा, सेनापति व सैन्य हें सर्व खटलें आहेच. आत्मा हा राजा, मन हें सेनापति, पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें हें सैन्य होय. आमच्या शरीरांत टेलिफोन ऑफिसही आहे. शंभर सव्वाशें मैल अग्रभागीं पसरलेल्या अशा प्रचंड सेनासमुद्रामध्यें काय चाललें आहे हें सेनापतीला समजतें. तसेंच सैन्याच्या कोणत्या भागानें शत्रूच्या कोणत्या टोळीशीं लढावें, बिकट प्रसंगीं सैन्यांतील लोकांनीं काय करावें, शत्रूवर कसा हल्ला करावा इ. गोष्टींबद्दल सूचना अगर हुकूम सेनापतीला सर्व सैन्याला कळवितां येतात. हें सर्व कशानें होतें म्हणाल तर टेलिफोनच्या तारांच्या द्वारेंच होय. मनाचें कामही याप्रमाणेंच आमच्या शरीरांत चालतें.

शिर अथवा डोकें ही वर्तुलाकार पेटी आहे. तिच्यांत मेंदू नांवाचा एक पदार्थ आहे. हा मज्जातंतु व मज्जामय द्रव्यें यांचा गोळा आहे. मेंदू शरीरांतील टेलिफोन आफिसचें मुख्य स्थान होय. सर्व शरीरभर पसरलेले ज्ञानतंतु—मज्जातंतुरूपी तारा—येथेंच येऊन मिळतात.

डोकें हें पाठीच्या कण्यावर बसविलेलें आहे. हा कणा पोकळ नळीसारखा असून हाडांचे मणके एकावर एक बसवून केलेला आहे. शरीराच्या बहुतेक भागांतील ज्ञानतंतु या नळींत येऊन मिळतात. तेथें त्याची एक दोरी बनून ती मेंदूच्या मुळापर्यंत गेलेली आहे. या दोरीला पृष्ठवंश रज्जु ( Spinal cord ) असें म्हणतात. ही दोरी ज्ञानतंतुरूपी तारांचा एक जुडगाच ( Cable ) आहे.


मन सर्व कामें मेंदू, पृष्ठवंश रज्जु, ज्ञानतंतु, या टेलिफोन साधनांच्या द्वारें, पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें यांजकडून करून घेतें. कोणतेंही काम करावें अशी मनांत इच्छा उत्पन्न होतांच, मन मेंदूमार्फत मज्जातंतूच्या द्वारें स्नायूंकडे प्रेरणा पाठवून, स्नायूंकडून काम करून घेतें. उदाहरणार्थ, हात वर उचलावा असें मनांत येतांच, मन मेंदूकडून हाताकडे गेलेल्या ज्ञानतंतूंच्या द्वारें स्नायूंना प्रेरणा पाठवितें. त्या प्रेरणेच्या ( सूचना ) योगें स्नायु आकुंचित व ताठ होतात. स्नायूंचें एक टोंक एका हाडाला व दुसरें त्याच्या खालच्या किंवा वरच्या हाडाला बांधलेलें असतें; त्यामुळें आकुंचनाचा परिणाम असा होतो कीं एक हाड दुसऱ्या हाडाकडे ओढलें जातें, म्हणजे हात वर उचलला जातो. स्नायूंचें आकुंचन हेंच शरीरांत घडणाऱ्या हालचालीचें कारण आहे.

स्नायूंचें आकुंचन ज्ञानतंतूंतून येणाऱ्या इच्छाशक्ति ( Will ) च्या प्रेरणेनें सुरू होतें. इच्छाशक्ति मनावर अवलंबून आहे. आमच्या शरीराच्या सर्व हालचाली, सर्व कामें, स्नायूंच्या आकुंचनानें होतात हें खरें आहे.


पण हें आकुंचन जेव्हां ज्ञानतंतूंतून मनाची प्रेरणा येते तेव्हां होतें. यावरून ज्ञानतंतु, मेंदू, इच्छाशक्ति व मन यांचें स्नायूंपेक्षां कितीतरी पटीनें अधिक महत्त्व आहे हें स्पष्ट होतें.

### ज्ञानतंतु, मेंदू व मन यांना व्यायाम.

आतां आपल्या शरीरांतील ज्ञानतंतूला, मेंदूला व त्यावर सत्ता चालविणारें मन यांना योग्य व्यायाम कसा घडावा, व तीं सर्व सुस्थितींत कशीं रहावीं हा विचार करण्याजोगा आहे; परंतु लोक हा विचार फारसा करीत नाहींत, त्यामुळें त्यांचा अतिशय तोटा होत आहे. याकरितां यासंबंधानें थोडेसें विवेचन करण्याचें योजिलें आहे. अपरिचित असा प्रसंग आमचेवर आल्यास आमचें धाबें दणाणून जातें, व काय करावें हें त्या प्रसंगीं सुचेनासें होतें. याकरितां प्रथम लहान, नंतर त्याहून मोठे, तदनंतर त्यापेक्षां मोठे असे क्रमानें भयोत्पादक, धोक्याचे, बिकट प्रसंग आपल्यावर बरेच आणून घेतले पाहिजेत. संकटें, हाल, कष्ट यांच्यांशीं तोंड देण्यास शिकलें पाहिजे. तयारी नसतां एकाएकीं एखाद्या कठीण प्रसंगाशीं तोंड देण्याचा प्रसंग आल्यास आमचें धैर्य खचून जातें. प्रसंगावधान न राहिल्यामुळें अशा वेळीं योग्य कार्य आमचेकडून होत नाहीं. याकरितां क्रमाक्रमानें दृढाभ्यास करून मनाचें धैर्य वाढवावें.



शिरोभाग.




आपल्या शरीरांत पसरलेलें ज्ञानतंतूंचें जाळें.

खेळांनींही हा व्यायाम कसा घडतो, याबद्दल थोडें स्पष्टीकरण करूं. प्रथम पोहणें घेऊं. नवखा मनुष्य पोहणें शिकण्याकरितां पाण्यांत पडला म्हणजे तो घाबरून जातो; त्याचा जीव कासावीस होतो, तेव्हां तो घटाघट पाणी पिऊं लागतो. पाण्यासंबंधीं भीति त्याच्या मनांत असल्यामुळें वरील प्रकार होतो. पण कांहीं दिवस त्यानें पोहण्याचा अभ्यास केला म्हणजे, पाण्याची भीति त्याला वाटत नाहीं, व पाणी म्हणजे कःपदार्थ असें त्याला होऊन जातें. पोहण्यास शिकणें हा एक मनाची पाण्याविषयींची भीति घालविण्याचा मार्ग आहे. पोहण्यानें सर्व शरीराला व्यायाम होतोच. मज्जातंतूंना पुष्टि देणारा व मनाला प्रसन्नता आणणारा पहाटेस तास अर्धातास स्वच्छ पाण्यांत पोहण्यासारखा दुसरा उपाय, दुसरें रामबाण औषध नाहीं. दुसरें उदाहरण— घोड्यावर बसण्याचें. घोड्यावर बसण्यानें स्नायूंना व ज्ञानतंतूलाही व्यायाम घडतो. घोड्यावर बसण्यास शिकणाराला घोडा उधळेल काय, आपणांस पाडील काय, उधळल्यास त्याला आवरावें कसें वगैरे नानाप्रकारचे विचार मनांत येतात व थोडी भीतिही वाटते. ह्या भीतीमुळें मन व ज्ञानतंतु, अपघात टाळण्याकरितां जय्यत तयार असतात. घोड्यावर बसण्याची संवय झाली म्हणजे

भीति मोडत जाते, नंतर पूर्वींइतका मनाला व ज्ञानतंतूला व्यायाम घडत नाहीं.

तिसरें उदाहरण,—अंधेऱ्या रात्रीं एकटा दुकटा गांवाबाहेर भयप्रद स्थलें, स्मशानें अशा ठिकाणीं जाण्याचा अभ्यास ठेवणें. अशा प्रसंगीं चोरांची, भुताखेतांची, सापाची अशी नानाप्रकारची भीति मनांत असल्यामुळें, फार हुशारीनें चालावें लागतें. मनाला व ज्ञानतंतूला शेवटपर्यंत फार सावधगिरीनें, जपून व काळजीनें काम करावें लागतें.

चवथें उदाहरण शिकारीचें होय. जंगलांत जाऊन शिकारीचा अभ्यास केल्यानें मन बरेंच तयार व निर्भय असें होतें. एकाद्या खेडेगांवचे लोक जमवून त्यांजकडून सावजें उठवून आपले समोर आणविणें व आपण झाडावर तयार केलेल्या खुर्चीवर निर्भयपणें बसून त्यांवर गोळी घालणें, अशी जी एक अलीकडे पद्धत चालूं आहे, ती मात्र खरी शिकार नव्हे.



मेंदू.

सोटे, बडगे, फार तर कुऱ्हाडी इतकेंच सामान बरोबर घेऊन कांहीं निवडक मंडळींनीं जंगलांत जाणें व ह्या साधनांनींच सावजें मारणें ही खरी शिकार होय. प्रसंगविशेषीं, वरील साधनांशिवाय सावजाशीं—वाघाशीं-नुसत्या शरीरबलानें टक्कर देण्यास तयार होणें याचेंच नांव शिकार. पण सावजाशीं लढून त्याची शिकार करण्याचे आधीं मनुष्याशीं, आपल्या संवगड्याशीं व शत्रूशीं लढण्याचा अभ्यास केला पाहिजे.

ज्ञानतंतु व मन हीं आपलीं कामें अति जलदीनें व वेगानें करितात. उदाहरणार्थ—आम्ही टणटण असा आवाज रस्त्यानें चाललों असतां ऐकितों; म्हणजे कानांतील ज्ञानतंतु आवाजाची बातमी मेंदूकडे नेतात. मन हें मेंदूमार्फत काय प्रकार आहे तें पाहून रिपोर्ट करावा असा डोळ्यांना हुकूम पाठवितें. डोळे काय प्रकार आहे तें पाहतात; आणि कोणी एक मनुष्य बायसिकलवर बसून भरधांव धांवत आहे असें कळवितात. मन हें बाजूस सरकणें बरें असा विचार करून, तसें करण्याकरितां ज्ञानतंतूद्वारें पायांचे स्नायूंना हुकूम पाठवितें. हुकूम येतांच पायांचे स्नायु आकुंचित व ताठ होतात; म्हणजे आम्ही उडी मारून दुसऱ्या बाजूस जातो. घंटा वाजणें व आमचें बाजूस होणें, या दोन्ही क्रियेंत फारसें वेळेचें अंतर नसतें. उडी मारून दुसऱ्या बाजूस जाणें ह्या क्रियेस कारणभूत अशा वर सांगितलेल्या क्रिया निमिषार्धांत ज्ञानतंतूंकडून होऊन जातात.

अशा अत्यंत शीघ्र गतीनें काम करणाऱ्या ज्ञानतंतूला व मनाला योग्य व्यायाम देऊन तयार करणें असल्यास, दुसऱ्या त्याहून चपल, चलाख अशा ज्ञानतंतूशीं व मनाशीं टक्कर लावणें म्हणजे कुस्ती खेळण्याचा अभ्यास करणें यासारखा दुसरा उपाय नाहीं. कुस्तीमध्यें आपल्यापेक्षां जास्त सशक्त व तरतरीत असा विरुद्ध गडी, केव्हां हातपाय ओढून पाडील, काय डावपेंच लढवून आपल्या छातीवर बसेल, कसें फसवील वगैरे गोष्टींबद्दल मन भयभीत व साशंक असतें. यास्तव आपल्या मनाला व ज्ञानतंतूला कुस्तीचे वेळीं डोळ्यांत तेल घालून काम करावें लागतें. यामुळें त्यांना फारच चांगला व्यायाम होतो.

कुस्तीमध्यें देखील एक प्रकार लक्षांत ठेवण्याजोगा असतो तो असा. कांहीं लोक आपल्या आखाड्यांत फार चांगली कुस्ती खेळतात. पण जर त्यांना बाहेर चारचौघांत कुस्ती खेळण्यास सांगितलें तर त्यांच्या

हातून चांगली कुस्ती खेळणें होत नाहीं. याचें कारण परिस्थिति बदलली हें होय. तशा प्रकारची संवय मनाला झालेली नसते व सर्वच अपरिचित वाटतें, म्हणून त्यांचे हातून काम चांगलें होत नाहीं. यास्तव कुस्तीचा अभ्यास करणारांनीं तालीमखान्यांत तसेंच बाहेरही खेळत रहावें. कुस्तीप्रमाणेंच मुष्टियुद्ध ( Boxing ), दांडपट्टा ( Fencing ), जपानी तऱ्हेचें शारीरिक शिक्षण ( जुजुत्स ) यांचा प्रकार आहे.

# जंगली लोकांच्या चमत्कारिक कल्पना.

फिजी बेटांत बहुतेक ' जंगली ' लोकांची वस्ती आहे. पण तेथील कित्येक चालीरीति पाहून सुधारलेल्या युरोपियनांना देखील आश्चर्य वाटण्याजोगें आहे. या लोकांत व्यक्तीला सामाजिकदृष्ट्या अस्तित्व नाहीं म्हटलें तरी चालेल. सर्व जमातीची मिळकत समाईक तत्त्वावर नाइकाच्या ताब्यांत असते. सर्व उत्पन्न जमातीनें वाटून खात जावें असा त्यांचा प्रघात होता. युरोपियन लोक प्रथम या बेटांत आले तेव्हां या लोकांनीं त्यांचें चांगलें आदरातिथ्य केलें. कांहीं दिवसांनीं एकमेकांची ओळख झाल्यावर व युरोपांतील समाजाचे रीतिरिवाज ऐकून घेतल्यावर त्यांना युरोपियनांचा द्रव्यलोभ पाहून फार आश्चर्य वाटलें. युरोपांत अत्यंत दरिद्री लोकही आहेत असें सांगितलें तरी त्यांचा विश्वास बसेना; कारण ते म्हणत " तुम्ही इतके धनधान्यांनीं समृद्ध असतांना तुमचे जातभाई गरीब किंवा उपाशी राहणें कसें शक्य आहे ? " कित्येक वर्षांमागें फिजी बेटांतील एक तरुण गृहस्थ एका युरोपियन व्यापाऱ्याकडे कारकून म्हणून राहिला. त्या महत्त्वाकांक्षी तरुणानें व्यापाराचें धोरण व हिशेबाची माहिती इतक्या लवकर संपादन केली कीं त्या युरोपियन व्यापाऱ्याचा त्याजवर लोभ जडला. नंतर त्या व्यापाऱ्यानें कांहीं किराणा माल देऊन त्या तरुणास आपल्या खेड्यांत जाऊन दुकान लावण्यास सांगितलें. आपल्या जातभाईची कमाई पाहतांच खेड्यांतील लोक आनंदानें त्याचे वाटेकरी होण्यासाठीं जमा झाले. पण त्या तरुणानें " हे जिन्नस विकण्याकरितां आणले आहेत; त्यास पैसा दिल्याशिवाय हात लावूं देणार नाहीं " असें बजावलें. आपल्या जातभाईचे हे शब्द ऐकून " तूंही युरोपियन होणार काय ? " असें रागानें विचारीत त्याचें दुकान सर्वांनीं मिळून लुटलें; व त्या तरुणास मुकाट्यानें धन्याकडे परत जावें लागलें.

२४ तासांत गुण.

# हिस्ट्रिया—वायुमुक्ता.

**किं. रु. ४–१०–० पोष्टेज निराळें.**

या औषधानें—हिस्ट्रिया, फेंफरें, आंकडी वगैरे वायूपासून होणारे तसेच इतर रोग, व स्त्रियांच्या गर्भाशयांतील हरएक रोग बरे होतात. ह्याबद्दल प्रत्येकानें आपली खात्री करून सर्टिफिकेट मात्र पाठविण्याचें करावें.

**छगनलाल लल्लुभाई देशीनामावाले, डभोई–बडोदा.**

# दोन राजकन्या.

एकुलती एक मुलगी व त्यांतून राजाची, मग तिचे लाड आणि कोड कौतुक काय विचारावयाचे ? आणि या सर्वांचा परिणाम जो व्हावयाचा, तोच झाला. राजकन्या कांहीं आतां नेणतें मूल नव्हती; तिला आतां चांगलें समजत होतें. पण तिचा हटवादीपणा आणि चिडखोरपणा नेहमीं वाढतच चालला होता. ती नोकराचाकरांशीं नेहमीं उर्मटपणानें वागे, व दासींशीं नेहमीं ओरडून व रागावून बोले; इतकेंच नव्हे तर आईबापांशींही ती कधीं गोड शब्द बोलली नाहीं. ती नेहमीं रुसलेली असावयाची; व तिला खुष ठेवण्याकरितां रात्रंदिवस प्रयत्न करीत असतांही आईबापांना तिचा चेहरा आनंदी दिसेना. या तिच्या स्वभावामुळें तिलाही सुख लागत नसे, व जवळच्या इतर मंडळींनांही लागत नसे.

राजवाड्याजवळील बागेंत नेहमीं एक वनदेवता येत असे; तिनें हा प्रकार पाहिला. व तिनें राजकन्येस ताळ्यावर आणण्याचा बेत केला.

आपल्या अदृश्य रूपानें ती त्या राजधानीवरून संचार करीत असतां, तिनें अंगावर एक फाटकें चिरगुट व डोक्यावर एक पाटी घेऊन एका लहानशा गल्लींतून रडत चाललेली एक लहान मुलगी पाहिली. तिचें वय व तोंडावळाही जवळ–जवळ राजकन्येसारखाच पाहून वनदेवता एका गरीब म्हातारीचें रूप घेऊन तिजजवळ गेली, आणि तिला तिनें रडण्याचें कारण विचारिलें.

‘ मला आईबाप नाहींत. मी आपल्या आतेजवळ असतें. ती माझ्याजवळून खूप काम करून घेते, पण पोटभर खायला कधींही देत नाहीं; व मला अतिशय मारते, ’ त्या मुलीनें रडत रडतच सांगितलें.

‘ बरं बाळ रडूं नकोस. आज रात्रीं कांहीं चमत्कार होईल, व उद्यांपासून तुला कांहींही त्रास होणार नाहीं. ’ असें म्हणून वनदेवता अंतर्धान पावली.

रात्रीं वनदेवतेनें त्या भाजीवाल्या पोरीच्या खोपटांत जाऊन हलकेंच त्या मुलीला उचलून राजवाड्यांत नेलें व तिला राजकन्येचे कपडे घालून व राजकन्येच्या जागेवर निजवून, राजकन्येला त्या झोंपडींतल्या कोंपऱ्यांत आणून टाकिलें. आणि वनदेवता निघून गेली.

सकाळीं पाठींत एक रपाटा बसल्यामुळें, राजकन्या जागी झाली, व पहाते तों आपल्याजवळ आपल्या दासींपैकीं कोणीही उभी नसून, म्हातारीशी एक खाष्ट बाई एका लांकडानें आपणास मारीत आहे, व तोंडानें म्हणत आहे:—‘ कारटे, अजून तूं निजलेलीच कां ? मग केव्हां तूं गिळायच्या वेळेला उठणार होय ? कांहीं काम नाहीं केलेंस तर तुझ्यापुढें गिळायला तरी काय ठेवूं ? ’

‘ हें काय ? मी येथें कुठें आलें ? ’ असें राजकन्या रडत–रडत आपल्याशीं म्हणत आहे, तोंच तिच्या पाठींत आणखी एक लांकूड बसलें; आणि ‘ कारटे, तूं इथेंच आली आहेस तरफडायला माझ्या उरावर, आतां उठतेस कां मारूं एक कंबरेंत लाथ ? ’ असें म्हणत त्या बाईनें तिला खसकून ओढलेंच; आणि तिच्या डोक्यावर एक भाजीची पाटी ठेवून ती म्हणाली, ‘ चल हो पुढें, मला आज किती उशीर झाला तुझ्यामुळें. ’ राजकन्या स्फुंदत–स्फुंदत मुकाट्यानें चालूं लागली.


वाटेनें ती बाई “ घ्या भाजी आळूची, करडईची, आंबट चुका, मेथी, तांबडा भोपळा, वांगी, भेंड्या, गवारी, बटाटे ” असें ओरडत चालली. पण राजकन्या मात्र कांहींच म्हणत नाहीं असें पाहून कांहीं वेळानें तिच्या अंगावर ओरडून ती बाई म्हणते

' अवदसे, तूं ओरड ना ? माझा घसा ओरडून ओरडून आतां दुखायला लागला. ' राजकन्या मुकाट्यानें त्या बाईप्रमाणें ' घ्या भाजी अळूची ' म्हणून ओरडूं लागली.

राजवाड्याबाहेर कधीं चार पावलेंही पायीं बाहेर जाण्याचें माहीत नसलेली राजकन्या, या डोक्यावर पाटी घेऊन चालण्यानें व घसा फोडून ओरडण्यानें लवकरच थकून गेली यांत नवल काय ? त्यांतून सकाळपासून तिच्या पोटांतही कांहीं नव्हतें; पण ती थोडीशी जरी मागें राहिली तरी शेलक्या शेलक्या शिव्या व मधून मधून रट्टेही तिचा समाचार घेण्यास होत्याच.

दोन प्रहरपर्यंत याप्रमाणें फिरणें झाल्यानंतर घरीं आल्यावर त्या बाईनें कांहीं भाकऱ्या व थोडसें तिखट तिच्यापुढें ठेविलें; व राजकन्येनेंही कांहीं एक कुरकूर न करितां त्या खाल्ल्या, आणि तिला आज त्या गोडही लागल्या.

दुपारीं ती भाजीवाली कोठें थोडी बाहेर गेली, तेव्हां राजकन्या एका कोंपऱ्यांत पडून आपल्या दुर्दैवाचा विचार करूं लागली. राजवाड्यांत आपले नेहमीं होणारे लाड व चैनी तिला आतां आठवल्या व त्यांचें खरें सौख्य तिला आतां कळून आलें. आणि इतक्या चांगल्या स्थितींतही आपण किती असमाधानानें राहून, जवळपासच्या मंडळींना किती त्रास देत होतों, हें आठवून तिला फार वाईट वाटलें. ' आपल्या या स्वभावामुळेंच त्रासून आपल्या आईबापांनीं आपल्याला येथें टाकून दिलें नाहीं ना ? ' असेंही तिच्या मनांत आलें. एका आठ दहा तासांतच तिच्या स्वभावांतील उर्मटपणा, हट्टीपणा व हेकेखोरपणा निघून जाऊन ती अगदीं गरीब झाली होती. ' देवा, मला पुन्हां माझ्या राजवाड्यांत जाऊं दे, मी आपल्यामुळें पुन्हां कधींही कोणाला थोडासासुद्धां त्रास होऊं देणार नाहीं, ' असें म्हणून तिनें जमिनीवर डोकें टेकलें. इतक्यांत ती भाजीवाली बाई आली असें पाहतांच, पाण्यांनीं भरलेले आपले डोळे पुसून ती चटकन् उठून उभी राहिली; व आतां संध्याकाळ होत आली असल्यामुळें पुन्हां डोक्यावर भाजीची पाटी घेऊन, त्या बाईबरोबर ' घ्या भाजी आळूची ....' करीत चालली.



याप्रमाणें शहरांतील एका मोठ्या रस्त्यानें गाडी चालली असतां, डोक्यावर भाजीची पाटी घेऊन समोरून येणाऱ्या खऱ्या राजकन्येनें ती पाहिली.

इकडे ती भाजीवाली मुलगी सकाळीं उठून पहाते तों आपण आपल्या फाटक्या रकट्यावर नसून पलंगावर मऊमऊ गादीवर निजलों आहों. जवळ सडक्या कांदाबटाट्यांचा ढीग नसून निरनिराळ्या प्रकारच्या शोभिवंत वस्तु व्यवस्थित तऱ्हेनें मांडलेल्या आहेत. व आपल्या भोंवताली चारपांच दासी आपण केव्हां उठतों याची वाटच पहात उभ्या आहेत. तिला लागलींच संध्याकाळच्या म्हाताऱ्या बाईची आठवण झाली, व तिनें सांगितलेलाच हा चमत्कार असावा असें तिनें ताडलें, व म्हणून कांहींही न बोलतां काय होतें तें पहावयाचें असा तिनें निश्चय केला.

ती उठून बसतांच दासींनीं तिच्या अंगावरचें पांघरूण काढलें, व जवळच्या मोरीवर तोंड धुण्यास ऊन ऊन पाणी वगैरे आणून ठेविलें. तिनें तोंड धुतांच, त्यांनीं तिच्या हातांत तोंड पुसण्यास रुमाल दिला.

नंतर त्यांनीं तिला दुसरे कपडे घातले. पण हें सर्व होत असतांना बाईसाहेब आज न रागावतां आरडतां ओरडतां सर्व गोष्टी करून घेत आहेत; इतकेंच नव्हे तर सर्वजणींकडे हंसत पहात आहेत याचें त्यांना नवल वाटलें; व आमच्या बाईसाहेबांना नेहमीं अशीच सद्बुद्धि दे अशी त्यांनीं मनांत ईश्वराची प्रार्थना केली.

जेवावयाचे वेळीं तिला येतांना दुरून पहातांच राजाराणींनीं 'ये बाळ' म्हणून तिला जवळ बोलाविलें. तिचें त्यांच्याशीं नवें झालेलें नातें तिनें ओळखलें होतेंच. जवळ जातांक्षणींच मोठ्या आदरानें त्यांना नमस्कार करून ती त्यांच्याजवळ बसली. राजकन्येच्या वृत्तींत आज फार फरक पडला आहे, ही गोष्ट त्यांच्या कानावर आली होतीच. तिचें हें प्रत्यक्ष प्रत्यंतर पहातांच त्यांना फार कौतुक वाटलें, व त्यांनीं तिला मोठ्या प्रेमानें कुरवाळलें. जेवतांना तिचें तें नम्रपणाचें व प्रेमळपणाचें बोलणें वगैरे पाहून, त्यांना फारच आनंद झाला, व आपल्या मुलीस एकाएकीं अशी सद्बुद्धि उत्पन्न झाल्याबद्दल त्यांनीं देवाचे आभार मानले.

त्यांनीं तो सर्व दिवस आपल्या मुलीचें कौतुक करण्यांत घालविला; व राजकन्येचें हास्यमुख सर्व प्रजाजनांना दाखवावें म्हणूनच कीं काय संध्याकाळीं त्यांनीं शहरांतून फिरून येण्याचा बेत केला. चार घोड्यांच्या गाडींत आईबापांच्याजवळ बसलेली ही नवी राजकन्या हास्यमुखानें प्रजाजनांचे मुजरे घेऊं लागली. राजकन्येच्या वृत्तींतील फरक लोकांच्याही नजरेंत आल्यावांचून राहिला नाहीं.

याप्रमाणें शहरांतील एका मोठ्या रस्त्यानें गाडी चालली असतां, डोक्यावर भाजीची पाटी घेऊन समोरून येणाऱ्या खऱ्या राजकन्येनें ती पाहिली. आपल्या बापाची ती गाडी तिनें दुरूनच ओळखिली; व धांवतच पुढें जाऊन ती गाडीवर चढली; आणि 'आई, बाबा, मी पुन्हां नाहीं तुम्हांला त्रास देणार; मला टाकूं नका,' असें म्हणून तिनें त्यांना मिठी मारली.

राजाराणींनीं तिच्याकडे निरखून पाहिलें, व नव्या राजकन्येकडे पाहिलें; आणि त्यांनीं खऱ्या राजकन्येस ओळखिलें. 'हीच आपली मुलगी' राजा राणीस म्हणतो; 'पण तर मग ही कोण? कोण ग बाळ तूं आणि तूं इथें कशी आलीस?' त्यानें भाजीवाल्या मुलीकडे पाहून विचारिलें. 'तें मला नाहीं माहीत,' गोंधळून व कांपत कांपत त्या मुलीनें उत्तर केलें;—'मला आईबाप नाहींत. मी आपल्या भाजीवाल्या आतेजवळ रहातें. ती मला खाऊं घालीत नाहीं आणि खूप मारते. मी काल आपल्या झोंपडींत कोंपऱ्यांत निजलें होतें, व सकाळीं जागी झालें, तों मी राजवाड्यांत होतें.'

'आणि मी रात्रीं आपल्या पलंगावर निजलें होतें; आणि सकाळीं जागी झाल्यावर पहातें तों त्या भिकारड्या झोंपडींत;' खरी राजकन्या स्फुंदत स्फुंदत म्हणाली.

'हें कसें काय झालें? हें कोणाचें काम?' राजानें आपल्याशींच मोठ्यानें म्हटलें.

'काल संध्याकाळीं एक म्हातारीबाई मला म्हणाली होती कीं आज रात्रीं एक चमत्कार होणार आहे; आणि त्यामुळें उद्यांपासून तुझा सर्व त्रास नाहींसा होईल;' भाजीवाली मुलगी बोलली.

'तर मग हें तिचेंच काम! कुठें आहे ती म्हातारी? तिला आधीं शोधून काढिलें पाहिजे,' असें म्हणून राजानें शिपाई सर्वकडे शोधास धाडले; पण म्हातारीचा पत्ता लागला नाहीं.

राजाराणींनीं दोघींही मुलींना पोटाशीं कवटाळलें; त्यांना आतां त्या भाजीवाल्या मुलीबद्दलही प्रेम उत्पन्न झालें होतें, म्हणून त्यांनीं तिला आपले जवळच ठेवून घेतलें, व राजकन्येसारखेच वाढविलें.

खऱ्या राजकन्येच्या स्वभावांतही आतां अगदीं फरक झाला होता. दोघीही राजकन्या तेव्हांपासून बहिणीबहिणीसारख्या राहूं लागल्या.

' अवदसे, तूं ओरड ना ? माझा घसा ओरडून ओरडून आतां दुखायला लागला. ' राजकन्या मुकाट्यानें त्या बाईप्रमाणें ' घ्या भाजी अळूची ' म्हणून ओरडूं लागली.

राजवाड्याबाहेर कधीं चार पावलेंही पायीं बाहेर जाण्याचें माहीत नसलेली राजकन्या, या डोक्यावर पाटी घेऊन चालण्यानें व घसा फोडून ओरडण्यानें लवकरच थकून गेली यांत नवल काय ? त्यांतून सकाळपासून तिच्या पोटांतही कांहीं नव्हतें; पण ती थोडीशी जरी मागें राहिली तरी शेलक्या शेलक्या शिव्या व मधून मधून रट्टेही तिचा समाचार घेण्यास होत्याच.

दोन प्रहरपर्यंत याप्रमाणें फिरणें झाल्यानंतर घरीं आल्यावर त्या बाईनें कांहीं भाकऱ्या व थोडसें तिखट तिच्यापुढें ठेविलें; व राजकन्येनेंही कांहीं एक कुरकूर न करितां त्या खाल्ल्या, आणि तिला आज त्या गोडही लागल्या.



याप्रमाणें शहरांतील एका मोठ्या रस्त्यानें गाडी चालली असतां, डोक्यावर भाजीची पाटी घेऊन समोरून येणाऱ्या खऱ्या राजकन्येनें ती पाहिली.

दुपारीं ती भाजीवाली कोठें थोडी बाहेर गेली, तेव्हां राजकन्या एका कोंपऱ्यांत पडून आपल्या दुर्दैवाचा विचार करूं लागली. राजवाड्यांत आपले नेहमीं होणारे लाड व चैनी तिला आतां आठवल्या व त्यांचें खरें सौख्य तिला आतां कळून आलें. आणि इतक्या चांगल्या स्थितींतही आपण किती असमाधानानें राहून, जवळपासच्या मंडळींना किती त्रास देत होतों, हें आठवून तिला फार वाईट वाटलें. ' आपल्या या स्वभावामुळेंच त्रासून आपल्या आईबापांनीं आपल्याला येथें टाकून दिलें नाहीं ना ? ' असेंही तिच्या मनांत आलें. एका आठ दहा तासांतच तिच्या स्वभावांतील उर्मटपणा, हट्टीपणा व हेकेखोरपणा निवून जाऊन ती अगदीं गरीब झाली होती. ' देवा, मला पुन्हां माझ्या राजवाड्यांत जाऊं दे, मी आपल्यामुळें पुन्हां कधींही कोणाला थोडासासुद्धां त्रास होऊं देणार नाहीं, ' असें म्हणून तिनें जमिनीवर डोकें टेकलें. इतक्यांत ती भाजीवाली बाई आली असें पाहतांच, पाण्यांनीं भरलेले आपले डोळे पुसून ती चटकन् उठून उभी राहिली; व आतां संध्याकाळ होत आली असल्यामुळें पुन्हां डोक्यावर भाजीची पाटी घेऊन, त्या बाईबरोबर ' घ्या भाजी आळूची....' करीत चालली.

इकडे ती भाजीवाली मुलगी सकाळीं उठून पहाते तों आपण आपल्या फाटक्या रकट्यावर नसून पलंगावर मऊमऊ गादीवर निजलों आहों. जवळ सडक्या कांद्याबटाट्यांचा ढीग नसून निरनिराळ्या प्रकारच्या शोभिवंत वस्तु व्यवस्थित तऱ्हेनें मांडलेल्या आहेत. व आपल्या भोंवताली चार-पांच दासी आपण केव्हां उठतों याची वाटच पहात उभ्या आहेत. तिला लागलींच संध्याकाळच्या म्हाताऱ्या बाईची आठवण झाली, व तिनें सांगितलेलाच हा चमत्कार असावा असें तिनें ताडलें, व म्हणून कांहींही न बोलतां काय होतें तें पहावयाचें असा तिनें निश्चय केला.

ती उठून बसतांच दासींनीं तिच्या अंगावरचें पांघरूण काढलें, व जवळच्या मोरीवर तोंड धुण्यास ऊन ऊन पाणी वगैरे आणून ठेविलें. तिनें तोंड धुतांच, त्यांनीं तिच्या हातांत तोंड पुसण्यास रुमाल दिला.

नंतर त्यांनीं तिला दुसरे कपडे घातले. पण हें सर्व होत असतांना बाईसाहेब आज न रागावतां आरडतां ओरडतां सर्व गोष्टी करून घेत आहेत; इतकेंच नव्हे तर सर्वजणींकडे हंसत पहात आहेत याचें त्यांना नवल वाटलें; व आमच्या बाईसाहेबांना नेहमीं अशीच सद्बुद्धि दे अशी त्यांनीं मनांत ईश्वराची प्रार्थना केली.

जेवावयाचे वेळीं तिला येतांना दुरून पहातांच राजाराणींनीं 'ये बाळ' म्हणून तिला जवळ बोलाविलें. तिचें त्यांच्याशीं नवें झालेलें नातें तिनें ओळखलें होतेंच. जवळ जातांक्षणींच मोठ्या आदरानें त्यांना नमस्कार करून ती त्यांच्याजवळ बसली. राजकन्येच्या वृत्तींत आज फार फरक पडला आहे, ही गोष्ट त्यांच्या कानावर आली होतीच. तिचें हें प्रत्यक्ष प्रत्यंतर पहातांच त्यांना फार कौतुक वाटलें, व त्यांनीं तिला मोठ्या प्रेमानें कुरवाळलें. जेवतांना तिचें तें नम्रपणाचें व प्रेमळपणाचें बोलणें वगैरे पाहून, त्यांना फारच आनंद झाला, व आपल्या मुलीस एकाएकीं अशी सद्बुद्धि उत्पन्न झाल्याबद्दल त्यांनीं देवाचे आभार मानले.

त्यांनीं तो सर्व दिवस आपल्या मुलीचें कौतुक करण्यांत घालविला; व राजकन्येचें हास्यमुख सर्व प्रजाजनांना दाखवावें म्हणूनच कीं काय संध्याकाळीं त्यांनीं शहरांतून फिरून येण्याचा बेत केला. चार घोड्यांच्या गाडींत आईबापांच्याजवळ बसलेली ही नवी राजकन्या हास्यमुखानें प्रजाजनांचे मुजरे घेऊं लागली. राजकन्येच्या वृत्तींतील फरक लोकांच्याही नजरेंत आल्यावांचून राहिला नाहीं.

याप्रमाणें शहरांतील एका मोठ्या रस्त्यानें गाडी चालली असतां, डोक्यावर भाजीची पाटी घेऊन समोरून येणाऱ्या खऱ्या राजकन्येनें ती पाहिली. आपल्या बापाची ती गाडी तिनें दुरूनच ओळखिली; व धांवतच पुढें जाऊन ती गाडीवर चढली; आणि 'आई, बाबा, मी पुन्हां नाहीं तुम्हांला त्रास देणार; मला टाकूं नका,' असें म्हणून तिनें त्यांना मिठी मारली.

राजाराणींनीं तिच्याकडे निरखून पाहिलें, व नव्या राजकन्येकडे पाहिलें; आणि त्यांनीं खऱ्या राजकन्येस ओळखिलें. 'हीच आपली मुलगी' राजा राणीस म्हणतो; 'पण तर मग ही कोण? कोण ग बाळ तूं आणि तूं इथें कशी आलीस?' त्यानें भाजीवाल्या मुलीकडे पाहून विचारिलें. 'तें मला नाहीं माहीत,' गोंधळून व कांपत कांपत त्या मुलीनें उत्तर केलें;—'मला आईबाप नाहींत. मी आपल्या भाजीवाल्या आतेजवळ रहातें. ती मला खाऊं घालीत नाहीं आणि खूप मारते. मी काल आपल्या झोंपडींत कोंपऱ्यांत निजलें होतें, व सकाळीं जागी झालें, तों मी राजवाड्यांत होतें.'

'आणि मी रात्रीं आपल्या पलंगावर निजलें होतें; आणि सकाळीं जागी झाल्यावर पहातें तों त्या भिकारड्या झोंपडींत;' खरी राजकन्या स्फुंदत स्फुंदत म्हणाली.

'हें कसें काय झालें? हें कोणाचें काम?' राजानें आपल्याशींच मोठ्यानें म्हटलें.

'काल संध्याकाळीं एक म्हातारीबाई मला म्हणाली होती कीं आज रात्रीं एक चमत्कार होणार आहे; आणि त्यामुळें उद्यांपासून तुझा सर्व त्रास नाहींसा होईल;' भाजीवाली मुलगी बोलली.

'तर मग हें तिचेंच काम! कुठें आहे ती म्हातारी? तिला आधीं शोधून काढिलें पाहिजे,' असें म्हणून राजानें शिपाई सर्वकडे शोधास धाडले; पण म्हातारीचा पत्ता लागला नाहीं.

राजाराणींनीं दोघींही मुलींना पोटाशीं कवटाळलें; त्यांना आतां त्या भाजीवाल्या मुलीबद्दलही प्रेम उत्पन्न झालें होतें, म्हणून त्यांनीं तिला आपले जवळच ठेवून घेतलें, व राजकन्येसारखेंच वाढविलें.

खऱ्या राजकन्येच्या स्वभावांतही आतां अगदीं फरक झाला होता. दोघीही राजकन्या तेव्हांपासून बहिणीबहिणींसारख्या राहूं लागल्या.

---

# नाणें धातूचेंच कशाला पाहिजे ?

[ लेखक—हिमांशु. ]

देवघेवीचा व्यवहार फार त्रास न पडतां होण्यास नाणें फार जरूर आहे, हें सर्वांस माहीतच आहे. पण आपल्या मनांत कधीं कधीं असा प्रश्न येतो कीं, ' हें नाणें धातूचेंच कशाला पाहिजे ? तें कागदाचें, कातड्याचें, हस्तिदंताचें, कांचेचें अगर हिऱ्याचें कां करीत नाहींत ? अगर एखाद्या धान्याचाच नाण्यासारखा कां उपयोग करीत नाहींत ? जेथें एक रुपया द्यावयाचा तेथें आपलें एक दोन पायली तें धान्य द्यावयाचें असें ठरवावें म्हणजे झालें. हें धातूचें नाणेंच कशाला हवें ?' तर याचीं कारणें अनेक आहेत; त्यांपैकीं दोन तीन मुख्य कारणांचाच आपण येथें विचार करूं.

( १ ) पहिलें मुख्य कारण म्हटलें म्हणजे धातूचें नाणें ' आटोपसर ' असतें. धातू हा इतर बहुतेक सर्व पदार्थांपेक्षां—वजनाच्या दृष्टीनें विचार केला तर—महाग असल्यामुळें थोड्या वजनांत पुष्कळशी किंमत जवळ ठेवण्यास धातूसारखा सोईचा पदार्थ क्वचितच. २५ रु. किमतींत कोणकोणता पदार्थ किती किती मिळतो, हें पाहिलें म्हणजे व्यवहारांत उपयोगाकरितां यापैकीं 'आटोपसर' जिन्नस कोणता हें सहज लक्षांत येतें. साधारण मानानें २५ रुपयांत बाजरी ४ पोतीं, तांदूळ दोन पोतीं, साखर एक पोतें, कापूस ८ मण, तांबे १८ शेर, हस्तीदंत ६० तोळे, रुपें ३० तोळे व सोनें १ तोळा याप्रमाणें जिन्नस येतील. यावरून इतर वस्तूंच्या मानानें धातू जवळ वागविण्यास ' किती आटोपसर ' असतात हें लक्षांत येतें.

( २ ) धातूंच्या नाण्याचा दुसरा गुण म्हणजे ' टिकाऊपणा. ' नाणें कागद, कातडें वगैरेचें असल्यास उन्हानें, पाण्यानें किंवा हवेनेंही खराब होईल; कांचेचें, चिनीमातीचें वगैरे असल्यास फुटून जाईल; धान्यासारखा कांहीं जिन्नस नाण्यासारखा उपयोगांत आणावयाचें ठरविलें तर कुजून नासून जाण्याची भीति आहेच; धातूचें नाणें जसें आपल्याजवळ वर्षानुवर्ष ठेवितां येतें, तसे हे इतर पदार्थ ठेवितां येणार नाहींत. शंभर वर्षांमागें कोणी पुरून ठेविलेली ठेव जरी आतां सांपडली, तरी तें सोनें फाटलेलें असणार नाहीं कीं तुटलेलें असणार नाहीं; किडलेलें असणार नाहीं कीं कुजलेलेंही असणार नाहीं.

( ३ ) तिसरी गोष्ट म्हणजे धातूंच्या नाण्यांत साधारण मनुष्यही सहसा फसण्याचा संभव नसतो. धातूंचा आवाज, रंग, वजन वगैरे साधारण मनुष्यासही सहज समजण्यासारखें असल्यामुळें त्यामध्यें फसण्याचा संभव फार कमी. पण तेच हिरे, मोतीं वगैरे जिन्नस धातूंसारखेच अगर त्यांहून जास्तही मौल्यवान असतात, म्हणून त्यांचा जर नाण्यासारखा उपयोग करण्याचें ठरविलें तर साधारण लोकांस कांहीं त्यांची परीक्षा नसते, तेव्हां ते त्यांत नेहमीं फसतील.

एखाद्या धान्याचा उपयोग नाण्यासारखा केला तर त्यांतही ' हलक्या ' भावाचें धान्य ' भारी ' भावाचें म्हणून देण्याचे लबाडीचे प्रकार व्हावयाचे.

या सर्व कारणांकरितां व्यवहारांत धातूंचें नाणेंच वापरणें सोईचें असतें.

# प्रयत्न कीं दैव?

[ लेखक—वामन कृष्ण चोळकर ]

मनुष्य प्राण्याचें कर्तृत्व खरोखरच प्रयत्नाधीन आहे काय ? तो म्हणेल तें तो करूं शकेल हें खरें आहे काय ?

" मदायत्तंच पौरुषं " ही कर्णाची उक्ति प्रसिद्ध आहे. तिचाच आपण विचार करूं लागलों तर कर्णा-सारख्या तेजस्वी पुरुषाच्या हातून तरी ती कितपत सार्थ झाली ? कर्णानें आपल्या दर्पोक्तिप्रमाणें काय केलें ? प्रयत्नांत त्यानें कोठें कसूर केली असें तर दिसत नाहीं; साधन-सामुग्रीही त्याजपाशीं भरपूर होती. मग त्याला यश कां मिळालें नाहीं ? अर्जुनाचा पराभव होऊन कर्णाला रणांगणांत विजयश्री कां प्राप्त झाली नाहीं ? त्याचा परम मित्र व धनी दुर्योधन याचें प्रिय त्याला प्रयत्न-साध्य झालें काय ? नाहीं.

हें झालें पौराणिक उदाहरण. आतां गेल्या शतः कांतील ऐतिहासिक दाखला पहावयाचा झाल्यास नेपो-लियनचें चरित्र नजरेसमोर उभें राहतें. काय त्याचा पराक्रम ! केवढा त्याचा आत्मविश्वास ! दैव अनुकूल होतें तोंपर्यंत यश आणि सिद्धि जणूं काय त्याच्या आधीन ! पण दैव प्रतिकूल होतांच तो म्हणेल तसें होण्याचें त्याचें ऐश्वर्य पार मावळलें; व प्रयत्न लटका पडला !

गत-कालीन थोर व्यक्तींच्या गोष्टी सोडून प्रस्तुत काळांतील साधारण माणसांच्या स्थितीकडे लक्ष दिल्या-सही पुरुषार्थ केवळ प्रयत्नसाध्य आहे हें म्हणणें सर्वस्वीं पटत नाहीं. कोणीं क्षात्रकुलोत्पन्न शूर पुरुष परा-क्रम गाजवण्याच्या इच्छेनें रणांगणावर जाण्यास निघतो. रणक्षेत्राचें दर्शन होण्यापूर्वींच तो ज्या आगबोटीं-तून प्रवास करीत आहे ती आगबोट अकल्पित कार-णांनीं वरील सर्व सजीव-निर्जीव वस्तूंसह समुद्राच्या तळाशीं जाते ! आमच्या क्षत्रिय कुलावतंसाचे मनोरथ दरिद्री पुरुषाच्या मनोरथाप्रमाणें जागच्या जागीं लय पावतात. यांत प्रयत्नसिद्धि कोठें गेली ? दुसरा दाखला एका व्यापाऱ्याचा घ्या. हल्लीं चालू असलेल्या महायुद्धापूर्वीं त्याचा धंदा उत्कृष्ट चालत होता. महायुद्धाची दैवी आपत्ति गुदरतांच आंतबट्टा येऊं लागला. भगीरथ प्रयत्न केले तरी ते व्यर्थ जाऊन दीड-दोन वर्षांत त्याचें दिवाळें निघण्यापर्यंत पाळी आली. येथें प्रयत्नानें पूर्वींप्रमाणें किफायत होण्याचें कां बंद झालें ? हेंच उदाहरण उलट बाजूनें घेऊन पूर्वीं न होणारा नफा हल्लीं युद्धामुळें होऊं लागला असें समजल्यास त्यांतही प्रयत्नाची थोरवी मुळींच दिसून येणार नाहीं.

दृष्टांताकरितां घेतलेल्या वरील सर्व उदाहरणांवरून दैव केवळ प्रयत्नाधीन आहे हें म्हणणें लंगडें पडतें. विदुरानें सांगितलेली सर्व नीति ऐकल्यावर अखेरीस धृतराष्ट्र त्याला म्हणतो:—" बा विदुरा ! तूं सांगित-लेल्या सर्व गोष्टी मला पटतात; पण त्याप्रमाणें वाग-ण्याची बुद्धि मला होत नाहीं यावरून दैव बलवत्तर आहे हेंच खरें. "

तर मग मनुष्य सर्वस्वीं दैवाधीन आहे, सबब त्यानें कांहीं एक न करतां स्वस्थ खाटल्यावर पडून रहावें, असें कोणी म्हटल्यास तें वाजवी होईल काय ? मुळींच नाहीं. अगदीं स्वस्थ बसणारा प्राणी जिवंतच राहणार नाहीं; व जगावें अशी प्रत्येक प्राण्याची इच्छा अस-ल्यामुळें त्याला उद्योग करणें प्राप्तच आहे. म्हणून निवळ दैवावर भरंवसा ठेवून बसणारास दगडाचीच उपमा साजेल. प्रत्येक व्यक्तीनें आपली उन्नति होण्या-करितां सज्जन-संमत मार्गानें अटोकाट प्रयत्न केला पाहिजे व तो केल्यावर यश व सिद्धि मिळाली नाहीं


तरी हताश न होतां परमेश्वराचें स्मरण करून फिरून प्रयत्न केला पाहिजे. अटोकाट प्रयत्न केला असतां यशप्राप्ति ठेवलेलीच अशा भावनेनें व अभिमानानें जो कार्यास प्रवृत्त होईल त्याला सिद्धीच्या अभावीं असह्य दु:ख होईल. या गूढ सृष्टींत कल्पनातीत अशा अनंत गोष्टी भरलेल्या आहेत. त्यांचे कार्य-कारण संबंध, मनुष्याची बुद्धि कितीही विशाल व खोल असली तरी तिला आकलन होणें शक्य नाहीं, हा जगांतील तत्त्ववेत्यांचा अनुभव आहे; तो ध्यानांत आणून प्रत्येकानें वागलें पाहिजे. पौरुष अथवा पराक्रम ही माझ्या हातची गोष्ट आहे—ती प्रयत्नसाध्य आहे—दैवाधीन नाहीं, असा अहंकार मनांत बाळगूं नये; येवढेंच सांगण्याचा या लहानशा लेखाचा हेतू आहे. हीच गोष्ट भगवंताच्या पुढील वचनांत आहे.

**कर्मण्येवाऽधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥**

# दामोदर मासा.

कोलंबसाचें नांव आमच्या वाचकांना माहीत आहेच. त्यानें अनेक जलपर्यटणें केलीं. पैकीं १४९४ मध्यें केलेल्या त्याच्या दुसऱ्या सफरींत त्याला ज्या जातीचे मासे व कोळी दिसले तसे इतरत्र कोठेंच आढळले नाहींत असें म्हणतात. ही गोष्ट स्वतः कोलंबसानेंच लिहून ठेवली होती; व त्यानें आपले सर्व हस्तलिखित ग्रंथ बर्नाल्देज नांवाच्या लेखकाकडे दिले. पुढें त्या ग्रंथांचें काय झालें तें कळत नाहीं. पण या लेखकानें लिहिलेल्या पुस्तकांत कोलंबसाच्या प्रवासाची हकीकत तेरा भागांत आणली आहे. त्यांत या चमत्कारिक माशाची गोष्ट आहे, व ती मूळ कोलंबसानें लिहिलेल्या मजकुरावरून घेतली असावी असा तर्क आहे. ती गोष्ट अशी—

"कोलंबस व त्याचे स्पानिश मित्र आपल्या जहाजांतून 'क्यूबा' बेटाच्या आसपास पोहोंचले; त्यावेळीं त्यांना कांहीं कोळी होडींत बसून मासे धरण्यांत गुंतले आहेत असें दिसलें. पण मासे धरण्याचा त्यांचा प्रकार फारच चमत्कारिक दिसला. त्या कोळ्याजवळ एक कांबलचक मासा होता. त्याला मध्यभागीं एका दाव्यानें किंवा दोरीनें बांधून ते समुद्रांत टाकीत. त्या माशाच्या डोक्यावर एक तुरा होता. त्याच्या योगानें तो इतर माशांना शोधून घेई; व त्या तुऱ्यास दुसरा मासा एक वेळ चिकटला कीं तो सुटण्याची भीति नसे. नंतर कोळी दोरी ओढून दोन्ही मासे वर काढीत; नवीन मासा होडींत ठेवून घेऊन हा 'दामोदर' (दावें ज्याच्या पोटास आहे तो) मासा पुनः पाण्यांत टाकीत."



**दामोदर मासा व त्याचा उपयोग करणारे खलाशी.**

या इतिहासप्रसिद्ध माशाचें तत्कालीन चितार्‍यानें काढलेलें चित्र येथें दिलें आहे.

या गोष्टींत कितपत तथ्य असावें याबद्दल प्राचीनेतिहाससंशोधकांत वाद आहे; कारण अशा प्रकारचे कोळी व मासे आज आढळत नाहींत.

म. ग्रं. सं. ठाणें.

# थंडी न होण्यास सोपा उपाय.

पावसाळ्यांत व हिवाळ्यांत बहुतेकांना थंडी बाधते; व थोडी हयगय झाल्यास त्यास मोठें स्वरूप येऊन भयंकर दुखणें बनतें. यासाठीं थंडीची बाधाच न होण्यास काय उपाय आहे याची माहिती वाचकांना देणें अधिक उपयोगाचें होईल. आजारी पडून औषधानें तो निस्तरीत बसण्यापेक्षां तो आजारच टाळतां आला तर बरें.

हा उपाय अगदीं साधा आहे. पण तो इतका साधा आहे कीं, त्यामुळेंच पुष्कळ लोकांना त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. सकाळीं उठल्याबरोबर एक तांब्याभर थंड पाणी घेऊन त्यानें डोक्यापासून पायांपर्यंत सर्वांग धुऊन टाका. हें काम एक दोन मिनिटांत केलें पाहिजे. धुतल्याबरोबर पंचानें अंग पुसून चांगलें कोरडें करावें; व मग कपडे घालावे.

आठ पंधरा दिवस नेमानें याप्रमाणें केलें तर ही संवय आपोआप जडते, ती मग सहसा सुटत नाहीं. कारण थंड पाण्यानें अंग धुतलें असतां जी हुषारी येते ती इतर कोणत्याही उपायानें येत नाहीं. शरीराला थंड पाणी लागलें कीं रक्ताचा प्रवाह कातड्याकडे जोरानें वाहूं लागतो व त्यायोगानें रंध्राचें काम चांगल्या रीतीनें होऊं लागतें; अर्थात शरीरांतील मळ नाहींसा होऊन मन प्रसन्न होतें; आणि साऱ्या शरीरास आराम वाटतो. “ हा उपाय नेमानें करणाऱ्या कोणत्याही मनुष्यास थंडी झाल्याचें माझ्या पाहण्यांत नाहीं” असें एका नामांकित डॉक्टराचें म्हणणें आहे.

ज्यांना वरचेवर थंडीची बाधा होत असेल व विशेषतः ज्यांना थंड व दमट हवेंत रहावयाचें असेल त्यांनीं आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, ती ही कीं निवळ लोंकरीचें वस्त्र त्यांनीं अंगाबरोबर वापरावें. शरीरांतील ओलावा शोषून घेण्याचें सामर्थ्य लोंकरीच्या कपड्यांत फार आहे; आणि शरीराशीं लोंकरीचें घर्षण झालें असतां शरीरांत अधिक उष्णता येते.

कपडा कोणत्याही जातीचा असला तरी तो कांहीं ऊन नसतो हें नेहमीं लक्षांत ठेवावें. उष्णता कपड्यांत नसते, अंगांत असते. अंगाच्या उष्णतेनें कपडा ऊन होतो व चांगल्या जातीचा कपडा असल्यास तो ती उष्णता कोंडून ठेवतो. लोंकरीची महती याच गुणामुळें आहे. हिवाळ्यांत जो मनुष्य पोटासभोंवतीं लोंकरीची पट्टी नेहमीं गुंडाळून ठेवील त्याला थंडी होणें शक्यच नाहीं अशी हमी एका चांगल्या डॉक्टरानें दिली आहे. शरीराचा मध्यभाग उबदार राहण्याची व्यवस्था केल्यावर दोन्ही टोकांकडे विशेष लक्ष देण्याचें कारण रहात नाहीं.

प्रारंभीं दिलेला शीतप्रतिबंधक उपाय व पोटासभोंवतीं लोंकरचा कपडा गुंडाळणें यांचें महत्त्व कोणास प्रत्यक्ष पहावयाचें असेल तर थंडीच्या दिवसांत देखील नियमानें प्रातःस्नान करून धाबळी पांघरणारे ब्राम्हण किंवा कमरेभोंवतीं घोंगडी गुंडाळून भर हिवाळ्यांत पहाटे शेतांत काम करणारे शेतकरी थंडी झाल्याबद्दल औषध घेण्यास वैद्याकडे किती क्वचित् येतात याचा विचार करावा. इतर लोक देखील चेहरा नेहमीं उघडा ठेवतात व वरचेवर धुतात, पण त्यानें कधीं थंडीची बाधा होत नाहीं. इतर शरीर नेहमीं उबेंत ठेवून एखादे वेळीं उघडें पडलें कीं त्याला थंडी बाधते. त्यापेक्षां चेहऱ्याप्रमाणें सारें शरीर होतां होईतोंवर उघडें ठेवून त्यास थंडीवारा सहन करण्याची शक्ति आणणें हा सर्वांत उत्तम उपाय. नाहींतर एकादे दिवशीं जर उघड्यांत निजलें किंवा गळ्याभोंवतीं गुंडाळण्याचा फलानीचा

तुकडा सांपडला नाहीं, किंवा पायमोज्यावांचून बाहेर जाण्याचा प्रसंग आला कीं झाली थंडी अशी बहुतेक विद्यार्थ्यांची स्थिति असते; हें बरें नव्हे. कारण कितीही व्यवस्थित व जपणारा मनुष्य असला तरी केव्हांना केव्हां तरी हीं साधनें न मिळतां वावरण्याचा प्रसंग येणारच व तो आला कीं थंडी ठेवलेलीच आहे; अशी नाजूक प्रकृति करून घेण्यापेक्षां शरीरच थोडें काटक बनविण्याची खटपट करणें अधिक शहाणपणाचें आहे. केव्हांही परावलंबनापेक्षां स्वावलंबनच श्रेयस्कर.

प्रवासाला जातेवेळीं नेहमींपेक्षां जरा अधिक उबदार व वजनदार कपडे असावे. निवळ परीटघडीचा कपडा घातला पाहिजे या आग्रहाच्या बळी. पडून हलके कपडे वापरून प्रवासाला जाण्यानें पुष्कळ लोक आजारी पडतात. त्याचप्रमाणें रोजच्या वापरांत नसलेला बिछाना दमट असतो; त्यावर पाहुणा निजला कीं बहुतकरून आजारी पडतो. याबद्दल पाहुण्यानें स्वतः जपावें.

---

# चिनी वैद्य.

आपल्या देशांत नाकाडोळ्यांचे वैद्य ज्याप्रमाणें खेड्यापाड्यांत हिंडून वैद्यकीची कांहीं माहिती नसतांना थापा मारून लोकांकडून पैसे उकळतात व कोणाच्या कानांत काडी घाल, कोणाचा डोळा काढ वगैरे वाटेल तें करण्यास कचरत नाहींत, त्याप्रमाणें चीनमध्यें वैदूंचें प्रस्थ बरेंच मोठें आहे असें दिसतें. या वैदूंना वैद्यकीचें ज्ञान संपादन करण्यास फारशी मेहनत घ्यावी लागत नाहीं. पण 'सूचीभेदा' ची माहिती त्यास असलीच पाहिजे. चीनमध्यें फार प्राचीन काळापासून या पद्धतीचा प्रचार आहे. शरीरांतील ३३७ स्थानें ओळखण्यास शिकावयाचें आणि रोगी पुढें आला म्हणजे योग्य स्थानीं सुई टोचून खोलपर्यंत जखम करावयाची हें तेथील वैद्याचें काम असतें. सुई टोचतांना रक्तवाहिनीस धक्का न लागू देण्याची खबरदारी घ्यावी लागते. कधीं कधीं सुई आंत खुपसल्यावर तिचें दुसरें टोक तापवितात. पण आधी तापवून सुई कधीं खुपसत नाहींत. कधीं कधीं या सुया रोग्याच्या शरीरांत मोडतात; व नंतर एखाद्या पाश्चात्य शस्त्रवैद्याची गांठ पडली तर ठीक; नाहींतर तो भाग कुजून तो तुकडा आपोआप बाहेर पडेल तेव्हां खरे ! अर्थात या गोष्टी अडाणी माणसाच्या हातून व क्वचित् प्रसंगीं होतात.

चिनी वैद्यांची माहिती देतांना पाश्चिमात्य लेखक फारच अद्वातद्वा लिहितात. या लिहिण्यांतील कांहीं भाग तरी अज्ञानमूलक असावा असें स्पष्ट दिसतें. एक लेखक म्हणतो "चिनी वैद्यांचें औषध म्हणजे त्यांत कांहीं तरी अद्भुत पदार्थ असलाच पाहिजे. सापाची कात, हाडें, गेंड्याचें शिंग, रेशमाचे किडे, गोगलगाय वगैरे कोणता पदार्थ ते औषधांत घालतील त्याचा कांहीं नियम नाहीं. पण साधारणपणें ज्या औषधांत किळसवाणा पदार्थ अधिक तितकें तें अधिक गुणकारी असें ठोकळ प्रमाण धरतात. त्याचप्रमाणें औषध थोडेथोडकें द्यावयाचें नाहीं. एक डोस म्हणजे एक पंचपात्रीभर तरी औषध असलें पाहिजे. चिनी लोकांना औषध देतांना, पाश्चात्य वैद्यांना अशी सूचना द्यावी लागते कीं गोळ्या ज्या कागदाच्या डबींत घातलेल्या असतात ती डबी फेकून द्यावयाची. हा इषारा न दिल्यास चिनी रोगी ती डबी देखील खाऊन टाकतात!"

ग्रंथ संग्रहालय
ता.........

# शास्त्रीय माहिती.

( लेखक—पु. वि. गोगटे. बी. एस्. सी. खांडवा )

## उष्णता लेखांक ३.

अण्णासाहेब नित्यनियमाप्रमाणें अकरा वाजतां टांग्यांत बसून कचेरीला गेले. मधुकराच्या शाळेला इन्स्पेक्टरसाहेब येऊन गेल्याबद्दल सुटी होती म्हणून तो घरींच होता; व दुसरे दिवशीं दिलेला अभ्यास करण्याच्या तयारीला लागला होता. आपलीं पुस्तकें पुढें घेऊन तो बसतो न बसतो तोंच महादू टांगेवाला अण्णासाहेबांकडून चिठ्ठी घेऊन आला व मधुकरास हाक मारून ती चिठ्ठी त्यास दिली. चिठ्ठींत असें लिहिलें होतें कीं "कचेरींत येतांना वाटेंत टांग्याच्या एका चाकाची धांव उतरली. तें चाक व ती धांव घेऊन महादू तुझ्याकडे येईल; तरी त्याला घेऊन आपल्या लोहाराकडे जा व धांव चढवून चाक तावडतोब पाठवून दे." मधुकरानें कोट-टोपी घातली व चिठ्ठींत लिहिल्याप्रमाणें चाक लोहाराकडून दुरुस्त करवून पाठवून दिलें.

लोहाराच्या येथें जाण्यापूर्वी मधुकरानें धांव बसविण्यांत आपलें थोडेसें कौशल्य खर्च केलें. त्यानें हातोड्यानें धांव ठोकून बसविण्याचा प्रयत्न केला; परंतु धांव तितकी सैल नसल्यामुळें धांव ठोकतांना चाकाच्या धलप्या उडूं लागल्या. महादूनेंही ती धांव लोहाराखेरीज बसणार नाहीं असें सांगितलें, तेव्हां मधुकरानें आपला प्रयत्न सोडून दिला. परंतु लोहार धांव कशी बसवील हें पहाण्याची व समजून घेण्याची उत्सुकता त्याच्या मनांत उत्पन्न झाली. या उत्सुकतेमुळें लोहारानें धांव कशी काय बसविली हें त्यानें लक्षपूर्वक पाहिलें. अगोदरच थोडीशी लहान असणारी धांव लोहारानें कापून थोडी आणखी लहान केली तेव्हां तर त्याला मोठें आश्चर्य वाटलें. कितीदां तरी लोहारास प्रश्न विचारण्याचें त्याच्या मनांत आलें असेल, परंतु लोहार आपल्या प्रश्नाला हंसेल कीं काय ही भीति वाटून त्यानें त्याला कांहीं एक प्रश्न विचारला नाहीं. त्यानें अण्णासाहेबांस हे प्रश्न विचारण्याचा निश्चय केला व लोहाराच्या दुकानांतून घरीं आल्यावर तो अण्णासाहेबांची कचेरींतून येण्याची वाट पहात बसला.

अण्णासाहेब कचेरींतून आले व कपडे काढीत असतां त्यांनीं मधुकरास विचारलें "मधुकर, लोहार धांव कशी चढवितात हें तुला पहावयास मिळावें म्हणून मीं आज तुला मुद्दाम चिठ्ठी पाठविली होती. त्याप्रमाणें तूं गेलाच असशील ?"

मधु०:—होय बाबा, मी गेलों होतों. धांव त्यानें कशी बसविली तें सर्व मीं पाहिलें व मला आपणांस याबद्दल बऱ्याच गोष्टीही विचारावयाच्या आहेत.

अण्णा०:—तूं अगोदर लोहारानें धांव कशी बसविली हें सांग व मग तुला काय काय नाहीं समजलें तें विचार.

मधु०:—प्रथम लोहारानें ती धांव कापून थोडीशी कमी केली व कापलेलीं टोंकें लाल होईपर्यंत तापविलीं व एकमेकांवर ठेवून हातोड्यानें ठोकून दोन्हीं टोंकांचा एकजीव केला. मग ती धांव जमिनीवर आडवी ठेवून तिच्या भोवतालीं गोंवऱ्यांचा विस्तव केला. कांहीं वेळानें ती सबंध धांव लालभडक झाली. अशा तापलेल्या स्थितींत तिला एका बाजूनें महादूनें व एका बाजूनें

लोहारानें सांडशीनें उचलून चाकावर ठेवली व लोहारानें थोडेसें इकडे तिकडे हातोड्यानें फटके मारल्याबरोबर ती चाकावर बसली. नंतर तिच्यावर थंड पाणी ओतलें. त्यामुळें लांकूड करकरतें असा आवाज झाला व धांव त्या चाकावर घट्ट बसली. आतां बाबा, मला जें विचारावयाचें आहे तें हें कीं ती धांव घरींच हातोड्यानें बसविण्याचा प्रयत्न मीं केला, परंतु धांव आंखूड असल्यामुळें ती चाकावर चढेना. असें असतां लोहारानें तिला कापून जास्त आंखूड कां केली ?

अण्णा०:—लोहारानें असा तर्क केला असेल कीं ज्या अर्थीं ती धांव वाटेंत आपोआप निघाली त्या अर्थीं ती असावी तितकी घट्ट नाहीं जर ती असावी तितकी घट्ट असती तर ती रस्त्यांत सहज चाकावरून उतरलीच नसती. म्हणून त्यानें ती धांव कापून थोडी लहान केली. त्याचा तो नेहमींचा धंदा असल्यामुळें त्याला हा विचार तावडतोब सुचला. आणखी कांहीं तुला विचारावयाचें आहे काय ?

मधु०:—ती धांव चाकाच्या घेरापेक्षां लहान होती परंतु तापविल्यानें ती सहज चाकावर बसली. यावरून ती तापविल्यानेंच वाढली असावी; नाहीं का ?

अण्णा०:—होय; ती तापविल्यानेंच वाढली.

मधु०:—पण बाबा, ती तापविल्यानेंच वाढली म्हणावी तर ती कशी वाढली असावी ? तिच्यांत जास्त लोखंड तर आलेंच नाहीं; मग जास्त लोखंडाखेरीज तिचा घेर कसा काय वाढला असेल ?

अण्णा०:—यावर तूं थोडा विचार केला असतास तर या प्रश्नाचें उत्तर तुझें तुलाच देतां आलें असतें. ( अण्णासाहेबांनीं त्याच्या हातांत एक रबराचा तुकडा देऊन म्हटलें ) हें रबर खेंचलें म्हणजे मोठें होतें. कां मोठें होतें ?

मधु०:—बाबा, रबराचा मोठें होण्याचा धर्मच आहे.

अण्णा०:—जरी धर्म असला तरी रबर खेंचलें म्हणजे त्याच्यांत कांहीं फरक होतो किंवा काय हें पाहिलें पाहिजे. या नुसत्या रबरांतून उन्हाकडे पहा व नंतर तें खेंचून त्यांतून पहा. कांहीं फरक दिसतो का ?

मधु०:—होय; खेंचल्यामुळें रबर पातळ होतें व त्यांतून जास्त उजेड दिसतो.

अण्णा०:—प्रत्येक वस्तू बारीक कण मिळून झाली आहे व हे कण जरी आपल्या दृष्टीला निरनिराळे दिसत नाहींत तरी ते निराळे असतात व प्रत्येक कणाच्या आसपास थोडीशी पोकळी असते. या गोष्टी विद्वानांनीं सिद्ध करून ठेवल्या आहेत. रबर खेंचलें म्हणजे मोठें होतें; कारण खेंचल्यानें रबराचे कण विरळ होतात व प्रत्येक कणाच्या आसपास असणारी पोकळी मोठी होते. ज्याप्रमाणें कांहीं मुलें एका ओळींत एकमेकाला चिकटून बसलीं तर ती ओळ लहान होईल व तींच मुलें जरा सुटीं बसलीं तर ओळ मोठी होईल, त्याप्रमाणें रबराचे कण विरळ झाल्यामुळें रबराची लांबी वाढेल. खेंचलेल्या रबरांतून जास्त उजेड येण्याचें कारण हा कणांचा विरळपणा आहे हें तुझ्या लक्षांत आलें असेलच ?

मधु०:—होय बाबा, तें मी समजलों; धांवेची लांबी वाढण्याचें कारणही लोखंडाचे कण उष्णतेनें विरळ होत असतील, हेंच असेल ?

अण्णा०:—हेंच. रबराचे कण विरळ करावयास तूं आपली शक्ति लावलीस तशीच लोखंडाचे कण विरळ करावयास लोहारानें उष्णतेची शक्ति लावली. तसेंच रबरावरची शक्ति काढून घेतल्याबरोबर रबर पूर्वीं होतें तितकें लहान झालें व त्याचप्रमाणें धांवेवर थंड पाणी ओतून उष्णतेची शक्ति काढून घेतल्याबरोबर धांव पूर्वींइतकी लहान झाली व चाकावर घट्ट बसली.

येथपर्यंत रबर व लोखंड यांचें साम्य म्हणजे सारखेपणा झाला. आतां या दोहोंत काय फरक आहे तो पाहूं. रबर खेंचलें म्हणजे तें फक्त एकाच दिशेला वाढतें. लांबीच्या बाजूनें खेंचलें तर रुंदींत व जाडींत वाढणार नाहीं. इतकेंच नाहीं तर उलट रुंदींत व जाडींत तें लहानच होईल. रुंदीच्या बाजूनें खेंचलें तर लांबींत व जाडींत लहान होईल. लोखंडाचें तसें नाहीं.

लोखंड तापविलें म्हणजे तें सर्व बाजूनें वाढेल. नुसतीच लांबी वाढेल असें नाहीं. याचें कारण उष्णतेचा खेंच फक्त लांबींत असणाऱ्या कणांवरच पडत नाहीं तर तो रुंदींत असणाऱ्या व जाडींत असणाऱ्या कणांवरही पडतो व तिथलेही कण विरळ होतात. त्यामुळें तापविलेल्या लोखंडाची लांबी, रुंदी व जाडी सर्व वाढतात.

मधु०:—बाबा, अशाच तऱ्हेनें इतर धातुही उष्णतेनें वाढतात काय ?

अण्णा०:—धातुच काय पण सर्व पदार्थ उष्णतेनें वाढतात; मग ते लोखंडासारखे घन असोत, पाण्यासारखे पातळ म्हणजे द्रव असोत किंवा हवेसारखे वायुरूप असोत. उष्णतेनें पदार्थ वाढला म्हणजे त्याला पदार्थाचें प्रसरण झालें असें म्हणतात व थंडीनें पदार्थ लहान झाला म्हणजे त्याला पदार्थाचें आकुंचन म्हणतात. "उष्णतेनें पदार्थाचें प्रसरण व थंडीनें आकुंचन होतें" हा उष्णताशास्त्राचा एक मोठा सिद्धांत आहे.

मधु०:—सिद्धांत म्हणजे काय ?

अण्णा०:—जी गोष्ट आपण प्रयोग करून सिद्ध करतों म्हणजे ठरवितों तिला सिद्धांत म्हणतात. आतां येथें लोखंडी धांव तापविल्यानें मोठी झाली हें तूं प्रत्यक्ष पाहिलेंस म्हणून लोखंड तापविल्यानें वाढतें हा तूं सिद्धांत ठरविलास. अशाच तऱ्हेनें अनेक विद्वानांनीं निरनिराळे पदार्थ घेऊन ते उष्णतेनें प्रसरण पावतात व थंडीनें आकुंचित होतात असें ठरविलें आहे. म्हणून "उष्णतेनें पदार्थाचें प्रसरण व थंडीनें आकुंचन होतें" असा सिद्धांत ठरला. हा सिद्धांत फारच महत्त्वाचा आहे.

मधु०:—या सिद्धांताचा आपल्याला धांव चढविण्यापलीकडे काय उपयोग होतो बाबा ?

अण्णा०:—पुष्कळ डाक्टर लोक ज्या यंत्रानें ताप पहातात तें यंत्र म्हणजे थर्मामिटरच घे. हें यंत्र किती उपयोगाचें आहे बरें ? हें यंत्र फक्त डाक्टरांच्याच उपयोगाचें आहे असें नाहीं; तर सर्व शास्त्रीय शोधांत ह्याची अत्यंत जरूर असते. हें यंत्र जर नसतें तर आज जितके शास्त्रीय शोध लागले आहेत तितके कधींही लागले नसते. हें यंत्र वरील सिद्धांतावरच बसविलें आहे.

मधु०:—तें कसें हें समजवून सांगाल बाबा ?

इतक्यांत "मधु, पुरें कर आतां तुझें विचारणें. कचेरींतून थकून भागून यायचें झालें आहे तर किती प्रश्न विचारशील ? तिकडे जरा स्वस्थ पडूं दे" असें म्हणत रमाबाईंनीं चहाचा पेला अण्णासाहेबापुढें ठेवला व चहासाठीं मधूस त्या आपल्याबरोबर स्वयंपाकघरांत घेऊन गेल्या.

मुद्दाम संग्रहीं ठेवण्यायोग्य असा दुसरे वर्षाचा

"व्यायाम' वार्षिक वर्गणी ट. ह. व ] **व्यायामाचा खास अंक.** [ व्ही. पी. खर्चासह १-१३-०

येत्या विजयादशमीनंतर ता. १५ आक्टोबर १९१६ रोजीं प्रसिद्ध होईल.

यांत अनेक विद्वानांचे संपूर्ण लेख येणार असून मनोवेधक चित्रेंही भरपूर देण्यांत येतील. हा वर्गणीदारांस वार्षिक वर्गणींतच मिळेल. इतरांस याची किंमत ६ आणे व व्ही. पी. खर्च २ आणे पडेल. तरी वर्गणीदार होण्याची त्वरा करावी. जाहिराती देणारांचीही यांत उत्तम सोय असल्यानें त्यांनीं जाहिराती सत्वर पाठवाव्या.

**फुटकळ अंकास ०-३-५. प्रत्येक महिन्याचे पंधरा तारखेस प्रसिद्ध होतो.**

रावपुरा, बडोदें. मॅनेजर, 'व्यायाम.'

# मनोरंजक माहिती.

**टेलिफोननें शरीरांत घुसलेली गोळी शोधणें**—युरोपमध्यें लढाऊ इस्पितळांत सऱ्यां टेलिफोननें गोळी हुडकून काढून, सभोंवतालच्या गुंतागुंतींतून ती काढून फारसा फाड न करितां थोडेसें तात्पुरतें फाडून गोळी बाहेर काढण्याचे प्रयोग चालू आहेत, असें सर जेम्स म्याकेंझी डेर्डसन ह्यांनीं " ल्यान्सेट " मध्यें लिहिलें आहे. टेलिफोनच्या एका बाजूच्या अग्राला ( Terminal ) एक सुई लावलेली असते. व त्या सुईच्या धातूचीच एक तबकडी दुसरीकडे असते. परीक्षा करण्याच्या अवयवावर तबकडी ठेवून ती सुई गोळी भासणाऱ्या संशयास्पद जागीं खुपसतात. सुई गोळीला लागतांच शरीरांतच विजेची ब्याटरी सुरू होते व कर्णयंत्रांत एक टिक टिक आवाज होतो. ह्या आवाजानें गोळी कोठें आहे हें नक्की समजतें. गोळी नसल्यास ध्वनी होत नाहीं. एक्सरेजपेक्षांही हें सोपें आहे.

---

**जमिनीवर व पाण्यांत चालणारी बायसिकल**—ही फ्रेंचांची युक्ती आहे.पाण्यांत चालण्याकरितां तिला दोन्ही बाजूस वाटोळे, लांब असे तरांडे ( Floats ) लावलेले असतात. हे सायकलपेक्षां किंचित् लांब असून निमुळते असतात. जमिनीवर चालावयाचे असल्यास हे वर उचलतां येतात व पाण्यांत चालावयाच्या वेळीं खालीं सोडून द्यावे लागतात. पाण्यांत चालतांना, पायांनीं ( Pedals ) चालवितां येणारा एक प्रतिसारक ( Propeller ) असतो, व पुढें एक हातानीं फिरवावयाचें सुकाणूं असतें. ह्यानें तासांत ५।६ मैल पाण्यांतून सहज प्रवास करितां येतो पण सगळ्या सायकलचें वजन २७० पौंड असतें. तेव्हां जमीनीवर नुसत्या पायांनीं ती कशी हलवयाची ?

---

**वनस्पतींना लस टोंचणें**—रोगप्रतिबंधक लस वनस्पतींना टोंचण्याचा नवीन शोध शास्त्रज्ञांनीं नुकताच लावला आहे. मनुष्याप्रमाणेंच वनस्पतींच्याही त्वचेखालीं लस भिनविल्यास त्यांना किंचित् आजार होऊन त्यांतून बऱ्या झाल्यावर मग त्यांस त्या रोगाचें भय राहत नाहीं. गहूं, जवस, वाटाणे आणि मूळें ह्यांना सफरचंदांतील आम्ल acid किंवा द्राक्षाम्लाचा रस टोंचून घातल्यास त्यांना जंतुरोगांची भीति रहात नाहीं. परंतु ह्यांतही दक्षता राखणें जरूर आहे. कारण कांहीं पिकांना—उदाहरणार्थ वाटाणे—जोमांत यावयास कांहीं विशिष्ट जंतूंचीच आवश्यकता असते.

---

म्हातारपणीं केस 'रुपेरी' होणें स्वाभाविक आहे. पण कित्येक तरुणांचे केस पांढरे कां होतात "हा एक मोठा गूढ प्रश्न आहे. पण जेव्हां एखाद्याचे काळेभोर केस आकस्मिक रीतीनें चार आठ दिवसांत पांढरे होतात तेव्हां तो एक अद्भुत प्रकार समजला पाहिजे. सध्यांच्या महायुद्धांत असा एक प्रकार घडून आला. फ्रान्समधील एका खंदकांत एक फ्रेंच शिपाई बसला असतां एका सुरुंगानें त्या खंदकाच्या चिंधड्या उडाल्या. त्या धडाक्यासरशी तो शिपाई चेंडूसारखा हवेंत उडाला व खालीं पडला; तेव्हां त्याच्या अंगावर माती, लांकडें वगैरे बरीच अडगळ पडली. पण त्याला फारशी दुखापत झाली नाहीं. त्याला बाहेर सुरक्षीतपणें काढण्यांत आलें; तेव्हां तो बहिरा बनला होता आणि सात आठ दिवसांनीं त्यानें आरशांत पाहिलें तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं डाव्या बाजूचे सर्व केस पांढरे सफेत झाले आहेत. शोधाअंती असें कळलें कीं त्याला डाव्या बाजूस विशेष दुखापत झाली होती !

---

A GUIDE TO KINDERGARTEN.

# बालोद्यान-शिक्षणमार्गदर्शिका.

## सुधारलेली आवृत्ति दुसरी.

( ग. बा. थोरवडकरकृत. )

ह्या पुस्तकांत फ्रोबेलच्या १ पासून २० पर्यंतच्या सर्व देणग्यांचें उत्तम प्रकारें विवेचन केलेलें असून त्या स्पष्टपणें शिक्षकांस समजाव्या म्हणून शेवटीं प्रत्येक देणगीच्या आकृति जोडल्या आहेत. ह्या पुस्तकाचा उपयोग ज्यांना या विषयाची अद्याप मुळींच ओळख नाहीं, त्यांना तर फारच उत्तम होतो. किं० प्र. ८१०. ट. ह. शिवाय.

# चिमुकल्या गोष्टी.

( भाग १ ते ६. )

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळणीक टाईपांत सुंदर, जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत. प्रत्येक भागास किं० ८४. सहा भाग एकदम घेणारास किं० १८४:

# मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

ह्यांत प्रथम लहान मुलांना दिशा, नंतर व्याख्या व पाण्याचे विभाग समजावून देण्याकरितां लहान लहान रंगीत नकाशे दिले आहेत. पुढें पर्वत, नद्या, आगगाडीचे रस्ते, इलाख्याचे मुख्य भाग वगैरेंचे निरनिराळे नकाशे देऊन स्पष्ट दाखविले आहेत. भूगोलासारखा विषय लहान मुलांस समजावून देण्यास ह्या पुस्तकाचा उपयोग होतो. किं० ८१.

# शारदीय वाचनपाठमाला.

हें पुस्तक प्रसिद्ध पंडिता रमाबाई यांनीं लहान मुलांकरितां अमेरिकन तऱ्हेवर लिहिलेलें आहे. ह्यात लहानलहान प्राण्यांच्या बोधपर गोष्टी लिहिल्या आहेत. शिवाय मुलांना वाचण्यासारखे शब्द प्रत्येक धड्याचे प्रारंभीं दिले आहेत. प्रत्येक गोष्टीस चित्रें दिलीं असून पुस्तकाचा टाईप चांगला जाड आहे. किं० ८१८६.

मिळण्याचें ठिकाण:—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी रंगीत सचित्र वर्णमाला.

ह्यांत अ पासून ज्ञ पर्यंत बालबोध व मोडी मूळाक्षरें त्या त्या अक्षराच्या सूचक चित्रासह निरनिराळ्या रंगांत सुंदर व सुबक छापलेलीं असून शिवाय प्रत्येक बालबोध अक्षराचें अवयव स्पष्ट निरनिराळ्या रंगांत दाखविले आहेत. तक्ता नकाशाप्रमाणें कापडावर चढविलेला असून वार्निश व रूळपट्टीसह आहे. नवीन पद्धतीनें मूळाक्षरें शिकविण्यास या नकाशाचा उपयोग चांगला होतो. किं. ८।२.

# मूळाक्षरांचे (मराठी) चित्रयुक्त रंगीबेरंगी पत्ते.

हे पत्ते इस्पिकचे पत्त्यांप्रमाणें खेळासही उपयोगी पडणारे असून पत्त्यावर 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत मूळाक्षरें व १ पासून १० पर्यंत अंक त्या त्या अक्षरांकदर्शक वस्तूंच्या सुबक चित्रांसहित काढलेलीं आहेत. वरील पत्त्यांच्या इस्पिकांप्रमाणें खेळ खेळतांना मुलांना जोडाक्षरांसह अक्षरओळख होऊन आंकड्यांचेंही ज्ञान सुलभ रीतीनें व लवकर होतें. पत्तेजोड सुंदर पेटींत ठेविलेला आहे. किं. ८४, ट. ह. ८१.

# ऐतिहासिक खेळण्याचे पत्ते.

हे खेळण्याचे पत्ते नवीनच चित्रशाळेंत छापून तयार झालेले असून, ह्यांत राजा व राणी या चित्रांचे ठिकाणीं ऐतिहासिक स्त्री-पुरुषांचीं चित्रें छापलेलीं आहेत. व म्हणूनच ह्यांस ऐतिहासिक पत्ते असें नांव दिलेलें आहे. ह्या चित्रांत अकबर, शहाजहान, मुमताजमहाल, जहांगीर, नूरजहान, अवरंगजेब, चांदबीबी. वगैरे मोंगल घराण्यांपैकीं चित्रें असूनें छत्रपति शिवाजी, व्यंकोजी, ताराबाई, थोरले माधवराव पेशवे, रमाबाई, सवाई माधवराव पेशवे, गंगाबाई, नाना फडनवीस वगैरे मराठेशाहींतील व पेशवाईतील स्त्री-पुरुषांचीं चित्रें आहेत. शिवाय अलीकडील राजे--रजवाड्यांचींही चित्रें ह्यांत घातलेलीं आहेत. हीं सर्व चित्रें रंगित असून अगदीं ओळख पटण्यासारखीं हुबेहूब आहेत. पत्त्यांस चांगला जाड व गुळगुळीत कागद वापरलेला असून बावन पत्त्यांचे एका जोडास किंमत अवघी दोन आणे ठेविली आहे. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस ८१८ सदाशिव पेठ पुणें सिटी.

REGISTERED B. NO. 179.

पुस्तक २७. नोव्हेंबर सन १९१६ अंक ११.

# मराठी शालापत्रक

## विषयक्रम.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| मुलें आणि पैसा. | २०३ |
| भुतांचें अस्तित्व. | २०७ |
| गणित. | २१० |
| अबू बेन आढेम. | २११ |
| महायुद्धासंबंधीं मौजेच्या गोष्टी. | २१३ |
| रक्त व पाणी. | २१५ |
| शास्त्रीय माहिती. | २१७ |
| गप्पागोष्टी. | २२१ |

## आरबी भाषेंतील

# सुरस व चमत्कारिक गोष्टी.

### विद्यार्थ्यांकरितां काढलेली संक्षिप्त आवृत्ति.

ह्या पुस्तकांतील **गोष्टींची निवड** केवळ **लहानें-थोर विद्यार्थ्यांकरितांच** केलेली असून मूळ ग्रंथांत असलेला **अश्लील भाग** यांतून मुळींच काढून टाकलेला आहे. रिकामपणीं किंवा सुट्टीचे दिवसांत **मनोरंजनाकरितां** वरील पुस्तक **मुलांमुलींना वाचण्यास** दिलें असतां त्यापासून त्यांची **करमणूक** होऊन **वाचनाचीही** गोडी लागेल. पुस्तक **जाड व सुंदर टाइपांत** ग्लेज कागदावर छापलेलें असून त्यांत एकंदर १० **चित्रें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं** व आर्ट **पेपरवर छापलेलीं** घातलीं आहेत. **बाइंडिंग जाड पुठ्ठ्याचें मजबूत** आहे. किं० १८८. ट. ह. शिवाय.

# सचित्र अक्षरबोध.

### नवीन आवृत्ति.

या पुस्तकांत ' **अ** ' पासून ' **ज्ञ** ' पर्यंत **स्वर** आणि **व्यंजनें** हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत तें तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या **चित्रांसह** दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत **अंकही** वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज **क्राऊन चतुर्थांशाइतका** मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व **चित्रें** फारच **सुबक व मोठीं** अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील **सचित्र रंगीत ए. बी. सी. डी.** शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला पहिला धडा सहज शिकतात. किं० ८६.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व **मूळाक्षरें चित्रयुक्त** दिलीं असून मोडी व बालबोध **बाराखड्या** तयार करण्याची **समजूत थोडक्यांत** करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध **सोपे शब्द** मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें **१० अंक सचित्र** दिले असून त्यांबरोबरच मुलांस **बेरीज व वजाबाकीची** समजूत **टिंबांच्या आकृतींनीं** व **गोट्यांच्या चौकटीच्या** साहाय्यानें घालून दिली आहे. नंतर **पाढ्यांची समजूत** दिली असून शेवटीं **उजळणी** दिली आहे. एकंदरींत पुस्तक **नवीन** तऱ्हेनें **मुलांना** शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं० ८९ ट. ह. ८८६.

**मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# मराठी शालापत्रक.

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकळां जनां ॥ १ ॥

रामदास.

पुस्तक २७. नोव्हेंबर, सन १९१६. अंक ११.

## मुलें आणि पैसा.

[ लेखकः—रघुनाथ श्रीपाद देशपांडे, बी. ई. नीरा कॅनाल. ]

राष्ट्राचा खरा भाग्योदय होण्यास त्यांतील नागरिक जनांचे शारीरिक, मानसिक व नैतिक सामर्थ्य वाढलें पाहिजे. या तिहींचेंही महत्व सारखेंच आहे. तथापि विचारास उच्चार व आचार यांपेक्षां निसर्गतःच पूर्वस्थान प्राप्त होत असल्यानें अगोदर मन सुसंस्कृत केलें पाहिजे. जीं मुलें आज बाल्यदशेंत आहेत, तींच पुढें एके काळीं राष्ट्राचे आधारस्तंभ होणार आहेत. त्यांच्यांत सर्व अंगांनीं बळकटी आणण्यास त्यांचें शिक्षण शुद्ध पायावर स्थापन केलें पाहिजे. व्यायामशाला, शिक्षणसंस्था इत्यादिकांतून मिळणारें शिक्षण तूर्त तरी अगदींच एकांगी असतें. कारण एक तर अशा ठिकाणीं मुलांचा जाणारा वेळ फारच थोडा असतो. दुसरें, आपल्या कामांत उत्तम वाकबगार व आस्थेनें आणि कळकळीनें आपलें कर्तव्य बजाविणारे असे शिक्षक अगोदरच दुर्लभ व तशांतूनही ८ । १० रुपये पगारावर मिळणें अगदीं अशक्य असतें. तिसरें, कदाचित् असे शिक्षक मिळाले असें घटकाभर गृहीत धरिलें तरी एका शिक्षकास एकाच वेळीं अनेक विद्यार्थ्यांवर लक्ष्य ठेवावें लागत असल्यानें इतक्या मुलांच्या मनांचे व्यक्तिशः बारकाईनें निरीक्षण करणें अशक्य कोटींतीलच आहे. या कारणाकरितां आपल्या मुलांस उत्तम नागरिक बनवून त्यांच्याकडून देशकार्याचा आपआपला भाग उचलविण्यास जें आधारभूत सर्वांगपरिपूर्ण शिक्षण अवश्य आहे तें देण्याचा सर्व भार अर्थातच त्यांच्या आईबापावर पडतो

चांगला आहे. परंतु ती चढाओढ अशा प्रकारची असावी कीं तींत सर्वांस सारखा भाग घेतां यावा. उदाहरणार्थ, एकादें गाणें अगर कविता म्हणण्याची चढाओढ लाविली व तींत एकाच मुलाचा कंठ मधुर असला व इतरांचा साधारण अगर बेसूर असला तर अर्थातच मधुर कंठ असलेल्या मुलास बक्षिसाचा मान मिळणार. व इतर मुलांना खालीं मान घालून बसावें लागणार. अशा चढाओढी करणें जरूरच असेल तर त्यांबरोबरच कधींकधीं दुसऱ्याही अशा लावाव्या कीं त्यांत त्या मुलास हार खावी लागेल. असें झाल्यानें इतर मुलांस नेहमींच खालीं मान घालून बसावें लागणार नाहीं. व गाणाऱ्या मुलांस फाजील अभिमान वाटणार नाहीं. अशा शर्यती लावण्याचे वेळीं दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं त्याच्यामुळें मुला--मुलांमध्यें द्वेषाग्नि बिलकुल शिरतां कामा नये. ज्या उद्देशानें त्या लाविलेल्या असतात तो सिद्धीस गेला म्हणजे झालें. अशा चढाओढीच्या अखेरीस जित व जेते दोघांसही सारखीच मौज वाटली पाहिजे. एकादा धडा थोडा वेळ वाचून त्यांतील मतलब व्यवस्थित सांगणें, आपण सांगितलेली एकादी पुराणांतील अगर इसापनीतींतील गोष्ट पुन्हा जशीच्या तशी सांगणें वगैरे प्रकारही चढाओढी लावण्यास योग्य आहेत. आपल्या इकडे पुष्कळ संस्थांनीं शारीरिक मेहनतीचे मर्दानी खेळ करून त्यांत बक्षिसें लावण्याचा प्रघात पाडला आहे तो यांपैकींच. फक्त तो फार मोठ्या प्रमाणावर असतो व हा घरच्याघरीं अगर फार तर शेजारच्या मुलांत असतो एवढाच काय तो फरक.

पैसा हातीं देण्यापूर्वीं त्याचा विनियोग कसा करावा, त्याचा सदुपयोग कोणता, दुरुपयोग कोणता वगैरे गोष्टी चांगल्या समजावून सांगाव्या हें वर सांगितलेंच आहे. चांगल्या विनियोगाचे मुलांच्या मनावर ठसविण्यास योग्य असे अनेक प्रकार आहेत. ज्यांच्या योगानें देशी उद्योगधंद्यांची वाढ होते अशा पैसाफंडासारख्या अनेक संस्था आहेत. शक्य असल्यास अशी एकादी संस्था मुद्दाम मुलांस दाखवून आणावी व तिचे उद्देश व कार्यव्याप्ति हीं नीट समजावून सांगावीं. अनाथबालिकाश्रम, गोरक्षण, सार्वजनिक शिक्षणसंस्था इत्यादि .धार्मिक संस्थांस मदत करणें हा प्रकारही फार उत्तम आहे. मदत जरी अत्यल्प असली तरी तिचें महत्त्व फार मोठें आहे. व उद्देश त्याहूनही मोठा आहे. दुसरा उपयोग म्हणजे दीन, अनाथ, पंगू, दुष्काळग्रस्त अशा दुबळ्या लोकांस मदत करणें--असे लोक पाहण्याची संधी आली असतां ती व्यर्थ जाऊं न देतां तिचा उपयोग, त्यांची हृदयद्रावक स्थिति, त्यांचे मनांत बिंबविण्याकडे करावा.

गोल्ड स्मिथच्या ' व्हिकर ऑफ वेकफील्ड ' मध्यें अशा संबंधानें एक उल्लेख केलेला आहे. व्हिकरनें आपल्या मुलांमध्यें कोणी पाहुणा आला म्हणजे एकादें गाणें म्हणण्यांत किंवा धडा वाचण्यांत शर्यत लावावयाची व जो सर्वांत चांगलें करील त्यास चर्चमधील धर्मादाय पेटींत टाकण्यास एक पेनी द्यावयाची ( The one who read the loudest & distinctedst was given a penny to be thrown into the Poor Box ) अर्थातच अशा शर्यतींत शिरतांना मुलांना धर्मादाय पेटींत पैसे टाकणें ही गोष्ट मोठेपणाची व मानाची वाटत असली पाहिजे.

वर सांगितलेल्या गोष्टींच्या खालोखाल तिसरा पैशाचा विनियोग करण्याचा प्रकार म्हणजे मुलांच्या स्वतःच्या गरजा भागविण्याकडे करणें हा होय. बहुधा अशी स्थिति फार करून कोणतीही येत नाहीं. तथापि, जेथें मुलांच्या हातांत पुष्कळ पैसा ( pocket-money ) देतात तेथें किंवा सांपत्तिक स्थिति चांगली असून मुलानें स्वतः सार्वजनिक शर्यती जिंकून अगर या शिष्यवृत्ति मिळवून कमाविलेला पैसा असेल तेथें या प्रकारचा उपयोग होण्याचा संभव आहे. सुसंपन्न कुटुंबांनीं मुलांच्या आवडीचे खेळ अगर पुस्तकें विकत घेण्यांत अशा पैशाचा उपयोग करावा. गरीब स्थितीं-

तील कुटुंबांनीं कपडेलत्ते वगैरे ज्या आवश्यक वस्तु त्या विकत घेण्यांत करावा. स्वभावतःच मुलांना नवीन वस्तु प्राप्त झाल्या म्हणजे निरतिशय आनंद होतो. त्यास त्या स्वतःच्या कमाईच्या पैशांतून घेतलेल्या पाहून तो द्विगुणित होईल व त्यांचा स्वाभिमान जागृत होईल यांत शंकाच नाहीं. खेळ घेऊन देणें ते असे असावे कीं त्यामुळें घरीं बसून राहण्यापेक्षां बाहेर अंगणांत थोडा बहुत व्यायाम व्हावा.

मुलांचे लेख—

# भुतांचें अस्तित्व.

आज तारखेला प्रायः आंग्लविद्याविभूषित झालेल्या समाजांत पिशाचयोनि नाहींच, अशा तऱ्हेचें ठाम मत झालेलें आहे. व तत्संबंधीं विधायक व विघातक अशीं टीकात्मक पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं आहेत. तीं पुस्तकें जरी माझ्या अवलोकनांत आलेलीं नाहींत, आणि मी म्हणतों जरी आलीं असतीं तरी माझें मत पिशाचयोनीच्या नास्तिक्यासंबंधाचें बनलें नसतें. कारण कांहीं केलें तरी खग्याखोब्यामध्यें जसें चार बोटाचें अंतर अक्षय असतें तसें माझ्या वाचनांत आणि प्रत्यक्ष पाहण्यांत तें अंतर कायम राहिलेलें असलेंच पाहिजे. आणि मला माहीत आहे कीं त्यांच्या नास्तिक्यासंबंधानें केवढालींही बाडें लिहून काढलीं असलीं, आणि आपल्या कल्पनेच्या वाटेल तशा निरंकुशाप्रमाणें भराऱ्या चालवून शिवाय त्यास श्रीसमर्थांच्या " वाजे पाऊल आपुलें। म्हणे मागें कोण आलें? "—अशा उक्तींची जरी भर दिलेली आहे तरी त्याचा प्रत्यक्ष अनुभवजन्य सत्यापुढें टिकाव कसा लागावा? असो.

भीषण रात्रीच्या निबिड काळोखांत ज्या कराल वृक्षांचीं पानें, खांद्या छेदन केल्या आहेत, त्या वृक्षांना पाहून, हें पिशाच म्हणून पिशाचयोनि खरी मानण्याचें मीं निश्चित केलें आहे असें नाहीं, तर तसें मानण्याला तशींच बलवत्तर प्रत्यंतरें आलेलीं आहेत. पिशाच सदेह असतें कीं नाहीं, सुरूप असतें कीं कुरूप, भेसूर दिसतें कीं कसें, हें सांगणें जरी तें मीं आजपर्यंत कधींच पाहिलें नसल्यामुळें अशक्य आहे, तरी त्यांच्या कृति मात्र खास विचित्र व अगम्य असतात, यांत शंका नाहीं. मानवप्राण्याची बुद्धिमत्ता कितीही तीव्रतर असो, पिशाचकृतिका सोपपत्तिक तरसक कधींही लावावयाच्या नाहीं अशी माझी तर दृढ समजूत आहे. " मेसमेरिझम् " च्या सहायानें पिशाचकृतीसारख्या कांहीं कृति करतां येतील यांत शंका नाहीं, पण म्हणून " पिशाचयोनि नाकबूल करितां येणार नाहीं. "

कांहीं दिवसांपूर्वीं कांहीं मासिकांतून पिशाचाविषयीं गोष्टी प्रसिद्ध झाल्याचें पुष्कळांना माहीत असेलच. त्या गोष्टी कशा होताहेत, हें प्रत्यक्ष पाहण्यास यावें म्हणून ज्या गृहस्थाच्या घरीं त्या होत होत्या त्यानें जाहीर विनंती केली होती. तो योगायोग जरी मला साधतां आला नाहीं तरी दुसरे ठिकाणीं तेच प्रयोग मला पहावयास मिळाले.

अंगांत पिशाच संचरतें, बोलतें, मी अमुक अमुक आहें, अशा अशा करितां या " झाडांना " (व्यक्तींना) धरलें आहे, मला अमका फलाणा जिन्नस पाहिजे. (शेंदूर, अंडी, दामटे, उडीद, तांदूळ, काळेदोरे, लिंबें, सुया, गांजा व नारळ, कोंबडीं, बकरीं व मनुष्यें वगैरे हें खरेंच असेल कीं काय हें कळणें दुरापास्त आहे.) व त्या दिवशीं वाद घालीत बसून स्थलाचा व कालाचा व्यर्थ व्यय करीत बसत नाहीं, मला प्रस्तुतच्या लेखांत

इतकेंच सिद्ध करावयाचें आहे कीं अमानुष अशा कांहीं चमत्कारिक कांहीं अदृश्य शक्तींकडून जेव्हां सृष्टिनियमांविरुद्ध कृति झालेल्या आपल्याला दिसतात, तेव्हां त्यांवरून " पिशाचयोनि " खरी मानावयाची कीं नाहीं हा प्रश्न सर्वांपुढें ठेवावयाचा.

शनिवार, अमावास्या, पौर्णिमा, या दिवशीं मी सुमारें २।३ महिने अशी एक मौज प्रत्यक्ष पहात होतों कीं आमच्या शेजारी एका ब्राह्मण सुवासिनीच्या पोटावर बिब्ब्याच्या फुल्या आपोआप पडत. केस न्हाल्यासारखे पहातां पहातां होत. आणि मळवटही आपोआप भरला जाई!!! ते ते दिवस आले म्हणजे ती विचारी घाबरून जाई. व असें कांहीं अनिष्ट होऊं नये, म्हणून देवावर भरंवसा ठेवून सर्व दिवस उपोषण करून तुळशीस प्रदक्षिणा घालीत असे. पण त्याचा कांहीं उपयोग होत नसे. प्रदक्षिणा चालू असतांनाच पोटावर एकदम चुणचुणल्यासारखें होई, पहातों तों त्या चुणचुणल्या ठिकाणीं बिब्ब्याचा बरोबर २ रेघांचा क्रॉस झालेला दिसे.



तो इतक्यांत कोणी कोण जाणें माझ्या मित्राला त्या पलंगासह उचलून त्याच्या घराच्या अगदीं उंचीच्या आढ्यावर नेऊन ठेवलें !

या चमत्काराचा शोध लावणें तर अशक्यच आहे; परंतु मी पुढें आणखी एक अद्भुत चमत्कार पुढें ठेवणार आहें, त्याचा शोध लावणें त्याहूनही अशक्य आहे, असें सर्वांच्या ध्यानांत येईल.

तो चमत्कार म्हणजे असा झाला.—

मी ज्या खेड्यांत प्राथमिक शिक्षणाकरितां रहात असे—तेथें—मी रहात असें त्याच घरीं—माझ्या जोडीचा एक मुलगा होता. त्यास पिशाचबाधा आहे, असें सर्व खेड्यांत माहीत होतें. मींही तो लहरींत असल्या वेळीं त्याच्या कांहीं चेष्टा पाहिल्या होत्या, व नेहमीं पहात असे. त्या वेळीं मला विशेष अशी कांहींच कल्पना येत नसे. ही कसली तरी वायूची लहर असावी. एवढीच माझी समजूत असे. त्या घरचीं माणसें अंगारे-धुपारे, देवदेवर्षि, नानाप्रकारचे उपाय करीत. तें पाहून

मला त्यांची कींव येई. असा प्रकार बरेच दिवस चालला असतां मी एके दिवशीं शाळेला लागोपाठ ३।४ दिवसांची सुट्टी असल्या कारणानें घरीं गेलों होतों. मी घरीं गेलों त्या दिवशीं त्या मुलाच्या अंगांत बऱ्याच दिवसांनीं संचारलें! मी व तो समवयस्क असल्यानें तो जेव्हां शुद्धींत असे, तेव्हां माझ्याशीं अतिशय सलगीनें वागे. यामुळें माझ्यावांचून त्याला अगदीं करमेनासें होई. तो त्या लहरींत येऊन अगदीं मूकवृत्तीनें बसला. त्या वेळीं घरच्या मंडळींनीं देवऋषि आणून त्याच्यापुढें देवऋषीकडून धूप पेटवून त्याला बोलविण्याचा अटोकाट प्रयत्न केला, परंतु रामाचें नांव! अगदींच जेव्हां त्याला सतावून सोडलें तेव्हां त्यानें त्या मंडळींना एकदांच एवढें सांगून टाकलें कीं, "मला इतर कोणाशींही बोलावयाची इच्छा नाहीं. माझा नाना मित्र आहे तो आल्यावर मी त्याच्याशीं बोलणार; एरव्हीं कोणाशींही नाहीं; झालें. यावर कोण काय बोलणार? जो तो मी आपल्या गांवाहून परत केव्हां येतो याची मार्गप्रतीक्षा करूं लागला. वास्तविक मला ४।५ दिवसांची सुट्टी होती. माझाही कांहीं १।२ दिवसांत परत जाण्याचा विचार नव्हताच. पण मागील कोणत्याही प्रकारची कल्पना नसतांना मला एकाएकीच आपले शाळेच्या गांवीं जावें अशी बुद्धी झाली. इकडे मी चालतों आहें, तिकडे तो मुलगा भ्रमिष्ट स्थितींतच आपल्या जवळच्या लोकांना सांगतो आहे कीं, "येतो आहे, माझा मित्र वाट चालत आहे बरें! मी त्याच्याशीं बोलणार; अगदीं जवळ जवळ आला आहे. इतक्यांत तास अर्ध्या तासाच्या अवधींत आलाच म्हणून समजा." परंतु हें खरें कोणाला व कसें वाटणार? कारण जातांना घरीं सर्वांना विचारून ४।५ दिवस येणार नाहीं म्हणून सांगून गेलों होतों. पण योगायोगच कसे चमत्कारिक पहा! झालें! त्याचें म्हणणें खरें झालें! मी लवकरच घरीं त्याच्या म्हणण्याप्रमाणें गेलों! हें झालें कसें! मी वाट चालत असल्याची बातमी सांगितली कोणीं? हा माझा प्रत्यक्ष अनुभव. याहून अत्यंत आश्चर्यजनक माझ्या मित्राला दोन अनुभव आले आहेत, तेही येथें नमूद करून ठेवतों.

(१) अमावास्येची रात्र! रजनीची रौद्रता काय वर्णावी? माझा मित्र आपल्या अंगणांत मांच (खुज्या पायाचा पलंग) टाकून त्यावर पडला होता. अमावास्या, खेड्याची वस्ती; आज चोराचिलटांची फार भीति; म्हणून शक्य तितकें सावध असावयाचें. माझा मित्र यामुळें रात्रीं १०॥ वाजेपर्यंत पूर्ण जागाच होता. यापुढें त्याला गुंगी येऊं लागली. डोळ्याला ताणावे देत देत झोंप घालविण्याचा प्रयत्न करीत होता, पण तितक्यांतून झोंप आपला पगडा बसविल्याशिवाय सोडीत नव्हती. अशा स्थितींत असतांना काय अद्भुत अमानुष चमत्कार झाला! गुंगींत माझा मित्र सुमारें २।३ मिनिटें असेल नसेल-तों इतक्यांत कोणी, कोण जाणें माझ्या मित्राला त्या पलंगासह उचलून त्याच्या घराच्या अगदीं उंचीच्या आढ्यावर नेऊन ठेवलें! पुन्हा हा सावध होऊन इकडे तिकडे चळवळ करतों आहे तोंच पलंग डळमळला! जमिनीवर असलेला पलंग कसा डळमळेल? डोळे उघडून पाहतों तों भलत्याच ठिकाणीं! त्यामुळें त्याची घाबरगुंडी उडून त्यानें एकदम शंखध्वनि केला! अल्पावकाशांत शेजारीपाजारी जमले! त्यांना तेथून माझ्या मित्राला व पलंगाला घराखालीं उतरता उतरता नाकीं नळ आले! चांगला तेथून त्याला काढण्याला ५।६ मंडळींना अर्धा पाऊण तास लागला! हें कसें झालें? येथें कल्पनेची भरारी कशी लढवावयाची? ही पिशाचकृति नव्हे तर काय? असे अनेकविध अनुभव आलेले आहेत. या शंका कोणी निरसन करून पिशाचयोनि नाहीं, अशी सप्रमाण खात्री करून दिल्यास माझ्या बुद्धीचा कोतेपणा कबूल करीन—इत्यलम्.

रत्नजडित पुस्तकांत कांहीं लिहीत बसला होता. देवदूताचें तें तेज पाहून अबूच्या मनांत त्याच्याविषयीं आदरभाव उत्पन्न झाला आणि तो काय करीत आहे हें जाणण्याची त्याला इच्छा झाली. शुद्धाचरणाच्या जोरामुळें आपण देवदूताला एखादी गोष्ट कशी विचारावी अशी त्याला मुळींच शंका आली नाहीं. तो त्या देवदूताजवळ अदबीनें उभा राहिला व हळूंच नम्रपणें म्हणाला; ' महाभागा, तूं काय लिहित आहेस ? ' अबूचे हे शब्द कानीं पडतांच देवदूतानें त्याच्याकडे पाहिलें. आतांपर्यंत अबूनें देवदूताला नीटसें पाहिलें नव्हतें; कारण तो खालीं बघून लिहिण्यांत गुंतला होता. पण आतां जेव्हां त्या देवदूतानें आपली मान वर केली तेव्हां अबूला त्याच्या चेहेऱ्यावरील मनोरम दैवीहास्य पाहून पराकाष्ठेचा आनंद झाला.



तो त्या देवदूताजवळ अदबीनें उभा राहिला व हळूंच नम्रपणें म्हणालाः–' महाभागा, तूं काय लिहीत आहेस ? '

देवदूतानें उत्तर केलें, ' मी देवाच्या एकनिष्ठभक्तांचीं नांवें लिहीत आहे. '

आपल्या साध्या व भोळसर स्वभावाप्रमाणें अबू त्यास म्हणाला, ' कांहो पण माझें नांव तुमच्या यादींत आहे काय ? ' ' छेः, मला वाईट वाटतें, तुझें नांव या यादींत आलेलें नाहीं ' देवदूतानें उत्तर केलें.

अबूला थोडेसें वाईट वाटलें व आपण मंदिरांत नियमितपणें जात नाहीं म्हणूनच असें झालें असलें पाहिजे असा त्यानें अदमास केला.

थोड्या वेळानें पुनः अबूला कांहीं विचार सुचला आणि तो त्या देवदूताला म्हणाला, ' लोकसेवकांच्या यादींत माझें नांव तुम्हाला घालतां येईल कां ? ' देवदूत ' होय ' म्हणाला आणि निघून गेला.

दुसरे दिवशीं रात्रीं तोच देवदूत तेंच रत्नजडित पुस्तक घेऊन त्याला त्याच्या खोलींत दिसला. अबू आपल्या अंथरुणावरून उठला व त्या देवदूतास त्यानें वंदन केलें. आतां कांहीं शब्द तो बोलणार तोंच देवदूतानें आपण होऊन तें रत्नजडित पुस्तक त्याचेपुढें केलें. देवाच्या एकनिष्ठभक्तांची ती यादी होती. त्या यादींत पहिलें नांव आपलें आहे असें पाहून अबूला अत्यंत आश्चर्य व पराकाष्ठेचा आनंद वाटला.

देवभक्ति आणि लोकसेवा हीं भिन्न नाहींत.

---

२४ तासांत गुण. ] हिस्ट्रिया–वायुमुक्ता [ २४ तासांत गुण.

या औषधानें–हिस्ट्रिया, फेफरें, आंकडी वगैरे वायूपासून होणारे तसेच इतर रोग, व स्त्रियांच्या गर्भाशयांतील हरएक रोग बरे होतात. याबद्दल प्रत्येकानें आपली खात्री करून सर्टिफिकेट मात्र पाठविण्याचें करावें.

किं. रु. ४–१०–० पोष्टेज निराळें. छगनलाल कल्लुभाई देशीनामावाले, डभोई–बडोदा.

# महायुद्धासंबंधी मौजेच्या गोष्टी.

फ्रेंच लोक चैनी, नटवे व ऐषआरामांत गढून गेलेले असतात; तेव्हां ते आपलीं मुलें रणांगणावर पाठविण्यास तयार होणार नाहींत असा कित्येक लोकांचा तर्क होता. महायुद्धापूर्वी फ्रेंच लोकांचें वर्तन कदाचित या आक्षेपास पात्र होण्याजोगें असल्यास न कळे. पण अलीकडे तेथील लोकांचा स्वार्थत्याग, पराक्रम व देशाभिमान पाहून लोकांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं आहेत. फ्रेंच माता लहानपणापासून आपलीं मुलें रणयज्ञांत बळी देण्याच्या महत्त्वाकांक्षेनें वाढवीत नसतील; पण देशावर संकट आलें असतां त्याच माता मुलांना शिपाईगिरी पत्करण्यास सर्वतोपरी प्रोत्साहन देत आहेत याबद्दल शंका नाहीं. लष्करीदृष्ट्या परीक्षा पास होण्यास जी शारीरिक सुस्थिति अवश्यक आहे असें समजतात ती आपल्या मुलाची नाहीं असें कळतांच या स्त्रिया मुलाची स्थिति सुधारण्याकरितां किती काळजी घेतात तें पाहिलें असतां मोठें कौतुक वाटतें. एक बुद्धिवान फ्रेंच तरुण कालेजांतील उच्च परीक्षेंत चांगल्या प्रकारें पास झाला. तो परीक्षेचा निकाल लागताच लष्करी अधिकाऱ्याकडे लष्करांत सामील होण्यासाठीं गेला. तेथें लेखी व तोंडी परीक्षेंत तो लायक ठरला; पण त्याचें वजन कमी भरलें. त्यामुळें ' तुला सैन्यांत घेतां येत नाहीं ' असें लष्करी अधिकाऱ्यांनीं सांगितलें. तो तरुण घरीं गेला व त्यानें आपल्या आईस सर्व हकीकत सांगितली. आईनें लगेच त्याला एका नामांकित डाक्तराकडे नेऊन त्याची तपासणी करविली; व त्याचें वजन वाढण्यास कोणत्या प्रकारचा व्यायाम पाहिजे व कोणतें अन्न खाल्लें पाहिजे वगैरे विचारून घेतलें. तेव्हांपासून त्या तरुणानें व त्याच्या आईनें या कामीं इतकी मनापासून मेहनत घेतली कीं थोड्याच दिवसांत त्याचें वजन वाढलें. तो पुनः लष्करी अधिकाऱ्याकडे गेला, त्यांच्या परीक्षेंत पास झाला व त्याला सैन्यांत दाखल होण्याची परवानगी मिळाली. त्याबद्दल त्याला इतका आनंद झाला कीं त्यानें ही बातमी आईला तारेनें कळविली; व स्वतः एका स्नेह्याच्या घरीं जाऊन लष्करी फीत लाऊन नंतर घराकडे गेला. मुलाचा तो प्रफुल्लित चेहरा व त्यानें मिळविलेली लष्करी फीत पाहून त्या आईस जें समाधान वाटलें व आपला मुलगा देशकार्यासाठीं आतां समरभूमीवर जाऊन आपलें कर्तव्य बजावणार हें लक्षांत येऊन तिला जो अभिमान वाटला त्याचें वर्णन शब्दांनीं कसें व्हावें ? एवढें मात्र खरें कीं तो घरीं आल्यापासून रणांगणावर जाण्याकरितां निघेपर्यंत जे ८।१५ दिवस गेले त्या अवधींत ती आई व तिचा मुलगा अतिशय आनंदांत असत. असे वीर व अशा वीरमाता ज्या देशांत आजतागायत हयात आहेत त्या देशाचें नांव जगाच्या इतिहासांत दुमदुमत राहिल्यास नवल कसलें ?

---

ब्रुसेल्स शहरास जर्मन लोकांनीं वेढलें त्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट पारिसच्या एका प्रमुख वर्तमानपत्राच्या बातमीदारानें दिली आहे. तो म्हणतो:— जर्मन येणार ही बातमी कळतांच शहरांतील लोकांची पळापळ सुरू झाली. ज्या दिशेनें जर्मनांची स्वारी होणार असें कळले होतें त्याच्या उलट दिशेनें लोक शहराबाहेर पडू लागले. पण जर्मन सैन्य आल्याचें प्रत्यक्ष पाहिल्यावाचून आपण तें शहर सोडावयाचें नाहीं असा माझा निश्चय झाला असल्यामुळें मी दूरवर नजर देऊन पहात राहिलों होतों. इतक्यांत कांहीं

अंतरावर धुळीचा लोट दिसला. त्याबरोबर लोक तिकडे बोट दाखवून " ते पहा प्रशियन आले " असे ओरडूं लागले. मी निरखून पाहिलें. परंतु मला धुरा खेरीज कांहींच दिसेना. मनुष्यांचा मागमूस देखील नसून नुसता धुरळा उडत असलेला पाहून मी आश्चर्यचकित झालों. त्यांतल्या त्यांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी कीं तो धुरळा हात दोन हातापेक्षां उंच उडत नव्हता. मी अधिकच लक्षपूर्वक पाहूं लागलों, तेव्हां त्या लोटांच्या मागें लाखो प्राण्यांचें सैन्य येतांना दिसलें. पण ते प्राणी द्विपाद नसून चतुष्पाद होते. हा समुदाय उंदरांचा होता! जर्मनांनीं तोफांच्या गडगडाटानें जेव्हां इतर किल्ले पाडले व कित्येक गांव उध्वस्त केले तेव्हां हे दूरदर्शी उंदीर जीव वाचविण्यासाठीं पळत सुटले, व शेवटीं त्यानीं ब्रूसेल्स किल्ला गांठला. पण ही उंदरांची सूचना मिळतांच शहरांतील लोक—प्लेगच्या भयानें हिंदुस्थानांतील लोक गांवाबाहेर पडतात त्याप्रमाणें—तत्काळ गांव सोडून निघून गेले. एकंदरींत संकटाची सूचना देण्याचें काम उंदीर अनेक प्रसंगीं करतात असें दिसतें.

---

सरहद्दीवर रणधुमाळी माजून राहिली असली तरी फ्रान्समधील सर्वच लोक बारानबारा चोवीस तास लढाईखेरीज इतर व्यवहार मुळींच करीत नाहींत असें नाहीं. स्वतः लढणें अगर युद्धसामुग्री तयार करण्यास हरएक प्रकारें मदत करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे ही गोष्ट प्रत्येक फ्रेंच गृहस्थ व फ्रेंच गृहिणी जाणते. पण तें कर्तव्य बजावल्यानंतर जो वेळ शिल्लक राहतो तो त्यांनीं करमणुकींत घालविला तर त्यास दोष देण्याचें कारण नाहीं. सारा दिवस काम करीत राहणें अशक्य आहे. मनाला मधून मधून विसावा न दिल्यास त्याची तरतरी कमी होते. असो. रोजचें काम झाल्यानंतर लढाईच्या दिवसांत देखील फ्रेंच लोक नाटकें पहाण्यास जातात हें खरें. पण त्या नाटकांत देखील देशाभिमानाचें नांव निघतांच सर्व श्रोतृसमाज प्रफुल्लित अंतःकरणानें डोलूं लागतो. अशा एका प्रसंगाचें वर्णन एका अमेरिकन गृहस्थानें दिलें आहे तें असें—" मी गेल्या महिन्यांत फ्रान्समधील एका शहरांत नाटक पहाण्यास गेलों होतों. एक अंक झाल्यानंतर पडदा पडला तेव्हां सर्व लोक मोकळीं हवा घेण्याकरितां नाटकगृहाबाहेर आले; त्याबरोबर मींही बाहेर पडलों. माझ्यासमोर तीन शिपाई दिसले त्यांपैकीं दोघांनीं कुबडयांचा आधार घेतला होता, पण त्यांच्यामध्यें जो तिसरा ठेंगणा शिपाई होता त्याच्याशीं ते मोठ्या प्रेमानें बोलत होते. अधिक लक्षपूर्वक पाहिलें तेव्हां मला असें दिसून आलें कीं दोन शिपायांना कुबडयाच्या सहायानें चालण्याची सवय नसल्यामुळें मधल्या मनुष्याच्या खांद्याचा आधार त्यांना चालतांना घ्यावा लागे. पण मधला मनुष्य आंधळा होता; व त्याला सभोंवार काय चाललें आहे तें सांगण्याचें काम ते दोघेही करीत होते. त्या नाटकासंबंधीं गुणदोषविवेचन करण्यांत तीघेही गुंतले होते. इतक्यांत पडदा उघडला. तेव्हां सर्व लोक परत नाटकगृहांत गेले. पहिल्याच प्रवेशांत एक सुप्रसिद्ध नटी काम करणार होती. ती रंगभूमीवर येतांच सारें नाटकगृह स्तब्ध झालें. त्या नटीनें फ्रेंच पद्धतीचा जयसूचक तिरंगी पोषाख केला होता. तिनें खणखणीत आवाजानें सुप्रसिद्ध फ्रेंच राष्ट्रगीत ( ला. मार्सेलीस ) म्हणण्यास सुरुवात केली. आपल्या मधुर पण गंभीर स्वरानें तिनें सर्व नाटकगृह तल्लीन करून टाकलें. माझे डोळे अश्रूंनीं भरून आले. हा सर्व नाटकी प्रकार आहे असें मी मनास बजावून अश्रू आवरून धरण्याचा प्रयत्न चालविला होता. इतक्यांत पेटीचा सूर थांबला; व त्या नटीनें गुडघे टेकून जमिनीवर ठेवलेल्या राष्ट्रीय निशाणाचें आदर-

पूर्वक चुंबन घेतले. त्यावेळीं मात्र मला डोळे पुसण्याचा प्रसंग आला. इतर लोकाकडे पाहिलें तों सर्व तोच प्रकार. चांगली दाढीवाली पोक्त मंडळी देखील लहान मुलाप्रमाणें रडत होती. मागे सांगितलेल्या तीन शिपायांची स्थिति काय आहे ते जाणण्याची मला साहजिक इच्छा झाली. प्रथम ते मला दिसेनात. पण थोड्या वेळानें माडीवर ग्यालरींत तिघेही दिसले. ते कठड्याला टेकून राष्ट्रगीत ऐकण्याकरतां कान टवकारून बसलेले दिसले. गीत चाललें असतांना मधल्या आंधळ्याच्या चेहऱ्यावर भिन्नभिन्न विचारतरंगाच्या छटा स्पष्टपणें दिसत होत्या; आणि गाणें संपलें तेव्हां त्यानें इतर लोकांबरोबर मोठमोठ्यानें टाळ्या वाजविल्या. त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या अंतःकरणांतील देशाभिमानाचें तेज स्पष्टपणें दिसत होतें. सारांश आंधळा असो किंवा डोळस असो, पुरुष असो किंवा स्त्री असो, चालू महायुद्धांत प्रत्येक फ्रेंच मनुष्यानें राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यांत व स्वराष्ट्राविषयीं सदैव पूज्यबुद्धी वागविण्यांत जें अपूर्व उदाहरण घालून दिलें आहे त्यामुळें एकोणीसाव्या शतकाप्रमाणें वीसाव्या शतकांत देखील फ्रेंच लोकांना जगांतील उच्च विचाराचे नेते असा मान मिळेल यांत शंका नाहीं.

---

# रक्त व पाणी.

**लेखिका**—कुमारी सोनूबाई–बडोदें शिक्षिका गर्ल्सस्कूल.


## रक्तरूपी बाजार.

एका राक्षसिणीला भीमापासून घटोत्कच नांवाचा पुत्र झालेला होता. या घटोत्कचानें वत्सला हिचें हरण केलें. याविषयींचें वर्णन महाभारतांत दिलेलें आहे. या वत्सलाहरणाच्या प्रसंगीं घटोत्कचानें एक मायावी बाजार भरविला होता. या बाजारांत दुर्योधनाकडच्या वऱ्हाडी मंडळींना त्यांचीं जुनीं वस्त्रें, जुनें सामान घेऊन त्याऐवजीं त्यांना नवीं वस्त्रें, नवें सामान मिळालें होतें. आमच्या शरिरांतही रक्तरूपी फिरता बाजार आहे. तो वरील घटोत्कचाच्या बाजाराप्रमाणें आहे. आमच्या शरिरांतील हाडांना क्षार पाहिजेत; मेंदूला फास्फरस पाहिजे, सांध्यांना तेल ( वंगण ) पाहिजे. स्नायूंना मांसवर्धक द्रव्यें पाहिजेत; यांना हीं सर्व द्रव्यें रक्तरूपी बाजारांतून मिळतात. वर सांगितलेल्या सर्व भागांत जीर्ण व निरुपयोगी झालेले पदार्थ सांचलेले असतात. हे पदार्थ वर सांगितलेल्या रक्तरूपीं बाजारांत टाकून दिले जातात व त्या ऐवजीं स्वतःला आवश्यक अशा पौष्टिक पदार्थांचें रक्तांतून ग्रहण केलें जातें. घटोत्कचाचा बाजार मायावी होता. यामुळें वऱ्हाडी मंडळींचें नवें मिळालेलें सामान पुढें एकदम नाहींसें झालें. जुनें तर त्यांनीं अगोदरच देऊन टाकिलें होतें. वऱ्हाडी मंडळींचें नवेंही सामान गेलें व जुनेंही गेलें. परंतु आमच्या शरिरांतील रक्ताचा बाजार तसा मायावी नाहीं. ह्या बाजारांत देवघेवीचें काम अगदीं बरोबर चालतें. दूषित पदार्थ देऊन त्या ऐवजीं पौष्टिक पदार्थ मिळतातच. ही देवघेव रात्रंदिवस चालू असते. हिला खंड म्हणून असा कधीं पडत नाहीं. एकंदरींत श्वासोच्छ्वासाची क्रिया किती महत्त्वाची आहे व श्वासोच्छ्वासाच्या इंद्रियांना योग्य व्यायाम देऊन तीं चांगलीं राखणें हें किती फायदेशीर व जरूर आहे हें स्पष्ट होतें.

## पाणी.

मूत्रपिंड, त्वचा व फुफ्फुसें हीं इंद्रियें शरिरांतील मळ बाहेर फेंकून देतात. पाण्याच्या मदतीनें हीं इंद्रियें आपआपलीं कामें फार चांगलीं करितात. मूत्र व घाम यांत पाणी असतेंच. तसेंच फुफ्फुसांतून बाहेर येणाऱ्या हवेंतही पाण्याचा अंश वाफरूपानें असतो. हिवाळ्यांत तोंड उघडून हवा बाहेर सोडिली असतां तोंडांतून वाफ निघत आहे असें दृष्टीस पडते. उन्हाळ्यांत मात्र ही वाफ दिसत नाहीं; कारण हवेंतील उष्णतेमुळें ही वाफ विरळ होऊन जाते.

पाणी प्यावयाचें तें एकदम गटगट पिऊं नये. पाण्याचा घोट तोंडांत कांहीं सेंकंदेंपर्यंत ठेविला पाहिजे. असें केलें असतां पाण्यांत लाळ मिसळते व तें पचविण्यास सोपें जातें. अन्नाप्रमाणें पाण्याचेंही पचन होत असतें. तोंडांतील लाळपिंडें पाण्यांतील थोडींबहुत पोषक द्रव्यें शोषून घेतात. पाणी जठरांत कांहीं मिनिटें राहून नंतर तें आंतड्यांत जातें. या वेळीं पाण्यांतील पोषक द्रव्यें रक्तांत शोषिलीं जातात. पाण्याच्याच सहाय्यानें रक्त सर्व शरीरभर खेळत असतें. केसाहूनही सूक्ष्म अशा रक्तवाहिन्यांतून रक्त खेळलें पाहिजे. पाण्याच्या मदतीवांचून हें कसें घडून येईल? रक्तांतून पाण्याचा सर्व अंश काढून घेतला तर रक्ताची स्थिति काय होईल, याचा थोडासा विचार करा. पाण्यावांचून रक्त एक चिखलाचा गोळाच बनून राहील. रक्त हें शरिराचें जीवन होय व पाणी हें रक्ताचें जीवन आहे. तेव्हां पाण्यास जीवनाचें जीवन म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.



शरीरांतील इंद्रियें आणि रक्तवाहिन्या.

पाणी शरिरांतील उष्णतामान सारखें राखतें. काम करून थकून आल्यावर गुळणा करून एक पेलाभर पाणी पिण्यानें आपले सर्व शरीर गार होऊन जातें याचा अनुभव आपणांस पुष्कळ वेळां येतो.

पाण्याच्या योगानें मोठ्या आंतड्यांतील मळ ओला होतो व त्यायोगें त्याला बाहेर पडणें सोपें जातें. यथेच्छ पाणी प्यालो तर आपणांस मलावरोध होण्याची भीति राहणार नाहीं. तसेंच तें अन्नपचनास अत्यंत जरूर असे लाळ, जाठररस इत्यादि रस उत्पन्न करतें; व त्यामुळें अन्नपचनास मदत होते. असे पाण्याचे पुष्कळ उपयोग आहेत म्हणून शरिराला पाण्याचा योग्य पुरवठा करणें अत्यंत अवश्य आहे. जेवणाच्या वेळीं मात्र फार पाणी पिऊं नये. तसें केल्यास लाळ व जाठररस हीं पातळ होतात; चर्वण चांगलें होत नाहीं; अन्नांत लाळ पूर्णपणें मिसळत नाहीं; व यायोगें पचनक्रियेस व्यत्यय येतो. खरोखर म्हटलें म्हणजे जेवण झाल्यावर तीन तासांनीं पाणी पिणें उत्तम; परंतु ज्यास असें करणें अवघड जात असेल त्यानें जेवणानंतर एक अथवा दोन तासांनीं पाणी प्यावें. तहान लागली असतां इतर वेळीं, पहाटेस किंवा रात्रीं निजते वेळीं पाणी प्यावें. आपला त्यापासून कांहीं तोटा होणार नाहीं; उलट उपयोग मात्र फार होईल.

# शास्त्रीय माहिती.

( लेखक—पु. वि. गोगटे. बी. एस्. सी. खांडवा. )

## उष्णता लेखांक ४.

सकाळची चहाची वेळ होती. अण्णासाहेब व मधु चहा घेत बसले होते. चहा आज थोडा जास्त गोड झाल्यामुळें मधु म्हणाला, बाबा, आज चहांत रोजच्यापेक्षां थोडी जास्त साखर पडली आहे, नाहीं कां?

अण्णाः—( थोडेसें स्मित करून ) कशावरून म्हणतोस साखर जास्त झाली म्हणून?

मधुः—बाबा, रोजच्यापेक्षां चहा आज विशेष गोड नाहीं लागत का?

अण्णाः—चहा जास्त गोड झाला म्हणून चहांत रोजच्यापेक्षां जास्त साखर आहे असें कशावरून? साखर रोजच्या इतकीच टाकली असून एखादा पेला पाणीच कमी टाकलें नसेल कशावरून? किंवा रोजच्यापेक्षां आज चहाचेंही प्रमाण कमी असेल. चहाचें प्रमाण कमी असेल तरी चहा गोड होण्याचा संभव आहे.

मधुः—साखर जास्त आहे किंवा पाणी कमी आहे किंवा चहाचें प्रमाण कमी आहे हें कांहीं सांगता येणार नाहीं. चहा मात्र जास्त गोड झाला आहे. मग तो कशानें झाला कोणास ठाऊक.

अण्णाः—मग तूं जें मघां म्हटलेंस कीं साखर जास्त आहे तें चुकीचें आहे, खरें ना? तुझ्या जिभेनें जी परीक्षा केली ती फक्त गोडीची केली, तिला साखरेच्या प्रमाणाची परीक्षा करतां आली नाहीं.

मधुः—पण एखादा पदार्थ जास्त गोड असला म्हणजे त्यांत साखर जास्त आहे असें आपण नाहीं म्हणत का, बाबा?

अण्णाः—पण तें केवळ अनुमानानें. एक पेलाभर खीर आहे व एक पेलाभर नुसतें पाणी आहे असें समज. आतां या प्रत्येक पेल्यांत दोन दोन चमचे साखर घातली. दोन चमचे साखरेनें पाणी चांगलें गोड होईल पण खीर कमी गोड होईल. दोन्ही पेल्यांत पदार्थ सारखाच आहे व ज्यांत साखरही सारखीच आहे. आतां नुसत्या जिभेनें परीक्षा करावयाची म्हटली तर खिरींत साखर कमी आहे व पाण्यांत साखर जास्त आहे असेंच कोणीही म्हणेल. जिभेनें साखरेचें प्रमाण निव्वळ अनुमानानें ठरविलें. हें अनुमान कसें चुकतें हें तुला समजलें? जिभेनें एवढें सांगतां येईल कीं दोन्ही पदार्थ सारखे गोड नाहींत; खिरींत पाण्याच्या गोडीइतकी गोडी येण्यास जास्त साखर हवी असेंही म्हणतां येईल; परंतु खिरींत किती साखर आहे, पाण्यांत किती साखर आहे हें मात्र सांगतां येणार नाहीं.

मधुः—म्हणजे बाबा, आपल्या जिभेनें फक्त गोडीचें प्रमाण समजतें, साखरेचें समजत नाहीं असेंच ना, बाबा?

अण्णाः—होय, पण यांतून आणखी जें समजायचें आहे तें हें कीं साखर व साखरेची गोडी या भिन्न गोष्टी आहेत. साखर व साखरेची गोडी या दोन्ही गोष्टी एकच असल्या तर ज्या जिभेनें साखरेची गोडी समजते त्याच जिभेनें साखरेचें प्रमाणही समजलें असतें.

मधुः—आपण बाबा वर्तकी साखर खाली म्हणजे ती साखर विलायती साखरेपेक्षां जास्त गोड लागते

याच्यावरून ही साखर व साखरेची गोडी या निरनिराळ्या गोष्टी आहेत असें सांगतां येईल. दोन्ही साखराच; पण एकांत जास्त गोडी व दुसऱ्यांत कमी गोडी.

अण्णा:—साखर व साखरेची गोडी यांतला फरक तुला जांगला समजला. चल आतां आपण पाणी तापविण्याच्या चुलीकडे जाऊं. हें पहा पाणी तापविण्यासाठीं हा हांडा चुलीवर ठेवला आहे. याच्याखालीं आपण जाळ करतों. जाळांतील उष्णता भांड्याला लागते व भांड्यांतून आंत पाण्यांत शिरते. ही उष्णता पाण्यांत पसरली म्हणजे त्याला आपण तापलें असें म्हणतों. आतां जी उष्णता ह्या हांडाभर पाण्यांत पसरली आहे तितकी सर्व उष्णता ( हांड्यांतून एक पेलाभर गरम पाणी बाहेर काढून ) या पेलाभर पाण्यांत आहे का !

मधु:—नाहीं. कशी असेल. हांड्यांतल्या सर्व पाण्याची उष्णता या पेलाभर पाण्यांत आली तर हांड्यांतलें पाणी थंड नाहीं कां होणार? या पेलाभर पाण्यांत पेलाभर पाण्याच्या प्रमाणांतच उष्णता असेल.

अण्णा:—म्हणजे या हांड्यांत पूर्वी शंभर पेले पाणी असेल तर त्या पाण्यांतून हें पेलाभर पाणी बाहेर काढलें म्हणजे सर्व हांडाभर पाण्यांत जितकी उष्णता असेल त्याचा शंभरावा हिस्सा या पाण्यांत उष्णता आली असेल असेंच ना?

मधु:—होय.

अण्णा:—आतां या दोन्ही पाण्यांत हात घालून पहा. पेलाभर पाण्यांत कमी उष्णता व हांडाभर पाण्यात जास्त उष्णता आहे म्हणून पेल्यांतलें पाणी कमी गरम व हांड्यांतलें पाणी जास्त गरम आहे का?

मधु:—( दोन्ही पाण्यांत हात घालून ) नाहीं, बाबा. दोन्ही सारखींच कढत आहेत.

अण्णा:—याचें काय कारण बरें? हांड्यांत जर जास्त उष्णता आहे तर तें पाणी जास्त कढत कां लागूं नये?

मधु:—बाबा, हांड्यांतल्या पाण्यांत उष्णता जास्त आहे हें खरें पण त्या मानानें पाणी पण जास्त आहे, त्यामुळें, ती सर्व उष्णता इतक्या थोरल्या पाण्यांत पसरल्यामुळें पाणी जास्त कढत लागत नाहीं.

अण्णा:—आता तूं जो म्हणालास कीं दोन्ही जातींचें पाणी सारखेंच कढत आहे तर हें तुला कसें समजलें?

मधु:—हातानें, बाबा.

अण्णा:—आतां तूं डोळे मीट व पुन्हां पाण्यांत हात घाल.

मधु:—दोन्ही डोळे मिटले तरी सारखींच कढत लागतात.

अण्णा:—पण कोणच्या पाण्यांत जास्त उष्णता आहे व कोणच्या पाण्यांत कमी याची कल्पना तुला येतें का?

मधु:—नाहीं. दोन्ही पाणी सारखींच कढत आहेत एवढेंच.

अण्णा:—म्हणजे तुझ्या हातानें तुला पाण्याचा कढतपणा समजला पण त्या पाण्यांत किती उष्णता आहे हें मात्र हाताला समजलें नाहीं. खरें कीं नाहीं?

मधु:—होय बाबा. हातानें कढतपणा समजतो पण उष्णता समजत नाहीं; म्हणजे उष्णता व कढतपणा या गोष्टी भिन्न आहेत, नाहीं का?

अण्णा:—अगदीं बरोबर ताडलेंस.

मधु:—बाबा साखर व साखरेची गोडी या जशा भिन्न गोष्टी आहेत, तसेंच उष्णता व उष्णतामान याही गोष्टी भिन्न आहेत, नाहीं का?

अण्णा:—होय ज्याप्रमाणें जिभेला गोडीचें प्रमाण समजतें पण साखरेचें प्रमाण समजत नाहीं, त्याचप्रमाणें हाताला कढतपणा समजतो पण उष्णतेचें प्रमाण समजत नाहीं. या कढतपणाला उष्णतेची तीव्रता किंवा उष्णतामान असेंही म्हणतात. आतां गोडीचें प्रमाण समजायला आपण जीभ उपयोगांत आणतो व उष्णतामान समजायला हात उपयोगांत आणतों. परंतु

हीं इंद्रियें कितपत भरंवसेदार आहेत तें पाहूं. तू कधीं लाडू किंवा असाच गोड पदार्थ खाऊन वर चहा प्यायलास असें तुला आठवतें का?

मधु:——होय बाबा. कालच बनीच्या येथें लक्ष्मीकाकूंनीं मला लाडू व चहा दिला होता.

अण्णा:——मग तुला लाडूवर चहा गोड लागला?

मधु:——नाहीं बाबा. लाडू खाल्ल्यावर चहा मुळींच गोड लागत नाहीं. मी तर लाडू नकोच म्हणत होतो पण लक्ष्मीकाकूंनीं आग्रहानें माझ्याकडून खावविला.

अण्णा:——लाडू खाल्ल्यावर चहा गोड कां लागूं नये? चहांत तर साखर असते मग त्या साखरेची गोडी आपल्या जिभेला कां समजत नाहीं?

मधु:——मला वाटतें लाडूंत साखर जास्त असल्यामुळें आपली जीभ गोड होते म्हणून गोडांत गोड समजत नसेल.

अण्णा:——बरोबर आहे. आपल्या जिभेला जास्त गोडाची संवय झाली म्हणजे कमी गोड पदार्थ असला तर त्याची गोडी आपल्याला समजत नाहीं. थंड देशांत रहाणाऱ्या लोकांना थंडीची संवय झालेली असते. हे लोक आपल्या हिंदुस्थानांत आले म्हणजे त्यांना येथील हिंवाळा आपणास जितका थंड वाटतो तितका त्यांना वाटत नाहीं. आपल्याला गरम कपड्याची अवश्यकता भासते; त्यांना मुळींच भासत नाहीं. उन्हांत काम करीत असलेल्या मनुष्यास झाडाखालींच थंड वाटतें व चांगल्या चुनेगच्चीच्या घरांत रहाणाऱ्या मनुष्यास झाडाखालीं उकडतें. लोहार नेहमीं भट्टीजवळ असतात. आपण एक क्षणभर जरी भट्टीजवळ गेलों तरी आपला जीव घाबरतो. या सर्वांचें कारण काय म्हणशील तर संवय.

मधु:——मग बाबा, जिभेला जशी कमी जास्त संवय असेल त्या मानानें आपणाला पदार्थ कमी किंवा जास्त गोड लागेल.

अण्णा:——लागेल काय, लागतोच. आपण पहात नाहीं कीं पंक्तींत कांहीं मंडळी जिलब्यांच्या गोडीवर संतुष्ट न होतां, जिलब्यांवर पाक मागून घेतात. या लोकांच्या जिभेला साखरेची वरीच संवय झाल्यामुळें नुसत्या जिलब्या त्यांना जशा हव्या तशा गोड लागत नाहींत. ज्यांना साखर किंवा गोड पदार्थ खाण्याची विशेष संवय नाहीं त्यांना जिलब्यांच्या गोडीनेंच वीट येतो.

मधु:——मग बाबा, निरनिराळ्या मनुष्यांना एकच पदार्थ कमी किंवा जास्त गोड लागतो. असें जर आहे तर आपल्या जिभेला गोडीची खरी परीक्षा करतां येत नाहीं असें दिसतें.

अण्णा:——जिभेनें गोडीचें ठोकळमान समजेल, पण फार बारीक फरक समजणार नाहीं. असेंच आपल्या हाताचेंही आहे. मघां तूं म्हणाला होतास कीं उष्णतामान किंवा कढतपणा आपल्या हाताला समजतो; पण तो देखील ठोकळ मानानेंच. याचा आपण एक प्रयोग करूं. तीन सारखीं भांडीं आण पाहूं. (मधूनें तीन भांडीं आणल्यावर अण्णासाहेबांनीं तीं एका ओळींत ठेऊन एका बाजूच्या भांड्यांत चांगलें कढत पाणी ओतलें; दुसऱ्या बाजूच्या भांड्यांत थंड पाणी ओतलें व मधल्या भांड्यांत कोंवट पाणी ओतलें. नंतर त्यांनीं मधुकरास एक हात थंड पाण्यांत व एक हात कढत पाण्यांत ठेवावयास सांगितलें. कांहीं वेळानें ते दोन्ही हात बाहेर काढून मधल्या कोंवट पाण्यांत बुचकळण्यास सांगितलें व विचारलें) "मधु, आतां सांग पाहूं; मधलें पाणी कढत आहे किंवा थंड आहे?

मधु:——बाबा, ह्या थंड पाण्यांतल्या हाताला हें पाणी गरम लागतें व कढत पाण्यांतल्या हाताला थंड लागते.

अण्णा:——म्हणजे, पाणी एकच पण ज्या हाताला जशी संवय झाली त्याप्रमाणें हें पाणी थंड किंवा गरम लागतें. हात हे उष्णतामानाचे खरे परीक्षक नाहींत. आंघोळीचें पाणी अंगावर घेण्यासारखें झालें आहे किंवा नाहीं, लहान मुलांना चहा किंवा दूध पाजतांना तें कितपत गरम आहे, त्यानें त्यांचें तोंड पोळेल

किंवा काय अशी ठोकळ उष्णतामानें हातानें पहातां येतील.

मधु:—बावा, हातानें जर ठोकळ उष्णतामानें समजतात तर सूक्ष्म रीतीनें उष्णतामान पहावयाचें असेल तर त्याला कांहीं साधन आहे का ?

अण्णा:—त्याला साधन आहे तर. गेल्या वेळेस मीं तुला सांगितलें होतें कीं उष्णतेनें पदार्थ प्रसरण पावतात व या तत्त्वाचा उपयोग आपण व्यवहारांत फार करतों म्हणून.

मधु:—हो, बावा, मला आठवलें. आपण हेंही म्हणाला होतां कीं, डॉक्टरजवळ ताप मोजण्याचें जें थर्मामिटर असतें त्यांत याच तत्वाचा उपयोग केला आहे.

अण्णा:—हेंच थर्मामिटर म्हणजे काय तें मीं तुला सांगणार आहे. या थर्मामिटरनें उष्णतामान मोजतां येतें, पण उष्णता मोजतां येत नाहीं. उष्णता व उष्णतामान यांतील फरक तुला समजावा, व घोंटाळा होऊं नये म्हणून साखर व साखरेची गोडी यांचें उदाहरण घेऊन थोडेसें विस्तारपूर्वक सांगितलें. तूं पाहिलेस कीं हाताला एखाद्या पदार्थांत उष्णता किती आहे हें समजत नाहीं पण त्या पदार्थाचें उष्णतामान म्हणजे कढतपणा समजतो. त्याचप्रमाणें थर्मामिटरनें उष्णता समजत नाहीं पण उष्णतामान समजतें. आपल्या हाताला व थर्मामिटरला दोघांना उष्णतामान समजतें. फरक एवढाच कीं हातानें ठोकळ उष्णतामान समजतें, व थर्मामिटरनें सूक्ष्म रीतीनें समजतें.

मधु:—बावा, थर्मामिटरनें उष्णतामान कसें पहातात तें सांगाल कां ?

इतक्यांत घड्याळांत दहाचे ठोके पडले व रमाबाईनींही " आतां स्नान करून घ्यायचें; नाहीं तर जेवण झाल्यावर मग कचेरींत जाण्याची घाई होईल. " अशी सूचना दिल्यामुळें अण्णासाहेब मधूस " एखाद्या सुट्टीच्या दिवशीं सांगेन " असें म्हणून स्नान करावयास उठले व मधुही त्यांच्या मागोमाग स्नान करावयास गेला.

---

**पुढचा व मागचा देखावा**—प्यारीस पोलिसच्या अधिकाऱ्यानें आपल्या शिपायांकरितां एक विलक्षण हिकमतीचे चष्मे बनविले आहेत. त्यांच्या योगानें त्यांना आपल्या डोळ्यांसमोर काय चाललें आहे एवढेंच न दिसतां आपल्या मागें काय चाललें आहे हेंही दिसतें. चष्म्यांच्या बाह्य कोनांच्या बाजूस लहान चंद्राकृती ◡ आरसे बसविले आहेत. त्यांच्यायोगानें पुढें काय चाललें आहे हें दिसण्यांत व्यत्यय न येतां मागचें मात्र स्पष्ट दिसतें.

*   *   *

**मास्तर:**—काय रे रामा, तुला सुट्टींत अंकगणित सोडवण्यास सांगितलें होतें, सोडविलेस कां ?

**रामा:**—सर, मी तें सोडविण्यापूर्वींच माझ्या धाकट्या भावानें सोडविलें.

*   *   *

**एक:**—काय हो इगतपुरीस किती डॉक्टर आहेत ?

**दुसरा:**—आहेत सात आठ.

**पहिला:**—तर मग आणखी एक दोन चालण्यासारखे आहेत.

**दुसरा:**—अहो, न चालावयाला काय झालें, रस्ते खूप मोठे आहेत.

*   *   *

**गुंडोपंत:**—( भावी वरास उद्देशून ) " म्हटलें आपण कुठें असतां ? "

**भावी वर:**—" कॉलेजांत असतो. "

एके दिवशीं वरील गृहस्थास कॉलेजांत जातांना पाहून गुंडोपंत विचारतात, " का हो कोणच्या क्लासांत आहात ? "

" मी कोणच्याही क्लासांत नाहीं, परंतु सर्व क्लासांचा आचारी आहे.

# गप्पागोष्टी.

मिठाचा खडा पाण्यांत विरघळतो; ऊन पाण्यांत तुरटी विरघळते, कागदी लिंबाच्या रसांत साखर आणि कित्येक आसिडांत सोन्यारुप्यासारखे धातु व शंख शिंपा वगैरे कठीण पदार्थ विरतात. तेव्हां कोणताही पदार्थ आंत टाकला असतां तो विरून जावा असे कडक आसीड शोधून काढण्याचा प्रयत्न फार दिवसांपासून चालला आहे. त्यांत अद्याप म्हणण्याजोगें यश आलें नाहीं. मध्यंतरी एका विनोदी गृहस्थानें सर्व पदार्थांना विरवून टाकणारें रसायन आपण शोधून काढलें असें जाहीर केलें. तेव्हां कांहीं लोक त्याजकडे जाऊन तें रसायन आपणास दाखविण्याबद्दल आग्रह करूं लागले. तेव्हां तो म्हणाला, "नुसतें पाहून काय करावयाचें? तुम्ही भांडें आणा, त्यांत थोडा रसच देतों म्हणजे झालें." तेव्हां एका गृहस्थानें पंचपात्री पुढें केली तेव्हां तो विनोदी गृहस्थ म्हणाला, "यांत तें रसायन ओतलें तर पितळ त्यांत विरून तो रस खालीं पडेल." नंतर कोणी रुप्याचें, कोणी कांचेचें, तर कोणी दगडाचें भांडें तो अद्भुत रस घेण्याकरतां आणलें; पण सर्वांना त्यानें एकच उत्तर दिलें. तो म्हणाला, "अहो! माझ्या रसायनांत तुम्ही आणलेल्या व न आणलेल्या सर्व जातीच्या पदार्थांचीं भांडीं विरघळून रस होत असल्यामुळें माझें रसायन ठेवता येईल असें भांडें तुम्हांस बनवितां येईल असें लक्षण मला दिसत नाहीं." तेव्हां लोकांच्या लक्षांत आलें कीं असले सर्वभक्षक आसीड सांपडणें शक्य नाहीं. पण अलीकडे सर्वभक्षक नसलें तरी बहुतेक पदार्थांचें पाणी करणारें **फ्लोराइन** नांवाच्या तत्वाचा शोध लागला आहे.

* * * *

पाणी आपणास प्रवाही स्थितींत आढळतें. परंतु त्यास थंडीनें बर्फ म्हणजे घनरूपी व उष्णतेनें वाफ म्हणजे वायुरूपी बनविणें शक्य आहे, म्हणजे पाणी घन, प्रवाही व वायुरूप या तीनही स्थितींत आढळतें. इतर सर्व पदार्थांस हाच नियम लागू पडतो. बहुतेक वायुरूपी पदार्थांना थंडी व दाव लावून प्रवाही रूप देतां येतें असें आतां सिद्ध झालें आहे. इ. स. १८२३ मध्यें क्लोराइन वायूस **फॅरडे** यानें प्रवाही बनविलें. ही एक गोष्ट साधतांच त्यानें आणखी कित्येक वायूंना पातळ पाण्यासारखे बनविलें. पण हवेंतील कित्येक वायूंना द्रवरूप देणें त्याला साधले नाहीं. अशा वायूंना त्यानें "खरे वायू" असें निराळें नांव दिलें. पण १८७७ मध्यें **पिक्टेट** नांवाच्या विद्वानानें हवेचे पातळ थेंब बनविलें! आणि १८९५ सालीं तर हवेस द्रवरूप देण्याची यंत्रें इतकी जबरदस्त निघालीं कीं आतां पातळ हवा कित्येक पिपें भरून मिळूं शकतें! हैड्रोजन वायूस प्रवाहीरूप देण्यास पुष्कळ प्रयोग करावे लागले; आणि १८९८ मध्यें **डेवार** यानें या कामांत यश मिळविलें. हेलियम नांवाचा वायू मात्र पातळ होत नव्हता पण त्याचेंही १९०८ सालीं **ओमनेस** यानें थेंब बनविले. मात्र या वायूस घनरूप देण्याच्या म्हणजे या वायूच्या वड्या बनविण्याच्या कामीं अद्याप यश आलें नाहीं.

* * * *

बर्फ अगदीं थंडगार असते, लोखंडाचा तापलेला गोळा अतिशय ऊन असतो, आणि टेबल, खुर्ची, खांब, जमीन वगैरे निर्जीव पदार्थांपेक्षां आमचें अंग ऊन असते, ही गोष्ट सर्वांना माहीत असते. पण थंड साधारण ऊन व कडकडीत या शब्दांनीं विद्वान लोकांचें समाधान होत नाहीं. उष्णतेचें मान मोजण्याकरितां कांहीं साधनें तयार केलीं आहेत. ताप आल्या वेळीं 'थर्मामिटर' लाऊन पाहतात अशा प्रकारचें एक उष्णता–मापक यंत्र,

आहे. हीं मापें इंग्रजी व फ्रेंच पद्धतीचीं अशी दोन जातीचीं आहेत. पैकीं फ्रेंच म्हणजे सेंटिग्रेड मान समजण्यास सोपें आहे. त्याची कल्पना पुढें दिलेल्या आकड्यावरून येईल. बर्फ वितळू लागण्यास शून्य अंश उष्णता पुरते; आणि पाण्यास आधण येण्यास १०० अंश उष्णता लागते. तांबड्याभडक ज्वालेचें उष्णतामान १००० अंश असतें; लोखंड वितळणाऱ्या भट्ट्यांत १७०० अंशपर्यंत व विजेचे सहायानें ३५०० अंशपर्यंत उष्णता सध्या उपयोगांत आणतात. ४ हजार अंशापेक्षां अधीक उष्णता उत्पन्न करण्याचें साधन सध्या कोणत्याही मनुष्यास माहीत नाहीं. सूर्याचें उष्णतामान ६ हजार अंश असावें असा तर्क आहे! उलटपक्षीं शून्यांशापेक्षा म्हणजे बर्फापेक्षां थंड पदार्थ तयार करण्याच्या कामीं पुष्कळ प्रयत्न केले तरी २७३ पेक्षां अधीक अंशाची थंडी उत्पन्न करिता येत नाहीं.

**पत्त्यांचे** आश्चर्यकारक खेळ किंवा पत्त्यांच्या खेळांचा वस्ताद गुरु—या पुस्तकांत स्टेजवर पत्त्यांचे आश्चर्यकारक खेळ दाखवून हजारों रु० मिळवितात. तसले ३७ खेळ भाषण, रचना, कृति यांसह आहेत. स्वस्त पैशाला १ खेळ पडतो, किं० ८८

पत्ता—वा. वि. इनामदार, मु. पो. नातेपुतें, जि० सोलापूर.

# सचित्र इसाप-नीति.

## पूर्वार्ध.

[ नवीन भाषांतर—भाग १ ला. ]

पृष्ठसंख्या २००, गोष्टी २६२, कागद जाड व गुळगुळीत,
सांचा क्राऊन, साईज अष्टपत्री, टाईप मोठा.

**या भागांत ११० सुंदर चित्रें आहेत.**

मुलांमुलींस अत्यंत उपयुक्त. किं. फार माफक—१ रु. ट. ह. ८२.

या भागाचे ६ पोटभाग केले आहेत; त्या प्रत्येकाचीं पृष्ठें ३६ असून किंमत ४ आणे ठेविली आहे. ज्यांस सबंध पहिला भाग एकदम घेण्यास सवड नसेल त्यांस हे पोटभाग घेणें अधिक सोईचें होईल. या भागाच्या मूळपृष्ठांवर सुंदर रंगित चित्रें दिलीं आहेत. नुकत्याच अक्षरओळख झालेल्या मुलांचें ह्या पुस्तकांतील लहान लहान गोष्टी वाचून त्यांचें मनोरंजन होतें व त्यांस वाचण्याची उत्तम गोडीही लागते.

# मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

ह्यांत प्रथम लहान मुलांना दिशा, नंतर व्याख्या व पाण्याचे विभाग समजावून देण्याकरितां लहान लहान **रंगीत नकाशे** दिले आहेत. पुढें **पर्वत, नद्या, आगगाडीचे रस्ते,** इलाख्याचे मुख्य भाग वगैरेंचे निरनिराळे **नकाशे** देऊन स्पष्ट दाखविले आहेत. भूगोलासारखा विषय लहान मुलांस समजावून देण्यास ह्या पुस्तकाचा उपयोग होतो. किं० ८१.

मिळण्याचें ठिकाण—चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.

# लक्ष्मीपूजन व भाऊबिजेची आठवण.

## ( दोन बोधपर गोष्टी. )

लेखकः—त्र्यं. सि. कारखानीस, ( महाराष्ट्र नाटक मंडळी. )

वरील गोष्टी काल्पनिक तर खऱ्याच; परंतु लेखकानें मनुष्यस्वभावाचें हुबेहूब चित्र वरील गोष्टींत ज्या चातुर्यानें व सफाईनें रेखाटलें आहे कीं, वाचणारांस क्षणभर त्या खऱ्याच घडत आहेत कीं काय, असा भास झाल्यावांचून रहात नाहीं. ह्या गोष्टीरूप बोधामृताचा स्त्री—पुरुषांचे मनावर पडा ठसा उमटावा म्हणून पुस्तकांत जागजागीं गोष्टींतील महत्त्वाचे प्रसंगांचीं सात चित्रें दिलेलीं आहेत. गोष्टी रोजच्या व्यावहारिक व सोप्या भाषेंत लिहिलेल्या असून दिपवाळीचे सणांत लहानथोर भावंडांनीं भाऊबिजेस ओंवाळणीदाखल आपल्या प्रियभगिनींस पाठविण्यास फारच योग्य अशा झाल्या आहेत. पुस्तकाचें बाह्यांगही फारच सुबक व रमणीय आहे. किंमत ८४. ट. ह. ८॥.

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

## शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि—शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

# मुलांच्या शिक्षणाचा अहवाल.

सर्व शाळांतुन ह्या पुस्तकांचा उपयोग करतां येतो. कारण अमुकच शाळेचें नांव यावर घातलेलें नाहीं. ह्यांत दर महिन्याच्या बारा महिन्यांचीं एकंदर बारा पानें मुलांच्या अभ्यासक्रमाकरितां किंवा मासिक परीक्षेचे गुण मोजण्याकरिता दिलेलीं आहेत शिवाय आईबाप किंवा पालक यांच्या अभिप्रायाकरितां प्रत्येक पेजाखालीं जागा ठेविली आहे. शेवटीं चांचणीपरीक्षा, वर्ग बदलण्याची परीक्षा, दरमहा वर्गांतील नंबराची सरासरी वगैरे निराळीं कोष्टकें दिलीं आहेत किं० ८८६.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.

# ध्रुव व चिलया.

अंगीं **स्वाभिमान** असणें हें मनुष्यत्वाचें–किंवा जिवंतपणाचेंही म्हणतां येईल,—खरें लक्षण आहे. **स्वाभिमान** हा व्यक्तीच्या उत्कर्षाचा पाया आहे; व राष्ट्राचा उत्कर्ष हें व्यक्तीच्या उत्कर्षाचें संतान असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं स्वाभिमानाचें बीं रुजविणें हा **राष्ट्रहिताचा श्रीगणेशा**—होय. पण स्वाभिमानाचें पाणी, मन कोंवळें असतांना अंगांत मुरलें पाहिजे; नाहीं तर पुढें तें केव्हांही मुरावयाचें नाहीं. तेव्हां हें कार्य अंशतः तरी व्हावें, या हेतूनें **ध्रुव व चिलया** या दोन **पौराणिक मुलांचीं चरित्रें** आम्हीं **रा. रा. कृष्णाजी गोविंद किनरे** यांजकडून मुद्दाम मुलांकरितां लिहविलीं आहेत. **ध्रुवाचें चरित्र** म्हणजे स्वाभिमानाची **केवळ जागती ज्योत** आहे; तसेंच **भक्ति व दृढ निश्चय** यांच्या बळावर **अमर कीर्ति, अखंड वैभव व चिरंजीवित्व** हीं कशीं संपादन करितां येतात, याचेंही तें प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्याचप्रमाणें आई-बापांची—**कुलाची—कीर्ति** राखण्याकरितां प्रसंगीं जिवावरही उदार होणें कसें श्रेयस्कर आहे, हें **चिलयाचे** चरित्रांत दाखविलें आहे. अशीं हीं दोन **हृदयंगम चरित्रें** अगदीं नवीन तऱ्हेनें लिहिलेलीं आहेत. **मुलांनींच काय,** पण थोरांनींही यांचीं नित्य पारायणें करावीं, इतकी यांची योग्यता आहे. आधीं चरित्रें गोड, त्यांत अत्यंत मोहक भाषेंत तीं रा. किनरे यांनीं लिहिल्यामुळें, ‘आधींच सोन्याचें, वरी जडावाचें’ असा प्रकार झाला आहे. छपाईचें कामही **अंतरंगाला साजेसेंच** केलें आहे. **सात सुंदर चित्रें** घातलीं आहेत. किंमत पांच आणे. ट. ख. निराळा.

# भारतांतील गोष्टी, [ भाग १ ला. ]

‘चिमुकलें भारत’ या मुलांना **अत्यंत प्रिय झालेल्या** पुस्तकांत कौरव व पांडव यांचा सरळ व सोप्या पण मोहक भाषेंत इतिहास दिला आहे. भारतांतील **उपकथाही तितक्याच महत्त्वाच्या** असल्यामुळें त्या **लहानपणीं मनावर ठसणें योग्य** आहे. म्हणून आम्हीं त्या **रा. कृष्णाजी गोविंद किनरे** यांजकडूनच मुद्दाम लिहविल्या आहेत. **गोष्टी** अशाच धाटणीनें लिहिल्या आहेत कीं, वाचतां वाचतांच त्यांचें **मर्म मुलांचे मनावर** आपोआप ठसावें. **उपदेशपर वाक्यें जाडअक्षरीं केलीं आहेत.** भाषा **मोहक,** छपाई **गोड. सात सुंदर चित्रें.** एकंदरींत बाह्यांग अत्यंत **मनोरम** पृ. १२९. किं. पांच आणे. ट. ह. निराळें.

**मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें सिटी.**


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस ८१८ सदाशिव पुणें सिटी.

# विषयक्रम.

विषय, — पृष्ठ.


इंग्रज लोकांची हकीगत. ... ... ... ... ... ... ... २२३
प्राणिशास्त्रांतील कित्येक सिद्धांत. ... ... ... ... ... ... २२५
गोकाकच धबधबा. ... ... ... ... ... ... ... २२८
जपानी व्यायाम–पद्धति. ... ... ... ... ... ... ... २३०
जगांतील सात आश्चर्यें. ... ... ... ... ... ... २३१
स्वभाव बदलतां येतो. ... ... ... ... ... ... ... २४०
शंकासमाधान. ... ... ... ... ... ... ... २४१
गप्पासप्पा. ... ... ... ... ... ... ... २४२

# ध्रुव व चिलया.

अंगीं **स्वाभिमान** असणें हें मनुष्यत्वाचें—किंवा जिवंतपणाचेंही म्हणतां येईल,—खरें लक्षण आहे. **स्वाभिमान** हा व्यक्तीच्या उत्कर्षाचा पाया आहे; व राष्ट्राचा उत्कर्ष हें व्यक्तीच्या उत्कर्षाचें संतान असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं स्वाभिमानाचें बीं रुजणें हा राष्ट्रहिताचा **श्रीगणेशा**—होय. पण स्वाभिमानाचें पाणी, मन कोंवळें असतांना मुरलें पाहिजे; नाहीं तर पुढें तें केव्हांही मुरावयाचें नाहीं. तेव्हां हें कार्य अंशतः [illegible] या हेतूनें **ध्रुव व चिलया** या दोन पौराणिक [illegible] बालकांचीं चरित्रें आम्हीं रा. [illegible] **किंमत ४ आणे** गोविंद [illegible] पहिला भाग **एकदम** घेण्यास सवड नसेल त्यांस हे पोटभाग घेणें अधिक सोईचें होईल. या भागाच्या मूळपृष्ठांवर **सुंदर रंगित** चित्रें दिलीं आहेत. नुकत्याच अक्षरओळख झालेल्या मुलांचें ह्या पुस्तकांतील लहान लहान गोष्टी वाचून त्यांचें **मनोरंजन** होतें व त्यांस वाचण्याची **उत्तम** गोडीही लागते.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

**[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]**

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून **ह्यांत** २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

**दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २.**

# रंगीत इसाप--नीति.

**ह्यांत एकंदर इसापनीतींतील** आठ अगदीं **सोप्या गोष्टी मोठ्या व जाड** टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक **गोष्टीसमोर** त्यांतील रहस्य दाखविणारें **रंगीत सुंदर** चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना **गोष्टींतील** तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक **नुकत्याच अक्षरओळख** झालेल्या **मुलांमुलींकरितांच** लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर **१७ गोष्टी** अगदीं **सोप्या** भाषेंत, व एकही **जोडाक्षर न येऊं देतां** लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं **कथानकाचें** मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच **त्यांतील** सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं० अवघी चार आणे, ट. ह. ८८६.

मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.

मोठमोठ्या नद्यांवरील पूल हळू हळू अस्तित्वांत आले. अद्यापही, इग्लंडांतील कांहीं कांहीं जुनाट शहरीं रोमन लोकांच्या वेळच्या बांधकामाचे नमुने सांपडतात. त्या-वेळच्या विटा आजही पूर्वीप्रमाणेंच मजबूत जशाच्या तशा आहेत. त्यांनीं दळणवळणाकरितां देशाच्या सर्व भागांत उत्तम रस्ते बांधले. दळणवळ-णाकरितां उत्तम मार्ग तयार झाल्यामुळें जरा कोठें ब्रि-...ंचें बंड झाल्याचा सुगावा लागतांच भराभर ...

अंगीं उतरतात याबद्दल निश्चयात्मक ... पोंचत व बंड-सांगणें बरेंच कठीण आहे. पण अनेक ... असे नियम बसविण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनीं केला आहे. त्यांतील एक दोन नियम प्रयोगासुद्धां येथें देतों.

प्रथम परिस्थितींत बदल केल्यानें भिन्नजातीचे प्राणी कसे उत्पन्न होतात हें दाखविणारे प्रयोग सांगतों. सुरवं-टापासून चित्रविचित्र रंगाचीं फुलपांखरें निर्माण होतात हें सर्वांना माहीतच आहे. तेव्हां कांहीं सुरवंटांना कांहीं दिवस विशेष उबेंत ठेवलें असतां काय होतें हें पाह-ण्याकरितां स्टँडफस व फिशर यांनीं अनेक प्रयोग केले. त्यावरून असें ठरलें कीं विशेष प्रकारच्या उबेंत ठेव-लेल्या सुरवंटांपासून आईबापापेक्षां अगदीं भिन्न रंगाचीं फुलपांखरें उत्पन्न होतात. या नवीन फुलपांखरांचीं अंडीं विशेष उबेंत न ठेवतां वाढूं दिलीं; तेव्हां त्यापासून जीं फुलपांखरें उत्पन्न झालीं तीं बहुतेक आजोबाच्या वळणाचीं झालीं ...

सुंदर भांडीं कशीं करावींत तेंही त्यांनीं शिकाविलें. रोमन लोक ब्रिटनमध्यें राज्य करीत होते तोंपर्यंत बाहेरच्या कोणत्याही शत्रूपासून ब्रिटन लोकांना काडीइतकाही त्रास झाला नाहीं. ज्याला हल्लीं स्कॉटलंड म्हणतात तो भाग मात्र रोमन लोकांनीं केव्हांही जिंकला नाहीं. त्या वेळीं तेथें पिक्ट नांवाचे क्रूर लोक राहत असत. हे लोक वारंवार ब्रिटन लोकांना लूटमार करून फार सतावून सोडीत. यांचा बंदोबस्त करण्याकरितां रोमन लोकांनीं दोन मोठ्या थोरल्या भिंती बांधल्या. या दोन भिंती मिळून इंग्लंड व स्कॉटलंड यांच्यामध्यें ... होता. या

हे प्रयोग कित्येक पिढ्यापर्यंत चालविले तरी त्यांच्या मिश्ररंगाची संतति म्हणजे कांहीं पांढरी व कांहीं काळी अशा जातीची किंवा भुरकट रंगाची छटा असलेली संतति मुळींच झाली नाहीं. यावरून दोन नियम बांधले ते असे: —

अगदीं भिन्न गुणाच्या आईबापापासून उत्पन्न होणारी प्रजा—त्या एकाच गुणाचा विचार केला असतां—निवळ आईच्या किंवा निवळ बापाच्या वळ-णावर जाते, मिश्रवर्णी होत नाहीं; व दुसऱ्या पिढींत निवळ आईचा वर्ण मुलांत दिसला तरी बापाचा वर्ण त्या पिढींत गुप्त असतो, यामुळें तिसऱ्या पिढींत कांहीं प्रजा आजाच्या व कांहीं आजीच्या वर्णाची निपजते ...

प्राण्याची यादी केली तरी ती बरीच मोठी होईल; मग ज्यांनीं अनेक प्रकारच्या प्राण्यांची माहिती मिळवि-ण्यांतच सारा जन्म घालविला त्या प्राणिशास्त्रवेत्त्यांना लक्षावधी प्राण्यांची माहिती असल्यास नवल कसलें? सध्यां या शास्त्रज्ञांना अदमासें पांच लाख जातींचे प्राणी माहीत आहेत; शिवाय त्यांत दरसाल नवीन माहि-तीची भर पडतच आहे.

यावर कित्येक लोक असा प्रश्न करतात कीं, " काय हो! एवढी ही उठाठेव शास्त्रज्ञ कशाकरतां करतात? हे ... जातींचे प्राणी आम्हांस उपयोगी पडतात

... नांव शास्त्र आणि हें ज्यांत साधन नसेल तो सर्व खटा-टोप म्हणजे व्यर्थ श्रम होय. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण आधीं सर्व सृष्टीची रचना मनुष्याच्या सुखासाठीं केली आहे हें म्हणणें पटण्याजोगें आहे. पाणिनीसारख्या वैयाकरणाचा संहार करणारा वाघ, परी-क्षिति व नलराजासारख्यांना दंश करणारा साप, हिंव-तापाचा प्रसार करणारे डांस अगर चोवीस तासांत मनु-ष्याचा बळी घेणारे प्लेगचे सूक्ष्म जंतू वगैरे प्राण्यांचा आयुष्यक्रम पाहिला असतां सृष्टीची रचना करतांना पर-

मेश्वरानें केवळ मनुष्यजातीच्या सोईकडेच लक्ष ठेविलें होतें असा कोणीही आग्रह धरणार नाहीं. शिवाय प्राचीन काळीं असें एक मोठें युग होऊन गेलें कीं, त्यावेळीं मनुष्यजातच या जगतीतलावर अस्तित्वांत नव्हती; आणि कदाचित् भविष्यकाळीं असेंही एक युग उत्क्रांत होईल कीं, त्यांत मनुष्यापेक्षां श्रेष्ठ असा दुसरा एखादा प्राणी अस्तित्वांत येईल व ही जात जगांतून नष्टप्राय किंवा नामशेष होईल. मागला इतिहास पाहिला असतां पूर्वीं पृथ्वीवर कित्येक जातींचे प्राणी विपुल असून आज त्यांचा मागमूसही लागत नाहीं! सांगण्याचा मुद्दा हा कीं, मनुष्य या प्राणिसृष्टीचें केंद्रस्थान नव्हे.

श्वरानें निर्माण केलें व त्यापासून सध्यांचा विस्तार झाला असें प्रतिपादन करणारा धार्मिक लोकांचा एक पक्ष होता. पण भूस्तरशास्त्राचें पद्धतशीर अध्ययन झाल्यामुळें प्राचीनकाळीं पृथ्वीवर कोणत्या जातीचे प्राणी रहात होते याचा अंदाज त्यांच्या हाडांच्या सांपळ्यावरून लोकांना करतां येऊं लागला; व त्यावरून प्राचीन काळापासून आतांपर्यंत एकाच जातीचे प्राणी पृथ्वीवर रहात आहेत हें म्हणणें हास्यास्पद वाटूं लागलें; पण ही जुनी उपपत्ति समाधानका[illegible]

[illegible] वरील प्रश्नाचें [illegible] आहेत. नुकत्याच [illegible] नाम्हा वाचून त्यांचें मनोरंजन होतें [illegible] त्यास वाचण्याची उत्तम गोडीही लागते.


# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १६४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें [illegible] मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ६६. ट. ह. ६६६.


[illegible] पुष्कळ शोधांचा आजपर्यंत झाला आहे.

प्राणिशास्त्राच्या उपयुक्ततेविषयींचा हा वाद सोडून त्यांतील एक–दोन सिद्धांताचें विवेचन करूं. या शास्त्रांतील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे प्राण्याच्या जातींसंबंधीचा. पांच लाख जातींचे प्राणी सध्या शास्त्रज्ञांना माहीत आहेत हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां पृथ्वीवर या जाती पहिल्यापासून नांदत आहेत किंवा प्रथम थोड्या जाती असून नंतर त्यांपासून इतर जातींची उत्पत्ति झाली ? हा प्रश्न सोडवावयाचा आहे. सृष्टीच्या प्रारंभीं प्रत्येक जातीचें एक एक जोडपें पृथ्वीवर परमे-

राळ्या जातींत करावी लागते. हाच न्याय प्राण्यांस लागू आहे असें उत्क्रान्ति–तत्वाचें सांगणें आहे.

प्राणिशास्त्रांतील हें सामान्य तत्व आपण स्वतःसच लावून पाहिलें असतां उत्क्रान्ति–तत्वाचा सहज उलगडा होण्याजोगा आहे. आम्ही हिंदु आर्यलोकांचे वंशज आहों असा नेहमीं अभिमान बाळगतों; व आमच्या अंगांत त्यांचें रक्त खेळत आहे याबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. पण त्यांचे आम्ही वंशज असलों तरी त्यांचे कितीसे गुण आमच्या अंगीं आहेत ? त्यांचें दीर्घायुष्य, अगाध ज्ञान, सहिष्णुता, शौर्य, [illegible]

निष्ठा वगैरे सद्गुण आज आमच्यांत कितपत वसत आहेत ? तेव्हां कालांतरानें आर्यवंशाच्या लोकांत फरक पडला व आम्ही निरनिराळ्या जातींचीं माणसें बनलों. व हा सृष्टीचा नेहमींचा क्रम आहे हें कबूल करणें भाग आहे.

दीर्घकालाच्या दृष्टीनें पूर्वजांपेक्षां वंशज भिन्न गुणी निपजत असला तरी आईबापांचे व आजोबाचे गुण मुलाच्या नातवाच्या अंगीं बऱ्याच अंशीं दिसतात याबद्दल वाद नाहीं. मात्र आईबापांचे कोणते गुण मुलांच्या अंगीं उतरतात याबद्दल निश्चयात्मक सिद्धांत अगर नियम सांगणें बरेंच कठीण आहे. पण अनेक प्रयोग करून असे नियम बसविण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनीं केला आहे. त्यांतील एक दोन नियम प्रयोगासुद्धां येथें देतों.

प्रथम परिस्थितींत बदल केल्यानें भिन्नजातीचे प्राणी कसे उत्पन्न होतात हें दाखविणारे प्रयोग सांगतों. सुरवंटापासून चित्रविचित्र रंगाचीं फुलपांखरें निर्माण होतात हें सर्वांना माहीतच आहे. तेव्हां कांहीं सुरवंटांना कांहीं दिवस विशेष उबेंत ठेवलें असतां काय होतें हें पाहण्याकरतां स्टँडफस व फिशर यांनीं अनेक प्रयोग केले. त्यावरून असें ठरलें कीं विशेष प्रकारच्या उबेंत ठेवलेल्या सुरवंटांपासून आईबापापेक्षां अगदीं भिन्न रंगाचीं फुलपांखरें उत्पन्न होतात. या नवीन फुलपांखरांचीं अंडीं विशेष उबेंत न ठेवतां वाढूं दिलीं; तेव्हां त्यापासून जीं फुलपांखरें उत्पन्न झालीं तीं बहुतेक आजोबाच्या वळणाचीं झालीं. दोन तीनच बापाच्या वळणावर गेलीं. यानंतर उष्णतेचें व थंडीचें प्रमाण कमीजास्त करून शेंकडो अंड्यांवर प्रयोग करण्यांत आले; त्यावरून केवळ उष्णतेच्या फरकानेंच शेंकडो प्रकारचे चित्रविचित्र ठिपके असलेलीं फुलपांखरें उत्पन्न करतां येतात असें ठरलें. साराश, परिस्थिति बदलली असतां जी प्रजा उत्पन्न होते ती तीन प्रकारची असते; कांहीं बापाच्या वळणावर, कांहीं आजाच्या वळणावर आणि कांहीं अगदीं नवीन वळणावर. बदललेली परिस्थिति कित्येक पिढ्या कायम राहिल्यास नवीन वळण कायम होतें असाही पुष्कळ प्रयोगांत अनुभव आला.

याहीपेक्षां मनोरंजक असे प्रयोग **मेंडेल** नांवाच्या शास्त्रज्ञानें केले. त्याचा हेतु संततींत आईचे गुण कितपत उतरतात व बापाचे कितपत उतरतात याचें प्रमाण ठरवावें असा होता. त्यानें एक सशाचें जोडपें आणलें. त्यांतील नर पांढरासफेत होता व मादी काळीकुळकुळीत होती. या जोडप्यास जीं पिलें झालीं तीं सर्व काळीं-कुळकुळीत होतीं. नंतर या काळ्या पिलांपासून जी संतति उत्पन्न झाली त्यांत कांहीं पिलें पांढरींसफेत व कांहीं काळीकुळकुळीत झालीं ! यावरून दुसऱ्या पिढीचे सारे ससे जरी काळेभोर होते तरी त्यांच्या ठिकाणीं पांढरा रंग गुप्तरूपानें वसत होता असें म्हणावें लागतें. हे प्रयोग कित्येक पिढ्यापर्यंत चालविले तरी त्यापासून मिश्ररंगाची संतति म्हणजे कांहीं पांढरी व कांहीं काळी अशा जातीची किंवा भुरकट रंगाची छटा असलेली संतति मुळींच झाली नाहीं. यावरून दोन नियम बांधले ते असे: —

अगदीं भिन्न गुणाच्या आईबापापासून उत्पन्न होणारी प्रजा—त्या एकाच गुणाचा विचार केला असतां—निवळ आईच्या किंवा निवळ बापाच्या वळणावर जाते, मिश्रवर्णी होत नाहीं; व दुसऱ्या पिढींत निवळ आईचा वर्ण मुलांत दिसला तरी बापाचा वर्ण त्या पिढींत गुप्त असतो, यामुळें तिसऱ्या पिढींत कांहीं प्रजा आजाच्या व कांहीं आजीच्या वर्णाची निपजते.

रंगाऐवजी गुळगुळीत कातडीचा नर व खरखरीत कातडीची मादी असें सशाचें जोडपें घेतलें तरी हाच अनुभव आला. म्हणजे दुसरी पिढी एकसारखी व तिसऱ्या पिढींत कांहीं प्रजा आजाच्या व आजीच्या गुणाची निघाली, मिश्रगुणाची मुळींच निघाली नाहीं.

नंतर रंग व कातडीचा गुळगुळीतपणा या दोन बाबींकडे लक्ष ठेवून प्रयोग केले, ते असे. पांढरा गुळगुळीत कातडीचा नर व काळी खरखरीत कातडीची मादी यांपासून झालेली संतति पाहिली तर तिसऱ्या

पिढींत चार जातींचीं पिलें निपजलीं; ह्मणजे ( १ ) कांहीं नातू रंगाच्या व कातडीच्या दृष्टीनें थेट आजोबासारखे, ( २ ) कांहीं आजीसारखे, ( ३ ) कांहीं रंगानें आजोबाच्या वळणावर आणि कातडीनें आजीच्या वळणावर, आणि ( ४ ) कांहीं याच्या उलट.

हे नियम आई व बाप अगदीं भिन्नगुणी असतील तेव्हांच लागू पडतात. जर आईबापांच्या गुणांत फार थोडा फरक असेल तर संतति कोणाच्या वळणावर जाईल याचा निर्णय वरील नियमांत केलेला नाहीं. असो; प्राणिशास्त्राचे सर्व नियम येथें देण्याचा आमचा हेतु नाहीं. फक्त या शास्त्राचें सामान्य स्वरूप काय आहे तें दाखवून देऊन ज्या बाबतींत कांहींच नियम नसतील असें प्रथम वाटतें, त्या बाबतींत देखील सृष्टीची रचना नियमबद्ध आहे हें शास्त्रज्ञ पटवून देतात हें आमच्या बालवाचकांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें, हें सांगण्याकरितां वरील माहिती दिली आहे. ती वाचून हे नियम शोधण्यासाठीं कांहीं वाचक लक्षपूर्वक अवलोकन करतील तर मेंडेलप्रमाणें ते जगाच्या ज्ञानांत भर पाडतील.

---

# गोकाकचा धबधबा.

( लेखक—मगदूम समडोळीकर वि० दुधगांव. )

या आपल्या सृष्टीमध्यें अशा कांहीं अद्‌भुत व सृष्ट वस्तु आहेत कीं, त्यांच्या साक्षात् अवलोकनानें किंवा चिंतनानें सृष्टिकर्त्या दयाळु परमेश्वराची कृति अगाध व अतर्क्य आहे, याची कल्पना झाल्यावांचून रहात नाहीं. अशी कल्पना होण्यास बुधशुक्रादि ग्रह ज्यांत आहेत अशा खगोलाचाच आश्रय केला पाहिजे असें नाहीं. भूपृष्ठावरही अशा असंख्य सृष्ट कृति आहेत, त्यांपैकींच प्रस्तुत विषयाचें साहचर्य होणारें स्थळ होय. हें स्थळ म्हणजे गोकाकचा धबधबा होय. मुंबई इलाख्याच्या महाराष्ट्र नांवाखालीं मोडणाऱ्या प्रदेशाचा दुभंग करणारा, त्या दुभागापैकीं देश या भागाच्या पश्चिमभागीं असणारा, हिंदुस्थानच्या पश्चिम भागच्या प्रदेशांत क्षीरपान घडवून त्यास सुशोभित आणि धान्यसंपन्न करणारा असा सह्य या नांवानें जो पर्वत आहे त्यांत बऱ्याच नद्यांचे उगम असून घटप्रभा नदीचेंही जनकत्व त्याच्याकडेच आलें आहे.

घटप्रभा नदी सह्याद्रींत उगम पावून पुढें चालत कांहीं मैल भूमि आक्रमण केल्यानंतर तिला एका मोठ्या ५७६ फूट उंच कड्यावरून उडी घेण्याची पाळी येते. हें ठिकाण म्हणजे बेळगांव जिल्ह्याचें अजमासें मध्य-स्थान होय. या ठिकाणीं गोकाक म्हणून एक तालुक्याचा गांव आहे. त्याच्या पश्चिम बाजूला साडेतीन मैलांवर घटप्रभा नदी असून खडथडित भूप्रदेशांतून ती वेगानें एकदम खालीं उडी घेते. त्याच्या वरच्या भागीं प्रवाह फुटून त्याचे ओघ खडकाच्या निरनिराळ्या घळींतून वाहात येऊन कड्याजवळ एकत्र होतात. घळींतून प्रवाह वाहात असल्यामुळें कांहीं खडकांचे भाग वर दिसतात. त्यामुळें जगूं काय, खडबडीत प्रदेशांतील ते वर आलेले खडकांचे भाग घटप्रभेची स्थिति वर डोकावून पहात आहेत, असा भास होतो. पाणी कोसळणारा कडा साधारण गोमुखाप्रमाणें आहे, त्यावरून धबधब्यानें गोकाक हें नांव धारण केलें आहे. पावसाळ्यांत पाणी गढूळ असल्यामुळें त्यावेळची शोभा कमीच दृष्टीस पडते. मात्र त्यावेळीं घटप्रभा वर्षाऋतूंतील मेघ-पंक्तीवर रागावून क्रोधानें लाल होऊन अंग तप्त करून व आपली गती शीघ्र करून धावूं लागते. परंतु हेमंतऋतु तिचें सांत्वन करण्याकरितां सत्वर धावत येऊन मेघ-पंक्तींना घालवून घटप्रभेला

लडीवाळपणानें आंजारून गोंजारून तिचा राग शांत करितो. मेघपंक्ती नंतर पुन्हां आपलें मूळचें रूप धारण करून मंदगतीनें पुढें चालते. पाणी स्वच्छ असतें तेव्हां उडी घेणारे प्रवाह व तुषारांचे धोत बर्फाप्रमाणें चमकतात. त्यायोगें ही शुभ्र पांढरें वस्त्रच नेसून चालली आहे असा भास होतो व पाहणाराचे डोळे दिपून जातात. अशा स्थळाची शोभा पाहण्याकरितां नाना वर्णांचे, नाना धर्मांचे, नाना आचाराचे आणि नाना विचाराचे लोक नित्यशः येत असतात. नजीकच गोकाक धबधब्याच्या दक्षिण तीरीं श्रीमहालिंगेश्वराचें मोठें देऊळ जणूं काय धबधब्याची शोभा पाहात आहे. घटप्रभा नदी आपली बहीण जी कृष्णानदी ती माहेरीहून सासरीं जात आहे असें जाणून प्रेमानें आपल्या भगिनीस भेट देण्याकरितां जाते.

जाते वेळीं तिला इतका हर्ष झाला कीं, तिला पुढील मार्गसुद्धां दिसेनासा झाला. चालते वेळीं बऱ्याच ठिकाणीं जरी ठेंचा लागतात तरी प्रेम त्याला जुमानीत नाहीं; परंतु जणूं काय सृष्टिकर्त्या परमेश्वराला, हिला गर्वच झाला आहे, पुढें पहात सुद्धां नाहीं असें भासून तिचा गर्व हरण करण्याकरितांच पुढें मोठा खंदक खणून ठेविला आहे. तिला प्रेमानंदापुढें खंदकांत पडण्याची पाळी आली असावी. हा खंदक कोठें आहे हें प्रस्तुत लेखावरून समजेलच. खंदकांत घसरत असतां अंगाचें सालडें निघून आणि खालीं पडल्यानंतर अंग ठेंचून घटप्रभेला जें दुःख होत असेल, त्याची कल्पना वाचकांस होण्यासारखी आहे.

खालीं पडल्यानंतर तिला झालेलें दुःख सहन न होऊन ती मोठ्यानें जणूं काय रडूं लागते. तिचा आक्रोश इतका भयंकर आहे कीं, आसपास राहणाऱ्या पक्षांचा किलकिलाट व मनुष्यप्राण्यांचा शब्दनाद त्यांत मिळून जातो; इतकेंच नाहीं तर तो आक्रोश सुमारें पांच मैलपर्यंत ऐकूं जातो. हा तिचा भयंकर आक्रोश आणि सृष्टिसौंदर्याचें भव्य आणि मनोरम चित्र डोळ्यापुढें उभें राहून पाहणारास सृष्टिकर्त्या परमेश्वराची कृति अतर्क्य व अवर्णनीय आहे असें वाटून



गोकाक येथील धबधबा.

त्याजविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहात नाहीं. श्रीमहालिंगेश्वराच्या देवळानजीकच एक मोठी सूत काढण्याची गिरणी चालू केली आहे, तिला घटप्रभेची प्रचंड शक्तीच कारणीभूत झाली आहे. तेथेंच एक मोठा लांबता पूल बांधिला आहे, तो सुद्धां पाहण्यासारखा आहे. पुढें घटप्रभा आपली बहीण जी कृष्णा तिला भेटून अगदीं तन्मय होऊन जाते.

# जपानी व्यायामपद्धति.

जपानी लोकांची जिउजित्सु नांवाची व्यायाम-पद्धति पुष्कळ लोकांना माहीत असेलच. त्याशिवाय अनेक जपानी लोकांनीं पुष्कळ विचार करून शारीरिक शिक्षणांत कोणत्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे याबद्दल अनेक नियम बसविले आहेत. त्यांपैकीं **टाकिझावा** नांवाच्या अनुभविक शिक्षकानें गेलीं छत्तीस वर्षे अशा प्रकारच्या प्रयत्नांत घालवून पुढें दिलेली पद्धति बसविली आहे.

याच्या मतें शरीर सुदृढ बनण्यास उन्ह, वारा, पाणी आणि जमीन या चार गोष्टींची आवश्यकता आहे. टाकिझावाच्या पद्धतीप्रमाणें व्यायाम घेऊं इच्छिणारानें शरीरास या चार तत्वांचा सहवास होऊं देण्याकरितां वस्त्ररहित होऊन व्यायामास सुरुवात केली पाहिजे. उन्हाळा असो किंवा हिवाळा असो; उन्ह, मोकळी हवा व भूमाता यांचा स्पर्श शरीरास शक्य तितका करून दिला पाहिजे. उन्हांत व वाऱ्यांत पोरांना उघडें ठेवणें सकृद्दर्शनीं घातुक वाटतें, पण हा समज चुकीचा आहे. टाकिझावाच्या शाळेंतील विद्यार्थ्यांना हळूहळू ऊन्ह व वारा सोसण्याची संवय होते व कांहीं महिन्यांनीं त्यांना कपडे घालण्यापेक्षां उघडें शरीर ठेवणें अधिक सुखावह वाटूं लागतें. हिवाळ्यांत थंडगार वारा सुटला असतांना पहाटेच्या वेळीं देखील हीं मुलें कपडे घालीत नाहींत. कारण व्यायामानें त्यांच्या अंगांत इतकी उष्णता उत्पन्न होते कीं त्यांच्या अंगांतून घामाच्या धारा चाललेल्या असतात. याचा परिणाम असा होतो कीं तेथील मुलांना ऊन्ह व थंडी यांची बाधा होऊं शकत नाहीं व तीं काटक बनतात. अंगाचा घाम व पाय धुऊन शरीर स्वच्छ करण्याकरितां तेथील शाळांतून एक पाण्याचें टाकें असतें.

या पद्धतीप्रमाणें व्यायाम करावयाचा असेल त्यानें पहाटे उठून मोकळ्या हवेंत उभे राहून कांहीं मिनिटेंपर्यंत दीर्घश्वास घेण्याची संवय केली पाहिजे. त्यायोगानें भूक चांगली लागते व फुफ्फुसें सदृढ व निरोगी बनतात. महिन्यांतून एक वेळ पांच सहा मैलांची शर्यत करावी. धावणें झेपत नसल्यास चालावें. ठरलेलें ठिकाण गाठण्यास किती वेळ लागला हें टिपून ठेवावें. म्हणजे महिन्यांत प्रगति झाली किंवा नाहीं हें पुढल्या महिन्याच्या टिपणावरून समजेल. पांच सहा मैल धावण्याची संवय असेल तर प्रसंगोपात तो मनुष्य २५ मैलपर्यंत देखील पायीं मजल मारूं शकेल; व एकंदरींत त्याची शरीरप्रकृति निकोप राहील.

या पद्धतींत थंड पाण्याचें स्नान करणें फार हितावह समजलें जातें. स्वतः टाकिझावानें गेल्या तीस वर्षांत एकही दिवस न चुकतां हें व्रत चालविलें आहे. तो अंगावर कित्येक बादल्या थंड पाणी ओतून घेऊन कोरड्या टावेलानें अंग इतकें घासतो कीं तें ऊन व तांबडें होतें. यानंतर देखील कांहीं वेळपर्यंत तो वस्त्ररहित राहून आपल्या बागेंत झाडलोट करतो. " मला थंडी अशी कधींच वाजत नाहीं " असें तो म्हणतो. असें होण्याचें कारण काय म्हणून कोणीं प्रश्न विचारला तर " हिवाळ्यांत देखील तुमचा चेहरा उघडा असला तरी त्यास थंडी वाजत नाहीं; कारण चेहरा नेहमीं उघडा असल्यामुळें त्यास थंडी सोसण्याची संवय झालेली असते. सर्व शरीररास अशीच

संवय लावतां येते. " टाकीझावाचें हें व्रत त्याच्या बहुतेक विद्यार्थ्यांनीं स्वीकारलें आहे.

या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं नेहमीं ताठ बसलें पाहिजे असा कडक नियम आहे.

उन्हाळ्यांत या शाळेस सुटी नसते. त्यावेळीं एक तास व्याख्यान ऐकणें, एक तास चिंतन आणि तीन तास खेळणें अशी साधारणपणें दिनचर्या ठरलेली असते. खेळतांना अंगरखा, टोपी किंवा जोडे घालावयाचे नाहींत असा नियम आहे. उन्हांत खेळावयाचें असल्यामुळें मुलांचें शरीर काळें होतें. ज्या मुलास उन्हाचा ताप असह्य वाटेल त्याला झाडाखालीं सावलींत बसण्याची परवानगी देतात. पण बहुतेक मुलांना ऊन्ह सोसतें असा अनुभव आहे. दोन तीन महिने या पद्धतीनें वाढलेलीं मुलें शरीरानें व मनानें सदृढ व आनंदी बनतात. त्यांचा आळस, भीति, रोग, भिडस्तपणा नाहींसा होऊन ते उद्योगी, धीट, निरोगी व धाडशी होतात. उन्हाळ्याच्या सुटींत घरीं जाण्याऐवजीं या शाळेंत राहणेंच बरें वाटतें असें तेथील विद्यार्थी म्हणतात. यावरून ही पद्धति विद्यार्थ्यांना आवडते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# जगांतील सात आश्चर्यें.

( एका विद्वान मित्राकडून. )

आग्र्याचा ताजमहाल, वेरूळचीं कोरीव लेणीं किंवा विजापूरचा बोलघुमट वगैरे पाहिलीं अथवा सुएझ व पनामा येथील कालवे, फ्रान्समधील इफेल टॉवर, चीनदेशांतील १०० मैल लांबीची भिंत इत्यादिकांचीं वर्णनें ऐकिलीं किंवा वाचलीं म्हणजे साधारण माणसाच्या तोंडून सहज ' अबब ! काय तरी आश्चर्य हें ' असे उद्गार निघतात. इंग्रजी शिकलेलीं माणसें यावेळीं One of the seven wonders of the world ' ( जगांतील सात आश्चर्यांपैकीं एक ) असें म्हणतात. पण " हीं सात आश्चर्यें कोणतीं ? " या प्रश्नाचें उत्तर फारच थोड्यांस देतां येईल. मात्र कित्येकांचीं अशी ठाम समजूत आहे कीं आपला आग्र्याचा ताजमहाल हा या सातांपैकीं एक असलाच पाहिजे. चीनमधील एवढ्या थोरल्या प्रचंड भिंतीस या सातांत अग्रस्थानच पाहिजे. सुएझचा कालवा अनेक दृष्टींनें फारच आश्चर्यजनक तेव्हां तो यांपैकींच एक वगैरे; परंतु या सर्व समजुती भ्रामक आहेत.

आतां वरील गोष्टी ( ताज, लेणीं, चीनमधील भिंत वगैरे ) आश्चर्यें नव्हत असें नाहीं. परंतु एके काळीं ज्या गोष्टी जगांतील सात आश्चर्यें म्हणून मानल्या गेल्या त्यांत मात्र वरील गोष्टींचा समावेश होत नाहीं. आजच्या जगांत सातांच्या ऐवजीं सातशें किंबहुना सातहजार सुद्धां आश्चर्यें निघूं शकतील. आज आपणांस त्यांचा विचार कर्तव्य नाहीं. सात आश्चर्यांचें वर्णन देण्यापूर्वीं थोडी सामान्य माहिती प्रस्तावनेदाखल दिल्यास अस्थानीं होणार नाहीं. कोलंबसाला पंधराव्या शतकाच्या अखेर अखेर अमेरिकेचा—नवीन जगाचा—( New world ) शोध लागला.तत्पूर्वीं यूरोप, आशिया व आफ्रिका हींच कायती पृथ्वी अशी सर्वांची समजूत होती. या तिहींच्यामध्यें असणारा जो समुद्र त्याला साहजीकच भूमध्य समुद्र अशी संज्ञा प्राप्त झाली; व दळणवळण आणि व्यापार या दृष्टीनें त्याला फारच महत्त्व प्राप्त झालें. आज नवीन जगाचा शोध लागल्यामुळें खऱ्या भूमध्य समुद्राचें स्वरूप अटलांटिक

महासागरास प्राप्त झालें आहे; व त्यानें पूर्वीच्या भूमध्य समुद्रास मागें टाकलें आहे यांत संशय नाहीं. तरी पण अजूनही भूमध्य समुद्राचें महत्त्व बरेंच आहे व सुएझच्या कालव्यामुळें तर तें पूर्वीपेक्षां जास्तच वाढलें आहे. खुष्कीच्या मार्गापेक्षां जलमार्ग दळणवळणास व व्यापारास फारच सोईचा. कारण एक तर तो सलग असतो; डोंगर, पर्वत, नद्या, दऱ्या, खोरी यांचा मुळींच अडथळा नाहीं. शिवाय समुद्रयानांस सृष्टिनिर्मित शक्तीचा—वाऱ्याचा—उपयोग करून घेतां येतो. आजच्या सुधारलेल्या जगांत या शक्तीवर कोणी अवलंबून रहात नाहीं हें खरें. परंतु पूर्वी हीच मुख्य शक्ति होती व शिवाय ती बिनखर्चाची होती. आज जरी आगगाड्यांचा अत्यंत फैलाव झाला आहे तरी जलमार्गाचें महत्त्व मुळींच कमी झालें नाहीं. उद्यां विमानांचा आगगाड्यांप्रमाणेंच फैलाव झाल्यास मात्र बरेंच स्थित्यन्तर होण्याचा संभव आहे; व मग मात्र जलमार्गाचें महत्त्व कमी होईल, पण आपण ज्या काळाविषयीं विचार करणार आहों त्या वेळीं विमानेंही नव्हतीं व आगगाड्याही नव्हत्या; तेव्हां जलमार्गाचें किती महत्त्व असेल याची सहज कल्पना होईल. जलाशयाच्या भोंवतीं असलेल्या देशांत साहजीकच व्यापाराची घडामोड जास्त व व्यापाराबरोबर विचार व कल्पना यांचाही विनिमय होणें अगदीं स्वाभाविक आहे. जेथें जेथें असें दळणवळण, व्यापार व विचार-विनिमय जास्त त्याच देशांत सुधारणेचा फैलाव होण्याचा संभव जास्त. अशा तऱ्हेनें विचार केल्यास भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील देशांत सुधारणेची प्रगती झाली असली पाहिजे, असा कोणीं तर्क केल्यास त्यांत कांहीं चूक नाहीं. पूर्वीचा इतिहास पाहिल्यास तोही याच मतास दुजोरा देईल. भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील भागास लीव्हांट ( Levant ) सूर्योदयाची दिशा--अशी संज्ञा आहे. आणि याच्याच भोंवतीं एके काळीं सुधारणेचा अगदीं कळस झालेला होता असें इतिहास आपणांस सांगतो. अशाच ठिकाणीं आश्चर्यांचा संभव जास्त; आणि आपलीं सात आश्चर्यें जुन्या सुधारणेपैकीं होत, तेव्हां त्यांपैकीं बरींच येथें असलीं पाहिजेत. हीं सर्वच लीव्हांटच्या आसपास आपणांस सांपडतील. कारण जुन्या भूमध्यसमुद्रीय सुधारणेचीं हीं स्मारकेंच होत. यांच्यासंबंधीं दुसरी गोष्ट म्हणजे एकाखेरीज बाकीचीं सर्व आज केवळ नामशेषच आहेत. कांहीं थोड्या ठिकाणीं कांहीं अवशेष सांपडतात पण त्यांवरून नक्की अशी माहिती मुळींच मिळत नाहीं. ताज किंवा लेणीं आज पाहूं म्हटल्यास एखाद्यास आपली जिज्ञासा तृप्त करून घेतां येणें शक्य आहे; पण येथें मात्र तसा प्रकार नाहीं. कारण पुष्कळ ठिकाणीं यांचीं वर्णनें अपुरीं आहेत. हिरोडोटस म्हणून एक जुना इतिहासकार होऊन गेला. त्यानें स्वत. पाहून कित्येकांचीं वर्णनें दिलीं आहेत, व त्यांचे अवशेष पाहून विद्वान लोकांनीं काढलेलीं अनुमानें, यावरून जी काय माहिती मिळते तेवढ्यावरच आपणाला आपली तहान भागविणें प्राप्त आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, या सातांपैकीं सहा तर केवळ नामशेषच आहेत; तेव्हां जें अद्याप शिल्लक आहे त्याचाच अगोदर विचार करणें बरें. हें **पहिलें आश्चर्य**—आज ज्याला युरोपियन Darkest अंधकारमय व अत्यंत रानटी खंड म्हणतात, त्या आफ्रिका खंडांतल्या—मिसर देशांत आहे. हा देश आफ्रिकेच्या ईशान्येस आहे, व बहुतेक सर्व वालुकामय आहे. केवळ नाईल नदीमुळेंच याला नंदनवनाची शोभा आली आहे; आणि ती फक्त नाईल नदीच्या खोऱ्यांतच! आसपास सर्व रुक्ष, ओसाड व वालुकामय प्रदेश आहे. याच नदीच्या काठीं मुखापासून १०० मैलांवर दक्षिणेस केरो शहर आहे. या शहरापासून नैऋत्येस तीन मैलांवर सुमारें १२००० वस्तीचें गिझे किंवा घिझे नांवाचें गांव आहे; त्या गांवाजवळ एक भव्य आश्चर्यकारक मनोरा आहे, हा मनोरा एकच नाहीं अनेक आहेत. पण त्या सर्वांत जो मोठा त्याचें वर्णन येथें देतों.

पहिल्या प्रथम मनोऱ्यांचा आकार बरोबर लक्षांत

येण्यास एक पुठ्ठा घेऊन ज्याची प्रत्येक बाजू पांच इंच आहे असा एक काटकोन चौकोन कापावा. नंतर तसल्याच पुठ्ठ्याचे चार समद्विभुज त्रिकोण--ज्यांची असमान बाजू पांच इंच व समान बाजवा सहा-सहा इंच आहेत--कापावे. मग चौकोन जमीनीवर ठेवून त्याच्या चारी बाजूंवर त्रिकोणांच्या असमान बाजू ठेवाव्या व त्रिकोणांचे राहिलेले कोन एके ठिकाणीं आणून मिळविल्यावर जी आकृती तयार होईल त्यासच मनोरा म्हणतात. या मनोऱ्यासंबंधीं एक दैंथकथा आहे. इजिप्तचा राजा शिआप्स यानें एक ( सर्वांत मोठा ) मनोरा ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ९०० च्या सुमारास बांधला. तो बांधण्यास १ लाख मनुष्यें वीस वर्षे खपत होतीं. या मनोऱ्याच्या तळाशीं राजा शिआप्सचें प्रेत एका खोलींत ठेविलें आहे. व खोलीभोंवतीं नाईल नदीचें पाणी पाटानें आणून खेळविलें आहे. दुसरा मनोरा शिआप्सच्या भावानें, आणि तिसरा त्याच्या मुलानें बांधला. त्याची प्रत्येक बाजू ८०० फूट असून उंची तितकीच आहे व प्रत्येक दगड लांबीला ३० फुटांपेक्षां कमी नाहीं.

असो; सर्वांत मोठ्या मनोऱ्याचा खालचा भाग ५५०००० चौरस फूट आहे, म्हणजे प्रत्येक बाजू सरासरीनें ७४१ फूट झाली; आज त्याची उंची ४७४ फूट आहे, परंतु त्याचें शिखर पडलें आहे. आणि पूर्णावस्थेंत त्याची उंची ५०२ फूट असावी असा अंदाज आहे. हे मनोरे दगडाचे बांधलेले आहेत व हे दगड सरासरी ६०० मैलांवरून आणले आहेत असें म्हणतात. कारण जवळपास सर्व वालुकामय प्रदेश आहे. दिल्ली दरबारच्या चित्रांत जुम्मामशिदीच्या पायऱ्या कित्येक वाचकांनीं पाहिल्या असतील तशाच पायऱ्या चारी बाजूंला आहेत अशी कल्पना करावी. फरक एवढाच कीं वरच्या वरच्या पायऱ्यांची उंची कमी कमी होत गेली आहे. पायरीची जास्तींत जास्त उंची ४ फूट ८ इंच व कमींत कमी १ फूट ८ इंच आहे, व अशा पायऱ्या आज २०३ आहेत. पूर्वी त्या २०८ असाव्या असें एका ग्रंथकाराच्या लिहिण्यावरून कळतें. सध्या शिल्लक असलेल्या वरच्या पायरीची एक बाजू ३२ फूट ८ इंच आहे. पूर्वी २०८ पायऱ्या असतांना ती १६ फूट ८ इंच होती. ज्या चुन्यानें दगड एकमेकांस जोडले आहेत त्यांत वाळूचा अंश नाहींच म्हटलें तरी चालेल.

या मनोऱ्याच्या आंत जाण्याचा मार्ग पायापासून ४७ फुटांवर उत्तरेस आहे. आंत खोल्या आहेत. आणि त्यांतून राजांचीं प्रेतें ठेवलेलीं होतीं. या खोल्या किती आहेत याचा अद्याप नक्की पत्ता नाहीं; कारण वाळूनें सर्व मार्ग भरून गेल्यामुळें शोध करण्याचे कामीं फारच अडथळे आहेत. आजपर्यंत तीनच खोल्यांचा शोध लागलेला आहे. पैकीं एकीची लांबी ३५, रुंदी १७, उंची १९ फूट आहे. मनोऱ्याचें एकंदर घनफळ ८५०००००० फूट आहे. यापैकीं निम्में जरी खोल्यांच्या भिंतीकरतां वगैरे सोडलें, तरी वर सांगितलेल्या तऱ्हेच्या निदान तीन हजार सातशें खोल्या असल्या पाहिजेत, यावरून पिरॅमिडचा भव्यपणा लक्षांत येईल. इतकें जरी भव्य काम आहे तरी तें ओबडधोबड नाहीं, फारच सुबक आहे. कित्येक ठिकाणीं चुन्यावर दिलेला रंग अगदीं ताजा वाटतो. अजिंठ्याचीं लेणीं व तेथील चित्रांचें रंगीत काम ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना याची चांगलीच कल्पना येईल. दुसऱ्या पिरॅमिडची प्रत्येक बाजू ६८४ फूट व उंची ४५६ फूट आहे. तिसऱ्याची बाजू ३३० व उंची १७४ फूट आहे. जवळच एक चवथा आहे, तो फारच लहान आहे, त्याची बाजू १३० फूट आहे.

मनोरे इजिप्तमध्येंच आहेत असें नाहीं, तर जगाच्या बऱ्याच भागांत ते सांपडतात. म्हणजे एके काळीं अशा तऱ्हेची शिल्पपद्धति अस्तित्वांत होती असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. पण त्याची पूर्णावस्था मात्र इजिप्तमध्यें पहावयास सांपडते. अमेरिकेंतील मेक्सिको देशांत मनोरे आहेत; हिंदुस्थानांत विशेषत: मद्रास-

इलाख्यांत देवळांचीं शिखरें ( गोपुरें ) मनोऱ्याच्याच साधारण आकाराचीं आहेत. रोममधील सेंटपालचें मंदिर साधारण मनोऱ्याच्या आकाराचें आहे. फ्रान्स, इंग्लंडमध्येंही अशाच तऱ्हेचीं देवळें आहेत. मेक्सिको-मधील मनोऱ्याची बाजू आफ्रिकेंतील सर्वांत मोठ्याच्या बाजूच्या दुप्पट म्हणजे १४४० फूट आहे. पण उंची फारच कमी, म्हणजे अवघी १७७ फूट आहे.

जगांतील **दुसरें आश्चर्य** म्हणजे एक दीपगृह होय व हेंही पण इजिप्त देशांतच होतें. आज त्याचा माग-मूसही नाहीं. इजिप्त देशांत आलेक्झांड्रिया नांवाचें बंदर आहे. एके काळीं लंडनप्रमाणें व्यापाराच्या दृष्टीनें याला महत्त्व होतें. हें शहर इसवी सनापूर्वी ३३२ च्या सुमारास आलेक्झांड्रा यानें वसविलें. याच्या अगदीं नजीक फेरॉस नांवाचें एक लांबट बेट आहे; हें फारच उत्तम बंदर होतें. त्या वेळचा अतिशय मोठा जो शिल्पज्ञ डिनोक्रॅटस यानें अलेक्झांड्रिया व हें बेट यांचे मध्यें एक भली मोठी भिंत बांधून बंदराचे दोन भाग केले. एक पूर्वेकडील व दुसरा पश्चिमेकडील. अलेक्झां-डरच्या मृत्यूनंतर इजिप्तची व्यवस्था टॉलेमीसोटरकडे आली; आणि त्यानें हें बंदर जास्त सुरक्षित करण्याकरितां बंदराच्या पूर्व टोंकावर एक दीपगृह बांधावयाचें ठरविलें. हें दीपगृह इतकें प्रसिद्ध होतें कीं बाकीच्या दीपगृहांस यानंतर फेरॉस हीच संज्ञा प्राप्त झाली. फेरॉस म्हणजे दीपगृह असा सामान्य अर्थ झाला. याला टॉलेमीचा दिवा असेंही म्हणत असत. पहिल्या टॉलेमीच्या कारकीर्दींत याचें काम पूर्ण झालें नाहीं; तें त्याचा मुलगा दुसरा टॉलेमी यानें शेवटास नेलें.

याची उंची ४५० फूट असून सरासरी १०० मैलांवरून तें दिसत असे. पहिले तीन मजले षट्कोनी होते; चवथा मजला चौकोनी असून त्याच्या चारी बाजूंस मनोरे होते. पांचवा मजला वाटोळा असून पुढें टोंकांपर्यंत वाटोळेंच होतें. वर जाण्याकरितां वाटोळा जिना होता, अगदीं टोंकावर खलाशांच्या सोईकरितां नेहमींच दिवे जळत ठेवलेले असत. व वरच्या गॅल-रींत कांहीं आरसे अशा तऱ्हेनें ठेवलेले असत कीं कित्येक मैल समुद्रांतील जहाजें वगैरे चांगल्या तऱ्हेनें दिसावीं. तुफानापासून याचें रक्षण व्हावें म्हणून भोंवतीं बऱ्याच उंचीच्या व मजबूत भिंती बांधल्या होत्या. अशी एक गोष्ट सांगतात कीं टॉलेमीनें आपल्या नांवाचा लेख या दीपगृहावर खोदविला. परंतु ज्या शिल्पज्ञाच्या देख-रेखीखालीं सर्व काम झालें त्यालाही साहजीकच आपलें नांव अजरामर करण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली, व त्यानें एका दगडावर आपलें नांव खोदलें, व मग त्या-वर चुना वगैरे लावून त्या चुन्यावर टॉलेमीचें नांव खोदलें. अर्थात त्या वेळीं हें कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं. शिल्पज्ञाचाही तोच उद्देश होता. कालान्तरानें चुना पडून जाऊन टॉलेमीचें नांव गेलें व त्या ठिकाणीं दगडावर खोदलेलें शिल्पज्ञाचें नांव चमकूं लागलें. भूकं-पाच्या धक्क्यानें हें पडून गेलें, किंवा वीज पडून याचा नाश झाला, किंवा शत्रूंनीं तें जमीनदोस्त केलें, किंवा त्याचा हळू हळू स्वाभाविक नाश झाला, याबद्दल कोठेंच कोणीही इतिहासकार लिहीत नाहीं.

येथूनच जर आपण गलबतांत बसून वायव्येस सुमारें चारशें मैल गेलों तर लीव्हाँटमधील **ऱ्होड्स** नांवाचें एक बेट आपल्याला लागेल. हेंच आपल्या **तिसऱ्या आश्चर्याचें स्थान** होतें. अलेक्झांडरनें इतरां-प्रमाणेंच ऱ्होडियन लोकानांही जिंकून आपल्या ताब्यांत आणलें होतें व त्यांनींही त्याची सत्ता कबूल केली होती. पण त्याच्या मरणानंतर इजिप्त देश जसा टॉले-मीसोटरच्या ताब्यांत आला, त्याप्रमाणें ऱ्होडियन लोकांनींही अलेक्झांडरच्या वंशजांची सत्ता झुगारून ते स्वतंत्र बनले. तेव्हां इजिप्त आणि ऱ्होडस यांच्या-मधील व्यापार थांबवावा म्हणून एन्टिगोनस यानें आपला मुलगा डेमेट्रियस यास पाठविलें; परंतु टॉले-मीच्या साहाय्यानें डेमेट्रियस यास वेढा उठविण्यास ऱ्होडियन लोकांनीं भाग पाडिलें व ऱ्होडियन लोकांचें शौर्य पाहून डेमेट्रियस हा इतका खुष झाला कीं,

ऱ्होडियनांचा नाश करण्याकरितां जी सामग्री त्यानें जमविली होती ती ऱ्होडियन लोकांना त्यानें नजर केली. ती विकून त्याच्या पैशानें, लढाईत जय आल्याबद्दल अपोलो देवाचा एक मोठा थोरला पुतळा उभारण्याचा त्यांनीं निश्चय केला व हें काम शारीस आणि लाशीस यांच्याकडे सोंपविलें. या पुतळ्याचें काम बारा वर्षें चालू होतें. ही मूर्ती मिश्र धातूची असून तिची उंची १.२५ फूट होती. ती पोकळ असून आंतल्या बाजूनें वर जाण्यास वाटोळे जिने होते. त्याच्या टोकावरून सिरीया प्रांत व समुद्रांत पुष्कळ लांबवर गलबतें दिसत असत. तो पुतळा दोन्ही पाय फांकून उभा होता अशी कल्पना आहे. शहराला दोन बंदरें असून एकाचें प्रवेशद्वार ५० व दुसऱ्याचें २० फूट होतें. या दुसऱ्या ठिकाणीं पुतळा असावा अशी कल्पना जास्त संभवनीय दिसते. याच्या पायाखालून लहान सहान गलबतें सहज जाऊं शकत. हा पुतळा इसवी सनापूर्वीं ३०० च्या सुमारास स्थानापन्न झाला व ६० वर्षांनीं एका भूकंपाच्या धक्क्यानें तो समुद्रांत पडला. ऱ्होडियन लोकांनीं आसपासच्या लोकांच्या मदतीनें तो पुतळा काढून पुन्हा उभा करण्याची खटपट चालविली; परंतु डेल्फी येथें पुतळा पुन्हा उभा करण्यासंबंधी अनुकूल असा कौल मिळाला नाहीं.

यामुळें हा पुतळा इ. स. ६७२ पर्यंत म्हणजे सरासरी ९०० वर्षें समुद्रांतच पडून होता. इतक्या अवधींत बऱ्याच घडामोडी होऊन ऱ्होड्स बेट सॅरॅसिन लोकांच्या ताब्यांत गेलें होतें, आणि त्यांनीं हा पुतळा एका ज्यू व्यापाऱ्यास विकला. त्या व्यापाऱ्यानें पुतळ्याच्या धातूनें ९०० उंट लादून नेले. साधारणतः प्रत्येक उंटावर अर्धखंडी वजन याप्रमाणें अंदाज केल्यास एकंदर धातू ४५० खंडी होती असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

ऱ्होड्स बेट सोडून जर आपण आशिया मायनरच्या बुड्रुन बंदरीं येऊन दाखल झालों तर जवळच आपल्याला जगांतील **चवथ्या आश्चर्याची जागा** आढळेल. हें बंदर ऱ्होड्स बेटाच्या समोरच उत्तरेस आहे. याच ठिकाणास पूर्वीं हेलिकारनासस असें नांव होतें, व तेथें डोरियन लोकांचें राज्य होतें. केरिया प्रांताचें तें राजधानीचें ठिकाण होतें. इसवी सनापूर्वीं चवथ्या शतकांत मॅसोलस नांवाचा राजा राज्य करीत होता. या ठिकाणची स्वाभाविक रचना बंदराला व व्यापाराला सोईची पाहून यानें राजवाडा वगैरे बांधून तेंच मुख्य शहर केलें, व इतर बऱ्याच सुधारणा केल्या. त्याच्या राणीचें नांव आरटीमिसिया असून दोघांचें एकमेकांवर इतकें प्रेम होतें कीं असें प्रेम राजाराणींत क्वचितच सांपडेल.

इ. स. पूर्वीं ३५३ त राजा मॉसोलस मरण पावला. त्या लोकांत आपल्याप्रमाणेंच प्रेतें जाळण्याची चाल होती. चालीप्रमाणें राजाचें प्रेतही जाळलें. राणीनें प्रेमभरानें प्रेताची सर्व राख एके ठिकाणीं करून पाण्यांत कालवून पिऊन टाकली असें सांगतात आणि त्याच्या ( राजाच्या ) स्मरणार्थ सर्व जगांत अपूर्व असें थडगें बांधण्याचा तिनें निश्चय करून हें काम पिथिस आणि सॅटिरस यांजकडे सोंपविलें. राजाच्या मरणानंतर दोनच वर्षांनीं राणीनेंही देह ठेवला व काम पुरें झालेलें तिनें पाहिलें नाहीं व तिच्या मरणानंतर काम पुरें झालें कीं नाहीं अशीही शंका येणें साहजीकच आहे. परंतु त्या वेळच्या शिल्पज्ञांनीं केवळ आपल्या कलेचा गौरव व्हावा व आपलें नांव व्हावें म्हणूनच हें काम पुरें केलें. याच वेळीं राणीनें सर्व विद्वान लोक दरबारीं बोलावून मॅसोलसचें गुण वर्णनात्मक काव्य करणारास बक्षीस देणेंचें ठरविलें व हें बक्षीस प्रसिद्ध तत्ववेत्ता जो साक्रेतीस याच्या एका शिष्यानें पटकाविलें असें सांगतात. हें थडगें साधारण चौकोनीच होतें, त्याची एक बाजू ११३ फूट व दुसरी ९३ फूट होती. सभोंवार ६० फूट उंचीचे ३६ खांब असून यावरचा आकार साधारण पिरॅमिडसारखा होता.

एकंदर उंची १४० फूट होती. सर्व उत्तम संगम-

इलाख्यांत देवळांचीं शिखरें ( गोपुरें ) मनोऱ्याच्याच साधारण आकाराचीं आहेत. रोममधील सेंटपालचें मंदिर साधारण मनोऱ्याच्या आकाराचें आहे. फ्रान्स, इंग्लंडमध्येंही अशाच तऱ्हेचीं देवळें आहेत. मेक्सिको-मधील मनोऱ्याची बाजू आफ्रिकेंतील सर्वांत मोठ्याच्या बाजूच्या दुप्पट म्हणजे १४४० फूट आहे. पण उंची फारच कमी, म्हणजे अवघी १७७ फूट आहे.

जगांतील **दुसरें आश्चर्य** म्हणजे एक दीपगृह होय व हेंही पण इजिप्त देशांतच होतें. आज त्याचा माग-मूसही नाहीं. इजिप्त देशांत आलेक्झांड्रिया नांवाचें बंदर आहे. एके काळीं लंडनप्रमाणें व्यापाराच्या दृष्टीनें याला महत्त्व होतें. हें शहर इसवी सनापूर्वी ३३२ च्या सुमारास आलेक्झांडर यानें वसविलें. याच्या अगदीं नजीक फेरॉस नांवाचें एक लांबट बेट आहे; हें फारच उत्तम बंदर होतें. त्या वेळचा अतीशय मोठा जो शिल्पज्ञ डिनोक्रेटस यानें अलेक्झांड्रिया व हें बेट यांचे मध्यें एक भली मोठी भिंत बांधून बंदराचे दोन भाग केले. एक पूर्वेकडील व दुसरा पश्चिमेकडील. अलेक्झां-डरच्या मृत्यूनंतर इजिप्तची व्यवस्था टॉलेमीसोटरकडे आली; आणि त्यानें हें बंदर जास्त सुरक्षित करण्याकरितां बंदराच्या पूर्व टोंकावर एक दीपगृह बांधावयाचें ठरविलें. हें दीपगृह इतकें प्रसिद्ध होतें कीं बाकीच्या दीपगृहांस यानंतर फेरॉस हीच संज्ञा प्राप्त झाली. फेरॉस म्हणजे दीपगृह असा सामान्य अर्थ झाला. याला टॉलेमीचा दिवा असेंही म्हणत असत. पहिल्या टॉलेमीच्या कारकीर्दींत याचें काम पूर्ण झालें नाहीं; तें त्याचा मुलगा दुसरा टॉलेमी यानें शेवटास नेलें.

याची उंची ४५० फूट असून सरासरी १०० मैलांवरून तें दिसत असे. पहिले तीन मजले षट्कोनी होते; चवथा मजला चौकोनी असून त्याच्या चारी बाजूंस मनोरे होते. पांचवा मजला वाटोळा असून पुढें टोंकापर्यंत वाटोळेंच होतें. वर जाण्याकरितां वाटोळा जिना होता, अगदीं टोंकावर खलाशांच्या सोईकरितां नेहमींच दिवे जळत ठेवलेले असत. व वरच्या गॅल-रींत कांहीं आरसे अशा तऱ्हेनें ठेवलेले असत कीं कित्येक मैल समुद्रांतील जहाजें वगैरे चांगल्या तऱ्हेनें दिसावीं. तुफानापासून याचें रक्षण व्हावें म्हणून भोंवतीं बऱ्याच उंचीच्या व मजबूत भिंती बांधल्या होत्या. अशी एक गोष्ट सांगतात कीं टॉलेमीनें आपल्या नांवाचा लेख या दीपगृहावर खोदविला. परंतु ज्या शिल्पज्ञाच्या देख-रेखीखालीं सर्व काम झालें त्यालाही साहजीकच आपलें नांव अजरामर करण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली, व त्यानें एका दगडावर आपलें नांव खोदलें, व मग त्या-वर चुना वगैरे लावून त्या चुन्यावर टॉलेमीचें नांव खोदलें. अर्थात त्या वेळीं हें कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं. शिल्पज्ञाचाही तोच उद्देश होता. कालान्तरानें चुना पडून जाऊन टॉलेमीचें नांव गेलें व त्या ठिकाणीं दगडावर खोदलेलें शिल्पज्ञाचें नांव चमकूं लागलें. भूकं-पाच्या धक्क्यानें हें पडून गेलें, किंवा वीज पडून याचा नाश झाला, किंवा शत्रूंनीं तें जमीनदोस्त केलें, किंवा त्याचा हळू हळू स्वाभाविक नाश झाला, याबद्दल कोठेंच कोणीही इतिहासकार लिहीत नाहीं.

येथूनच जर आपण गलबतांत बसून वायव्येस सुमारें चारशें मैल गेलों तर लीव्हॉंटमधील **ऱ्होड्स** नांवाचें एक बेट आपल्याला लागेल. हेंच आपल्या **तिसऱ्या आश्चर्याचें स्थान** होतें. अलेक्झांडरनें इतरां-प्रमाणेंच ऱ्होडियन लोकानांही जिंकून आपल्या ताब्यांत आणलें होतें व त्यांनींही त्याची सत्ता कबूल केली होती. पण त्याच्या मरणानंतर इजिप्त देश जसा टॉले-मीसोटरच्या ताब्यांत आला, त्याप्रमाणें ऱ्होडियन लोकांनींही अलेक्झांडरच्या वंशजांची सत्ता झुगारून ते स्वतंत्र बनले. तेव्हां इजिप्त आणि ऱ्होडस यांच्या-मधील व्यापार थांबवावा म्हणून एन्टिगोनस यानें आपला मुलगा डेमेट्रियस यास पाठविलें; परंतु टॉले-मीच्या साहाय्यानें डेमेट्रियस यास वेढा उठविण्यास ऱ्होडियन लोकांनीं भाग पाडिलें व ऱ्होडियन लोकांचें शौर्य पाहून डेमेट्रियस हा इतका खुष झाला कीं,

ऱ्होडियनांचा नाश करण्याकरितां जी सामग्री त्यानें जमविली होती ती ऱ्होडियन लोकांना त्यानें नजर केली. ती विकून त्याच्या पैशानें, लढाईंत जय आल्याबद्दल अपोलो देवाचा एक मोठा थोरला पुतळा उभारण्याचा त्यांनीं निश्चय केला व हें काम शारीस आणि लाशीस यांच्याकडे सोंपविलें. या पुतळ्याचें काम बारा वर्षें चालू होतें. ही मूर्ती मिश्र धातूची असून तिची उंची १.२५ फूट होती. ती पोकळ असून आंतल्या बाजूनें वर जाण्यास वाटोळे जिने होते. त्याच्या टोकावरून सिरीया प्रांत व समुद्रांत पुष्कळ लांबवर गलबतें दिसत असत. तो पुतळा दोन्ही पाय फांकून उभा होता अशी कल्पना आहे. शहराला दोन बंदरें असून एकाचें प्रवेशद्वार ५० व दुसऱ्याचें २० फूट होतें. या दुसऱ्या ठिकाणीं पुतळा असावा अशी कल्पना जास्त संभवनीय दिसते. याच्या पायाखालून लहान सहान गलबतें सहज जाऊं शकत. हा पुतळा इसवी सनापूर्वी ३०० च्या सुमारास स्थानापन्न झाला व ६० वर्षांनीं एका भूकंपाच्या धक्क्यानें तो समुद्रांत पडला. ऱ्होडियन लोकांनीं आसपासच्या लोकांच्या मदतीनें तो पुतळा काढून पुन्हा उभा करण्याची खटपट चालविली; परंतु डेल्फी येथें पुतळा पुन्हा उभा करण्यासंबंधी अनुकूल असा कौल मिळाला नाहीं.

यामुळें हा पुतळा इ. स. ६७२ पर्यंत म्हणजे सरासरी ९०० वर्षें समुद्रांतच पडून होता. इतक्या अवधींत बऱ्याच घडामोडी होऊन ऱ्होड्स बेट सॅरॅसिन लोकांच्या ताब्यांत गेलें होतें, आणि त्यांनीं हा पुतळा एका ज्यू व्यापाऱ्यास विकला. त्या व्यापाऱ्यानें पुतळ्याच्या धातूनें ९०० उंट लादून नेले. साधारणतः प्रत्येक उंटावर अर्धखंडी वजन याप्रमाणें अंदाज केल्यास एकंदर धातू ४५० खंडी होती असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

ऱ्होड्स बेट सोडून जर आपण आशिया मायनरच्या बुडून बंदरीं येऊन दाखल झालों तर जवळच आपल्याला जगांतील **चवथ्या आश्चर्याची जागा** आढळेल. हें बंदर ऱ्होड्स बेटाच्या समोरच उत्तरेस आहे. याच ठिकाणास पूर्वी हेलिकारनासस असें नांव होतें, व तेथें डोरियन लोकांचें राज्य होतें. केरिया प्रांताचें तें राजधानीचें ठिकाण होतें. इसवी सनापूर्वीं चवथ्या शतकांत मॅसोलस नांवाचा राजा राज्य करीत होता. या ठिकाणची स्वाभाविक रचना बंदराला व व्यापाराला सोईची पाहून यानें राजवाडा वगैरे बांधून तेंच मुख्य शहर केलें, व इतर बऱ्याच सुधारणा केल्या. त्याच्या राणीचें नांव आरटीमिसिया असून दोघांचें एकमेकांवर इतकें प्रेम होतें कीं असें प्रेम राजाराणींत क्वचित्च सांपडेल.

इ. स. पूर्वी ३५३ त राजा मॉसोलस मरण पावला. त्या लोकांत आपल्याप्रमाणेंच प्रेतें जाळण्याची चाल होती. चालीप्रमाणें राजाचें प्रेतही जाळलें. राणीनें प्रेमभरानें प्रेताची सर्व राख एके ठिकाणीं करून पाण्यांत कालवून पिऊन टाकली असें सांगतात आणि त्याच्या ( राजाच्या ) स्मरणार्थ सर्व जगांत अपूर्व असें थडगें बांधण्याचा तिनें निश्चय करून हें काम पिथिस आणि सॅटिरस यांजकडे सोंपविलें. राजाच्या मरणानंतर दोनच वर्षांनीं राणीनेंही देह ठेवला व काम पुरें झालेलें तिनें पाहिलें नाहीं व तिच्या मरणानंतर काम पुरें झालें कीं नाहीं अशीही शंका येणें साहजीकच आहे. परंतु त्या वेळच्या शिल्पज्ञांनीं केवळ आपल्या कलेचा गौरव व्हावा व आपलें नांव व्हावें म्हणूनच हें काम पुरें केलें. याच वेळीं राणीनें सर्व विद्वान लोक दरबारीं बोलावून मॅसोलसचें गुण वर्णनात्मक काव्य करणारास बक्षीस देणेचें ठरविलें व हें बक्षीस प्रसिद्ध तत्ववेत्ता जो साक्रेतीस याच्या एका शिष्यानें पटकाविलें असें सांगतात. हें थडगें साधारण चौकोनीच होतें, त्याची एक बाजू ११३ फूट व दुसरी ९३ फूट होती. सभोंवार ६० फूट उंचीचे ३६ खांब असून यावरचा आकार साधारण पिरॅमिडसारखा होता.

एकंदर उंची १४० फूट होती. सर्व उत्तम संगम-

रवरी दगडाचें बांधलें असून, ग्रिशीयन पद्धतीच्या नक्स कामानें सजविलें होतें. हें बांधावयास इतका खर्च आला होता कीं, एके वेळीं एक महान् तत्ववेत्ता ( अॅनॅक्झॅगोरास ) तें पहावयास गेला असतां " अबब ! किती तरी पैसा दगडांत घातला हा ! " असें म्हणाला. हें थडगें इतकें प्रसिद्ध होतें कीं, कोणत्याही थडग्यास मॉसोलियम् हाच शब्द लावण्याची वहिवाट पडली. या पैकीं कांहीं अवशेष ब्रिटिश संग्रहालयांत आहेत असें सांगतात.

येथून जवळच स्मर्नाच्या अग्नयेस ३८ मैलांवर आपणाला **पांचवें आश्चर्य** सांपडेल. तें म्हणजे एफिसस येथील डायना देवीचें मंदीर होय. प्राचीन काळीं हें शहर फारच प्रसिद्ध होतें. एका ग्रीक ग्रंथकारानें तर याला आशियाचा एक ' डोळा ' असेंच म्हटलें आहे. अशी समजूत होती कीं, प्रत्यक्ष ज्युपिटरनें (बृहस्पतीनें) स्वर्गांतून डायना देवीचा लांकडाचा केलेला एक लहानसा पुतळा पाठवून दिला. हा पुतळा ठेवून त्याची पूजाअर्चा करण्याकरितां, इ. स. पूर्वी ५७० मध्यें सव्हियस ट्रुलियसनें एक फारच भव्य मंदीर बांधलें. परंतु लवकरच दुर्दैवानें याचा आगीनें नाश झाला. या देवळासंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, याचा तीन वेळ अग्नीनें नाश झाला व तीन वेळ पुन्हा नवीन बांधलें; चवथे वेळीं मात्र नाश होण्याची अगदीं पाळी आली असून त्या वेळीं तें अचानक बचावलें. इ. स. पूर्वी ५४० च्या सुमारास पुन्हा देऊळ बांधावयास सुरुवात केली, आणि पूर्वीपेक्षांही जास्त भव्य व सुंदर अशी ही इमारत झाली. इ. स. पूर्वी ४०० मध्यें ज्या दिवशीं महान् तत्ववेत्ता साक्रेतीस याला वीष दिलें, त्याच दिवशीं इकडे देवळास आग लागली. देऊळ पुन्हा बांधलें. पूर्वीपेक्षांही उत्तम झालें. ' कावळा बसावयास व खांदी मोडावयास एक गांठ ' म्हणा, किंवा काय वाटेल तें म्हणा. पण अलेक्झांडर ज्या रात्रीं जन्मला त्याच रात्रीं देवळास एरस्ट्रेटसनें आग लावली. यानें आपला गुन्हा कबूल करून केवळ आपलें नांव अजरामर व्हावें म्हणूनच आपण अशा सर्वोत्कृष्ट मंदिरास आग लावली असें सांगितलें.

यानंतर कोणींही त्याचा नामनिर्देश करूं नये असा वट हुकूम सोडण्यांत आला. पण त्या योगें त्याचें नांव जास्तच प्रसिद्ध झालें. या ठिकाणीं आपल्याकडील एका संस्कृत श्लोकाची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. " घटंभिन्द्यात्पटंछिन्द्यात्कुर्याद्वा रासभध्वनिम् । येनकेन प्रकारेण प्रसिद्धःपुरुषोभवेत् ॥ " गाडगीं फोडावीं, उंची वस्त्रांच्या चिंध्या कराव्या, शंकध्वनी करावा, गाढवाप्रमाणें ओरडावें, काय वाटेल तें करावें पण प्रसिद्धीला यावें अशांतलाच वरील प्रकार होय. असो; इराणचा राजा झर्सस हा जेथें जेथें गेला, तेथें तेथें त्यानें मूर्तिपूजकांचीं मंदिरें व मूर्ती यांचा समूळ उच्छेद केला. परंतु येथें आल्यावर देवळाचें सौंदर्य पाहून त्याचा निश्चय डळमळला, आणि त्याच्या तडाख्यांतून देऊळ वांचलें. या एकाच गोष्टीवरून देऊळ किती उत्तम असलें पाहिजे याची कल्पना होते. अलेक्झांडरनें एका अटीवर देऊळ पुन्हा बांधण्याचें कबूल केलें आणि ती अट म्हणजे स्वतःचें नांव प्रमुख भागीं असावें. परंतु एफिसस येथील लोकांनीं अत्यंत आदरानें त्याचें म्हणणें नाकबूल केलें. व लोकांचा इतका उत्साह होता कीं, बायकांनीं आपले दागिने विकून, देऊळ बांधण्याकरितां रकमा दिल्या व देऊळ पुन्हा बांधलें. देवळाची लांबी ४२५ फूट व रुंदी २२० फूट होती. १२७ खांब असून प्रत्येकाची उंची ६० फूट—म्हणजे सरासरी ६।७ मजले म्हणावयास हरकत नाहीं—होती. शेवटीं हें देऊळ गॉथ लोकांनीं जाळून टाकलें व यानंतर हें पुन्हा बांधलें नाहीं. अद्याप त्याचे कांहीं अवशेष सांपडतात.

राहिलेल्या दोहोंपैकीं एक आशियांत व एक यूरोपांत आहे. स्मर्ना येथून गलबतांत बसून, एजियन् किंवा आर्किपेलागोचा समुद्र ओलांडला, म्हणजे ग्रीसच्या दक्षिणेस असणारें मोरिया नांवाचें द्वीपकल्प लागेल.

त्याला वळसा घालून, त्याच्या पश्चिम किनाऱ्यावर साधारण मध्येंच आपण उतरलों, तर जवळच आपणास ऑलिंपिया शहर दिसेल. याच ठिकाणीं **सहावें आश्चर्य** होतें. फार प्राचीन काळीं म्हणजे सुमारें इ. स. पूर्वीं १२२२ च्या सुमारास ज्युपिटर देवाच्या सन्मानार्थ दर ५९ वर्षांनीं मर्दानी खेळांचा सामना करण्याची चाल प्रत्यक्ष हरक्युलिसनें सुरू केली म्हणतात. नंतर कांहीं वर्षांनीं ही चाल बंद झाली होती; परंतु पुन्हा इ. स. ७७६ त ती सुरू झाली व त्याची सर्व व्यवस्था एलियन लोकांकडे दिली होती. याच वेळीं अथेन्समधील एक अत्यंत मोठा कारागीर फिडिआस हा तेथून पळून आला होता. कारण अथेन्स शहराला भूषण होऊन राहिलेल्या मिनर्व्हाचा पुतळा तयार करण्यास दिलेल्या सोन्यापैकीं कांहीं सोनें चोरलें असा त्यावर आळ आला होता. तेव्हां त्याचा होणारा भयंकर परिणाम टाळावा म्हणून तो अथेन्स येथून ऑलिंपिया येथें आला होता. त्याचा फायदा घेऊन एलियन लोकांनीं त्याचेकडे ज्युपिटरचा एक पुतळा करण्याचें काम सोंपविलें. व त्यानेंही मोठ्या आनंदानें तें काम हातीं घेऊन मिनर्व्हाच्या पुतळ्यावर कडी करून अशा तऱ्हेनें ऑथिनियन लोकांचा सूड घेण्याचा निश्चय केला. हा सर्व पुतळा सोनें आणि हस्तिदंत यांचा बनवलेला होता. आणि त्याची नक्की उंची काय होती यासंबंधीं कोठेंच कांहीं सांपडत नाहीं; परंतु ही मूर्ति बसलेली असून तिचें डोकें बहुतेक देवळाच्या शिखराला लागण्याच्या बेतांत होतें. आणि असें वाटे कीं, ती मूर्ति जर उठली तर छपर डोक्यावर घेऊन उठेल. या देवळाची आंतील उंची ६० फूट होती, यावरून मूर्तीची उंची अदमासें ४०।४५ फूट असेल असें वाटतें. आणि हें शक्य आहे; कारण फिडिआस यानें अथेन्स येथें केलेली मिनर्व्हाची मूर्ति सुवर्ण व हस्तिदंताची असून ३९ फूट उंच होती. ज्युपिटरचा पुतळा जरी एवढा मोठा होता तरी तो अगदीं प्रमाणशीर होता. आणि त्याचें काम इतकें उत्कृष्ट झालें होतें कीं, पहाणाराला आपण पुतळा पहात नसून प्रत्यक्ष देवाचेंच दर्शन घेत आहों असें वाटे. ही कांहीं अज्ञानी लोकांची स्थिति होती असें नाहीं, तर रोमन लोकांचा अत्यंत विद्वान कायदे पंडीतही असेंच म्हणतो. हा पुतळा पाहिल्याशिवाय मरण येणें म्हणजे मोठेंच पाप असें ग्रीस आणि इटलीमधील लोक समजत असत. याच्या उत्कृष्टपणाबद्दल अशी एक आख्यायिका सांगतात कीं, फिडीआसनें काम पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष ज्युपिटरलाच विनंति करून आपल्या कौशल्यानें तुष्ट झालास कीं नाहीं अशी पृच्छा केली व देवानेंही विद्युद्रूपानें आपली पसंती दर्शविली. विनंति करतांच देवळाच्या फरशीवर वीज पडून नंतर त्या ठिकाणीं एक आकृती उमटली. मिनर्व्हाच्या पुतळ्याला लागलेल्या सोन्याची किंमत १२०००० पौंड होती, यावरून ज्युपिटरच्या पुतळ्यासंबंधीं थोडी कल्पना करितां येईल.

येथून निघून आपण पुन्हा आशियांतील तुर्कस्थानांत येऊन मेसापोटेमिया प्रांतांत गेलों तर आपणास बगदाद नांवाचें प्रसिद्ध शहर लागेल. हें तैग्रीस नदीच्या कांठीं आहे. याचे दक्षिणेस अथवा किंचित् नैऋत्येस ५० मैलांवर एक गांव आहे त्यास हिल्हे म्हणतात. हें एक लहानसें खेडेंच आहे. हें युफ्रेतीस नदीवर आहे. याच ठिकाणीं पूर्वीं एके काळीं एक मोठें प्रचंड शहर होतें. लंडन ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें असेल किंवा त्याचें वर्णन ऐकिलें असेल त्यास याची कल्पना सहज होईल व अशा तऱ्हेचें शहर असणें असंभवनीयही वाटणार नाहीं. या शहरास बॅबीलोन असें नांव होतें. अद्याप त्याचे कांहीं अवशेष हिल्हेच्या आसपास सांपडतात. हेंच आपले **सातवें आश्चर्य** होय. हें शहरच केवळ आश्चर्यजनक होतें असें नाहीं तर शिवाय शहरांत इतर २।३ आश्चर्यकारक गोष्टी होत्या, त्यांचें क्रमानें वर्णन येईलच. या शहराची स्थापना कोणी म्हणतात सेमिरामीसनें केली; कोणी म्हणतात बीलसनें केली. ती कोणी कां केलेली असेना, एवढें मात्र खरें

कीं, जगांतल्या आश्चर्याचें रूप त्याला येण्याला कारणीभूत केवळ नेबुशाड्नेझरच होय.

शहर, भिंती, राजवाडा, बीलसचें मंदीर व हँगिंगगार्डन्स इतक्या गोष्टी या ठिकाणीं आश्चर्यजनक होत्या.

शहर १५ मैल लांब व १५ मैल रुंद असून अगदीं काटकोनांत होतें. फार प्राचीनकाळीं निनिव्हे नांवाचें एक अशाच तऱ्हेचें शहर होतें. त्याचीही लांबी-रुंदी इतकीच होती. पण तें अगदीं काटकोनांत नसल्यामुळें त्याचें क्षेत्रफळ कमी होतें व बॅबीलोनचें जास्त होतें. नेबुशाड्नेझर व त्याचा बाप या दोघांनीं निनिव्हे ( असिरियन लोकांची राजधानी ) शहराचा नाश केल्यावर त्यापेक्षां श्रेष्ठ प्रतीचें शहर बांधण्याचा नेबुशाड्नेझरनें निश्चय केला.

या शहराचें क्षेत्रफळ अर्थात २२५ चौरस मैल होतें. सबंध शहराभोंवती जी भिंत होती तिची उंची ३५० फूट असून तिची जाडी ८७ फूट होती. ही विटांची बांधलेली असून त्या भोंवती खंदक होता. खंदकाच्या दोन्ही बाजू विटांनीं बांधून काढल्या होत्या. हा खंदक केवढा मोठा होता याची साधारण कल्पना येण्यास इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं खंदक म्हणून जी माती निघाली तिच्याच विटा बनवून त्यांनीं शहराचा तट व खंदकाच्या बाजू बांधून काढल्या होत्या. तटाच्या विटा चुन्यानें पक्क्या न करितां त्या देशांतल्या जमिनींतून निघणारें बिटुयेन नांवाच्या चिकट पदार्थानें पक्क्या बसवल्या होत्या. इमारतींचे दगड, विटा चुन्यापेक्षां यानें जास्त घट्ट बसतात. शहराच्या प्रत्येक बाजूच्या तटाला २५।२५ भले मोठे भरीव पितळेचे दरवाजे होते. म्हणजे एकंदर १०० दरवाजे होते. प्रत्येक दोन दरवाजांमध्यें तटावर १०।१० फूट उंचीचे असे तीन तीन टेहेळणीचे मनोरे होते; मात्र हे कांहीं चारी बाजूंला नव्हते. तर जिकडून शत्रूच्या भीतीचा संभव जास्त तिकडेच होते. हे सरासरी २५० पेक्षां जास्त नव्हते; नाहीं तर वरच्या हिशेबानें पाहूं गेलें असतां चारी कोपऱ्यांवरील चार धरून ३१६ असावयास पाहिजे होते. या पंचवीस पंचवीस दरवाजांतून मोठमोठ्या सडका निघून थेट सरळ समोरच्या २५।२५ दरवाज्यांना मिळाल्या होत्या, म्हणजे २५ उभे व २५ आडवे रस्ते होते व त्यांचे ६२५ चौक बनले होते. या प्रत्येक रस्त्याची रुंदी १५० फूट होती. शिवाय तटाच्या भिंतीला लागून आंतल्या चारी बाजूनें २०० फूट रुंदीची एक सडक होती. या सर्व रस्त्यांच्या योगानें शहराचे एकंदर ६७६ भाग झाले असून प्रत्येक भागाची लांबीरुंदी अर्ध्या मैलापेक्षां जास्त होती. शहराच्या मधून युफ्रेटीस नदी वाहत होती. नदीवर शहराच्या मध्यभागीं पूल असून पुलाच्या दोन्ही टोंकांस नवा व जुना असे राजवाडे होते. जुना राजवाडा पूर्व टोंकाला असून जवळच बीलसचें मंदीर होतें. नदीच्या पूर्व भागाच्या शहरास जुनें व पश्चिमेच्या भागास नवें शहर म्हणत. या एवढ्या अवाढव्य शहरांत वस्ती करण्याकरितां नेबुशाड्नेझरनें जुडिया वगैरे जिंकलेल्या प्रांतांतून पुष्कळ कैदी आणले होते. तरी पण शहरांत पूर्ण अशी वस्ती कधीं झालीच नाहीं. क्षेत्रफळाच्या मानानें लोकवस्ती फारच थोडी होती. नेबुशाड्नेझरच्या मरणानंतर पंचवीसच वर्षांनीं सायरसनें शूशान येथें राजधानी नेल्यामुळें हें शहर मागें पडलें आणि अलेक्झांडर ज्या वेळीं येथें आला होता त्या वेळीं १४००० चौरस फर्लांगांपैकीं फक्त ८१०० मध्येंच वस्ती होती. बाकीच्या ठिकाणीं पेरीत असत. ज्या विनिन्हे शहराच्या धर्तीवर हें बांधलें होतें त्याची लोकसंख्या मात्र खूपच असे. नुसत्या लहान मुलांचीच संख्या १२०००० असे, असें सांगतात.

शहरानंतर दुसरी गोष्ट म्हणजे बीलसचें मंदीर होय. हें पिरॅमिडच्या आकाराचें असून इजिप्तांतील अत्यन्त मोठ्या पिरॅमिडपेक्षां उंचीला जवळ जवळ १२० फूट जास्त होतें. फक्त याची बाजू मात्र लांबीला कमी म्हणजे ६०० फूटच होती. याला आठ मजले असून प्रत्येकाची उंची सरासरी ७५ फूट म्हणजे जवळ जवळ

मनोऱ्यावर मनोरे ठेवल्याप्रमाणें होते. मुख्य पूजाअर्चा अगदीं शेवटल्या मजल्यावर चालत असे. शेवटल्या मजल्याच्या टोंकावर वेधशाळा होती व यामुळेंच बॅबिलोनचे लोक खगोल शास्त्रांत इतरांच्या पुढें होते. अलेक्झांडर बरोबर एक तत्वज्ञ गेला होता. त्याला या ठिकाणीं जवळ जवळ १९०० वर्षांचे वेध लिहून ठेवलेले सांपडले. हें देऊळ झर्क्सिसच्या वेळेपर्यंत होतें असें सांगतात. परंतु ग्रीसवर स्वारी करून परत येतांना देवळातील सर्व सुवर्ण मूर्ती ( एक मूर्ति ४० फूट उंच होती म्हणतात ) व संपत्ती लुटून देऊळ जमीनदोस्त करून टाकलें. २००० वर्षेपर्यंत जमवलेली सर्व संपत्ती यानें लुटून नेली. तेव्हां काय अगणीत संपत्ती नेली असेल याचा अंदाजच करितां येत नाहीं. सोमनाथाच्या मूर्तींत ज्याप्रमाणें हिरेमाणकें निघालीं त्याप्रमाणें वरील मूर्तींमध्यें बाबिलोनिश मोहरा निघाल्या.

या देवळाजवळच जुना राजवाडा होता. पण त्यांत विशेष आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे झुलती बाग होय. ज्या प्रदेशांत हें शहर वसविलें होतें त्यांत डोंगर, पर्वत, किंवा टेंकडी मुळींच नाहीं. यामुळें डोंगराळ प्रदेशाच्या वनश्रीची या ठिकाणीं उणीव होती. ही उणीव राजापेक्षां राणीला जास्त भासे; कारण तिचें बालपण मिडिया देशांतीलें डोंगर व जंगलें हीं पाहण्यांत गेलें होतें; ती मिडियाच्या राजाची मुलगी होती. लग्न होऊन येथें आल्यावर तिला साहजीकच असें वाटलें कीं, आपल्या जन्मभूमीप्रमाणेंच येथेंही देखावे असतील; पण तिची अत्यंत निराशा झाली व तिला फारच वाईटही वाटत असे; तेव्हां केवळ तिच्या मर्जीखातर कृत्रिम टेंकडी करून त्यावर बागबगीच्या, जंगल वगैरे करण्याचें राजानें ठरविलें. याच बागेला झुलता बगीचा म्हणत असत. या बागेच्या टेंकडीची प्रत्येक बाजू ४०० फूट होती, आणि उंची शहराच्या भिंतीइतकी होती; याचा आकार म्हणजे साधारण पिरॅमिडसारखाच म्हणजे लहान लहान होत गेलेल्या पायऱ्याप्रमाणें होता. प्रत्येक पायरीवर जाण्यास १०। १० फूट रुंदीचे रस्ते होते. याची रचना खालीं लिहिल्याप्रमाणें केली होती. पहिल्याप्रथम मोठमोठ्या कमानी उभारल्या होत्या, त्यावर दुसऱ्या कमानी, त्यावर तिसऱ्या याप्रमाणें शेवटपर्यंत केलें असून कमानीच्या टोंकांवर पहिल्या प्रथम १६ फूट लांब, व ४। ४ फूट रुंदीचे दगड टाकून नंतर त्यावर बिटुमेन व गवत वगैरे चांगलें मिसळून पसरलें होतें. यावर विटांचे दोन दोन थर देऊन वरतीं शिशाचें खूब जाड पत्रे पसरून दिले होते; नंतर याच्यावर मातीचा थर घालून बाग केली होती. हा मातीचा थर इतका जाड होता, कीं मोठमोठीं झाडेंसुद्धां सहज वाढावीं. अशा या टेकडीवर कित्येक ठिकाणीं वनश्रीचे देखावे तर कित्येक ठिकाणीं लताकुंज, कारंजीं, निरनिराळ्या तऱ्हेचीं झाडें वगैरेंनीं फारच शोभा आणलेली होती. राजानें शक्य ते प्रयत्न करून आपल्या राणीची हौस पूर्ण करून तिला आपल्या घरची आठवण होऊन दुःख वाटणार नाहीं अशी व्यवस्था केली होती. कमानीच्या आंत मोठमोठीं दालनें काढलीं होतीं, म्हणजे टेंकडी आंतून पोकळ असून वर मात्र बगीचा होता; म्हणूनच याला हँगिंग गार्डन असें नांव दिलें आहे. आपल्या मुंबईसही हँगिंग गार्डन आहे, ती ज्यांनीं पाहिली असेल त्यांस याविषयीं जास्त चांगली कल्पना येईल. याशिवाय युफ्रेटिस नदीला पूर आल्यानें शहरांत पाणी शिरून त्याचा खराबा होऊं नये म्हणून राजा नेबुशाड्नेझर यानें युफ्रेटिस नदीला दोन कालवे काढून ते टैग्रिस नदीस जोडून दिलें होतें. शिवाय एक कृत्रीम तलावही केला होता; उद्देश हा कीं, नदीला कितीही पूर आला तरी शहरास त्रास होऊं नये युफ्रेटिस नदी आर्मीनियाच्या डोंगराळ प्रदेशांत उगम पावते व उन्हाळ्यांत येथील बर्फ वितळलें म्हणजे नदीला सपाटूनच पाणी चढतें. आणि वरीलसारखी व्यवस्था नसती तर तें शहराला अपायकारक झालें असतें.

# स्वभाव बदलतां येतो.

चांगलें किंवा वाईट खाण्याचा परिणाम शरीरावर होतो हें लहान मुलांना देखील माहीत असतें. परंतु प्राण्याचा स्वभाव देखील त्याच्या आहारावर अवलंबून असतो हें पुष्कळ लोकांच्या लक्षांत येत नाहीं. कित्येक लोक तर आहाराचा व स्वभावाचा बिलकूल संबंध नाहीं असें देखील म्हणत असतात. अशा लोकांनीं पुढें दिलेले दोन तीन प्रयोग वाचावे.

एका अगदीं गरीब स्वभावाच्या गाईवर पहिला प्रयोग करण्यांत आला तो असा: तिला दोन दिवस अगदीं उपाशीं ठेवण्यांत आलें; दाणा वैरण मुळींच दिला नाहीं; भुकेनें ती अगदीं व्याकुळ झाली तेव्हां शिजविलेलें मांस तिच्या पुढें ठेवलें. गाईचा निरुपाय झाल्यामुळें तिनें तें कसें तरी करून खालें. दुसऱ्या दिवशीं पुनः शिजलेलें मांसच तिला चारलें. तिनें तें फारशी तक्रार न करतां खाऊन टाकलें. असें करता करता ४।६ दिवसांनीं ती तें मांस हौसेनें खाऊं लागली. नंतर साधारण शिजलेलें मांस तिला देण्यांत आलें, व हाच क्रम चालवितां चालवितां ती गाय अगदीं कच्चें मांस बिनतक्रारच नव्हे तर आधाशाप्रमाणें झपाझप खाऊं लागली. खाण्याच्या दृष्टीनें एवढा फरक होण्यास दोन महिने लागले. आणि या फरकाबरोबर तिचा स्वभाव देखील अजीबात बदलला. पूर्वीं ती जितकी गरीब होती तितकीच ती आतां मारकट, बेफाम व क्रूर बनली. अगदीं ओळखीच्या माणसांना देखील ती शिंगें मारूं लागली. सारांश, तिचा स्वभाव मांसाहारी प्राण्याप्रमाणें बनला.

दुसरा प्रयोग एका अस्वलावर करण्यांत आला. कांहीं माणसें शिकारीस गेल्या वेळीं त्यांना रानांत अस्वलाचीं पिलें सांपडलीं. तीं क्रूर जातीचीं होतीं. परंतु त्यांना फक्त भात, भाकरी वगैरे साधें अन्न खावयास दिलें. तीं पिलें मोठीं झालीं तरी स्वभावानें अगदीं गरीब निपजलीं. मांजराच्या पिलांप्रमाणें तीं मालकाच्या मुलाबरोबर लडिवाळपणें खेळत असत, व त्यांच्यापासून कोणासही त्रास झाला नाहीं. कुत्रा अस्वलाचा स्वाभाविक शत्रु आहे. परंतु वर सांगितलेलें अस्वलाचें पोर घरच्या कुत्र्याबरोबर मोठ्या प्रेमानें खेळत असे. हा क्रम एक वर्ष चालला. नंतर मागें सांगितलेल्या गाईप्रमाणें त्या अस्वलाला प्रथम शिजविलेलें व नंतर कच्चें मांस खाण्यास दिलें. दोन तीन महिन्यांत ते अस्वलाचें पोर अगदीं बदलून गेलें. त्याचें सौम्य स्वरूप नाहींसें होऊन तें ज्याच्या त्याच्या अंगावर गुरगुरूं लागलें. घरच्या माणसाशीं व कुत्र्याशीं खेळण्याचें सोडून तें एकीकडे बसून राही; व कोणी जवळ गेल्यास त्याच्या अंगावर चाल करून येत असे. प्रत्येकजण आपला शत्रु आहे असें आतां त्यास वाटूं लागलें.

हे दोनही प्रयोग सात आठ वेळां निरनिराळ्या ठिकाणीं करण्यांत आले व प्रत्येक ठिकाणीं तोच परिणाम झाला. यावरून शाकाहारी प्राणी गरीब स्वभावाचा व मांसाहारी क्रूर स्वभावाचा बनतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हा प्रयोग सृष्टीच्या घडामोडींत हजारों ठिकाणीं चाललेला असतो. उदाहरणार्थ मधमाशा घ्या. प्रत्येक पोळ्यांत एक राणी माशी व बाकीच्या साध्या मधमाशा असतात. जेव्हां ही राणी माशी मरण पावते तेव्हां बाकीच्या सर्व माशांची एक सभा भरते. आणि आपल्यापैकीं एकीची निवडणूक करून तिला राणी माशी बनविण्याचा ठराव करतात. साध्या मधमाशा प्रजोत्पत्तीचें काम करीत नाहींत. त्या नर नव्हेत किंवा माद्याही नव्हेत. खपणें, काम करणें एवढेंच त्यांना माहीत असतें. संतती उत्पन्न करण्याचें काम फक्त एका राणी माशीकडे असतें. असो; राणी माशीची निवड झाल्या-

वर तिला एका निराळ्या घरांत ठेवतात; व निराळा खुराक खाऊं घालतात.

हा खुराक कसा बनवितात हें मनुष्यांस अद्याप कळलें नाहीं; त्यांत नैट्रोजन व कार्बो हायड्रेट हीं द्रव्यें पुष्कळ असतात एवढें मात्र रासायनिक पृथक्करणानें कळलें आहे. स्थूलमानानें या खुराकांत नैट्रोजन, प्रोटीन (पौष्टिक द्रव्यें) आणि साखर असते असें म्हणतां येईल. हा खुराक तीन चार महिने खाल्ल्यानंतर ती माशी पुष्ट होते. तिचा आकार पूर्वींच्या दुप्पट होतो, व ती मादी बनते ! आणि तिला मुलें होऊं लागतात. हा सर्व फरक फक्त अन्नाचा बदल केल्यामुळें घडून येतो. यावरून शरीर, मन, बुद्धि व स्वभाव या सर्वांवर अन्नाचा परिणाम होतो हें उघड आहे.

सध्या जगांतील लोक एकमेकांशीं भांडतात, चांगल्या सज्जनाचा छळ करतात, सरळ धोपट मार्गानें जाणें त्यांना आवडत नाहीं, लबाडी व कपट यांच्या सहायानें लोकांचा पैसा हिरावून घेण्यांत त्यांना आनंद वाटतो यास कारण लोकांचा आहार शास्त्रशुद्ध नाहीं अशी एका शास्त्रज्ञानें उपपत्ती लावली आहे ती विचार करण्यासारखी आहे.

# शंकासमाधान.

[ आमच्या कित्येक वाचकांनीं पत्रद्वारें आम्हांकडे कांहीं शंका विचारल्या आहेत. त्यांपैकी ज्यांत शास्त्रीय तत्वें गोवलेली आहेत, अशीं प्रश्नोत्तरें या ठिकाणी देत आहों. ]

१ प्रश्नः—पाण्याचें भांडें चुलीवर ठेऊन खाली जाळ लावला असता पाणी ऊन होतें. पण त्याला आधण आल्यानंतर कितीही जाळ केला तरी पाण्याची उष्णता वाढत नाहीं ही गोष्ट खरी काय?

उत्तरः—पाणी किंवा दुसरा कोणताही प्रवाही पदार्थ हवेंत उघडा ठेऊन त्याला कितीही उष्णता दिली तरी ठरीव मर्यादे पलीकडे त्याचें उष्णतामान वाढत नाही. ही मर्यादा म्हणजे त्या प्रवाही पदार्थास वायुरूप प्राप्त होण्यास लागणारें उष्णतामान. आधण आलें म्हणजे पाण्याची वाफ बनते. त्यानंतर कितीही जाळ घातला तरी त्या उष्णतेनें पाण्याचें स्थित्यंतर मात्र होते; उष्णतामान वाढत नाहीं. पण हा सर्व प्रकार भांड्याचें तोंड उघडें ठेवल्या वेळचा आहे. जर भांड्याचें तोंड चांगलें बंद करतां येईल व भांडें वाफेच्या शक्तीनें फुटण्याजोगे नसेल तर त्यांत नेहमीच्या आधणापेक्षा अधीक उष्णतामानाचें पाणी तयार करतां येईल. आगगाडीच्या इंजनांतील बॉइलर मधलें आधण याचकारणामुळें आमच्या आधणापेक्षा फार ऊन असतें.

२ प्रश्नः—साबणाचे बुडबुडे करून खेळणें मला फार आवडतें. पण कपडे धुण्याच्या साबणाचे ( बार सोपचे ) बुडबुडे मोठे झाले तरी फार लवकर फुटतात. तर पुष्कळ वेळ टिकणारे बुडबुडे होण्यास कोणत्या पदार्थांचें मिश्रण बनवावें तें मला सांगाल काय ?

उत्तरः—मोगली एरंडाच्या चिकाचे बुडबुडे कपड्याच्या साबणाच्यापेक्षा टिकाऊ होतात; पण ते लहान असतात. मोठे व टिकाऊ बुडबुडे होण्यास खोबरेल तेलापासून बनविलेला साबण १ भाग, ग्लिसरीन ८ भाग व पाणी ८ भाग यांचें मिश्रण बनविलें पाहिजे. प्रथम एका बाटलींत पाणी घालून त्यांत साबण टाकावें; आणि बाटली जोरानें हालवावी म्हणजे तें साबण पाण्यांत विरघळतें. थोडावेळ थांबल्यानंतर तें साबणाचें पाणी स्वच्छ दिसतें किंवा नाही तें पहावें. खाली गाळ राहतां उपयोगी नाहीं; तसा राहिला असल्यास तें पाणी टाकून पुनः दुसरे पाणी घेऊन तोच प्रयोग करावा. नंतर त्यांत ग्लिसरीन मिसळून बाटली बराच वेळ हालवावी म्हणजे चांगलें मिश्रण तयार होतें. नंतर कागदाची सुरळी करून या मिश्रणांत ती बुडवून फुंकावी.

वर तिला एका निराळ्या घरांत ठेवतात; व निराळा खुराक खाऊं घालतात.

हा खुराक कसा बनवितात हें मनुष्यांस अद्याप कळलें नाहीं; त्यांत नैट्रोजन व कार्बो हायड्रेट हीं द्रव्यें पुष्कळ असतात एवढें मात्र रासायनिक पृथक्करणानें कळलें आहे. स्थूलमानानें या खुराकांत नैट्रोजन, प्रोटीन (पौष्टिक द्रव्यें) आणि साखर असते असें म्हणतां येईल. हा खुराक तीन चार महिने खाल्ल्यानंतर ती माशी पुष्ट होते. तिचा आकार पूर्वीच्या दुप्पट होतो, व ती मादी बनते ! आणि तिला मुलें होऊं लागतात. हा सर्व फरक फक्त अन्नाचा बदल केल्यामुळें घडून येतो. यावरून शरीर, मन, बुद्धि व स्वभाव या सर्वांवर अन्नाचा परिणाम होतो हें उघड आहे.

सध्या जगांतील लोक एकमेकांशीं भांडतात, चांगल्या सज्जनाचा छळ करतात, सरळ धोपट मार्गानें जाणें त्यांना आवडत नाहीं, लबाडी व कपट यांच्या सहायानें लोकांचा पैसा हिरावून घेण्यांत त्यांना आनंद वाटतो यास कारण लोकांचा आहार शास्त्रशुद्ध नाहीं अशी एका शास्त्रज्ञानें उपपत्ती लावली आहे ती विचार करण्यासारखी आहे.

## शंकासमाधान.

[ आमच्या कित्येक वाचकांनीं पत्रद्वारें आम्हांकडे कांहीं शंका विचारल्या आहेत. त्यांपैकी ज्यांत शास्त्रीय तत्वें गोवलेली आहेत, अशीं प्रश्नोत्तरें या ठिकाणी देत आहों. ]

१ प्रश्न:—पाण्याचें भांडें चुलीवर ठेऊन खाली जाळ लावला असता पाणी ऊन होतें. पण त्याला आधण आल्यानंतर कितीही जाळ केला तरी पाण्याची उष्णतां वाढत नाहीं ही गोष्ट खरी काय?

उत्तर:—पाणी किंवा दुसरा कोणताही प्रवाही पदार्थ हवेंत उघडा ठेऊन त्याला कितीही उष्णता दिली तरी ठरीव मर्यादे पलीकडे त्याचें उष्णतामान वाढत नाहीं. ही मर्यादा म्हणजे त्या प्रवाही पदार्थास वायुरूप प्राप्त होण्यास लागणारें उष्णतामान. आधण आलें म्हणजे पाण्याची वाफ बनते. त्यानंतर कितीही जाळ घातला तरी त्या उष्णतेनें पाण्याचें स्थित्यंतर मात्र होते; उष्णतामान वाढत नाहीं. पण हा सर्व प्रकार भांड्याचें तोंड उघडें ठेवल्या वेळचा आहे. जर भांड्याचें तोंड चांगलें बंद करतां येईल व भांडें वाफेच्या शक्तीनें फुटण्याजोगे नसेल तर त्यांत नेहमीच्या आधणापेक्षा अधीक उष्णतामानाचें पाणी तयार करतां येईल. आगगाडीच्या इंजनांतील बॉइलरमधलें आधण याचकारणामुळें आमच्या आधणापेक्षा फार ऊन असतें.

२ प्रश्न:—साबणाचे बुडबुडे करून खेळणें मला फार आवडतें. पण कपडे धुण्याच्या साबणाचे ( बार सोपचे ) बुडबुडे मोठे झाले तरी फार लवकर फुटतात. तर पुष्कळ वेळ टिकणारे बुडबुडे होण्यास कोणत्या पदार्थांचें मिश्रण बनवावें तें मला सांगाल काय?

उत्तर:—मोगली एरंडाच्या चिकाचे बुडबुडे कपड्याच्या साबणाच्यापेक्षा टिकाऊ होतात; पण ते लहान असतात. मोठे व टिकाऊ बुडबुडे होण्यास खोबरेल तेलापासून बनविलेला साबण १ भाग, ग्लिसरीन ८ भाग व पाणी ८ भाग यांचें मिश्रण बनविलें पाहिजे. प्रथम एका बाटलींत पाणी घालून त्यांत साबण टाकावें; आणि बाटली जोरानें हालवावी म्हणजे तें साबण पाण्यांत विरघळतें. थोडावेळ थांबल्यानंतर तें साबणाचें पाणी स्वच्छ दिसतें किंवा नाहीं तें पहावें. खाली गाळ राहतां उपयोगी नाहीं; तसा राहिला असल्यास तें पाणी टाकून पुनः दुसरे पाणी घेऊन तोच प्रयोग करावा. नंतर त्यांत ग्लिसरीन मिसळून बाटली बराच वेळ हालवावी म्हणजे चांगलें मिश्रण तयार होतें. नंतर कागदाची सुरळी करून या मिश्रणांत ती बुडवून फुंकावी.

# गप्पासप्पा.

आळस हें रोगाचें चिन्ह आहे असें अलीकडच्या डॉक्टरांचें मत आहे.

---

दोन तीन महिन्यांपूर्वी 'गुरु' हा ग्रह अत्यंत तेजस्वी दिसत होता. पण ब्रेस्ला येथील जर्मन सैनिकांना तो ग्रह नसून रशियन विमान आहे असा भ्रम झाल्यामुळें त्यावर त्यांनीं बंदुकांच्या फैरा झाडल्या.

---

अफगाणिस्थानच्या अमीरानें मोटार गाडी खरेदी केल्यापासून त्याला रस्ते चांगल्या स्थितींत राहिले पाहिजेत असें वाटूं लागलें आहे; व अलीकडे तेथें दहा हजार मैल लांबीचा रस्ता खडी घालून सुधारलेल्या पद्धतीनें तयार करण्यांत आला आहे.

---

हल्लींच्या महायुद्धांत मनुष्येतर प्राण्यांचा फार मोठ्या प्रमाणांत उपयोग होत आहे. घोडे, खेचरें व बैल हे बसण्यास व तोफा ओढण्यास उपयोगी पडतात; कुत्रे जखमी लोकांना शोधून काढण्याचें काम करतात; मांजरें खंदकांतील उंदरांचा फन्ना उडवितात; कबूतरें पत्रें पोंचवितात, आणि पांढरे उंदीर पाणबुडींतील धूर बाहेर पडूं लागल्यास त्याचा इषारा देतात.

---

खडक म्हटला कीं, त्याला भेगा असावयाच्याच; आणि या भेगांतून कोणत्या तरी वनस्पतीचें बीं पडून त्यास मूळें फुटतात. पुष्कळ वेळां हीं रोपें लहानपणींच मरतात; पण तीं मेलीं तरी तेथें कांहीं तरी जमीन तयार होते, व दुसऱ्या झाडांना रुजण्यास अधिक सोपें पडतें. अशा रीतीनें तयार झालेल्या जमीनींत वाऱ्याच्या सामर्थ्यानें एखाद्या जोरदार झाडाचें बीं उडून येऊन पडलें व तें रुजलें म्हणजे त्याच्या मुळ्यानें तो खडक दुभंगण्याचें काम पद्धतशीर रीतीनें सुरू होतें. या झगड्यापुढें कोणत्याही खडकास टिकाव धरतां येत नाहीं.

---

अलीकडे एका विलक्षण जातीच्या माशाचा शोध लागला आहे. पाण्यांवाचून मासा जगणें शक्य नाहीं असा सर्व साधारण समज आहे. पण हा मासा झाडावर घरटें करून राहतो ! व तेथें तो आपल्या 'बायकोची वाट' पाहतो. हें घरटें समुद्राच्या कांठीं उगवणाऱ्या गवताचें केलेलें असतें; व त्यास दोन दरवाजे असतात. हा विलक्षण मासा एका दरवाजांत पाहरा करीत असतो; व त्याच्या मनाजोगी बायको तेथें आली तर मात्र तिला दुसऱ्या दरवाजानें आंत येऊं देतो; इतरांना आंत येण्याची सक्त मनाई असते.

---

समुद्राचा तळ एकसारखा सपाट नाहीं. जमीनीवर ज्याप्रमाणें उंच टेंकड्या व खोल दऱ्या आहेत त्याचप्रमाणें समुद्राच्या तळाची स्थिति आहे. यामुळें हा तळ कांहीं ठिकाणीं अगदीं उथळ आहे तर कांहीं ठिकाणीं अतिशय खोल आहे. या खोल ठिकाणांचा 'ठाव' घेण्याकरितां सुधारलेल्या राष्ट्रांनीं कित्येक जहाजांची नेमणूक केली आहे; त्यांनीं लावलेल्या शोधावरून आतां असें ठरलें आहे कीं अमेरिकेच्या ताब्यांतील गुआम बेटापासून अग्नेयेस ७५ मैलांवर पासिफिक महासागरांत एक ठिकाण आहे तेथें समुद्र जास्तींत जास्त खोल आहे. तेथें समुद्रपृष्ठापासून तळ ३१६१४ फुटांवर म्हणजे ६ मैलांपेक्षां अधिक खोल आहे. एकंदरींत समुद्राचा तळ सरासरी मानानें पाहिला असतां १२६०० फूट खोल आहे.

---